www.vitragvani.com

# अष्ट पाहुड



भाषा वचनिकाकार
पंडितवर श्री जयचंदजी छाबडा

मराठी अनुवाद
डॉ. प्रा. रेखा नविनचंद्र जैन, पुणे

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

श्रीमद् भगवत्कुन्द कुन्दाचार्य देव विरचित

# अष्ट पाहुड

* भाषा वचनिकाकार *
पंडितवर श्री जयचंदजी छाबडा

* मराठी भाष्यानुवाद *
डॉ. प्रा. रेखा नविनचंद्र जैन, M.D. Phd (महामहोपाध्याय)
पुणे, (महाराष्ट्र)

* प्रकाशक *
पूज्य श्री कानजी स्वामी स्मारक ट्रस्ट
जैन मुमुक्षु अंतर्गत महिला मंडळ, देवळाली.
लामरोड, बेलतगांव, रेल्वे भुसिंग, देवळाली - ४२२ ४०१.

* सौजन्य *
श्री कुंदकुंद - कहान पारमार्थिक ट्रस्ट
मुबंई - ४०० ०५६.

मराठी संस्करण :– १५००
२६–११–२०११, भगवान महावीर निर्वाण दिन

मुल्य :- १००/– रु. (मुळ किमंत)
२०/– रु. (खरेदी किमंत)

**प्राप्ति स्थान : –**

**श्री कुंदकुंद – कहान पारमार्थिक ट्रस्ट**
३०२, कृष्ण कुंज, वी.एल.महेता मार्ग, विलेपार्ले (वेस्ट), मुंबई – ४०० ०५६
फोन : (०२२) २६१० ४९१२, २६१३ ०८२०.
e-mail : info@vitragvani.com www. vitragvani.com

**पूज्य श्री कानजी स्वामी स्मारक ट्रस्ट**
जैन मुमुक्षु अंतर्गत महिला मंडळ, देवळाली.
लामरोड, बेलतगांव, रेल्वे भुसिंग, देवळाली - ४२२ ४०१.

**मुद्रक**
समर्थ आटर्स्, नाशिक - ९.

# * प्रकाशकीय *

वीतरागी जिन शासनाच्या महान परंपरेत आचार्य भगवंत दिगंबर मुनिराज यांच्या द्वारे केले गेलेले लेखन कार्य सर्व जगाला संजिवनी प्रदान करणारे आहे. या कलियूगात भव्य जीवांना सुखाचा मार्ग सांगण्यासाठी जिनवाणी हे एकमेव श्रेष्ठ साधन आहे. अशा श्रेष्ठतम जिनवाणी चे रहस्य समजावुन घेवून ती आत्मसात करुन घेणे हाच एकमात्र सुखी होण्याचा उपाय आहे.

आचार्य कुंद कुंद देवकृत अष्ट पाहुड या ग्रंथाच्या पंडित जयचंदजी छाबडा कृत हिंन्दी भाषा वचनिका या ग्रंथाचा डॉ. रेखा जैन कृत मराठी भाषेतील अनुवादित केलेला हा ग्रंथ आपल्या हाती देतांना आम्हाला अत्यानंद होत आहे. चरणानुयोगाची मुख्यत: असलेल्या या ग्रंथाच्या माध्यमातुन परमहितकारी उपदेश दिला गेला आहे.

आध्यात्मिक सत्पुरुष पुज्य गुरु देव श्री कानजी स्वामींच्या पुण्य प्रभावाने स्थापित श्री कुंद कुंद कहान पारमार्थिक ट्रस्ट मुंबई, वीतरागवाणी तळागाळा पर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध आहे. महाराष्ट्रातील मराठी भाषिकजनतेला या अध्यात्मिक ग्रंथाचा अभ्यास करता यावा या उद्देशाने डॉ. रेखा जैन यांनी हा ग्रंथ सोप्या मराठी भाषेत अनुवादित केला आहे. तो आम्ही प्रकाशीत करत आहोत. हा ग्रंथ प्रकाशीत करण्यासाठी प्रोत्साहन आणि सहकार्य दिल्या बद्दल आम्ही ब्र. रमाबेन (देवळाली नाशिक) यांचे आभारी आहोत. या ग्रंथाचे सुंदर आणि वेळेत मुद्रण कार्य केल्या बद्दल समर्थ आर्ट्स चे श्री. विवेक मधुकर महाजन यांना आम्ही हार्दिक धन्यवाद देत आहोत.

सुज्ञ वाचकांना या अध्यात्मिक ग्रंथाचा स्वाध्याय करण्यासाठी तसेच मानवाच्या जीवनाचे सार्थक असणाऱ्या आत्मानूभुती करीता उपयुक्त होवो अशी आशा व्यक्त करतो.

धन्यवाद.

शुभेच्छु
अनंत राय ए सेठ
श्री कुंद-कुंद कहान पारमार्थिक ट्रस्ट मुंबई.

# ❋ अनुवादिकेचे मनोगत ❋

—डॉ. रेखा जैन

मंगल भगवान वीरो मंगलम् गौतमो गणी ।
मंगल कुंदकुदाद्यो जैन धर्मोस्तु मंगलम् ।।

ऑगस्ट २००९ मध्ये प्रतिवर्षा प्रमाणे पर्यूषणपर्व साजरे करण्यासाठी ''कहाननगर'' देवळाली (नाशिक) येथे मी गेले होते. तेथे दररोज भगवंतांचा अभिषेक, पूजा, प्रवचन यांचा अलभ्य लाभ मिळत होता. ब्र. रमाबेन यांचा धार्मिक सहवास आणि चर्चा चालू होती. त्यावेळी नुकताच 'प्रवचनसार' या कुंदकुंदाचार्य यांच्या ग्रंथाचा मराठी अनुवाद केलेली संहिता मी त्यांना दाखवत होते. तत्पूर्वि ''समयसार'' या ग्रंथाचा तसेच ''समयसार का सार'' या ग्रंथांचा मराठी अनुवाद मी केल्याचे त्यांना माहित होते त्यामुळे त्यावेळी त्यांनी एक कल्पना सुचवली त्या म्हणाल्या ''रेखाबेन आप पूरे कुंदकुंद आचार्य पंचपरमागमका आसान मराठी भाषामें अनुवाद करो । जिससे कुंदकुंद आचार्य की धार्मिक कृती का पठन हो जायेगा; और संपूर्ण महाराष्ट्र मे जनजन तक कुंदकुंद आचार्यजीका तत्त्वज्ञान पहुँचेगा । साथ ही साथ आपका ध्यान सदैव स्वाध्याय मे लगा रहेगा ।'' त्यांची ही कल्पना मला खूपच आवडली ''समयसार व प्रवचनसार'' या दोन महान आणि अवघड समजल्या जाणाऱ्या आत्मप्रवर्तक ग्रंथाचा अनुवाद केलाच होता; आता 'नियमसार' ग्रंथाचा अनुवाद करण्यापूर्वी 'अष्ट पाहुड' या ग्रंथाचा अनुवाद करा असे सुचवून ब्र. रमाबेन यांच्या जवळ असलेला ''श्रीमद् भगवत् कुन्दकुन्दाचार्य देव रचित ''अष्ट पाहुड'' भाषा वचनिकाकार पं. जयचंद्रजी छाबडा (जयपुर) यांचा ग्रंथ त्यांनी माझ्या हातात ठेवला.

२००९ सालच्या 'विजयदशमी'च्या शुभमुहूर्तावर मी या ग्रंथाचा मराठी अनुवाद करण्यास प्रारंभ केला. ''समयसारा'' सारख्या आत्मतत्त्वज्ञानाच्या अवघड ग्रंथाचा अनुवाद केला असल्यामुळे तुलनेने या ग्रंथाचा मराठी अनुवाद करणे मला सोपे वाटत होते. पहिल्याच दर्शन पाहुडाचा अनुवाद करतांना धर्माचे मूळ सम्यक्दर्शनच आहे, तसेच धर्माचे स्वरूप, दर्शनाचे भेद, त्याचे विवेचन, सम्यक्त्वाचे आठ गुण, आठ अंगे, वगैरे गोष्टींची उजळणी झाली. अनेक गोष्टी समजल्या, मनातल्या शंकांचे निवारण झाले. सम्यकदर्शनाचे महत्त्व समजले.

पुढे सूत्र पाहुड लिहिताना सूत्रस्थ पदार्थाचे वर्णन आणि त्याना जाणणारी सम्यक्दृष्टी ! तसेच परमार्थ सूत्रांचे कथन आणि अर्थ, जिनसूत्रात प्रतिपादित मोक्षमार्ग; कर्माचा क्षय किंवा निर्जरा करण्यासाठी परिषह जयाची आवश्यकता यांची माहिती मिळाली. जिनसूत्र जाणणाऱ्या मुनिंचे वर्णन, उत्कृष्ट श्रावकाचे वर्णन वगैरे गोष्टीची माहिती वाचायला मिळाली.

तसेच चारित्र पाहुडामध्ये ज्ञानादि भावत्रयाच्या शुध्दि चे अर्थ आणि दोन प्रकारचे चारित्र्य, मिथ्यात्वादित्रय त्यागाचा उपदेश, चारित्र्य दोषाचे परिमार्जन करणारे गुण, संयमाचरणाचे भेद, तीन गुणव्रतांचे स्वरूप, शिक्षाव्रते, संयम शुध्दिच्या कारण असलेल्या पंचसमिती, मोक्षमार्गस्वरूप, ज्ञानीचे लक्षण, चारित्र्य पाहुडाच्या भावनेचे फळ, इत्यादि जैन दर्शनातील प्राथमिक तत्त्वज्ञान अभ्यासायला मिळाले.

बोध पाहुडात जिनमुद्रेचे स्वरूप, धर्म, दीक्षा, देवाचे स्वरूप अरहंताचे स्वरूप, आणि सर्व माहिती, दीक्षेचे अंतरंग स्वरूप आणि विशेष कथन वगैरेंचे चिंतन करता आले.

भाव पाहुड तर अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणत्याही प्रकारच्या तपाची सिद्धि भावा शिवाय होवू शकत नाही. मोक्षमार्गा मध्ये प्रधान 'भाव'च आहेत, भावा शिवाय नग्नपणा निष्फळ आहे ही माहिती

मिळाली. तसेच चारीगति मधील दु:खाचे वर्णन, मुनि बाहुबलीचे भावशुद्धिसाठी दिलेले उदाहरण म्हणून भावलिंगी होण्याचा केलेला उपदेश; जिन धर्माचा महीमा आणि उपदेश अशा महत्त्वाच्या अभ्यासाकरीता या पाहुडाचा उपयोग झाला.

मोक्ष पाहुडाचा अनुवाद करत असताना आत्म्याचे तीन भेद त्यांचे स्वरूप, बंध मोक्षाच्या कारणांचे कथन, स्वद्रव्य, परद्रव्याची माहिती, आत्मज्ञानाचा विधि, ध्यान अध्ययन, रत्नत्रयांचे कथन, मोक्ष मार्गाचे फळ इत्यादी सूक्ष्मवर्णन या पाहुडात वाचायला मिळाले.

लिंग पाहुडात कोणता लिंगी अनंत संसारी आहे, जिनमार्गीश्रमण कोण होवू शकत नाही, स्त्रियांचा संसर्ग ठेवणारे श्रमण होवू शकत नाहीत. या विषयाची माहिती या पाहुडात दिली आहे.

शील पाहुडात शील आणि ज्ञान या विषयी विशेष माहिती दिली आहे. ज्ञानप्राप्तिपूर्वक आचरणचं संसारापासून अलिप्त करू शकते. या खेरीज शीलाचा परिवार, शीला शिवाय ज्ञानप्राप्ती नाही, तपादिक सर्व शीलच आहे. शीला शिवाय ज्ञान कार्यकारी होत नाही त्याचे उदाहरणासहित वर्णन; मोक्षाचे मुख्य कारण उत्तर शीलच आहे, ज्ञान तेव्हाच प्राप्त होते जेंव्हा सम्यक्त्व शीलासहित असते. अशा अनेक विषयावर या पाहुडा मध्ये चर्चा केली आहे.

अशा या सर्व पाहुडांचा अनुवाद करत असताना अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली. त्यामुळे माझ्या अल्पज्ञानात भर पडली; शंकांचे निरसन झाले. तसेच जैनदर्शनाचा मूळापासून स्वाध्याय करण्याचा आनंद आणि समाधान मिळत गेले. जैन तत्वज्ञानाचा शाश्वत ठेवा मराठी भाषेत जतन करण्याच्या कार्यात थोडासा हातभार किंवा खारीचा वाटा मला लाभला त्याचा अत्यानंद मला होत आहे.

या अतिशय पुरातन धार्मिक साहित्याचा मराठी भाषेत तंतोतंत आणि भावार्थ लक्षात घेवून अनुवाद करण्याचा मी यशस्वी प्रयत्न केला आहे. काही ठिकाणी शब्दांची पुनरोक्ती असेल तर अनुवाद करताना अर्थ लक्षात घेवून ती पुनरोक्ती टाळण्याचा मी प्रयत्न केला आहे. तरी सुद्धा न कळत कोठे त्रुटी राहिल्या असतील तर सूज्ञ वाचक मला उदार अंत:करणाने क्षमा करतील अशी अपेक्षा करते.

आचार्य कुंदकुंदांच्या ग्रंथाचा मराठी भाषेत अनुवाद करण्यासाठी प्रसिध्द जैन तत्वज्ञ डॉ. हुकुमचंदजी भारिल्ल; ब्र. यशपालजी जैन, ब्र. रमाबेन यांचे मला वेळोवेळी प्रोत्साहन आणि अचूक मार्गदर्शन मिळाले त्या बद्दल मी त्यांची हार्दिक आभारी आहे. या ग्रंथाच्या छपाईच्या संदर्भात मला आमचे व्याही श्री. किसनलालजी सारडा यांचे सहकार्य लाभले त्या बद्दल मी त्यांची आभारी आहे. तसेच उत्तम छपाईसह हा ग्रंथ योग्य वेळी पूर्ण करून दिल्याबद्दल श्री. विवेक महाजन यांनी ही मी धन्यवाद देवू इच्छिते. या सर्व कामात लक्ष घालून उत्तम सहकार्य केल्याबद्दल मी श्री. एस्. एन्. कुलकर्णी यांची आभारी आहे.

हा मी मराठी अनुवादित केलेला पुरातन ग्रंथ ''मुमुक्षु महिला मंडळ कहान नगर (देवळाली) यांनी मला प्रोत्साहन देवून प्रकाशित केला त्या सर्वांची मी अत्यंत आभारी आहे. तसेच मा. दानशूर आनंदभाईंनी त्याच्या ट्रस्ट तर्फे या ग्रंथाच्या छपाई करीता सहयोग दिला. त्याबद्दल मी त्यांची शतश: आभारी आहे.

या सर्व मराठी भाषेतील अनुवादित ग्रंथाचा अबाल वृध्द, स्त्री, पुरूषाना अभ्यासकाना, संशोधकाना, उत्तम उपयोग होवो आणि ते सर्व मोक्ष मार्गाकडे वाटचाल करत राहोत. अशी शुभ भावना व्यक्त करून मी आपला निरोप घेते.

अहिंसा परमो धर्म:

**डॉ. रेखा जैन**
अभिमान श्री सोसायटी
गेट नं. २ ''नविन बंगला'' पाषाण रोड, पुणे - ८.
मो. ९८२३१९१६६७, २५६५०७७३

# ＊ भूमिका ＊

अनादिकाळापासून ही भरतभूमि अनेक ऋषिमुनिनि अहिंसात्मक तसेच सम भावाच्या विचाराने पवित्र केली आहे. त्या पैकीच एक 'पूज्य' श्री १००८ भगवान वर्धमानांच्या प्रमाणेच असणारे आचार्य कुंदकुंद आज या पंचमकाळात मानले जात आहेत. त्यांची वाणी साक्षात तीर्थकरांच्या वाणीप्रमाणे आम्हाला हितकारक झाली आहे. यांच्याविषयी किंवा यांच्या सर्वज्ञ परंपरागत कृतिविषयी (ग्रंथसंपदेविषयी) कोणाचा आक्षेप अथवा मतभेद नाही. कारण त्यांची ग्रंथशैली आध्यात्म प्रधान आणि मोक्षमार्ग दाखवणारी आहे. म्हणूनच त्यांना भगवान महावीर तसेच गौतमगणी इतक्या उच्चकोटीचे आणि प्रधान मानले आहे. शास्त्रांच्या सुरवातीलाच मंगला चरणामध्ये

''मंगलं भगवान वीरो मंगलं गौतमो गणी ।
मंगलं कुंदकन्दाद्यो जैन धर्मोस्तु मंगलं ।।

असा श्लोक नेहमीच लिहिला जातो, वाचला जातो.

यावरून समजते की, आचार्य कुंदकुंदांचे स्थान या दिगंबर जैन समाजात किती उंच आहे, हे आचार्य मानले गेले आहेत. म्हणून आमचा प्रधान समाज मूलसंघाच्या कुंदकुंद आम्नयात असल्याने स्वत:ला धन्य मानत आहे. वास्तविक कुंदकुंद आम्नय आणि मूलसंघ एकच आहेत. म्हणून दिगंबर जैन समाज मूलसंघता कुन्दकुन्द आम्नया बरोबरच मानतो. आणि याची प्रसिध्दी दिगंबर प्रमुख समाजात सर्वत्रच आहे. त्यामुळे कुठल्या विवादाला किंवा संदेहाला येथे जागा नाही.

श्री श्रुतसागरसूरिने त्यांच्या 'अष्टपाहुड' ग्रंथाच्या संस्कृत टीकेच्या प्रत्येक पाहुडाच्या शेवटी यांची ५ नांवे लिहिली आहेत. जी अशा प्रकारे आहेत. श्री पद्मनंदि कुंदकुंदाचार्य वक्रग्रीवाचार्यैलगृध्द पृच्छाचार्य नामपंचक विराजितेन'' यावरून असे वाटते की, तत्वार्थसूत्राचे कर्ता श्री उमास्वामी आणि आचार्य कुंदकुंद हे एकच असावेत कारण की, तत्त्वार्थ सूत्राच्या १० व्या अध्यायाच्या शेवटी ही ''तत्वार्थ सूत्र कर्तारं गृद्धपिच्छोपलक्षितं वन्दे गणीन्द्रसंज्ञातमुमास्वामिमुनीश्वरं'' या श्लोकात ही 'गृद्धपिच्छ' असे उमास्वामीजींचे विशेषण दिले आहे. यावरून तसेच विदेह क्षेत्रात भगवान श्री १००८ सीमंधरस्वामी द्वारे सांगितलेल्या कथेत ही गृध्दपिच्छ चा विषय येतो तसेच काही विद्वान उमास्वामीजींची कथा ही आचार्य कुंदकुंदाच्या कथेप्रमाणेच गृध्दपिच्छाच्या विषयासंबंधी सांगितली जाते. सिमंधर स्वामीनी कुंदकुंदाचार्याच्या संबंधी सांगितल्याच्या संदर्भात श्री श्रुतसागरसूरि लिहितात की, ''सीमंधरस्वामी ज्ञानसंबोधितभव्य जनेन,'' यामुळे आम्हाला संभ्रम होतो की कदाचित् या दोन्ही व्यक्ती एकच असतील. परंतु

---

१. दिगंबर जैन नांवाच्या वर्ष १४ वे वीर सं. २४४७ वि. स. १६७७ इ.स. १६२७ च्या पं. नंदलालजी ईडर (चावली आगरा) द्वारे पाठवलेल्या ''आचार्यांची पावली आणि इतिहास'' नावाच्या लेखाच्या टिप्पणीत स्थानांगाच्या ईडर भंडारवाल्या पट्टावली ग. कुंदकुंदांच्या ५ नावांचा श्लोक असा मिळतो —

आचार्य कुंदकुंदाख्यो वक्रग्रीवो महामुनि : ।
एलाचार्यो गृध्दपृच्छ : पद्मनंदिति तन्नुतिः ।।५।।

कोणतातरी ठोस पुरावा मिळेपर्यंत संभ्रमावस्थेत राहाण्या खेरीज आम्हाला काही करता येत नाही, जर कधी कुंदकुंदांच्या नांवात उमास्वामी नांव असते तर शंकेला स्थान राहिले नसते तरी सुद्धां इतके नक्कीच आहे की, यांच्या मते कोणता तरी गुरू शिष्यांचा परस्पर संबंध नक्कीच असला पाहिजे.

गृध्दपुच्छ कुन्दकुन्द असो अथवा उमास्वामी असोत दोघांचे ही यशोगान या दिगंबर जैन समाजात पूर्णपणे भक्तीने तसेच मोठ्या श्रध्देने निरनिराळ्या दोन्ही नांवाने गायले जाते. तसेच गृध्दपुच्छ नांवाने काही ग्रंथकारानी आपली आंतरीक भक्ती व्यक्त केली आहे जसे वादिराज सूरिने आपल्या पार्श्वचरित्र ग्रंथात सर्व आचार्यांच्या पूर्वी गृध्दपृच्छ स्वामींनाच अपूर्व शब्दात गुणानुवाद पूर्वक नमस्कार केला आहे —

''अतुच्छगुणसंपातं गृध्दपिच्छं नतो ऽ स्मितं ।
पक्षीकुर्वंति यं भव्या निर्वाणायोत्पतिष्णवः ।।१।।

जे प्रधान दोन गुणांचे आश्रयदाते आहेत तसेच मोक्षाला जाण्याला इच्छुक उडणाऱ्या पक्ष्यांच्या पंखाप्रमाणे ज्याचा आश्रय घेतात त्या गृध्दपृच्छाना मी नमस्कार करतो.

कुंदकुंदाच्या विषयी भाषाटीकाकार पं. जयचंदजी छाबडा तसेच पं. वृंदावनदासजी वगैरे अनेक विद्वानानी ही चांगल्या शब्दात स्तुतिगान केले आहे तेच आजच्या काळात ही प्रवाहित होत आले आहे. तो स्वामीजींच्या अलौकिक पांडित्य तसेच त्यांच्या पवित्र आत्मपरिणतिचाच प्रभाव आहे. स्वामी कुंदकुंदाचार्यांनी अवतार घेवून या भारतभूमिला कोणत्या काळी भूषित तसेच पवित्र केले याविषयी आजपर्यंत कोणत्याही विव्दानांनी निर्णय केला नाही कारण काही विव्दानांनी विक्रमाच्या पहिल्या शतकात तर काहींनी विक्रमाच्या तिसऱ्या शतकात असल्याचे नमुद केले आहे. बहुतेक विद्वानांनी पहिल्या शतकाचा काल निश्चित केला आहे परंतु मला वाटते की त्यांचा काल त्या ही पूर्वीचा असावा कारण की, त्यांच्या कोणत्याही ग्रंथात (द्वादशानुप्रेक्षा ग्रंथाच्या शेवटी नाममात्र परिचया खेरीज) आपला परिचय दिला नाही. मात्र बोध पाहुडच्या शेवटी नं. ६१ ही गाथा अशी उपलब्ध आहे —

'सद्दवियारो भूओ भासासुत्तेसु जं जिऐ कहियं
सो तह कहियं णायं सीसेण य भद्दबाहुस्स ।।
बोध पाहुड ।।६१।।

---

१. जासके मुखारविन्दतें प्रकाश भासवृन्द स्यादवादजैनवैन इंदु कुंदकुंदसे ।
तासके अभ्यासते विकारा भेदज्ञान होत, मूढ़ सो लखे नही कुबुध्दि कुंदकुंदसे ।।
देत है अशीस शीस नाय इंदु चंद जाहि मोह-मार खंड मारतंड कुंदकुंदसे ।
विशुध्दि बुध्दि वृध्दिदा प्रसिध्द ऋध्दि सिध्दिदा हुए न, होंहिंगे मुनिंद कुंदकुंदसे ।।
- कवीवर वृंदावन दासजी

मला या गाथेचा अर्थ शब्द रचनेमुळे असा प्रतीत होतो.

जं - यत् - जिणे - जिनेन, कहिय - कथितं, सो - तत् भासा सुत्तेसु - भाषासूत्रेषु (भाषारूप परिणत द्वादशांग शास्त्रेषु), सद्दवियारो भूओ-शद्धविकारो भूत: (शद्धविकाररूप परिणत:) भद्दबाहुस्स - भद्रबाहो: सीसेणायाशिष्ये नापि । तह - तथा, णायं, ज्ञातं, कहियं - कथित्तं ।

जे जिनेंद्रदेवानी सांगितले आहे ते द्वादशांगात शब्दांकित झाले आहे आणि भद्रबाहुच्या शिष्याने त्याप्रमाणे जाणले आहे तसेच सांगितले आहे.

या गाथेत जिन भद्रबाहुचे कथन आले आहे ते भद्रबाहुचे कोण आहेत, त्याचा निश्चय करण्यासाठी त्याच्या पुढची गाथा नं. ६२ अशा प्रकारची आहे.

बारस अंगवियाणं चउदस पुवंग विउल वित्थरणं ।
सुयणाणि भद्दबाहु गमयगुरू भयवओ जयओ ।
बोध पाहुड ।।६२ ।।

द्वादशांगाचे जाणकार तसेच १४ पूर्वांगाचा विस्तार रूपाने प्रसार करणारे गमकगुरू श्रुतज्ञानी भगवान भद्रबाहु जयवंत होवो.

या दोन्ही गाथा वाचल्यानंतर वाचकाना चांगल्याप्रकारे समजते की, या बोधपाहुडच्या गाथा श्रुतकेवळी भद्रबाहुच्या शिष्यांची कृती आहे. आणि हे अष्ट पाहुड ग्रंथ निर्विवादपणे कुन्दकुन्दाचार्यानी लिहिले आहेत या वरून असे ही सिद्ध होते की, स्वामी कुंदकुंद श्रुतकेवली भद्रबहुचे शिष्य होते अशा स्थितीत कुंदकुंदाचा काल विक्रम संवत्च्या फार पूर्वीचा वाटतो.

परंतु या गाथेचा अर्थ मान्यवर श्री श्रुतसागर सूरिने दुसऱ्या प्रकारे केला आहे, आणि त्याच आधारावर पं. जयचंदजी छाबडा ने ही केला आहे. त्यामुळे आम्ही पूर्णपणे हे निश्चित लिहू शकत नाही की, स्वामीजींचा काल विक्रम शतकाच्या पूर्वीचा होता कारण की, श्रुतसागर सूरिने जो अर्थ लिहिला आहे तो कोणत्यातरी विशेष पट्टावली वगैरेच्या आधाराने लिहिला असावा; दुसरे म्हणजे ते एक प्रामाणिक तसेच प्रतिभाशाली विद्वान होते या कारणाने त्यांच्या अर्थाला अमान्य ठरवावे हे या तुच्छ लेखकाच्या शक्तीच्या बाहेरचे आहे. तरी सुद्धा मला त्या गाथेचा अर्थ समजला आहे तो स्पष्टपणे वरती लिहिला आहे. विद्वान पाठक याचा सारासार विचार करून स्वामीजींच्या काळाचा निर्णय संशोधन पूर्वक करून समाजाच्या एक खास त्रुटीला पूर्ण करतील.

भगवत् कुंदकुंदस्वामीनी लिहिलेल्या ग्रंथामध्ये १, समयसार २) प्रवचनसार ३) पंचास्तिकाय ४) नियमसार ५)अष्टपाहुड ६) रयणसार ७) द्वादशानुप्रेक्षा ८) मूलाचार ९) दसभक्ती हे नऊ ग्रंथ आहेत. आणि हे सगळे छापले गेले आहेत. अष्टपाहुडातील षट् पाहूडावर श्रीश्रुतसागर जींची संस्कृत टीका आहे. ती माणिकचंद दिगंबर जैन ग्रंथाच्या षट् प्राभृतादि संग्रहात प्रकाशित झाली आहे. या अष्टपाहुड ग्रंथावर पं. जयचंद्रजी छाबडा जयपुर निवासी कृत देशभाषामयवचनिका लिहिली आहे त्या करीता षट्पाहुड पर्यंत श्री

श्रुतसागरसूरिच्या टीकेंचा आश्रय घेतला आहे आणि बाकी दुसरे पाहुड त्यांनी स्वत: लिहिले आहेत ज्याचे वर्णन त्यानी स्वत: लिहिले आहे. ती प्रशस्ती या ग्रंथाच्या शेवटी जशीच्या तशी लावली आहे. वाचकांना त्याचा फायदा नक्कीच होईल. पं. श्री जयचंदजी छाबडा विषयी आम्ही प्रमेयरत्नमाला तसेच आप्तमिमासेच्या 'भूमिके' मध्ये लिहिले आहे. तेथून वाचकांना त्यांचा विशेष परिचय मिळू शकेल. ते १६ व्या शतकातील एक प्रतिभाशाली विद्वान होते पं. टोडरमलजी प्रमाणेच त्यांचा ही समाजात आज ही आदर केला जातो. पं. टोडरमलजीनी थोड्याच काळात प्रतिभाशाली, अलौकिक बुद्धिने दिगंबर जैन समाजाचे कल्याण केले आहे त्याचे फल म्हणून हा समाज आजपर्यंत यशोगान गात आहे. त्याचप्रमाणे टोडरमलजींच्या वेळीच असलेल्या पं. जयचंदजींचा ही समाजावर तसाच उपकार आहे, यामुळे समाजाला हे ही मान्य आहे की, पं. जयचंद्रजींचे पांडित्य प्रत्येक विषयात अपूर्व असेच आहे हे त्यांच्या ग्रंथावरून स्पष्ट होते. तसेच ते निरपेक्ष परोपकारी होते. तसे विद्वान त्यावेळी जयपूरात कोणत्याही धर्मामध्ये नव्हते. तसेच भाषा सर्वार्थ सिद्धिची प्रशस्ती वाचल्यानंतर समजते की, त्यांचे पुत्र नन्दलालजी सुद्धा मोठे विद्वान होते. त्यांच्या प्रेरणेने तसेच भव्यजनांच्या विशेष प्रेरणेनेच त्यांनी सर्वार्थ सिद्धि वगैरे ग्रंथांची देशभाषामय वचनिका लिहिली आहे. त्यांच्या विषयी आज ही वृद्धजन एक कथा सांगतात की, एकदा जयपूर नगरीत अन्य धर्मांतील एक शास्त्रार्थी पंडित जयपूर शहरातील विद्वानाना शास्त्रार्थात जिंकण्याच्या इच्छेने आला होता. त्या विद्वानापुढे शास्त्रार्थ करण्यासाठी जयपूर निवासी कोणताही विद्वान पुढे सरसावला नाही. अशा स्थितित शहरातील विद्वानांच्या नगराच्या विद्वत्तेची अकीर्ति होवू नये या हेतूने राज्याचे किर्तिवांच्छक, नगरातील विद्वान पंच तसेच राज्यकर्मचाऱ्यानी पं. जयचंदजी छाबडाना जावून सविनय निवेदन केले की, या विद्वानाना शास्त्रात आपणच जिंकू शकता. म्हणून या नगराची प्रतिष्ठा आपल्यावरच निर्भर आहे म्हणून शास्त्रार्थ करण्यासाठी आपण यावे. अन्यथा नगराची मोठी बदनामी होईल, कारण मोठमोठ्या पंडितांची खाण असणाऱ्या या विशाल नगराला एक परदेशी विद्वान जिंकून जाईल. ही गोष्ट ऐकून पं. जयचंदजी छाबडा म्हणाले ''मी तर जयपराजयाच्या अपेक्षेने शास्त्रार्थ करण्यासाठी कोठे जात नाही तरी सुद्धा आपला आग्रहच असेल तर माझ्या या पुत्राला ''नंदलाल''ला आपण घेवून जा, तो त्यांच्या बरोबर शास्त्रार्थ करेल सर्व लोक खुश होवून ते पं. नंदलालजीना घेवून गेले आणि पं. नंदलालजीने शास्त्रार्थ करून विदेशी विद्वानाना पराजित केले त्याचे फल म्हणजे राज्य तसेच नगरा तर्फे पं. नंदलालजींना पदवी बहाल केली त्यावेळी पं. जयचंद्रजीनी मी कर्तव्य केले तो उपकार नाही'' असे म्हणून ती पदवी त्यांनी परत केली.

या कथेवरून लक्षात येते की, ते आणि त्यांचे सुपुत्र किती विद्वान होते आणि धार्मिक गोष्टीपासून किती दूर होते ! त्यांच्या वडिलांचे नांव मोतीरामजी होते. जातीने खंडेवाल श्रावक होते तसेच छाबडा गोत्रात त्यांचा जन्म झाला होता. वयाच्या ११ व्या वर्षापासून त्यांचे जैनधर्माकडे विशेष लक्ष गेले होते. ते

तेरा पंथाचे अनुयायी होते. ते दुसऱ्यावर उपकार करणे विशेष मानत असत. ते कृतज्ञ होते. कारण की, पं. वंशधरजी, पं. टोडरमलजी, पं. दौलतरामजी त्यागी रायमल्लजी, व्रती मायारामजी वगैरेंच्या कृती तसेच त्यांचा उपकार, त्याचे वर्णन त्यांनी मोठ्या मनोज्ञ शब्दात केले आहे. त्यांनी गोम्मटसार, लाब्धिसार, क्षपणसार, समयसार, अध्यात्मसार, प्रवचनसार, पंचास्तिकाय, राजवार्तिक, श्लोकवार्तिक, अष्ट सहस्त्री, परीक्षामुख आदि प्रमुख अनेक ग्रंथांचे पठन तसेच मनन केले होते. ज्याचा खुलासा भाषा सर्वार्थ सिद्धि वगैरे ची प्रशस्ती वाचल्यानंतर होतो.

त्यांनी जे जे अनुवादरूप ग्रंथ कृती केल्या आहेत त्याचा खुलासा आम्ही प्रमेयरत्नावलीच्या 'भूमिके' मध्ये केला आहे. सर्वार्थ सिद्धि भाषा वचनिका आदिप्रमाणे त्यानी या 'अष्ट पाहुड' मध्ये खूपच प्रयत्न केला आहे. त्यांनी अतिकठिण ग्रंथांचा सरळ, सहृदय भाषेत अर्थ करून एक मोठी समाजाची त्रुटी पूर्ण केली आहे. यामुळेच आपल्या विषयी समाज आभारी असणे योग्यच आहे.

हा पाहुड ग्रंथ नांवाप्रमाणे आठ भागात विभक्त आहे. जसे दर्शन पाहुडात दर्शनाविषयी कथन, सूत्रपाहुडात सूत्रा विषयी कथन, इत्यादि पंडितजीनी या ग्रंथाच्या टीकेची समाप्ति विक्रम संवत् १८९७ भाद्रपद शुद्ध १३ ला केली. त्याप्रमाणे त्यांनी या ग्रंथाच्या प्रशस्ती मध्ये लिहिले आहे :—

''संवत्सर दश आठ सत सतसठि विक्रमराय ।
मासभाद्रपद शुल्कतिथि तेरसि पूरन याय ।।

पंडितजींच्या ग्रंथात आदि आणि अन्त मंगलाचरणामुळे समजते की, ते परम अस्तिक होते. देव, शास्त्र, गुरू, मध्ये पूर्ण भक्ती ठेवत होते. सत्य तर हे आहे की, जेथे अस्तिकता तसेच भक्ती आहे तेथे सर्वांसाठी उपकार बुद्धि ही असते. ही गोष्ट पंडितजी मध्ये होती. त्यामुळेच आपण आमचे आणि समाजाचे मान्यवर आहात. आता आम्ही इच्छा करतो की आपण लवकरच अनंत तसेच अक्षय सुखाचे भोगी व्हा. या ग्रंथाच्या भूमिके बरोबरच वाचकांच्या सोईसाठी विषयसूची जोडली आहे. शेवटी आमचे निवेदन आहे की, अल्पज्ञतेमुळे या भूमिकेमध्ये तसे ग्रंथ संशोधनात काही चुका राहिल्या असतील तर आपण सूज्ञपणे क्षमा कराल.

मिति मार्गशीर्ष शुद्ध - ८ — विनित
सं. १९८० विक्रम — रामप्रसाद जैन
ता. १५/१२/१९२३



# * अनुवादिकेचा परिचय *

प्रो. डॉ. रेखा नविनचंद्र जैन पुणे येथे टिळक आयुर्वेद महाविद्यालयात प्रोफेसर आणि रोगनिदान चिकित्सा विभागाच्या विभागप्रमुख होत्या. त्यानी पुणे विद्यापिठातून १९८४ साली एम्. डी. केले असून तत्पूर्वि त्या सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन इंडियन मेडिसिन न्यु दिल्ली (C.C.R.A.S.) या संस्थेत अनुसंधान अधिकारी म्हणून काम पाहात होत्या त्यावेळी त्यांनी विविध वैद्यकीय विषयावर संशोधनात्मक निबंध सादर केले आहे. १९८९ मध्ये पुणे विद्यापिठातून (P.HD) ''विद्यावाचस्वति'' ही पदवी मिळवली. त्यांच्या प्रबंधाचा विषय ''आयुर्वेदाच्या विकासात जैन धर्माचे योगदान'' (Contributions of Jainism to Ayurveda) असा होता. या विशेष अभ्यासाबद्दल ''इन्स्टिट्युट ऑफ इंडियन मेडिसिन'' या संस्थेने सुवर्ण पदक देवून गौरव केला आहे. अशा प्रकारचा वैद्यकीय, अध्यात्मिक आणि धार्मिक अभ्यास केल्याबद्दल पद्मश्री सुमतीबाई विद्यापीठाने ''महामहोपाध्याय'' ही मानाची पदवी देवून गौरव केला आहे. १९९१ साली Contributions of Jainism हे पुस्तक प्रसिद्ध झाले, त्याच्या प्रती भारतातील अनेक विद्यापिठानी घेतल्या असून वॉशिंग्टन विद्यापीठ अमेरिका यांनी २० कॉपीज घेतल्या आहेत. सध्या त्या पुणे विद्यापीठ, भारती विद्यापीठ येथे पी.एच्.डी. च्या मार्गदर्शक (Guide) आहेत. तसेच टिळक महाराष्ट्र विद्यापिठात जैनॉलॉजी विषयाच्याही मार्गदर्शक आहेत.

त्यांनी जैन तत्त्वज्ञानाची आवड असल्यामुळे समयसार, द्रव्यसंग्रह छहढाला. मोक्षमार्गप्रकाशक, प्रवचनसार आदि ग्रंथाचा अभ्यास केला. निवृत्ति नंतर २००७ साली ''समयसाराचा सार'' हा ''समयसारकासार'' या हुकुमचंद भारिल्लकृत हिन्दी ग्रंथाचा मराठी अनुवाद केला. त्यानंतर त्यांच्याच समयसाराच्या ''ज्ञायकभाव प्रबोधिनी'' टीका आणि ''प्रवचनसार ग्रंथाची'' ज्ञानज्ञेय प्रबोधिनी'' या दोन्ही ही ग्रंथाचा मराठी अनुवाद केला आहे. तसेच ''कल्याणकारक'', जैन वैद्यक ग्रंथाच्या पुर्नरचनेत सहभाग दिला आहे. तत् पूर्विही ''बिदाई की बेला'' ''हिमालय में जैन मुनि'' ''विद्या से विद्यासागर'', मूकमाटी आदि धार्मिक पुस्तकांचा मराठी अनुवाद केला आहे. या खेरीज त्यांची ''रोगनिदान'' या वैद्यकीय विषयाची ही दोन पुस्तके प्रसिध्द झाली आहेत.

दूरदर्शन, रेडिओच्या वैद्यकीय व अध्यात्मिक चर्चेत त्यांनी अनेक वेळा भाग घेतला असून सामाजिक बांधिलकी म्हणून वैद्यकीय मोफत नेत्रचिकित्सा शिबिरे आयोजित केली आहेत. देशात व परदेशात शाकाहार व आयुर्वेदाच्या अनेक विषयावर व्याख्याने दिली आहेत. भारतीय जैन संघटनेच्या महिला शाखेच्या अध्यक्ष म्हणून १९९२ ते १९९९ या अवधीत काम केले आहे. अशा प्रकारच्या धार्मिक सामाजिक, वैद्यकीय कार्याबद्दल समाजाकडून महामहोपाध्याय, संस्कृतिसंरक्षक, आगमोद्धारक, आयुर्वेद चंद्रिका अशा पदव्या देवून वेळोवेळी पुरस्कृत केले आहे. १००८ पद्मप्रभू दिगंबर जैन संस्थेच्या त्या प्रमुख सल्लागार आहेत. सध्या 'जैन बोधक' या धार्मिक पाक्षिकाच्या संपादक सभासद म्हणूनही काम पाहातात.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | अथ दर्शन पाहुड | १ ते २८ |
| २. | अथ सुत्र पाहुड | २९ ते ४८ |
| ३. | अथ चारित्र पाहुड | ४९ ते ७१ |
| ४. | अथ बोध पाहुड | ७२ ते १०४ |
| ५. | अथ भाव पाहुड | १०५ ते १९० |
| ६. | अथ मोक्ष पाहुड | १९१ ते २४६ |
| ७. | अथ लिंग पाहुड | २४६ ते २२५८ |
| ८. | अथ शील पाहुड | २५९ ते २७९ |
| ९. | वाचककाकारांची प्रशास्ति | २८० ते २८१ |

www.vitragvani.com



ॐ

—: स्वामि कुन्दकुन्दाचार्य विरचित :—

# * अष्ट पाहुड *

भाषा - वचनिका
(श्री पं. जयचन्द्रजी छाबड़ा)

## — अथ दर्शन पाहुड —

* दोहा *

श्रीमत वीरजिनेश रवि मिथ्यातम हरतार ।
विघनहरन मंगलकरन बंदूं वृषकरतार ॥ १ ॥
वानी बंदूं हितकरी जिनमुख-नभतैं गाजि ।
गणधरगणश्रुतभू–झरी–बूंद–वर्णपद साजि ॥ २ ॥
गुरु गौतम बंदूं सुविधि संयमतपधर और ।
जिनितैं पंचमकालमैं बरत्यो जिनमत दौर ॥ ३ ॥
कुन्दकुन्दमुनिकूं नमूं कुमतध्वांतहर भान ।
पाहुड ग्रन्थ रचे जिनहिं प्राकृत वचन महान ॥ ४ ॥
तिनिमैं कई प्रसिद्ध लखि करूं सुगम सुविचार ।
देशवचनिकामय लिखूं भव्य–जीवहितधार ॥ ५ ॥

अशा प्रकारे मंगल पूर्वक प्रतिज्ञा करून श्री कुंदकुंदआचार्यकृत प्राकृत गाथाबद्ध पाहुड ग्रंथातील वचनिका मराठी भाषेत अनुवादित करत आहे —

येथे प्रयोजन असे आहे की, या हुंडावसर्पिणी काळात मोक्षमार्ग सांगणारी अनेक मते आस्तित्वात आहेत. त्यात ही या पंचम काळात केवली श्रुतकेवलींचा व्युच्छेद झाल्यामुळे जिनमतामध्ये ही जड़विपरीत जीवामुळे परंपरेच्या मार्गाचे उल्लंघन करून श्वेताम्बर आदि बुध्दिकल्पित मते आली आहेत. त्यांचे निराकरण करून यथार्थ स्वरूप स्थापित करण्याच्या हेतूने दिगंबर आम्नाय मूलसंघात आचार्य झाले आणि त्यांनी सर्वज्ञाच्या परंपरेचे अव्युच्छेदरूप विवरणांच्या अनेक ग्रंथाची रचना केली आहे; त्यात दिगंबर संप्रदाय

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

मूलसंघ 'नन्दिआम्नाय सरस्वतीगच्छ' मध्ये श्री कुन्दकुन्द मुनि झाले आणि त्यानी पाहुडग्रंथाची रचना केली. त्यांना संस्कृतभाषेत प्राभृत असे म्हणतात, आणि ते ते प्राकृत भाषेत बद्ध आहेत. काल दोषाप्रमाणे अनुवादित 'वचनिका' करत आहे. या पेक्षा दुसरा कोणताही प्रसिद्धी, मोठेपणा वगैरे लाभाचे प्रयोजन नाही. म्हणून हे भव्य जीवानो, हे वाचून, अर्थ समजून घेवून, चित्तात धारणकरून यथार्थ मताचे बाह्यलिंग आणि तत्त्वार्थाचे श्रद्धान दृढ करावे. हे करत असताना बुद्धिमांद्यामुळे किंवा प्रमादाने चुकीचा अर्थ लिहिला गेला असेल तर अधिकबुद्धिमान मूल ग्रंथ पाहून शुद्ध करून ते वाचावे व मला अल्पबुद्धी समजून क्षमा करावी.

आता येथे प्रथम दर्शनपाहुडाची वचनिका लिहित आहे :—

(दोहा)

बंदूं श्री अरिहंतकूं मन वच तन इकतान ।
मिथ्याभाव निवारिकैं करैं सुदर्शन ज्ञान ।।

आता ग्रंथकर्ता कुन्दकुन्दाचार्य ग्रंथाच्या सुरवातीला ग्रंथाची उत्पत्ति आणि त्याच्या ज्ञानाचे कारण जो परंपरेचा गुरू प्रवाह त्यांना मंगल हेतूने नमस्कार करत आहे :—

**काऊण णमुक्कारं जिणवरवसहस्स वड्ढमाणस्स ।**
**दंसणमग्गं वोच्छामि जहाकम्मं समासेण ।।१।।**

कृत्वा नमस्कारं जिनवरवृषभस्य वर्द्धमानस्य ।
दर्शनमार्गं वक्ष्यामि यथाक्रमं समासेन ।।१।।

<u>अर्थ :</u>— आचार्य सांगतात की, मी जिनवर वृषभदेव आदि तीर्थंकर तसेच अंतिम तीर्थंकर वर्धमान, यांना नमस्कार करून दर्शनमार्ग यथानुक्रमाने संक्षेपात सांगत आहे.

<u>भावार्थ :</u>— येथे 'जिनवर वृषभ' विशेषण आहे; त्यात जो जिन शब्द आहे त्याचा अर्थ ज्याने कर्मशत्रूला जिंकले आहे तो जिन तेथे सम्यक्दृष्टि अव्रती पासून कर्माच्या गुणश्रेणीरूप निर्जरा करणारे सर्व जिन आहेत, आणि त्यात 'वर' म्हणजे श्रेष्ठ, अशा प्रकारे गणधर आदि मुनिनां जिनवर म्हटले जाते, त्यात वृषभ देव आदि तिर्थंकर परमदेव आहेत. त्यांच्यात प्रथम तर श्री वृषभदेव झाले आणि या पंचमकाळात प्रारंभी आणि चतुर्थकालाच्या शेवटी अंतिम तीर्थंकर श्री वर्धमान स्वामी झाले आहेत. ते सर्व तीर्थंकर जिनवर (वृषभ) आहेत. त्याना नमस्कार असो. तेथे 'वर्धमान' असे विशेषण सर्वासाठी आहे असे जाणावे, कारण की, सर्व अंतरंग आणि बाह्य लक्ष्मी ने वर्धमान आहेत. किंवा जिनवर वृषभ शब्दाने तर आदि तीर्थंकर श्री ऋषभदेवाना आणि वर्धमान शब्दाने अन्तिम तीर्थकराना जाणावे. अशा प्रकारे आदि आणि अन्तिम तीर्थंकराना नमस्कार केल्यामुळे मधल्या सर्व तीर्थंकरानाही नमस्कार जाणावा. तीर्थंकर सर्वज्ञ वीतरागी ना परमगुरू म्हणतात, आणि त्यांच्या प्रणालीमध्ये चालत आलेल्या गौतमादि मुनि नां जिनवर विशेषण दिले असून त्यांना अपर गुरू

www.vitragvani.com



म्हणतात. अशा प्रकारे परापर गुरूंचा प्रवाह जाणावा. ते शास्त्राच्या उत्पत्तिचे तसेच ज्ञानाचे कारण आहे. त्यांना ग्रंथाच्या सुरूवातीला नमस्कार केला आहे ।।१ ।।

आता धर्माचे मूल दर्शन आहे. म्हणून जो दर्शन विरहित आहे त्याची वंदना करता कामा नये. असे म्हणतात की

दंसणमूलो धम्मो उवइट्ठो जिणवरेहिं सिस्साणं ।
तं सोऊण सकण्णे दंसणहीणो ण वंदिव्वो ।।२।।

दर्शनमूलो धर्मः उपदिष्टः जिनवरैः शिष्याणाम् ।
तं श्रुत्वा स्वकर्णे दर्शनहीनो न वन्दितव्यः ।।२।।

<u>अर्थ :</u>— जिनवर, जे सर्वज्ञ देव आहेत त्यांनी शिष्य गणधरादिना धर्माचा उपदेश दिला आहे, कोणता उपदेश दिला आहे ? — तर दर्शन ज्याचे मूळ आहे. मूळ कशाला म्हणतात तर जसे मंदिराचा पाया किंवा वृक्षाची मुळे असतात त्याप्रमाणे धर्माचे मूळ दर्शन आहे. म्हणून आचार्य उपदेश देतात की, हे सकर्ण अर्थात् पंडित पुरूषानों सर्वज्ञानी सांगितलेल्या त्या दर्शनरूप धर्माला आपल्या कानानी अैकून ही जे दर्शन विरहित राहातात ते वंदन करण्यायोग्य नाहीत; म्हणून दर्शनहीनांची वंदना करू नका. ज्यांना दर्शन नाही त्याना धर्म नाही कारण की, मूळ रहित वृक्षांना शाखा, फांद्या, फुले, फळे कोठून असतील ? म्हणून असा उपदेश आहे की, ज्यांना धर्म नाही त्यांना धर्माची प्राप्ति होणार नाही, तर मग धर्मासाठी त्यांची वंदना कां करायची ? असे जाणावे.

आता येथे धर्म तथा दर्शनाचे स्वरूप जाणावे ते स्वरूप तर संक्षेपाने ग्रंथकार पुढे सांगणार आहेत, तरी सुद्धा काही अन्य ग्रंथाप्रमाणे त्याचा अर्थ देत आहे. धर्म शब्दाचा अर्थ असा आहे की, — जो आत्म्याला संसारातून अलिप्त करून सुखस्थानात स्थापित करतो तो धर्म होय आणि दर्शन म्हणजे पाहाणे. अशाप्रकारे धर्मांचे मूर्त स्वरूप दिसणे ते दर्शन आहे. म्हणून ज्यामुळे धर्माचे ग्रहण होते अशा मताला 'दर्शन' म्हटले जाते. 'लोका' मध्ये धर्माची तसेच दर्शनाची मान्यता सर्वांना आहे. परंतु सर्वज्ञा शिवाय यथार्थ स्वरूप जाणले जात नाही; अज्ञानी लोक आपल्या बुद्धिने अनेक प्रकारे कल्पना करून अन्य स्वरूप प्रस्थापित करून तेच आचरणात आणतात. जिनमत सर्वज्ञाच्या परंपरेने प्रवर्तमान आहे म्हणून यामध्यें यथार्थ स्वरूपाचे प्ररूपण आहे.

तेथे धर्माला निश्चय आणि व्यवहार अशा दोन प्रकाराने वर्णन केले आहे. त्याचे विवरण चार प्रकाराने केले आहे — प्रथम वस्तुस्वभाव, दुसरे उत्तमक्षमादिक दहा प्रकार, ३) सम्यक्‌दर्शन-ज्ञान-चारित्र रूप ४) जीवाच्या रक्षारूप असे चार प्रकार आहेत. येथे निश्चयाने विचार केला तर सर्वांमध्यें एकच प्रकार आहे म्हणून वस्तुस्वभावाचे तात्पर्य तर जीव नांवाच्या वस्तुची परमार्थरूप दर्शन-ज्ञान परिणाममयी चेतना आहे, आणि ती चेतना सर्व विकाराने रहित शुद्धस्वभावरूप परिणामित होणे हाच जीवाचा धर्म आहे. तसेच उत्तम क्षमादिक अशा प्रकारे म्हणण्याचे तात्पर्य असे आहे की, आत्मा क्रोधादि कषायरूप न होता आपल्या स्वभावात स्थिर होत राहाणे हाच धर्म आहे. हे शुद्ध चेतनरूपच आहे.

दर्शन, ज्ञान, चारित्र म्हणण्याचे तात्पर्य असे आहे की, हे तिन्ही एका ज्ञान चेतनेचेच परिणाम आहेत. तसेच ज्ञानस्वभावरूप धर्म आहेत. आणि जीवाच्या रक्षेचे तात्पर्य हे आहे की, — जीवन क्रोधादि कषायाना वशा होवून आपल्या किंवा पर च्या विनाशरूप मरण तसेच दु:ख संक्लेश परिणाम करणार नाही. अशा प्रकारचा आपला स्वभावच धर्म आहे. अशा प्रकारे शुद्ध द्रव्यार्थिकरूप निश्चयनयाने साधणारा धर्म एकच प्रकारचा आहे. व्यवहारनय पर्यायाश्रित आहे म्हणून भेदरूप आहे. व्यवहार नयाने विचार केला तर जीवाचे पर्यायरूप परिणाम अनेक प्रकारचे आहेत; म्हणून धर्माचे ही अनेक प्रकाराने वर्णन केले गेले आहे. १) प्रयोजन वश एक देशाचे सर्वदेशाने कथन करणे हा व्यवहार आहे. २) दुसऱ्या वस्तूत, दुसऱ्याचे आरोपण दुसऱ्याच्या निमित्ताने आणि प्रयोजनवश करणे हा ही व्यवहार आहे, तेथे वस्तु स्वभाव सांगण्याचे तात्पर्य तर निर्विकार चेतनेचे शुद्धपरिणामाचे साधकरूप ३) मंदकषायरूप शुभ परिणाम आहे. तसेच ज्या बाह्यक्रिया आहेत त्या सर्वांना व्यवहारधर्म म्हटले जाते. तसेच रत्नत्रयाचे तात्पर्य स्वरूपाचे भेद, दर्शन-ज्ञान-चारित्र तसेच त्या कारणाने बाह्य क्रियादिक आहे त्या सर्वांना व्यवहार धर्म म्हटले जाते. त्याचप्रमाणे ४) जीव दया म्हणण्याचे तात्पर्य असे आहे की, — क्रोधादि मंदकषाय झाल्याने आपल्या किंवा दुसऱ्याचे मरण, दु:ख क्लेश आदि न करणे, त्यांच्या साधक समस्त बाह्यक्रियादिकाला धर्म म्हटले जाते अशा प्रकारे जिनमतात निश्चय व्यवहार नयाने साधलेला तो धर्म म्हटला आहे.

तेथे एक स्वरूप अनेक स्वरूप असे म्हणण्याने स्याद्वादाला विरोध येत नाही. किंचितफरकाने सर्व प्रमाण सिद्ध आहे. अशा धर्माचे 'मूल' दर्शन म्हटले आहे, म्हणून अशा धर्माची श्रद्धा, प्रचिति, रूचिसहित आचरण करणेच दर्शन आहे, ही धर्माची मूर्ति आहे. यालाच मत (दर्शन) म्हणतात आणि हेच धर्माचे मूल आहे. तसेच अशा धर्माची प्रथम श्रद्धा, प्रतिति, रूचि नसेल तर धर्माचे आचरण ही होणार नाही. जसे वृक्षाच्या मूळाशिवाय शाखा, फांद्या नाहीत. म्हणून दर्शनाला धर्माचे मूळ म्हणणे योग्य आहे. अशा दर्शनाचे सिद्धान्तामध्ये जसे वर्णन आहे त्यानुसार येथे काही लिहित आहे.

येथे अंतरंग सम्यक्दर्शन तर जीवाचा भाव आहे. तो निश्चयाद्वारे उपाधिरहित जीवाचा साक्षात् अनुभव होणे असा एक प्रकार आहे. तो असा अनुभव अनादिकालापासून मिथ्यादर्शन नांवाच्या कर्माच्या उदयाने अन्यप्रकारे होतो. सादि मिथ्या दृष्टिच्या त्या मिथ्यात्वाच्या तीन प्रकृति सत्तेमध्ये असतात — मिथ्यात्व, सम्यक् मिथ्यात्व आणि सम्यक् प्रकृति. तसेच त्यांचे सहकारी अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभाच्या भेदाने चार कषाय नांवाच्या प्रकृति आहेत. अशाप्रकारे या सात प्रकृतिच सम्यक्दर्शनाचा घात करणाऱ्या आहेत. म्हणून या सातींचा (प्रकृतिचा) उपशम होण्यापूर्वी या जीवाला उपशमसम्यकत्व होते. या प्रकृतिंचे उपशम होण्याचे बाह्य कारण सामान्यत: द्रव्य, क्षेत्र, काल, भाव, आहे. त्या द्रव्यामध्यें तर साक्षात् तीर्थंकरांचे पाहाणे आदि प्रधान आहे. क्षेत्रामध्ये समवसरणादिक प्रधान आहे.

---

१. साधकरूप :— सहचर हेतुरूप, निमित्तमात्र, अंतरंगकार्य असेल तर बाह्यत: या प्रकाराला निमित्त कारण म्हटले जाते.

www.vitragvani.com



कालामध्ये अर्धपुद्‌गलपरावर्तन संसारभ्रमण बाकी राहील; तसेच भावामध्ये अध: प्रवृत्तकरण आदि आहे.

सम्यक्‌त्वाची बाह्य करणे विशेष रूपाने अनेक आहेत. त्यामधील काहीना – अरिहंत बिब पाहाणे, काहींना जिनेंद्रांचे कल्याणक आदिचा महिमा पाहाणे, काहींना जातिस्मरण, काहीना वेदनेचा अनुभव, काहींना धर्मश्रवण तसेच काहींना देवांच्या ऋद्धिला पाहाणे इत्यादि बाह्य कारणाद्वारे मिथ्यात्वकर्माचा उपशम झाल्यामुळे उपशमसम्यक्त्व होते. तसेच या सात प्रकृतिमधल्या सहांचा उपशम किंवा क्षय होवून एका सम्यक्त्व प्रकृतिचा उदय होतो तेव्हा क्षयोपशम सम्यक्त्व होते. या प्रकृतिच्या उदयाने किंचित अतिचार मल लागतो. तसेच या सात प्रकृतिंचा सत्तेतून नाश होईल तेव्हा क्षायिक सम्यक्त्व होते.

अशाप्रकारे उपशमादि झाल्यानंतर जीवाचे परिणाम भेदाने तीन प्रकार होतात; ते परिणाम अतिसूक्ष्म आहेत, केवलज्ञानगम्य आहेत म्हणून या प्रकृतिंचे द्रव्य पुद्‌गलपरमाणूंचे स्कंध आहेत, ते अतिसूक्ष्म आहेत आणि त्यांच्यात फल देण्याची शक्तिरूप अनुभाग आहे. तो अतिसूक्ष्म आहे तो अज्ञानीला ज्ञानगम्य नाही. तसेच त्यांचे उपशमन झाल्याने जीवाचे परिणाम ही सम्यक्त्वरूप होतात ते ही अतिसूक्ष्म आहेत ते ही केवलज्ञानगम्य आहेत. तरी सुद्धां जीवाचे काही परिणाम अज्ञानीच्या ज्ञानात येण्यायोग्य होतात, ते त्यांना ओळखण्याचे बाह्य चिन्ह आहे, त्यांची परीक्षा करून निश्चय करण्याचा व्यवहार आहे, असे झाले नाही तर (छद्‌मस्थ) अज्ञानी व्यवहारी जीवाच्या सम्यक्‌त्वाचा निश्चय होणार नाही आणि तेव्हा आस्तिवयाचा अभावसिद्ध होईल व्यवहाराचा लोप होईल. हा महानदोष येईल. म्हणून बाह्य चिन्हांचा आगम, अनुमान, तसेच स्वानुभवाने परीक्षा करून निश्चय केला पाहिजे.

ते चिन्ह (लक्षणे) कोणते ते सांगत आहेत — मुख्य लक्षण तर उपाधिरहित शुद्ध ज्ञान चेतना स्वरूप आत्म्याची अनुभूति आहे. जरी ही अनुभूति ज्ञानाचा विशेष आहे, तथापि ती सम्यक्‌त्व आल्यानंतरच येते, म्हणून त्याला बाह्य चिन्ह म्हटले आहे. ज्ञान तर आपले आपल्यालाच स्वसंवेदनरूप आहे, त्याचा - रागादि विकाररहित शुद्धज्ञानाचा आपल्याला आस्वाद मिळतो की, ''जे हे शुद्धज्ञान आहे ते मी आहे, आणि ज्ञानात जे रागादि विकार आहेत ते कर्माच्या निमित्ताने उत्पन्न होतात ते माझे स्वरूप नाही.'' — अशा प्रकारे भेदज्ञानाने फक्त ज्ञानाचे आस्वादन त्याला ज्ञानाची अनुभूति म्हणतात. तीच आत्म्याची अनुभूति आहे, तसेच तोच शुद्ध नयाचा विषय आहे. अशा अनुभूतिने शुद्धनयाच्या द्वारे असे ही श्रद्धानात होते की, सर्व कर्मजनित रागादिभावाने रहित अनंतचतुष्टय माझे स्वरूप आहे. बाकी सर्व भाव संयोगजनित आहेत. अशा शुद्धात्माची अनुभूति हे सम्यक्त्वाचे लक्षण आहे. हे मिथ्यात्व - अनंतानुबंधीच्या अभावाने सम्यक्त्व होते त्याचे लक्षण आहे, त्या लक्षणालाच (चिन्ह) सम्यक्त्व म्हणणे हा व्यवहार आहे.

त्याची परीक्षा सर्वज्ञाचे आगम, अनुमान तसेच स्वानुभाव प्रत्यक्ष प्रमाण या प्रमाणानी केली जाते. यालाच निश्चय तत्त्वार्थश्रद्धान असे ही म्हटले जाते. तेथे आपली परीक्षा तर आपल्या स्वसंवेदनाच्या प्रधानतेने होते आणि 'पर' ची परीक्षा तर पर च्या अंतरंगात असण्याची परीक्षा 'पर' चे वचन, कायेच्या क्रियेच्या परीक्षेने होते हा व्यवहार आहे. परमार्थ सर्वज्ञ जाणतात. व्यवहारी जीवाला सर्वज्ञानी सुद्धा

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

व्यवहाराला शरण जाण्याचा उपदेश दिला आहे. (अनुभूति ज्ञान गुणाचा पर्याय आहे, तो श्रद्धा गुणापेक्षा भिन्न आहे म्हणून ज्ञानाच्या द्वारे श्रद्धेचा निर्णय करणे व्यवहार आहे, त्याचे नांव व्यवहारी जीवाला व्यवहाराचे शरण किंवा आलंबन समजावे.)

अनेक लोक म्हणतात की, — सम्यक्त्व तर केवलीगम्य आहे. म्हणून आपल्याला सम्यक्त्व होण्याचा निश्चय होत नाही. म्हणून आपल्याला सम्यक्दृष्टी समजत नाहीत. परंतु अशा प्रकारे सर्वथा एकान्ताने सांगणे ही मिथ्यादृष्टि आहे, सर्वथा असे म्हणण्याने व्यवहाराचा लोप होईल, सर्व मुनि - श्रावकांची प्रवृत्ति मिथ्यात्वरूप सिद्ध होईल आणि सर्व आपल्याला मिथ्यादृष्टि मानतील तर व्यवहार कोठे राहील ? म्हणून परीक्षा झाल्यानंतर असे श्रद्धान ठेवू नये की, मी मिथ्यादृष्टिच आहे. मिथ्यादृष्टि तर 'अन्यमती' ला म्हणतात आणि त्यांच्या प्रमाणे स्वत: होवू अशा प्रकारचा एकान्त पक्ष ग्रहण करू नये तसे तत्वार्थ श्रद्धान हे बाह्यलक्षण आहे. जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा मोक्ष असे सात (तत्त्वार्थ) पदार्थ आहेत. त्याला पुण्य आणि पाप जोडल्याने नऊ पदार्थ होतात. त्यांची श्रद्धा अर्थात् संन्मुखता, रूचि अर्थात् तद्रूप भाव करणे तसेच प्रतीति अर्थात् जसे सर्वज्ञानी सांगितले आहे त्यानुसार अंगिकार करणे आणि तसे आचरण करणे :— अशा प्रकारे श्रद्धाळू होणे सम्यक्त्वाचे बाह्य चिन्ह आहे.

तसेच प्रशम, संवेग, अनुकंपा आस्तिक्य, ही सम्यक्त्वाची बाह्य लक्षणे आहेत. येथे

<u>(१) प्रशम म्हणजे</u> — अनंतानुबंधी क्रोधादिक कषायाच्या उदयाचा अभाव असणे होय. त्याची बाह्य लक्षणे म्हणजे - सर्वथा एकान्त तत्त्वार्थाचे कथन करणाऱ्या अन्य मतांचे श्रद्धान, बाह्यत: सत्यार्थपणाचा अभिमान करणे, पर्यायात एकान्तामुळे आत्मबुद्धिचा अभिमान, तसेच प्रिति करणे हे अनंतानुबंधीचे कार्य आहे. हे ज्यांच्यात नसेल, तसेच कोणी आपले वाईट केले म्हणून त्याचा घात करणे असे मिथ्यादृष्टिप्रमाणे विकार बुद्धि आपल्यात उत्पन्न न होवू देणे, तसेच असा विचार करणे की, मी आपल्या परिणामाने जे कर्म बांधले होते तेच वाईट करणारे आहेत, बाकी तर निमित्तमात्र आहेत, अशी बुद्धि आपल्याला होणे. हे मंदकषाय आहे. तसेच अनंतानुबंधीशिवाय अन्य चारित्रमोहाच्या प्रकृतिच्या उदयाने आरंभादिक क्रियेत हिंसादिक होतात ते ही योग्य नाही म्हणून त्यामुळे 'प्रशम' चा अभाव म्हणत नाहीत.

<u>(२) संवेग :</u>— धर्म आणि धर्माच्या फलात परम उत्साह असणे हा संवेग आहे. तसेच साधर्मि बरोबर अनुराग आणि पंचपरमेष्ठीची प्रीति हा सुद्धां संवेगच आहे. या धर्मात तसेच धर्माच्या फलात अनुरागाला 'अभिलाषा' म्हणू नये. कारण की, 'अभिलाषा' तर त्याला म्हणतात ज्याला इंद्रियविषयांची इच्छा आहे आपल्या स्वरूपाच्या प्राप्तित अनुरागाला अभिलाषा म्हणत नाहीत.

<u>(३) निर्वेग :</u>— या संवेगातच निर्वेग सामावला आहे, कारण की, आपल्या स्वस्वरूप धर्माच्या प्राप्तित अनुराग होतो तेव्हा दुसरीकडे सर्व अभिलाषेचा (इच्छेचा) त्याग होतो. सर्व परद्रव्याविषयी वैराग्य येते तोच निर्वेग आहे.

<u>(४) अनुकम्पा ;</u>— सर्व प्राण्याविषयी उपकाराची (भावना) बुद्धि आणि मैत्रीभाव म्हणजे अनुकंपा होय. तसेच मध्यस्थभाव असल्यामुळे सम्यक्दृष्टिला शल्य वाटत नाही. कोणाबरोबर वैरभाव नसतो, सुख, दु:ख,

जीवन, मरण आपल्याला पराद्वारे आणि पराला आपल्याद्वारे असे मानत नाही. तसेच दुसऱ्यासाठी जी अनुकंपा आहे ती स्वत:तच आहे. म्हणून दुसऱ्याचे वाईट करण्याचा विचार केला तर आपल्या कषाय भावाने स्वत:चेही वाईट होईल, दुसऱ्याचे वाईट चिंतले नाही तर आपले स्वत:चे कषायभाव होणार नाहीत म्हणून ती आपली अनुकंपाच झाली.

(५) आस्तिक्य :— जीवादि पदार्थात आस्तित्वभाव तो आस्तिवयभाव आहे. जीवादि पदार्थांचे स्वरूप सर्वज्ञाच्या आगमातून जाणणे त्यांच्यात अशी बुद्धि होणे की, — ''जसे सर्वज्ञानी सांगितले आहे तसेच हे आहे. त्यापेक्षा निराळे नाही तोच अस्तिक्य भाव आहे. अशा प्रकारे हे सम्यक्त्वाचे बाह्य लक्षण आहे.

सम्यक्त्वाचे आठ गुण आहेत :— संवेग, निर्वेग, निंदा, गर्हा, उपशम, भक्ति, वात्सल्य आणि अनुकंपा. हे सर्व प्रशमादि चारीमध्ये येतात. संवेगात निर्वेग, वात्सल्य आणि भक्ति येतात तसेच प्रशमात निंदा, गर्हा येतात.

सम्यक्‌दर्शनाचे आठ अंग सांगितले आहेत. त्यांना 'लक्षण' असे ही म्हणतात आणि गुणही म्हणतात. त्यांची नांवे — नि:शंकित, नि:कांक्षित, निर्विचिकित्सा, अमूढदृष्टि, उपगूहन स्थितिकरण, वात्सल्य आणि प्रभावना.

तेथे शंका नांव संशयाचे ही आहे आणि भयाचे ही आहे. तेथे धर्म द्रव्य अधर्मद्रव्य, कालाणुद्रव्य परमाणु इत्यादि तर सूक्ष्म वस्तु आहेत. तसेच द्वीप, समुद्र मेरूपर्वत आदि दूरवर्ती पदार्थ आहेत तसेच तीर्थंकर, चक्रवर्ति आदि अंतरित पदार्थ आहेत; ते सर्वज्ञाच्या आगमामध्ये जसे सांगितले आहेत तसे आहेत की, नाहीत ? किंवा सर्वज्ञदेवाने वस्तुचे स्वरूप अनेकान्तात्मक सांगितले आहे ते सत्य आहे किंवा असत्य ? अशा संदेहाला शंका असे म्हणतात. ज्याला ही शंका नसते त्याला नि:शंकित अंग असे म्हटले जाते. तसेच ही जी शंका येते ती मिथ्यात्वाच्या कर्मोदयाने येते; 'परा'मध्ये आत्मबुद्धि होणे हे त्याचे कार्य आहे. जी पर मध्ये आत्मबुद्धि आहे ती पर्यायबुद्धि आहे, आणि पर्यायबुद्धि भय ही उत्पन्न करते. 'शंका' भयाला ही म्हणतात. त्याचे सात भेद आहेत - या लोकीचे भय, परलोकीचेभय, मृत्युचेभय, अरक्षेचेभय, अगुप्तिभय, वेदनेचेभय, अकस्मिकभय ज्याना हे भय आहे त्यांच्या मिथ्यात्व कर्माचा उदय समजला पाहिजे. सम्यकूदृष्टी झाल्यानंतर हे भय राहात नाही.

प्रश्न :— भयप्रकृतिचा उदय तर आठव्या गुणस्थानात आहे; त्याच्या निमित्ताने सम्यकूदृष्टिला भय होतेच, मग भयाचा अभाव कसा काय ?

उत्तर :— जरी सम्यकूदृष्टीला चारित्रमोहाच्या भेदाने भयप्रकृतिच्या उदयाने भय होते. तरी सुद्धा त्याला निर्भयच म्हणतात, कारण की त्याला कर्माच्या उदयाचे स्वामित्व नाही आणि परद्रव्याच्या कारणाने आपल्या द्रव्य स्वभावाचा नाश मानत नाहीत. पर्यायाचा स्वभाव विनाशिक मानतात, म्हणून भय होत असून ही त्याला निर्भयच म्हटले जाते. भय झाल्यानंतर त्याचा उपचार पळून जाणे इत्यादी करतात. तेथे वर्तमानातील पीडा सहन न झाल्याने तो इलाज (उपचार) करतो तो निर्बलतेचा दोष आहे. अशाप्रकारे सम्यकूदृष्टि संदेह तसेच भयरहित झाल्याने त्याला नि:शंकित अंगाची प्राप्ति होते ।।१ ।।

कांक्षा म्हणजे (भोगों की इच्छा) अभिलाषा. तेथे पूर्वकालात केलेल्या भोगांची इच्छा तसेच त्या भोगांच्या मुख्य क्रियेत वांछा (इच्छा) तसेच कर्म आणि कर्म फलाची इच्छा तसेच मिथ्या दृष्टिच्या भोगाची प्राप्ति पाहून त्यांना आपल्या मनात भला जाणणे किंवा इंद्रिय विषयात रूचि घेणे, उद्वेगन होणे, अशाप्रकारचे हे भोगाभिलाषेची लक्षणे आहेत. अशी भोगाभिलाषा मिथ्यात्वकर्माच्या उदयाने होते. आणि ज्यांना ही (भोगाभिलाषा) नसते तो नि:कांक्षित अंगयुक्त सम्यक्दृष्टि होतो. तो सम्यक्दृष्टि जरी शुभाक्रिया-व्रतादिक आचरण करतो आणि त्याचे फल शुभ कर्म बंध आहे, परंतु तो त्याची इच्छा करत नाही. व्रतादिकाना स्वरूपाचे साधक जाणून त्याचे आचरण करतो, कर्म फलाची वांछा करत नाही असे नि:कांक्षित अंग आहे ।।२।।

आपल्यातच आपल्या गुणाच्या महत्ता बुद्धिने स्वत:ला श्रेष्ठ मानून 'परा'मध्ये हीनतेची बुद्धि ठेवणे त्याला विचिकित्सा म्हणतात. अशी बुद्धि न होणे ती निर्विचिकित्सा अंगयुक्त व सम्यक्दृष्टि होय. त्याची लक्षणे अशी आहेत की, जर कोणा पुरूषाला पापाच्या उदयाने दु:ख झाले, असाताच्या उदयाने ग्लानीयुक्त शरीर मिळाले तर त्याच्यात ग्लानी बुद्धि करत नाही. अशी ही बुद्धि तो करत नाही की, मी संपदावान आहे, सुंदर आहे, तो दीन आहे, रंक आहे, माझी बरोबरी करूं शकत नाही. उलट असा विचार करतो की, प्राण्यांच्या कर्मोदयाने अनेक विचित्र अवस्था येतात; जेव्हा माझ्या अशा कर्माचा उदय होईल तेंव्हा मी ही असाच होईन - अशा विचाराने निर्विचिकित्सा अंग प्राप्त होते. ।।३।।

अतत्त्वात तत्त्वपणाचे श्रद्धान असणे ही मूढ दृष्टि आहे. अशी मूढ दृष्टी ज्यांची नाही ते अमूढ दृष्टि होय. मिथ्यादृष्टी द्वारे मिथ्या हेतू आणि मिथ्या दृष्टान्ताने साधित पदार्थ आहेत ते सम्यक्दृष्टीला प्रिति उत्पन्न करत नाहीत तसेच लौकिक रूढी अनेक प्रकारच्या आहेत, त्या नि:सार आहेत, नि:सार पुरूषाकडूनच त्याचे आचरण होते, जे अनिष्ट फल देणारे आहे, तसेच जे निष्फल आहे, ज्याचे वाईट फल आहे तसेच त्याचा काही हेतू नाही, अर्थ नाही, जी काही लोक रूढी चालते त्याला लोक आपलेसे करतात आणि मग ते सोडणे कठिण होते - इत्यादि लोकरूढी आहे.

कुदेवामध्ये देवबुद्धि, अधर्मात धर्मबुद्धि, अगुरूमध्ये गुरूबुद्धि इत्यादी देवादिक मूढता आहे, ती कल्याणकारी नाही, सदोष देवाला देव मानणे, तसेच त्यांच्या निमित्ताने हिंसादि द्वारा अधर्माला धर्म मानणे, तसेच मिथ्याचारी, शल्यवान, परिग्रहवान सम्यक्त्व-व्रत रहिताला गुरू मानणे इत्यादि मूढ दृष्टिची लक्षणे आहेत. आता देव-धर्म-गुरू कसे असतात त्यांचे स्वरूप जाणून घेतले पाहिजे. म्हणून सांगतात :—

रागादिकदोष आणि ज्ञानावरणादिक कर्मच आवरण आहे. हे दोन्ही ज्याना नाहीत तो देव आहे. त्याला केवलज्ञान, केवलदर्शन, अनंतसुख, अनंतवीर्य, असे अनंत चतुष्टय प्राप्त झालेले असतात. सामान्य रूपाने तर देव एकचं आहे आणि विशेष रूपाने अरिहंत, सिद्ध असे दोन भेद आहेत, तसेच यांचे नामभेदाने प्रकार केले. तर हजार नांवे आहेत. तसेच गुणभेद केले गेले तर अनंत गुण आहेत. परमौदारिक देहात विद्यमान घातिकर्म रहित, अनंतचतुष्टयसहित धर्माचा उपदेश करणारे असे ते अरहंत देव आहेत तसेच पुद्गलमयी देहाने रहित लोकाच्या शिखरावर विराजमान सम्यक्त्वादि अष्टगुणमंडित अष्टकर्मरहित असे सिद्धदेव

www.vitragvani.com



आहेत. त्यांची अनेक नांवे आहेत, अरहंत, जिन, परमात्मा, महादेव, शंकर, विष्णू, ब्रह्मा, हरि, बुद्ध, सर्वज्ञ, वीतराग, परमात्मा इत्यादि अर्थासहित अनेक नांवे आहेत असे देवाचे स्वरूप जाणावे.

गुरूचा ही अर्थाने विचार केला तर ते अर्हंतदेवच आहेत. कारण मोक्षमार्गाचा उपदेश करणारे अरिहंतच आहेत. तेच साक्षात मोक्षमार्गाचे प्रवर्तन करतात; तसेच अरिहंता नंतर छद्रमस्थज्ञानाचे धारण करणारे, निर्ग्रंथ दिगंबर रूप धारण करणारे मुनि आहेत ते ही गुरू आहेत. कारण की, अरिहंताची सम्यक्‌दर्शन, ज्ञान, चारित्राची एकदेश शुद्धता त्यांच्यात असते. तीच संवर - निर्जरा - मोक्षाचे कारण आहे, म्हणून अरिहंताप्रमाणे एकदेश रूपाने निर्दोष आहे ते मुनि ही गुरू आहेत, मोक्षमार्गाचा उपदेश करणारे आहेत.

असा मुनिपणा सामान्यरूपाने एक प्रकारचा आहे आणि विशेषरूपाने तोच तीन प्रकारचा आहे. - आचार्य, उपाध्याय, साधू अशा प्रकारे ही पदवीची विशेषता होवून ही त्यांची मुनिपणाची क्रिया समानच आहे; बाह्य लिंग ही समानच आहे, पंचमहाव्रत पंचसमिति, तीन गुप्ति अशा तेरा प्रकारचे चरित्र ही समानच आहे, तप ही शक्तिनुसार समानच आहे, साम्यभाव ही समानच आहे, मूलगुण, उत्तरगुण ही समान आहेत, परिषह उपसर्गाचे सहज करणे ही समान आहे, आहारादिची विधि ही समान आहे. चर्या, स्थान, आसनादि ही समान आहेत, चार आराधनेची आराधना क्रोधादिक कषायाना जिंकणे इत्यादि मुनिंची प्रवृत्ति हे सर्व समान आहे.

विशेष हे आहे की, जे आचार्य पंचाचार दुसऱ्याना ग्रहण करायला लावतात, तसेच दुसऱ्याला दोष लागला तर त्याला प्रायश्चिताचा विधि सांगतात, धर्मोपदेश दीक्षा, शिक्षा देतात; असे आचार्य गुरू वंदना करण्यायोग्य आहेत.

जे उपाध्याय आहेत ते वादित्व, वाग्मित्व, कवित्व, गमकत्व - या चार विद्येमध्ये प्रवीण असतात, त्यात शास्त्राचा अभ्यास प्रधानकारण आहे. जे स्वत: शास्त्र वाचतात आणि दुसऱ्याला शिकवतात असे उपाध्याय गुरू वंदनीय आहेत. त्यांची अन्य मुनिव्रते, मूलगुण, उत्तरगुणाची क्रिया आचार्या समानच असते. तसेच साधू रत्नत्रयात्मक मोक्षमार्गाची साधना करतात ते साधू आहेत, त्याना दीक्षा, शिक्षा, उपदेशादि देण्याचा अधिकार नाही. ते तर आपल्या स्वरूपाच्या साधनेतच तत्पर असतात; जिनागमात जशी निर्ग्रंथ दिगंबर मुनिंची प्रवृत्ति सांगितली आहे तशीच सर्व प्रवृत्ति त्यांची असते. असे साधू वंदनकरण्यायोग्य आहेत. अन्यलिंगी, व्रतादिकाने रहित, परिग्रहवान विषयामध्ये आसक्त गुरूनाम धारण करतात ते वंदन करण्यायोग्य नाहीत.

या पंचमकालात जिनमतामध्ये ही 'वेशी' झाले आहेत. ते श्वेतांबर यापनीयसंघ, गोपुच्छपिच्छसंघ, नि:पिच्छसंघ, द्राविड़संघ आदि अनेक झाले आहेत; हे सर्व वंदन करण्यायोग्य नाहीत. मूलसंघ, नग्नदिगंबर, अठ्ठाविस मूलगुणांचे धारक दयेचे आणि स्वच्छतेची उपकरणे (धारण करणारे) मयूरपिच्छक, कमंडल धारण करणारे यथोक्त विधि आहार करणारे गुरू वंदन करण्यायोग्य आहेत. कारण की, जेंव्हा तीर्थंकरदेव दीक्षा घेतात तेव्हा असेच रूप धारण करतात, अन्यवेष धारण करत नाहीत; यालाच जिनदर्शन म्हणतात.

www.vitragvani.com



धर्म त्याला म्हणतात जो जीवाला संसाराच्या दु:खरूप निच पदापासून मोक्षाच्या सुखरूप उच्चपदाला (धारण) घेवून जातो. असा धर्म मुनि - श्रावकाच्या भेदाने दर्शन, ज्ञान-चारित्रात्मक एकदेश, सर्वदेशरूप, निश्चय-व्यवहार, द्वारे दोन प्रकारे सांगितले आहेत; त्याचे मूल सम्यक्‌दर्शन आहे. त्याच्याशिवाय धर्माची उत्पत्ति होत नाही अशा प्रकारे देव-गुरू-धर्मात तसेच लोकात यथार्थ दृष्टि असणे आणि मूढ़ता नसणे ते अमूढ़ दृष्टिअंग होय . ।।४।।

आपल्या आत्म्याची शक्ती वाढवणे म्हणजे उपबृव्हण अंग आहे. सम्यक्‌दर्शन ज्ञान-चारित्राला आपल्या पुरूषार्थाद्वारे वाढवणेच उपबृव्हंण (अंग) आहे. यालाच उपगूहन ही म्हणतात. त्याचा असा अर्थ जाणला पाहिजे की, — जिनमार्ग स्वयंसिद्ध आहे; त्याच्यात बालकाच्या तसेच असमर्थ जनाच्या आश्रयाने जी न्युनता येते त्याला आपल्या बुद्धिने (गुप्त करून) दूर करणे हे उपगूहन अंग आहे. ।।५।।

जो धर्मापासून च्युत होत असेल त्याला स्थिर करणे स्थितिकरण अंग आहे. स्वत: कर्मोदयाने वश होवून कदाचित् श्रद्धेने तसेच क्रिया आचाराने च्युत होत असेल तर आपल्याला पुरूषार्थपूर्वक पुन: श्रद्धेत दृढ करणे, त्याचप्रमाणे अन्यकोणी धर्मात्मा धर्मापासून च्युत होत असेल तर त्याला उपदेशादिद्वारे धर्मात स्थापित करणे ते स्थितिकरण अंग होय ।।६।.

अरिहंत, सिद्ध, त्यांचे बिम्ब, चैत्यालय, चतुर्विधसंघ आणि शास्त्रात दासत्त्व असणे, जसा स्वामीचा नोकर (भृत्य) दास होतो त्याप्रमाणे ते वात्सल्य अंग आहे. धर्माच्या स्थानाला 'पर' उपसर्गादि आले त्याला आपल्या शक्तीनुसार दूर करणे. आपली शक्ती न लपवणे हे सर्व धर्मात अतिप्रिति असेल तेव्हाच होईल. ।।७।।

धर्माला प्रकाशित करणे हे प्रभावना अंग आहे. रत्नत्रयद्वारा आपल्या आत्म्याला प्रकाशमान करणे, तसेच दान, तप, पूजा, विधानद्वारे आणि विद्या, अतिशय चमत्कारादि द्वारे जिनधर्माला प्रकाशमान करणे हे प्रभावना अंग आहे. ।।८।।

अशा प्रकारे ही सम्यक्त्वाची आठ अंगे आहेत, ज्यांच्यात ही प्रकट होतील त्याला सम्यक्त्व झाले असे समजावे.

प्रश्न :— जर ही सम्यक्त्वाची चिन्हे मिथ्यादृष्टि मध्ये दिसली तर सम्यक्-मिथ्याचा फरक कसा करता येईल ?

उत्तर :— जशी लक्षणे सम्यक्त्वाची असतील तशी मिथ्यात्वाची कधीही नसतील, तरी सुद्धा अपरीक्षकाला समान दिसली तर परीक्षा करून भेद जाणला जावू शकतो. परीक्षेमध्ये आपला स्वानुभव प्रधान आहे. सर्वज्ञाच्या आगमात जसा आत्म्याचा अनुभव असला पाहिजे तसा स्वत:ला झाला तर त्याच्या होण्याने आपली वचन कायेची प्रवृत्ति पण त्यानुसार होते. त्या प्रवृत्तिप्रमाणे दुसऱ्याची ही वचन कायेची प्रवृत्ति ओळखली जाते. — अशा प्रकारे परीक्षा केल्याने भेद समजतो. तसेच हा व्यवहार मार्ग आहे, म्हणून व्यवहारी छद्‌मस्थ जीवांची आपल्या ज्ञानानुसार प्रवृत्ति होते. यथार्थ सर्वज्ञ देव जाणतात. व्यवहारीला सर्वज्ञदेवाने व्यवहाराचाच आश्रय सांगितला आहे. हे अंतरंगसम्यक्त्व भावरूप सम्यक्त्व आहे तेच

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



सम्यक्‌दर्शन आहे, बाह्यदर्शन, व्रत, समिती, गुप्तिरूप चारित्र आणि तपसहित अठ्ठाविस मूलगुण सहित नग्न दिगंबर मुद्रा त्याची मूर्ति आहे. त्याला जिनदर्शन म्हणतात त्यांच्या वंदन - पूजनाचा निषेध केला आहे. असा हा उपदेश भव्य-जीवांचा अंगिकार करण्यायोग्य आहे. ॥२॥

आता म्हणतात की, — अंतरंग सम्यक्‌दर्शनाशिवाय बाह्यचारित्राने निर्वाण होत नाही :—

दंसणभट्टा भट्टा दंसणभट्टस्स णत्थि णिव्वाणं ।
सिज्झंति चरियभट्टा दंसणभट्टा ण सिज्झंति ॥३॥

दर्शनभ्रष्टाः भ्रष्टाः दर्शनभ्रष्टस्य नास्ति निर्वाणम् ।
सिध्यन्ति चारित्रभ्रष्टाः दर्शनभ्रष्टाः न सिध्यन्ति ॥३॥

अर्थ :— जे पुरूष दर्शनापासून भ्रष्ट आहेत ते भ्रष्ट आहेत. जो दर्शनभ्रष्ट आहे त्यांना निर्वाण मिळत नाही; कारण कीं, हे प्रसिद्ध आहे की, जो चारित्र्याने भ्रष्ट आहे ते तर सिद्धिला प्राप्त होवू शकतात परंतु जे दर्शनभ्रष्ट आहेत ते सिद्धिला प्राप्त होत नाहीत.

भावार्थ :— जे जिनमतावर श्रद्धा करत नाहीत त्याना भ्रष्ट असे म्हणतात. आणि जे श्रद्धेने भ्रष्ट नाहीत परंतु कदाचित् कर्माच्या उदयाने चारित्रभ्रष्ट झाले आहेत त्याना भ्रष्ट म्हणत नाहीत, कारण की, जे दर्शनाने भ्रष्ट आहेत त्याना निर्वाणाची प्राप्ति होत नाही; जो चारित्र्याने भ्रष्ट होतात परंतु श्रद्धा दृढ असते त्यांना तर शिघ्रतेने पुन: चारित्र्याचे ग्रहण होते आणि मोक्ष प्राप्त होते. तसेच दर्शन श्रद्धेने भ्रष्ट असेल तर त्यांना परत चारित्र्याचे ग्रहण कठिण होते म्हणून निर्वाणाची प्राप्ति दुर्लभ होते. जसे वृक्षाच्या शाखा आदि कापल्यागेल्या परंतु मुळे चांगली राहिली तर शाखा आदि परत शीघ्रतेने पुन: उगवतात आणि फळे लागतात परंतु मुळे उखडली गेली तर शाखा वगैरे कसे राहातील ? त्याप्रमाणे धर्माचे मूल दर्शन जाणावे ॥३॥

आता जो सम्यक्‌दर्शनापासून भ्रष्ट आहे आणि शास्त्राला अनेक प्रकाराने जाणतो तरीही संसारात भटकतात; — अशा ज्ञानापेक्षा ही दर्शनाला अधिक म्हणतात. —

सम्मत्तरयणभट्टा जाणंता बहुविहाइं सत्थाइं ।
आराहणाविरहिया भमंति तत्थेव तत्थेव ॥४॥

सम्यक्त्वरत्नभ्रष्टाः जानंतो बहुविधानि शास्त्राणि ।
आराधना विरहिताः भ्रमंति तत्रैव तत्रैव ॥४॥

अर्थ :— जो पुरूष सम्यक्त्वस्वरूप रत्नापासून भ्रष्ट आहे तसेच अनेक प्रकारच्या शास्त्राना जाणतात, तरी सुद्धा ते आराधनेपासून रहित होवून संसारातच भ्रमण करतात. दोन वेळा हे सांगून फारच परिभ्रमण सांगितले आहे.

www.vitragvani.com



<u>भावार्थ :</u>— जे जिनमताच्या श्रद्धेपासून भ्रष्ट आहेत आणि शद्ब, न्याय, छंद, अलंकार आदि अनेक प्रकारच्या शास्त्राना जाणतात तथापि सम्यक्‌दर्शन, ज्ञान, चारित्र, तपरूप आराधना जाणत नाहीत म्हणून कुमरणाने चतुर्गतिरूप संसारात भ्रमण करतात. मोक्ष प्राप्त करून घेत नाहीत; म्हणून सम्यक्त्वरहित ज्ञानाला नांव देत नाहीत.

आता सांगतात की, – जे तप ही करतात आणि सम्यक्त्वरहित असतात त्याना स्वरूपाचा लाभ होत नाही :—

सम्मत्तविरहिया णं सुट्ठु वि उग्गं तवं चरंता णं ।
ण लहंति बोहिलाहं अवि वाससहस्सकोडीहिं ॥५॥

सम्यक्त्वविरहिता णं सुष्ठु अपि उग्रं तपः चरंतो णं ।
न लभन्ते बोधिलाभं अपि वर्षसहस्रकोटिभिः ॥५॥

<u>अर्थ :</u>— जे पुरूष सम्यक्त्वाने रहित आहेत ते सुष्ठु अर्थात् सहजासहजी उग्र तपाचे आचरण करतात तरीसुद्धा ते बोधि अर्थात् सम्यक्‌दर्शन-ज्ञान-चारित्रमय आपले स्वरूप त्याचा लाभ प्राप्त करत नाहीत जरी हजार कोटी वर्षापर्यंत राहिले तरी सुद्धां स्वरूपाची प्राप्ति होणार नाही. येथे गाथेमध्ये दोन्ही ठिकाणी 'णं' शद्ब आहे तो प्राकृतमध्ये अव्यय आहे, त्याचा अर्थ वाक्याचा अलंकार आहे.

<u>भावार्थ :</u>— सम्यक्त्वाशिवाय हजारकोटी वर्षे तप करून सुद्धा मोक्षमार्गाची प्राप्ति होत नाही. येथे हजार कोटी म्हणण्याचे तात्पर्य तितकेच वर्षे समजू नये परंतु येथे काळाचा दीर्घपणा सांगितला आहे. 'तप' मनुष्य पर्यायातच होते, म्हणून मनुष्य काल ही थोडा आहे म्हणून तपाचे तात्पर्य अनेक वर्षे सांगितले आहेत ॥५॥

सम्मत्तणाणदंसणबलवीरियवड्ढमाण जे सव्वे ।
कलिकलुसपावरहिया वरणाणी होंति अइरेण ॥६॥

सम्यक्त्वज्ञानदर्शनबलवीर्यवर्द्धमानाः ये सर्वे ।
कलिकलुषपापरहिताः वरज्ञानिनः भवंति अचिरेण ॥६॥

<u>अर्थ :</u>— जे पुरूष सम्यक्त्व ज्ञान, दर्शन, बल, वीर्याने वर्धमान आहेत तसेच कलिकलुष पाप अर्थात् या पंचमकालात मलिन पापाने रहित आहेत ते सर्व अल्पकालात वरज्ञानी अर्थात् केवलीज्ञानी होतात.

<u>भावार्थ :</u>— या पंचमकालात जड-वक्र जीवांच्या निमित्ताने यथार्थ मार्ग विकृत झाला आहे. त्यांच्या वासनेपासून जे जीव रहित झाले ते यथार्थ जिनमार्गच्या श्रद्धानरूप सम्यक्त्व सहित ज्ञान दर्शनाचे आपले पराक्रम-बलाला न लपवता तसेच आपले वीर्य अर्थात शक्तीने वर्धमान होवून प्रवर्ततात ते अल्पकालातच केवलज्ञानी होवून मोक्ष प्राप्त करतात ॥६॥

www.vitragvani.com



आता सांगतात की, - सम्यक्त्वरूपी जलाचा प्रवाह आत्म्याला कर्मरज लागू देत नाही —

सम्मत्तसलिलपवहो णिच्चं हियए पवट्टए जस्स ।
कम्मं वालुयवरणं बन्धुच्चिय णासए तस्स ॥७॥

सम्यक्त्वसलिलप्रवाहः नित्यं हृदये प्रवर्त्तते यस्य ।
कर्म वालुकावरणं बद्धमपि नश्यति तस्य ॥७॥

अर्थ :— ज्या पुरूषाच्या हृदयात सम्यक्त्वरूपी जलाचा प्रवाह निरंतर प्रवर्तमान आहे. त्याला कर्मरूपी रज-धूळीचे आवरण लागत नाही, तसेच पूर्वकाळात जो कर्मबंध झाला असेल तो ही नाशाला प्राप्त होतो.

भावार्थ :— सम्यक्त्वसहित पुरूषाला (निरंतर ज्ञानचेतनेच्या स्वामित्वरूप परिणमन आहे म्हणून) कर्माच्या उदयाने झालेल्या रागादिक भावांचे स्वामित्व येत नाही, म्हणून कषायांच्या तीव्र कलुषतेने रहित परिणाम उज्ज्वल होतात; त्याला जलाची उपमा दिली आहे. जसे जेथे निरंतर जलाचा प्रवाह वाहतो तेथे वाळू-रेती-धूळ लागत नाही; तसेच सम्यक्त्वी जीव कर्माच्या उदयाला भोगून ही कर्माने लिप्त होत नाहीत. तसेच बाह्य व्यवहाराच्या अपेक्षेने असे ही तात्पर्य जाणले पाहिजे की, ज्यांच्यात निरंतर सम्यक्त्वरूपी जलाचा प्रवाह वाहातो तो सम्यक्त्वी पुरूष या कलिकालसंबंधी वासना अर्थात् कुदेव-कुशास्त्र-कुगुरूला नमस्कारादिरूप अतिचाररूप रज ही लागत नाही तसेच त्याच्या मिथ्यात्वासंबंधी प्रकृतिंचा आगामी बंध ही होत नाही ॥७॥

आता सांगतात की, — जो दर्शन भ्रष्ट आहे तसेच ज्ञान चारित्राने भ्रष्ट आहेत ते स्वत: तर भ्रष्ट आहेतच परंतु दुसऱ्यानाही भ्रष्ट करतात हा अनर्थ आहे :—

जे दंसणेसु भट्ठा णाणे भट्ठा चरित्तभट्ठा य ।
एदे भट्ठ वि भट्ठा सेसं पि जणं विणासंति ॥८॥

ये दर्शनेषु भ्रष्टाः ज्ञाने भ्रष्टाः चारित्र भ्रष्टाः च ।
एते भ्रष्टात् अपि भ्रष्टाः शेषं अपि जनं विनाशयंति ॥८॥

अर्थ :— जे पुरूष दर्शनाने भ्रष्ट आहे तसेच ज्ञान-चारित्र्याने ही भ्रष्ट आहेत ते पुरूष भ्रष्टामध्ये ही विशेष भ्रष्ट आहेत. कितीतरी दर्शनसहित आहे. परंतु ज्ञान-चारित्र त्यांचे नाही, तसेच कितीतरी अंतरंग दर्शनापासून भ्रष्ट आहे. तरीसुद्धां ज्ञान-चारित्राचे सहजासहजी पालन करतात; आणि दर्शन-ज्ञान चारित्र या तिन्हीनी भ्रष्ट आहे ते तर अत्यन्त भ्रष्ट आहेत; ते स्वयं तर भ्रष्ट आहेतच परंतु शेष अर्थात् आपल्या शिवाय अन्य लोकाना ही नष्ट करतात.

भावार्थ :— येथे सामान्य वचन आहे म्हणून असा ही आशय सूचित करतात की, सत्यार्थ श्रद्धान, ज्ञान, चारित्र तर दूरच राहाते जो आपल्या मताची श्रद्धा, ज्ञान, आचरणाने ही भ्रष्ट आहेत ते तर निरर्गल

www.vitragvani.com



स्वेच्छाचारी आहेत ते स्वत: भ्रष्ट आहेत त्याचप्रमाणे अन्य लोकाना उपदेशादिक द्वारा भ्रष्ट करतात तसेच त्यांची प्रवृत्ति पाहून लोक स्वत:च भ्रष्ट होतात, म्हणून असे तीव्र कषायी निषिद्ध आहेत; त्यांची संगति करणे ही उचित नाही ।।८।।

आता सांगतात की, — असे भ्रष्ट पुरूष स्वत: भ्रष्ट आहेत, ते धर्मात्मा पुरूषाना दोष देवून भ्रष्ट म्हणतात :—

**जो कोवि धम्मसीलो संजमतवणियमजोयगुणधारी ।**
**तस्स य दोष कहंता भग्गा भग्गत्तणं दिंति ।।९।।**

यः कोऽपि धर्मशीलः संयमतपोनियमयोगगुणधारी ।
तस्य च दोषान् कथयंतः भग्ना भग्नत्वं ददति ।।९।।

<u>अर्थ :</u>— जो पुरूष धर्मशील अर्थात् आपल्या स्वरूपरूप धर्माला साधण्याचा ज्याचा स्वभाव आहे, तसेच संयम अर्थात् इन्द्रिय मनाचा निग्रह आणि षट्काय जीवांची रक्षा, तप अर्थात् बाह्याभ्यंतर भेदाने 'बारा' प्रकारचे तप, नियम अर्थात् आवश्यकादि नित्यकर्म, योग अर्थात् समाधी, ध्यान तथा वर्षाकाल आदि कालयोग गुण अर्थात् आवश्यकादि नित्यकर्म, योग अर्थात् समाधी, ध्यान, तसेच वर्षाकाल आदि काल योग, गुण अर्थात् मूलगुण, उत्तरगुण याच पालन करणारा असेल त्याला कित्येक मतभ्रष्ट जीव दोषांचे आरोपण करून म्हणतात की, — हा भ्रष्ट आहे दोषयुक्त आहे, ते पापात्मा जीव स्वत:भ्रष्ट आहेत म्हणून आपल्या अभिमानाच्या पुष्टिसाठी दुसऱ्या धर्मात्मा पुरूषाला भ्रष्टपणा देतात.

<u>भावार्थ :</u>— पापी लोकांचा असाच स्वभाव असतो की, स्वत: पापी असतात तसेच धर्मात्म्यामध्यें दोष सांगून आपल्या सारखे बनवू इच्छितात. अशा पापी लोकांची संगत करू नये.

आता सांगतात की, जो दर्शनभ्रष्ट आहे तो मूलभ्रष्ट आहे, त्याला फलाची प्राप्ति होत नाही —

**जह मूलम्मि विणट्ठे दुमस्स परिवार णत्थि परवड्ढी ।**
**तह जिणदंसणभट्ठा मूलविणट्ठा ण सिज्झंति ।। १० ।।**

यथा मूले विनष्टे द्रुमस्य परिवारस्य नास्ति परिवृद्धिः ।
तथा जिनदर्शनभ्रष्टाः मूलविनष्टाः न सिद्ध्यन्ति ।।१०।।

<u>अर्थ :</u>— ज्या प्रमाणे वृक्षाचे मूल नष्ट झाल्याने त्याचा परिवार अर्थात् शाखा, फांद्या, पाने, फुले, फळांची वृद्धि होत नाही त्याप्रमाणे जे जिनदर्शनाचा पासून भ्रष्ट आहेत – बाह्यत: तर नग्न दिगंबर यथाजातरूप निर्गंथ लिंग, मूलगुणाचे धारण मोरपिसांची पिंछी तसेच कमंडलु धारण करणारे यथाविध दोष टाळून उभ्या उभ्या शुद्ध आहार घेणे इत्यादि बाह्य शुद्ध वेष धारण करतात, तसेच अंतरंगात जीवादि सहा द्रव्ये, नवपदार्थ, सात

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



तत्त्वांचे यथार्थ श्रद्धान आणि भेदविज्ञानाने आत्मस्वरूपाचे अनुभवन - असे दर्शन मतापासून (बाह्य) निराळे आहेत. मूल विनिष्ट आहेत, त्याना सिद्धि मिळत नाही. आता म्हणतात की, - जिन दर्शनच मूल मोक्ष मार्ग आहे.

जह मूलाओ खन्धो साहापरिवार बहुगुणो होइ ।
तह जिणदंसण मूलो णिद्दिट्ठो मोक्खमग्गस्स ॥११॥

यथा मूलात् स्कंधः शाखापरिवारः बहुगुणः भवति ।
तथा जिनदर्शनं मूलं निर्दिष्टं मोक्षमार्गस्य ॥११॥

<u>अर्थ :</u>— ज्याप्रमाणे मूळापासून खोड (स्कंध) निघते, 'खोड' म्हणजे ज्यापासून शाखा आदि परिवार मोठा होतो, त्याप्रमाणे गणधर देवादिकानी जिनदर्शनाला मोक्षमार्गाचे मूळ म्हटले आहे.

<u>भावार्थ :</u>— येथे जिनदर्शन अर्थात् तीर्थंकर परमदेवाने जे दर्शन ग्रहण केले त्याचा उपदेश दिला आहे तो मूलसंघ आहे. तो २८ मूलगुणासहित सांगितला आहे. पांच महाव्रत, पांचसमिति, सहा आवश्यक, पांच इंद्रिये वश करणे, स्नान न करणे, वस्त्रादिकांचा त्याग, दिगंबर मुद्रा, केशलोच करणे, एकवेळा भोजन करणे, उभे राहून आहार घेणे, दंतधावन न करणे, हे अठ्ठावीस मूल गुण आहेत. तसेच सेहेचाळीस दोष टाळून आहार करणे हे एषणा समिति मध्ये येते. 'ईर्यापथ' म्हणजे - पाहून चालणे हे ईर्या समितिमध्ये येते. तसेच दयेचे उपकरण मोराच्या पिसाची पिंछी आणि स्वच्छतेचे उपकरण कमंडलु धारण करणे असा बाह्य वेश असतो. तसेच अंतरंगात जीवादिक षट्द्रव्ये, पंचास्तिकाय, साततत्त्व, नवपदार्थांना यथोक्त जाणून श्रद्धा करणे आणि भेदविज्ञानाद्वारे आपल्या आत्मस्वरूपाचे चिंतन करणे अनुभव करणे असे दर्शन अर्थात् मत ते मूलसंघाचे आहे. असे जिनदर्शन आहे ते मोक्षमार्गाचे मूल आहे. या मूळापासून मोक्षमार्गाची सर्व प्रवृत्ति सफल होते. तसेच जे या पासून भ्रष्ट होतात ते या पंचमकाळात दोषामुळे जैनाभासी झाले आहेत, ते श्वेताम्बर, द्राविड, यापनीय, गोपुच्छ, पिच्छ, निपिच्छ पांचसंघ होतात. त्यांनी सूत्र सिद्धान्त अपभ्रंशीत केले आहेत. त्यांनी बाह्य वेषाला बदलून आचरण बिघडवले आहे ते जिनमतापासून मूल संघापासून भ्रष्ट आहेत त्याना मोक्ष मार्गाची प्राप्ति होणार नाही. मोक्ष मार्गाची प्राप्ति मूल संघाचे श्रद्धान-ज्ञान, आचरणानेच आहे असा नियम जाणावा. ॥११॥

पुढे म्हणतात की, जे हे यथार्थ दर्शनापासून भ्रष्ट आहे आणि दर्शनाच्या धारकाकडून आपला विनय करून घेणे इच्छितात ते दुर्गति प्राप्त करून घेतात.

जे दंसणेसु भट्ठा पाए पाडंति दंसणधराणं ।
ते होंति लल्लमूआ बोही पुण दुल्लहा तेसिं ॥१२॥

ये दर्शनेषु भ्रष्टाः पादयोः पातयंति दर्शनधरान् ।
ते भवंति लल्लमूकाः बोधिः पुनः दुर्लभा तेषाम् ॥१२॥

<u>अर्थ :</u>— जे पुरूष दर्शन भ्रष्ट आहेत तसेच अन्य जे दर्शनाचे धारक आहेत त्यांना आपल्या पाया पडायला

लावतात, नमस्कार करायला लावतात ते पराभवी, लुळे, मुके होतात आणि त्याना 'बोधी' अर्थात् सम्यक्दर्शन-ज्ञान-चारित्राची प्राप्ति दुर्लभ होते.

भावार्थ :— जे दर्शन भ्रष्ट आहेत ते मिथ्या दृष्टि आहेत आणि दर्शनाचे धारक आहेत ते सम्यक्दृष्टि आहेत. जे मिथ्यादृष्टि असून सम्यक्दृष्टिकडून नमस्कार इच्छितात ते तीव्र मिथ्यात्वाचा उदय सहित आहेत. ते पराभवात लुळे, मुके असतात, अशा प्रकारे एकेंद्रिय स्थावर होवून निरोधात वास करतात. तेथे अनंतकाल राहातात. त्याना दर्शनज्ञान चारित्र्याची प्राप्ति दुर्लभ असते. मिथ्यात्वाचे फल निगोदच सांगितले आहे. या पंचमकाळात मिथ्यामताचे आचार्य बनून लोकाकडून विनयादिक पूजेची इच्छा करतात, त्यांना वाटते कीं त्रस राशिचा काल पूर्ण झाला आहे. आता एकेंद्रियी होवून निगोदात वास करावा असे जाणते.

पुढे म्हणतात की, जो दर्शन भ्रष्ट आहे त्यांच्या लज्जादिक ही पाया पडतात ते ही त्यांच्या सारखेच आहेत.

जे वि पडंति च तेसिं जाणंता लज्जागारवभयेण ।
तेसिं पि णत्थि बोही पावं अणुमोयमाणाणं ॥१३॥

येऽपि पतन्ति च तेषां जानंतः लज्जागारवभयेन ।
तेषामपि नास्ति बोधिः पापं अनुमन्यमानानाम् ॥१३॥

अर्थ :— जे पुरूष दर्शन सहित आहेत ते सुद्धां जे दर्शनभ्रष्ट आहेत त्याना मिथ्यादृष्टि जाणून ही त्यांच्या पाया पडतात, त्यांचा लाज, भय, गौरव, विनयादि करतात त्यानाही 'बोधि' अर्थात् दर्शन-ज्ञान-चारित्राची प्राप्ति होत नाही, कारण की, ते ही मिथ्यात्व जे की पाप आहे त्याचे अनुमोदन करतात. करणे, करवणे, अनुमोदन देणे समान म्हटले आहेत. येथे लज्जा तर अशा प्रकारची आहे की, — आम्ही कोणाचा विनय केला नाहीतर लोक म्हणतील की हा उद्धट आहे, मानी आहे. म्हणून आम्हाला तर सर्व साधायचे आहे. अशाप्रकारे लज्जेने दर्शनभ्रष्टाचे ही विनयादिक करतात. तसेच भय अशाप्रकारे आहे की, — "हे राजमान्य आहे आणि मंत्र विद्यादिने सामर्थ्ययुक्त आहेत," त्यांचा विनय केला नाही तर आम्हाला काही उपद्रव होईल, अशा प्रकारच्या भयाने विनय करतात. तसेच (गारव) गर्व तीन प्रकारे आहे. १) रसगुरूता २) ऋद्धिगारव ३) सातगारव रस गारव म्हणजे मिष्ट, इष्ट, पुष्ट भोजन केल्यामुळे प्रमादी होतो; तसेच ऋद्धि गारव म्हणजे काही तपाच्या प्रभावाने ऋद्धि ची प्राप्ति होते त्याचा गर्व होतो, त्यामुळे उद्धटपणा, प्रमादि होतो. तसेच सात गारव म्हणजे शरीर निरोगी असणे, काही क्लेशाचे कारण नसणे, त्यामुळे सुखवस्तु बनणे त्यातच मग्न असणे इत्यादि

१. मुद्रित संस्कृत सटीक प्रतिमध्ये या गाथेचा पूर्वार्ध अशा प्रकारे ज्याचा अर्थ आहे की, 'जे दर्शनभ्रष्ट पुरूष दर्शनधारीयांच्या पाया पडत नाही''

जे दंसणेषु भट्ठा पाए न पडंति दंसणधराणं ।
उत्तरार्ध समान आहे.

गर्वाच्या मस्तीने चांगल्या वाईटाचा विचार करत नाही तेंव्हा दर्शनभ्रष्टांचा ही तो विनय करूं लागतो. अशा प्रकारच्या निमित्ताने दर्शनभ्रष्टाचा विनय केला तर त्यात मिथ्यात्वाला अनुमोदन होते. ते आपण योग्य समजले तर आपण ही त्या सारखेच बनाल तर त्याला 'बोधी' कसे म्हणायचे ? असे जाणावे ।।१३ ।।

**दुविहं पि गंथचायं तीसु वि जोएसु संजमो ठादि ।**
**णाणम्मि करणसुद्धे उब्भसणे दंसणं होई ॥ १४ ॥**

द्विविधः अपि ग्रन्थत्यागः त्रिषु अपि योगेषु संयमः तिष्ठति ।
ज्ञाने करणशुद्धे उद्भभोजने दर्शनं भवति ।। १४ ।।

<u>अर्थ :</u>— जेंव्हा बाह्यांतर भेदाने दोन्ही प्रकारच्या परिग्रहाचा त्याग होईल आणि मन, वचन, काय, अशा तिन्हि योगात संयम असेल तसेच कृत, कारित, अनुमोदित अशी तीन कारणे ज्यांच्यात शुद्ध असतील असे ज्ञान असणे, तसेच निर्दोष म्हणजे ज्यात कृत, कारित, अनुमोदना आपल्याला लागत नाही, उभे राहून हातात आहार करतात, अशाप्रकारे मूर्तिमंत दर्शन होते.

<u>भावार्थ :</u>— येथे दर्शन म्हणजे मत होय. तेथे बाह्य वेष शुद्ध दिसणे ते दर्शन होय. ते त्याच अंतरंगभाव ही दाखवतो. तेथे बाह्य परिग्रह अर्थात् धन धान्यादिक आणि अंतरंग परिग्रह मिथ्यात्व-कषायादिक, जेथे नसतील यथाजात दिगंबर मूर्ति असेल, इंद्रिये, मनाला, वश करणे, त्रस स्थावर जीवावर दया करणे, अशा संयमाचा मन-वचन-काय द्वारे शुद्ध पालन करणे आणि ज्ञानात विकार करणे, करवणे, अनुमोदन देणे अशा तिन्ही कारणाने विकार न होणे आणि निर्दोष (पाणिपात्र) हातात उभे राहून आहार घेणे अशा प्रकारची दर्शनाची मूर्ति आहे हे जिन देवाचे मत आहे. तेथेच वंदन पूजन योग्य आहे अन्य पाखंड वेष वंदना-पूजा योग्य नाहीत. ।।१४।।

पुढे म्हणतात की, या सम्यक्‌दर्शनाने च कल्याण्-अकल्याणाचा निश्चय होतो. —

**सम्मत्तादो णाणं णाणादो सव्वभावउवलद्धी ।**
**उवलद्धपयत्थे पुण सेयासेयं वियाणेदि ॥ १५ ॥**

सम्यक्त्वात् ज्ञानं ज्ञानात् सर्वभावोपलब्धिः ।
उपलब्धपदार्थे पुनः श्रेयोऽश्रेयो विजानाति ।।१५।।

<u>अर्थ :</u>— सम्यक्त्वाने तर ज्ञान सम्यक् होते, तसेच सम्यक्‌ज्ञानाने सर्व पदार्थांची उपलब्धि अर्थात् प्राप्ति अर्थात् जाणणे होते. तसेच पदार्थांची उपलब्धि झाल्याने श्रेय अर्थात् कल्याण आणि अश्रेय अकल्याण हे दोन्ही जाणले जातात.

<u>भावार्थ :</u>— सम्यक्‌दर्शनाशिवाय ज्ञानाला मिथ्याज्ञान म्हटले आहे. म्हणून सम्यक्‌दर्शन झाल्यानंतर सम्यक्‌ज्ञान होते, आणि सम्यक्‌ज्ञानाने जीवादि पदार्थांचे यथार्थ स्वरूप जाणले जाते. तसेच जेंव्हा

www.vitragvani.com



पदार्थाचे यथार्थ स्वरूप जाणले जाते. तसेच जेंव्हा पदार्थाचे यथार्थ स्वरूप जाणले जाईल तेंव्हा भला-वाईट मार्ग जाणला जातो. अशाप्रकारे मार्ग जाणण्यातही सम्यक्दर्शनच प्रधान आहे. ।।१५।।

पुढे, कल्याण, अकल्याण जाणल्याने काय होते ? हे सांगतात :—

सेयासेयविदण्हू उद्धुदुदुस्सील सीलवंतो वि ।
सीलफलेणब्भुदयं तत्तो पुण लहइ णिव्वाणं ।।१६।।

श्रेयोऽश्रेयवेत्ता उद्धृतदुःशीलः शीलवानपि ।
शीलफलेनाभ्युदयं ततः पुनः लभते निर्वाणम् ।।१६।।

अर्थ :— कल्याण आणि अकल्याणमार्गाला जाणणारा पुरूष ''उद्धृतदु:शील:'' अर्थात् ज्याने मिथ्यात्व स्वभावाला सोडले आहे असा होतो तथा ''शीलवानापि'' अर्थात् सम्यक्स्वभावाचा ही असतो. तसेच त्या सम्यक्स्वभावाच्या फलाने अभ्युदयाला प्राप्त होतो. तीर्थंकरादि पद प्राप्त करतो, तसेच अभ्युदय झाल्यानंतर निर्वाणाला प्राप्त होतो.

भावार्थ :— चांगल्या वाईट मार्गाला जाणतो, तेंव्हा अनादि संसारात रमून जी मिथ्याभावरूप प्रकृति आहे ती बदलून टाकून सम्यक्भाव स्वरूप प्रकृति होते. त्या प्रकृतिने विशिष्ट पुण्य बंध केल्यानंतर अभ्युदयरूप तीर्थंकरांदिंची पदवी प्राप्त करून निर्वाणाला प्राप्त होतो. ।।१६।।

पुढे सांगतात की, असे सम्यक्त्व जिनवचनाने प्राप्त होते. म्हणून तेच सर्व दु:खाचे हरण करणारे आहे:—

जिणवयणमोसहमिणं विसयसुहविरेयणं अमिदभूयं ।
जरमरणवाहिहरणं खयकरणं सव्वदुक्खाणं ।।१७।।

जिनवचनमौषधमिदं विषयसुखविरेचनममृतभूतम् ।
जरामरणव्याधिहरणंक्षयकरणं सर्वदुःखानाम् ।।१७।।

अर्थ :— हे जिनवचन च औषधि आहे. कसे औषध आहे ? — इंद्रिय विषयात जे सुख मानले आहे त्याचे विरेचन अर्थात् ते दूर करणारे आहे. ते कसे आहे ? अमृतभूत अर्थात् अमृतस्थान आहे आणि म्हणून जरामरणरूप रोगाला हरवणारे आहे, तसेच सर्व दु:खाचा क्षय करणारे आहे.

भावार्थ :— या संसारात प्राणी विषयसुखांचे सेवन करतात ज्यामुळे कर्म बांधले जातात आणि त्यामुळे जन्म, जरा, मरणरूप रोगाने पीडित होतात; तेथे जिनवचनरूप औषधी अशी आहे जी विषयसुखाने अरूचि उत्पन्न करून त्याचे विरेचन करते. जसे 'गुरू' आहाराने जेंव्हा मल वाढतो तेंव्हा ज्वरादि रोग उत्पन्न होतात तेंव्हा त्याच्या विरेचनासाठी 'हिरडां' आदि औषधि उपकारी होते. त्याप्रमाणे हे उपकारी आहे. त्या विषयापासून वैराग्य आल्यानंतर कर्मबंध होत नाही आणि तेंव्हा जन्म, जरा, मरण रोग होत नाहीत तसेच

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

संसारातील दु:खाचा अभाव होतो अशाप्रकारे जिनवचनाला अमृतासमान मानून त्याचा अंगिकार करावा.

पुढे जिनवचनात दर्शनाचे लक्षण अर्थात वेष किती प्रकारचा सांगितला आहे ते सांगतात :—

एगं जिणस्स रूवं बीयं उक्किट्ठसावयाणं तु ।
अवरट्ठियाण तइयं चउत्थ पुण लिंग दंसणं णत्थि ॥१८॥

एक जिनस्य रूपं द्वितीयं उत्कृष्ट श्रावकाणां तु ।
अवरस्थितानां तृतीयं चतुर्थं पुनः लिंगदर्शनं नास्ति ॥१८॥

अर्थ :— दर्शनात एक तर जिना चे स्वरूप आहे, तेथे जसे लिंग जिनदेवाने धारण केले तेच लिंग आहे, तसेच दुसरे उत्कृष्ट श्रावकांचे लिंग आहे आणि तिसरे 'अवरस्थित' अर्थात् जघन्यपदात स्थित असे आर्यिकांचे लिंग आहे; मात्र चौथे लिंग दर्शन नाही.

भावार्थ :— जिनमतामध्ये तीनलिंग अर्थात् वेष सांगितले आहेत. एक तर ते जे यथाजातरूप जिनदेवाने धारण केले आहे; तसेच दुसरे ११व्या प्रतिमाधारी उत्कृष्ट श्रावकाचे असते, तिसरे स्त्री आर्यिकांचे असते ते ! याखेरीज चौथा अन्य प्रकारचा वेष जिनमतामध्ये नाही जे आहे असे मानतात ते मूलसंघाच्या बाहेरचे आहेत. ॥१८॥

पुढे सांगतात की, असे बाह्य लक्षण असेल त्यांची अंतरंग श्रद्धा ही अशी असते, आणि ते सम्यक् दृष्टि असतात :—

छह दव्व णव पयत्था पंचत्थी सत्त तच्च णिद्दिट्ठा ।
सद्दहइ ताण रूवं सो सद्दिट्ठी मुणेयव्वो ॥ १९ ॥

षट् द्रव्याणि नव पदार्थाः पंचास्तिकायाः सप्ततत्त्वानि निर्दिष्टानि ।
श्रद्धाति तेषां रूपं सः सद्दृष्टिः ज्ञातव्यः ॥ १९ ॥

अर्थ :— सहा द्रव्ये, नऊ पदार्थ, पांच अस्तिकाय, सात तत्त्व - हे जिनवचनात सांगितले आहेत, त्यांच्या स्वरूपाचे जे श्रद्धान करतात त्यांना सम्यग्दृष्टि जाणावे.

भावार्थ :— (जाति अपेक्षेने सहा द्रव्यांची नांवे) जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल, ही सहा द्रव्ये आहेत. तसेच जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष आणि पुण्यपाप ही नऊ तत्त्वे अर्थात् नऊ पदार्थ आहेत; सहा द्रव्ये काला शिवाय पंचास्तिकाय आहेत. पुण्य पापा शिवाय नव तत्व पदार्थ सप्त तत्त्वे आहेत. यांचे संक्षेप स्वरूप अशा प्रकारे आहे - जीव तर चेतना स्वरूप आहे आणि चेतना दर्शनज्ञानमयी आहे. पुद्गल स्पर्श, रस, गंध, वर्ण गुणसहित मूर्तिक आहे, त्याचे परमाणू आणि स्कंध असे दोन प्रकार आहेत; स्कंधाचे प्रकार शब्द, बंध, सूक्ष्म, स्थूल, संस्थान, भेद, तम, छाया, आतप, उद्योत इत्यादि अनेक प्रकार

www.vitragvani.com



आहेत; धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य, हे एक एक आहेत अमूर्तिक आहेत, निष्क्रिय आहेत, कालाणु असंख्यात द्रव्य आहेत. कालाला सोडून पांच द्रव्ये बहुप्रदेशी आहेत म्हणून अस्तिकाय पांच आहेत कालद्रव्य बहुप्रदेशी नाही म्हणून ते अस्तिकाय नाही; इत्यादि त्यांचे स्वरूप तर्वार्थ सूत्राच्या टीकेवरून जाणावे. जीव पदार्थ एक आहे आणि अजीवपदार्थ पांच आहेत, जीवाचे कर्मबंध योग्य, पुद्गलांचे येणे आश्रव आहे, कर्माचे बांधणे बंध आहे, आश्रवाचे थांबणे संवर आहे. कर्मबंधाचे झडणे निर्जरा आहे. संपूर्ण कर्मांचा नाश होणे मोक्ष आहे, जीवाच्या सुखाचे निमित्त पुण्य आहे आणि दु:खाचे निमित्त पाप आहे; अशी सप्त तत्त्वे आणि नऊ पदार्थ आहेत यांचे आगमानुसार स्वरूप जाणून श्रद्धान करणारे सम्यक्दृष्टि असतात. ||१९||

आता व्यवहार निश्चयाच्या भेदाने सम्यक्त्वाचे दोन प्रकार सांगितले आहेत —

**जीवादी सद्दहणं, सम्मत्तं जिणवरेहिं पण्णत्तं ।**
**ववहारा णिच्छयदो अप्पाणं हवइ सम्मत्तं ॥ २० ॥**

जीवादीनां श्रद्धानं सम्यक्त्वं जिनवरैः प्रज्ञप्तम् ।
व्यवहारात् निश्चयतः आत्मैव भवति सम्यक्त्वम् ॥ २० ॥

<u>अर्थ</u> :— जिन भगवंतानी जीव आदि पदार्थांच्या श्रद्धानाला व्यवहार सम्यक्त्व म्हटले आहे. आणि आपल्या आत्म्याच्या श्रद्धानाला निश्चय सम्यक्त्व म्हटले आहे.

<u>भावार्थ</u> :— तत्त्वार्थाचे श्रद्धान व्यवहाराने सम्यक्त्व आहे आणि आपल्या आत्मस्वरूपाच्या अनुभवाद्वारे त्याची श्रद्धा, प्रतिति, रूचि आचरण हे निश्चयाने सम्यक्त्व आहे, हे सम्यक्त्व आत्म्यापासून भिन्न वस्तु नाही. आत्म्याचाच परिणाम आहे तोच आत्मा आहे. असे सम्यकत्त्व आणि आत्मा एकच वस्तु आहे हाच निश्चयाचा आशय आहे. ||२०||

आता सांगतात की, हे सम्यक्दर्शनच सर्व गुणांचे सार आहे त्याला धारण करा —

**एवं जिणपण्णत्तं दंसणरयणं धरेह भावेण ।**
**सारं गुणरयणत्तय सोवाणं पढम मोक्खस्स ॥ २१ ॥**

एवं जिनप्रणीतं दर्शनरत्नं धरत भावेन ।
सारं गुणरत्नत्रये सोपानं प्रथमं मोक्षस्य ॥ २१ ॥

<u>अर्थ</u> :— असे पूर्वी सांगितल्याप्रमाणे जिनेश्वर देवाचे सांगितलेले दर्शन आहे. हेच गुणाचे आणि दर्शन, ज्ञान, चारित्र या तीन रत्नाचे सार आहे उत्तम आहे आणि मोक्ष मंदिरात चढण्याची पहिली शिडी आहे. म्हणून आचार्य म्हणतात की, हे भव्यजीवानों, तुम्ही अंतरंग भावाने धारण करा, बाह्य क्रियादिकाने धारण करणे हा तर परमार्थ नाही, अंतरंगाच्या रूचिने धारण करणे मोक्षाचे कारण आहे ||२१||

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



आता सांगतात की, जो श्रद्धान करतो त्यालाच सम्यक्त्व होते —

जं सक्कइ तं कीरइ जं च ण सक्केइ तं च सद्दहणं ।
केवलिजिणेहिं भणियं सद्दहमाणस्स सम्मत्तं ॥२२॥

यत् शक्नोति तत् क्रियते यत् च न शक्नुयात् तस्य च श्रद्धानम् ।
केवलिजिनैः भणितं श्रद्धानस्य सम्यक्त्वम् ॥२२॥

अर्थ :— जो करण्याला समर्थ आहे तो तर करेलच आणि जो करण्याला समर्थ नाही तो ही श्रद्धान करेल कारण की, केवली भगवंतानी श्रद्धान करण्याला सम्यक्त्त्व म्हटले आहे.

भावार्थ :— येथे आशय असा आहे की, जर कोणी म्हणाले सम्यक्त्व झाल्यानंतर तर संसारातील सर्व 'परद्रव्ये'- संसारालाच हेय (समजतात) जाणतात. ज्याला हेय जाणले त्याला सोडून मुनि बनून चारित्र्याचे पालन केले तर सम्यक्त्वी मानले जाईल, याच्या समाधानासाठी ही गाथा आहे. ज्यानी सर्व परद्रव्याला हेय जाणून निजस्वरूपाला उपादेय जाणले आहे, श्रद्धान केले आहे. तेंव्हा मिथ्याभाव तर दूर होईल परंतु जो पर्यंत (चारित्र्यात प्रबलदोष आहेत तो पर्यंत) चारित्रामोह कर्माचा उदय प्रबल होतो (आणि) तो पर्यंत चारित्र अंगिकार करण्याचे सामर्थ्य येत नाही. जितके सामर्थ्य आहे तितके तर करा आणि बाकीचे श्रद्धान करा अशा प्रकारे श्रद्धान करणाऱ्यानाच भगवन्तानी सम्यक्त्व म्हटले आहे. ॥२२॥

आता सांगतात की, जे अशा दर्शन, ज्ञान, चारित्र्यात स्थित आहे ते वंदन करण्यायोग्य आहेत :—

दंसणणाणचरित्ते तवविणये णिच्चकालसुपसत्था ।
एदे दु वंदणीया जे गुणवादी गुणधराणं ॥ २३ ॥

दर्शनज्ञानचारित्रे तपोविनये नित्यकालसुप्रस्वस्थाः ।
एते तु वन्दनीया ये गुणवादिनः गुणधराणाम् ॥ २३ ॥

अर्थ :— दर्शन-ज्ञान-चारित्र, तप तथा विनय यांच्यात जे भल्या प्रकारे स्थित आहे ते प्रशस्त आहेत, सराहण्या योग्य आहेत किंवा भल्या प्रकारे स्वस्थ आहेत, लीन आहेत आणि गणधर आचार्य ही त्यांचे गुणगान करतात म्हणून ते वंदनीय आहेत. दुसरे जे दर्शनादिका पासून भ्रष्ट आहेत आणि गुणवानाशी मत्सरभाव ठेवून विनयरूप प्रवर्तत नाहीत ते वंदन करण्यायोग्य नाहीत ॥२३॥

आता सांगतात की, - जे यथाजात रूपाला पाहून मत्सरभावाने वंदन करत नाहीत, ते मिथ्या दृष्टिच आहेत :—

सहजुप्पण्णं रूवं दट्ठुं जो मण्णए ण मच्छरिओ ।
सो संजमपडिवण्णो मिच्छाइट्ठी हवइ एसो ॥ २४ ॥

सहजोत्पन्नं रूपं दृष्ट्वा यः मन्यते न मत्सरी ।
सः संयमप्रतिपन्नः मिथ्यादृष्टिः भवति एषः ॥ २४ ॥

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

**अर्थ :—** जो सहजोत्पन्न यथाजात रूपाला पाहून मानत नाहीत, त्यांचा विनय सत्कार प्रीति करत नाहीत आणि मत्सरभाव करतात ते संयमप्रतिपन्न आहेत दीक्षा ग्रहण केली असली तरी ही प्रत्यक्ष मिथ्यादृष्टि आहेत. ।।२४।।

**भावार्थ :—** जो यथाजात रूपाला पाहून मत्सरभावाने त्याचा विनय करत नाहीत त्यावरून समजते की, - त्याना या रूपाची श्रद्धा-रूचि नाही अशा श्रद्धा रूचिशिवाय ते मिथ्यादृष्टिच होतात. येथे आशय असा आहे की, जे श्वेतांबरादि झाले ते दिगंबराशी मत्सरभाव ठेवतात त्यांचा विनय करत नाहीत त्यांचा निषेध असो ।।२४।।

पुढे हाच विचार दृढ करतात :—

**अमराण वंदियाणं रूवं दट्ठूण सीलसहियाणं ।**
**जे गारवं करंति य सम्मत्तविवज्जिया होंति ।। २५ ।।**

अमरैः वंदितानां रूपं दृष्ट्वा शीलसहितानाम् ।
ये गौरवं कुर्वन्ति च सम्यक्त्वविवर्जिताः भवंति ।। २५ ।।

**अर्थ :—** देवाना ही वंदन करण्यायोग्य शीलसहित जिनेश्वर देवांच्या यथाजातरूपाला पाहून जे आढ्यता करतात, विनयादिक करत नाहीत ते सम्यक्त्वाने रहित आहेत ।। २५ ।।

**भावार्थ :—** ज्या यथाजात रूपाला पाहून आणि मादिक ऋद्धि चे धारक देव ही पाया पडतात, त्यांना पाहून जे मत्सरभावाने नमस्कार करत नाहीत त्यांना सम्यक्त्व कसे असेल ? ते सम्यक्त्वरहितच आहेत. ।।२५।।

आता सांगतात की, असंयमी वंदनकरण्या योग्य नाहीत :—

**अस्संजदं ण वन्दे वच्छविहीणोवि तो ण वंदिज्ज ।**
**दोण्णि वि होंति समाणा एगो वि ण संजदो होदि ।। २६ ।।**

असंयतं न वन्देत वस्त्रविहीनोऽपि स न वन्द्येत ।
द्वौ अपि भवतः समानौ एकः अपि न संयतः भवति ।। २६ ।।

**अर्थ :—** असंयमीला नमस्कार करूं नये. भाव संयम नसेल आणि बाह्यत: वस्त्र रहित असेल तर तो ही वंदन करण्यायोग्य नाही. कारण की, हे दोन्ही ही संयमरहित समान आहेत. यात एक ही संयमी नाही.

**भावार्थ :—** ज्यानी गृहस्थाचा वेष धारण केला आहे तो तर असंयमी आहेच परंतु ज्यानी बाह्यत: नग्नरूप धारण केले आहे आणि अंतरंगात भावसंयम नाही तर तो ही असंयमीच आहे. म्हणून हे दोन्ही ही असंयमीच आहेत. म्हणून दोन्ही ही वंदन करण्यायोग्य नाहीत. येथे आशय असा आहे, अर्थात् असे समजू नये की, - जे आचार्य यथाजात रूपाला दर्शन म्हणत आले आहेत ते केवळ नग्नरूपच यथाजात रूप असेल कारण की,

आचार्य तर बाह्य अभ्यन्तर भावसंयमाशिवाय बाह्य नग्न झाल्याने तर कोणी संयमी होत नाही असे जाणावे. येथे कोणी विचारले बाह्य वेष शुद्ध असेल, आचार निर्दोष पालन करत असेल पण अभ्यंतर भावात कपट असेल त्याला निश्चय (ज्ञान) कसे असेल ? तसेच सूक्ष्मभावतर केवलीगम्य आहेत मिथ्यात्विला निश्चय कसा होईल ? निश्चय शिवाय वंदन कसे करायचे ? त्याचे समाधान म्हणजे अशा कपटीना जो पर्यंत निश्चित होत नाही तो पर्यंत आचार शुद्ध पाहून वंदन करावे त्यात दोष नाही. केवलीगम्याची मिथ्यात्वाच्या व्यवहारात चर्चा नाही. जो आपल्या ज्ञानाचा विषय नाही त्याला निर्बाध करण्याचे कारण (व्यवहार) नाही. सर्वज्ञ भगवंताची सुद्धा हीच आज्ञा आहे. व्यवहारी जीवाला व्यवहाराचेच शरण आहे.

(नोट - एका गुणाचे दुसऱ्या अनुषंगिक गुणाद्वारे निश्चय करणे व्यवहार आहे त्याचे नांव व्यवहारी जीवाला व्यवहाराचे शरण आहे.)

पुढे हाचविचार दृढ करताना सांगतात :—

णवि देहो वंदिज्जइ णवि य कुलो णवि य जाइसंजुत्तो ।
को वंदमि गुणहीणो ण हु सवणो णेय सावओ होइ ।। २७ ।।

नापि देहो वंद्यते नापि च कुलं नापि च जातिसंयुक्तः ।
कः[1] वंद्यते गुणहीनः न खलु श्रमणः नैव श्रावकः भवति ।।२७।।

<u>अर्थ :</u>— देहाला ही नमस्कार करत नाहीत, आणि कुणाला ही नमस्कार करीत नाहीत तसेच जातिला ही नमस्कार करत नाहीत, कारण की, गुण रहित जे असतील त्यांना कोण वंदन करणार ? गुण प्रकटल्याशिवाय मुनिपण नाही आणि श्रावक ही नाही.

<u>भावार्थ :</u>— लोकात ही असा न्याय आहे जो गुण हीन आहे त्याला कोणी श्रेष्ठ मानत नाही, देह रूपवान असला म्हणून काय झाले ? कुल मोठे असेल जात श्रेष्ठ असली म्हणून काय झाले मोक्ष मार्गात तर दर्शन, ज्ञान, चारित्र गुण आवश्यक आहेत. यांच्या शिवाय जाती-कुल-रूप आदि वंदनीय नाहीत. यामुळे मुनि अथवा श्रावकपण येवू शकत नाही. मुनिपणा श्रावकपण तर सम्यक्दर्शन ज्ञान, चारित्र्यामुळेच येतो. म्हणून यांचे धारण करणारेच वंदन करण्यायोग्य आहेत जाती, कुल आदि वंदन करण्यायोग्य नसतात.

आता सांगतात की, जो तप आदिने संयुक्त आहे त्यांना नमस्कार करतो —

वंदमि [2]तवसावयणा सीलं च गुणं च बंभचेरं च ।
सिद्धिगमणं च तेसिं सम्मत्तेण[3] सुद्धभावेण ।।२८।।

वन्दे तपः श्रमणान् शीलं च गुणं च ब्रह्मचर्यं च ।
सिद्धिगमनं च तेषां सम्यक्त्वेन शुद्धभावेन ।।२८।।

<u>अर्थ :</u>— आचार्य म्हणतात की, जे तपासहित श्रवणपणा धारण करतात त्याना तसेच त्यांच्या शीलाला,

www.vitragvani.com



त्यांच्या गुणाला व ब्रह्मचर्याला सम्यक्त्व सहित शुद्धभावाने नमस्कार करतात कारण की, त्यांच्या त्या गुणाने सम्यक्त्व सहित शुद्धभावाने सिद्धि अर्थात् मोक्षाकडे गमन होते.

भावार्थ :— प्रथम सांगितले की, देहादिक वंदन करण्यायोग्य नाहीत गुण वंदन करण्यायोग्य आहेत. तेथे गुणासहित असणाऱ्यांना वंदन केले आहे. येथे जे तप धारण करून गृहस्थ धर्म सोडून मुनि झाले आहेत त्यांना; तसेच ते शीलगुण ब्रह्मचर्य सम्यक्त्व सहित शुद्धभावाने संयुक्त आहेत त्यांना वंदन केले आहे. येथे शील शुद्धाने उत्तरगुण आणि गुण शुद्धाने मूलगुण तसेच ब्रह्मचर्य शद्धाने आत्मस्वरूपात मग्नता समजले पाहिजे. ॥२८॥

पुढे कोणी अशी शंका घेतात की, — संयमीला वंदन करण्यायोग्य म्हटले आहे तर समवसरणादि विभूति सहित तीर्थंकर आहेत ते वंदण्यायोग्य आहेत किंवा नाहीत ? त्याचे समाधान करण्यासाठी गाथा सांगतात की, जे तीर्थंकर परमदेव आहेत ते सम्यकृत्वासहित तपाच्या महात्म्याने तीर्थंकरपद प्राप्त करून घेतात ते ही वंदन करण्यायोग्यच आहेत :—

चउसट्ठिचमरसहिओ चउतीसहि अइसएहिं संजुत्तो ।
अणवरबहुसत्तहिओ कम्मक्खयकारणणिमित्तो ॥२६॥

चतुःषष्टिचमरसहितः चतुस्त्रिंशद्भिरतिशयैः संयुक्तः ।
[1]अनवरतबहुसत्त्वहितः कर्मक्षयकारणनिमित्तः[2] ॥२९॥

अर्थ :— जो चौसष्ठ चामरा सहित आहे. चौतिस अतिशयासहित आहे. निरंतर अनेक प्राण्यांचे हित ज्यामुळे होते असे उपदेश देणारे आहेत, आणि कर्मक्षय करणारे आहेत असे तीर्थंकर परमदेव आहेत ते वंदन करण्यायोग्य आहेत.

भावार्थ :— येथे चौंसष्ठ चामर, चौतीस अतिशय सहित आदि विशेषणानी तीर्थंकराचे प्रभूत्व सांगितले आहे तसेच प्राण्यांचे हित करणे आणि कर्मक्षयाचे कारण विशेषणाने दुसऱ्यावर उपकार करणारे सांगितले आहेत. या दोन्ही कारणानी ते जगात वंदनीय पूजनीय आहेत. म्हणून असा भ्रम करून घेवू नका की, तीर्थंकर कसे पूज्य आहेत, हे तीर्थंकर सर्वज्ञ वीतरागी आहेत. त्याना समवसरणादिक विभूति रचून इंद्रादिक भक्तजन महिमा करतात. असे प्रश्न करू नयेत. स्वत: दिगंबरत्वाला धारण करून अंतरिक्षात तिष्ठत आहेत असे जाणावे.

---

१. 'कं वन्दे गुण हीन' षट्पाहुडमध्ये पाठ आहे.

२. 'तव समणणा' छाया – (तप समापन्नात) 'तव उणणा' तव समाणं हे तीन पाठ मुद्रित षट् प्राभृत पुस्तकात तसेच त्याच्या टीकेमध्ये आले आहे.

३. सम्मत्तेणेव असा पाठ झाल्याने पादभंग होत नाही.

www.vitragvani.com



पुढे मोक्ष कसा मिळेल ते सांगतात :—

णाणेण दंसणेण य तवेण चरियेण संजमगुणेण ।
चउहिं पि समाजोगे मोक्खो जिणसासणे दिट्ठो ।।३०।।

ज्ञानेन दर्शनेन च तपसा चारित्रेण संयमगुणेन ।
चतुर्णामपि समायोगे मोक्षः जिनशासने दृष्टः ।।३०।।

अर्थ :— ज्ञान, दर्शन, तप आणि चारित्राने या चारींच्या समन्वय झाल्याने जो संयम गुण प्राप्त होतो, त्याला जिन शासनात मोक्ष होणे म्हटले आहे ।।३० ।।

पुढे या ज्ञान आदिचे उत्तारोत्तर सार सांगितले आहे :—

णाणं णरस्स सारो सारो वि णरस्स होइ सम्मत्तं ।
सम्मत्ताओ चरणं चरणाओ होइ णिव्वाणं ।।३१।।

ज्ञानं नरस्य सारः सारः अपि नरस्य भवति सम्यक्त्वम् ।
सम्यक्त्वात् चरणं चरणात् भवति निर्वाणम् ।।३१।।

अर्थ :— प्रथम तर पुरूषासाठी ज्ञान सार आहे. कारण की, ज्ञानामुळे सर्व हेय, उपादेय जाणले जावू शकते. मग त्या पुरूषाकरीता सम्यक्त्व निश्चयाने सार आहे कारण की, सम्यक्त्वा शिवाय चारित्र्य ही मिथ्याच आहे चारित्र्यामुळे निर्वाण होते.

भावार्थ :— चारित्र्याने निर्वाण होते आणि चारित्र्य ज्ञानपूर्वक सत्यार्थ होतो तसेच ज्ञान सम्यक्त्वपूर्वक सत्यार्थ होतो, अशा प्रकारे विचार केल्याने सम्यक्त्वाचे सार समजते. म्हणून प्रथम सम्यकृत्व सार आहे त्यानंतर ज्ञान, चारित्रसार आहे. तरी ही सम्यकृत्वाशिवाय त्याचे ही सार नाही असे जाणावे. ।।३२ ।।

पुढे हाच अर्थ दृढ करतात :—

णाणम्मि दंसणम्मि य तवेण चरिएण सम्मसहिएण ।
चोण्हं पि समाजोगे सिद्धा जीवा ण सन्देहो ।।३२।।

ज्ञाने दर्शने च तपसा चारित्रेण सम्यक्त्वसहितेन ।
चतुर्णामपि समायोगे सिद्धा जीवा न सन्देहः ।।३२।।

अर्थ :— ज्ञान आणि दर्शन झाल्यानंतर सम्यक्त्वासहित तप करून चारित्रपूर्वक या चारींचा समन्वय झाल्याने जीव सिद्ध होतो यात संदेह नाही.

www.vitragvani.com



भावार्थ :— प्रथम जे सिद्ध झाले आहेत सम्यक्‌दर्शन, ज्ञान चारित्र आणि तप या चारींच्या संयोगाने झाले आहेत. हे जिनवचन आहे, यात संदेह नाही. ।।३२।।

पुढे म्हणतात की, लोकात सम्यक्‌दर्शनरूप रत्न अमोलक आहे ते देव दानवा पेक्षा पूज्य आहे.

कल्लाणपरंपरया लहंति जीवा विसुद्धसम्मत्तं ।
सम्मद्दंसणरयणं अग्घेदि सुरासुरे लोए ।।३३।।

कल्याणपरंपरया लभंते जीवाः विशुद्धसम्यक्त्वम् ।
सम्यग्दर्शनरत्नं अर्घ्यते सुरासुरे लोके ।।३३।।

अर्थ :— कल्याणकारी परंपरेने जीव सम्यक्त्व प्राप्त करून घेतात. म्हणून सम्यक्‌दर्शन रत्न आहे ते या सुर असुराने भरलेल्या लोकात पूज्य आहेत ।।

भावार्थ :— विशुद्ध अर्थात् २५ मल दोषाने रहित, निरतिचार सम्यक्त्वला कल्याणाची परंपरा अर्थात् तीर्थंकरपद प्राप्त करून घेतात म्हणून हे सम्यक्त्वरत्न लोकात सर्व देव, दानव आणि मनुष्य पेक्षा पूज्य आहे. तीर्थंकर प्रकृतिच्या बंधाच्या कारणाने "सोलह कारण" भावना सांगितली आहे. त्यात पहिली दर्शन विशुद्धि आहे, तीच प्रधान आहे. हेच विनयादिक पंधरा भावनांचे कारण आहे. म्हणून सम्यक्‌दर्शनच प्रधान आहे. ।।३३।।

आता सांगतात की, जे उत्तम गोत्रासहित मनुष्यात्वाला प्राप्त करून सम्यक्त्वाच्या प्राप्तिने मोक्ष प्राप्त करून घेतात. हे सम्यक्त्वाचे महत्त्व आहे. —

लद्धूण[1] य मणुयत्तं सहियं तह उत्तमेण गुत्तेण ।
लद्धूण य सम्मत्तं अक्खयसुक्खं[2] च मोक्खं च ।।३४।।

लब्ध्वा च मनुजत्त्वं सहितं तथा उत्तमेन गोत्रेण ।
लब्ध्वा च सम्यक्त्वं अक्षयसुखं च मोक्षं च ।।३४।।

अर्थ :— उत्तम गोत्रा सहित (मनुष्यपण) मानव जीवन प्राप्त करून आणि सम्यक्त्व प्राप्त करून अविनाशी सुखरूप केवलज्ञान प्राप्त करून घेतात तसेच अक्षय सुखी मोक्ष प्राप्त करून घेतात.

भावार्थ :— हे सर्व सम्यक्त्वाचे महात्म्य आहे ।।३४।।

आता प्रश्न उत्पन्न होतो की, – जे सम्यक्त्वाच्या प्रभावाने मोक्ष प्राप्त करून घेतात ते तात्कालच प्राप्त करून घेतात की, त्यात काही अवस्था ही आहेत ? त्याच्या समाधानासाठी गाथा सांगतात. —

विहरदि जाव जिणिंदो सहसट्ठसुलक्खणेहिं संजुत्तो ।
चउतीस अइसयजुदो सा पडिमा थावरा भणिया ।। ३५ ।।

विहरति यावत् जिनेन्द्रः सहस्राष्टलक्षणैः संयुक्तः ।
चतुस्त्रिंशदतिशययुतः सा प्रतिमा स्थावरा भणिता ।। ३५ ।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



अर्थ :— केवलज्ञान झाल्यानंतर जिनेंद्रभगवान जो पर्यंत या लोकात आर्यखंडात विहार करतात तो पर्यंत त्यांची ती प्रतिमा अर्थात् शरिरासहित प्रतिबिंब ज्याला स्थावर प्रतिमा असे म्हणतात, ते_ जिनेंद्र _कसे आहेत ? ते एक हजार आठ लक्षणानी संयुक्त आहेत. तेथे श्रीवृक्षासहित एकशे आठ लक्षणे असतात. तीळ, मस आदि नऊशे व्यंजन असतात. चौतिस अतिशयामध्ये दहा तर जन्मापासूनच आलेले असतात ते १) निस्वेदता, २) निर्मलता, ३) श्वेतरूचिरता, ४) समचतुस्त्र संस्थान, ५) वज्रवृषभ नाराच संहनन, ६) सुरूपता, ७) सुगंधता, ८) सुलक्षणता, ९) अतुलवीर्य, १०) हितमित वचन, असे दहा आहेत. घाति कर्माचा नाश (क्षय) झाल्यानंतर दहा होतात ते - १) शतयोजन सुभिक्षता, २) आकाशगमन, ३) प्राणिवध अभाव, ४) कवलाहाराचा अभाव, ५) उपसर्गाचा अभाव, ६) चतुर्मुखपणा, ७) सर्वविद्या प्रभुत्व, ८) छायारहितत्त्व, ९) लोचन निस्वंदन रहितत्त्व, १०) केश नख वृद्धिरहितत्त्व असे दहा असतात.

देवा द्वारे केलेले चौदा असतात — १) सकलार्द्धमागधी भाषा, २) सर्वजीव मैत्रीभाव, ३) सर्व ऋतुफल पुष्प प्रादुर्भाव, ४) दर्पणाप्रमाणे पृथ्वी असणे, ५) मंद सुगंधी हवा चालणे, ६) साऱ्या संसारात आनंद असणे. ७) भूमि कटंका रहित असणे, ८) देवा द्वारे गंधोदकाची वर्षा होणे. ९) विहाराच्या वेळी चरण कमलाच्या खाली देवा कडून सुवर्णमयी कमलांची रचना होणे. १०) भूमि धान्य निष्पात्ति सहित असणे. ११) दिशा आकाश निर्मल होणे. १२) देवांचा आहवानन शद्ब होणे. १३) धर्मचक्र पुढे चालणे. १४) अष्टमंगल द्रव्य असणे असे चौदा आहेत असे सगळे मिळून चौतीस होतात. आठ प्रतिहार्य असतात त्यांची नांवे —

१) अशोक वृक्ष, २) पुष्पवृष्टि, ३) दिव्य ध्वनि, ४) चामर, ५) सिंहासन, ६) छत्र, ७) भामंड, ८) दुन्दुभिवादित्र असे आठ असतात. असे अतिशयासहित, अनंतज्ञान, अनंत सुख अनंत वीर्य सहित तीर्थंकर परमदेव जो पर्यंत जीवाच्या संबोधना निमित्त विहार करतात विराजतात तो पर्यंत 'स्थावरप्रतिमा' म्हटले जातात. असे स्थावर प्रतिमा म्हटल्याने तीर्थंकराना केवलज्ञान झाल्यानंतर अवस्थांतर सांगितले आहे आणि धातु पाषाणाची प्रतिमा बनवून स्थापित करतात तो याचा व्यवहार आहे. ॥३५॥

पुढे कर्माचा नाश करून मोक्ष प्राप्त करून घेतात असे म्हणतात :—

**बारसविहतवजुत्ता कम्मं खविऊणविहिबलेण स्सं ।**
**वोसट्टचत्तदेहा णिव्वाणमणुत्तरं पत्ता ॥३६॥**

द्वादशविधतपोयुक्ताः कर्मक्षपयित्वा विधिबलेण स्वीयम् ।
व्युत्सर्गत्यक्तदेहा निर्वाणमनुत्तरं प्राप्ताः ॥३६॥

अर्थ :— जो बारा प्रकारच्या तपाने युक्त होवून विधिच्या बलाने आपल्या कर्माला नष्ट करून 'वोसह चत्त देहा' अर्थात् ज्यानी भिन्न करून देह सोडले आहेत अर्थात् ज्याच्या पुढे अन्य अवस्था नाहीत अशा निर्वाण अवस्थेला प्राप्त होतात.

www.vitragvani.com



**भावार्थ :**— जे बारा प्रकारच्या तपाद्वारे केवलज्ञान प्राप्त करून घेतात द्रव्य, क्षेत्र, काल, भावाच्या सामुग्रीरूप विधिच्या बलाने कर्म नष्ट करून शरीर सोडून व्युत्सर्गद्वारे जेव्हा निर्वाणपदाला प्राप्त होतात तेव्हा लोक शिखरावर जावून विराजमान होतात तेथे गमन करण्यास एक समय लागतो. त्या वेळी 'जंगम प्रतिमा' असे म्हणतात अशा सम्यक्‌दर्शन-ज्ञान-चारित्रामुळे मोक्षाची प्राप्ति होते, त्यातही सम्यक्‌दर्शन प्रधान आहे. या पाहुडामध्ये 'सम्यक्‌दर्शनाची' महत्ता सांगितली आहे प्रधानत्त्व सांगितले आहे. ।।३६ ।।

* सवैया छंद *

मोक्ष उपाय कह्यो जिनराज जु सम्यग्दर्शन ज्ञान चरित्रा ।
तामधि सम्यग्दर्शन मुख्य भये निज बोध फलै सुचरित्रा ।।
जे नर आगम जानि करै पहचानि यथावत मित्रा ।
घाति क्षिपाय रु केवल पाय अघाति हने लहि मोक्ष पवित्रा ।।१।।

* दोहा *

नमूं देव गुरु धर्मकूं, जिन आगमकूं मानि ।
जा प्रसाद पायो अमल, सम्यग्दर्शन जानि ।।२।।

इति श्री कुन्दकुन्द विरचित अष्टप्राभृतातील दर्शनप्राभृत आणि
जयचंद्र छाबडा कृत हिन्दी देवभाषा वचनिकेचा डॉ. रेखा जैन कृत
मराठी भाषा अनुवाद 'समाप्त' होत आहे.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



# ❋ अथ सूत्र पाहुड ❋

—: २ :—

❋ दोहा ❋

वीर जिनेश्वरको नमूं गणधर लार ।
काल पंचमा आदि मैं भए सूत्र करतार ।।१।।

अशा प्रकारे मंगल करून श्री कुन्दकुन्द आचार्यकृत प्राकृत गाथेचा सूत्र पाहूडच्या देशभाषा वचनिकेचा मराठी अनुवाद लिहित आहे.

प्रथम श्री कुंदकुंद आचार्यांच्या महिमा गर्भित सूत्राचे स्वरूप सांगत आहेत :—

**अरहंतभासियत्थं गणहरदेवेहिं गंथियं सम्मं ।**
**सुत्तत्थमग्गणत्थं सवणा साहंति परमत्थं ।।१।।**

अर्हद्भाषितार्थं गणधरदेवैः ग्रथितं सम्यक् ।
सूत्रार्थमार्गणार्थं श्रमणाः साधयंति परमार्थम् ।।१।।

**अर्थ :—** जे गणधर देवानी सम्यक् प्रकारे पूर्वापार विरोध रहित हे सूत्र रचले आहे. ते सूत्र कसे आहे ? सूत्राच्या द्वारे श्रमण (मुनि) परमार्थ, अर्थात् उत्कृष्ट अर्थ शोधत अविनाशी मोक्ष साध्य करतात. येथे गाथेमध्ये 'सूत्र' पद विशेषणाच्या सामर्थ्याने घेतले आहे.

**भावार्थ :—** जे अरहंत सर्वज्ञाद्वारे भाषित आहे, तसेच गणधर देवानी अक्षरपद वाक्यात रचले आहे, त्याचा सूत्रार्थ जाणून घेवून मुनि परमार्थ म्हणजे मोक्षपद प्राप्त करून घेतात. बाकी जे अक्षपाद, जैमिनि कपिल, सुगत आदि अज्ञानी (छद्मस्थ) ने रचलेली कल्पित सूत्रे आहेत त्यांच्यामुळे परमार्थाची सिद्धि होत नाही. असा आशय जाणावा ।।१।।

www.vitragvani.com



पुढे म्हणतात की, जे अशा प्रकारे आचार्य परंपरेने सांगितलेला (प्रवर्तमान) सूत्राचा अर्थ जाणून मोक्ष मार्ग साधतात ते भव्य आहेत :—

सुत्तम्मि जं सुदिट्ठं आइरियपरंपरेण मग्गेण ।
णाऊण दुविह सुत्तं वट्टइ सिवमग्ग जो भव्वो ॥२॥

सूत्रे यत् सुदृष्टं आचार्यपरंपरेण मार्गेण ।
ज्ञात्वा द्विविधं सूत्रं वर्त्तते शिवमार्गे यः भव्यः ॥२॥

अर्थ :— सर्व भाषित सूत्रात जे कांही भल्याप्रकारे सांगितले आहे ते आचार्यांच्या परंपरेच्या मार्गाने दोन प्रकारच्या सूत्राना शुद्धमय आणि अर्थमय जाणून मोक्षमार्गाकडे प्रवर्ततो तो भव्य जीव होय. तो मोक्ष प्राप्त करण्यायोग्य आहे.

भावार्थ :— येथे कोणी म्हणत असेल अरिहंताद्वारे भाषित आणि गणधर देवाने रचित सूत्र तर द्वादसांगरूप आहे ते या काळात दिसत नाही तेंव्हा परमार्थरूप मोक्षमार्ग कसा साधणार ? याचे समाधान करण्यासाठी ही गाथा आहे अरहंत भाषित गणधर रचित सूत्रात जो उपदेश आहे, त्याला आचार्यांच्या परंपरेने जाणतात. त्यातील शब्द आणि अर्थ जाणून जो मोक्ष मार्गाला साधतो तो मोक्ष प्राप्त करण्यायोग्य आहे, भव्य आहे. येथे पुन्हा कोणी विचारले की, — आचार्यांची परंपरा काय आहे ? इतर ग्रंथात आचार्यांची परंपरा खालीलप्रमाणे सांगितली आहे :—

श्री वर्धमान तीर्थंकरांच्या (सर्वज्ञदेवांच्या) अगोदर तीन केवलज्ञानी झाले; १) गौतम, २) सुधर्म, ३) जंबू. त्यांच्या अगोदर पाच श्रुतकेवली झाले. त्याना द्वादशांग सूत्राचे ज्ञान होते — १) विष्णू, २) नंदिमित्र, ३) अपराजित, ४) गोवर्धन, ५) भद्रबाहू त्यांच्या पूर्वि दहा पूर्वाचे ज्ञाता अकरा झाले — १) विशाखा, २) प्रौष्ठिल, ३) क्षत्रिय, ४) जयसेन, ५) नागसेन, ६) सिद्धार्थ, ७) धृतिषेण, ८) विजय, ९) बुद्धिल, १०) गंगदेव, ११) धर्मसेन. त्यांच्या पूर्वी पांच अकरा अंगाचे धारक झाले — १) नक्षत्र, २) जयपाल, ३) पांडू, ४) ध्रुवसेन, ५) कंस यांच्या पूर्वी एक अंगाचे धारक चार झाले; १) सुभद्र, २) यशोभद्र, ३) भद्रबाहू, ४) लोहाचार्य त्यांच्या पूर्वी एक अंगाच्या पूर्ण ज्ञानीचा अभाव झाला आणि अंगाच्या एकदेश अर्थाचे ज्ञाता आचार्य झाले. त्यातील काहींची नांवे खालीलप्रमाणे आहेत — १) अर्हद्बली, २) माघनंदि, ३) धरसेन, ४) पुष्पदंत, ५) भूतबली, ६) जिनचंद्र, ७) कुन्दकुन्द, ८) उमास्वामी, ९) समंतभद्र, १०) शिवकोटी, ११) शिवायन, १२) पूज्यपाद, १३) वीरसेन, १४) जिनसेन, १५) नेमिचंद्र इत्यादि.

यांच्या पूर्वी अशा प्रकारचे आचार्य झाले अशी दिगंबर संप्रदायाची यथार्थ प्ररूपणा आहे. अन्य श्वेतांबरादिक वर्धमान स्वामी बरोबर परंपरा जोडतात ती कल्पित आहे कारण की भद्रबाहू स्वामी पूर्वी कित्येक मुनि भ्रष्ट झाले त्याना अर्धफालक म्हटले आहे. यांच्या संप्रदायात श्वेताम्बर झाले त्यात

www.vitragvani.com



''देवार्द्धिगणि'' नांवाचे साधू होते त्यांनी सूत्रे बनवली आहेत त्यात कल्पित आचरणांचे कथन केले आहे ते प्रमाणभूत नाही पंचम कालात जैनाभासांच्या शिथिलाचाराची अधिकता आहे, या कालात खरा मोक्षमार्ग दुर्मिळ आहे म्हणून शिथिलाचाऱ्याना मोक्षमार्ग कोठून मिळणार ? असे जाणावे.

आता येथे काही द्वादशांगसूत्र तसेच अंगबाह्यश्रुताचे वर्णन लिहित आहे — तिर्थंकरांच्या मुखातून उत्पन्न झालेल्या सर्व भाषामय दिव्य ध्वनि अैकून चार ज्ञान, सप्तऋध्दिचे धारक गणधर देवानी अक्षर पद्यमय सूत्र रचना केली 'सूत्र' दोन प्रकारची आहेत १) अंग २) अंग बाह्य यांच्याअपुनरूक्त अक्षरांची संख्या वीस अंक प्रमाण आहे. हे अंक एक घाटि इकट्ठी प्रमाण आहे. हे अंक १८४४६७४४०७३७०९५५१६१५ इतकी अक्षरे आहेत. यांची पदे केली तर एक मध्यपदाची अक्षरे सोळाशे चौतीस करोड त्र्यायंशी लाख, सातहजार आठशे अठ्यांशी सांगितली आहेत. यांचा भाग दिल्यानंतर एकशेबारा करोड त्र्यायंशी लाख, अट्ठावनहजार पांच इतके हे पद बारह अंगरूप सूत्राचे पद आहे. आणि (अवशेष) बाकी वीस अंकात अक्षरे राहीली. त्याला अंगबाह्य सूत्र असे म्हणतात. हे आठ करोड एक लाख आठ हजार एकशे पंचाहत्तर अक्षरे आहेत. या अक्षरात चौदा प्रकीर्णकरूप सूत्र रचना आहेत.

आता या द्वादशांगरूप सूत्रांची नांवे आणि पद संख्या लिहितात :— प्रथम अंग, ''आचारांग'' आहे, यात मुनिश्वरांच्या आचारांचे निरूपण आहे, त्यात १८ हजार पदे आहेत. दुसरे ''सूत्रकृत अंग'' आहे यात ज्ञानाचा विनय आदि अथवा धर्मक्रियेमध्ये स्वमत, परमताच्या क्रियेच्या विशेषणाचे निरूपण आहे, यात ३६ हजार पदे आहेत तिसरे 'स्थानांग' आहे यात पदार्थांचे एक आदि स्थानांचे निरूपण आहे जसे जीव सामान्यरूपाने एकप्रकारचे, विशेषरूपाने दोन प्रकारचे, तीन प्रकारचे इत्यादि अशी स्थाने सांगितली आहेत. यांची पदे ४२ हजार आहेत. चौथे समवाय अंग आहे, यात जीवादिक सहाद्रव्याचे द्रव्य, क्षेत्र, कालादि द्वारे वर्णन आहे. यांची १ लाख, ६४ हजार पदे आहेत.

पांचवे व्याख्या प्रज्ञाप्ति अंग आहे, यात जीवाचे आस्ति नास्ति आदिक साठ हजार प्रश्न गणधर देवानें तीर्थकरांच्या निकटचे केलेले वर्णन आहे, यात दोन लाख २८ हजार पदे आहेत. सहावे 'ज्ञातृधर्मकथा' नांवाचे अंग आहे, यात तीर्थकरांच्या धर्माच्या कथा जीवादिक पदार्थाच्या स्वभावाचे वर्णन तसेच गणधरांच्या प्रश्नांच्या उत्तराचे वर्णन आहे. यांची ५ लाख ५६ हजार पदे आहेत. सातवे 'उपासकाध्ययन' नांवाचे अंग आहे यांत ११ प्रतिमा आदि श्रावकांच्या आचाराचे वर्णन आहे. यात ११ लाख ७० हजार पदे आहेत. आठवे ''अंतकृतदशांग'' नांवाचे अंग आहे यात एक एक तीर्थकरांच्या कालात दहा दहा अंतकृत केवली झाले त्यांचे वर्णन आहे. यात २३ लाख २८ हजार पदे आहेत. नववे ''अनुत्तरोपपादक' नांवाचे अंग आहे, यात एक एका तीर्थंकराच्या कालात दहा दहा महामुनि घोर उपसर्ग सहन करून अनुत्तरविमानामध्ये उत्पन्न झालेले असे त्यांचे वर्णन आहे, त्यांची१ २ लाख ४४ हजार पदे आहेत. दहावे 'प्रश्नव्याकरण' नांवाचे अंग आहे, यात अतीत, अनागत, कालासंबंधी शुभा शुभ प्रश्न केले तर त्यांचे यथार्थ उत्तराचे वर्णन केले आहे. तसेच आक्षेपणी, विक्षेपणी, संवेदनी या चार कथांचे ही या अंगात वर्णन आहे. यात ९३ लाख १६ हजार

www.vitragvani.com



पदे आहेत अकरावे 'विपाकसूत्र' नांवाचे अंग आहे यांत कर्माच्या उदयाचे तीव्र, मंद, अनुभागाचे द्रव्य, क्षेत्र, काल, भावाच्या अपेक्षेने वर्णन आहे. यात १ कोट ८४ लाख पदे आहेत. अशा प्रकारे ११ अंग आहेत. यांच्या पदांच्या संख्येला जोडले तर ४ कोट १५ लाख, २ हजार पदें होतात.

बारावे दृष्टिवाद नांवाचे अंग आहे, यात मिथ्यादर्शना संबंधी ३६३ कुवादींचे वर्णन आहे, यांची १०८ कोट, ६८ लाख, ५६ हजार पांच पदे आहेत. या बाराव्या अंगाचे ५ अधिकार आहे. १) परिकर्म, २) सूत्र, ३) प्रथमानुयोग, ४) पूर्वगत, ५) चूलिका, परिकर्मांमध्ये गणिताची करण सूत्रे आहेत; यांचे पांच भेद आहेत, पहिला चंद्रप्रज्ञप्ति आहे यात चंद्राच्या गमनादिचे तसेच परिवार वृद्धि हानि, ग्रह, आदिचे वर्णन आहे यात ३६ लाख ५ हजार पदे आहेत. दुसरे सूर्य प्रज्ञप्ति आहे यात सूर्याची ऋद्धि, परिवार, गमन आदिचे वर्णन आहे यात ५ लाख तीन हजार पदे आहेत. तिसरी जंबू द्वीप प्रज्ञप्ति आहे, यात जंबू द्वीपासंबंधी मेरूगिरी क्षेत्र कुलाचल आदिचे वर्णन आहे, यात ३ लाख २५ हजार पदे आहेत. चौथी द्वीपसागर प्रज्ञप्ति आहे, यात द्वीपसागराचे स्वरूप तसेच तेथे असलेले ज्योतीष, व्यंतर, भवनवासी देवांचे आवास तसेच तेथे असलेल्या जिनमंदिराचे वर्णन आहे. त्याची पदे ५२ लाख ३६ हजार आहे. पांचवी व्याख्या प्रज्ञप्ति आहे यात जीव, अजीत, पदार्थाच्या प्रमाणांचे वर्णन आहे यात ८४ लाख ३६ हजार पदे आहेत. अशा प्रकारे परिकर्माच्या ५ भेदाची पदे एकत्र केली तर १ कोट ८१ लाख ५००० पदे होतात.

बाराव्या अंगाचा दुसरा प्रकार 'सूत्र' नांवाचा आहे. यात मिथ्यादर्शनासंबंधी ३६३ कुवादिंचा पूर्व पक्ष घेवून त्याना जीव पदार्थावर घटित करणे आदिचे वर्णन आहे. त्याचे ८८ लाख भेद आहेत. बाराव्या अंगाचा तिसरा भेद प्रथमानुयोग आहे, यात प्रथम जीवाच्या उपदेश योग्य तीर्थंकर आदि ६३ शलाका पुरूषांचे वर्णन आहे, यात ५००० पदे आहेत. बाराव्या अंगाचा चौथा भेद पूर्वगत आहे. याचे १४ भेद आहेत. पहिला उत्पाद नांवाचा आहे यात जीव आदि वस्तूंच्या उत्पाद, व्यय, ध्रौव्य आदि अनेक, धर्माच्या अपेक्षेने भेदवर्णन केले आहे. यात १ कोटी पदे आहेत, दुसरे अग्रयाणी नामक पूर्व आहे यात ७०० सुनय, दुर्नयाचे वर्णन आले आहे तसेच षट्द्रव्य, सप्रतत्त्व नवपदार्थाचे वर्णन आले आहे यात ९६ लाख पदें आहेत.

तिसरे वीर्यानुवाद नांवाचे पूर्व आहे. यात सहा द्रव्यांच्या शक्तिरूप वीर्याचे वर्णन आहे, त्याची ७० लाख पदें आहेत. चौथे अस्तिनास्ति प्रवाद नांवाचे पूर्व आहे. यात जीवादिक वस्तुचे स्वरूप द्रव्य, क्षेत्र, काल भावाच्या अपेक्षेने अस्ति, पररूप द्रव्य, क्षेत्र, काल भावाच्या अपेक्षेने नास्ति आदि अनेक धर्मात विधि निषेध करून सप्तभंगाच्या द्वारे कथंचित् विरोध मिटवून मुख्य आणि गौण अशा पद्धतिने वर्णन आहे. त्याची साठ लाख पदें आहेत. पांचवा ज्ञानप्रवाद नांवाचे पूर्व आहे. यात ज्ञानाच्या भेदांचे स्वरूप, संख्या, विषय, फल आदिचे वर्णन आहे. यात एक कमी एक करोड पदे आहेत. सहावे सत्यप्रवाद नांवाचे पूर्व आहे, यात सत्य, असत्य आदि वचनांच्या अनेक प्रकारच्या प्रवृत्तिचे वर्णन आहे, यात एककोट, सहा पदे आहेत. सातवे आत्मप्रवाह नांवाचे पूर्व आहे. यात आत्मा (जीव) पदार्थाचे कर्ता, भोक्ता, आदि अनेक धर्मांचे निश्चय-व्यवहार नयाच्या अपेक्षेने वर्णन आहे, यात २६ कोट पदें आहेत.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



आठवे कर्मप्रवाद नांवाचे पूर्व आहे, यात ज्ञानावरण आदि आठ कर्मांचे बंध, सत्त्व, उदय, उदीरणा, आदिचे तसेच क्रियारूप कर्मांचे वर्णन आहे, यात १ करोड ८० लाख पदें आहेत. नववे प्रत्याख्यान नांवाचे पूर्व आहे, यात पापाच्या त्यागाचे अनेक प्रकाराने वर्णन आहे, यात ८४ लाख पदें आहेत. दहावे विद्यानुवाद नांवाचे पूर्व आहे, यात सातशे शुद्रविद्या आणि पाचशे महाविद्यांचे स्वरूप, साधन, मंत्रादिक आणि सिद्ध झालेल्या फलाचे वर्णन आहे तसे अष्टांग निमित्तज्ञानाचे वर्णन आहे. यात एक कोट दहा लाखपदे आहेत. अकरावा कल्याणवाद नांवाचे पूर्व आहे यात तीर्थंकर चक्रवर्ति आदिंच्या गर्भादि कल्याणक उत्सव तसेच त्या कारणाने सोळा भावनादिंचे तपश्चरणादिक तसेच चंद्र सूर्यादिंचे गमन विशेष आदिचे वर्णन आहे. त्यात २६ कोट पदे आहेत.

बारावे 'प्राणवाद' नांवाचे पूर्व आहे, यात आठ प्रकार वैद्यक तसेच भूतादिकांच्या व्याधिच्या निवारण करणारे मंत्रादिक तसेच विष दूर करण्याचे उपाय आणि स्वरोदय आदिचे वर्णन आहे. त्याची १३ कोटी पदे आहेत. तेरावे 'क्रियाविशाल' नांवाचे पूर्व आहे यात संगीतशास्त्र, छंद, अलंकारादिक तसेच चौसष्ठ कला, गर्भाधानादि चौऱ्यांशी क्रिया, सम्यक्दर्शन आदि १६० क्रिया देववंदनादि पंचवीस क्रिया, नित्य नौमित्तिक क्रिया इत्यादिंचे वर्णन आहे. यात ९ कोट पदें आहेत. चौदावे त्रिलोक बिंदुसार नावाचे पूर्व आहे, यात तीनलोकीचे स्वरूप आणि बीजगणिताचे स्वरूप तसेच मोक्षाचे स्वरूप तसेच मोक्षाला कारणभूत क्रियेचे स्वरूप इत्यादिचे वर्णन आहे. यात १२ कोट ५० लाख पदे आहेत. असे चौदापूर्व आहेत ही सर्व पदे एकत्र केली तर ९५ कोट ५० लाख इतकी होतात.

बाराव्या अंगाचा ५ वा भेद चूलिका आहे याचे पांच प्रकार आहेत. यात दोन कोट नऊ लाख एकोण्णवद हजार दोनशे आहेत. यातील प्रथमभेद जलगता चूलिके मध्ये जळाचे स्तंभन करणे, जळात गमन करणे याचे वर्णन आहे. अग्निगता चूलिके मध्ये अग्निस्तंभन करणे, अग्नित प्रवेश करणे, अग्निचे भक्षण करणे इत्यादिचे कारणभूत मंत्रतंत्रादिकाचे वर्णन आहे. यात २ कोट ९ लाख एकोणनव्वद हजार दोनशे आहेत. इतकी इतकीच पदे अन्य चार चूलिकेमध्ये जाणावे. दुसरा प्रकार स्थलगता चूलिका आहे. यात मेरूपर्वत, भूमि इत्यादीमध्ये प्रवेश करणे, शिघ्रगमन करणे इत्यादि क्रियांचे कारण मंत्र, तंत्र, तपश्चरणादिचे वर्णन आहे.

तिसरा प्रकार मायागत चूलिका आहे, यात मायामयी इंद्रजाल विक्रियेच्या कारणभूत मंत्र, तंत्र, तपश्चरणादिकेचे प्ररूपण आहे. चौथा भेद रूपगता चूलिका आहे. यात सिंह, हाथी, घोडा, बैल, हरिण इत्यादी अनेक प्रकारचे रूप घेण्याचे कारणभूत मंत्र, तंत्र, तपश्चरण, आदिचे प्ररूपण आहे. तसेच चित्राम काष्ठलेपादिचे लक्षण आणि वर्णन आहे, आणि धातु रसायनाचे निरूपण आहे. पांचवा प्रकार 'आकाशगत चुलिका' असा आहे, यात आकाशात गमनादिक करण्याला कारणभूत मंत्र, तंत्र, तंत्रादिकाचे वर्णन आहे. अशी बारा अंगे आहेत आणि अशा प्रकारे बाराअंग सूत्र आहे.

अंगबाह्य श्रुताचे १४ प्रकीर्ण आहेत. प्रथम प्रकीर्णक सामायिक नांवाचे आहे यात नाम, स्थापना, द्रव्य, क्षेत्र, काल भावाच्या भेदाने सहा प्रकार इत्यादि सामायिकाचे विशेषरूपाने वर्णन आहे. दुसरे

चतुर्विंशतिस्तव नांवाचे प्रकीर्णक आहे यात चोवीस तीर्थंकराच्या महत्तेचे वर्णन आहे. तिसरे वंदना नामक प्रकीर्णक आहे यात एका तीर्थंकराच्या आश्रय वंदना स्तुतिचे वर्णन आहे. चौथे प्रतिकरणनामक प्रकीर्ण आहे, यात सात प्रकारच्या प्रतिक्रमणाचे वर्णन आहे. पांचवा वैनयिक नांवाचे प्रकीर्णक आहे, यात पांच प्रकारच्या विनयाचे वर्णन आहे. सहावे कृतिकर्म नांवाचे प्रकीर्णक आहे, अरहंत आदिच्या वदंनेच्या क्रियेचे वर्णन आहे. सातवे दशवैकालिक नांवाचे प्रकीर्णक आहे, यात मुनिचा आचार, आहाराची शुद्धता आदिचे वर्णन आहे. आठवे उत्तराध्ययन नांवाचे प्रकीर्णक आहे. यात परिषद उपसर्गाला सहन करण्याच्या विधानाचे वर्णन आहे.

नववे कल्पव्यवहार नांवाचे प्रकीर्णक आहे यात मुनिला योग्य आचरण आणि अयोग्य सेवनाच्या प्रायश्चित्तांचे वर्णन आहे. दहावे कल्पाकल्प नांवाचे प्रकीर्णक आहे, यात मुनिला हे योग्य आहे, अयोग्य आहे असा द्रव्य क्षेत्र काल भावाच्या अपेक्षेने वर्णन आहे. अकरावे ''महाकल्प'' नांवाचे प्रकीर्णक आहे, ज्यात जिनकल्पी मुनिच्या प्रतिमायोग, त्रिकालयोगाचे प्ररूपण आहे तसेच स्थवरकाल्पी मुनिंच्या प्रवृत्तिचे वर्णन आहे. बारावे पुंडरिक नांवाचे प्रकीर्णक आहे यात चार प्रकारच्या देवात होण्याच्या कारणांचे वर्णन आहे. तेरावे महापुंडरिक नांवाचे प्रकीर्णक आहे यात इंद्रादिक मोठ्या ऋद्धिचे धारक देवात उत्पन्न होणाऱ्या कारणांचे विवरण केले आहे. चौदावे निषिद्धिका नांवाचे प्रकीर्णक आहे, यात अनेक प्रकारच्या दोषांच्या शुद्धते निमित्त प्रायश्चितांचे निरूपण केले आहे. हे प्रायश्चित शास्त्र आहे याचे नांव निसितिका ही आहे. अशा प्रकारे अंगबाह्य श्रुत चौदा प्रकारचे आहेत.

पूर्वांची उत्पत्ति, पर्याय समास, ज्ञानाला लावून पूर्वज्ञानापर्यंत वीस भेद आहेत त्यांचे विशेष वर्णन, श्रुतज्ञानाचे वर्णन गोमट्टसार नांवाच्या ग्रंथात विस्तार पूर्वक आहे तेथून जाणून घ्यावे. ॥२॥

पुढे म्हणतात की, जे सूत्रात प्रवीण आहेत ते संसाराचा नाश करतात —

[1]सुत्तम्मि जाणमाणो भवस्स भवणासणं च सो कुणदि ।
सूई जहा असुत्ता णासदि सुत्ते [2]सहा णो वि ॥३॥

सूत्रे ज्ञायमानः भवस्य भवनाशनं च सः करोति ।
सूची यथा असूत्रा नश्यति सूत्रेण सह नापि ॥३॥

अर्थ : — जो पुरूष सूत्राला जाणतो, त्यात प्रवीण आहे तो संसारात जन्म घेण्याचा नाश करतो जसे लोखंडाची सूई सूया (दोरा) शिवाय असेल तर ती नष्ट होते आणि दोऱ्यासहित असेल तर नष्ट होत नाही हा दृष्टांत आहे. ॥३॥

१. सुत्तंहि । २. सूंत्रहि पाठांतर षट्पाहुड

**भावार्थ :**— सूत्राचे ज्ञाता असेल तर संसाराचा नाश करतो. जसे सुई दोऱ्यासहित असेल तर दृष्टीगोचर होते आणि लगेच सापडते कधी ही नष्ट होत नाही. आणि दोऱ्या शिवाय असेल तर दिसत नाही म्हणून लवकर सापडत नाही. असे जाणावे ।।३ ।।

पुढे सुईच्या उदाहरणांला घटित करताना सांगतात —

पुरिसो वि जो ससुत्तो ण विणासइ सो गओ वि संसारे ।
सच्चेयणपच्चक्खं णासदि तं सो अदिस्समाणो वि ।।४।।

पुरुषोऽपि यः ससूत्रः न विनश्यति स गतोऽपि संसारे ।
सच्चेतनप्रत्यक्षेण नाशयति तं सः अदृश्यमानोऽपि ।।४।।

**अर्थ :**— सूत्र सहित सुई नष्ट होत नाही तसेच जो पुरूष संसारात रमला आहे आपले रूप आपल्या दृष्टिगोचर नाही तरीही सूत्राचा ज्ञाता असेल तर त्याच्या आत्मा सत्तारूप चैतन्य चमत्कारमयी स्वसंवेदनाने प्रत्यक्ष अनुभवाता येतो म्हणून 'गत' नाही, नष्ट झाला नाही, तो ज्या संसारात गत आहे त्या संसाराचा नाश करतो.

**भावार्थ :**— जरी आत्मा इंद्रियगोचर नाही. तरी सुद्धा सूत्राच्या ज्ञात्याला स्वसंवेदन प्रत्यक्षाने अनुभव गोचर आहे, तो सूत्राचा ज्ञाता संसाराचा नाश करतो स्वत: प्रकटतो म्हणून सुईचा दृष्टान्त युक्त आहे.

पुढे सूत्रात अर्थ काय आहे ते सांगतात —

सुत्तत्थं जिणभणियं जीवाजीवादिबहुविहं अत्थं ।
हेयाहेयं च तहा जो जाणइ सो हु सद्दिट्ठी ।।५।।

सूत्रार्थं जिनभणितं जीवाजीवादिबहुविधमर्थम् ।
हेयाहेयं च तथा यो जानति स हि सद्दृष्टिः ।।५।।

**अर्थ :**— सूत्राचा अर्थ जिन सर्वज्ञ देवाने म्हटले आहे आणि सूत्राचा अर्थ जीव, अजीव आदि बहुतेक बरेच प्रकार आहेत. तसेच हेय अर्थात् त्यागण्या योग्य पुद्गलदिक आणि घेण्यायोग्य आत्म्याला जो जाणतो तो प्रकट सम्यक्दृष्टी आहे.

**भावार्थ :**— सर्व भाषित सूत्रामध्ये जीवादिक नऊ पदार्थ आणि यात हेय उपादेय अशा प्रकारे बरीच माहिती आहे ते जो जाणतो तो श्रद्धावान सम्यक्दृष्टी होतो ।।५ ।।

www.vitragvani.com



पुढे म्हणतात की, जिनभाषित सूत्र व्यवहार परमार्थरूप दोन प्रकारे आहेत ते जाणून योगीश्वर शुद्धभाव करून सुख प्राप्त करून घेतात —

जं सूत्तं जिणउत्तं ववहारो तह य जाण परमत्थो ।
तं जाणिऊण जोई लहइ सुहं खवइ मलपुंजं ॥६॥

यत्सूत्रं जिनोक्तं व्यवहारं तथा च ज्ञानीहि परमार्थम् ।
तं ज्ञात्वा योगी लभते सुखं क्षिपते मलपुंजं ॥६॥

अर्थ :— जे जिनभाषित सूत्र आहे ते व्यवहारूप तथा परमार्थरूप आहे, त्याला योगीश्वर जाणून सुख प्राप्त करून घेतात आणि मलपुंज अर्थात् द्रव्यकर्म, भावकर्म, नो कर्मांचा क्षय करतात.

भावार्थ :— जिनसूत्राला व्यवहार परमार्थरूप यथार्थ जाणून योगीश्वर (मुनि) कर्मांचा नाश करून अविनाशी सुखरूप मोक्ष प्राप्त करून घेतात. परमार्थ (निश्चिय) आणि व्यवहार यांचा संक्षेप स्वरूप अशा प्रकारे आहे की, — जिन आगमाची व्याख्या चार अनुयोगरूप शास्त्रामध्ये दोन प्रकाराने सिद्ध आहे, एक आगमरूप दुसरी अध्यात्मरूप. तेथे सामान्य विशेषरूपाने सर्व पदार्थांचे विवरण करतात ते आगमरूप आहे परंतु जेथे एक आत्म्याचा आश्रय निरूपण करतात ते अध्यात्म आहे. अहेतुम आणि हेतुमत् असे ही दोन प्रकार आहेत. तेथे सर्वज्ञाच्या आज्ञेनेच केवल प्रमाणता मानणे अहेतुमत् आहे आणि प्रमाण नयाच्याद्वारे वस्तुची निर्बाध सिध्दि करून मानणे ते हेतूमत् आहे अशा प्रकारे दोन प्रकाराने आगमामध्यें निश्चय व्यवहाराने वर्णन आहे ते सांगितले आहे.

जेव्हा आगमरूप सर्व पदार्थांच्या वर्णनावर लावतात तेंव्हा तर वस्तुचे स्वरूप सामान्य विशेषरूप अनन्त धर्मस्वरूप आहे ते ज्ञानमय आहे, यात सामान्यरूप तर निश्चयाचा विषय आहे आणि विशेषरूप अनन्त धर्मस्वरूप आहे ते ज्ञानगम्य आहे, यात सामान्यरूप तर निश्चयाचा विषय आहे आणि विशेषरूप जितके आहेत त्यांचा भेदरूप करून भिन्न भिन्न सांगितले आहे तो व्यवहारनयाचा विषय आहे. त्याला द्रव्य, पर्याय स्वरूप ही म्हणतात ज्या वस्तुला पाहून सिध्द करायचे असते त्याचा द्रव्य, क्षेत्र, काल, भावाप्रमाणे जो कांहीं सामान्य विशेषरूप सर्वस्व असेल ते निश्चय, व्यवहाराने सांगावे लागते तसेच वस्तुची दुसऱ्या वस्तुशी संयोगरूप अवस्था असेल त्याला त्या वस्तुरूप सांगणे ही व्यवहार आहे. त्याला उपचार ही म्हणतात. याचे उदाहरण असे आहे - जसे एका विशिष्ठ घट नांवाच्या वस्तुवर घटित केले तर ज्या घटचा द्रव्य क्षेत्रकाल भावरूप सामान्य विशेषरूप जितके सर्वस्व आहे तितके सांगितले, ते निश्चय व्यवहाराने सांगितले तर निश्चय, व्यवहार आहे. आणि घटावर दुसऱ्या अन्यवस्तुचा लेप करून त्या घटाला त्या नावाने संबोधणे तसेच अन्य पटादिमध्यें घटाचे आरोपण करून घट संबोधणे हा व्यवहार आहे.

व्यवहाराचे दोन आश्रय आहेत, एक प्रयोजन, दुसरे निमित्त प्रयोजन साधण्यासाठीं कोण्या वस्तुला घट म्हणणे ते तर प्रयोजनाश्रित आहे आणि कोण्या अन्य वस्तुच्या निमित्ताने घटात अवस्थांतर

झाले. त्याला घटरूप म्हणणे ते निमित्ताश्रित आहे. अशा प्रकारे दिसणाऱ्या सर्व जीव अजीव वस्तुवर लावणे (घटित करणे ) किंवा एका आत्म्यावर प्राधान्याने घटित करणे (लावणे ) अध्यात्म आहे जीव सामान्याला ही आत्मा म्हणतात. जो जीव आपल्याला सर्वा पेक्षा भिन्न अनुभव करतो त्यालाही आत्मा म्हणतात. जेंव्हा स्वत: सर्वापेक्षा भिन्न अनुभव करून, आपल्यावर 'निश्चय' लावतो तेंव्हा अशा प्रकारे जे आपण अनादि अनंत अविनाशी सर्व दुसऱ्या द्रव्या पेक्षा भिन्न एक सामान्य विशेषरूप अनंत धर्मात्मक द्रव्य पर्यायात्मक जीव नांवाची शुध्द वस्तु आहे ती कशी आहे ?

शुध्द दर्शन ज्ञानमयी चेतना स्वरूप, असाधारण धर्माची, अनंतशक्तीची धारक आहे, त्यात सामान्यभेद चेतना अनंत शक्तीचे समुह द्रव्य आहे. अनंतज्ञान दर्शन, सुखवीर्य हे चेतनेचे (विशेष) वैशिष्ठय आहे, तो तर गुण आहे आणि अगुरू लघु गुणाच्याद्वारे षट्स्थान पतितहानि वृध्दिरूप परिणमन करून जीवाचे त्रिकालत्मक अनंत पर्याय आहेत. अशा प्रकारे शुध्द जीव नांवाच्या वस्तुला सर्वज्ञाने जसे आगमामध्ये सांगितले आहे. तसे तो तर एक अभेदरूप शुध्द निश्चय नयाचा विषयभूत जीव आहे. अशा दृष्टिने अनुभव करावा आणि अनंत धर्मातील भेदरूप कोण्या एका धर्माला सांगणे व्यवहार आहे.

आत्म वस्तु बरोबर अनादिकाला पासून पुद्गल कर्माचा संयोग आहे. या निमित्ताने रागद्वेषरूप विकार होतात त्याला विभाव परिणति म्हणतात. यामुळे पुन्हा आगामी कर्माचा बंध होतो. अशा प्रकारे अनादि निमित्त नैमित्तिक भावाद्वारे चतुर्गतिरूप संसारभ्रमणाची प्रवृत्ति होते. ज्या गतिला प्राप्त होईल त्याच नावाने जीव संबोधला जातो तसेच जसा रागादिक भाव असेल तसे नांव संबोधले जाते. जेंव्हा द्रव्य, क्षेत्र, काल, भावाच्या बाह्य अंतरंग सामुग्रीच्या निमित्ताने आपले शुध्द स्वरूप शुध्द निश्चयाचे विषयस्वरूप आपल्याला जाणून श्रध्दान करून कर्मसंयोगाचा तसेच त्यांच्या निमित्ताने आपले भाव होतात त्याचे यथार्थ स्वरूप जाणले कीं, भेदज्ञान होते. तेव्हाच पराभावापासून विरक्ती होते. पुन्हा त्यांना दूर करण्याचा उपाय सर्वज्ञाच्या आगमातून यथार्थ समजून त्याचा अंगिकार केल्यानंतर आपल्या स्वभावात स्थिर होवून अनंत चतुष्ट्य प्रकट होतात. सर्व कर्मांचा क्षय करून लोकशिखरावर जाऊन विराजमान होतो तेंव्हा तो जीव मुक्त किंवा सिद्ध म्हणवला जातो.

अशा प्रकारे जितक्या संसाराच्या अवस्था आणि ही मुक्तावस्था अशा प्रकारे भेदरूप आत्म्याचे निरूपण आहे तो ही व्यवहार नयाचा विषय आहे. याला अधात्मशास्त्रामध्यें अभूतार्थ असत्यार्थ नांवाने सांगून वर्णन केले आहे. कारण की, शुद्ध आत्म्यामध्यें संयोगजनित अवस्था असणे हा असत्यार्थच आहे. शुद्ध वस्तूचा तर हा स्वभाव नाही, म्हणून असत्यच आहे. ज्या निमित्ताने अवस्था झाल्या तो ही आत्म्याचाच परिणाम आहे, जो आत्म्याचा परिणाम आहे तो आत्म्यातच आहे म्हणून कथंचित याला सत्य ही म्हणतात परंतु जो पर्यंत भेदज्ञान होत नाही तो पर्यंतच ही दृष्टी आहे, भेदज्ञान झाल्यानंतर जसे आहे तसेच जाणतो.

जे द्रव्यरूप पुद्गलकर्म आहे ते आत्म्यापासून भिन्नच आहे त्यांच्याबरोबर शरिरादिचा संयोग आहे. तो आत्म्या पासून भिन्न आहे याना आत्म्याचा म्हणतात तो व्यवहार आहे, यालाच असत्यार्थ किंवा उपचार

असे म्हणतात. येथे कर्माचे संयोग जनित भाव आहेत ते सर्व निमित्ताश्रित व्यवहाराचे प्रकारे निश्चय व्यवहार संक्षेपाने सांगितला आहे. सम्यक्‌दर्शन ज्ञान चारित्र्याला मोक्षमार्ग म्हटले आहे, येथे असे समजणे की, हे तिन्ही एका आत्म्याचेच भाव आहेत अशाप्रकारे या रूपात आत्म्याचाच अनुभव होणे तो निश्चयमोक्षमार्ग आहे, यातही जेव्हा अनुभवाची साक्षात् पूर्णता नसते तो पर्यंत एकदेशरूप असते त्याला कथंचित सर्वदेशरूप म्हणणे व्यवहार आहे आणि एकदेश नांवाने संबोधणे निश्चय आहे.

दर्शन, ज्ञान, चारित्र्याला भेदरूप संबोधून मोक्षमार्ग सांगणे तसेच यांचे बाह्य स्वरूप द्रव्य, क्षेत्र, काल, भाव, निमित्त त्याना दर्शन, ज्ञान, चारित्र्याच्या नांवाने संबोधणे हा व्यवहार आहे. देव, गुरू, शास्त्राच्या श्रद्धेला सम्यक्‌दर्शन म्हणतात. जीवादिक तत्त्वांच्या श्रद्धेला सम्यक्‌दर्शन म्हणतात. शास्त्राचे ज्ञान अर्थात् जीवादिक पदार्थाच्या ज्ञानाला ज्ञान म्हणतात इत्यादि पांच महाव्रत, पांच समिती तीन गुप्तिरूप प्रवृत्तिला चारित्र म्हणतात. बारा प्रकारच्या तपाना तप म्हणतात. अशा भेदरूप तसेच परद्रव्याच्या आलंबन रूप प्रवृत्ति या सर्व अध्यात्म शास्त्राच्या अपेक्षेने व्यवहाराच्या नांवाने सांगितल्या जातात कारण की, वस्तुच्या एकदेशप्रदेशाला वस्तु म्हणणे ही व्यवहार आहे आणि परद्रव्याच्या आलंबनरूप प्रवृत्तिला त्या वस्तुच्या नांवाने सांगणे हा ही व्यवहार आहे.

अध्यात्म शास्त्रात वस्तु अनंत धर्मरूप आहे म्हणून त्याचे सामान्य विशेषरूपाने तसेच द्रव्य, पर्यायाने ही वर्णन केले आहे. फक्त द्रव्य म्हणणे किंवा फक्त पर्याय म्हणणे हा व्यवहाराचा विषय आहे. द्रव्याचाही आणि पर्यायाचाही निषेध करून वर्णन करणे निश्चयनयाचा विषय आहे. द्रव्यरूप ही आहे आणि पर्यायरूप ही आहे अशा प्रकारचे दोन्हीला ही प्रधान करून सांगणे हा प्रमाणाचा विषय आहे. याचे उदाहरण अशा प्रकारे आहे - जसे जीवाला चैतन्यरूप नित्य एक अस्तिरूप भेदमात्र सांगणे हा द्रव्यार्थिक नयाचा विषय आहे. आणि ज्ञान दर्शनरूप अनित्य अनेक नास्तिस्वरूप इत्यादि भेदरूप सांगणे पर्यायार्थिक नयाचा विषय आहे. दोन्हीही प्रकारच्या प्रधानतेचा निषेध करून सांगणे निश्चयनयाचा विषय आहे. दोन्हीही प्रकाराना प्रधान करून सांगणे प्रमाणाचा विषय आहे.

अशा प्रकारे निश्चय व्यवहाराचे सामान्य संक्षिप्त स्वरूप आहे, ते जाणून जसे आगम अध्यात्म शास्त्रात विशेषरूपाने वर्णन आहे ते सूक्ष्मरूपाने जाणावे. जिनमत अनेकांतस्वरूप स्याद्‌वाद आहे आणि नयाच्या आश्रयाने कथन आहे. नयांचा परस्पर विरोध स्याद्‌वाद दूर करतो. त्याच्या विरोधाचे आणि अविरोधाचे स्वरूप चांगल्या प्रकारे जाणावे. यथार्थ तर गुरू आम्नयाने समजतो परंतु या कालात गुरूचे निमित्त विरल झाले आहे. म्हणून आपल्या ज्ञानाच्या बलाने विशेषरूपाने जाणत राहावे. सध्याच्या काळात अल्पज्ञानी बरेच आहेत. त्यांच्याकडून शिकल्याने श्रद्धान विपरीत होण्याची शक्यता असते, अपराध होण्याचे प्रसंग येतात म्हणून शास्त्रांना ज्ञानाचा सागर समजून स्वत:ला अल्पज्ञानी समजून ते विशेष समजून घेण्याची अभिलाषा धरून ज्ञानाची वृद्धि करून घ्यावी.

www.vitragvani.com



निश्चय व्यवहार रूप आगमाच्या व्यवहार पद्धतिला समजून त्याचे श्रद्धान करून यथाशक्ती आचरण करावे. जिनमत अभ्यासून परीक्षा करून आत्मसात करावे. अल्पज्ञानी मध्ये महंत बनून विषय कषाय पुष्ट करू नयेत त्यामुळे मोक्षाचा मार्ग सापडणार नाही. मोक्षाचा उपदेश समजणार नाही असे जाणावे.

पुढे सांगतात की, जे सूत्राचे अर्थ व पदापासून भ्रष्ट आहेत त्याना मिथ्यादृष्टि जाणावे —

सूत्तत्थपयविणट्ठो मिच्छादिट्ठी हु सो मुणेयव्वो ।
खेडे वि ण कायव्वं पाणिप्पत्तं सचेलस्स ।।७।।

सूत्रार्थपदविनष्टः मिथ्यादृष्टिः हि सः ज्ञातव्यः ।
खेलेऽपि न कर्त्तव्यं पाणिपात्रं सचेलस्य ।।७।।

<u>अर्थ :</u>— ज्याना सूत्राचा अर्थ आणि पद समजत नाही ते स्पष्ट मिथ्यादृष्टि आहेत म्हणून जे वस्त्रसहित आहेत. त्यांना हास्य, कुतुहल म्हणून सुद्धा (पाणिपात्र) अर्थात् हस्तरूप पात्रात आहारदान करूं नये.

<u>भावार्थ :</u>— सूत्रामध्यें मुनींचे स्वरूप नग्न दिगंबर सांगितले आहे. हा अर्थ ज्याना समजत नाही तो जिन आज्ञेपासून भ्रष्ट आहे, प्रकट मिथ्यादृष्टि आहेत वस्त्र धारण करून स्वत:ला मुनि म्हणवून घेतात. म्हणून या वस्त्र सहिताना हास्य कुतुहल म्हणून ही पाणीपात्रात आहारदान करू नये. अशाप्रकारे क्रिडा म्हणून ही करू नये.

पुढे म्हणतात की, जे जिनसूत्रा पासून भ्रष्ट हरिहरादिकाशी तुल्य असले तरी ही त्याना मोक्ष प्राप्त होत नाही —

हरिहरतुल्लो वि णरो सग्गं गच्छेइ एइ भवकोडी ।
तह वि ण पावइ सिद्धिं संसारत्थो पुणो भणिदो ।।८।।

हरिहरतुल्योऽपि नरः स्वर्गं गच्छति एति भवकोटिः ।
तथापि न प्राप्नोति सिद्धिं संसारस्थः पुनः भणितः ।।८।।

<u>अर्थ :</u>— जो मनुष्य सूत्राच्या अर्थपदा पासून भ्रष्ट आहे तो हरि अर्थात् नारायण हर अर्थात् रूद्र यांच्या समान जरी असले, अनेक ऋद्धि युक्त असेल तरी सुद्धा सिद्धि अर्थात् मोक्षाला प्राप्त होत नाही. जर कदाचित् पूजादि करून पुण्यउपार्जन करून स्वर्गाला गेला तरी सुद्धां तेथून कोटी भव फिरून संसारातच राहातो असे जिनागमात सांगितले आहे.

<u>भावार्थ :</u>— श्वेतांबरादिक अशा प्रकारे सांगतात की, गृहस्थादि वस्त्रसहिताना ही मोक्ष मिळते. त्याचा या गाथेत निषेध केला आहे. जे हरिहरा प्रमाणे मोठे सामर्थ्याचे धारक ही वस्त्र सहित असतील तर मोक्ष प्राप्त करू शकत नाहीत. (श्वेतांबरानी कल्पित सूत्र बनवले आहेत ते प्रमाणभूत नाहीत ती श्वेतांबर जिनसूत्रे अर्थ पदापासून च्युत झाले आहेत असे जाणावे.)

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

पुढे सांगतात की, जे जिनसूत्रापासून च्युत झाले आहेत ते स्वच्छंद आणि मिथ्यादृष्टि आहेत :—

उक्किट्ठसीहचरियं बहुपरियम्मो य गरुय भारो य ।
जो विहरइ सच्छंदं पावं गच्छंदि होदि मिच्छत्तं ॥९॥

उत्कृष्ट सिंहचरितः बहुपरिकर्मा च गुरुभारश्च ।
यः विहरति स्वच्छंदं पापं गच्छति भवति मिथ्यात्वम् ॥९॥

अर्थ :— जे मुनि होवून उत्कृष्ट सिंहाप्रमाणे निर्भय आचरण करतात आणि तपश्चरणादि क्रिया करतात, संघनायक आहेत, गुरूभार सांभाळतात परंतु जो जिनसूत्रापासून च्युत होवून स्वच्छंद राहातो तो पापाला पात्र होतो, मिथ्यात्वाला प्राप्त होतो.

भावार्थ :— जो धर्माचा (नायक) गुरू बनून निर्भयपणे तपश्चरणादि करून आपला संप्रदाय चालवतो, जिन सूत्रापासून च्युत होवून स्वेच्छाचारी वर्तन करत असेल तर तो पापी मिथ्यादृष्टि आहे. ॥९॥

पुढे सांगतात की, जिनसूत्रात अशा प्रकारे मोक्षमार्ग सांगितला आहे—

णिच्चेलपाणिपत्तं उवइट्ठं परमजिणवरिंदेहिं ।
एक्को वि मोक्खमग्गो सेसा य अमग्गया सव्वे ॥१०॥

निश्चेलपाणिपात्रं उपदिष्टं परमजिनवरेन्द्रैः ।
एकोऽपि मोक्षमार्गः शेषाश्च अमार्गाः सर्वे ॥१०॥

अर्थ :— जे वस्त्रसहित दिगंबर स्वरूप आणि पाणीपात्रात (हातात) उभे राहून आहार घेतात अशा प्रकारे तीर्थंकर परमदेव जिनेंद्रानी अद्वितीय उपदेश दिला आहे तो मोक्षमार्ग आहे याशिवाय अन्य पद्धति सगळे कुमार्ग आहेत.

भावार्थ :— जे मृगचर्म, वृक्षाची साल (वल्कल), कपासपट्ट, तृणवस्त्र, रोमवस्त्र इत्यादि ठेवून आपल्याला मोक्ष मार्गी मानतात तसेच या कालात ते जिनसूत्रापासून च्युत झाले आहेत, ते आपल्या इच्छेप्रमाणे अनेक वेष बदलतात कधी श्वेत, कधी लाल, कधी पिवळे, कधी गवताची तर ताटाची वस्त्रे आदि घालतात, त्यांना मोक्षमार्ग नाही जिनसूत्राप्रमाणे तर एक नग्न दिगंबर स्वरूप, पाणिपात्रात आहार करणारे मोक्षमार्गी आहेत अन्य सर्व वेषधारी मोक्षमार्गी नाहीत आणि जे त्याना मानतात ते मिथ्यादृष्टि आहेत. ॥१०॥

www.vitragvani.com



पुढे दिगंबर मोक्ष मार्गाची प्रवृत्ति वर्णन करतात —

जो संजमेसु सहिओ आरंभपरिग्गहेसु विरओ वि ।
सो होइ वंदणीओ ससुरासुरमाणुसे लोए ॥११॥

यः संयमेषु सहितः आरंभपरिग्रहेषु विरतः अपि ।
सः भवति वंदनीयः ससुरासुरमानुषे लोके ॥११॥

**अर्थ :**— जे दिगंबर मुद्रेचे धारक मुनि इंद्रिय, मनावर ताबा मिळवून, सहाकायिक जिवावर दया करून संयम सहित आहेत आणि गृहस्थाच्या बाह्य अभ्यंतर परिग्रहापासून विरक्त आहेत, ब्रह्मचर्य आदि गुणानी युक्त आहेत ते देव, दानवासहित मनुष्य लोकात वंदनीय आहेत. अन्य वेष धारक परिग्रहानी युक्त, पाखंडी, ढोंगी वंदन करण्यायोग्य नाहीत.

पुढे त्यांच्या प्रवत्तिचे विशेष वर्णन करतात —

जे बावीसपरीसह सहंति सत्तीसएहिं संजुत्ता ।
ते होंदि[1] वंदणीया कम्मक्खयणिज्जरासाहू ॥१२॥

ये द्वाविंशतिपरीषहान् सहंते शक्तिशतैः संयुक्ताः ।
ते भवंति वंदनीयाः कर्मक्षयनिर्जरासाधवः ॥१२॥

**अर्थ :**— जे साधू मुनि आपल्या शेकडो शक्तीने युक्त असतात. क्षुधा, तृषादिक बावीस परिषह सहन करतात आणि कर्माची क्षयरूप निर्जरा करण्यात प्रवीण असतात तेच वंदन करण्यायोग्य आहेत.

**भावार्थ :**— जे मोठ्या शक्तीचे धारक साधू परिषह सहन करतात, परिषह आल्यानंतरही आपल्या पदापासून च्युत होत नाहीत त्यांच्या कर्माची निर्जरा होते ते वंदन करण्यायोग्य आहेत. ॥१२॥

पुढे म्हणतात की, जो दिगंबर मुद्रेशिवाय कोणते वस्त्रधारण करणार नाही सम्यक्दर्शन ज्ञानाने युक्त आहेत ते इच्छाकार करण्यायोग्य आहेत.

अवसेसा जे लिंगी दंसणणाणेणसम्म संजुत्ता ।
चेलेण य परिगहिया ते भणिया इच्छणिज्जाय ॥१३॥

अवशेषा ये लिंगिनः दर्शनज्ञानेन सम्यक् संयुक्ता ।
चेलेन च परिगृहीताः ते भणिता इच्छाकारयोग्याः ॥१३॥

**अर्थ :**— जे सम्यक्दर्शन ज्ञानाने युक्त आहेत वस्त्राने (परिगृहित) धारण करतात ते इच्छाकार करण्यायोग्य आहेत.

---

१) होंति – पाठांतर षट्पाहुड

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



**भावार्थ :—** जे सम्यक्‌दर्शन ज्ञान संयुक्त आहेत उत्कृष्ट श्रावकाचा वेष धारण करतात. एक वस्त्रमात्र परिग्रह ठेवतात ते इच्छाकार करण्यायोग्य आहेत म्हणून 'इच्छामि' असे म्हटले आहे.

पुढे इच्छाकार योग्य श्रावकाचे स्वरूप सांगितले आहे—

इच्छायारमहत्थं सुत्तठिणो जो हु छंडए कम्मं ।
ठाणे ट्ठियसम्मत्तं परलोयसुहंकरो होइ ॥१४॥

इच्छाकारमहार्थं सूत्रस्थितः यः स्फुटं त्यजति कर्म ।
स्थाने स्थितसम्यक्त्वः परलोकसुखंकरः भवति ॥१४॥

**अर्थ :—** जे पुरूष जिनसूत्रातील इच्छाकार शद्बाचा महान अर्थ जाणतात आणि जे श्रावका प्रतिमाधारी असून सम्यक्त्वासहित आहेत, आरंभादि कर्मांना सोडले आहे ते परलोकात सुख मिळवतात.

**भावार्थ :—** उत्कृष्ट श्रावक जे इच्छाकाराचा अर्थ जाणतात आणि सूत्रा प्रमाणे सम्यक्‌त्वासहित आरंभादिक सोडून उत्कृष्ट श्रावक होतात ते परलोकात स्वर्गाचे सुख प्राप्त करून घेतात.

पुढे म्हणतात जे इच्छाकाराच्या प्रधान अर्थाला जाणत नाही आणि अन्य धर्माचे आचरण करतात तो सिद्धिप्राप्त करून घेत नाही.

अह पुण अप्पा णिच्छदि धम्माइं करेइ णिरव सेसाइं ।
तह वि ण पावदि सिद्धिं संसारत्थो पुणो भणिदो ॥१५॥

अथ पुनः आत्मानं नेच्छति धर्मान् करोति निरवशेषान् ।
तथापि न प्राप्नोति सिद्धिं संसारस्थः पुनः भणितः ॥१५॥

**अर्थ :—** आता पुन्हा सांगतात की, जे 'इच्छाकारा'चा अर्थ जाणतात ते आचरण करून स्वर्गसुख प्राप्त करून घेतात. ते परत सांगतात की, इच्छाकाराचा प्रधान अर्थ 'आत्म्याची इच्छा करणे' असा आहे. आपल्या स्वरूपात रूचि करणे आहे, या प्रमाणे जे करत (आचरण) नाहीत आणि अन्य धर्माचे आचरण करतात ते सिद्धि अर्थात मोक्ष प्राप्त करून घेवू शकत नाहीत. ते संसारातच राहातात.

**भावार्थ :—** 'इच्छाकाराचा' मुख्य अर्थ आत्म्याची इच्छा करणे असा आहे. ज्याला स्वरूपाचे रूचिरूप सम्यक्त्व नाही त्याला मुनिश्रावकाची आचरण पद्धतिने मोक्ष मिळणार नाही.

पुढे याच अर्थाला दृढ करून उपदेश करतात :—

एएण कारणेण य तं अप्पा सद्दहेह तिविहेण ।
जेण य लहेइ मोक्खं तं जाणिज्जइ पयत्तेण ॥१६॥

एतेन कारणेन च तं आत्मानं श्रद्धत्त त्रिविधेन ।
येन च लभध्वं मोक्षं तं जानीत प्रयत्नेन ॥१६॥

अर्थ :— याच कारणामुळे हे भव्य जीवानो त्या आत्म्याचे श्रद्धान करा मन, वचन, कायेने स्वरूपात रूचि करा. अशा प्रकारे जाणिवपूर्वक प्रयत्न केल्याने मोक्षाचा लाभ होईल.

भावार्थ :— ज्यामुळे मोक्ष मिळू शकतो तेच जाणून घेत जावे, श्रद्धान करत जावे हाच मुख्य उपदेश केला आहे, बाकी अवडंबर करण्याचे काही प्रयोजन नाही असे जाणावे.

पुढे म्हणतात की, जे जिनसूत्राला जाणणारे मुनि आहेत त्यांचे स्वरूप दृढ करत आहेत :—

वालग्गकोडिमत्तं परिगहगहणं ण होइ साहूणं ।
भुंजेइ पाणिपत्ते दिण्णण्णं इक्कठाणम्मि ॥१७॥

वालाग्रकोटिमात्रं परिग्रहग्रहणं न भवति साधूनाम् ।
भुंजीत पाणिपात्रे दत्तमन्येन एकस्थाने ॥१७॥

अर्थ :— केसाच्या अग्रभागाच्या कोटी म्हणजे कणभर ही परीग्रहाचे ग्रहण साधू करत नाहीत. येथे शंका अशी आहे जर परिग्रह काहींच नाहीत तर ते आहार कसे काय करतात ? त्याचे समाधान करतात — आहार घेतात तो पाणिपात्रात (हातात) घेतात तो ही दुसऱ्यानी दिलेला प्रासुक अन्न फक्त घेतात ते ही एकाच ठिकाणी, एकाच वेळी परत परत किंवा निरनिराळ्या ठिकाणी घेत नाहीत.

भावार्थ :— जे मुनि आहार ही दुसऱ्याने दिलेला, प्रासुक, योग्य, निर्दोष अन्न दिवसातून एकदा आपल्या हातात घेवून खातात ते अन्य परिग्रह कां ग्रहण करतील ? अर्थात् ग्रहण करत नाहीत, जिनसूत्रामध्यें मुनिंचे असे वर्णन आहे ॥१७॥

पुढे सांगतात कीं, अल्प ग्रहण करतात त्यात दोष कसला? त्यातले ही दोष दाखवतात :-

जहजायरूवसरिसो तिलतुसमित्तं ण गिहदि हत्तेसु ।
जइ लेइ अप्पबहुयं तत्तो पुण जाइ णिग्गोदम् ॥१८॥

यथाजातरूपसदृशः तिलतुषमात्रं न गृह्णाति हस्तयोः ।
यदि लाति अल्पबहुकं ततः पुनः याति निगोदम् ॥१८॥

अर्थ :— मुनि यथाजातरूप म्हणजे बालक जसे नग्नरूप असते त्याप्रमाणेच नग्न रूप दिगंम्बर मुद्रेचे धारक आहेत. ते आपल्या हाताने तिळाच्या तुषा इतकेही कांहीं ग्रहण करत नाहीत आणि जर कांहीं थोडे बहुत घेतले तर ते मुनि ग्रहण केल्यामुळे निगोदात जातात.

भावार्थ :— यथाजातरूप दिग्म्बर निर्गंथला मुनि असे म्हणतात. यानी जर कांहीं परिग्रह ठेवले तर समजा कीं, यांना जिनसूत्राची श्रध्दा नाही, ते मिथ्यादृष्टि आहेत म्हणून मिथ्यात्वाचे फल निगोदच आहे, कदाचित् कांहीं तपश्चरणादिक केले तर त्यामुळें शुभकर्म बांधून स्वर्गादिक मिळतो. तरी सुध्दा परत एकेंद्रिय होवून ते संसारात भ्रमण करतात.

येथे प्रश्न आहे कीं, मुनिंना शरीर आहे, ते आहार करतात, कमंडलू पिंछी पुस्तक जवळ ठेवतात, येथे तिल तुष मात्र परिग्रह ठेवायचा नाही असे म्हणतात मग हे कसे? याचे समाधान असे आहे कीं, - मिथ्यात्वा सहित रागभावाने आपलेसे करून आपले विषय, कषायपुष्ट करण्यासाठी कांहीं ठेवणे याला परिग्रह असे म्हणतात, या निमित्ताने कांहीं थोडे बहुत ठेवण्याचा निषेध केला आहे. संयमाच्या निमित्ताचा तर सर्वथा निषेध नाही. शरीर तर आयुकर्मा संपेपर्यंत सुटत नाही, त्याचे ममत्वच सुटावे म्हणून निषेध केलाच आहे. जो पर्यंत शरीर आहे तो पर्यंत आहार केला नाही तर सामर्थ्य राहाणार नाही, संयम साधणार नाही, म्हणून कांहीं योग्य आहार विधिपूर्वक शरीराचा राग न धरता घेवून शरीर खडे ठेवून संयम साधतात.

कमंडलु हे बाह्य स्वच्छतेचे उपकरण आहे, जर ठेवले नाही तर मलमूत्राच्या अशुचितेमुळे पंचपरमेष्ठीची भक्ती वंदना कशी करणार ? पिंछी दयेचे उपकरण आहे, जर ठेवले नाही तर जीवसहित भूमिची स्वच्छता कशी करणार? पुस्तक ज्ञानाचे उपकरण आहे जर जवळ ठेवले नाही तर पठन, पाठन कसे करणार ? ही उपकरणे ममत्त्व पूर्वक ठेवलेली नसतात, यांच्याबद्दल रागभाव नाही. आहार या सर्व क्रिया सोडून शरीराचे ही सर्वथा ममत्त्व सोडून ध्यान अवस्था घेवून आपल्या स्वरूपात लीन झाल्यानंतर परम निर्ग्रंथ अवस्था प्राप्त होते. अन्य क्रिया करत असाल तर केवलज्ञान उत्पन्न होणार नाही. अशा प्रकारे निर्ग्रंथपणा, मोक्षाचा मार्ग जिन सूत्रात सांगितला आहे.

श्वेताम्बर म्हणतात कीं, भवस्थिति पूरी झाल्यानंतर सर्व अवस्थेमध्यें केवलज्ञान उत्पन्न होते, हे म्हणणे मिथ्या आहे, जिनसूत्राचे हे वचन नाही, या श्वेतांबरानी कल्पित सूत्रें बनविली आहेत. पुन्हा श्वेतांबर येथे म्हणतात कीं, जे तुम्ही सांगितले तो तर उत्सर्गमार्ग आहे, अपवाद मार्गामध्ये वस्त्रादिक उपकरणे ठेवण्यास सांगितले आहे. जसे तुम्ही धर्मोपकरणे सांगितली आहेत तसेच वस्त्रादिक ही धर्मोपकरणच आहे. जसे क्षुधेची बाधा आहाराने मिटवून संयम साधतात तशीच (शीत) थंडी आदिची बाधा वस्त्रादिने मिटवून संयम साधतात यात विशेष काय? यात मोठेच दोष लागतात. कारण कोणी म्हणेल कीं काम विकार उत्पन्न होईल तेव्हा स्त्री सेवन केले तर त्यात काय विशेष? तर अशा प्रकारे सांगणे योग्य नाही.

क्षुधेची बाधा आहाराने मिटवणे योग्य आहे. आहाराशिवाय देह अशक्त होईल, तोल जाईल तर अपघाताचा दोष येईल त्या मानाने थंडीची बाधा कमी आहे. ती तर ज्ञानाभ्यासदि साधनानेच मिटू शकते. अपवाद मार्ग सांगितला आहे. ज्या परिग्रहामुळे किंवा ज्या क्रियेमुळे मुनिपद भ्रष्ट होवून ग्रहस्थाप्रमाणे आचरण कराल तो अपवाद मार्ग नाही. दिगंबर मुद्राधारण करून कमंडलु, पिंछि सहित आहार, विहार उपदेशादि मध्ये प्रवर्तणे हा अपवाद मार्ग आहे. आणि या सर्वप्रवृत्तिला सोडून ध्यानस्थ होणे, शुध्दोपयोगामध्ये लीन होणे याला उत्सर्गमार्ग म्हटले आहे. अशाप्रकारे मुनिपद साधता येत नसेल तर शिथिलाचरणाचे पोषण कशासाठीं करायचे ? त्यापेक्षा मुनिपद सांभाळण्याचे सामर्थ्य नसेल तर श्रावकधर्माचेच पालन करावे. म्हणजे पंरपरेने यामुळे सिध्दि मिळू शकेल. जिनसूत्राची यथार्थ श्रध्दा ठेवल्यानेच सिध्दि आहे. याशिवाय अन्य सगळ्या क्रिया संसारमार्ग आहेत मोक्षमार्ग नाहीत असे जाणावे ।।१८।।

पुढे याचेच समर्थन करतात :-

जस्स परिग्गहगहणं अप्पं बहुयं च हवइ लिंगस्स ।
सो गरहिउ जिणवयणे परिगह रहिओ निरायारो ॥१९॥

यस्य परिग्रहग्रहणं अल्पं बहुकं च भवति लिंगस्य ।
स गर्ह्यः जिनवचने परिग्रहरहितः निरागारः ॥१९॥

**अर्थ :—** ज्या मतामध्यें वेषाच्या संदर्भात अल्प तसेच बरेच परिग्रहाचे ग्रहण करण्यास सांगितले आहे ते मत अग्राह्य त्याची श्रध्दा करणारे पुरूष निंदनिय आहेत कारण कीं, जिनवचनात परिग्रहरहित, निरागार निर्दोष मुनि सांगितले आहेत हे जाणावे.

**भावार्थ :—** श्वेतांबरांच्या कल्पित सूत्रामध्यें वेषाच्या संदर्भात थोडे बहुत परिग्रहाचे ग्रहण सांगितले आहे. तो सिध्दान्त आणि त्याचे श्रध्दा करणारे निंद्य आहेत. जिनवचनात परिग्रह रहित निर्दोष असणाऱ्यानाच मुनि म्हटले आहे. ।।१९ ।।

पुढे सांगतात की जिनवचनात असेच मुनि वंदन करण्यायोग्य आहेत :-

पंचमहव्वयजुत्तो तिहि गुत्तिहि जो स संजदो होई ।
णिग्गंथमोक्खमग्गो सो होदि हु वंदणिज्जो य ॥२०॥

पंचमहाव्रतयुक्तः तिसृभिः गुप्तिभिः यः स संयतो भवति ।
निर्ग्रंथमोक्षमार्गः स भवति हि वन्दनीयः च ॥२०॥

**अर्थ :—** जे मुनि पंच महाव्रत युक्त आहेत आणि तीन गुप्ति संयुक्त आहेत ते संयत आहेत संयमवान आहेत निरग्रंथ असून तेच मोक्षमार्गी आहेत म्हणून निश्चयाने तेच वंदन करण्या योग्य आहेत.

**भावार्थ :—** अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह या पाच महाव्रतासहित आणि मन, वचन, कायरूप तीन गुप्ति सहित असतील तर ते संयमी आहेत. ते निर्ग्रंथ स्वरूपी आहेत, तेच वंदन करण्या योग्य आहेत. जे कांहीं अल्प बहुत परिग्रह ठेवतात ते महाव्रती संयमी नाहीत, तो मोक्षमार्ग नाही. ।।२० ।।

पुढे म्हणतात कीं, पूर्वोक्त एक वेष मुनिंचा सांगितला आता दुसरे उत्कृष्ट श्रावकाचे वर्णन अशा प्रकारे करत आहेत.

दुइयं च उत्त लिंगं उक्किट्ठं अवरसावयाणं च ।
भिक्खं भमेइ पत्ते समिदीभासेण मोणेण ॥२१॥

द्वितीयं चोक्तं लिंगं उत्कृष्टं अवरश्रावकाणां च ।
भिक्षां भ्रमति पात्रे समितिभाषया मौनेन ॥२१॥

www.vitragvani.com



अर्थ :— द्वितीय लिंग म्हणजेच दुसरा वेष, उकृष्ट श्रावक जो गृहस्थ नाही (संसारी) तो उत्कृष्ट श्रावक ११ व्या प्रतिमाचा धारक आहे तो भ्रमण करून भिक्षेद्वारे भोजन करत असेल, पात्रामध्ये भोजन करत असेल तसेच ते हातात करत असेल आणि समितिरूप आचरण करत असेल भाषा समितिरूप बोलत असेल किंवा मौन ठेवत असेल. (असे जाणावे)

भावार्थ :— एक तर मुनिचे यथा जात रूप सांगितले आहे आणि दुसरे हे उत्कृष्ट श्रावकाचे स्वरूप सांगितले आहे. हा ११ व्या प्रतिमेचे धारण करणारा उत्कृष्ट श्रावक आहे तो एक वस्त्र तसेच धारण करतो आणि भिक्षा भोजन करतो. पात्रामध्ये ही भोजन करतो आणि हातामध्यें (करपात्रात) ही करतो, समितिरूप वचन करतो किंवा मौन ही धारण करतो अशा प्रकारचे दुसरे उत्कृष्ट श्रावकाचे स्वरूप आहे. ।।२१ ।।

पुढे तिसरे स्वरूप स्त्रियांचे सांगितले आहे :-

**लिंगं इत्थीण हवदि भुञ्जइ पिंडं सुएयकालम्मि ।**
**अज्जिय वि एकवत्था वत्थावरणेण भुञ्जेइ ।।२२।।**

लिंगं स्त्रीणां भवति भुंक्ते पिंडं स्वेक काले ।
आर्या अपि एकवस्त्रा वस्त्रावरणेन भुंक्ते ।।२२।।

अर्थ :— स्त्रियांचे लिंग (वर्णन) अशा प्रकारे सांगतात, एक वेळच आहार घेतात, परत परत भोजन करत नाहीत. आर्थिका सुध्दां एकच वस्त्र धारण करतात आणि भोजन करण्याच्या वेळी ही वस्त्रावरणासहित करतात. नग्न राहात नाहीत.

भावार्थ :— स्त्री आर्यिका असेल किंवा क्षुल्लिका ही असेल तरी दोघीही भोजन दिवसातून एकवेळाच करतात, आर्यिका एक वस्त्र धारण करून भोजन करतात नग्न राहात नाहीत. अशा प्रकारे तिसरे स्त्रियांचे (लक्षण) लिंग वर्णन केले आहे.

पुढे सांगतात कीं, वस्त्र धारकांना मोक्ष नाही, नग्न साधूनाच मोक्ष मिळतो :-

**णवि सिज्झइ वत्थधरो जिणसासणे जइ वि होइ तित्थयरो ।**
**णग्गो विमोक्खमग्गो सेसा उम्मग्गया सव्वे ।।२३।।**

नापि सिध्यति वस्त्रधरः जिनशासने यद्यपि भवति तीर्थंकरः ।
नग्नः विमोक्षमार्गः शेषा उन्मार्गकाः सर्वे ।।२३।।

अर्थ :— जिन शासनात अशा प्रकारे सांगितले आहे कीं, वस्त्राला धारण करणारा मोक्ष मिळवू शकत नाहीत. तीर्थंकर ही जो पर्यंत गृहस्थ होते तो पर्यंत मोक्ष मिळवूं शकले नाहीत, दीक्षा घेवून दिगम्बररूप धारण केले तरच मोक्ष मिळवूं शकतात कारण कीं, नग्न पणाच मोक्षमार्ग आहे, बाकी सर्व लिंग उन्मार्ग आहेत.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

भावार्थ :— श्वेतांबरादि वस्त्र धारकानाही मोक्ष मिळतो असे म्हणतात ते मिथ्या आहे, हे जिनमत नाही ।।२३।।

पुढे स्त्रियांना दीक्षा नाही याचे कारण सांगतात :-

**लिंगम्मि य इत्थीणं थणंतरे णाहिकक्खदेसेसु ।**
**भणिओ सुहमो काओ तासिं कह होइ पव्वज्जा ।।२४।।**

**लिंगे च स्त्रीणां स्तनांतरे नाभिकक्षदेशेषु ।**
**भणितः सूक्ष्मः कायः तासां कथं भवति प्रव्रज्या ।।२४।।**

अर्थ :— स्त्रियांचे लिंग अर्थात् योनिमध्ये दोन्ही स्तनाग्रामध्ये दोन्ही काखेत नाभी मध्ये सूक्ष्म काय अर्थात् दृष्टीला न दिसणारे जीव असतात असे म्हटले आहे. म्हणून अशा कारणामुळे स्त्रियांना दिक्षा (प्रव्रज्या) कशी होईल?

भावार्थ :— स्त्रियांना योनि, स्तन, काख, नाभी मध्यें जीवांची उत्पत्ति निरंतर सांगितली आहे. त्यांना महाव्रतरूप दिक्षा कशी देता येईल येथे महाव्रत उपचाराने म्हटले आहे, परमार्थाने नाही . स्त्री कांहीं मर्यादितच महाव्रताचे धारण करू शकते ।। २४ ।।

पुढे म्हणतात कीं, जर स्त्रिया दर्शनाने शुध्द असेल तर पाप रहित आहे, भली आहे :-

**जइ दंसणेण सुद्धा उत्ता मग्गेण सावि संजुत्ता ।**
**घोरं चरिय चरित्तं इत्थीसु ण पावया[1] भणिया ।।२५।।**

**यदि दर्शनेन शुद्धा उक्ता मार्गेण सापि संयुक्ता ।**
**घोरं चरित्वा चारित्रं स्त्रीषु न पापका भणिता ।।२५।।**

अर्थ :— स्त्रियामध्यें जे स्त्री दर्शन अर्थात् यथार्थ जिनमताच्या श्रध्देने वरील मार्गाने जाणारी, शुध्द आहे. ती घोर चारित्र्य, तीव्र तपश्चरणादिक आचरणाने पापरहित होते म्हणून तिला पापी म्हणूं नये.

भावार्थ :— स्त्रियामध्यें जी स्त्री सम्यक्त्वासहित आहे आणि तपश्चरण करते ती पापरहित होवून स्वर्गाला प्राप्त होते म्हणून प्रशंसेला योग्य आहे. परंतु स्त्री पर्यायातून मोक्ष मिळत नाही ।।२५।।

पुढे म्हणतात कीं, स्त्रियाना ध्यानाने सिध्दि ही मिळत नाही :-

**चित्तासोहि ण तेसिं ढिल्लं भावं तहा सहावेण ।**
**विज्जदि मासा तेसिं इत्थीसु ण संकया झाणा ।।२६।।**

**चित्ताशोधि न तेषां शिथिलः भावः तथा स्वभावेन ।**
**विद्यते मासा तेषां स्त्रीषु न शंकया ध्यानम् ।।२६।।**

१) प्रवज्या – प्रवज्या पाठांतर

www.vitragvani.com



**अर्थ :**— स्वभावत:च स्त्रिया शिथिल स्वभावाच्या असतात, ढिलाभाव असतो शिवाय त्यांना मासिक पाळी येते (रक्तस्त्राव होतो) त्यामुळे त्यांचे ध्यान लागत नाही.

**भावार्थ :**— चित्तशुद्ध होण्यासाठी ध्यान लावावे लागते. स्त्रीया स्वभावत:च शिथिल असल्यामुळे, मासिक रक्तस्त्राव होत असल्यामुळे त्याना ध्यान लावता येत नाही. ध्यानाशिवाय केवलज्ञान कसे उत्पन्न होणार आणि केवलज्ञाना शिवाय मोक्ष कसा मिळणार ।।२६ ।।

पुढे सूत्र पाहुड समाप्त करतात, सामान्य रूपाने सुखाचे कारण सांगतात :—

गाहेण अप्पगाहा समुद्दसलिले सचेलअत्थेण ।
इच्छा जाहु णियत्ता ताह णियत्ताइं सव्वदुक्खाइं ।।२७।।

ग्राह्येण अल्पग्राह्याः समुद्रसलिले स्वचेलार्थेन ।
इच्छा येभ्यः निवृत्ताः तेषां निवृत्तानि सर्वदुःखानि ।।२७।।

**अर्थ :**— जे मुनि ग्राह्य अर्थात ग्रहण करण्यायोग्य वस्तु थोडे ग्रहण करतात जसे कोणी पुरूष पाण्याने भरलेला समुद्र पुढे असला तरी वस्त्र धुण्या एवढेच पाणी घेतो. ज्या मुनिंची इच्छा पूर्ण नाहीशी (निवृत्त) झाली आहे त्यांचे सर्व दु:ख नाहीसे होते.

**भावार्थ :**— जगात हे प्रसिद्ध आहे की, जे संतोषी (समाधानी) आहेत ते सुखी होतात या न्यायाने हे सिद्ध झाले की, जिन मुनिंची इच्छेची निवृत्ती झाली आहे. संसाराविषयाची किंचित ही इच्छा नाही. देहापासून ही विरक्त आहेत म्हणून परम संतोषी आहेत आहारसुद्धा जो ग्रहण करण्यायोग्य आहे त्यातून अल्प ग्रहण करतात म्हणून ते संतोषी आणि परम सुखी आहेत. हे जिन सूत्राच्या श्रद्धानाचे फल आहे, इतरत्र कोठेही यथार्थ निवृत्तिचे वर्णन नाही म्हणून कल्याणाचे सुख इच्छिणाऱ्याना जिनसूत्राचे निरंतर सेवन केले पाहिजे.

असे येथे सूत्र पाहूड पुर्ण होते.

* छप्पय *

जिनवरकी ध्वनि मेघध्वनिसम मुखतैं गरजै
गणधरके श्रुति भूमि वरषि अक्षर पद सरजै
सकल तत्त्व परकास करै जगताप निवारै
हेय अहेय विधान लोक नीकै मन धारै
विधि पुण्यपाप अरु लोककी मुनि श्रावक आचरन फुनि ।
करि स्व-पर भेद निर्णय सकल कर्म नाशि शिव लहत मुनि ।।१।।

* दोहा *

वर्द्धमान जिनके वचन वरतैं पंचमकाल ।
भव्य पाय शिवमग लहै नमूं तास गुणमाल ।।२।।

इति श्री कुन्द कुन्द विरचित अष्टप्राभृतातील 'सूत्रप्राभूत' आणि जयचंद्र छाबडाकृत हिन्दी देवभाषा वचनिकेचा डॉ. रेखा जैन कृत मराठी भाषा अनुवाद समाप्त होत आहे.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



# * अथ चारित्र पाहुड *

—: ३ :—

* दोहा *

वीतराग सर्वज्ञ जिन वंदूं मन वच काय ।
चारित धर्म बखानियो सांचो मोक्ष उपाय ॥१॥

कुन्दकुन्दमुनिराजकृत चारितपाहुड ग्रन्थ ।
प्राकृत गाथाबंधकी करूं वचनिका पंथ ॥२॥

अशा प्रकारे मंगलपूर्वक प्रतिज्ञा करून आता चारित्र पाहूड प्राकृत गाथा बंधाची देशभाषा वचनिकेचा मराठी अनुवाद लिहीला जात आहे. श्री कुन्दकुन्द आचार्य प्रथम मंगल करताना इष्ट देवाला नमस्कार करून चारित्र पाहुड लिहिण्याची प्रतिज्ञा करत आहेत.

सव्वण्हु सव्वदंसी णिम्मोहा वीयराय परमेट्ठी ।
वंदित्तु तिजगवंदा अरहंता भव्वजीवेहिं ॥१॥
णाणं दंसण सम्मं चारित्तं सोहिकारणं तेसिं ।
मुक्खाराहणहेउं चारित्तं पाहुडं वोच्छे ॥२॥ युग्मम् ।

सर्वज्ञान् सर्वदर्शिनः निर्मोहान् वीतरागान् परमेष्ठिनः ।
वंदित्वा त्रिजगद्वंदितान् अर्हतः भव्यजीवैः ॥१॥
ज्ञानं दर्शनं सम्यक् चारित्रं शुद्धिकारणं तेषाम् ।
मोक्षाराधनहेतुं चारित्रं प्राभृतं वक्ष्ये ॥२॥ युग्मम् ॥

<u>अर्थ :</u>— आचार्य सांगतात की, मी अरहंत परमेष्ठीला नमस्कार करून चारित्र पाहुड सांगत आहे. अरहंत परमेवष्ठी कसे आहेत ? अरि अर्थात् मोह कर्मादि शत्रू हन्त म्हणजे हनन करणे, नाश करणे ज्यानी असा चारी

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



घाती कर्माचे हनन केले आहे ते अरिहंत आहेत. संस्कृतमध्यें अर्ह म्हणजे पूजा अर्हन म्हणजे पूजा करण्यास योग्य, अर्हत् भव्य जीवाकडून पूजा करण्यास योग्य पूज्य आहेत. परमेष्ठी म्हणजे पर इष्ट उत्कृष्ट पूज्य असणे किंवा जे उत्कृष्ट पदात स्थित आहेत ते परमेष्ठी होत. अशा प्रकारे इंद्रादिकाने पूज्य अरहंत परमेष्ठी आहेत.

सर्वज्ञ आहेत, सर्व लोकालोकाचेस्वरूप चराचर पदार्थाला जाणणारे आहेत. सर्वदर्शी अर्थात् सर्व पदार्थाला पाहाणारे आहेत: निर्मोही आहेत. मोहनीय नांवाच्या कर्माची प्रधान प्रकृति मिथ्यात्त्व आहे त्याने रहित आहेत. वीतरागी आहेत. ज्यांचा विशेषरूपाने राग (मोह) दूर झाला आहे ते वीतरागी होय. मोहनीय कर्माच्या उदयाने होणारा राग, द्वेष त्याना नाही. ते त्रिजगद्वंद्य आहेत, तीन जगाचे प्राणी तसेच त्यांचे स्वामी इंद्र, धरणेंद्र, चक्रवर्तिच्या कडून वंदन करण्यास योग्य आहेत. अशा प्रकारे अरहंत पदाला विशेष्य करून अन्यपदाला विशेषण करून अर्थ केला आहे. सर्वज्ञ पदाला विशेष्य करून अन्य पदाला विशेषण केले तरी असाच अर्थ होतो, शिवाय अरहंत भव्य जीवाकडून पूजनीय आहेत. असा ही अर्थ होतो.

चारित्र कसे आहे ? सम्यक्दर्शन, सम्यक्ज्ञान, सम्यक्चारित्र हे तीन आत्म्याचे परिणाम आहेत; ते शुद्धतेचे कारण आहेत. चारित्र अंगिकार केल्यानंतर सम्यक्दर्शनादि परिणाम निर्दोष होतात. चारित्र मोक्षाच्या आराधनेचे कारण आहे. अशा प्रकारे चारित्र्याच्या प्राभृताला (ग्रंथ) सांगत आहे. अशी आचार्यांनी मंगलपूर्वक प्रतिज्ञा केली आहे. ॥१-२॥

पुढे सम्यक्दर्शनादि तीन भावांचे स्वरूप सांगत आहेत :—

जं जाणइ तं णाणं जं पिच्छइ तं च दंसणं भणियं ।
णाणस्स पिच्छियस्स य समवण्णा होइ चारित्तं ॥३॥

यज्जानाति तत् ज्ञानं यत् पश्यति तच्च दर्शनं भणितम् ।
ज्ञानस्य दर्शनस्य च समापन्नात् भवति चारित्रम् ॥३॥

**अर्थ :** — जे जाणते ते ज्ञान आहे. जे पाहते ते दर्शन आहे. ज्ञान आणि दर्शनाच्या समायोगाने चारित्र तयार होते.

**भावार्थ :** — जाणणे हे ज्ञान आहे आणि पाहाणे, श्रद्धान करणे ते दर्शन आहे तसेच दोन्ही एकरूप होवून स्थिर होणे चारित्र आहे.

पुढे म्हणतात की, — जे तीनभाव जीवाचे आहेत त्यांच्या शुद्धतेसाठीं चारित्र दोन प्रकारचे सांगितले आहे :—

एए तिण्णि वि भावा हवंति जीवस्स अक्खयामेया ।
तिण्हं पि सोहणत्थे जिण भणियं दुविह चारित्तं ॥४॥

एते त्रयोऽपि भावाः भवंति जीवस्य अक्षयाः अमेयाः ।
त्रयाणामपि शोधनार्थं जिनभणितं द्विविधं चारित्रं ॥४॥

www.vitragvani.com



अर्थ :— असे ज्ञानादिक तीन भाव सांगितले आहेत. ते अक्षय आणि अनंत जीवाचे भाव आहेत. ते साध्य करण्यासाठी जिनदेवानी दोन प्रकारचे चारित्र सांगितले आहे —

भावार्थ :— जाणणे, पाहाणे आणि आचरण करणे हे तीन भाव जीवाचे अक्षय अनंत भाव आहेत. अक्षय अर्थात् ज्याचा क्षय होत नाही, नाश होत नाही, अमेय म्हणजे अनंत, ज्याला शेवट नाही असे, सर्व लोकालोकाला जाणणारे ज्ञान आहे. अशा प्रकारेच दर्शन आहे, अशा प्रकारे चारित्र्य आहे. तरी सुद्धां घातिकर्माच्या निमित्ताने ते अशुद्ध होते म्हणून श्री जिनदेवानी ते शुद्ध करण्यासाठी त्या (आचरण) चारित्र्याचे दोन प्रकार सांगितले आहेत ।।४।.

पुढे दोन प्रकारचे चारित्र सांगत आहेत :—

जिणणाणदिट्ठिसुद्धं पढमं सम्मत्तचरणचारित्तं ।
विदियं संजमचरणं जिणणाणसदेसियं तं पि ।।५।।

जिनज्ञानदृष्टिशुद्धं प्रथमं सम्यक्त्वचरणचारित्रम् ।
द्वितीयं संयमचरणं जिनज्ञानसंदेशितं तदपि ।।५।।

अर्थ :— प्रथम तर सम्यक्त्वाचे आचरण स्वरूप चारित्र आहे. ते जिनदेवाच्या ज्ञान, दर्शन श्रद्धाना ने शुद्ध केले आहे. दुसरे संयमाचे आचरण स्वरूप चारित्र आहे, ते ही जिनदेवाच्या ज्ञानाने दाखवलेले शुद्ध स्वरूपी आहे.

भावार्थ :— चारित्र्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. प्रथम सम्यक्त्वाचे आचरण सांगितले आहे. ते सर्वज्ञांच्या आगमग्रंथात तत्त्वार्थाचे स्वरूप सांगितले आहे ते यथार्थ जाणून श्रद्धान करणे आणि त्यांचे शंकादिअतिचार मलदोष सांगितले आहेत त्यांचा परिहार करून शुद्ध करणे तसेच त्यांच्या नि:शंकितादि गुणाना प्रकट करणे ते संयमाचरण चारित्र आहे, अशा प्रकारे संक्षेपाने स्वरूप सांगितले आहे.

पुढे सम्यक्त्वाचरण चारित्र्याच्या मल दोषांचा परिहार करून आचरण करण्यास सांगत आहेत :—

एवं चिय णाऊण य सव्वे मिच्छत्तदोस संकाइ ।
परिहरि सम्मत्तमला जिणभणिया तिविह जोएण ।।६।।

एवं चैव ज्ञात्वा च सर्वान् मिथ्यात्वदोषान् शंकादीन् ।
परिहर सम्यक्त्वमलान् जिनभणितान् त्रिविधयोगेन ।।६।।

अर्थ :— अशा प्रकारे सम्यक्त्वाचरण चारित्र्याला जाणून मिथ्यात्व कर्माच्या उदयाने शंकादि दोष सम्यक्त्वाला अशुद्ध करणारे मल आहेत असे जिनदेव सांगतात ते मन, वचन, कायेच्या तीन योगाने सोडावेत.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



भावार्थ :— सम्यक्त्वाचरण चारित्र, शंकादिदोष सम्यक्त्वाचे मल आहेत. ते त्यागले म्हणजे शुध्दी होते म्हणून त्यांना त्यागण्याचा उपदेश जिनदेवाने केला आहे. ते दोष कोणते आहेत ते सांगत आहेत — जिनवचनामध्ये वस्तुचे स्वरूप सांगितले आहे त्यांत संशय करणे हा शंका दोष आहे, तो झाल्यानंतर सप्तभयाच्या निमित्ताने स्वरूपाची शंका घेणे, भोगांची अभिलाषा 'कांक्षा' दोष आहे, तो झाल्याने भोगासाठी स्वरूपापासून भ्रष्ट होतो. वस्तुचे स्वरूप अर्थात् धर्मा विषयी ग्लानी ठेवणे जुगुप्सा दोष आहे. हा झाल्यानंतर धर्मात्मा पुरूषांच्या पूर्वकर्माच्या उदयाने बाह्य मलिनता पाहून यथार्थ मतापासून भ्रष्ट होवू शकतो ढळूं शकतो.

देव, गुरू, धर्म तसेच लौकिक कार्यात मूढता अर्थात् यथार्थ स्वरूपाला न जाणणे ही मूढ दृष्टि आहे. ही असल्यामुळे लौकिक जनानी मानलेले सरागी देव, हिंसाधर्म आणि सग्रन्थगुरू तसेच लोकाना न विचारता केलेल्या, मानलेल्या अनेक क्रिया विशेष ज्यामुळें विभावादिची प्राप्ति होवून यथार्थ मतापासून भ्रष्ट होत जाते. धर्मात्मा पुरूषामध्यें कर्माच्या उदयाने काही दोष उत्पन्न झालेले पाहून त्यांची अवज्ञा करणे हा अनुपगुहन दोष आहे. हा झाला तर धर्म सुटून जातो. धर्मात्मा पुरूषाला कर्माच्या उदयामुळे धर्मापासून ढळताना पाहून त्यांची स्थिरता न करणे हा अस्थितिकरण दोष आहे. हा झाल्याने त्याचे धर्माचे प्रेम कमी होते आणि धर्मा विषयी अनुराग नसणे हा सम्यक्त्वात दोष सांगितला आहे.

धर्मात्मा पुरुषाबरोबर प्रिति न करणे हा अवात्सल्य दोष आहे. हा झाल्याने सम्यक्त्वाचा अभाव सूचित होतो. धर्माचे महात्म्य शक्तिप्रमाणे प्रकट न करणे हा अप्रभावना दोष आहे, हा झाला तर धर्माचे महात्म्य, श्रद्धा प्रकट होत नाही. अशा प्रकारे सम्यक्त्वाचे मिथ्यात्वाच्या उदयाने हे आठ दोष प्रकट होतात. जेथे हे तीव्र स्वरूपात असतील तेथे मिथ्यात्व प्रकृतिचा उदय सांगितला जातो, सम्यक्त्वाचा अभाव सांगतात आणि जेथे मंद अतिचार असेल तर सम्यक्त्वप्रकृति नांवाच्या मिथ्यात्वाचा सद्भाव असतो, परमार्थाने विचार केला तर अतिचार त्यागण्याच्या योग्यतेचाच आहे.

या दोषा खेरीज अन्य 'मल' ही प्रकट होतात त्या तीन मूढता आहेत १) देव मूढता, २) पाखंड मूढता, ३) लोक मूढता, चांगले वरदान मिळण्याच्या इच्छेने सरागी देवाची उपासना करणे, त्यांची पाषाणादि स्वरूपात स्थापना करून पूजणे ही देव मूढता आहे. ढोंगी गुरूमध्ये मूढता - परिग्रह, आरंभ, हिंसादिसहित पाखंडी (ढोंगी) वेषधारकांचा सत्कार, पुरस्कार करणे पाखंड मूढता आहे. लोकमूढता अन्य मतवाल्याच्या उपदेशाने स्वत: कोणाला न विचारता वर्तन करणे, घर, विहिर, पूजणे गाईच्या शेपटीला नमस्कार करणे, गाईचे मूत्र पिणे, रत्न, घोडा, आदिवाहन, पृथ्वी, वृक्ष, शस्त्र, पर्वत आदिची सेवा पूजा करणे, नदी-समुद्र आदिला तीर्थ मानून त्यात स्नान करणे, डोंगरावरून गडगडणे, अग्नित प्रवेश करणे इत्यादि.

www.vitragvani.com



सहा अनायतन सांगितले आहेत — कुदेव, कुगुरू, कुशास्त्र आणि त्यांचे भक्त असे सहा आहेत, ही धर्माची स्थाने समजून यांची मनापासून प्रशंसा करणे वचनाने कौतुक करणे, कायेने वंदना करणे ही खरं तर धर्माची स्थाने नाहीत म्हणून याना अनायतन असे म्हणतात. जाति, लाभ, कुल, रूप, तप, बल, विद्या, ऐश्वर्य यांचा गर्व करणे आठ मद आहेत. जाती हा मातेचा पक्ष आहे, लाभ धनादिक कर्माच्या उदयाच्या आश्रयाने मिळतात. कुल पित्याचा पक्ष आहे, रूप कर्मउदयाश्रित आहे, तप हे आपल्या स्वरूपाला जाणण्याचे साधन आहे, बल कर्मउदयाश्रित आहे, विद्या कर्माच्या क्षयोपशमाश्रित आहे, ऐश्वर्य कर्मोदयाश्रित आहे, म्हणून यांचा गर्व का करायचा ? परद्रव्याच्या निमित्ताने मिळणाऱ्या गोष्टीचा गर्व करणे सम्यक्त्वाचा अभाव सांगतो किंवा मलिनता करतो अशा प्रकारे हे २५ सम्यक्त्वाचे मल दोष सांगितले आहेत यांचा त्याग केला तरच सम्यक्त्वशुद्ध होते. तेच सम्यक्त्वाचरण चारित्र्याचे अंग आहे ।।६।।

पुढे शंकादि दोष दूर झाल्यानंतर सम्यक्त्वाचे आठ अंग प्रकट होतात ते सांगतात —

**णिस्संकिय णिक्कंखिय णिव्विदिगिंछा अमूढदिट्ठी य ।**
**उवगूहण ठिदिकरणं वच्छल्ल पहावणा य ते अट्ठ ।।७।।**

निःशंकितं निःकांक्षितं निर्विचिकित्सा अमूढदृष्टी च ।
उपगूहनं स्थितीकरणं वात्सल्यं प्रभावना च ते अष्टौ ।।७।।

<u>अर्थ :</u>— निःशंकित, निःकांक्षित, निर्विचिकित्सा, अमूढदृष्टी, उपगूहन, स्थितिकरण, वासल्य आणि प्रभावना ही आठ अंगे आहेत.

<u>भावार्थ :</u>— ही आठ अंगे पूर्वी सांगितलेल्या शंकादि दोषाने प्रकट होतात यांची उदाहरणे पुराणात सांगितली आहेत त्या कथावरून जाणावे. निःशंकितेचे अंजन चोराची कथा हे उदाहरण आहे. ज्याने जिनवचनात शंका घेतली नाही, निर्भय होवून शिंकेची लड काटून मंत्र सिद्ध केला. निःकांक्षिताची सीता, अनंतमती, सुतारा आदि उदाहरणे आहेत. ज्यानी भोगासाठी धर्माला सोडले नाही. निर्विचिकित्सेचे उद्दायन राजाचे उदाहरण आहे. ज्यांनी मुनिचे शरीर अपवित्र पाहून (ग्लानी) घृणा केली नाही. अमूढदृष्टिचे रेवती राणीचे उदाहरण आहे. विद्याधरने त्यांना अनेक चमत्कार (महिमा) दाखवले तरी त्या श्रद्धेपासून शिथिल झाल्या नाहीत.

'उपगुहन' चे जिनेंद्रभक्त सेठाचे उदाहरण आहे. ज्यानी चोर, ब्रह्मचारिका असे दोष करून छत्राची चोरी केली. त्याच्या ब्रह्मचारी पदाची निंदा होते ते जाणून त्याच्या दोषाला लपवले. वारिषेणाचे उदाहरण

www.vitragvani.com



स्थितिकरण अंगासाठी सांगितले आहे. ज्याने पुष्पदंत ब्राह्मणाला मुनिपदापासून शिथिल झाला असे जाणून परत दृढ केले वात्सल्यअंगाचे विष्णूकुमारांचे उदाहरण आहे ज्यानी अकंपन आदि मुनिंचा उपसर्ग निवारण केला. प्रभावनेमध्यें वज्रकुमार मुनिंचे उदाहरण आहे, ज्यानी विद्याधराबरोबर सहायता घेवून धर्माची प्रभावना केली. असे आठ अंग प्रकट झाल्यानंतर सम्यक्त्वाचरण चारित्र होते. जसे शरीराचे हात, पाय, आदि अंग आहेत तसेच हे सम्यक्त्वाचे अंग आहेत हे नसतील तर तो विकलांग होईल ।।७।।

पुढे सांगतात की, अशा प्रकारे पहिले सम्यक्त्वाचरण चारित्र होते—

**तं चेव गुणविसुद्धं जिणसम्मत्तं सुमुक्खठाणाय ।**
**जं चरइ णाणजुत्तं पढ़मं सम्मत्तचरणचारित्तं ॥८॥**

तच्चैव गुणविशुद्धं जिनसम्यक्त्वं सुमोक्षस्थानाय ।
तत् चरति ज्ञानयुक्तं प्रथमं सम्यक्त्वचरणचारित्रम् ।।८।।

अर्थ :— ते जिनसम्यक्त्व अर्थात् अरहंत जिनदेवाची श्रद्धा नि:शकित आदि गुणानी विशुद्ध होवून त्याचे यथार्थ ज्ञानाने आचरण करणे हे प्रथम सम्यक्त्वाचरण चारित्र आहे ते मोक्षासाठी होते.

भावार्थ :— सर्वज्ञ भाषित तत्त्वार्थाची श्रद्धा नि:शंकित आदिगुण सहित, पंचवीस मलदोष रहित ज्ञानाबरोबर आचरण करतील त्याला सम्यक्त्वाचरण चारित्र म्हणतात हे मोक्षाच्या प्राप्तिसाठी केले जाते. कारण की, मोक्षमार्गात पहिले सम्यक्दर्शन सांगितले आहे म्हणून मोक्षमार्गात प्रधान हेच आहे ।।८।।

पुढे म्हणतात की, जे या प्रकारे सम्यक्त्वचरण चारित्र्याचे आचरण करून संयमाचरण चारित्र्याचा अंगीकार करतात ते लवकरच निर्वाण प्राप्त करून घेतात :—

**सम्मत्तचरणसुद्धा संजमचरणस्स जइ व सुपसिद्धा ।**
**णाणी अमूढदिट्ठी अचिरे पावंति णिव्वाणं ॥९॥**

सम्यक्त्वचरणशुद्धाः संयमचरणस्य यदि वा सुप्रसिद्धाः ।
ज्ञानिनः अमूढदृष्टयः अचिरं प्राप्नुवंति निर्वाणम् ।।९।।

अर्थ :— जे ज्ञानी आहेत तरी अमूढ दृष्टि होवून सम्यक्त्वाचरण चारित्र्याने शुद्ध असतो आणि जो संयमाचरणाने चारित्र्याने सम्यक्प्रकारे शुद्ध असेल तो लवकरच निर्वाणालां प्राप्त होतो.

भावार्थ :— जो पदार्थाच्या यथार्थज्ञानाने मूढदृष्टिरहित विशुद्ध सम्यग्दृष्टि होवून सम्यक्चरित्र स्वरूप संयमाचे आचरण करतो तो लवकरच मोक्ष प्राप्त करून घेतो. संयम अंगिकार करून स्वरूपाच्या साधनरूप एकाग्र धर्मध्यान बलाने अतिशय अप्रमत्त गुणस्थानरूप होवून श्रेणी चढून अंन्तर्मुहुर्तात केवलज्ञान उत्पन्न करून अघातिकर्माचा नाश करून मोक्ष प्राप्त करून घेतो हे सम्यक्त्वाचरण चारित्र्याचेच (महत्त्व) महात्म्य आहे. ।।९।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे म्हणतात की, जो सम्यक्त्वाच्या आचरणाने भ्रष्ट आहे आणि ते संयमाचे आचरण करतात तरी ते मोक्ष प्राप्त करून घेवू शकत नाहीत :—

सम्मत्तचरणभट्टा संजमचरणं चरंति जे वि णरा ।
अण्णाणणाणमूढा तहवि ण पावंति णिव्वाणं ॥१०॥

सम्यक्त्वचरणभ्रष्टाः संयमचरणं चरन्ति येऽपि नराः ।
अज्ञानज्ञानमूढाः तथाऽपि न प्राप्नुवंति निर्वाणम् ॥१०॥

<u>अर्थ :</u>— जो पुरूष सम्यक्त्वाचरण चारित्र्याने भ्रष्ट आहे आणि संयमाचे आचरण करतात ते ही अज्ञानी मूढ दृष्टिच असतात म्हणून निर्वाण मिळवू शकत नाहीत.

<u>भावार्थ :</u>— सम्यक्त्वाचरण चारित्र्याशिवाय संयमाचरणाशिवाय चारित्र निर्वाणाचे कारण नाही कारण कीं, सम्यक्ज्ञानाशिवाय तर ज्ञान मिथ्या म्हणवले जाते. म्हणून अशाप्रकारे सम्यक्त्वाशिवाय चारित्र्यालाही मिथ्यापण येते. ॥१०॥

पुढे प्रश्न उत्पन्न होतो की, अशाप्रकारे सम्यक्त्वाचरण चारित्र्याचे लक्षण (चिन्ह) काय आहे, ज्यामुळे ते जाणले जांवू शकेल. त्याच्या उत्तररूप गाथेत सम्यक्त्वाची लक्षणे सांगतात —

वच्छल्लं विणएण य अणुकंपाए सुदाणदच्छाए ।
मग्गगुणसंसणाए अवगूहण रक्खणाए य ॥११॥
एएहिं लक्खणेहिं य लक्खिज्जइ अज्जवेहिं भावेहिं ।
जीवो आराहंतो जिणसम्मत्तं अमोहेण ॥१२॥

वात्सल्यं विनयेन च अनुकंपया सुदान दक्षया ।
मार्गगुणशंसनया उपगूहनं रक्षणेन च ॥११॥
एतैः लक्षणैः च लक्ष्यते आर्जवैः भावैः ।
जीवः आराधयन् जिनसम्यक्त्वं अमोहेन ॥१२॥

<u>अर्थ :</u>— जिनदेवाची श्रद्धा सम्यक्त्वाची मोह अर्थात् मिथ्यात्व रहित आराधना करणारा जीव या लक्षणानी अर्थात् चिन्हानी ओळखला जातो — प्रथम तर धर्मात्मा पुरूष ज्याला वात्सल्यभाव असणे जसा सद्यप्रसूत गाईच्या वासराची प्रिति असते तशी धर्मात्म्याची प्रीती असणे हे एक लक्षण आहे. सम्यक्त्वादि गुणानी अधिक असणे, त्याला विनय, सत्कारादिक असणे हे विनय एक लक्षण (चिन्ह) आहे. दु:खी प्राणी पाहून करूणाभाव स्वरूप अनुकंपा (आहे) असणे हे एक लक्षण आहे. अनुकंपा कशी असावी ? चांगल्याप्रकारे

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



दानाने योग्य असणे. निर्ग्रंथस्वरूप मोक्षमार्गाची प्रशंसे सहित असणे हे ही एक लक्षण आहे. तसेच उपगुहन भाव असणे म्हणजे धर्मात्मा पुरूषाच्या कर्माच्या उदयाने दोष उत्पन्न झाले तर ते प्रकट न करणे हे ही एक चिन्ह किंवा लक्षण आहे. धर्मात्मा मार्गातून च्युत होत असेल तर त्याला योग्य मार्गात परत स्थिर करणे असे रक्षण नांवाचे लक्षण आहे. याला स्थितिकरण असे म्हणतात. या सर्व चिन्हाना सत्यार्थ देणारा एक आर्जवभाव आहे कारण की, निष्कपट परिणामाने ही सर्व चिन्हे प्रकट होतात, यात सत्यार्थ असतो, इतक्या लक्षणानी सम्यक्दृष्टिला आपण जाणूं शकतो.

भावार्थ :— सम्यक्त्वभाव मिथ्यात्व कर्माच्या अभावाने जीवांचा निजभाव प्रकट होतो म्हणून तो भाव तर सूक्ष्म आहे, ज्ञानगोचर नाही आणि त्याची बाह्य चिन्हे सम्यक्दृष्टिला प्रकट होतात त्याना सम्यक्त्व झाले असे समजले जाते जे वात्सल्य आदि भाव सांगितले ते आपल्या स्वत:लाच अनुभव गोचर असतात आणि दुसऱ्यांना त्यांच्या वचन, कायेच्या क्रियेने जाणवले जातात. त्याची परीक्षा जशी आपल्या क्रियाविशेषाने होते तशीच दुसऱ्यांची ही क्रियाविशेषाने परीक्षा होते असा व्यवहार आहे, जर असे झाले नाही तर सम्यक्त्व व्यवहार मार्गाचा लोप होईल. म्हणून व्यवहारी प्राण्याला व्यवहाराचाच आश्रय म्हटले आहे, परमार्थाला सर्वज्ञ जाणतो ।।११-१२।।

पुढे म्हणतात कीं, जे असे कारणासहित असतील तर ते सम्यक्त्व सोडून देतील :—

**उच्छाहभावणासं पसंससेवा कुदंसणे सद्धा ।**
**अण्णाणमोहमग्गे कुव्वंतो जहदि जिणसम्मं ।।१३।।**

उत्साहभावनाशं प्रशंसासेवा कुदर्शने श्रद्धा ।
अज्ञानमोहमार्गे कुर्वन् जहाति जिनसम्यक्त्वम् ।।१३।।

अर्थ :— कुदर्शन अर्थात् नैयायिक, वैशेषिक, सांख्यमत, मिमांसकमत, वेदान्तमत बौद्धमत, चार्वाकमत, शून्यवादीचे मत यांचे वेष तसेच यांचे भाषित पदार्थ आणि श्वेतांबरादिक जैनाभास यांच्यावर श्रद्धा उत्साह, भावना, प्रशंसा आणि यांची उपासना आणि सेवा जे पुरूष करतात ते जिनमताचे श्रद्धारूप सम्यक्त्वाला सोडतात. तो कुदर्शन, अज्ञान, आणि मिथ्यात्वाचा मार्ग आहे.

भावार्थ :— अनादिकाला पासून मिथ्यात्व कर्माच्या उदयाने हा जीव संसारात भ्रमण करतो काही भाग्याच्या उदयामुळे त्यात जिनमार्गाची श्रध्दा होत आणि मिथ्यात्वाच्या प्रसंगामुळे मिथ्यामतामध्यें काहीं कारणाने उत्साह, भावना, प्रशंसा सेवा, श्रद्धा, उत्पन्न झाल्याने सम्यक्त्वाचा अभाव होतो कारण की, जिनमताशिवाय अन्य मतात छद्मस्थ अज्ञानीद्वारे प्ररूपित मिथ्या पदार्थ तसेच मिथ्या प्रवृत्तिरूप मार्ग आहे. त्यांची श्रद्धा होईल तेंव्हा जिनमताची श्रद्धा जात राहील ! म्हणून मिथ्या दृष्टिचा संसर्गही होता कामा नये. अशा प्रकारे भाव जाणावा.

www.vitragvani.com



पुढे म्हणतात की, जे हे उत्साह भावनादिक सांगितले ते सुदर्शनात म्हणणे सम्यक्मार्गात असतील तर जिनमताच्या श्रद्धारूप सम्यक्त्वाला सोडत नाहीत —

उच्छाहभावणासं पसंससेवा सुदंसणे सद्धा ।
ण जहदि जिणसम्मत्तं कुव्वंतो णाणमग्गेण ।।१४।।

उत्साहभावनाशं प्रशंससेवाः सुदर्शने श्रद्धां ।
न जहाति जिनसम्यक्त्वं कुर्वन् ज्ञानमार्गेण ।।१४।।

अर्थ :— सुदर्शन अर्थात् सम्यक्‌दर्शन ज्ञान चारित्र, स्वरूप, सम्यक्मार्ग त्यात उत्साहभावना अर्थात् ते ग्रहण करण्याचा उत्साह धरून वरचेवर (पुन्हापुन्हा) चिंतवनरूपभाव आणि प्रशंसा अर्थात् मन, वचन, कायेने भले जाणून स्तुती करणे सेवा अर्थात् उपासना पूजनादिक करणे आणि श्रद्धा करणे अशा प्रकारे ज्ञानमार्ग जाणून करतापुरूष जिनमताच्या श्रद्धारूप सम्यक्त्वाला सोडत नाही.

भावार्थ :— जिनमतात उत्साह, भावना, प्रशंसा, सेवा, श्रद्धा, ज्यांच्या कडे असेल तो सम्यक्त्वापासून च्युत होत नाही ।।१४।।

पुढे अज्ञान मिथ्यात्व कुचरित्र त्यागाचा उपदेश करतात —

अण्णाणं मिच्छत्तं वज्जहि णाणे विसुद्धसम्मत्ते ।
अह मोहं सारंभं परिहर धम्मे अहिंसाए ।।१५।।

अज्ञानं मिथ्यात्वं वर्जय ज्ञाने विशुद्धसम्यक्त्वे ।
अथ मोहं सारंभं परिहर धर्मे अहिंसायाम् ।।१५।।

अर्थ :— आचार्य सांगतात कीं, हे भव्य ! तू ज्ञान प्राप्त होताच अज्ञानाचा त्याग कर. विशुद्ध सम्यक्त्व झाल्याने मिथ्यात्वाचा त्याग कर आणिअहिंसा धर्माचे लक्षण प्राप्त झाल्याने आरंभसहित मोहाला सोड.

भावार्थ :— सम्यक्‌दर्शन ज्ञान चारित्र्याची प्राप्ति झाल्यानंतर पुन्हा मिथ्यादर्शन ज्ञान चारित्र्यात पुन्हा प्रवर्तनन होवो असा उपदेश आहे ।।१५।।

पुढे पुन्हा उपदेश करतात —

पव्वज्ज संगचाए पयट्ट सुतवे सुसंजमे भावे ।
होइ सुविशुद्धझाणं णिम्मोहे वीयरायत्ते ।।१६।।

प्रव्रज्यायां संगत्यागे प्रवर्त्तस्व सुतपसि सुसंयमेभावे ।
भवति सुविशुद्धध्यानं निर्मोहे वीतरागत्वे ।।१६।।

अर्थ :— हे भव्य ! तू संग अर्थात् परिग्रहाचा त्याग ज्यात सांगितला आहे अशी दीक्षा ग्रहण कर आणि भल्या

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

प्रकाराने संयमस्वरूप भाव झाल्यानंतर सम्यक्‌प्रकारे तपात प्रवर्तन करून वीतरागपण प्राप्त झाले म्हणजे (निर्मलधर्म) शुक्ल ध्यान प्राप्त होईल.

भावार्थ :— निर्ग्रंथ होवून दीक्षा घेवून संयमभावाने चांगल्या प्रकारे तपात प्रवर्तन केले कीं, तेंव्हा संसाराचा मोह दूर होवून वीतरागपणा येतो, मग निर्मल धर्मध्यान शुल्कध्यान होते अशाप्रकारे ध्यानाने केवलज्ञान प्राप्त करून मोक्षप्राप्त होतो म्हणून अशा प्रकारचा उपदेश केला आहे.

पुढे म्हणतात की हा जीव अज्ञान आणि मिथ्यात्वाच्या दोषाने मिथ्यामार्गात प्रवर्तन करतो :—

**मिच्छादंसणमग्गे मलिणे अण्णाणमोहदोसेहिं ।**
**वज्झंति मूढ़जीवा मिच्छत्ताबुद्धिउदएण ॥१७॥**

मिथ्यादर्शनमार्गे मलिने अज्ञानमोहदोषैः ।
वध्यन्ते मूढ़जीवाः मिथ्यात्वा बुद्ध्युदयेन ॥१७॥

अर्थ :— मूढजीव अज्ञान आणि मोह अर्थात् मिथ्यात्वाच्या दोषाने मलिन जे मिथ्यादर्शन अर्थात् कुमताच्या मार्गात मिथात्व आणि अबुद्धि अर्थात् अज्ञानाच्या उदयाने प्रवृत्ति करतात.

भावार्थ :— हा मूढ जीव मिथ्यात्व आणि अज्ञानाच्या उदयाने मिथ्यामार्गाकडे जातो, म्हणून मिथ्यात्वाचा अज्ञानाचा नाश करा असा उपदेश आहे. ॥१७॥

पुढे म्हणतात कीं, सम्यक्‌दर्शन ज्ञान श्रद्धानाने चारित्र्यांचे दोष दूर होतात.

**सम्मद्दंसण पस्सदि जाणदि णाणेण दव्वपज्जाया ।**
**सम्मेण य सद्दहदि परिहरदि चरित्तजे दोसे ॥१८॥**

सम्यग्दर्शनेन पश्यति जानाति ज्ञानेन द्रव्यपर्यायान् ।
सम्यक्त्वेन च श्रद्धाति च परिहरति चारित्रजान् दोषान् ॥१८॥

अर्थ :— हा आत्मा सम्यक्‌दर्शनामुळे सत्तेतील वस्तुंना पाहातो, सम्यक्‌ज्ञानाने द्रव्य आणि पर्यायाला जाणतो. सम्यक्त्वाने द्रव्य, पर्याय, स्वरूप, सत्तामयी वस्तूचे श्रद्धान करतो आणि अशा प्रकारे पाहाणे, जाणणे आणि श्रद्धान होते. तेव्हा चारित्र अर्थात् आचरणात उत्पन्न झालेल्या दोषाना सोडतो.

भावार्थ :— वस्तुचे स्वरूप द्रव्य पर्यायात्मक सत्ता स्वरूप आहे. म्हणून जसे आहे तसे पाहावे तेंव्हा आचरण शुद्ध होते म्हणून सर्वज्ञाच्या आगमाप्रमाणे वस्तुचा निश्चय करून आचरण करावे. वस्तुद्रव्य पर्याय स्वरूप आहे. द्रव्याचे सत्ता लक्षण आहे, तसेच गुणपर्यायवानाला द्रव्य असे म्हणतात. पर्याय दोन प्रकारचे आहेत. सहवर्ती आणि क्रमवर्ती, सहवर्तीपर्यायाला गुण असे म्हणतात आणि क्रमवर्ती प्रकाराला पर्याय असे म्हणतात. द्रव्य सामान्य रूपाने एक आहे आणि विशेषरूपाने सहा आहेत, जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल.

जीवाचा दर्शनमयी चेतना हा गुण आहे. आणि मति आदिक ज्ञान तसेच क्रोध, मान, माया, लोभ आदि आणि नर नारकादि विभाव पर्याय आहेत. अगुरूलघु गुणाच्या द्वारे हानि वृद्धिचे परीणमन समजते. पुद्‌गल द्रव्याचे स्पर्श, रस, गंध, वर्णरूप मूर्तता तो गुण आहे आणि स्पर्श, रस, गंध, वर्णाचे भेदरूप परिणमन तसेच अणु पासून स्कंधरूप होणे तसेच शुद्ध, बंध, आदिरूप होणे इत्यादि भेदरूप परिणमन तसेच अणु पासून स्कंधरूप होणे तसेच शद्ध, बंध, आदिरूप होणे इत्यादि पर्याय आहे. धर्म, अधर्म, द्रव्याचे गतिहेतूत्त्व, स्थितिहेतुत्व तर गुण आहेत आणि या गुणाचे जीव, पुद्‌गलाचे, गति, स्थितिच्या भेदाने प्रकार होत आहेत ते पर्याय आहेत. तसेच अगुरूलघु गुणाच्या द्वारे हानि वृद्धिचे परिणमन होत आहेत. जो स्वभाव पर्याय आहे.

आकाशाचा अवगाहन गुण आहे आणि जीव पुद्‌गल आदिचे निमित्ताने प्रदेशभेदाची कल्पना केली जाते, ते पर्याय होत. तसेच हानिवृद्धिचे परिणमन तो स्वभाव पर्याय आहे. काल द्रव्याचा वर्तना हा गुण आहे आणि जीव आणि पुद्‌गलाच्या निमित्ताने समय आदि कल्पना हे पर्याय आहेत. यालाच व्यवहार काल ही म्हणतात तसेच हानि वृद्धिचे परिणमन हा स्वभाव पर्याय आहे. इत्यादि यांचे स्वरूप जिनआगमातून जाणून घ्यावे, श्रद्धान करावे त्यामुळे चारित्र शुद्ध होते. ज्ञानाशिवाय, श्रद्धानाचे आचरण शुद्ध होत नाही असे जाणावे. ॥१८॥

पुढे सांगतात कीं, हे सम्यक्‌दर्शन ज्ञान, चारित्र तीन भाव मोह रहित जीवाचे असतात. यांचे आचरण केल्याने शिघ्र मोक्ष मिळतो.

**एए तिण्णि वि भावा हवंति जीवस्स मोहरहियस्स ।**
**णियगुणमाराहंतो अचिरेण वि कम्म परिहरइ ॥१९॥**

एते त्रयोऽपि भावाः भवंति जीवस्य मोहरहितस्य ।
निजगुणमाराधयन् अचिरेण अपि कर्म परिहरति ॥१९॥

<u>अर्थ :</u>— हे पूर्वोक्त सम्यक्‌दर्शन, ज्ञान, चारित्र, तीन भाव आहेत, हे निश्चयाने मोह अर्थात् मिथ्यात्वरहित जीवाचेच असतात, तेंव्हा हा जीव आपला निजगुण जो शुद्धदर्शन, ज्ञानमयी, चेतनेची आराधना करून थोड्याच वेळात कर्माचा नाश करतो.

<u>भावार्थ :</u>— निजगुणाच्या ध्यानाने शीघ्र ही केवल ज्ञान प्राप्त करून मोक्ष मिळवतो.

पुढे या सम्यक्त्वचरण चारित्र्याच्या कथनाचा संकोच करतात :—

**संखिज्जमसंखिज्जगुणं च संसारिमेरुमत्ता' णं ।**
**सम्मत्तमणुचरंता करंति दुक्खक्खयं धीरा ॥२०॥**

संख्येयामसंख्येयगुणां संसारिमेरुमात्रा णं ।
सम्यक्त्वमनुचरंतः कुर्वन्ति दुःखक्षयं धीराः ॥२०॥

<u>अर्थ :</u>— सम्यक्त्वाचे आचरण करून धीर पुरूष संख्यातगुणी तसेच असंख्यात गुणी कर्माची निर्जरा

www.vitragvani.com



करतात आणि कर्माच्या उदयाने निर्माण झालेल्या संसारातील दु:खाचा नाश करतात कर्म कसे आहेत ? संसारी जीवाचे मेरू अर्थात् मर्यादामात्र आहेत आणि 'सिद्ध' झाल्यानंतर तर कर्म नाहीतच.

<u>भावार्थ :</u>— या सम्यक्त्वाचे आचरण केल्यानंतर प्रथम काळात तर गुणश्रेणी निर्जरा होत नाही. ते असंख्यात गुणाकाररूप आहेत. त्यापूर्वि जो पर्यंत संयमाचे आचरण होत नाही तोपर्यंत गुणश्रेणी निर्जरा होत नाही. तेथे संख्यात गुणाकार रूप आहेत. म्हणून संख्यातगुण आणि असंख्यातगुण अशाप्रकारे दोन्ही वचने सांगितली आहेत. कर्म म्हणजे संसारावस्था आहे, त्यात दु:खाचे कारण मोहकर्म आहे; त्यात मिथ्यात्वकर्म प्रधान आहे. सम्यक्त्व झाल्यानंतर मिथ्यात्वाचा तर अभावच झाला आणि चारित्र मोह दु:खाचे कारण आहे म्हणून हे जो पर्यंत आहे तो पर्यंत त्याची निर्जरा करते. अशा प्रकारे अनुक्रमाने दु:खाचा क्षय होतो. संयमाचरणाच्या असण्याने सर्व दु:खाचा क्षय होतोच. सम्यक्त्वाचे महात्म्य अशाप्रकारे आहे, कीं, सम्यक्त्वाचरण झाल्याने संयमाचरण ही शिघ्र होते. म्हणून सम्यक्त्वाला मोक्षमार्गात प्रधान जाणून त्याचेच वर्णन प्रथम केले आहे. ॥२०॥

पुढे संयमाचरण चारित्र्याला म्हणतात :—

**दुविहं संजमचरणं सायारं तह हवे णिरायारं ।**
**सायारं सग्गंथे परिग्गहा रहिय खलु णिरायारं ॥२१॥**

द्विविधं संयमचरणं सागारं तथा भवेत् निरागारं ।
सागारं सग्रन्थे परिग्रहाद्रहिते खलु निरागारम् ॥२१॥

<u>अर्थ :</u>— संयमाचरण चारित्र दोन प्रकारचे आहे. सागार आणि निरागार. सागार म्हणजे परिग्रहा सहित, श्रावकाला म्हटले जाते आणि निरागार म्हणजे परिग्रहाने रहित मुनिसाठी सांगितले आहे. हा निश्चय आहे. ॥२१॥

पुढे 'सागार' संयमाचरण सांगत आहेत —

**दंसण वय सामाइय पोसह सचित्त रायभत्ते य ।**
**बंभारंभपरिग्गह अणुमण उद्दिट्ठ देसविरदो य ॥२२॥**

दर्शनं व्रतं सामायिकं प्रोषधं सचित्तं रात्रिभुक्तिश्च ।
ब्रह्म आरंभः परिग्रहः अनुमतिः उद्दिष्ट देशविरतश्च ॥२२॥

<u>अर्थ :</u>— दर्शन, व्रत, सामायिक आणि प्रोषध आदिचे नांव एकदेश आहे, आणि नांवे अशी आहेत,

---

१. 'संसारिमेरूमता' 'सासारि मेरू मित्ता' याचे संस्कृत ''सर्षप मेरूमात्रा'' अशा प्रकारे आहे.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



प्रोषधोपवास, सचित्तत्याग, रात्रिभुक्तित्याग, ब्रह्मचार्य, आरंभ त्याग, परिग्रह त्याग, अनुमतित्याग आणि उद्दिष्ट त्याग, अशा प्रकारे देशविरत आहे.

भावार्थ :— हे सागार संयमाचरणाचे ११ स्थाने आहेत, यांना प्रतिमा असे ही म्हणतात. ॥२२॥

पुढे या स्थानात संयमाचे आचरण कशा प्रकारे आहे ते सांगतात —

पंचेव णुव्वयाइं गुणव्वयाइं हवंति तह तिण्णि।
सिक्खावय चत्तारि य संजमचरणं च सायारं ॥२३॥

पंचैव अणुव्रतानि गुणव्रतानि भवंति तथा त्रीणि ।
शिक्षाव्रतानि चत्वारि संयमचरणं च सागारम् ॥२३॥

अर्थ :— पांच अणुव्रत, तीनगुणव्रत आणि चार शिक्षाव्रत अशा प्रकारे बारा प्रकारचे संयमाचरण चारित्र आहे, जे सागार आहे, ग्रंथ सहित श्रावकाना होते. म्हणून सागार असे म्हटले आहे.

प्रश्न :— हे बारा प्रकार व्रताचे सांगितले आहेत आणि पहिल्या गाथेत ११नांवे सांगितली आहेत. त्यात प्रथम दर्शन नांव सांगितले त्यात हे व्रत कसे असते ? याचे समाधान असे सांगतात :— अणूव्रत म्हणजे किंचित् छोटे व्रत अशी पांच व्रते आहेत. म्हणून दर्शन प्रतिमेचा धारक ही अणूव्रतीच आहे. याचे नांव दर्शनच सांगितले आहे. येथे केवळ सम्यक्त्वी होतो आणि अव्रती आहे असे जाणावे अणु व्रती नाही. याचे अणुव्रत अतिचार सहित होते म्हणून व्रती नाम सांगितले नाही. दुसऱ्या प्रतिमेमध्यें अणुव्रत अतिचारा रहित पाळले जाते. म्हणून व्रत असे नांव दिले आहे. येथे सम्यक्त्वाचे अतिचार टाळले आहेत. सम्यक्त्वच प्रधान आहे म्हणून दर्शन प्रतिमा असे नांव आहे. अन्य ग्रंथात याचे स्वरूप अशा प्रकारे सांगितले आहे. जे आठ मूलगुणाचे पालन करतो, सात व्यसनांचा त्याग करतो ज्याला सम्यक्त्व अतिचाररहित शुद्ध आहे तो दर्शन प्रतिमेचा धारक आहे. पांच उद्म्बरफल आणि मदय, मांस, मधु या साठीचा त्याग करणे आंठ मूलगुण आहेत.

किंवा काही ग्रंथात अशा प्रकारे सांगितले आहे कीं, पांच अणुव्रताचे पालन करणे, मद्द, मांस मधाचा त्याग करावे तसेच तेच आठ मूलगुण आहेत, परंतु याला विरोध नाही हा विचाराचा फरक आहे. पांच उद्म्बरफल आणि तीन मकाराचा त्याग सांगण्याने ज्या पदार्थात साक्षात् त्रस जीव दिसतात त्यासर्व वस्तूंचे भक्षण करूं नये. देवादिकाच्या निमित्ताने तसेच औषधादिच्या निमित्ताने दिसणाऱ्या त्रसजीवांचा घात करणार नाही असा आशय आहे यात अहिंसा अणूव्रत येते. सात व्यसनाच्या त्यागात खोटे बोलणे चोरी, आणि परास्त्रिचा त्याग आला, अन्य व्यसनांच्या त्यागात अन्याय, परधन, परस्त्रिचे ग्रहण येत नाही. यात अतिलोभाच्या त्यागाने परिग्रहाचे घटणे आले अशा प्रकारे पांच अणुव्रते येतात. या व्रतांचे अतिचार टळत नाहीत म्हणून अणूव्रती नाम प्राप्त करत नाही तरी ही अशा प्रकारे दर्शन प्रतिमेचा धारक ही अणुव्रती आहे म्हणून देशविरत सागार संयमाचरण चारित्रतेत हे घेतले आहे. ॥२३॥

www.vitragvani.com



पुढे पांच अणुव्रताचे स्वरूप सांगतात—

थूले तसकायवहे थूले मोसे अदत्तथूले[1] य ।
परिहारो परमहिला परग्गहारंभ परिमाणं ॥२४॥

स्थूले त्रसकायवधे स्थूलायां मृषायां अदत्तस्थूले च ।
परिहारः परमहिलायां परिग्रहारंभपरिमाणम् ॥२४॥

अर्थ :— स्थूल त्रसकायेचा घात, स्थूल मृष अर्थात् असत्य, स्थूल, अदत्ता अर्थात् 'पर' दुसऱ्याने न दिलेले धन, पर स्त्री यांचा परिहार अर्थात् त्याग आणि परिग्रह तसेच आरंभाचे परिणाम अशा प्रकारे पांच अणूव्रते आहेत.

भावार्थ :— येथे स्थूल शब्दाचा अर्थ ज्यात आपले मरण आहे, 'पर' चे मरण आहे, आपले घर बिघडणे, 'पर'चे घर बिघडणे, राजाने दंड करण्यायोग्य असणे. पंचांच्या दंडाला प्राप्त होणे अशा प्रकारे मोठे अन्यायरूप पापकार्य जाणावे. अशा प्रकारे स्थूलपाप राजादिंच्या भयाने न करणे हे व्रत नाही, याच्या तीव्र कषायाच्या निमित्ताने तीव्र कर्मबंधाचे निमित्त जाणून स्वत: ते न करण्याचा भावरूप त्याग होणे ते व्रत आहे. यांची ११ स्थाने सांगितली आहेत. त्यात वरचे वर त्यागाचे स्वरूप वाढत जाते. म्हणून त्याची उत्कृष्टता अशी आहे कीं, ज्या कार्यात त्रस जीवाला बाधा आहे अशा प्रकारची कार्ये(आपोआप) सुटतात म्हणून सामान्यपणे असे म्हणतात कीं, त्रसहिंसेचा त्यागी देशव्रती असतो. याचे विशेष वर्णन अन्य ग्रंथातून जाणावे ॥२४॥

पुढे तीन गुण व्रतांचे वर्णन करत आहेत—

दिसिविदिसिमाण पढमं अणत्थदंडस्स वज्जणं विदियं ।
भोगोपभोगपरिमा इयमेव गुणव्वया तिण्णि ॥२५॥

दिग्विदिग्मानं प्रथमं अनर्थदण्डस्य वर्जनं द्वितीयम् ।
भोगोपभोगपरिमाणं इमान्येव गुणव्रतानि त्रीणि ॥२५॥

अर्थ :— दिशा विदिशात गमन करण्याचे परिमाण (बंधन) ते प्रथम गुणव्रत आहे. अनर्थ दंड वर्ज करणे द्वितीय गुण व्रत आहे. भोगोपभोगाचे नियंत्रण (परिणाम) हे तिसरे गुणव्रत आहे. अशाप्रकारे ही तीन गुणव्रते आहेत.

भावार्थ :— येथे गुणशद्ब तर उपकाराचा वाचक आहे, हे अणूव्रतासाठी उपकारक आहेत. दिशा विदिश अर्थात् पूर्वादिदिशेकडे गमन करण्याची मर्यादा ठेवणे. अर्थदंड अर्थात् ज्या कार्याने आपले प्रयोजन

१. अदत्तथूलेच्या स्थानी सं. छायेत 'तितिक्खथूले' 'परमहिला' च्या स्थानी 'परमपिम्मे' असा पाठ आहे.

www.vitragvani.com



साध्य होत नाही अशा प्रकारची पाप कार्ये न करणे. येथे कोणी विचारले कीं, प्रयोजनाशिवाय तर कोणताही जीव कार्य करत नाही. कोणतेही प्रयोजन विचारपूर्वक ठरवलेले असते. तर मग अनर्थदंड काय आहे ? याचे समाधान करण्यासाठी सांगतात सम्यक्‌दृष्टी श्रावक आपल्या पदाप्रमाणे विचार करतात, पदा व्यतिरिक्त सर्व अनर्थ आहे. पापी पुरूषाना तर सर्व पापच प्रयोजन असते त्यांच्या विषयी काय बोलावे ? भोग म्हणजे भोजनादिक आणि उपभोग म्हणजे स्त्री, वस्त्र, आभूषण, वाहनादिचे नियंत्रण करणे असे जाणावे ।।२५।।

पुढे चार शिक्षाव्रताचे वर्णन करत आहेत —

**सामाइयं च पढमं विदियं च तहेव पोसहं भणियं ।**
**तइयं च अतिहिपुज्जं चउत्थ सल्लेहणा अंते ।।२६।।**

सामाइकं च प्रथमं द्वितीयं च तथैव प्रोषधः भणितः ।
तृतीयं च अतिथिपूजा चतुर्थं सल्लेखना अन्ते ।।२६।।

<u>अर्थ</u> :— सामायिक तर पहिले शिक्षाव्रत आहे. दुसरे प्रोषधव्रत आहे तिसरे अतिथि पूजन आहे, चौथे अन्तसमयी सल्लेखना व्रत घेणे आहे.

<u>भावार्थ</u> :— येथे शिक्षा शब्दाने आगामी मुनिव्रताचे शिक्षण सूचित करतात जेंव्हा मुनि दीक्षा घेतात तेंव्हा असे आचरण अपेक्षित आहे. सामायिक म्हणजे राग द्वेषाचा त्याग करून एकान्त स्थानात बसून सकाळ, दुपार, संध्याकाळ मर्यादित काळात आपल्या स्वरूपाचे चिंतवन तथा पंचपरमेष्ठीच्या भक्तीचा पाठ वाचणे वंदन करणे इत्यादि विधान करणे म्हणजे सामायिक होय. अशाप्रकारे प्रोषध अर्थात् अष्टमी, चौदसच्या पर्वात प्रतिज्ञा करून धर्म कार्यात प्रवर्तन करणे म्हणजे प्रोप्रध आहे अतिथि अर्थात् पूजा करणे, त्याना आहारदान देणे, अतिथिपूजन आहे. अंतसमयी काय आणि कषायना कृश करणे समाधिमरण करणे, अंती सल्लेखना आहे, अशा प्रकारे चार शिक्षाव्रते आहेत.

पुढे सांगतात कीं, संयमाचरण चारित्र्यात अर्थात् श्रावकधर्म सांगितला आता यति धर्म सांगतात :—

**एवं सावयधम्मं संजमचरणं उदेसियं सयलं ।**
**सुद्धं संजमचरणं जइधम्मं णिक्कलं वोच्छे ।।२७।।**

एवं श्रावकधर्मं संयमचरणं उपदेशितं सकलम् ।
शुद्धं संयमचरणं यतिधर्मं निष्कलं वक्ष्ये ।।२७।।

<u>अर्थ</u> :— अशा प्रकारे श्रावकधर्मस्वरूप संयमाचरण तर म्हटले ते कसे ? सकल अर्थात् कलासहित आहे, (येथे) एक देशाला कला असे म्हटले आहे. आता यतिधर्माचे धर्मस्वरूप संयमाचरणाला सांगण्याची आचार्यांनी प्रतिज्ञा केली आहे. यतिधर्म कसा आहे ? शुद्ध आहे, निर्दोष आहे, ज्यामध्ये पापाचरणाचा लेश नाही, निकल अर्थात् कलेने परीपूर्ण आहे, संपूर्ण आहे श्रावकधर्माप्रमाणे एकदेश नाही ।।२७।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे यति धर्माची सामुग्री सांगत आहेत :—

पंचेंदियसंवरणं पंच वया पंचविंसकिरियासु ।
पंच समिदि तय गुत्ती संयमचरणं णिरायारं ॥२८॥

पंचेंद्रियसंवरणं पंच व्रताः पंचविंशतिक्रियासु ।
पंच समितयः तिस्रः गुप्तयः संयमचरणं निरागारम् ॥२८॥

अर्थ :— पांच इंद्रियांचे संवर, पांच व्रते हे २५ क्रियांचे सद्भाव झाल्याने होते. पांच समिति आणि तीन गुप्ति असे निरागार संयमाचरण चारित्र असते. ॥२८॥

पुढे ५ इंद्रियांच्या संवरणाचे स्वरूप सांगतात :—

अमणुण्णे य मणुण्णे सजीवदव्वे अजीवदव्वे य ।
ण करेइ रायदोसे पंचेंदियसंवरो भणिओ ॥२९॥

अमनोज्ञे च मनोज्ञे सजीवद्रव्ये अजीवद्रव्ये च ।
न करोति रागद्वेषौ पंचेंद्रियसंवरः भणितः ॥२९॥

अर्थ :— अमनोज्ञ तसेच मनोज्ञ असे पदार्थ ज्याना लोक आपले मानतात असे सजीवद्रव्य स्त्री पुत्रादिक, आणि अजीवद्रव्य धन धान्य आदि सर्व पुद्गल द्रव्य आदिमध्यें रागद्वेष करूं नये तो पांच इंद्रियांचा संवर असे म्हटले आहे.

भावार्थ :— इंद्रियगोचर जीव, अजीव द्रव्य आहे, हे इंद्रियाने ग्रहण करता येतात हा जीव यांच्याविषयी कधी इष्ट मानून राग करतो तर कधी अनिष्ट मानून द्वेष करतात. अशा प्रकारे राग द्वेष मुनि करत नाहीत. त्यांचे संयमाचरण चारित्र असते ॥२९॥

पुढे ५ व्रतांचे स्वरूप सांगतात :—

हिंसाविरइ अहिंसा असच्चविरई अदत्तविरई य ।
तुरियं अबंभविरई पंचम संगम्मि विरई य ॥३०॥

हिंसाविरतिरहिंसा असत्यविरतिः अदत्तविरतिश्च ।
तुर्यं अब्रह्मविरतिः पंचमं संगे विरतिः च ॥३०॥

अर्थ :— प्रथम तर हिंसेच्या उलट अहिंसा आहे. दुसरी असत्य, तिसरी अदत्त, चौथी ब्रह्मविरति आणि पांचवी परिग्रहविरती आहे.

भावार्थ :— या पांच पापांचा सर्वथा त्याग ज्यात होतो ती पांच महाव्रते म्हटली आहेत.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे यांना महाव्रत कां म्हणतात ते सांगतात :—

साहंति जं महल्ला आयरियं जं महल्लपुव्वेहिं ।
जं च महल्लाणि तदो महव्वया इत्तहे याइं ॥३१॥

साधयंति यन्महांतः आचरितं यत् महत्पूर्वैः ।
यच्च महन्ति ततः महाव्रतानि एतस्माद्धेतोः तानि ॥३१॥

अर्थ :— महल्ला अर्थात् महंत पुरूष जे साधन करतात, आचरण करतात आणि पूर्विही ज्यानी महंत पुरूषानी आचरण केले आहे तसेच हे व्रत महानच आहे कारण यात पापाचा अंश ही नाही अशाप्रकारे ही पांच महाव्रते आहेत.

भावार्थ :— ज्यांचे मोठे पुरूष आचरण करतात आणि आपण निर्दोष होतात जे निर्दोष आहेत आणि ज्याप्रमाणे मोठे पुरूष आचरण करतात तेच मोठे समजले जातात अशा प्रकारे या पांच व्रताला महाव्रत संज्ञा आहे. ॥३१॥

पुढे यां पांच व्रतांच्या २५ भावना सांगतात त्यातही प्रथम अहिंसा व्रताच्या ५ भावना सांगत आहेत :—

वयगुत्ती मणगुत्ती इरियासमिदी सुदाणणिक्खेवो ।
अवलोय भोयणाए अहिंसए भावणा होंति ॥३२॥

वचोगुप्तिः मनोगुप्तिः ईर्यासमितिः सुदाननिक्षेपः ।
अवलोक्य भोजनेन अहिंसाया भावना भवंति ॥३२॥

अर्थ :— वचनगुप्ति आणि मनोगुप्ति तसेच ईर्यासमिति, कमंडलू आदिचे धारण निक्षेप ही आदान निक्षेपणा समिति, चांगल्या प्रकारे पाहून विधिपूर्वक भोजन करणे ही एषणा समिति आहे अशा प्रकारे ५ अहिंसा महाव्रताच्या भावना आहेत.

भावार्थ :— भावना म्हणजे येथे परत परत तोच अभ्यास करणे होय. म्हणून येथे प्रवृत्ति निवृत्ति मध्यें हिंसा होत असते म्हणून निरंतर अभ्यास करत राहिले तर अहिंसा व्रताचे पालन होते. म्हणून येथे योगाची निवृत्ति करणे म्हणजे गुप्ति करणे आणि प्रवृत्ति करणे म्हणजे समितीरूप करणे. अशा निरंतर अभ्यासामुळे अहिंसा महाव्रत दृढ राहाते. या आशयाने याना भावना म्हणतात ॥३२॥

पुढे सत्य महाव्रताची भावना सांगतात :—

कोहभयहासलोहा मोहाविपरीयभावणा चेव ।
विदियस्स भावणाए ए पंचेव य तहा होंति ॥३३॥

क्रोधभयहास्यलोभमोहविपरीतभावनाः च एव ।
द्वितीयस्य भावना इमा पंचैव च तथा भवंति ॥३३॥

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



<u>अर्थ :</u>— क्रोध, भय, हास्य, लोभ आणि मोह यांच्या उलट यांचा अभाव हे द्वितीय व्रत महाव्रताची भावना आहे.

<u>भावार्थ :</u>— असत्य वचनाची प्रवृत्ति क्रोध, भय, हास्य, लोभ आणि परद्रव्याच्या मोहरूप मिथ्यारूपाने होते. त्यांचा त्याग करण्याने सत्य महाव्रत दृढ होत जाते.

तत्वार्थ सूत्रात पांचवी भावना अनुवीची भाषणं सांगितली आहे. त्याचा अर्थ असा आहे कीं, — जिनसूत्राच्या प्रमाणे म्हटले तर, आणि येथे मोहाचा अभाव सांगितला तर, तेथे मिथ्यात्वामुळे सूत्राविरूद्ध बोलले जाते, मिथ्यात्वाचा अभाव असेल तर सूत्रा विरूद्ध बोलले जात नाही अनुवीची भाषणाचा हाच अर्थ आहे. यात अर्थभेद नाही. ॥३३॥

पुढे आचार्य महाव्रताची भावना सांगतात :—

सुण्णायारणिवासो विमोचितावास जं परोधं च ।
एसणसुद्धिसउत्तं साहम्मीसंविसंवादो ॥३४॥

शून्यागारनिवासः विमोचितावासः यत् परोधं च ।
एषणाशुद्धिसहितं साधर्मिसमविसंवादः ॥३४॥

<u>अर्थ :</u>— शुन्यागार अर्थात् पर्वत, गुहा, तरू, कोटर आदि मध्यें निवास करणे विमेचितवास अर्थात् जे घर ओसाड पडले आहे अशा प्रकारच्या गृह ग्रामदिमध्ये निवास करणे. परोपरोध अर्थात् जेथे दुसऱ्याची अडचण होणार नाही अशा मंदिरादि मध्ये राहाणे, एषणाशुद्धि अर्थात् आहारशुद्ध घेणे आणि साधर्मिबरोबर वाद न करणे या पांच भावना <u>तृतीय महाव्रताच्या आहेत.</u>

<u>भावार्थ :</u>— मुनिंच्या, मंदिरात राहाणे आणि आहार घेणे या दोन प्रवृत्ति अवश्य असतात. लोकामध्यें याच निमित्ताने अदत्ताचे आदान होते. मुनिनि अशास्थानी राहिले पाहिजे जेथे 'अदत्त'चा दोष लागणार नाही. तसेच दोन्हीही प्रवृत्तिमध्यें साधर्मी आदिकडून विसंवाद उत्पन्न होणार नाही. अशा प्रकारे या पांच भावना सांगितल्या आहेत. यांच्यामुळे अचौर्य महाव्रत दृढ राहाते. ॥३४॥

पुढे ब्रह्मचर्य महाव्रताची भावना सांगत आहेत :—

महिलालोयणपुव्वरइसरणसंसत्तवसहिविकाहाहिं ।
पुट्ठियरसेहिं विरओ भावण पंचावि तुरियम्मि ॥३५॥

महिलालोकनपूर्वरतिस्मरणसंसक्तवसतिविकथाभिः ।
पौष्टिकरसैः विरतः भावनाः पंचापि तुर्ये ॥३५॥

<u>अर्थ :</u>— स्त्रियांचे अवलोकन अर्थात् रागभावसहित पाहाणे, पूर्व काळात भोगलेल्या भोगांचे स्मरण करणे, स्त्रिया असतील अशा वस्तिकेमध्ये राहाणे, स्त्रियांच्या कथा करणे, पौष्टिकरसांचे सेवन करणे, या पांची

क्रियामुळे विकार उत्पन्न होतात म्हणून यापासून विरक्त राहाणे. या पांच ब्रह्मचर्य महाव्रताची भावना आहे.

भावार्थ :— कामविकाराच्या निमित्ताने ब्रह्मचर्यव्रत भंग होते. म्हणून स्त्रियाकडे रागभावाने पाहाणे आदि निमित्त सांगितले आहेत या पासून विरक्त राहाणे, अति प्रसंग न करणे यामुळे ब्रह्मचर्य महाव्रत दृढ राहाते. ।।३५।।

पुढे पांच अपरिग्रह महाव्रताची भावना सांगतात :—

अपरिग्गह समणुण्णेसु सद्दपरिसरसरूवगंधेसु ।
रायद्दोसाईणं परिहारो भावणा होंति ।।३६।।

अपरिग्रहे समनोज्ञेषु शब्दस्पर्शरसरूपगंधेषु ।
रागद्वेषादीनां परिहारो भावनाः भवन्ति ।।३६।।

अर्थ :— शद्ब, स्पर्श, रस, रूप, गंध हे पांच इंद्रियाचे विषय समनोज्ञ अर्थात् मनाला चांगले वाटणारे आणि अमानोज्ञ अर्थात् मनाला लागणारे या दोन्हीत होणारा राग, द्वेष आदि न करणे परिग्रहत्यागव्रताच्या या पांच भावना आहेत.

भावार्थ :— पांच इंद्रियांचे विषय स्पर्श, रस, गंध, वर्ण, शद्ब हे आहेत या इष्ट अनिष्ट बुद्धिरूप राग द्वेष केला नाही तर अपरिग्रहव्रत दृढ राहाते. म्हणून या पांच भावना अपरिग्रह महाव्रताच्या सांगितल्या आहेत. ।।३६ ।।

पुढे पांच समिति सांगत आहेत :—

इरिया भासा एसण जा सा आदाण चेव णिक्खेवो ।
संजमसोहिणिमित्ते खंति जिणा पंच समिदीओ ।।३७।।

ईर्या भाषा एषणा या सा आदानं चैव निक्षेपः ।
संयमशोधिनिमित्तं ख्यान्ति जिनाः पंच समितीः ।।३७।।

अर्थ :— ईर्या, भाषा, एषणा, आदाननिक्षेपण, आणि प्रतिष्ठापना या पांच समिती संयमाच्या शुद्धीसाठी कारण आहेत असे जिनदेवाने सांगितले आहे.

भावार्थ :— मुनि पंचमहाव्रतरूप संयमाची साधना करतात त्या संयमाच्या शुद्धतेसाठी पांच समित्या सांगितल्या आहेत म्हणूनच त्याना सार्थक म्हटले आहे. ''सं अर्थात् सम्यक्प्रकारे 'इति' अर्थात् प्रवृत्ति ज्यात आहे ती समिती आहे.'' चालताना ते चार हात पुढे जमिन पाहून चालतात, बोलणे हितमितरूप असले पाहिजे, आहार ४६ दोष, ३२ अंतराय टाळून चौदा मल दोष विरहित शुद्ध आहार घेतात, धर्मोपकरणाला प्रयत्नपूर्वक ग्रहण करणे असेच प्रयत्नपूर्वक क्षेपण करणे अशाप्रकारे निष्प्रमाद, राहिल तेंव्हा संयमाचे शुद्ध पालन होते. म्हणून पंचसमितिरूप प्रवृत्ति सांगितली आहे. अशा प्रकारे संयमाचरण चारित्र्याच्या प्रवृत्तिचे वर्णन केले आहे. ।।३७।।

www.vitragvani.com



आता आचार्य निश्चय चारित्र्याला मनात धारण करून ज्ञानाचे स्वरूप सांगतात :—

**भव्वजणबोहणत्थं जिणमग्गे जिणवरेहिं जह भणियं ।**
**णाणं णाणसरूवं अप्पाणं तं वियाणेहि ॥ ३८ ॥**

भव्यजनबोधनार्थं जिनमार्गे जिनवरैः यथा भणितं ।
ज्ञानं ज्ञानस्वरूपं आत्मानं तं विजानीहि ॥३८॥

<u>अर्थ :</u>— जिनमार्गात जिनेश्वर देवाने भव्यजीवांच्या संबोधना करीता जसे ज्ञान आणि ज्ञानाचे स्वरूप सांगितले आहे तो ज्ञान स्वरूप आत्मा आहे त्याला हे भव्य जीवा तूं जाण !

<u>भावार्थ :</u>— ज्ञान आणि ज्ञानाच्या स्वरूपाला अन्य मतवाले अनेक प्रकाराने सांगतात, तसे ज्ञान आणि तसे स्वरूप ज्ञानाचे नाही. जो सर्वज्ञ वीतराग देव भाषित ज्ञान आणि ज्ञानाचे स्वरूप आहे ते निर्बाध सत्यार्थ आहे आणि ज्ञान आहे तोच आत्मा आहे तसेच आत्म्याचे स्वरूप आहे. त्याला जाणून, त्यात स्थिरभाव करणे. परद्रव्याशी रागद्वेश न करणे हेच निश्चय चारित्र आहे. म्हणून पूर्वोक्त महाव्रतादिची प्रवृत्ति करून या ज्ञानस्वरूप आत्म्यात लीन होणे अशा प्रकारचा उपदेश आहे. ॥३८॥

पुढे सांगतात कीं, जो अशाप्रकारे ज्ञानाने जाणतो तो सम्यक्ज्ञानी आहे :—

**जीवाजीवविभत्ती जो जाणइ सो हवेइ सण्णाणी ।**
**रायादिदोसरहिओ जिणसासण मोक्खमग्गुत्ति ॥३९॥**

जीवाजीवविभक्ति यः जानाति स भवेत् सज्ज्ञानः ।
रागादिदोषरहितः जिनशासने मोक्षमार्ग इति ॥३९॥

<u>अर्थ :</u>— जो पुरूष जीव आणि अजीवाचा भेद जाणतो तो सम्यकज्ञानी असतो. आणि रागादि दोषापासून रहित असतो. अशाप्रकारे जिनशासनात मोक्ष मार्ग आहे.

<u>भावार्थ :</u>— जो जीव-अजीव पदार्थाचे स्वरूप भेदरूप जाणून स्व-पर चा भेद जाणतो. तो सम्यक्ज्ञानी होतो आणि परद्रव्यापासून राग द्वेष सोडल्याने ज्ञानात स्थिरता झाल्याने निश्चय सम्यक्चारित्र होते. तेच जिनमतात मोक्षमार्गाचे स्वरूप सांगितले आहे.

पुढे अशा प्रकारे मोक्षमार्ग जाणून श्रद्धेने त्यात प्रवृत्ति करतो तो लवकरच मोक्ष प्राप्त करून घेतो –

**दंसणणाणचरित्तं तिण्णि वि जाणेह परमसद्धाए ।**
**जं जाणिऊण जोई अइरेण लहंति णिव्वाणं ॥४०॥**

दर्शनज्ञानचरित्रं त्रीण्यपि जानीहि परमश्रद्धया ।
यत् ज्ञात्वा योगिनः अचिरेण लभंते निर्वाणम् ॥४०॥

www.vitragvani.com



अर्थ :— हे भव्य ! तू दर्शन, ज्ञान, चारित्र या तिन्हिला परमश्रद्धेने जाणून घे, जे जाणून योगी, मुनि, अल्पकाळातच निर्वाणाला प्राप्त झाले आहेत.

भावार्थ :— सम्यक्दर्शन, ज्ञान, चारित्र असा त्रयात्मक मोक्षमार्ग आहे त्याला श्रद्धापूर्वक जाणण्याचा उपदेश केला आहे कारण कीं, हे जाणल्यामुळें मुनिना मोक्षाची प्राप्ति होते. ।।४०।।

पुढे म्हणतात कीं, अशाप्रकारे निश्चयचारित्र्या रूप ज्ञानाचे स्वरूप सांगितले आहे. जे हे मिळवतात ते शिवरूप मंदिरात राहाणारे होतात.

पाऊण णाणसलिलं णिम्मलसुविशुद्धभावसंजुत्ता ।
हुंति सिवालयवासी तिहुवणचूडामणी सिद्धा ।।४१।।

प्राप्य ज्ञानसलिलं निर्मलसुविशुद्धभावसंयुक्ताः ।
भवंति शिवालयवासिनः त्रिभुवनचूडामणयः सिद्धाः ।।४१।।

अर्थ :— जो पुरूष या जिनभाषित ज्ञानरूप जल प्राप्त करून आपले निर्मलभाव संयुक्त करतात ते पुरूष तीन भवनाचे चुडामणी आणि शिवालय अर्थात् मोक्षरूपी मंदिरात राहाणारे सिद्ध परमेष्ठी होतात.

भावार्थ :— जसे पाण्याने स्नान करून शुद्ध होवून उत्तम पुरूष महालात निवास करतात. तसेच हे ज्ञान जल प्रमाणे आहे, त्याला (आत्म्याला) रागादिक मल लागल्यामुळे मलिनता येते म्हणून या ज्ञानरूप जलाने रागादिक मलाला धुवून जो आपल्या आत्म्याला शुद्ध करतात ते मुक्तिरूप महालात राहून आनंद उपभोगतात. त्याना तीन भवनाचे सिद्ध शिरोमणी म्हणतात. ।।४१।।

पुढे म्हणतात कीं, जो ज्ञान गुणाने रहित आहेत ते इष्ट वस्तुला मिळवू शकत नाहीत. म्हणून गुणदोष जाणण्यासाठीं ज्ञान चांगल्याप्रकारे जाणून घ्या :—

णाणगुणेहिं विहीणा ण लहंते ते सुइच्छियं लाहं ।
इय णाऊं गुणदोसं तं सण्णाणं वियाणेहि ।।४२।।

ज्ञानगुणैः विहीना न लभंते ते स्विष्टं लाभं ।
इति ज्ञात्वा गुणदोषौ तत् सद्ज्ञानं विजानीहि ।।४२।।

अर्थ :— ज्ञान गुणाने हीन पुरूष आपल्या इच्छित वस्तुचा लाभ घेवू शकत नाहीत हे जाणून घेवून हे भव्य ! तू पूर्वोक्त सम्यक्ज्ञानाचे गुण, दोष, जाणून घे आणि अनिष्ट वस्तुला जाणत नाहीत त्यामुळें इष्ट वस्तुचा लाभ होत नाही. म्हणून सम्यक्ज्ञानानेच गुण, दोष, जाणले जातात. कारण कीं, सम्यक्ज्ञाना शिवाय हेय, उपादेय वस्तुनां जाणणे. हीत नाही, आणि हेय, उपादेय जाणल्या शिवाय सम्यक्चारित्र होत नाही. म्हणून ज्ञानालाच चारीत्र्यापेक्षा प्रधान म्हटले आहे. ।।४२।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे म्हणतात कीं, जे सम्यक्‌ज्ञान सहित चारित्र धारण करतात ते थोड्याच काळात अनुपम सुख मिळवतात :—

चारित्तसमारूढो अप्पासु परं ण ईहए णाणी ।
पावइ अइरेण सुहं अणोवमं जाण णिच्छयदो ।।४३।।

चारित्रसमारूढ आत्मनि[1] परं न ईहते ज्ञानी ।
प्राप्नोति अचिरेण सुखं अनुपमं जानीहि निश्चयतः ।।४३।।

**अर्थ :—** जे पुरूष ज्ञानी आहेत आणि चारित्र्या सहित आहेत ते आपल्या आत्म्यात पर द्रव्याची इच्छा करत नाहीत. 'पर' द्रव्यात राग, द्वेष, मोह, करत नाहीत. ते ज्ञानी जे अनुपमेय आहेत ते अशाप्रकारे अविनाशी मुक्तिचे सुख मिळवतात. हे भव्य ! तू निश्चयाने अशा प्रकारे जाण येथे ज्ञानी होवून हेय उपादेय जाणून घेवून संयमी बनून परद्रव्याला आपल्यात न मिसळून घेता परमसुख मिळवतो अशाप्रकारे सांगितले आहे. ।।४३ ।।

पुढे इष्ट चारित्र्याच्या कथनाचा सारांश सांगत आहेत :—

एवं संखेवेण य भणियं णाणेण वीयरायेण ।
सम्मत्तसंजमासयदुण्हं पि उदेसियं चरणं ।।४४।।

एवं संक्षेपेण च भणितं ज्ञानेन वीतरागेण ।
सम्यक्त्वसंयमाश्रयद्वयोरपि उद्देशितं चरणम् ।।४४।।

**अर्थ :—** एवं अर्थात् अशाप्रकारे पूर्वोक्त प्रकार संक्षेपाने श्री वीतराग देवाने ज्ञानाच्या द्वारे सांगितले आहेत अशा प्रकारे सम्यक्त्व आणि संयम या दोन्हीचे आश्रय चारित्र सम्यक्त्वचरण स्वरूप आणि संयमाचरण स्वरूप दोन प्रकारे उपदेश केला आहे, आचार्यांनि चारित्र्याच्या कथनाला (संक्षेपाने सांगून) सारांश सांगितला आहे. ।।४ ।।

पुढे या चारित्र्यपाहुडाला समजवण्याचा उपदेश आणि त्याचे फल सांगत आहेत :—

भावेह भावसुद्धं फुडु रइयं चरणपाहुडं चेव ।
लहु चउगइ चइऊणं अइरेणऽपुणब्भवा होई ।।४५।।

भावयत भावशुद्धं स्फुटं रचितं चरणप्राभृतं चैव ।
लघु चतुर्गतीः त्यक्त्वा अचिरेण अपुनर्भवाः भवत ।।४५।।

**अर्थ :—** येथे आचार्य सांगतात कीं, हे भव्य जीवानों ! हे चरण अर्थात् चारित्र्य पाहुड आम्ही स्फुट प्रकट

१ सं. प्रतिमे 'आत्मनि' च्या स्थानात आत्मन: श्रुतसागरी सं. टीका मुद्रित प्रतिमध्ये टीकेत अर्थ ही 'आत्मन:' चाच केला आहे. दे . पु. ५४.

www.vitragvani.com



करून बनवले आहे. ते तुम्ही आपल्या शुद्धभावाने पाहा. आपल्या भावात सतत अभ्यासात राहा, त्यामुळे लवकरच चार गति सोडून अपुनर्भव मोक्ष तुम्हाला होईल. पुन्हा संसारात जन्म होणार नाही.

<u>भावार्थ :</u>— हे चारित्र्य पाहूड वाचणे, अभ्यासणे, धारण करणे, वरचेवर आचरणे, अभ्यास करणे असा उपदेश केला आहे. यामुळे चारित्र्याचे स्वरूप जाणून धारण करण्याची रूचि असणे अंगिकार करणे तेंव्हाच चारगतिरूप संसाराच्या दु:खातून रहित होवून निर्वाणाला प्राप्त होत जाल. परत संसारात जन्म घेणार नाही म्हणून जे कल्याणाची इच्छा करतात त्यांनी अशा प्रकारे आचरण करावे.

* छप्पय *

चारित दोय प्रकार देव जिनवरने भाख्या ।
समकित संयम चरण ज्ञानपूरव तिस राख्या ।।
जे नर सरधावान याहि धारैं विधि सेती ।
निश्चय अर व्यवहार रीति आगममें जेती ।।
जब जगधंधा सब मेटिकैं निजस्वरूपमें थिर रहै ।
तब अष्टकर्मकूं नाशिकै अविनाशी शिवकूं लहै ।।१।।

असे सम्यक्त्वचरण चारित्र आणि संयमाचरण चारित्र दोन प्रकारचे चारित्र्याचे स्वरूप या प्राभृतामध्यें सांगितले आहे.

* दोहा *

जिनभाषित चारित्रकूं जे पालैं मुनिराय ।
तिनिके चरण नमूं सदा पाऊं तिनि गुणसाज ।।२।।

इति श्री कुन्दकुन्द आचार्य स्वामी विरचित चारित्र प्राभृताचा पं. जयचंद्रजी छाबडा कृत देशभाषामय वचनिकेचा डॉ. रेखा जैन कृत मराठी भाषा अनुवाद समाप्त होत आहे ।।३ ।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



# * अथ बोधपाहुड *

—: ४ :—

* दोहा *

देव जिनेश्वर सर्वगुरु, बंदूं मन-वच-काय ।
जा प्रसाद भवि बोध ले, पालैं जीवनिकाय ।।१।।

अशा प्रकारे मंगलाचरणाच्या द्वारे श्री कुंद कुंद आचार्यकृत गाथाबंध 'बोध पाहुड'च्या हिन्दी भाषामय वचनिकेचा मराठी अनुवाद लिहित आहे, प्रथम आचार्य ग्रंथ लिहिण्याची प्रतिज्ञा करत आहेत.

बहुसत्थअत्थजाणे संजमसम्मत्तसुद्धतवयरणे ।
वंदित्ता आयरिए कसायमलवज्जिदे सुद्धे ।।१।।
सयलजणबोहणत्थं जिणमग्गे जिणवरेहिं जह भणियं ।
वुच्छामि समासेण छक्कायसुहंकरं सुणह ।।२।।

बहुशास्त्रार्थज्ञापकान् संयमसम्यक्त्वशुद्धतपश्चरणान् ।
वन्दित्वा आचार्यान् कषायमलवर्जितान् शुद्धान् ।।१।।
सकलजनबोधनार्थं जिनमार्गे जिनवरैः यथा भणितम् ।
वक्ष्यामि समासेन षट्कायसुखंकरं शृणु ।।२।। युग्मम् ।।

अर्थ :— आचार्य सांगतात कीं, – मी आचार्यांना नमस्कार करून षट्कायिक जीवांचे सुख करणाऱ्या जिनमार्गात जिनदेवाने जसे सांगितले आहे तसे ज्यात समस्त लोकाच्या हिताचेच प्रयोजन आहे असा ग्रंथ संक्षेपाने सांगत आहे. हे भव्य जनो ! तुम्ही ऐका ! ज्या आचार्यांचे वंदन केले ते आचार्य कसे आहेत ? ते बऱ्याच शास्त्रांचा अर्थ जाणणारे आहेत, ज्यांचे तपश्चरण सम्यक्त्व आणि संयमाने शुद्ध आहे, कषायरूप मलाने रहित आहे, म्हणून शुद्ध आहे.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



**भावार्थ :**— येथे आचार्यांची वंदना केली आहे. त्याना विशेषणानी जाणले जाते गणधरापासून आपल्या गुरू पर्यंत सर्वांची वंदना केली आहे आणि ग्रंथ करण्याची प्रतिज्ञा केली आहे त्यांना विशेषणानी जाणले जाते. जे बोध पाहुड ग्रंथ करतील ते लोकाना धर्म मार्गात सावधान करून कुमार्ग सोडवून अहिंसा धर्माचे आचरण करण्याचा उपदेश करतील. ।।३।।

पुढे या 'बोध पाहुड' मध्ये ११ स्थळे घेतली आहेत. त्यांची नांवे सांगत आहेत :—

**आयदणं चेदिहरं जिणपडिमा दंसणं च जिणबिंबं ।**
**भणियं सुवीयरायं जिणमुद्दा णाणमादत्थं ।।३।।**
**अरहंतेण सुदिट्ठं जं देवं तित्थमिह य अरहंतं ।**
**पावज्जगुणविसुद्धा इय णायव्वा जहाकमसो ।।४।।**

आयतनं चैत्यगृहं जिनप्रतिमा दर्शनं च जिनबिंबम् ।
भणितं सुवीतरागं जिनमुद्रा ज्ञानमात्मार्थम् ।।३।।
अर्हता सुदृष्टं यः देवः तीर्थमिह च अर्हन् ।
प्रव्रज्या गुणविशुद्धा इति ज्ञातव्याः यथाक्रमशः ।।४।।

**अर्थ :**— १. आयतन, २. चैत्यगृह, ३. जिनप्रतिमा, ४. दर्शन, ५. जिनबिंब कसे आहे जिन बिंब ? ते वीतरागी आहेत ६. जिनमुद्रा राग सहित असत नाही, ७. ज्ञान पद कसे ? आत्मा हेच ज्याचे प्रयोजन आहे. अशा प्रकारे हे सात तर हे निश्चय वीतराग देवाने सांगितले तसे अनुक्रमे जाणावेत. ८. देव, ९. तीर्थ, १०. अरहंत, तसेच गुणानी विशुद्ध, ११. प्रव्रज्या हे चार जे अरहंत भगवंतानी सांगितले तसेच या ग्रंथात जाणावे. अशा प्रकारे ही ११ स्थळे सांगितली आहेत.

**भावार्थ :** — येथे आशय असा जाणावा कीं, — धर्म मार्गात कालदोषामुळे अनेक मते झाली आहेत तसेच जैन मतामध्ये ही भेद निर्माण झाले आहेत, त्यात आयतन आदिमध्ये (विपरीतता) विपर्यय निर्माण झाला आहे. त्यांचे परमार्थभूत खरे स्वरूप तर लोक जाणत नाहीत आणि धर्माचे लोभी होवून जशी बाह्य प्रवृत्ति पाहतात त्या प्रमाणेच करूं लागतात, त्यांना संबोधण्यासाठी हे 'बोधपाहुड' सांगितले आहे. त्यात आयतन आदि ११ स्थानांचे परमार्थभूत खरे स्वरूप जसे सर्वज्ञ देवाने सांगितले आहे तसे सांगत आहे, अनुक्रमाने जशी नांवे सांगितली आहेत त्याच अनुक्रमाने त्याचे विवरण केले आहे ते जाणण्या योग्य आहे. ।।३-४।।

(१) पहिले जे आयतन सांगितले आहे त्याचे निरूपण करत आहेत :—

**मणवयणकायदव्वा आयत्ता जस्स इन्दिया विसया ।**
**आयदणं जिणमग्गे णिद्दिट्ठं संजयं रूवं ।।५।।**

मनोवचनकायद्रव्याणि आयत्ताः यस्य ऐन्द्रियाः विषयाः ।
आयतनं जिनमार्गे निर्दिष्टं संयतं रूपम् ।।५।।

www.vitragvani.com



अर्थ :— जिनमार्गामध्यें संयमसहित मुनिरूप आहे त्याला 'आयतन' म्हटले आहे कसे आहे मुनिरूप – ज्याचे मन-वचन-काय द्रव्यरूप आहे, तसेच पांच इंद्रियांचे स्पर्श, रस, गंध, वर्ण, शद्ब हे विषय आहेत ते आधिन आहेत, वशीभूत आहेत त्यांच्या म्हणजे विषयांच्या आधिन (मन, वच, काय आणि पांच इंद्रियांचे विषय) संयमी मुनि नाहीत. तेच मुनिंच्या वश आहेत तोच मार्ग (आयतन) आहे.

पुढे पुन्हा म्हणतात :—

मय राय दोस मोहो कोहो लोहो य जस्स आयत्ता ।
पंचमहव्वयधारा आयदणं महरिसी भणियं ॥६॥

मदः रागः द्वेषः मोहः क्रोधः लोभः च यस्य आयत्ताः ।
पंचमहाव्रतधराः आयतनं महर्षयो भणिताः ॥६॥

अर्थ :— ज्या मुनिंचे मद, राग, द्वेष, मोह, क्रोध, लोभ आणि माया आदि हे सर्व निग्रहाला प्राप्त झाले आहेत आणि पांच महाव्रते जी अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य तसेच परिग्रहाचा त्याग त्यांचे धारण करणारे असे महामुनि ऋषिश्वराना "आयतन" म्हटले आहे.

भावार्थ :— पहिल्या गाथेत तर बाह्य स्वरूप वर्णन केले होते. येथे बाह्य, अभ्यन्तर दोन्ही प्रकारे संयमी असणे 'आयतन' आहे असे जाणावे ॥६॥

पुढे पुन्हा म्हणतात :—

सिद्धं जस्स सदत्थं विसुद्धझाणस्स णाणजुत्तस्स ।
सिद्धायदणं सिद्धं मुणिवरवसहस्स मुणिदत्थं ॥७॥

सिद्धं यस्य सदर्थं विशुद्धध्यानस्य ज्ञानयुक्तस्य ।
सिद्धायतनं सिद्धं मुनिवरवृषभस्य मुनितार्थम् ॥७॥

अर्थ :— ज्या मुनिचा सदर्थ अर्थात् जो शुद्ध आत्मा सिद्ध झाला आहे ते सिद्धायतन आहे. कसे आहेत मुनि? ज्यांचे विशुद्ध ध्यान आहे, धर्मध्यानाला साधून शुक्ल ध्यानाला प्राप्त झाले आहे; ज्ञान सहित आहेत, केवलज्ञानाला प्राप्त झाले आहेत घातिकर्मरूप मलाने रहित आहेत म्हणून मुनिमध्यें 'वृषभ' अर्थात् प्रधान आहे, ज्यानी समस्त पर्याय जाणला आहे अशा प्रकारे मुनिप्रधानाला 'सिद्धायतन' म्हणतात.

भावार्थ :— अशा प्रकारे तीन गाथामध्यें 'आयतन' चे स्वरूप सांगितले आहे. पहिल्या गाथेत त्याला संयमी सामान्यांचे बाह्यरूप प्रधानतेने म्हटले आहे. दुसरीमध्यें अंतरंग, बाह्यत: दोन्हीतही शुद्धतारूप ऋद्धिधारी मुनिनां ऋषीश्वर म्हटले आहेत आणि या तिसऱ्या गाथेमध्यें केवलज्ञानीला जे मुनिमध्यें प्रधान आहेत त्याना

१. संस्कृत प्रतित आसत्ता पाठ आहे. ज्याचे संस्कृत 'आसक्ता' आहे.

'सिद्धायतन' म्हटले आहे. येथे अशा प्रकारे जाणणे जे 'आयतन' अर्थात् ज्यात वसले आहे, निवास केला आहे त्याला आयतन म्हटले आहे. म्हणून धर्म पद्धति मध्यें जो धर्मात्मापुरूषांचा आश्रय करण्यायोग्य आहे ते 'धर्मायतन' आहे. अशा प्रकारे मुनिच धर्माचे आयतन आहेत. अन्य कोणी वेषधारी, पाखंडी, (ढोंगी) विषय कषायात आसक्त, परिग्रहधारि, धर्माचे आयतन नाहीत, बौद्धमतामध्यें पांच इंद्रिये, त्यांचे पांच विषय, एक मन एक धर्मायतन शरीर असे १२ आयतन सांगितले आहेत ते ही कल्पित आहेत, म्हणून जसे येथे आयतन वर्णन केले आहे तसेच समजावे, धर्मात्म्याला त्याचा आश्रय करणे, दुसऱ्याची स्तुति प्रशंसा, विनयादिक न करणे, हाच 'बोधपाहुड' ग्रंथ करण्याचा आशय आहे. ज्यात अशा प्रकारे निर्ग्रंथ मुनि राहातात अशा प्रकारच्या क्षेत्राला ही 'आयतन' म्हणतात. जो व्यवहार आहे.

(२) पुढे चैत्यगृहाचे निरूपण करतात :—

बुद्धं जं बोहंतो अप्पाणं चेदयाइं अण्णं च ।
पंचमहव्वयसुद्धं णाणमयं जाण चेदिहरं ।।८।।

बुद्धं यत् बोधयन् आत्मानं चैत्यानि अन्यत् च ।
पंचमहाव्रतशुद्धं ज्ञानमयं जानीहि चैत्यगृहम् ।।८।।

<u>अर्थ :</u>— जे मुनि 'बुद्ध' अर्थात् ज्ञानमयी आत्म्याला जाणतात अन्य जीवाला 'चैत्य' अर्थात चेतना स्वरूप जाणतात, ज्ञानमयी आहेत आणि पांच महाव्रतानी शुद्ध आहेत, निर्मल आहेत त्या मुनिना हे भव्य ! तू चैत्य गृह समज.

<u>भावार्थ :</u>— ज्यामध्यें आपल्याला आणि दुसऱ्याला जाणणारा ज्ञानी, निष्पाप निर्मल अशाप्रकारे चैत्य अर्थात् चेतन स्वरूप आत्मा राहातो ते चैत्यगृह आहे. अशाप्रकारचे चैत्यगृह म्हणजे संयमी मुनि आहेत अन्य पाषाणादिच्या मंदिराला 'चैत्यगृह' म्हणणे हा व्यवहार आहे.

पुढे पुन्हा म्हणतात :—

चेइय बंधं मोक्खं दुक्खं सुक्खं च अप्पयं तस्स ।
चेइहरं जिणमग्गे छक्कायहियंकरं भणियं ।।९।।

चैत्यं बंधं मोक्षं दुःखं सुखं च आत्मकं तस्य ।
चैत्यगृहं जिनमार्गे षट्कायहितंकरं भणितम् ।।९।।

<u>अर्थ :</u>— ज्याला बंध, मोक्ष, सुख आणि दु:ख आहे त्या आत्म्याला चैत्य असे म्हणतात. अर्थात् हे चिन्ह ज्याच्या स्वरूपात आहे त्याला 'चैत्य' असे म्हणतात, कारण कीं, जो चेतना स्वरूप आहे त्यालाच बंध, मोक्ष, सुख, दु:ख संभव आहे. अशा प्रकारे चैत्याचे जे गृह त्याला 'चैत्यगृह' असे म्हणतात. जिन मार्गामध्ये अशा प्रकारे चैत्यगृह षट्कायिकांचेहित करणारे असतात ते अशा प्रकारचे मुनि आहेत. पांच स्थावर आणि

त्रसमध्यें विकलत्रय आणि असैनी पंचेद्रियापर्यंत केवळ रक्षा करण्यायोग्य आहेत. म्हणून त्यांचे रक्षण करण्याचा उपदेश करत आहेत. तसेच त्यांचा ते घात करत नाहीत. सैनि पंचेंद्रियाचे हित करतात, रक्षण करतात, रक्षण करण्याचा उपदेश ही करतात. तसेच त्यांना संसारातून निवृत्तिरूप मोक्ष प्राप्त करण्याचा उपदेश करतात. अशा प्रकारे मुनिराजाना 'चैत्यगृह' असे म्हणतात.

**भावार्थ :—** लौकिक जन चैत्यगृहाचे स्वरूप अन्यथा अनेक प्रकारे मानतात त्याना सावधान केले आहे. – जिन सूत्रामध्यें षट्कायिक हित करणारा ज्ञानमयी संयमी मुनि आहेत ते 'चैत्यगृह' आहेत; दुसऱ्याला चैत्यगृह म्हणणे, मानणे व्यवहार आहे. अशा प्रकारे चैत्यगृहाचे स्वरूप सांगितले आहे. ।।९।।

(३) पुढे जिनप्रतिमेचे निरूपण करत आहेत :—

सपरा जंगमदेहा दंसणणाणेण सुद्धचरणाणं।
णिग्गंथवीयराया जिणमग्गे एरिसा पडिमा ।।१०।।

स्वपरा जंगमदेहा दर्शनज्ञानेन शुद्धचरणानाम् ।
निर्ग्रन्थवीतरागा जिनमार्गे ईदृशी प्रतिमा ।।१०।।

**अर्थ :—** ज्यांचे चारित्र दर्शन - ज्ञान शुद्ध निर्मल आहे, त्यांची स्व-परा अर्थात् आपली आणि पराची चलती असणारा देह आहे. ती जिनमार्गात 'जंगम प्रतिमा' आहे, अथवा स्व, पर, अर्थात् आत्म्यापासून 'पर' म्हणजे भिन्न आहे असा देह आहे. तो कसा आहे ? ज्याचे निर्ग्रंथ स्वरूप आहे, कोणत्याही परिग्रहाचा लेश ही नाही अशी दिगम्बर मुद्रा आहे. ज्याचे वीतराग स्वरूप आहे, कोणत्याही वस्तुचा राग, द्वेष, मोह नाही, जिन मार्गात अशी 'प्रतिमा' सांगितली आहे. ज्यांच्या दर्शन ज्ञानामुळें निर्मल चारित्र प्राप्त होते. अशा प्रकारे मुनिंची गुरू-शिष्य अपेक्षेने आपली तसेच 'पर'ची चलती झाली, देह निर्ग्रंथ वीतरागमुद्रा स्वरूप आहे. ती जिन मार्गात 'प्रतिमा' आहे अन्य कल्पित आहे आणि धातु-पाषाण आदि ने बनवलेल्या दिगंबर मुद्रा स्वरूपाला 'प्रतिमा' म्हणतात. जो व्यवहार आहे. ती ही बाह्य आकृति तर तशीच आहे. ते व्यवहारात मान्य आहे ।।१०।।

पुढे आणखी सांगतात :—

जं चरदि सुद्धचरणं जाणइ पिच्छेइ सुद्धसम्मत्तं ।
सा होई वंदणीया णिग्गंथा संजदा पडिमा ।।११।।

यः चरति शुद्धचरणं जानाति पश्यति शुद्धसम्यक्त्वम् ।
सा भवति वंदनीया निर्ग्रन्था संयता प्रतिमा ।।११।।

**अर्थ :—** जो शुद्ध आचरणाचे आचरण करतात तसेच सम्यक्ज्ञानाने यथार्थ वस्तुला जाणतात आणि सम्यक्दर्शनाने आपल्या स्वरूपाला पाहातात अशा प्रकारे शुद्धसम्यक्त्व ज्याना प्राप्त होते अशी निर्ग्रंथ संयम स्वरूप प्रतिमा आहे ती वंदन करण्यायोग्य आहे.

www.vitragvani.com



भावार्थ :— जाणणारा, पाहाणारा, शुद्धसम्यक्त्व, शुद्धचारित्र्यस्वरूप, निर्ग्रंथ संयमसहित अशा प्रकारे मुनिचे स्वरूप आहे ती 'प्रतिमा' आहे. तीच वंदन करण्यायोग्य आहे. अन्य कल्पित वंदन करण्यायोग्य नाहीत, आणि तसे ही रूप सदृश धातु पाषाणाची प्रतिमा असणे ती व्यवहाराने वंदन योग्य आहे. ।।११ ।।

पुढे पुन्हा सांगतात :—

दंसण अणंत णाणं अणंतवीरिय अणंतसुक्खा य ।
सासयसुक्ख अदेहा मुक्का कम्मट्ठबंधेहिं ।।१२।।
निरुवममचलमखोहा णिम्मिविया जंगमेण रूवेण ।
सिद्धट्ठाणम्मि ठिया वोसरपडिमा धुवा सिद्धा ।।१३।।

दर्शनं अनंतं ज्ञानं अनन्तवीर्याः अनंतसुखाः च ।
शाश्वतसुखा अदेहा मुक्ताः कर्माष्टकबंधैः ।।१२।।
निरुपमा अचला अक्षोभाः निर्मापिता जंगमेन रूपेण ।
सिद्धस्थाने स्थिताः व्युत्सर्गप्रतिमा ध्रुवाः सिद्धाः ।।१३।।

अर्थ :— जो अनंतदर्शन, अनंतज्ञान, अनंतवीर्य अनंत सुखा सहित आहे; शाश्वत अविनाशी सुखसहित आहे. शाश्वत अविनाशी सुस्वरूप आहे; अदेह आहे - कर्म नो कर्म रूप पुद्‌गलमयी देह ज्याना नाही; अष्ट कर्माच्या बंधनापासून रहित आहे; ज्याची उपमा दिली जावी अशी लोकात वस्तु नाही; अचल आहे ज्यातील प्रदेशांचे चलन होत नाही; अक्षोभ आहे – ज्यांच्या उपयोगात कोणताही क्षोभ नाही, निश्चल आहे; जंगमरूपाने निर्मित आहे; सिद्धस्थान जे लोकाच्या अग्रभागी स्थित आहे; म्हणून व्युत्सर्ग अर्थात् काय रहित आहे – जसा पूर्व शरीरात आकार होता तसाच प्रदेशांचा आकार चरम शरीरापेक्षा काही कमी आहेत; ध्रुव आहेत संसारातून मुक्त होवून त्याच वेळी एक समयमात्र गमन करून लोकाच्या अग्रभागी जावून स्थित होतात त्यानंतर हालचाल होत नाही अशी सिद्धभगवंताची प्रतिमा आहे.

भावार्थ :— पहिल्या दोन गाथामध्ये तर जंगम प्रतिमा संयमी मुनिंच्या देहासहित सांगितल्या आहेत. या दोन गाथामध्यें 'थिरप्रतिमा' सिद्धांची सांगितली आहे. अशा प्रकारे जंगम, स्थावर प्रतिमांचा स्वरूप सांगितले आहे. अन्य काही बऱ्यांच प्रकारे कल्पना करतात तशी प्रतिमा वंदन करण्यायोग्य नाही.

येथे प्रश्न असा आहे कीं हे तर परमार्थरूप सांगितले आहे आणि बाह्य व्यवहारात पाषाणादिकच्या मूर्तिची (प्रतिमेचे) वंदना करतात ते कसे ? त्याचे समाधान असे करतात – जे बाह्य व्यवहारात मतांतराच्या भेदाने अनेक रीति प्रतिमाची प्रवृत्ति आहे येथे परमार्थाला 'प्रधान' करून सांगितले आहे आणि व्यवहार आहे तेथे जसे प्रतिमेला परमार्थरूप समजून तिलाच सूचित करत असेल तर ते निर्बाध आहे. जसा परमार्थरूप

आकार सांगितला आहे तसाच आकार रूप व्यवहार होवो तो व्यवहारही प्रशस्त आहे; व्यवहारी जीवानात हे ही वंदन करण्यायोग्य आहेत. स्याद्वाद न्यायाने सिद्ध केले गेलेले परमार्थ आणि व्यवहारात विरोध नाही. ॥१२-१३॥

अशा प्रकारे जिनप्रतिमाचे स्वरूप सांगितले आहे :—

(४) पुढे दर्शनाचे स्वरूप सांगत आहेत :—

दंसेइ मोक्खमग्गं सम्मत्तं संयमं सुधम्मं च ।
णिग्गंथं णाणमयं जिणमग्गे दंसणं भणियं ॥१४॥

दर्शयति मोक्षमार्गं सम्यक्त्वं संयमं सुधर्मं च ।
निर्ग्रंथं ज्ञानमयं जिनमार्गे दर्शनं भणितम् ॥१४॥

अर्थ :— जो मोक्षमार्ग दाखवतो ते 'दर्शन' आहे, मोक्षमार्ग कसा आहे ? — सम्यक्त्व अर्थात् तत्वार्थश्रद्धानलक्षण सम्यक्त्वस्वरूप आहे, संयम अर्थात् चारित्र - पंच महाव्रत, पंचसमिति, तीनगुप्ति, असे तेरा प्रकार चरित्ररूप आहेत, सुधर्म अर्थात् उत्तमक्षमादिक दशलक्षण धर्मरूप आहे, निर्ग्रंथरूप आहे - बाह्य अभ्यन्तर परिग्रहरहित आहे. ज्ञानमयी आहे — जीव अजीवादि पदार्थांना जाणणारा आहे. येथे 'निर्ग्रंथ' आणि 'ज्ञानमयी ही दोन्ही विशेषण दर्शनाचेच असतात, कारण कीं, दर्शन आहे ते बाह्य तर त्याची मूर्ति निर्ग्रंथ आहे आणि अंतरंग ज्ञानमयी आहे. अशा प्रकारे मुनिंच्या रूपाला जिनमार्गात 'दर्शन' म्हटले आहे तसेच अशा प्रकारच्या रूपाच्या श्रद्धानारूप सम्यक्त्वरूपाला 'दर्शन' म्हटले आहे.

भावार्थ :— परमार्थरूप 'अंतरंग दर्शन' तर सम्यक्त्व आहे आणि बाह्य त्याची मूर्ति, ज्ञान सहित ग्रहण केलेले निर्ग्रंथरूप असे मुनिचे रूप आहे तेच दर्शन आहे. कारण कीं 'मता' (जिन)च्या मूर्तिला दर्शन म्हणणे लोकात प्रसिद्ध आहे.

पुढे पुन्हा सांगतात :—

जह फुल्लं गंधमयं भवदि हु खीरं स घियमयं चावि ।
तह दंसणं हि सम्मं णाणमयं होइ रूवत्थं ॥१५॥

यथा पुष्पं गंधमयं भवति स्फुटं क्षीरं तत् घृतमयं चापि ।
तथा दर्शनं हि सम्यक् ज्ञानमयं भवति रूपस्थम् ॥१५॥

अर्थ :— जसे फूल गंधमयी आहे, दूध घृतमयी आहे तसे हे दर्शन अर्थात जिनमताने सम्यक्त्व आहे. कसे आहे दर्शन ? अंतरंग ज्ञानमयी आहे आणि बाह्य स्वरूप हे मुनिचे रूप आहे किंवा उत्कृष्ट श्रावक, अर्जिकांचेरूप आहे.

भावार्थ :— 'दर्शन' नाव मत हे प्रसिद्ध आहे. हे जिनदर्शन मुनि, श्रावक आणि आर्यिकांचे असा बाह्य वेष सांगितले आहे 'दर्शन' जानना आणि त्याची श्रध्दा ही 'अंतरंग दर्शन' जानना, हे दोन्ही ही ज्ञानमयी आहे, यथार्थ

तत्त्वार्थचे जाननेरूप सम्यक्त्व ज्याच्यात दिसते, आणि फूल मध्ये गंध आणि दूधामध्ये घृतं दृष्टांत युक्त आहे, अशाप्रकारे अन्यथा असे आहे. जे कल्याणरूप नाही ते संसारचे कारण आहे. ।।१५।।

५—पुढे जिनबिंबाचे निरूपण करत आहे :—

जिणबिंबं णाणमयं संजमसुद्धं सुवीयरायं च।
जं देइ दिक्खसिक्खा कम्मक्खयकारणे सुद्धा ।।१६।।

जिनबिंबं ज्ञानमयं संयमशुद्धं सुवीतरागं च ।
यत् ददाति दीक्षाशिक्षे कर्मक्षयकारणे शुद्धे ।।१६।।

<u>अर्थ :</u>— जिनबिंब कसे आहे ? ज्ञानमयी आहे, संयमाने शुद्ध आहे, अतिशयकर वीतराग आहे, कर्माचे क्षयाचे कारण आणि शुद्ध आहे अशाप्रकारे दीक्षा आणि शिक्षा देता येते.

<u>भावार्थ :</u>—जे 'जिन' अर्थात अरहन्त सर्वज्ञाचे प्रतिबिंब सांगितला आहे. त्याच्या जागी त्यांच्या सारखाच मानण्या योग्य अशा प्रकारे आचार्य हे दीक्षा अर्थात् व्रताचे ग्रहण आणि शिक्षा अर्थात व्रताचे विधान सांगणे, हे दोन्ही भव्यजीवाना देत आहेत. अशाप्रकारे — पहिल्यांदा ते आचार्य ज्ञानमयी आहेत, जिनसूत्रचे त्यांना ज्ञान आहे, ज्ञाना शिवाय यथार्थ दीक्षा-शिक्षा कशी होणार ? आणि २– ते सयंमाने शुद्ध आहेत, जर अशा प्रकारे नसतील तर ते दुसऱ्यालाही शुद्ध करू शकणार नाहीत. | ३– अतिशय=विशेषतया वीतरागी नसतील तर काषायसहित असल्यामुळे दीक्षा, शिक्षा यथार्थपणे देवू शकत नाहीत. अशा प्रकारे आचार्यांना जिनांचे प्रतिबिंब जाणावे ।। १६ ।।

पुढे पुन्हा सांगतात :—

तस्स य करह पणामं सव्वं पुज्जं च विणयवच्छल्लं।
जस्स य दंसणणाणं अत्थि धुवं चेयणा भावो ।।१७।।

तस्य च कुरुत प्रणामं सर्वां पूजां च विनयं वात्सल्यम् ।
यस्य च दर्शनं ज्ञानं अस्ति ध्रुवं चेतनाभावः ।।१७।।

<u>अर्थ :</u>— अशा प्रकारे पूर्वोक्त जिनबिंबाला प्रमाण करा आणि सर्व प्रकारे पूजा करा विनय करा, वात्सल्य करा, कारण कीं, त्यामुळे ध्रुव अर्थात् निश्चयाने दर्शन-ज्ञान चैतन्य प्राप्त केले जाते.

<u>भावार्थ :</u>— दर्शन-ज्ञानमयी चेतनाभावसहित जिनबिंब आचार्य आहेत त्याना नमस्कार करा. येथे परमार्थ प्रधान म्हटला आहे, जड़ प्रतिबिंबाची गौणता आहे ।।१७।।

पुढे पुन्हा सांगतात :—

तववयगुणेहिं सुद्धो जाणदि पिच्छेहि सुद्धसम्मत्तं ।
अरहंतमुद्द एसा दायारी दिक्खसिक्खा य ।।१८।।

तपोव्रतगुणैः शुद्धः जानाति पश्यति शुद्धसम्यक्त्वम् ।
अर्हन्मुद्रा एषा दात्री दीक्षाशिक्षाणां च ।। १८ ।।

<u>अर्थ :</u>— जे तप, व्रत आणि गुण अर्थात् उत्तर गुणानी शुद्ध, सम्यक्ज्ञानाने पदार्थाला यथार्थ जाणत असतात, सम्यक्दर्शनामुळे पदार्थाला पाहात असतात म्हणून ज्याना शुद्ध सम्यक्त्व आहे अशा प्रकारचे जिनबिंब आचार्य आहेत. हीच दीक्षा-शिक्षा देणारी अरहंताची मुद्रा आहे.

<u>भावार्थ :</u>— अशा प्रकारे जिनबिंब आहे ती जिनमुद्राच आहे अशा प्रकारे जिनबिंबाचे स्वरूप सांगितले आहे. ॥१८॥

(६) पुढे जिनमुद्रेचे स्वरूप सांगत आहेत :—

दढसंजममुद्दाए इन्दियमुद्दा कसायदढमुद्दा ।
मुद्दा इह णाणाए जिणमुद्दा एरिसा भणिया ॥१९॥

दृढसंयममुद्रया इन्द्रियमुद्रा कषायदृढमुद्रा ।
मुद्रा इह ज्ञानेन जिनमुद्रा ईदृशी भणिता ॥१९॥

<u>अर्थ :</u>— दृढ अर्थात् वज्रवत् चालवून ही चालत नाही असा इंद्रिय, मनाचा संयम करणे, षट्कायीक जीवाची रक्षा करणे, अशा प्रकारे संयमरूप मुद्रेने पांच इंद्रियांचे विषयात प्रवर्तन न होणे, त्यांचा संकोच करणे ही इंद्रियमुद्रा आहे, आणि अशा प्रकारे संयमाद्वारे ज्यात कषायांची प्रवृत्ति नाही अशी कषाय दृढ मुद्रा आहे तसेच ज्ञानाचे स्वरूपात लावणे अशा प्रकारे ज्ञानद्वारे सर्व बाह्य मुद्रा शुद्ध होते अशा प्रकारे जिनशासनात अशी 'जिनमुद्रा होते. ॥१९॥

<u>भावार्थ :</u>— १. जो संयम सहित आहे, २. ज्यांची इंद्रिये ताब्यात आहेत. ३. कषायांची प्रवृत्ति नाही, ४. ज्ञान स्वरूपात मग्न असेल असे मुनि असणेच जिनमुद्रा आहे ॥१९॥

(७) पुढे ज्ञानाचे निरूपण करत आहेत :—

संजमसंजुत्तस्स य सुझाणजोयस्स मोक्खमग्गस्स ।
णाणेण लहदि लक्खं तम्हा णाणं च णायव्वं ॥२०॥

संयमसंयुक्तस्य च 'सुध्यानयोग्यस्य मोक्षमार्गस्य ।
ज्ञानेन लभते लक्षं तस्मात् ज्ञानं च ज्ञातव्यम् ॥२०॥

<u>अर्थ :</u>— संयमाने संयुक्त आणि ध्यानाला योग्य अशा प्रकारे जो मोक्षमार्ग त्याचे लक्ष अर्थात् लक्षणे योग्य – जाणण्यायोग्य (निशाण) खूण जे आपले निजस्वरूप ते ज्ञान द्वारे प्राप्त केले जाते, म्हणून अशा प्रकारचे लक्ष जाणण्यासाठी ज्ञानाला जाणणे.

<u>भावार्थ :</u>— संयम अंगीकार करून ध्यान करावे आणि आत्म्याचे स्वरूप जाणावे त्या शिवाय मोक्ष मार्गाची सिद्धि नाही, म्हणून ज्ञानाचे स्वरूप जाणावे ते जाणण्यानेच सर्व सिद्धि प्राप्त होते ॥२०॥

www.vitragvani.com



पुढे हे दृष्टान्तद्वारे सिद्ध करत आहेत :—

**जह ण वि लहदि हु लक्खं रहिओ कंडस्स वेज्झयविहीणो ।**
**तह ण वि लक्खदि लक्खं अण्णाणी मोक्खमग्गस्स ॥२१॥**

यथा नापि लभते स्फुटं लक्षं रहितः कांडस्य [१]वेधकविहीनः ।
तथा नापि लक्षयति लक्षं अज्ञानी मोक्षमार्गस्य ॥२१॥

अर्थ :— जसे वेधक (बाण मारणारा) बाणा ने रहित असा असेल तो धनुष्याच्या अभ्यासाने रहित असेल तर लक्ष्य अर्थात् निशाणाला प्राप्त करू शकणार नाही, तसेच ज्ञानाने रहित अज्ञानी दर्शन चारित्ररूप जो मोक्षमार्ग त्याचे हे लक्ष्य अर्थात् स्वलक्षणानी जाणण्यायोग्य परमात्म्याचे जे स्वरूप त्याला प्राप्त करून घेवू शकणार नाही.

भावार्थ :— धनुष्यधारी धनुष्याच्या अभ्यासा रहित आणि वेधक जो बाणा शिवाय असेल तर लक्ष्य प्राप्त करूं शकणार नाही, त्याच प्रमाणे ज्ञान रहित अज्ञानी मोक्षमार्गाचे निशाण जो परमात्मास्वरूप आहे त्याला ओळखणार नाही त्यामुळे मोक्षमार्गाची सिद्धि होणार नाही. म्हणून ज्ञानाला जाणले पाहिजे. परमात्मरूप निशाना ज्ञानरूपबाण द्वारे वेधणे आवश्यक आहे.

पुढे म्हणतात कीं, अशा प्रकारे ज्ञान-विनय-संयुक्तपुरूष होईल तोच मोक्ष प्राप्त करतो :—

**णाणं पुरिसस्स हवदि लहदि सुपुरिसो वि विणयसंजुत्तो ।**
**णाणेण लहदि लक्खं लक्खंतो मोक्खमग्गस्स ॥२२॥**

ज्ञानं पुरुषस्य भवति लभते सुपुरुषोऽपि विनयसंयुक्तः ।
ज्ञानेन लभते लक्ष्यं लक्षयन् मोक्षमार्गस्य ॥२२॥

अर्थ :— पुरूषाना ज्ञान होते आणि तो पुरूष विनय संयुक्त असेल तर ज्ञान प्राप्त करून घेवू शकतो तेंव्हा त्या ज्ञानाच्या द्वारे मोक्ष मार्गाचे लक्ष जे 'परमात्म्याचे स्वरूप' त्याच्याकडे लक्ष देतो- पाहातो-ध्यान करतो आणि ते लक्ष्य प्राप्त करून घेतो.

भावार्थ :— विनयवान पुरूष ज्ञानाला प्राप्त करून घेतो आणि ज्ञान पुरूषाला होते त्या ज्ञानाच्या द्वारे च शुद्धआत्म्याचे स्वरूप जाणले जाते, म्हणून विशेष ज्ञानीयाच्या विनयद्वारे ज्ञानाची प्राप्ति करावी. कारण कीं, निज शुद्ध स्वरूपाला जाणून मोक्ष प्राप्त केला जातो. येथे जो विनयरहित आहे, यथार्थ सूत्र पदा पासून ढळला असेल भ्रष्ट झाला असेल त्याचा निषेध करावा. ॥२२॥

---

१. वेधक - वेध्यक पाठांतर आहे.

www.vitragvani.com



पुढे हेच दृढ करतात :—

**मइधणुहं जस्स थिरं सुदगुण बाणा सुअत्थि रयणत्तं ।**
**परमत्थबद्धलक्खो ण वि चुक्कदि मोक्खमग्गस्स ॥२३॥**

मतिधनुर्यस्य स्थिरं श्रुतं गुणः बाणाः सुसंति रत्नत्रयं ।
परमार्थबद्धलक्ष्यः नापि स्खलति मोक्षमार्गस्य ॥२३॥

अर्थ :— ज्या मुनिंचे मतिज्ञान धनुष्य स्थिर आहे, श्रुतज्ञानरूप गुण अर्थात् प्रत्यंचा आहे, रत्नत्रयरूप उत्तम बाण असेल आणि परमेश्वर स्वरूप, निजशुद्धात्मस्वरूपाचे संबंधरूप लक्ष असेल ते मुनि मोक्ष मार्ग चुकत नाहीत.

भावार्थ :— धनुष्याची सर्व सामग्री यथावत् मिळाली तर (निशान) नेम चुकत नाही त्याचप्रमाणे मुनिनां मोक्षमार्गाची यथावत् सामुग्री मिळाली तर मोक्ष मार्गापासून भ्रष्ट होत नाही. त्या साधनामुळे मोक्ष प्राप्त होतो. हे ज्ञानाचे महत्त्व आहे म्हणून जिनागमाप्रमाणे सत्यार्थ ज्ञानीयांचा विनय करून ज्ञानाची साधना करावी. ॥२३॥

अशा प्रकारे ज्ञानाचे निरूपण केले आहे.

(८) पुढे देवाचे स्वरूप सांगतात :—

**सो देवो जो अत्थं धम्मं कामं सुदेइ णाणं च ।**
**सो देइ जस्स अत्थि हु अत्थो धम्मो य पव्वज्जा ॥२४॥**

सः देवः यः अर्थं धर्मं कामं सुददाति ज्ञानं च ।
सः ददाति यस्य अस्ति तु अर्थः धर्मः च प्रव्रज्या ॥२४॥

अर्थ :— 'देव' त्यालाच म्हणतात जो 'अर्थ' अर्थात् धन, धर्म, काम अर्थात् इच्छेचा विषय - भोग आणि मोक्षाचे कारण 'ज्ञान' हे चारीही देतात येथे न्याय असा आहे कीं, जी वस्तु ज्याच्या जवळ असेल ती त्यानी द्यावी आणि ज्याच्या जवळ ती वस्तु नसेल ती ते कशी देतील ? या न्यायाने अर्थ, धर्म, स्वर्गादिचे भोग, आणि मोक्ष सुखाचे कारण प्रव्रज्या अर्थात् दीक्षा ज्यानी घेतली आहे त्याना देव जाणावे ॥२४॥

पुढे धर्मादिचे स्वरूप सांगत आहेत. जे जाणल्यामुळे देवादिकांचे स्वरूप जाणले जाते :—

**धम्मो दयाविसुद्धो पव्वज्जा सव्वसंगपरिचत्ता ।**
**देवो ववगयमोहो उदयकरो भव्वजीवाणं ॥२५॥**

धर्मः दयाविशुद्धः प्रव्रज्या सर्वसंगपरित्यक्ता ।
देवः व्यपगतमोहः उदयकरः भव्यजीवानाम् ॥२५॥

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



अर्थ :— जो दयेने विशुद्ध आहे तो धर्म आहे, जो सर्व परिग्रहाने रहित आहे. तो प्रव्रज्या आहे, ज्याचा मोह नष्ट झाला आहे तो देव आहे – तो भव्य जीवांचा उदय करणारा आहे.

भावार्थ :— लोकात हे प्रसिद्ध आहे कीं, धर्म, अर्थ काम आणि मोक्ष हे चार पुरूषांचे प्रयोजन (जीवनाचे) आहे. त्यासाठीं कोणाची पूजा करावी वंदना करावी ? न्याय असा आहे कीं, ज्याच्या जवळ जी वस्तु आहे ती दुसऱ्याला द्यावी, नसेलच तर कोठून आणणार ? हे चार पुरूषार्थ जिनदेवामध्यें असतात. धर्म त्यांच्यामध्यें दयेच्या स्वरूपात असतो तो साधून तीर्थंकर झाले धन आणि संसारातील भोगांची प्राप्ति झाली, लोकांमध्यें पूज्य झाले आणि तीर्थंकराच्या परमपदात दीक्षा घेवून, सर्व मोहापासून रहित होवून, परमार्थस्वरूप आत्मिकधर्माला साधून, मोक्षसुखाला प्राप्त करून घेतले असे तीर्थंकर जिन आहेत, तेच देव आहेत. अज्ञानी लोक ज्याना देव मानतात त्यांनी धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरूषार्थ जाणलेले नसतात कारण त्यातले काहीं हिंसक आहेत, काहीं विषयायासक्त आहेत, मोही आहेत त्यांना धर्म कुठला ? अर्थ आणि कामाची ज्याना वांछा असते त्याना अर्थ, काम कसला ? जन्म, मरण सहित आहे त्याना मोक्ष कुठला ? असे देव सच्चे जिन देवच आहेत तेच भव्यजीवांचे मनोरथ पूर्ण करतात बाकी सगळे कल्पित देव आहेत.

अशा प्रकारे देवाचे स्वरूप सांगितले आहे :—

वयसम्मत्तविसुद्धे पंचेंदियसंजदे णिरावेक्खे ।
ण्हाएउ मुणी तित्थे, दिक्खासिक्खासुण्हाणेण ॥२६॥

व्रतसम्यक्त्वविशुद्धे पंचेंद्रियसंयते निरपेक्षे ।
स्नातु मुनिः तीर्थे दीक्षाशिक्षासुस्नानेन ॥२६॥

अर्थ :— व्रत सम्यक्त्वाने विशुद्ध आणि पांच इंद्रियाने संयत अर्थात् संवरसंहित तसेच निरपेक्ष अर्थात् ख्याति, लाभ, पूजादिक या लोकातील फलाची तसेच परलोकात स्वर्गादिकाच्या भोगाच्या अपेक्षेने रहित असे आत्मस्वरूप तीर्थात दीक्षा-शिक्षा स्वरूप स्नानाने पवित्र होवो.

भावार्थ :— तर्वार्थ श्रद्धान लक्षणासंहित, पांच महाव्रतानी शुद्ध आणि पांच इंद्रियाच्या विषायापासून विरक्त , या लोकात, परलोकात विषय भेगाच्या वांछेने रहित अशा निर्मल आत्म्याच्या स्वभावरूप तीर्थामध्ये स्नान केल्यामुळे पवित्र होतात अशी प्रेरणा करतात. ॥२६॥

पुढे पुन्हा सांगतात :—

जं णिम्मलं सुधम्मं सम्मत्तं संजमं तवं णाणं ।
तं तित्थं जिणमग्गे हवेइ जदि संतिभावेण ॥२७॥

यत् निर्मलं सुधर्मं, सम्यक्त्वं संयमं तपः ज्ञानम् ।
तत् तीर्थं जिनमार्गे भवति यदि शान्तभावेन ॥२७॥

www.vitragvani.com



अर्थ :— जिन मार्गामध्यें ते तीर्थ आहे जे निर्मळ उत्तम क्षमादिक धर्म तसेच तत्वार्थश्रद्धान लक्षण, शंकादिमल रहित निर्मल सम्यक्त्व तसेच इंद्रिय मनाला वश करणे, षट्कायिकजीवाची रक्षा करणे अशा प्रकारे जो निर्मल संयम, तसेच अनशन, अवमौदर्य, वृत्तिपरिसंख्यान, रसपरित्याग, विविक्तशय्यासन, कायल्केश असे बाह्य ६ प्रकारचे तप आणि प्रायाश्चित्त, विनय, वैयावृत्य, स्वाध्याय, व्युत्सर्ग, ध्यान असे सहा प्रकारचे अंतरंग तप अशा प्रकारे १२ प्रकारचे निर्मल तप आणि जीव-अजीव आदि पदार्थांचे यथार्थज्ञान हे 'तीर्थ' आहेत हे ही जर शांतभाव सहित असतील, कषायभाव नसतील तेंव्हा निर्मल तीर्थ आहे कारण कीं, जर हे क्रोधादिभाव सहित असतील तर मलिनता असेल आणि निर्मलता राहाणार नाही.

भावार्थ :— जिनमार्गामध्यें अशाप्रकारे 'तीर्थ' चे वर्णन केले आहे. लोक सागर-नद्या, यांना तीर्थ मानून स्नान करून पवित्र होण्याची इच्छा करतात. शरीराचा बाह्यमल यामुळें थोडा नाहीसा होतो परंतु शरीराच्या आतला धातु उपधातुरूप अन्तर्मल त्यामुळें निघत नाही. तसेच ज्ञानावरण आदि कर्मरूप मल आणि अज्ञान, राग-द्वेष-मोह आदि भावकर्मरूप मल आत्म्याचे अंतर्मल आहेत ते तर यामुळें काहींच कमी होत नाहीत उलट हिंसादिकाने पापकर्मरूप मल लागतो, म्हणून सागर नदी आदिला तीर्थ मानणे भ्रम आहे. ज्यातून तरून जाल ते तीर्थ आहे, अशा प्रकारे जिनमार्गात सांगितले आहे. त्यालाच संसार समुद्रातून तारणारा जाणावे. ।।२७।।

अशा प्रकारे 'तीर्था'चे स्वरूप सांगितले

(१०) पुढे अरहंताचे स्वरूप सांगतात :—

णामे ठवणे हि य संदव्वे भावे हि सगुणपज्जाया ।
चउणागदि संपदिमे भावा भावंति अरहंतं ।।२८।।

नाम्नि संस्थापनायां हि च संद्रव्ये भावे च सगुणपर्यायाः[२] ।
च्यवनमागतिः संपत् इमे भावा भावयंति अर्हन्तम् ।।२८।।

अर्थ :— नाम, स्थापना, द्रव्य, भाव हे चार भाव अर्थात् पदार्थ आहेत हे अरहंता विषयी सांगतात आणि सगुणपर्याय अर्थात् अरहंताचे गुण पर्यायासहित तसेच च्यवन आणि आगति व संपदा या अरहंतांच्या भावाचे वर्णन करतात.

भावार्थ :— अरहंत शब्दाचा सामान्यपणे केवलज्ञानी ते सर्व अरहंत आहेत तरी ही येथे तीर्थकर पदाच्या प्रधानतेने म्हणून नामादिकाने सांगावे असे म्हणतात. लोक व्यवहारात नाम आदिची प्रवृत्ति अशाप्रकारे आहे —जे ज्या वस्तुचे नांव असेल तसे गुण नसणे त्याला नाम निक्षेप असे म्हणतात. ज्या वस्तुचा जसा आकार असेल त्या आकाराचे लाकुड पाषाणादिकाची मूर्ति बनवून त्यावर संकल्प करायचा त्याला स्थापना असे म्हणतात. ज्या वस्तुची पहिली स्थिति असेल तशीच पुढची अवस्था प्रधान करून सांगतात त्याला द्रव्य

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



म्हणतात. वर्तमानात जी अवस्था असेल त्याला भाव असे म्हणतात. असे चार निक्षेपाचे वर्णन आहे. त्याचे वर्णन शास्त्रामध्यें ही लोकाना समजावण्यासाठी केले आहे. जे निक्षेप विधानद्वारे, स्थापना, द्रव्याला भाव समजू नये. नामाला नाम समजावे. स्थापनेला स्थापना समजावे. द्रव्याला द्रव्य समजावे, भावाला भाव समजावे, अन्यला अन्य समजावे अन्यथा व्यभिचार नांवाचा दोष येईल. तो दूर करण्यासाठी लोकाना यथार्थ समजण्यासाठी शास्त्रामध्ये कथन आहे. परंतु येथे तसे निक्षपाचे कथन नाही. येथे तर निश्चयनयाच्या प्रधानतेने कथन आहे म्हणून जसे अरहंताचे नांव आहे तसेच गुण सहित नाम जाणावे, स्थापना जशी त्यांच्या देहाप्रमाणे मूर्ति आहे तीच स्थापना जाणावी, जसे त्याचे द्रव्य आहे तसे द्रव्य जाणावे आणि जसा त्यांचा भाव आहे तसाच त्यांचा भाव जाणावा. ॥२८॥

अशाच प्रकारचे कथन पुढे करत आहेत. प्रथम 'नाम' प्रधान करून सांगत आहेत —

दंसण अणंत णाणे मोक्खो णट्ठट्ठकम्मबंधेण ।
णिरुवमगुणमारूढो अरहंतो एरिसो होई ॥२९॥

दर्शनं अनंतं ज्ञानं मोक्षः नष्टाष्टकर्मबंधेन ।
निरुपमगुणमारूढः अर्हन् ईदृशो भवति ॥ २९ ॥

<u>अर्थ :</u>— ज्याचे ज्ञान दर्शन तर अनंत आहेच शिवाय घाति कर्माच्या नाशामुळें सर्व ज्ञेय पदार्थांना जाणतो. आणि अष्ट कर्माचे बंध नष्ट झाल्यामुळे मोक्ष मिळवतो. केवलीनां आंठ ही कर्माचा बंध नसतो. तरीही सातावेदनीयाचा आस्त्रव मात्र बंध सिध्दान्तात सांगितला आहे तरी ही स्थिति अनुभागरूप बंध नाही म्हणून अबंध तुल्यरुपच आहे. अशा प्रकारे आणि कर्मबंधच्या अपेक्षेने भावमोक्ष म्हणवला जातो आणि उपमारहित गुणानी आरूढ आहे - सहित आहे. अशा प्रकारे गुण छद्‌मस्था मध्यें कोठेच नाहीत. म्हणून ज्यांच्यात उपमारहित गुण आहेत असे अरहंत आहेत.

<u>भावार्थ :</u>— केवळ नावाने अरहंत असेल तर त्याना अरहंत म्हणत नाहीत. अशा प्रकारच्या गुणानी सहित जे आहेत त्याना अरहंत म्हणतात

पुढे पुन्हा सांगत आहेत :-

जरवाहिजम्ममरणं चउगइ गमणं च पुण्ण पावं च ।
हंतूण दोसकम्मे हुउ णाणमयं च अरहंतो ॥३०॥

जराव्याधिजन्ममरणं चतुर्गतिगमनं पुण्यं पापं च ।
हत्वा दोषकर्माणि भूतः ज्ञानमयश्चार्हन् ॥ ३० ॥

<u>अर्थ :</u>— जर (म्हातारपण) व्याधी, जन्म-मरण, चारी गतिमध्यें गमन, पुण्य, पाप आणि दोषाना उत्पन्न करणाऱ्या कर्माचा नाश करून केवल ज्ञानमयी अरहंत झाले असतील तेच अरहंत आहेत.

<u>भावार्थ :</u>— पहिल्या गाथेत तर गुणाच्या सद्‌भावाने अरहंत नांव म्हटले आहे. आणि या गाथेत दोषांच्या अभावाने अरहंत नांव म्हटले आहे. राग, द्वेष, मद, मोह, अरति, चिन्ता, भय, निद्रा, विवाद, खेद आणि

www.vitragvani.com



विस्मय हे ११ दोष घातिकर्माच्या उदयाने होतात आणि क्षुधा, तृषा, जन्म, जरा, मरण, रोग आणि स्वेद हे सात दोष अघाति कर्माच्या उदयाने होतात. या गाथे मध्यें जरा, रोग, जन्म, मरण आणि चार गतिमध्यें गमनाचा अभाव सांगिल्याने तर अघातिकर्मामुळे होणाऱ्या दोषांचा अभाव जाणणे, कारण कीं, अघातिकर्ममध्यें या दोषाना उत्पन्न करणाऱ्या पापप्रकृतिच्या उदयाचा 'अरहंता' मध्यें अभाव आहे आणि रागद्वेषादिक दोषांचा घातिकर्माच्या अभावामुळे अभाव आहे. येथे कोणी विचारले - अर्हंताला मरणाचा आणि पुण्याचा अभाव कसा? मोक्षगमन करणें हे अरहंताचे मरण आहे. आणि पुण्यप्रकृतिचा उदय असतो, त्याचा अभाव कसा? त्याचे समाधान -येथे मरण होवून परत संसारात जन्म होणे अशा प्रकरच्या 'मरण'अपेक्षेने कथन आहे अशा प्रकारचे मरण अरहंताना नाही, त्याचप्रमाणे जो पुण्यप्रकृतिचा उदय पापप्रकृतिच्या सापेक्षाने घेतला अशा प्रकारे पुण्याच्या उदयाचा अभाव जाणावा किंवा-अपेक्षा पुण्याचा ही बंध नाही. सातावेदनीय बांधले ते स्थिति-अनुभाग बिना अबंध तुल्यच आहे.

प्रश्न :— केवलीना असाता वेदनीयाचा उदय सिध्दांतामध्यें सांगितला आहे ते कसे काय?

उत्तर :— अशा प्रकारे जो असाताचा अत्यंतमंद अगदी मंद अनुभाग उदय आहे, त्यामुळे असाता कांहीं बाहय कार्य कर्म करण्याला समर्थ नाही, सूक्ष्म उदय करुन खिरला जातो किंवा संक्रमणरूप होवून सातारूप होतो असे जाणावे. अशा प्रकारे अनंत चतुष्टय सहित, सर्वदोषरहित सर्वज्ञवीतराग होतो त्याला 'अरहंत' नांव दिले आहे.

पुढे स्थापने द्वारे अरहंताचे वर्णन करतात :-

गुणठाणमग्गणेहिं य पज्जत्तीपाणजीवठाणेहिं ।
ठावण पंचविहेहिं पणयव्वा अरहपुरिसस्स ।।३१।।

गुणस्थानमार्गणाभिः च पर्याप्तिप्राणजीवस्थानैः ।
स्थापना पंचविधैः प्रणेतव्या अर्हत्पुरुषस्य ।।३१।।

अर्थ :— गुणस्थान, मार्गणास्थान, पर्याप्ति, प्राण आणि जीवस्थान या पांच प्रकाराने 'अरहंत' पुरूषाची स्थापना करणे किंवा त्याला वंदन करणे.

भावार्थ :— स्थापना निक्षेपामध्यें काष्ठपाषाणादिका मध्यें संकल्प करणे सांगितले आहे ते येथे प्रधान नाही. येथे निश्चयाच्या प्रधानतेने कथन आहे. येथे गुणस्थानादिकाने अरहंतांचे स्थापन सांगितले आहे. ।।३१ ।।

पुढे विशेष सांगत आहेत:-

तेरहमे गुणठाणे सजोइकेवलिय होइ अरहंतो ।
चउतीस अइसयगुणा होंतिहु तस्सट्ठपडिहारा ।।३२।।

त्रयोदशे गुणस्थाने सयोगकेवलिकः भवति अर्हन् ।
चतुस्त्रिंशत् अतिशयगुणा भवंति स्फुटं तस्याष्टप्रातिहार्या ।।३२।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

<u>अर्थ</u> :—१४ गुणस्थाने सांगितली आहेत. त्यात संयोगकेवली नावाचे तेरावे गुणस्थान आहे. त्यात योगाच्या प्रवृत्ति सहित, केवलज्ञानसहित सयोग केवली अरहंत असतात. त्यांचे ३४ अतिशय आणि ८ प्रातिहार्य असतात असे तर गुणस्थानद्वारे 'स्थापना अरहंत' म्हणवले जातात.

<u>भावार्थ</u> :— येथे ३४ अतिशय आणि ८ प्रातिहार्य म्हटल्याने तर समवसरणात विराजमान तसेच विहार करणारे अरहंत आहेत आणि 'सयोग' म्हटल्याने विहाराची प्रवृत्ति आणि वचनाची प्रवृत्ति सिध्द होते. 'केवली' म्हटल्याने केवलज्ञान द्वारे सर्व तत्त्वाना जाणणे सिध्द होते. चौतीस अतिशय अशा प्रकारे आहेत - जन्मापासून प्रकट होणारे १० मलमूत्राचा अभाव - ते १) मलमूत्राचा अभाव २) स्वेदाभाव ३) धवलरूधीर ४) समचतुरस्त्रसंस्थान ५) वज्रवृषभनाराच संहनन ६) सुन्दररूप ७) सुगंधशरिर ८) शुभलक्षणे असणे ९) अनंतबल १०) मधुरं वचन असे १० आहेत.

केवल ज्ञान उत्पन्न झाल्यावर हे १० होतात - १) उपसर्गाचा अभाव २) उदयाचा अभाव ३) शरीराची छाया न पडणे ४) चतुर्मुख दिसणे ५) सर्व विद्यांचे स्वामित्व ६) डोळ्यांच्या पापण्या न हलणे ७) शतयोजन सुभिक्षता ८) आकाशगमन ९) कवलाहार न होणे १०) नख, केस, न वाढणे असे १० आहेत.

चौदा देवकृत आहेत - १) सकलार्ध्दमागधी भाषा २) सर्वजीवातमैत्रीभाव ३) सर्वऋतुंची फळे फुले फुलणे ४) दर्पण समान भूमि ५) कटंकरहित भूमि ६) मंद सुंगध पवन ७) सर्वत्र आनंद ८) गंधोदकवृष्टि ९) पायतळी कमलाकार - रचना (१०) दाही दिशा निर्मल होणे (११) सर्व धान्य निष्पत्ति (१२) देवांच्या द्वारे आव्हानन (१३) धर्मचक्राचे पुढे चालणे (१४) अष्टमंगलद्रव्ये पुढे चालणे.

अष्टमंगल द्रव्यांची नावे - १) छत्र २) ध्वजा ३) दर्पण ४) कलश ५) चामर ६) भृङगार (झारी) ७) ताल ८) स्वस्तिक अर्थात् सुप्रतीच्छक असे आठ असतात.

असे ३४ अतिशय सांगितले आहेत. आठ प्रातिहार्य - १) अशोकवृक्ष २) पुष्पवृष्टि ३) दिव्यध्वनि ४) चामर ५) सिंहासन ६) भामंडल ७) दुन्दुभिवादित्र ८) छत्र असे आठ आहेत.

अशा प्रकारे गुणस्थानद्वारे अरहंताचे स्थापन सांगितले आहे ।।३२।।

आता मार्गणेद्वारा सांगत आहेत :-

**गइ इंदियं च काए जोए वेए कसाय णाणे य ।**
**संजम दंसण लेस्सा भविया सम्मत्त सण्णि आहारे ।।३३।।**

गतौ इन्द्रिये च काये योगे वेदे कषाये ज्ञाने च ।
संयमे दर्शने लेश्यायां भव्यत्वे सम्यक्त्वे संज्ञिनि आहारे ।।३३।।

<u>अर्थ</u> :—गति, इंद्रिय, काय, योग, वेद, कषाय, ज्ञान, संयम, दर्शन, लेश्या, भव्यत्त्व, सम्यक्त्व, संज्ञी आणि आहार अशा प्रकारे १४ मार्गणा असतात. अरहंत संयोग केवलींना तेरावे गुणस्थान आहे. त्यालाच मार्गणा

म्हणतात. चारीगतिमधली मनुष्य गति आहे, पंधरायोगामधला मनोयोग तर सत्य आणि अनुभय अशा प्रकारे दोन, आणि वचनयोग दोन तथा काययोग, औदारिक योग असे पांच योग आहेत, जेंव्हा समुद्घात करतात तेंव्हा औदारिक मिश्र आणि कार्माण दोन मिसळून सात योग आहेत, वेद-तीन्हीचा ही अभाव आहे. २५ कषायांचा ही अभाव आहे, आठी ज्ञानातील केवलज्ञान आहे, साती संयमातील यथाख्यात संयम आहे. चारी दर्शनातील एक केवल दर्शन आहे. सहा लेश्या मधली एक शुक्ल लेश्या जी योग निमित्त आहे. दोन भव्य मधले एक भव्य आहे. ६ सम्यक्त्वा मधले क्षायिक सम्यक्त्व आहे. दोन संज्ञी मधले द्रव्यसंज्ञा आहे. भावाने क्षयोपशमरूप भावमनाचा अभाव आहे, आहारक अनाहारक दोन्हीतील आहारक आहे, ते ही नो कर्मणा अपेक्षेने आहे. परंतु कवलाहार नाही. आणि समुद्घात करत असेल तर अनाहारक ही असेल अशा प्रकारे दोन्हीही आहे. अशा प्रकारे मार्गणेच्या अपेक्षेने अरहंताची स्थापना जाणावी ।।३३।।

पुढे पर्याप्ति द्वारे सांगत आहेत :—

आहारो य सरीरो इंदियमण आणपाणभासा य ।
पज्जत्तिगुणसमिद्धो उत्तमदेवो हवइ अरहो ।।३४।।

आहारः च शरीरं इन्द्रियमनआनप्राणभाषाः च ।
पर्याप्तिगुणसमृद्धः उत्तमदेवः भवति अर्हन् ।।३४।।

अर्थ :— आहार, शरीर इंद्रिय, मन, आनप्राण, अर्थात् श्वासोच्छवास आणि भाषा अशा प्रकारे सहा पर्याप्ति आहेत. या पर्याप्ति गुणद्वारे समृध्द अर्थात् युक्त उत्तम देव अरहंत आहेत.

भावार्थ :— पर्याप्तिचे स्वरूप अशा प्रकारे आहे. - जो जीव एक अन्य पर्यायाला सोडून अन्य पर्यायात जातो तेंव्हा विग्रह गति मध्यें तीन समय उत्कृष्ट मध्यें राहील, नंतर सैनी (मनसहित) पंचेंद्रियात उत्पन्न होईल. तेथे तीन जातीच्या वर्गणेचे ग्रहण करतील, आहारवर्गणा, भाषावर्गणा, मनोवर्गणा, अशा प्रकारे ग्रहण करून 'आहार' जातिच्या वर्गणेने आहार, शरीर, इंद्रिय, श्वासोच्छवास, अशा प्रकारे चार पर्याप्ति अंतर्मुहुर्त कालात पूर्ण केले कीं, तत्पश्चात् भाषाजाति, मनोजातिच्या वर्गणेने अंतर्मुहुतीत पूर्ण करतात त्या नंतर आयुपर्यंत पर्याप्त राहातो, आणि नो कर्म वर्गणांचे ग्रहण करतच राहतो. येथे आहार नांव कवलाहाराचे नाही. अशा प्रकारे १३ व्या गुणस्थानात ही अरहंताची पर्याप्ति पूर्णच आहे. अशा प्रकारे पर्याप्तिद्वारे अरहंतांची स्थापना आहे ।।३४।।

पुढे प्राणद्वारे सांगत आहेत :—

पंच वि इंदियपाणा मणवयकाएण तिण्णि बलपाणा ।
आणप्पाणप्पाणा आउगपाणेण होंति दह पाणा ।।३५।।

पंचापि इंद्रियप्राणाः मनोवचनकायैः त्रयो बलप्राणाः ।
आनप्राणप्राणाः आयुष्कप्राणेन भवंति दशप्राणाः ।।३५।।

अर्थ :— पांच इंद्रियप्राण, मन, वचन, काय, तीन बल प्राण, एक श्वासोच्छवास प्राण आणि एक आयुप्राण हे १० प्राण आहेत.

**भावार्थ :—** अशाप्रकारे १० प्राण सांगितले आहेत. १३ व्या गुणस्थानात भाव इंद्रिय आणि भावमनाची क्षयोपशमभावरूप प्रवृत्ति नाही या अपेक्षेने कायबल, वचनबल, श्वासोच्छवास, आयु हे चार प्राण आहेत आणि द्रव्यापेक्षेने दहा ही प्राण आहेत. अशा प्रकारे प्राणद्वारा अरहंताची स्थापना आहे ।।३५ ।।

पुढे जीवनस्थानद्वारे सांगतात :-

मणुयभवे पंचिंदिय जीवट्ठाणेसु होइ चउदसमे ।
एदे गुणगणजुत्तो गुणमारूढो हवइ अरहो ।।३६।।

मनुजभवे पंचेंद्रियः जीवस्थानेषु भवति चतुर्दशे ।
एतद्गुणगणयुक्तः गुणमारूढो भवति अर्हन् ।।३६।।

**अर्थ :—** मनुष्यभवात पंचेन्द्रिय नांवाचे चौदावे जीवस्थान अर्थात् जीवसमास त्यात इतक्या गुणांच्या समुहाने युक्त १३ व्या गुणस्थानाला प्राप्त करतात ते अरहंत असतात

**भावार्थ :—** जीव समास १४ सांगितले आहेत - एकेंद्रिय सूक्ष्म बादर - २ दोन इंद्रिये, तीनइंद्रिये, चतुरेंद्रिय असे विकलत्रय, पंचेद्रिय असैनी, सैनी - २ असे सात झाले, हे पर्याप्त, अपर्याप्ताच्या भेदाने १४ आहेत. यात पंचेंद्रिय जीव अरंहताचे आहे. गाथे मध्ये सैनीचा नाव घेतले नाही आणि मनुष्य भवाचे नांव घेतले तर मनुष्य सैनीच होतात, असैनी होत नाहीत, म्हणून मनुष्य म्हटल्यानंतर 'सैनी' च जाणले पाहिजे ।।३६ ।।

अशा प्रकारे जीवस्थान द्वारे ''स्थापना अरहंतांचे' वर्णन केले आहे.

पुढे द्रव्याच्या प्रधानतेने अरहंताचे निरुपण करतात :-

जरवाहिदुक्खरहियं आहारणिहारवज्जियं विमलं ।
सिंहाण खेल सेओ णत्थि दुगुंछा य दोसो य ।।३७।।
दस पाणा पज्जत्ती अट्ठसहस्सा य लक्खणा भणिया ।
गोखीरसंखधवलं मंसं रुहिरं च सव्वंगे ।।३८।।
एरिसगुणेहिं सव्वं अईसयवंतं सुपरिमलामोयं ।
ओरालियं च कायं णायव्वं अरहपुरिसस्स ।।३९।।

जराव्याधिदुःखरहितः आहारनीहारवर्जितः विमलः ।
सिंहाणः खेलः स्वेदः नास्ति दुर्गन्धः च दोषः च ।।३७।।
दश प्राणाः पर्याप्तयः अष्टसहस्राणि च लक्षणानि भणितानि ।
गोक्षीरशंखधवलं मांसं रुधिरं च सर्वांगे ।।३८।।
ईदृशगुणैः सर्वः अतिशयवान् सुपरिमलामोदः ।
औदारिकश्च कायः अर्हत्पुरुषस्य ज्ञातव्यः ।।३९।।

अर्थ :— अरहंत पुरूषाच्या औदारिक काय अशा प्रकारे होतो - ज्याना जरा, व्याधि आणि रोग यांचे दु:ख नसते. आहार, निहाराने रहित आहे, मलमूत्र, रहित आहे, सिंहाण अर्थात् श्लेष्म, थुंकी, स्वेद आणि दुर्घंद अर्थात् जुगुप्सा, ग्लानी, आणि दुर्गंधी दोष त्यात नाहीत.

त्यात असणारे दशप्राण ते द्रव्यप्राण आहेत, पूर्ण पर्याप्ति आहे. एक हजार आठ लक्षणे आहेत आणि गोक्षीर अर्थात् कपूर अथवा चंदन तसेच शंख जसे त्यात सर्वांग धवल रूधिर आणि मांस आहे ।।३८।।

अशा प्रकारे गुणानी संयुक्त सर्वच देह अतिशय सहित निर्मल आहेत. आमोद अर्थात् सुंगध ज्यांच्यात आहे असे औदारिक देह अरहंत पुरूषांचे आहेत.

भावार्थ :— येथे द्रव्यनिक्षेप समजू नये. आत्म्यापेक्षा निराळे देहाच्या प्रधानतेने 'द्रव्य' अरंहताचे वर्णन केले आहे. ।।३७,३८,३९।।

अशा प्रकारचे द्रव्य अरहंताचे वर्णन केले आहे.

मयरायदोसरहिओ कसायमलवज्जिओ य सुविशुद्धो ।
चित्तपरिणामरहिदो केवलभावे मुणेयव्वो ।।४०।।

मदरागदोषरहितः कषायमलवर्जितः च सुविशुद्धः ।
चित्तपरिणामरहितः केवलभावे ज्ञातव्यः ।।४०।।

अर्थ :— केवलभाव अर्थात् केवलज्ञानरूप एक भाव म्हणजे अरहंत होय. असे जाणावे. मद अर्थात् मानकषायाने होणारा गर्व, राग द्वेष अर्थात् कषायांच्या तीव्र उदयाने होणाऱ्या प्रीति आणि अप्रितिरूप परिणामाने विरहित २५ कषायरूपमल त्यांचे द्रव्यकर्म तसेच त्यांच्या उदयाने होणाऱ्या भावमलाने विरहित म्हणून अत्यन्त विशुध्द आहे, ज्ञानावरण कर्माच्या क्षयोपशमरूप मनाचा विकल्प नाही, अशा प्रकारे केवल एक ज्ञानरूप वीतराग स्वरूप 'भाव अरहंत' जाणावे. ।।४०।।

पुढे भावं याचा विशेष सांगत आहेत :-

सम्मद्दंसणि पस्सइ जाणदि णाणेण दव्वपज्जाया ।
सम्मत्तगुणविशुद्धो भावो अरहस्स णायव्वो ।।४१।।

सम्यग्दर्शनेन पश्यति जानाति ज्ञानेन द्रव्यपर्यायान् ।
सम्यक्त्वगुणविशुद्धः भावः अर्हतः ज्ञातव्यः ।।४१।।

अर्थ :— 'भावअरहंत' सम्यग्दर्शनाने ते आपल्याला तसेच सर्वांना 'सत्तामात्र' पाहातात. अशा प्रकारे ज्यांना केवलज्ञान आहे, ज्ञानाने सर्व पर्यायाना जाणतात अशा प्रकारे ज्याना केवलज्ञान आहे, ज्याना सम्यक्त्वगुणाने विशुध्द क्षायिक सम्यक्त्व प्राप्त होते अशा प्रकारचा अरहंताचा भाव जाणावा

<u>भावार्थ :</u>— अरहंतपणा घातिया कर्माच्या नाशाने प्राप्त होतो. मोहकर्माच्या नाशाने सम्यक्त्व आणि कषायाच्या अभावाने परमवीतरागता सर्व प्रकारेची निर्मलता प्राप्त होते. ज्ञानावरण, दर्शनावरण, कर्माच्या नाशाने अनंतदर्शन अनंतज्ञान प्रकट होते. यामुळें सर्वद्रव्य पर्यायाना एका समयात प्रत्यक्ष पाहातात, जाणतात. सहा द्रव्यें आहेत त्यातील जीवद्रव्याची संख्या अनंतानंत आहे. पुद्‌गल द्रव्य त्यापेक्षा अनंतानंतपट आहेत, आकाशद्रव्य एक आहे ते अनंतानंत प्रदेशी आहे. त्यांच्या मध्ये सर्व जीव पुद्‌गल, असंख्यात प्रदेशी स्थित आहेत. एकधर्म द्रव्य, एक अधर्मद्रव्य हे दोन्ही असंख्यात प्रदेशी आहेत. त्यामुळे आकाशाचे लोक अलोक असे भेद आहेत. त्या लोकातच कालद्रव्याचे असंख्यात कालाणु स्थित आहेत. या सर्व द्रव्य परिणाम स्वरूप पर्याय आहेत. ते एक एका द्रव्याचे अनंतानंत आहेत. त्याला कालद्रव्याचा परिणाम निमित्त आहे. त्यांच्या निमित्ताने क्रमरूप होणारा समयादिक 'व्यवहारकाल' म्हणवला जातो. याच्या गणनेने अतीत, अनागत, वर्तमान द्रव्यांचे पर्याय अनंतानंत आहेत. या सर्व द्रव्यपर्यायाना अरहंताचे दर्शन-ज्ञान एक समयात पाहातो, जाणतो म्हणून अरहंताना सर्वदर्शी- सर्वज्ञ म्हणतात ||

<u>भावार्थ :</u>— अशा प्रकारे अरहंताचे निरूपण १४ गाथे मध्ये केले आहे पहिल्या गाथेत नाम, स्थापना,द्रव्य,भाव, गुण पर्यायासहित च्यवन आगति, संपत्ति हे भाव अरहंताचे वर्णन करतात. हे सर्व वर्णन नामादि कथनात आले आहे. त्याचा संक्षेप भावार्थ लिहितात :-

<u>गर्भकल्याणक :</u>— पहिले गर्भ कल्याणक असते, गर्भात येण्याच्या ६ महिने अगोदर इंद्राने पाठवलेले कुंबेर ज्या राज्याच्या राणीच्या गर्भात तीर्थंकर येणार असतात त्या शहराची शोभा वाढवतात. रत्नमयी, सुर्वणमयी मंदिर बनवले जाते. नगराचे तट, खंदक, दरवाजे, सुंदरबन, उपवनाची रचना करतात सुंदर वेशातील नरनारी शहरात दिसतात. राजमंदिरावर नित्य रत्नांची वर्षा होते तीर्थंकरांचा जीव जेंव्हा मातेच्या गर्भात येतो तेव्हा मातेला सोळा स्वप्ने पडतात. रूचकवरद्विपात राहणाऱ्या देवांगना मातेची नित्यसेवा करतात. असे ९ महिने पुरे झाल्यानंतर प्रभूचे तीन ज्ञान आणि १० अतिशयासहित जन्म होतो. तेव्हा तिन्ही लोकात आनंदी आनंद होतो. देवानी न वाजवता ही वाद्ये वाजूं लागतात. इंद्राचे आसन कपित होते. तेव्हा प्रभुचा जन्म झाला असे जाणून स्वर्गातून इंद्र ऐरावत हत्तीवर बसून येतात. सर्व चार प्रकारचे देव देवी एकत्र होवून येतात. शची (इंद्रायणी) मातेच्या जवळ जावून गुप्तरूपाने प्रभुला घेवून येतात इंद्र हर्षित होवून हजारो नेत्राने पाहातात.

नंतर सौधर्म इंद्र बालकशरिरी भगवंताना आपल्या मांडित घेऊन ऐरावत हत्तीवर बसून मेरूपर्वतावर जातात, ईशान इंद्र छत्र धारण करतात. सनतकुमार, महेंद्रइन्द्र, चौरी ढाळतात. मेरूपर्वतावरील पाडूंकवनातील पांडूक शिलावर सिंहासनावर प्रभुना विराजमान करतात. सर्व देव क्षीर समुद्रातून १००८ कलशात जल घेवून देव, देवांगना, गीत नृत्य, वादने मोठ्या उत्साहात प्रभूच्या मस्तकावर कलश दाळून जन्मकल्याणकाचा अभिषेक करतात, नंतर श्रृंगार, वस्त्र, आभूषणे, घालून मातेच्या मंदिरात नेवून मातेकडे सोपवतात. इंद्रादिक देव आपल्या आपल्या स्थानावर जातात आणि कुबेर सेवेसाठी थांबतात.

त्यानंतर कुमार अवस्था तसेच राज्य अवस्था भोगतात त्यातच मनोवांछित भोग, भोगून पुन्हां कांही वैराग्याचे कारण पाहून संसार, देह, भोगापासून विरक्त होतात. तेव्हा लौकान्तिक देव येवून, वैराग्य

www.vitragvani.com



वाढवणारे प्रभूची स्तुती करतात, मग इंद्र येवून 'तपकल्याणक' करतात. पालखीत बसवून मोठ्या उत्सवाने वनांत घेवून जातात. तेथे पवित्र शिलेवर बसून पंचमुठीने लोच (केश) करून पंचमहाव्रताचा अंगिकार करतात. समस्त परिग्रहाचा त्याग करून दिंगबररूप धारण करून ध्यान करतात. त्याच वेळी मन:पर्याय ज्ञान उत्पन्न होते. पुन्हा कांहीं काल व्यतीत झाल्यानंतर तपाच्या बलाने घाति कर्माच्या प्रकृति ४७, तसेच १६५ कर्म प्रकृति अशा प्रकारे ६३ प्रकृतिचा सत्तेतून नाश करून केवलज्ञान उत्पन्न करून अनंतचतुष्टयरूप होवून क्षुधादिक १८ दोषाने रहित अरहंत होतात.

पुन्हा इन्द्र येवून समवसरणाची रचना करतात, ती आगमोक्त, अनेक शोभेसहित, मणिसुवर्णमयीकोट, खंदक, वेदी चारी दिशेला चार दरवाजे मानस्तंभ, नाट्यशाला, वन आदि अनेक रचना करतात. त्याच्या मध्यें सभामंडपात १२ सभा, त्यात मुनि, आर्थिका, श्रावक, श्राविका, देव, देवी, तीर्थंच बसतात. प्रभुचे अनेक अतिशय प्रकट होतात. सभामंडपामध्ये तीन पीठावर गंधकुटि मध्यें सिंहासनावर कमळावरती अंतरीक्ष प्रभु विराजमान होतात आणि आठ प्रातिहार्यांने युक्त होतात. वाणी खिरते ती अैकून गणधर द्वादशांग शास्त्र रचतात. अशा केवल कल्याणकादि उत्सव इंद्र करतात. नंतर प्रभू विहार करतात. त्याचा मोठा उत्सव देव करतात. कांही कालानंतर आयुष्याचे दिवस थोडे राहिल्यानंतर योगनिरोध करून अघाति कर्माचा नाश करून मुक्तिला प्राप्त होतात. तत्पश्चात् शरीराचा अग्निसंस्कार करून इंद्र उत्सवसहित 'निर्वाण कल्याणक' महोत्सव करतो. अशा प्रकारे तीर्थंकर पंचकल्याणाची पूजा प्राप्त करून अरहंत होवून निर्वाणाला प्राप्त होतो. असे जाणावे ।।४१ ।।

पुढे (११) प्रवज्याचे निरूपण करतात. त्यालाच दीक्षा असे म्हणतात. प्रथम दीक्षेला योग्य स्थान विशेषाला तसेच दीक्षासहित मुनि जेथे आहेत त्याचे स्वरूप सांगतात -

सुण्णहरे तरुहिट्ठे उज्जाणे तह मसाणवासे वा ।
गिरिगुह गिरिसिहरे वा भीमवणे अहव वसिते वा ।।४२।।
[1]सवसासत्तं तित्थं [2]वचचइदा लत्तयं च वुत्तेहिं ।
जिणभवणं अह वेज्झं जिणमग्गे जिणवरा विंति ।।४३।।
पंचमहव्वयजुत्ता पंचिंदियसंजया णिरावेक्खा ।
सज्झायझाणजुत्ता मुणिवरवसहा णिइच्छन्ति ।।४४।।

शून्यगृहे तरुमूले उद्याने तथा श्मसानवासे वा ।
गिरिगुहायां गिरिशिखरे वा, भीमवने अथवा वसतौ वा ।।४२।।
स्ववशासक्तं तीर्थं वचश्चैत्यालयत्रिकं च उक्तैः ।
जिनभवनं अथ वेध्यं जिनमार्गे जिनवरा विदन्ति ।।४३।।
पंचमहाव्रतयुक्ताः पंचेन्द्रियसंयताः निरपेक्षाः ।
स्वाध्यायध्यानयुक्ताः मुनिवरवृषभाः नीच्छन्ति ।।४४।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



अर्थ :— रिकामे घर, वृक्षाचे मूळ, घरटे, उद्यान, वन, श्मशानभूमि, पर्वताची गुंफा पर्वताचे शिखर, भयानकवन, आणि वस्तिका या मध्येच दीक्षित मुनिना राहावे. हे दीक्षेला योग्य स्थान आहे.

स्वाधीन मुनिनि आसक्त जे क्षेत्र जेथे मुनि राहातात त्याला स्ववशासक्त असे म्हणतात. जेथून ते मोक्षाला जातात. अशाप्रकारे तीर्थस्थान आणि वच, चैत्य, आलय, अशाप्रकारे त्रिक जे प्रथम सांगितले आहे अर्थात् आयतन आदिक परमार्थरूप, संयमी मुनि, अरहंत सिद्ध स्वरूप त्यांच्या नांवाचे अक्षररूप मंत्र तथा त्यांच्या आज्ञारूप वाणिला 'वच' असे म्हणतात. तसेच त्यांच्या आकाराप्रमाणे धातु-पाषाणाची प्रतिमा स्थापन करण्याला 'चैत्य' असे म्हणतात आणि ती प्रतिमा तसेच अक्षर मंत्र वाणि ज्यात स्थापित केले जातात अशा प्रकारचे 'आद्द-'मंदिर, यंत्र किंवा पुस्तकरूपात असे वच, चैत्य तसेच जिनभवन अर्थात् अकृत्रिम चैत्यालय मंदिर अशाप्रकारे आयतनादिक त्यांच्या समानच त्यांचा व्यवहार त्यांना जिनमार्गात जिनवर देव 'वेध्य' अर्थात् दीक्षा सहित मुनिंचे ध्यान करण्यायोग्य, चिंतन करण्यायोग्य म्हणतात.

जे मुनि वृषभ अर्थात् मुनिमध्यें प्रधान आहेत त्यांनी सांगितलेल्या शून्यगृहादिक तसेच तीर्थ, नाम मंत्र, स्थापनरूप, मूर्ति आणि त्यांचे आलय-मंदिर, पुस्तक आणि अकृत्रिम जिन मंदिर (त्यांची निश्चयाने इष्ट करतात.) यांची श्रद्धा करतात. रिकाम्या घरात राहातात, आणि तीर्थ आदिचे ध्यान, चिंतन करतात तसेच दुसऱ्याना तेथे दीक्षा देतात. येथे णिइच्छंति चा अर्थ णइच्छंति अशाप्रकारे ही आहे. त्याचा वक्रोक्तिद्वारा तर अशाप्रकारे अर्थ होतो की, जे कांही इष्ट करत नाहीत ? अर्थात् करतात एका टीकेमध्ये असा अर्थ केला आहे कीं, असे शून्यगृहादिक तसेच तीर्थादिला स्ववशासक्त अर्थात् स्वेच्छाचारी, भ्रष्टाचारी, द्वारे आसक्त होणे तर ते मुनिप्रधान इष्ट करणार नाहीत, तेथे राहिले नाहीत, कसे आहेत ते मुनिप्रधान ? पांच महाव्रत संयुक्त आहेत. पांच इंद्रियाला भल्याप्रकारे जिंकणारे आहेत, निरपेक्ष आहेत, कोणत्याही प्रकारच्या वांछेने मुनि झाले नाहीत, स्वाध्याय आणि ध्यानयुक्त आहेत कांही शास्त्रे वाचतात, शिकवतात कांही 'धर्म' शुल्कध्यान करतात.

भावार्थ :— येथे दीक्षायोग्य स्थान तसेच दीक्षासहित, दीक्षा देणाऱ्या मुनिंचा तसेच चिंतनयोग्य व्यवहाराचे स्वरूप सांगितले आहे. ।।४२,४३,४४।।

(११) पुढे प्रव्रज्याका स्वरूप सांगतात :—

**गिहगंथमोहमुक्का वावीसपरीषहा जियकषाया ।**
**पावारंभविमुक्का पव्वज्जा एरिसा भणिया ।।४५।।**

**गृहग्रंथमोहमुक्ता द्वाविंशतिपरीषहा जितकषाया ।**
**पापारंभविमुक्ता प्रव्रज्या ईदृशी भणिता ।।४५।।**

अर्थ :— गृह (घर) आणि ग्रंथ (परिग्रह) या दोन्हीमुळे मुनि तर मोह, ममत्व इष्ट, अनिष्ट, बुद्धिने रहितच आहे. ज्यात २२ परिषह सोसावे लागतात. कषायाना जिंकावे लागते आणि पापरूप आरंभाने रहित आहे अशा प्रकारचे जिनेश्वर देवाने प्रव्रज्या चे वर्णन केले आहे.

१. सं. प्रतिमें 'सवसा' सतं अशी दोन पदे केली आहेत ज्याची सं. स्ववशा सत्त्वं लिहिले आहे.
२. वचचइदालत्तयं याची ही दोन पदें किती आहे. 'वच:' चैत्यालयं ।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



<u>भावार्थ :</u>— जैन दीक्षेमध्यें कोणत्याही प्रकारचा परिग्रह नाही. संसाराचा मोह नाही. ज्यात २२ परिषह सोसणे, तसेच कषायाना जिंकणे प्राप्त केले जाते. आणि पापारंभाचा अभाव केला जातो. अशाप्रकारे 'अन्यमता' मध्यें नाही. ।।४५।।

पुढे आणखी सांगतात :—

धणधण्णवत्थदाणं हिरण्णसयणासणाइ छत्ताइं ।
कुद्दाणविरहरहिया पव्वज्जा एरिसा भणिया ।।४६।।

धनधान्यवस्त्रदानं हिरण्यशयनासनादि छत्रादि ।
कुदानविरहरहिता प्रव्रज्या ईदृशी भणिता ।।४६।।

<u>अर्थ :</u>— धन, धान्य, वस्त्र यांचे दान, हिरण्य अर्थात् रूपे, सोने आदि, शय्या, आसन, छत्र, चामरादिक आणि क्षेत्रादि कुदाना पासून रहित असे 'प्रव्रज्या' चे वर्णन केले आहे.

<u>भावार्थ :</u>— अन्यमताप्रमाणे बहुतेक अशाप्रकारे 'प्रव्रज्या'चे वर्णन करतात :— गौ, धन, धान्य, वस्त्र, सोने, रूपे, (चांदी) शयन, आसन, छत्र, चामर आणि भूमि यांचे दान करणे म्हणजे 'प्राव्रज्य' याचा या गाथेमध्यें निषेध केला आहे त्यांना कसली प्रव्रज्या ? हे तर गृहस्थाचे कर्म आहे, गृहस्थाला ही या वस्तुच्या दानाने विशेष पुण्य लाभत नाही, कारण त्यात पाप जास्ती आहे पुण्य कमी आहे त्यामुळें पापकर्म जास्ती केल्याने गृहस्थाला काहींच लाभ नाही. ज्यात जास्ती लाभ असेल तेच काम करण्यायोग्य आहे. दीक्षा तर या सर्व वस्तुनी रहितच आहे. ।।४६।।

पुढे पुन्हा म्हणतात :—

सत्तूमित्ते य समा पसंसणिंदाअलद्धिलद्धिसमा ।
तणकणए समभावा पव्वज्जा एरिसा भणिया ।।४७।।

शत्रौ मित्रे च समा प्रशंसानिन्दाऽलब्धिलब्धिसमा ।
तृणे कनके समभावा प्रव्रज्या ईदृशी भणिता ।।४७।।

<u>अर्थ :</u>— ज्यांच्यात शत्रू मित्रा मध्यें समभाव आहे, प्रशंसा-निंदेमध्ये, लाभ-अलाभाम आहे आणि तृण-कंचना मध्यें समभाव आहे त्याना 'प्रव्रज्या' म्हटले आहे.

<u>भावार्थ :</u>— जैन दीक्षेमध्यें राग, द्वेषाचा अभाव आहे, शत्रू-मित्र, निंदा-प्रशंसा, लाभ-अलाभ आणि तृण-कंचन (सोने) यात समभाव आहे. जैन मुनिंची दीक्षा अशा प्रकारेच होते.

पुढे पुन्हा सांगत आहेत :—

उत्तममज्झिमगेहे दारिद्दे ईसरे णिरावेक्खा ।
सव्वत्थ गिहिदपिंडा पव्वज्जा एरिसा भणिया ।।४८।।

उत्तममध्यमगेहे दरिद्रे ईश्वरे निरपेक्षा ।
सर्वत्र गृहीतपिंडा प्रव्रज्या ईदृशी भणिता ।।४८।।

www.vitragvani.com



अर्थ :— उत्तम गेह, अर्थात सुशोभित राजभवनादि आणि मध्यमगेह अर्थात् शोभारहित सामान्य लोकांचे घर यांच्यात तसेच दरिद्री-धनवान् यांच्यात निरपेक्ष अर्थात् इच्छारहित आहेत, योग्य जागी आहार ग्रहण करतात त्यानाच 'प्रव्रज्या' असे म्हणतात.

भावार्थ :— मुनि दीक्षासहित असतात आणि आहार घेण्यासाठी जातात तेंव्हा अशा प्रकारचा विचार करत नाहीत कीं, छोट्या घरी जायचे कीं, मोठ्या घरी जायचे अथवा धनवानाच्या घरी जायचे कीं, दरिद्री माणसाकडे जायचे ! अशा प्रकारे वांछारहित, निर्दोष आहाराची योग्यता असेल तेथे सर्व ठिकाणी आहार घेतात, अशा प्रकारची दीक्षा आहे. ।।४८।।

पुढे पुन्हा सांगत आहेत :—

णिग्गंथा णिस्संगा णिम्माणासा अराय णिद्दोसा ।
णिम्मम णिरहंकारा पव्वज्जा एरिसा भणिया ।।४९।।

निर्ग्रंथा निःसंगा निर्मानाशा अरागा निर्द्वेषा ।
निर्ममा निरहंकारा प्रव्रज्या ईदृशी भणिता ।।४९।।

अर्थ :— कशी आहे प्रव्रज्या ? निर्ग्रंथस्वरूप आहे, परिग्रहाने रहित आहे. नि:संग अर्थात् ज्यामध्ये स्त्रि: आदि परद्रव्याचा संग-मिलाप नाही ज्यांच्यात मान, कषाय नाहीत, मद रहित आहे, ज्यामध्यें आशा नाही, संसारभोगापासून अलिप्त आहे, ज्यामध्यें रागाचा अभाव आहे, संसार, देह, भोगाची प्रिती नाही निर्द्वेषा म्हणजेच कोणाचा द्वेष नाही. निर्ममा अर्थात् कोणाशी ममत्त्वभाव नाही. निरहंकारा अर्थात् अहंकार रहित आहे, जो काही कर्माचा उदय होतो. त्या प्रमाणेच घडते. अशा प्रकारे जाणल्याने परद्रव्यात कर्तृत्वाचा अहंकार राहात नाही. जसा कर्माचा उदय होतो तसेच घडते अशाप्रकारे जाणल्याने परद्रव्यात कर्तृत्वाचा अहंकार राहात नाही आणि आपल्या स्वरूपाला जाणणेच साध्य आहे त्याना प्रव्रज्या म्हटले आहे.

भावार्थ :— 'अन्यमति' वस्त्र घालणे (भगवे आदि) त्यालाच दीक्षा मानतात. ती दीक्षा नाही. जैन दीक्षा वरीलप्रमाणे सांगितली आहे.

पुढे आणखी सांगत आहेत :—

णिण्णेहा णिल्लोहा णिम्मोहा णिव्वियार णिक्कलुसा ।
णिब्भय णिरासभावा पव्वज्जा एरिसा भणिया ।।५०।।

निःस्नेहा निर्लोभा निर्मोहा निर्विकारा निःकलुषा ।
निर्भया निराशभावा प्रव्रज्या ईदृशी भणिता ।।५०।।

अर्थ :— प्रव्रज्या अशी सांगितली आहे :— नि:स्नेहा ज्याना कोणाचा स्नेह नाही ज्याना परद्रव्याविषयी रागादिरूप, चिकटभाव नाहीत, जे निर्लोभी दुसऱ्याचे घेण्याची ज्यांची इच्छा नाही, जे निर्मोही आहेत,

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



चुकुनही परद्रव्यात आत्मबुद्धि होत नाही, निर्विकार अर्थात् बाह्य, अभ्यन्तर, विकाराने रहित आहेत, ज्याना बाह्यशरीराचा, तसेच वस्त्रआभूषणादिकांचा तसेच अंग, उपांगाचा विकार नाही ज्याना अंतरंग, कामक्रोधादिचा विकार नाही, नि:कलुषा अर्थात् मलिनभाव रहित आहे. आत्म्याला कषाय मलिन करतात म्हणून कषाय ज्यांच्यात नाहीत. निर्भय म्हणजेच ज्यांना कोणत्या प्रकारचे भय नाही. आपल्या स्वरूपाला अविनाशी जाणतो. त्याला कोणाचे भय ? ज्याना कोणत्याही प्रकारे परद्रव्याकडून आशा नाही, आशा तर जेंव्हा कोणत्या वस्तुंची प्राप्ति होत नाही तेंव्हा ती लागून राहाते. परंतु जेथे परद्रव्याला आपले जाणलेच नाही आणि आपल्याला स्व, पर चा फरक समजला तर सर्वकांही प्राप्त झाले. तेव्हा काही प्राप्त करणे बाकी राहात नाही. मग कशाची आशा राहाणार ? अशा ना प्रव्रज्या म्हटले आहे.

भावार्थ :— जैन दीक्षा अशी आहे. 'अन्यमता'मध्ये स्व-पर द्रव्याचे भेद ज्ञान नाही, त्याना अशा प्रकारची दीक्षा कशी असूं शकेल ?

पुढे दीक्षेचे बाह्य स्वरूप सांगत आहेत.

जहजायरूवसरिसा अवलंवियभुय णिराउहा संता ।
परकियणिलयणिवासा पव्वज्जा एरिसा भणिया ॥५१॥

यथाजातरूपसदृशी अवलंबितभुजा निरायुधा शांता ।
परकृतनिलयनिवासा प्रव्रज्या ईदृशी भणिता ॥५१॥

अर्थ :— कशी आहे प्रव्रज्या ? यथाजातरूप सदृशी अर्थात जसे जन्मजात बालकाचे नग्नरूप असते तसे नग्नरूप त्यांचे असते. अवलंबितभुजा जे हात लांब करून (सरळ ठेवून) कायेत्सर्ग ध्यानात उभे राहातात. जे आयुधाविरहित आहेत, शांता अर्थात् जे अंग-उपांगाच्या विकाराने रहित शांत मुद्रा असते. परकृतनिलय-निवासा अर्थात् जे दुसऱ्यानी बांधलेल्या निवासात, वसतीके मध्यें राहातात असे 'प्रव्रज्या' चे वर्णन केले आहे.

भावार्थ :— 'अन्यमती' कित्येक लोक बाह्यत: वस्त्रादिक ठेवतात, कितीतरी आयुधे ठेवतात, काही सुखासाठी आसन, वाहन ठेवतात, कांही उपाश्रय आदि राहाण्याचे निवास बनवून त्यात राहातात आणि स्वत:ला दीक्षा सहित मानतात, ते वेषधारण करतात. जिन दीक्षा तर जशी सांगितली तशीच आहे.

पुढे पुन्हा सांगतात :—

उवसमखमदमजुत्ता सरीरसंक्कार वज्जिया रुक्खा ।
मयरायदोसरहिया पव्वज्जा एरिसा भणिया ॥५२॥

उपशमक्षमदमयुक्ता शरीरसंस्कार वर्जिता रूक्षा ।
मदरागदोषरहिता प्रव्रज्या ईदृशी भणिता ॥५२॥

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



अर्थ :— कशी आहे प्रव्रज्या ? उपशमक्षमदमयुक्ता अर्थात् उपशम तर मोहकर्माच्या उदयाचा अभावरूप शांतपरिणाम आणि क्षमा अर्थात् क्रोधाच्या अभावरूप उत्तमक्षमा तसेच दम अर्थात् इंद्रियानी विषयामध्यें रमू नये अशा भावानीयुक्त, शरीरसंस्कार वर्जित, म्हणजे स्नानादि करून शरीर सजवण्यापासून रहित ज्यात रूक्ष अर्थात् तेल आदिका मर्दन न करणे मद, राग, द्वेष रहित आहेत ते प्रव्रज्या म्हटले आहेत.

भावार्थ :— अन्यमताचे वेषधारी क्रोधादिरूप परिणमतात, शरीराला सजवून सुंदर ठेवतात, इंद्रियांच्या विषयांचे सेवन करतात तरीही आपल्या स्वत:ला दीक्षित मानतात ते तर गृहस्थासारखेच आहेत. अतीत (यति) म्हणवून उलट मिथ्यात्वाला दृढ करतात; ज्या प्रकारे जैन दीक्षा सांगितली आहे ती सत्यार्थ आहे. त्याचा अंगीकार करावा तेच सच्चे यति आहे. ॥५२॥

पुढे पुन्हा सांगतात :—

**विवरीयमूढभावा पणट्ठकम्मट्ठ णट्ठमिच्छत्ता ।**
**सम्मत्तगुणविसुद्धा पव्वज्जा एरिसा भणिया ॥५३॥**

विपरीतमूढभावा प्रणष्टकर्माष्टा नष्टमिथ्यात्वा ।
सम्यक्त्वगुणविशुद्धा प्रव्रज्या ईदृशी भणिता ॥५३॥

अर्थ :— कशी आहे प्रव्रजा ? ज्यांचा मूढभाव, अज्ञानभाव विपरीत झाला आहे दूर झाला आहे, अन्यमती आत्म्याचे स्वरूप सर्वथा एकांताने अनेक प्रकारे भिन्न भिन्न सांगून वाद करतात. त्यांच्या आत्म्याच्या स्वरूपात मूढ भाव आहे. जैनमुनिना अनेकांताने सिद्ध केलेले यथार्थज्ञान आहे म्हणून त्यात मूढ भाव नाही. ज्यातून आठकर्म आणि मिथ्यात्वादि नष्ट झाले आहेत. ॥५३॥

पुढे पुन्हा सांगत आहेत :—

**जिणमग्गे पव्वज्जा छहसंहणणेसु भणिय णिग्गंथा ।**
**भावंति भव्वपुरिसा कम्मक्खयकारणे भणिया ॥५४॥**

जिनमार्गे प्रव्रज्या षट्संहननेषु भणिता निर्ग्रंथा ।
भावयंति भव्यपुरुषाः कर्मक्षयकारणे भणिता ॥५४॥

अर्थ :— प्रव्रज्या जिनमार्गात सहा संहननवाले जीव सांगितले आहेत. निर्गंथ स्वरूप आहेत, सगळे परिग्रहाने रहित यथाजात स्वरूप आहेत. याना भव्य पुरूषच म्हटले जाते. अशा प्रकारची प्रव्रज्या कर्माच्या क्षयाचे कारण म्हटले आहे.

भावार्थ :— वज्रऋषभनाराच आदि सहा शरीराचे संहनन सांगितले आहेत त्या सर्वात दीक्षा घेणे सांगितले आहे. जे भव्य पुरूष आहेत ते कर्मक्षयाचे कारण समजून त्याचा अंगिकार करा. अशा प्रकारे असे नाही कीं,

दृढ संहनन वज्रऋषभ मध्येच फक्त आहे आणि त्यातच दीक्षा होते आणि असंसृपाटिक संहननात होत नाही, अशा प्रकारे निर्ग्रंथरूप दीक्षा तर असंप्राप्तासृपाटिका संहननात ही होते. ।।५४।।

पुढे पुन्हा सांगतात :—

तिलतुसमत्तणिमित्तसम वाहिरगंथसंगहो णत्थि।
पव्वज्ज हवइ एसा जह भणिया सव्वदरसीहिं ।।५५।।

तिलतुषमात्रनिमित्तसमः बाह्यग्रंथसंग्रहः नास्ति ।
प्रव्रज्या भवति एषा यथा भणिता सर्वदर्शिभिः ।।५५।।

अर्थ :— ज्या प्रव्रज्येमध्यें तिळतुषमात्र ही अंतरंग परिग्रह आणि बाह्य परिग्रहाचा संग्रह नाही अशा प्रकारे सर्वज्ञदेवाने 'प्रव्रज्या' चे वर्णन केले आहे. अशाच प्रकारची 'प्रव्रज्या' असते अन्य कोणत्याही प्रकारची नाही असे नियमाने जाणावे. श्वेताम्बर आदि सांगतात की, अपवादमार्गात वस्त्रादिकचा संग्रह साधूसाठी सांगितला आहे तो सर्वज्ञाच्या सूत्रात सांगितला नाही. त्यानी कल्पित सूत्रें बनविली आहेत, तो कालदोष आहे.

पुढे पुन्हां सांगतात :—

उवसग्गपरिसहसहा णिज्जणदेसेहि णिच्च अत्थेइ ।
सिल कट्ठे भूमितले सव्वे आरूहइ सव्वत्थ ।।५६।।

उपसर्गपरीषहसहा निर्जनदेशे हि नित्यं तिष्ठति ।
शिलायां काष्ठे भूमितले सर्वाणि आरोहति सर्वत्र ।।५६।।

अर्थ :— उपसर्ग अर्थात् देव मनुष्य, तीर्यंच आणि अचेतनकृत उपद्रव आणि परिषह अर्थात् दैव कर्मयोगाने आलेले २२ परिषहांचा समभावाने सहन करणे असे प्रव्रज्या मुनि असतात. ते जेथे अन्यजन राहात नाहीत अशा निर्जन वनादि प्रदेशात नेहमी राहातात. तेथे ही शिलातल, काष्ठ, भूमितलावर राहातात या सर्व प्रदेशात बसतात, निद्रा घेतात वनात आणि किंचित्काल नगरात राहातात.

भावार्थ :— जैनदीक्षा घेणारे मुनि उपसर्ग परिषहामध्यें समभाव ठेवतात आणि जेथे निद्रा घेतात, बसतात, तेथे निर्जन प्रदेशात शिला, काष्ठ, भूमिमध्यें बसतात झोपतात अशा प्रकारे जाणावे. अन्यमताप्रमाणे स्वच्छंदी प्रमादीवेषधारण करणारे नसतात.

पुढे आणखी विशेष सांगत आहेत :—

पसुमहिलसंढसंगं कुसीलसंगं ण कुणइ विकहाओ ।
सज्झायझाणजुत्ता पव्वज्जा एरिसा भणिया ।।५७।।

पशुमहिलाषंढसंगं कुशीलसंगं न करोति विकथाः ।
स्वाध्यायध्यानयुक्ता प्रव्रज्या ईदृशी भणिता ।।५७।।

www.vitragvani.com



अर्थ :— ज्या प्रव्रज्यामध्यें पशु-तिर्यंच, महिला (स्त्री), षंढ (नपुंसक) यांचा संग तसेच कुशील (व्याभिचारी) पुरूषाचा संग करत नाहीत, स्त्री कथा, राजकथा, भोजनकथा आणि चोर इत्यादिच्या कथा अशा विकथा जे करत नाहीत मग काय करतात ? स्वाध्याय अर्थात् शास्त्र जिनवचनांचे पठण, पाठण आणि ध्यान अर्थात् धर्म-शुल्कध्यान यानी युक्त राहातात अशाप्रकारे प्रव्रज्या जिनदेवानी सांगितली आहे.

भावार्थ :— जिनदिक्षा घेवून कुसंगति करणे, विकथादिक करणे आणि प्रमादि राहिले तर दीक्षेचा अभाव होतो म्हणून कुसंगति निषिद्ध आहे. अन्य वेषधारी प्रमाणे हा वेष नाही. हा मोक्षमार्ग आहे, अन्य सर्व संसार मार्ग आहेत. ।।५७।।

पुढे पुन्हा विशेष सांगत आहेत :—

तववयगुणेहिं सुद्धा संजमसम्मत्तगुणविसुद्धा य ।
सुद्धा गुणेहिं सुद्धा पव्वज्जा एरिसा भणिया ।।५८।।

तपोव्रतगुणैः शुद्धा संयमसम्यक्त्वगुणविशुद्धा च ।
शुद्धा गुणैः शुद्धा प्रव्रज्या ईदृशी भणिताः ।।५८।।

अर्थ :— जिनदेवाने 'प्रव्रज्या' अशा प्रकारे सांगितली आहे कीं, - तप अर्थात् बाह्य, अभ्यन्तर, बाराप्रकारचे तप तसेच व्रत अर्थात् पांचमहाव्रत आणि गुण अर्थात् त्यांच्या उत्तरगुणापेक्षा शुद्ध आहे. 'संयम' अर्थात् इंद्रिय मनाचा निरोध, षट्कायिक जीवांची रक्षा, 'सम्यक्त्व' अर्थात् तत्वार्थश्रद्धानलक्षण निश्चय-व्यवहारूप सम्यक्दर्शन तसेच त्यांचे गुण अर्थात् मूलगुणानी शुद्ध, अतिचाररहित निर्मल आहेत आणि जे 'प्रव्रज्या' चे गुण सांगितले त्यापेक्षा शुद्ध आहेत. नुसता वेष नाही अशाप्रकारे शुद्ध प्रव्रज्या सांगितली जाते. या गुणाशिवाय 'प्रव्रज्या' शुद्ध नाही.

भावार्थ :— तप, व्रत, सम्यक्त्व या सहित आणि ज्यामध्ये त्यांचे मूलगुण तसेच अतिचाराचे शोधने होते. अशाप्रकारे दीक्षा शुद्ध आहे. अन्यवादी तसे श्वेताम्बरादि पाहिजे तसे सांगतात ती दीक्षा शुद्ध नाही. ।।५८।।

पुढे सारांशाने 'प्रव्रज्या' चे कथन करत आहेत.

एवं आयत्तणगुणपज्जत्ता बहुविसुद्धसम्मत्ते ।
णिग्गंथे जिणमग्गे संखेवेणं जहाखादं ।।५९।।

एवं 'आयतनगुणपर्याप्ता बहुविशुद्धसम्यक्त्वे ।
निर्ग्रंथे जिनमार्गे संक्षेपेण यथाख्यातम् ।।५९।।

अर्थ :— अशा प्रकारे पूर्वोक्त पद्धतिने आयतन अर्थात् दीक्षेचे स्थान जे निर्ग्रंथ मुनि त्यांचे गुण जितके आहेत. त्यानी 'पज्जत्ता' म्हणजे परिपूर्ण अन्य जे बहुतेक गुण दीक्षेत असले पाहिजेत ते गुण ज्याच्यांत आहेत अशा प्रकारची 'प्रव्रज्या' जिनमार्गात प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे संक्षेपाने सांगितली आहे. कसा आहे

www.vitragvani.com



जिनमार्ग ? ज्यात सम्यक्त्व विशुद्ध आहे. ज्यात अतिचार रहित सम्यक्त्व प्राप्त केले जाते आणि ते निर्ग्रंथरूप आहे अर्थात् ज्यात बाह्य अंतरंग परिग्रह नाहीत.

**भावार्थ :—** अशा प्रकारे पूर्वोक्त प्रव्रज्या निर्मल सम्यक्त्वसहित निर्ग्रंथरूप जिनमार्गात सांगितली आहे. अन्य नैयायिक, वैशेषिक, सांख्य, वेदान्त, मीमांसक, पातंजली आणि बौद्ध आदिमतामध्ये नाही, ते काल दोषामुळे जैनमतपासून भ्रष्ट झाले आहेत.

अशा प्रकारे प्रव्रज्याचे स्वरूप वर्णन केले आहे :—

पुढे 'बोध पाहुड' सारांशाने सांगत आहेत :—

रूवत्थं सुद्धत्थं जिणमग्गे जिणवरेहिं जह भणियं।
भव्वजणबोहणत्थं छक्कायहियंकरं उत्तं ॥६०॥

रूपस्थं शुद्ध्यर्थं जिनमार्गे जिनवरैः यथा भणितम् ।
भव्यजनबोधनार्थं षट्कायहितंकरं उक्तम् ॥६०॥

**अर्थ :—** ज्यामध्यें अंतरंगाची भाव शुद्धि आहे तसेच जिनमार्गात जिनदेवानी सांगितलेला बाह्यस्वरूप मोक्षमार्ग, षट्कायिक जीवांचे हित करणारामार्ग भव्य जिवांना संबोधून सांगितला आहे.

**भावार्थ :—** या 'बोध पाहूड'मध्यें आयतना पासून प्रव्रज्यापर्यंत ११ स्थळे सांगितली आहेत. यातील अंतरंग स्वरूप जसे जिनदेवानी, जिनमार्गात सांगितले तसेच सांगितले आहे. कसे आहे हे रूप ? षट्कायिक जीवांचे हित करणारे आहे. ज्यात एकेंद्रिय आदि असैनी पर्यंत जीवांच्या रक्षणाचा अधिकार आहे, सैनी पंचेद्रिय जीवांचे रक्षण करतात आणि मोक्षमार्गाचा उपदेश करून संसाराचे दु:ख मिटवून मोक्षाला प्राप्त करतो. अशा प्रकारचे मार्ग (उपाय) भव्य जीवाना संबोधनासाठी सांगितले आहेत. जगातील प्राणी अनादि कालापासून मिथ्यामार्गात प्रवर्तन करून संसारात भ्रमण करतात, म्हणून दु:ख दूर करण्यासाठी आयतन आदि ११ स्थाने धर्माच्या ठिकाणाचा आश्रय घेतात, अज्ञानी जीव या स्थानावर अन्यथा स्वरूप स्थापित करून त्यापासून सुख घेवू इच्छितात, तशा पद्धतिने सुख कसे मिळू शकेल ? म्हणून आचार्य दयाळू होवून जसे सर्वज्ञानी सांगितले तसेच आयतन आदिचे स्वरूप संक्षेपाने सांगत आहेत. हे वाचा, अभ्यास करा. अशा प्रकारे केल्याने वर्तमानात सुखी राहाल, आणि आगामी संसार दु:खातून सुटुन परमानंदस्वरूप मोक्षाला प्राप्त करा. अशाप्रकारे आचार्य सांगत आहेत.

या बोधपाहुडामध्यें व्यवहारधर्माच्या प्रवृत्तिची ११ स्थाने सांगितली आहेत. हे षट्कायिक जीवांचे हित करणारे आहेत. ते अन्यमती हे अन्यप्रकारे स्थापन करून वर्तन करतात ते हिंसारूप आहेत, जीवांचे हित करणारे नाहीत. ही ११ स्थाने संयमी मुनि आणि अरहंत, सिद्धच म्हटले आहे. हे तर षट्कायिक जीवांचे हित करणारे आहेत म्हणून पूज्य आहेत. हे सत्य आहे कीं, जेथे ते राहातात जसे आकाशाचे प्रदेशरूप

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

क्षेत्र तसेच पर्वताची गुंफा वनादिक तसेच अकृत्रिमचैत्यालय हे स्वयमेव बनलेले असतात. त्यांना ही प्रयोजन आणि निमित्त विचार उपचारमात्रेने षट्कायिक जीवाचे हितचिंतक म्हटले तर त्याला विरोध नाही. कारण कीं, हे प्रदेश जड़ आहेत, हे बुद्धिपूर्वक कोणाचे चांगले, वाईट करत नाहीत. तसेच 'जड़' ला सुख दु:ख आदि फलाचा अनुभव नाही. म्हणून ते ही व्यवहाराने पूज्य आहेत कारण कीं, अरहंतादिक जिथे राहातात ते क्षेत्र निवास आदिक प्रशस्त आहेत. म्हणून त्या अरहंतादिच्या आश्रयाने क्षेत्रादिक ही पूज्य आहेत. परंतु प्रश्न असा आहे कीं, गृहस्थ जिनमंदिर बनवतात, वस्तिका, प्रतिमा बनवतात आणि प्रतिष्ठा पूजा करतात त्यात षट्कायिक जीवांची विराधना होते या उपदेशाची, प्रवृत्तिची बाहुल्यता कशी आहे ?

याचे समाधान अशाप्रकारे करतात कीं, गृहस्थ, अरहंत, सिद्ध मुनिंचे उपासक आहेत. हे जिथे साक्षात् आहेत तेथे त्यांची वंदना, पूजन करतात जेथे हे साक्षात् नाहीत तेथे परोक्ष संकल्प करून वंदना, पूजन करतो तसेच त्यांचे राहाण्याचे क्षेत्र तसेच ते मुक्त झाले त्या क्षेत्रात तसेच अकृत्रिम चैत्यालयात त्यांचा संकल्प करून वंदना आणि पूजन करतात. यात अनुराग विशेष सूचित होतो. पुन्हा त्यांची मुद्रा, प्रतिमा तदाकार बनवून त्याचे मंदिर बनवून प्रतिष्ठा करून स्थापित करतात, नित्यपूजन करतात यात अत्यन्त अनुराग सूचित होतो. त्या अनुरागामुळें विशिष्ठ पुण्यबंध होतो आणि त्या मंदिरात षट्कायिक जीवांचे हिताच्या रक्षणाचा उपदेश दिला जातो. तसेच निरंतर अैकणारे आणि धारण करणारे यांची अहिंसा धर्माची श्रद्धा दृढ होते. तसेच त्यांची तदाकार प्रतिमा पाहाणाऱ्यांचे भाव शांत होतात, ध्यानमुद्रेचे स्वरूप समजले जाते आणि वीतराग धर्माविषयी अनुराग उत्पन्न झाल्याने पुण्यबंध होतो. म्हणून याना ही षट्कायिक जीवांचे हित करणारे उपचाराने म्हटले जाते.

जिनमंदिर वस्तिका प्रतिमा बनवण्यात तसेच पूजा प्रतिष्ठा करण्यात काही हिंसा होते. असा आरंभतर गृहस्थाचे कार्य आहे, यात गृहस्थाला अल्प पाप म्हटले आहे, आणि पुण्य खूप म्हटले आहे, कारण कीं, गृहस्थी जीवनात न्याय कार्य करून, न्यायपूर्वक धन उपार्जन करणे, राहाण्यासाठी घर बनवणे, विवाहादिक करणे, आणि यत्नपूर्वक आरंभ करून, आहारादिक स्वत: बनवणे तसेच खाणे इत्यादिक कार्यात जरी हिंसा होते तरी ही गृहस्थाला त्याचे महापाप लागत नाही. गृहस्थाला तर महापाप, मिथ्यात्वाचे सेवन करणे अन्याय, चोरी आदिने धनउपार्जन करणे, त्रस जीवाना मारून मांस आदि अभक्ष्य खाणे आणि परस्त्री सेवन करणे हे महापाप आहे.

गृहस्थाचार सोडून मुनि होवून जावे तेंव्हा गृहस्थाचे न्याय कार्य ही अन्यायच आहे . मुनिंची ही आहारादि प्रवृत्ति मध्यें काहीं हिंसा होते त्यामुळें मुनिना हिंसक म्हटले जात नाही. तसे ही गृहस्थाला न्यायपूर्वक आपल्या पदाला योग्य आरंभाच्या कार्यात अल्प पापच म्हटले जाते. म्हणून जिनमंदिर वस्तिका आणि पूजा प्रतिष्ठेच्या कार्यात आरंभाचे थोडे पाप आहे. मोक्ष मार्गात प्रवर्तन करणारे त्याना अतिअनुराग होतो. आणि त्यांची प्रभावना करतात त्यांना आहारदानादिक देतात आणि त्यांचे वैयावृत्यादि करतात. हे

सम्यक्त्वाचे अंग आहे आणि महान पुण्याचे कारण आहे, म्हणून गृहस्थाला नेहमी करणे योग्य आहे. गृहस्थ होवून हे कार्य केले नाही तर त्याला धर्मानुराग विशेष नाही असे समजावे.

प्रश्न :— गृहस्थाना ज्या कार्याशिवाय चालणारच नाही असे कार्य करताना धर्म पद्धति प्रमाणे आरंभाचे पाप लागते कां ? सामायिक प्रतिक्रमण प्रौषध आदि करून पुण्य मिळते कां ? तर उत्तर देतात - जरी तुम्ही तसे म्हणाला तरी तुमचे परिणाम त्या जातीचे नाहीत, केवळ बाह्य क्रियेत पुण्य समजू नये वाह्यत: बहुआरंभी परिग्रहीचे मन, सामायिक, प्रतिक्रमण आदि निरारंभ कार्यात विशेष रूपाने लागत नाही, ते अनुभवगम्य आहे, तुम्हाला आपल्या भावांचा अनुभव नाही. केवळ बाह्य सामायिकादि निरारंभ कार्याचा वेष धारण करून बसला तर त्यात विशेष पुण्य नाही. शरीरादिक बाह्य वस्तु तर जड़ आहे, केवळ 'जड़' च्या क्रियेचे फल तर आत्म्याला मिळत नाही. आपले भाव जितक्या अंशाने बाह्य क्रियेत लागतील, तितक्या अंशाने शुभाशुभ फल आपल्याला मिळते, अशा प्रकारे विशिष्ठपुण्य तर भावानुसार आहे.

आरंभी 'परिग्रही' चे भाव तर पूजा, प्रतिष्ठादिक मोठ्या आरंभातच विशेष प्रेमाने लागतात. जे ग्रहस्थाचारातून मोठ्या आरंभाने विरक्त होवून त्याचा त्याग करून आपले पद उंचावतील जेंव्हा गृहस्थाचाराचे मोठे आरंभ सोडतील तेंव्हा धर्मप्रवृत्तिचे मोठे आरंभ ही पदानुसार घटवतील. म्हणजेच मुनि होतील तेंव्हा सर्वच आरंभ करणार नाहीत. म्हणून मिथ्यादृष्टी, बाह्यदृष्टी जे बाह्य कार्यालाच पुण्य-पाप मोक्षमार्ग समजतात. त्यांचा उपदेश ऐकून आपल्याला अज्ञानी होवून चालणार नाही पुण्य पापाच्या बंधात शुभाशुभ भाव प्रधान आहेत आणि पुण्य पाप रहित मोक्षमार्ग आहे. त्यात सम्यग्दर्शनादिकरूप आत्मपरिणाम प्रधान आहेत. धर्मानुराग मोक्षमार्गाचा सहकारी आहे. (आंशिक वीतराग भावासहित) धर्मानुरागाचे तीव्र, मंद या प्रमाणे बरेच भेद आहेत. म्हणून आपले भाव यथार्थपणे ओळखून आपली पदवी, सामर्थ्य ओळखून श्रद्धान, ज्ञान आणि त्यात प्रवृत्त करणे, तसेच आपले चांगले वाईट आपल्या 'भावांच्या' आधीन आहे. बाह्य परद्रव्य तर निमित्त मात्र आहेत. उपादान कारण असेल तर निमित्त सहकार्य करते, आणि उपादान नसेल तर निमित्त काहीही करू शकत नाही असा या बोधपाहुडचा आशय आहे.

हे चांगल्या प्रकारे समजून घेवून आयतनादिक जसे सांगितले तसे आणि त्यांचा बाह्य व्यवहारही चैत्यगृह प्रतिमा , जिनबिंब, जिनमुद्रा, आदिधातु पोषाण पासून बनविलेले तसेच जाणून श्रद्धान आणि प्रवृत्ति करावी. अन्यमती अनेकप्रकारे स्वरूप बिघडवून प्रवृत्ति करतात, ते सर्व कल्पित आहे असे जाणून उपासना करू नये. या द्रव्यव्यवहाराचे प्ररूपण 'प्रव्रज्या'च्या स्थलामध्ये दुसऱ्या गाथेत बिंब 'चैत्यालयत्रिक' आणि जिनभवन हे ही मुनिंचे ध्यान करण्यायोग्य आहे, अशाप्रकारे सांगितले आहे. म्हणून गृहस्थ जेंव्हा याची प्रवृत्ति करतात तेंव्हा ते मुनिंचे ध्यान करण्यायोग्य होतात. म्हणून जे जिनमंदिर, प्रतिमा, पूजा, प्रतिष्ठा आदि सर्वथा निषेध करणारे ते सर्वथा एकान्तिप्रमाणे मिथ्यादृष्टि आहेत. यांची संगति

www.vitragvani.com



करूं नये. (मूलाचार पृ. ४९२ अ-१० गाथा ९६ मध्यें सागितले आहे कीं, श्रद्धाभ्रष्ट आणि मिथ्यात्वादि दोष करणाऱ्या पासून निराळे राहावे असा उपदेश आहे.)

पुढे आचार्य या बोधपाहुडाचे वर्णन पूर्वाचार्यांच्या अशा प्रकारे करणारे सांगत आहेत :—

सद्दवियारो हूओ भासासुत्तेसु जं जिणे कहियं।
सो तह कहियं णायं सीसेण य भद्दबाहुस्स ॥६१॥

शब्दविकारो भूतः भाषासूत्रेषु यज्जिनेन कथितम्।
तत् तथा कथितं ज्ञातं शिष्येण च भद्रबाहोः ॥६१॥

<u>अर्थ :</u>— शब्दांच्या विकाराने उत्पन्न झालेला अशा प्रकारे अक्षररूप भाषा सूत्रामध्यें जिनदेवाने सांगितले, तेच ऐकले, तेच परंपरेने भद्रबाहुनामक पंचमश्रुत केवलीने जाणले आणि आपले शिष्य विशाखाचार्य आदि नां सांगितले. ते त्यानी जाणून घेतले तेच अर्थरूप विशाखाचार्याच्या परंपरेने चालत आले. तोच अर्थ आचार्य सांगतात आम्ही सांगितले आहे, ते आमच्या बुद्धिने कल्पित केलेले नाही असा अभिप्राय आहे. ॥६१॥

पुढे भद्रबाहु स्वामीची स्तुतिरूप वचन सांगतात :—

बारस अंगवियाणं चउदसपुव्वंगविउलवित्थरणं।
सुयणाणि भद्दबाहू गमयगुरू भयवओ जयओ ॥६२॥

द्वादशांगविज्ञानः चतुर्दशपूर्वांग विपुलविस्तरणः।
श्रुतज्ञानिभद्रबाहुः गमकगुरुः भगवान् जयतु ॥६२॥

<u>अर्थ :</u>— भद्रबाहु आचार्य जयवंत होवो ते कसे होते? त्यांना १२ अंगाचे विशेषज्ञाने आहे, १४ पूर्वांचा विपुल विस्तार त्यांनी केला आहे, म्हणून श्रुतज्ञानी समजले जातात. पूर्वभाव ज्ञानासहित अक्षरात्मक श्रुतज्ञान त्यांना होते. त्यांना गमकगुरू म्हणत असत कारण ते सूत्राचा अर्थ जाणून त्याप्रमाणे वाक्यार्थ करत असत म्हणून त्याना 'गमक' म्हणत. ते गुरूमध्यें प्रधान, सुरासुराकडून पूजनीय भगवान होते ते जयवंत होवो. अशा प्रकारे सांगण्यात त्याना स्तुतिरूप नमस्कार केला आहे. येथे (जयति धातु सर्वोकृष्ट अर्थाने घेतला आहे.)

<u>भावार्थ :</u>— भद्रबाहु स्वामी पंचमश्रुतकेवली झाले. त्यांच्या परंपरेने शास्त्राचा अर्थ जाणून हा बोधपाहुड ग्रंथ रचला गेला आहे. म्हणून त्याना अंतिम मंगलासाठी आचार्यांनी स्तुतिरूप नमस्कार केला आहे.

---

विशाखाचार्य- मौर्य सम्राट चंद्रगुप्ताच्या दीक्षा कालात दिले गेलेले नांव आहे.

अशा प्रकारे बोध पाहुड समाप्त होते. ॥६२॥

---

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



* छप्पाय *

प्रथम आयतन[१] दुतिय चैत्यगृह[२] तीजी प्रतिमा[३] ।
दर्शन[४] अर जिनबिंब[५] छठो जिनमुद्रा[६] यतिमा ।।
ज्ञान[७] सातमूं देव[८] आठमूं नवमूं तीरथ[९] ।
दसमूं है अरहंत[१०] ग्यारमू दीक्षा[११] श्रीपथ ।।
इम परमारथ मुनिरूप सति अन्यभेष सब निंद्य है ।
व्यवहार धातुपाषाणमय आकृति इनिकी वंद्य है ।।१।।

* दोहा *

भयो वीर जिनबोध यहु, गौतमगणधर धारि ।
बरतायो *पंचमगुरू, नमूं तिनहिं मद छारि ।।२।।

इति श्री कुंदकुंद स्वामि विरचित बोधपाहुडाच्या पं. जयचंद्र छाबडांच्या देशभाषा वचनिकेचा डॉ. रेखा जैन कृत मराठी भाषा नुवाद समाप्त होत आहे. ।।४।।

१ पंचम गुरू — पांचवे श्रुत केवली भद्रबाहु स्वामी

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



# ✻ अथ भावपाहुड ✻

—: ५ :—

पुढे भावपाहुडाची वचनिका लिहित आहेत :—

✻ दोहा ✻

परमातमकूं वंदिकरि शुद्धभावकरतार ।
करूं भावपाहुडतणीं देशवचनिका सार ।।१।।

अशा प्रकारे मंगलपूर्वक प्रतिज्ञा करून श्री कुन्दकुन्द आचार्यकृत भावपाहुड गाथाबंधाच्या देशभाषा वचनिकेचा मराठी अनुवाद लिहित आहे. प्रथम आचार्य इष्ट नमस्काररूप मंगल करून ग्रंथ करण्याचे प्रतिज्ञा सूत्र सांगत आहेत :-

**णमिऊण जिणवरिंदे णरसुरभवणिंदवंदिए सिद्धे ।**
**वोच्छामि भावपाहुडमवसेसे संजदे सिरसा ।।१।।**

नमस्कृत्य जिनवरेन्द्रान् नरसुरभवनेन्द्रवंदितान् सिद्धान् ।
वक्ष्यामि भावप्राभृतमवशेषान् संयतान् शिरसा ।।१।।

अर्थ :— आचार्य म्हणतात कीं, मी भावपाहुड नावाचा ग्रंथ सांगत आहे. त्या करीतां प्रथम जिनवरेंद्र अर्थात् तीर्थंकर परमदेव तसेच सिध्द अर्थात् अष्टकर्माचा नाश करून सिध्दपदाला प्राप्त झालेले आणि अवशेष संयत अर्थात् आचार्य, उपाध्याय आणि सर्वसाधु अशा प्रकारे पंचपरमेष्ठिला वंदन करून सांगतो. पंचपरमेष्ठी कसे आहेत? नर अर्थात् मनुष्य सुर अर्थात् स्वर्गातील देव, भवनेंद्र अर्थात् पाताळात राहणारे देव आणि इंद्र यांच्याकडून वंदनीय आहेत. ।।

भावार्थ :— आचार्य भावापाहुड ग्रंथ लिहित आहेत. ते भावप्रधान पंचपरमेष्ठिला नमस्कार करतात, कारण कीं, जिनवरेंद्र जे असे आहेत जिनं अर्थात् गुणश्रेणी, निर्जरायुक्त, अशा प्रकारच्या अविरत सम्यक्दृष्टि आदि मध्यें श्रेष्ठ अर्थात् गुणश्रेणी, निर्जरायुक्त, अशा प्रकारच्या अविरत सम्यक्दृष्टि आदि मध्यें श्रेष्ठ अर्थात्

श्रेष्ठगणधरादिमध्यें इंद्र तीर्थंकर परमदेव आहेत त्यांची गुणश्रेणी निर्जरा शुध्दभावाने होते, ते तीर्थंकर भावाच्या फलाला प्राप्त करून घाति कर्माचा नाश करून केवलज्ञान प्राप्त करतात. त्याच प्रमाणे सर्व कर्मांचा नाश करून, परमशुध्दभावाला प्राप्त करतात. त्याच प्रमाणे सर्व कर्मांचा नाश करून, परमशुध्दभावाला प्राप्त करून सिध्द झालेले, आचार्य, उपाध्याय शुध्द भावाचा एकदेश प्राप्त करून पूर्णता स्वत: साध्य करतात तसेच दुसऱ्यांना शुध्दभावाची दीक्षा शिक्षा देतात, अशा प्रकारे साधू सुध्दां शुध्द भाव स्वत: साध्य करतात आणि शुध्द भावाच्या महिमेने तीन लोकीच्या प्राण्याद्वारे पूजण्यायोग्य सांगितले आहेत. म्हणून 'भावप्राभृत'च्या सुरवातीलाच त्याना नमस्कार करतात. मस्तकद्वारे नमस्कार केल्याने यात सर्वांगाचा समावेश होतो. कारण सर्व शरिरांगात 'मस्तक' श्रेष्ठ म्हटले आहे. स्वयं नमस्कार म्हणजेच भाव पूर्वक 'मनवचन'-काय तिन्हींचा ही समावेश असलेला नमस्कार असे जाणावे ॥१॥

पुढे सांगतात कीं, लिंग द्रव्य भावाच्या भेदाने दोन प्रकारचे आहे यात भावलिंग परमार्थ आहे :—

**भावो हि पढमलिंगं ण दव्वलिंगं च जाण परमत्थं ।**
**भावो कारणभूदो गुणदोसाणां जिणा विन्ति ॥२॥**

भावः हि प्रथमलिंगं न द्रव्यलिंगं च जानीहि परमार्थम् ।
भावो कारणभूतः गुणदोषाणां जिना विदन्ति ॥२॥

अर्थ :— भाव: हि प्रथम लिंग आहे, म्हणून हे भव्य ! तू द्रव्य लिंग आहे त्याला परमार्थरूप जाणू नको, कारण कीं, गुण आणि दोषाना कारणभूत 'भाव'च आहेत, अशाप्रकारे जिन भगवान सांगतात :—

भावार्थ :— स्वर्ग, मोक्षादिक मिळणे म्हणजे गुण आणि नरकादि, संसारात असणे दोष आहे. यांचे कारण भगवंतानी 'भावा'नाच म्हटले आहे. कारण कार्याच्या अगोदर असते. येथे मुनि प्रथम द्रव्यलिंगी श्रावक असतात. म्हणून भावलिंगच प्रधान आहे आणि जे प्रधान आहे तोच परमार्थ आहे म्हणून द्रव्यलिंगाला परमार्थ जाणू नये अशा प्रकारे उपदेश केला आहे.

येथे कोणी विचारले कीं, भावस्वरूप काय आहे ? याचे समाधान - भावांचे स्वरूप, ते पुढे म्हणतात या लोकात सहा द्रव्यें आहेत यात जीव आणि पुद्‌गल प्रामुख्याने दिसतात - जीव चेतना स्वरूप आहे आणि पुद्‌गल स्पर्श, रस, गंध, आणि वर्णरूप जड आहे. यांच्या अवस्थेतून अवस्थान्तर होणे अशा परिणामाला 'भाव'असे म्हणतात. जीवाचा स्वभाव तर दर्शन, ज्ञान आहे आणि पुद्‌गल कर्माच्या निमित्ताने ज्ञानात मोह-राग-द्वेष होणे विभाव भाव आहे. पुद्‌गलाचे स्पर्शाचे - स्पर्शान्तर, रसाचे रसान्तर इत्यादि गुणाने गुणान्तर होणे 'स्वभाव भाव' आहे आणि परमाणूने स्कंध होणे तसेच स्कंधापासून अन्य स्कंध होणे आणि जीवाच्या भावाच्या निमित्ताने कर्मरूप होणे हे विभाव भाव आहेत. अशा प्रकारे यांचे परस्पर निमित्त नैमित्तिक भाव होतात.

पुद्‌गल तर जड आहे, यांच्या निमित्ताने सुख दु:खादि भाव होत नाहीत आणि जीव चेतन आहे यांच्या निमित्ताने भाव होतात - त्यामुळे सुख दु:खादि होतात. म्हणून जीवाला स्वभाव भावरूप राहण्याचा आणि नैमित्तिक भावरूप न प्रवर्तण्याचा उपदेश देतात. जीवाचा पद्‌गल कर्माच्या संयोगाने देहादिक

द्रव्यांचा संबंध आहे. या बाह्यरूपाला 'द्रव्य' असे म्हणतात आणि भावांमुळे द्रव्याची प्रवृत्ति होते, अशा प्रकारे द्रव्याची प्रवृत्ति असते. अशा प्रकारे द्रव्यभावाचे स्वरूप जाणून स्वभावात प्रवर्ततात विभावात प्रवर्तन करत नाहीत त्यांना परमानंद सुख प्राप्त होते आणि विभाव राग, द्वेष, मोह,रूप वर्ततात त्यांना त्यामुळे संसारात दु:ख मिळते.

द्रव्यरूप पुद्‌गलाचा विभाव आहे. या संबंधी जीवाला सुख, दु:ख होत नाही म्हणून 'भाव' च प्रधान आहे. असे झाले नसते तर तर केवली भगवंताना ही सांसारिक सुख दु:खाची प्राप्ति झाली असती परंतु असे होत नाही. अशा प्रकारे जीवाचा ज्ञान दर्शन तर स्वभाव आहे आणि राग, द्वेष, मोह हे स्वभाव - विभाव आहेत आणि पुद्‌गलाचे स्पर्शादिक आणि स्कन्धादिक स्वभाव - विभाव आहेत. त्यात जीवाचे हित - अहितभाव प्रधान आहेत. पुद्‌गल द्रव्य प्रधान नाही. बाह्य द्रव्य निमित्त मात्र आहे, उपादाना शिवाय निमित्त कांही करू शकत नाही. हे तर सामान्य रूपाने स्वभावाचे स्वरूप आहे आणि याचे विशेष सम्यक्‌दर्शन ज्ञान, चारित्र तर जीवाचा स्वभाव भाव आहे, यात सम्यक्‌दर्शन भाव प्रधान आहे. या शिवाय सर्व बाह्य क्रिया मिथ्या दर्शन चारित्र आहे. हे विभाव आहेत, हे संसाराला कारण आहेत अशा प्रकारे जाणावे. ।।२।।

पुढे म्हणतात कीं, बाह्य द्रव्य निमित्त मात्र आहे. 'यांचा अभाव' जीवाच्या विशुध्द भावाचे निमित्त आहे. म्हणून बाह्यद्रव्याचा त्याग सांगितला आहे :-

भावविसुद्धिणिमित्तं बाहिरगंथस्स कीरए चाओ।
बाहिरचाओ विहलो अब्भंतरग्रन्थजुत्तस्स ।।३।।

भावविशुद्धिनिमित्तं बाह्यग्रंथस्य क्रियते त्यागः ।
बाह्यत्यागः विफलः अभ्यन्तरग्रन्थयुक्तस्य ।।३।।

अर्थ :— बाह्य परिग्रहाचा त्याग 'भावांची' विशुध्दि करण्यासाठीं केला जातो परंतु रागादिक अभ्यंतर परिग्रह आहेत. ते असतील तर बाह्य परिग्रहाचा त्याग निष्फल आहे ।।

भावार्थ :— अंतरंग भावाच्या त्यागा शिवाय बाह्य त्यागादिकाची प्रवृत्ति निष्फल आहे. हे प्रसिध्द आहे ।।३।।

पुढे म्हणतात कीं, करोडो भवात तप केले तरी ही 'भावा' शिवाय सिध्दि नाही.

भावरहिओ ण सिज्झइ जइ वि तवं चरइ कोडिकोडीओ।
जम्मंतराइ बहुसो लंबियहत्थो गलियवत्थो ।।४।।

भावरहितः न सिद्धयति यद्यपि तपश्चरति कोटिकोटी ।
जन्मान्तराणि बहुशः लंबितहस्तः गलितवस्त्रः ।।४।।

www.vitragvani.com



अर्थ :— जरी कोणी जन्मांतरी पर्यंत करोडो वर्षे हात सरळ ठेवून (कायोत्सर्ग) वस्त्रादिकाचा त्याग करून तपश्चरण केले तरी सुध्दां 'भावारहित' असणाऱ्याना सिध्दि मिळत नाही.

भावार्थ :— भावामध्ये मिथ्यादर्शन, मिथ्याज्ञान मिथ्याचारित्ररूप विभाव रहित सम्यक्दर्शन-ज्ञान-चारित्ररूप, भावप्रधान आहे. आणि यात ही सम्यक् दर्शन प्रधान आहे. कारण कीं, या शिवाय ज्ञान - चारित्र मिथ्या म्हटले आहे. असे जाणावे. ।।४।।

पुढे याच अर्थाला दृढ करत आहेत :-

परिणाममम्मि असुद्धे गंथे मुञ्चेइ बाहरे य जई ।
बाहिरगंथच्चाओ भावविहूणस्स किं कुणइ ।।५।।

परिणामे अशुद्धे ग्रन्थान् मुञ्चति बाह्यान् च यदि ।
बाह्यग्रन्थत्यागः भावविहीनस्य किं करोति ।।५।।

अर्थ :— जर मुनि बनल्यानंतर ही परिणाम अशुध्द ठेवून परिग्रहाला सोडले तर तो बाहय परिग्रहाचा त्याग भावरहित मुनिनां कोणतेही लाभ देणार नाहीत.

भावार्थ :— जे बाहय परिग्रहाला सोडून मुनि बनतात आणि त्यांचे परिणाम परिग्रहरूप अशुध्द असतील, अभ्यंतर परिग्रह सोडलेले नसतील तर बाह्य त्याग कोणतेही कल्याणरूप फल देत नाही. सम्यक्दर्शनादि भाव कर्मनिर्जरारूप कार्याशिवाय होत नाहीत. ।।५।।

पहिल्या गाथे पासून या मध्यें एक विशेषता आहे कीं, जरी मुनिपद ही घेतले आणि परिणाम उज्ज्वल नसतील, आत्मज्ञानाची भावना नसेल तर कर्म कटणार नाहीत. (कर्मक्षय होणार नाही)

पुढे उपदेश करतात कीं, भावाला परमार्थ जाणून त्याचा अंगिकार करा :-

जाणहि भावं पढमं किं ते लिंगेण भावरहिएण ।
पंथिय ! सिवपुरिपंथं जिणउवइट्ठं पयत्तेण ।।६।।

जानीहि भावं प्रथमं किं ते लिंगेन भावरहितेन ।
पथिक शिवपुरीपंथाः जिनोपदिष्टः प्रयत्नेन ।।६।।

अर्थ :— हे शिवपुरीच्या पथिका ! प्रथम 'भाव' जाणून घ्या भावरहित लिंगाशी तुमचे काय प्रयोजन आहे ? शिवपुरीचा (मोक्षाचा) पंथ जिनभगवंताने प्रयत्न साध्य सांगितला आहे.

भावार्थ :— मोक्ष मार्ग जिनेश्वर देवाने सम्यक्दर्शन - ज्ञान - चारित्र, आत्मस्वभारूप परमार्थाने सांगितला आहे, म्हणून याला परमार्थ जाणून अंगीकार करा. केवळ द्रव्यमात्र लिंगाने काय साध्य होणार? अशा प्रकारे उपदेश आहे. ।।६।।

पुढे म्हणतात कीं, द्रव्यलिंगे आदि तू बरेच धारण केले आहेत परंतु त्यामुळे कांहींच सिध्द झाले नाही :-

भावरहिएण सपुरिस अणाइकालं अणंतसंसारे ।
गहिउज्झियाइं बहुसो बाहिरणिग्गंथरूवाइं ।।७।।

भावरहितेन सत्पुरुष ! अनादिकालं अनंतसंसारे ।
गृहीतोज्झितानि बहुशः बाह्यनिर्ग्रंथरूपाणि ।।७।।

<u>अर्थ :</u>— हे सत्पुरुषा! अनादि कालापासून या अनंत संसारातून तूं भावरहित निर्गंथरूप बऱ्याच वेळा ग्रहण केले आणि सोडले.

<u>भावार्थ :</u>— भाव ! जे निश्चय सम्यक्दर्शन ज्ञान-चारित्र्य शिवाय बाह्य निर्गंथरूप द्रव्यलिंग संसारात अनंतकालापासून बऱ्याच वेळा धारण केले आणि सोडले तरी ही काही सिद्ध झाले नाही. चारीगतित भ्रमणच करत राहिला ।।७।।

तेच सांगतात :-

भीसणणरयगईए तिरियगईए कुदेवमणुगइए ।
पत्तोसि तिव्वदुक्खं भावहि जिणभावणा जीव ! ।।८।।

भीषणनरकगतौ तिर्यग्गतौ कुदेवमनुष्यगत्योः ।
प्राप्तोऽसि तीव्रदुःखं भावय जिनभावनां जीव ! ।।८।।

<u>अर्थ :</u>— हे जीव ! तूं भीषण नरक गति तसेच तिर्थंच गति मध्यें आणि कुदेव कुमनुष्यगति मध्ये तीव्र दु:ख प्राप्त केले आहे. म्हणून आता तूं जिन भावना अर्थात् शुध्द आत्मतत्वाची आराधना कर त्यामुळे तुझे संसारातील भ्रमण मिटेल.

<u>भावार्थ :</u>— आत्म्याची आराधना न केल्यामुळे चार गतिचे दु:ख अनादि कालापासून या संसारात प्राप्त केले आहे म्हणून आता हे जीव ! तूं जिनेश्वर देवाला शरण जा आणि शुध्द स्वरूपाचा वेळोवेळी अभ्यास कर त्यामुळे संसार भ्रमणारहित मोक्ष तुला प्राप्त होईल. हा उपदेश दिला आहे ।।८।।

पुढे चार गतिच्या दु:खाचे विशेष रूपाने वर्णन करत आहेत. नरकगतिच्या दु:खाचे वर्णन करतात :—

सत्तसु णरयावासे दारुणभीसाइं असहणीयाइं ।
भुत्ताइं सुइरकालं दुःक्खाइं णिरंतरं सहिय ।।९।।

[1]सप्तसु नरकावासेषु दारुणभीषणानि असहनीयानि ।
भुक्तानि सुचिरकालं दुःखानि निरंतरं सोढानि[2] ।।९।।

www.vitragvani.com



अर्थ :— हे जीव ! तू सात नरक भूमिच्या बिळात अत्यंत दारूण, भयानक असहनीय अर्थात् सहन न होणाऱ्या दु:खाला बराच काळ पर्यंत निरंतर भोगले आहे, सहन केले आहे.

भावार्थ :— सात नरक आहेत त्यात अनेक बिळे आहेत. तेथे १० हजार वर्षांपासून (एक सागर ते ३३ सागर) करडो वर्षापर्यंत आयुष्य आहे. या सर्व आयुष्यात अति तीव्र दु:ख आहे ते हा जीव अनंतकालापासून सहन करत आला आहे. ।।९।।

पुढे तिर्यंचगतिच्या दु:खाचे वर्णन केले आहे :—

खणणुत्तावणवालण वेयणविच्छेयणाणिरोहं च ।
पत्तोसि भावरहिओ तिरियगईए चिरं कालं ।।१०।।

खननोत्तापनज्वालन [1]वेदनविच्छेदनानिरोधं च ।
प्राप्तोऽसि भावरहितः तिर्यग्गतौ चिरं कालं ।।१०।।

अर्थ :— हे जीव ! तू तिर्यंचगति मध्यें खनन, उत्तापन, ज्वलन, वेदन, व्युच्छेदन निरोधन इत्यादि दु:खे सम्यक्दर्शनादि भाव रहित होवून अनेक काल पर्यंत प्राप्त केली आहेत.

भावार्थ :— या जीवाने सम्यक्दर्शनादि भाव नसताना तिर्थंचगति मध्ये चिरकाल पर्यंत दु:ख प्राप्त केले पृथ्वीकाय मध्ये कुदाल आदि दु:ख मिळाले, जल काय मध्यें अग्निने तापणे, इत्यादि दु:खे मिळाली, अग्निकायमध्ये जळणे बुजणे आदि दु:खे मिळाली, विकल त्रयात दुसऱ्याकडून विरोध, अल्पआयुने मरणे इत्यादि दु:खे मिळाली पंचेद्रिय पशु, पक्षी, जलचर आदि मध्यें परस्पर घात तसेच मनुष्यादि द्वारा वेदना, भूक, तृषा, विरोध वध, बंधन, इत्यादि दु:खे मिळाली. अशा प्रकारे तिर्यंचगति मध्यें असंख्यात अनंतकालपर्यंत दु:खे मिळाली ।।१०।।

पुढे मनुष्यगतिच्या दु:खांचे वर्णन करतात :-

आगंतुक माणसियं सहजं सारीरियं च चत्तारि ।
दुक्खाइं मणुयजम्मे पत्तोसि अणंतयं कालं ।।११।।

आगंतुकं मानसिकं सहजं शारीरिकं च चत्वारि ।
दु:खानि मनुजजन्मनि प्राप्तोऽसि अनन्तकं कालं ।।११।।

---

१ मुद्रित संस्कृत प्रतित 'सप्रसु नरकवासे' असा पाठ आहे.

२ मुद्रित संस्कृत प्रतित 'स्वहित' असा पाठ आहे. 'सहिय' याच्या छायेत.

www.vitragvani.com



अर्थ :—_हे जीवा ! तू मनुष्यगतिमध्ये अनंतकाल पर्यंत आगंतुक अर्थात् अकस्मात् वज्रपातदिक होणे, मानसिक इच्छा पूर्ण न होणे, सहज म्हणजे माता पितादि कडून राग द्वेष होणे त्यामुळें वस्तु इष्ट अनिष्ट मानून दु:ख करणे शारिरीक अर्थात् व्याधि, रोगादिक तसेच परकृत छेदन, भेदन, आदि ने होणारे दु:ख ही चार प्रकारची दु:खे अशी अनेक प्रकारची दु:खे प्राप्त केली ।।११ ।।

पुढे देवगतिच्या दु:खाचे वर्णन करतात:-

सुरणिलयेसु सुरच्छरविओयकाले य माणसं तिव्वं ।
संपत्तोसि महाजस दुःखं सुहभावणारहिओ ।।१२।।

सुरनिलयेषु सुराप्सरावियोगकाले च मानसं तीव्रम् ।
संप्राप्तोऽसि महायश ! दुःखं शुभभावनारहितः ।।१२।।

अर्थ :—हे महायश ! सुरनिलयेषु म्हणजेच देवलोका मध्यें सुराप्सरा अर्थात् प्रियदेव आणि प्रिय अप्सराच्या वियोग कालात त्याना वियोगाचे दु:ख तसेच इंद्रियादिक मोठे ऋध्दिधारियाना पाहून आपल्याला हीन मानण्याचे मानसिक तीव्र दु:ख शुभ भावना रहित होवून अनुभवावे लागते.

भावार्थ :— येथे महायश या साठीं म्हटले आहे कीं, जे मुनि निर्ग्रंथ लिंग धारण करतात आणि द्रव्यलिंगी मुनिंची समस्त क्रिया करतात. परंतु आत्म्याचे स्वरूप शुध्दोपयोगाच्या सन्मुख होत नाही. त्याना मुख्यत: असे वाटते कीं, मुनि झाले म्हणजे मोठेच कार्य केले, हे यश लोकात प्रसिध्द झाले परंतु चांगल्या भावनेने शुध्दात्मतत्वाच्या अभ्यासा शिवाय तपश्चरणादि करून स्वर्गात देव ही झालात तरी तेथे ही विषयांचे लोभी होवून मानसिक दु:खाने तप्त होत राहाल ।।१२ ।।

पुढे शुभ भावनेने रहित अशुभ भावनेचे निरूपण करतात :-

कंदप्पनाइयाओ पंच वि असुहादिभावणाई य ।
भाऊण दव्वलिंगी, पहीणदेवो दिवे जाओ ।।१३।।

कांदर्पीत्यादीः पंचापि अशुभादिभावनाः च ।
भावयित्वा द्रव्यलिंगी प्रहीणदेवः दिवि जातः ।।१३।।

---

१ मुद्रित संस्कृत प्रति मध्ये 'वेयण' याचे संस्कृत व्यंजन आहे.

२ देहादि मध्ये किंवा बाह्य संयोगाने दु:ख नाही परंतु आपली भूलरूप मिथ्यात्व रागादि दोषानीच दु:ख होते. येथे निमित्त द्वारा उपादानाचे योग्यतेने ज्ञान करण्यासाठीं हे उपचारित व्यवहार नयाचे कथन आहे.

अर्थ :— हे जीव ! तूं द्रव्यलिंगी मुनि होवून कन्दर्पि आदि पांच अशुभ भावना भावून प्रहीणदेव म्हणजेच नीचदेव होवून स्वर्गात उत्पन्न झाला आहात.

भावार्थ :— कान्दर्पी, किल्विषिकी, संमोही, दानवी, आणि अभियोगिनि या पांच अशुभ भावना आहेत. निर्गंथ मुनि होवून सम्यक्त्वभावने शिवाय या अशुभ भावनेचे भजन केले तर किल्विष आदि नीच देव होवून मानसिक दु:खाला प्राप्त होतो. ॥१३॥

पुढे द्रव्यलिंगी पार्श्वस्थ आदि यांना सांगतात :-

पासत्थभावणाओ अणाइकालं अणेयवाराओ ।
भाऊण दुहं पत्तो कुभावणाभावबीएहिं ॥१४॥

पार्श्वस्थभावनाः अनादिकालं अनेकवारान् ।
भावयित्वा दुःखं प्राप्तः कुभावनाभावबीजैः ॥१४॥

अर्थ :— हे जीव ! तूं पार्श्वस्थ भावनेने अनादि कालापासून अनेक वेळा दु:खाला प्राप्त झाला. दु:ख कां मिळाले? कुभावना, अर्थात् खोटी भावना त्याचा भाव हेच दु:खाचे बीज आहे. त्यामुळे दु:ख प्राप्त झाले.

भावार्थ :— जे मुनि म्हणवतात आणि वास्तिका बांधून आजिविका करतात त्याना पार्श्वस्थ वेषधारी असे म्हणतात. जे कषायी होवून व्रतादिका पासून भ्रष्ट होतात, संघाचा अविनय करतात अशा प्रकारच्या वेषधारिना कुशिल असे म्हणतात. जे ज्योतिष, वैद्यक विद्या मंत्रानी आजीविका करतात राजादिकाची सेवा (सेवक) करतात अशा प्रकारच्या वेषधारिना संसक्त म्हणतात जे जिनसूत्राला प्रतिकूल, चारित्र्याने भ्रष्ट, आळशी अशा प्रकारे वेषधारिला अवसन्न म्हणतात. गुरूचा आश्रय सोडून एकाकी स्वच्छंद प्रवर्तन करतो जिन आज्ञेचा लोप करतो अशा वेषधारिला 'मृगचारी' असे म्हणतात यांची भावना करत राहिले तर तो दु:ख प्राप्त करून घेतो.

असे देव होवून मानसिक दु:ख प्राप्त करून घेतात ते येथे सांगतात :—

देवाण गुण विहूई इड्ढी माहप्प बहुविहं दट्ठुं ।
होऊण हीणदेवो पत्तो बहुमाणसं दुक्खं ॥१५॥

देवानां गुणान् विभूतीः ऋद्धीः माहात्म्यं बहुविधं दृष्ट्वा ।
भूत्वा हीनदेवः प्राप्तः बहु मानसं दुःखम् ॥ १५ ॥

अर्थ :— हे जीव ! तू हीन देव होवून अन्य देवांचे गुण, विभूति आणि ऋध्दिला अनेक प्रकाराने महात्म्य देवून फारच मानसिक दु:खाला प्राप्त होतो.

भावार्थ :— स्वर्गात हीन देव होवून मोठे ऋध्दिधारी देवाचे गुणाचे विभूती पाहातो तसेच देवांगनांचा मोठा परिवार पाहातो आणि आज्ञा, ऐश्वर्य, आदिचे महात्म्य पाहातो तेव्हा मनात विचार करतो कीं, मी पुण्य रहित आहे, हे मोठे पुण्यवान आहेत, त्यांच्याकडे ऋध्दि आहे अशा प्रकारे विचार केल्याने मानसिक दु:ख होते ।।१५।।

पुढे म्हणतात कीं, अशुभभावनेने नीच देव होवून दु:खाला प्राप्त होतात, असे म्हणून हे कथन सारांशाने सांगत आहेत :-

चउविहविकहासत्तो मयमत्तो असुहभावपयडत्थो ।
होऊण कुदेवत्तं पत्तोसि अणेयवाराओ ।।१६।।

चतुर्विधविकथासक्तः मदमत्तः अशुभभावप्रकटार्थः ।
भूत्वा कुदेवत्वं प्राप्तः असि अनेकवारान् ।।१६।।

अर्थ :— हे जीवा ! तू चार प्रकारच्या विकथेमध्यें आसक्त होवून मदाने मत्त आणि ज्याच्या अशुभ भावनेचेच प्रकट प्रयोजन आहे असे होवून अनेक वेळा कुदेवपणाला प्राप्त झाला आहेस.

भावार्थ :— स्त्री कथा, भोजनकथा, देशकथा, आणि राजकथा, या चार विकथामध्यें आसक्त होवून तेथे परिणामाला लावले तसेच जाति आदि ८ मदाने उन्मत्त अशी अशुभ भावना धारण करून अनेक वेळा नीच देवपणाला प्राप्त झाला आणि मानसिक दु:खाला प्राप्त झाला.

येथे हे विशेष जाणणे योग्य आहे कीं, विकथादि ने निच देव ही (खालच्या प्रतिचे) होत नाही. परंतु येथे मुनिनां उपदेश आहे तो मुनिपद धारण करून कांहीं तपश्चरणादिक करून वेषामध्यें विकथेमध्यें रक्त झाल्यामुळे नीच देव होतो. असे जाणावे ।।१६।।

पुढे सांगतात कीं, अशी कुदेव योनि मिळाल्याने तेथून जो मनुष्य तिर्यंच गतित गर्भात येतो त्याची अशी व्यवस्था आहे -

असुईबीहत्थेहि य कलिमलबहुलाहि गब्भवसहीहि ।
वसिओसि चिरं कालं अणेयजणणीण मुणिपवर ।।१७।।

अशुचिबीभत्सासु य कलिमलबहुलासु गर्भवसतिषु ।
उषितोऽसि चिरं कालं अनेकजननीनां मुनिप्रवर ! ।।१७।।

अर्थ :— हे मुनि प्रवर ! तू कुदेव योनितून अनेक मातांच्या गर्भात अनेक काल राहात आला, कशी आहे ती वसती? अपवित्र आहे बिभत्स आहे त्यात कलीमल खूपच आहे म्हणजेच पापरूप मलिन मलाची अधिकता आहे.

www.vitragvani.com



भावार्थ : — येथे मुनिप्रवर असे संबोधन आहे. जो मुनि पद घेवून मुनि मध्यें प्रधान म्हणवतो आणि शुध्दात्मरूप निश्चय चारित्र्याच्या सन्मुख नाही त्याला म्हणतात कीं, बाह्य द्रव्यलिंग तर बऱ्याच वेळा धारण करून चार गतिमध्यें भ्रमण केले, देव झाला तेथून राहून अशा प्रकारच्या मलिन गर्भावासात आला आणि तेथे ही अनेक काळ राहात गेला.

पुढे पुन्हा सांगतात कीं, अशा प्रकारच्या गर्भावासातून निघून जन्म घेवून अनेक मातांचे दूध पित गेला :—

पीत्रोसि थणच्छीरं अणंतजम्मंतराइं जणणीणं ।
अण्णाण्णाण महाजस ! सायरसलिलाहु अहिययरं ॥१८॥

पीतोऽसि स्तनक्षीरं अनंतजन्मांतराणि जननीनाम् ।
अन्यासामन्यासां महायश ! सागरसलिलात् अधिकतरम् ॥१८॥

अर्थ :— हे महायश ! त्या पूर्वोक्त गर्भावासात अन्य अन्य जन्मात अन्य अन्य मातेचे स्तनपान तू केले ते सागरापेक्षा ही जास्ती असेल !

भावार्थ :— जन्मोजन्मी अन्य अन्य मातांचे दूध पान इतके केले आहे कीं, ते एकत्र केले तर समुद्राच्या जलापेक्षा अधिक होईल ! येथे अतिशय चा अर्थ अनेक पट असा घेतला पाहिजे कारण अनंतकालाचे एकत्र केलेले दूध अनंतपट होते ॥१८॥

पुढे पुन्हा सांगतात कीं, जन्म घेवून मरण आले तेंव्हा मातांच्या रडण्याचे अश्रू चे जल सुध्दां तितकेच झाले :-

तुह मरणे दुक्खेण अण्णण्णाणं अणेयजणणीणं ।
रुण्णाण णयणणीरं सायरसलिलाहु अहिययरं ॥१६॥

तव मरणे दुःखेन अन्यासामन्यासां अनेकजननीनाम् ।
रुदितानां नयननीरं सागरसलिलात् अधिकतरम् ॥१९॥

अर्थ :— हे मुने ! तू आईच्या गर्भात राहून जन्म घेवून मृत्यूला सादर झाला तुझ्या त्या मरणामुळें अन्य अन्य मातांच्या रूदनाचे अश्रू एकत्र केले तर समुद्राच्या पाण्यापेक्षा अनंतपट होईल.

पुढे पुन्हा म्हणतात कीं, जितके संसारात जन्म घेतले त्या वेळेचे केश, नखे, नाळ, यांचा ढिग केला तर तो मेरू पर्वतापेक्षा मोठा होईल.

भवसायरे अणंते छिण्णुज्झिय केसणहरणालट्ठी ।
पुञ्जइ जइ को वि जए हवदि य गिरिसमधिया रासी ॥२०॥

भवसागरे अनन्ते छिन्नोज्झितानि केशनखरनालास्थीनि ।
पुञ्जयति यदि कोऽपि देवः भवति च गिरिसमाधिकः राशिः ॥२०॥

www.vitragvani.com



अर्थ :— हे मुने ! या अनंत संसार सागरात तूं जन्म घेतलेस त्या वेळचे केश, नख, नाल, अस्थि यांना एकत्र करून ढीग केला तर ती मेरू पर्वतापेक्षा अधिक राशी होईल. अनंत पट होईल. ।।२०।।

पुढे म्हणतात कीं, हे आत्मन् ! तूं जल, थल, आदि सर्व ठिकाणी राहिला आहे :-

जलथलसिहिपवणंबरगिरिसरिदरितरुवणाई* सव्वत्थ ।
वसिओसि चिरं कालं तिहुवणमज्झे अणप्पवसो ।।२१।।

जलस्थलशिखिपवनांबरगिरिसरिद्दरीतरुवनादिषु सर्वत्र ।
उषितोऽसि चिरं कालं त्रिभुवनमध्ये अनात्मवशः ।।२१।।

अर्थ :— हे जीव ! तूं जलात, भूमित, आग्निंत, हवेत, आकाशात, पर्वतात नदिमध्यें दरीत, पर्वताच्या गुंफेत, वृक्षामध्यें, वनामध्यें आणि जास्त काय सांगायचे सर्व स्थानामध्यें, तीन लोकात अनात्मवश अर्थात् पराधीन होवून बराच काळ राहिला, अर्थात निवास केला.

भावार्थ :— निज शुध्दात्म्याच्या भावने शिवाय कर्माच्या आधिन न होता तीन लोकात सर्व दु:खासहित सर्वत्र निवास केला ।।२१ ।।

पुढे आणखी सांगतात कीं, हे जीव ! तू या लोकात सर्व पुद्गल भक्षण केले तरी ही तृप्त झाला नाही :—

गसियाइं पुग्गलाइं भुवणोदरवत्तियाइं सव्वाइं ।
पत्तोसि तो ण तित्तिं पुणरुत्तं ताइं भुञ्जंतो ।।२२।।

ग्रसिताः पुद्गलाः भुवनोदरवर्त्तिनः सर्वे ।
प्राप्तोऽसि तन्न तृप्तिं पुनरुक्तान् तान् भुंजानः ।।२२।।

अर्थ :— हे जीव ! तू या लोकात जन्म घेवून जे पुद्गल स्कंध आहेत त्यांचे भक्षण केले आहे आणि त्यानाच पुन्हा पुन्हा भोगून ही तृप्त झाला नाही.

पुढे म्हणतात :-

तिहुयणसलिलं सयलं पीयं तिण्हाइ पीडिएण तुमे ।
तो वि ण तण्हाछेओ जाओ चिंतेह भवमहणं ।।२३।।

त्रिभुवनसलिलं सकलं पीतं तृष्णाया पीडितेन त्वया ।
तदपि न तृष्णाछेदः जातः चिन्तय भवमथनम् ।।२३।।

अर्थ :— हे जीव ! तू या लोकामध्यें तृष्णेने पीडित होवून तीन लोकाचे सर्व जल प्राशन केले तरी ही तृष्णा संपली नाही, म्हणून तू या संसाराचा नाश करून निश्चय रत्नत्रयाचे चिंतन कर.

www.vitragvani.com



भावार्थ :— संसारात कोठल्याही प्रकारचे समाधान नाही म्हणून संसाराचा अभाव होवो असे चिंतन करावे. अर्थात् निश्चय सम्यक्दर्शन, ज्ञान, चारित्राला धारण करावे हा उपदेश आहे ।।२३ ।।

पुढे पुन्हा सांगतात -

गहिउज्झियाइं मुणिवर कलेवराइं तुमे अणेयाइं ।
ताणं णत्थि पमाणं अणंतभवसायरे धीर ।।२४।।

गृहीतोज्झितानि मुनिवर कलेवराणि त्वया अनेकानि ।
तेषां नास्ति प्रमाणं अनन्तभवसागरे धीर ! ।।२४।।

अर्थ :— हे मुनिवर ! हे धीर ! तू या अनंत भवसागरात अनेक शरीरे धारण केली आणि सोडली त्याचे प्रमाण नाही.

भावार्थ :— हे मुनिप्रधान ! तू या शरीराचा मोह करूं इच्छितो तर या संसारात इतकी शरीरे सोडली आणि ग्रहण केली त्याचे मोजमाप ही केले जावूं शकत नाही. ।।२४ ।।

पुढे सांगतात कीं, जो पर्याय स्थिर नाही, आयु कर्माच्या आधिन आहे तो अनेक प्रकाराने क्षीण होवून जातो :-

विसवेयणरत्तक्खयभयसत्थग्गहणसंकिलेसाणं ।
आहारुस्सासाणं णिरोहणा खिज्जए आऊ ।।२५।।
हिमजलणसलिलगुरुयरपव्वयतरुरुहणपडणभंगेहिं ।
रसविज्जजोयधारण अणणपसंगेहिं विविहेहिं ।।२६।।
इय तिरिय मणुय जम्मे, सुइरं उववज्जिऊण बहुवारं ।
अवमिच्चुमहादुक्खं तिव्वं पत्तोसि तं मित्त ।।२७।।

विषवेदनारक्तक्षयभयशस्त्रग्रहणसंक्लेशानाम् ।
आहारोच्छ्वासानां निरोधनात् क्षीयते आयु ।।२५।।
हिमज्वलनसलिलगुरुतरपर्वततरुरोहणपतनभङ्गैः ।
रसविद्यायोगधारणानयप्रसंगैः विविधैः ।।२६।।
इति तिर्यग्मनुष्यजन्मनि सुचिरं उत्पद्य बहुवारम् ।
अपमृत्युमहादुःखं तीव्रं प्राप्तोऽसि त्वं मित्र ! ।।२७।।

१. मुद्रित संस्कृत प्रतित 'पुरवं' पाठ आहे जे संस्कृतमध्ये 'पुनरूप' छापले आहे.

अर्थ :— विषभक्षणामुळे, वेदनेच्या पीडेच्या निमित्ताने, रक्त अर्थात् रूधीर क्षयाने भयामुळे, शस्त्राच्या घाताने, संक्लेशपरिणामामुळे, आहार तसेच श्वासाच्या निरोधाने आयुष्याचा क्षय होतो.

हिम अर्थात् शीत स्पर्शाने, अग्निमुळे, पाण्याने, मोठया पर्वतावरून पडल्याने मोठ्या वृक्षावर चढून पडल्यामुळे, शरीराचा भंग झाल्याने, पारा आदि विद्येच्या संयोगाने धारण करून भक्षण केल्याने यामुळे आणि अन्यायकार्य, चोरी, व्यभिचार आदि निमित्ताने अशा प्रकारे अनेक प्रकारच्या कारणाने आयुष्याचा नाश होवून कुमरण येते.

म्हणून म्हणतात कीं हे मित्र ! अशा प्रकारे तिर्यंच मनुष्य जन्मात बराच काल बऱ्याच वेळा उत्पन्न होवून अपमृत्यु अर्थात् कुमरणामुळें महादु:खाला प्राप्त होतो.

भावार्थ :— या लोकात प्राण्याचे आयुष्य ( जेथे सोपक्रम आयु बांधली गेली आहे ते नियमानुसार ) तिर्यंच मनुष्य पर्यायात अनेक कारणानी छेदले जाते, या मुळें कुमरण येते. या मुळे मरताना तीव्र दु:ख होते तसेच खोट्या परिणामामुळें मरण येवून पुन्हा दुर्गतिमध्यें पडतो, अशा प्रकारे हा जीव संसारात महादु:खाला प्राप्त होतो. यामुळे आचार्य दयाळू होवून संसारातून मुक्त होण्याचा उपदेश करतात असे जाणावे ।।२५,२६,२७।।

पुढे निगोदाचे दु:ख वर्णन करतात :-

छत्तीसं तिण्णि सया छावट्ठिसहस्सवारमरणाणि ।
अंतोमुहुत्तमज्झे पत्तोसि निगोयवासम्मि ।।२८।।

षट्त्रिंशत् त्रीणि शतानि षट्षष्टिसहस्रवारमरणानि ।
अन्तर्मुहूर्त्तमध्ये प्राप्तोऽसि निकोतवासे ।।२८।।

अर्थ :— हे आत्मन् ! तूं निगोधात वास करताना एका अंतर्मुहुर्त्तमें सहासष्ठ हजार तिनशे छत्तीस वेळा मरणाला प्राप्त होतो.

भावार्थ :— निगोधात एका श्वासाचा १८ वा भाग प्रमाण आयु प्राप्त करतो तेथे एका मुहूर्ताचे ३७७३ श्वासोच्छवास मोजले जातात. त्यात ३६८५ श्वासोच्छवास आणि एका श्वासाचे तिसऱ्या भागाचे ६६३३६ वेळा निगोधात जन्म मरण होते. याचे दु:ख हा प्राणि सम्यक्‌दर्शनभाव प्राप्त केल्या शिवाय मिथ्यात्वाच्या उदयाने वशीभूत होवून सहन करतो थोडक्यात अंतर्मुहुर्तात ६६३३६ वेळा जन्म मरण सांगितले आहे . ते ८८ श्वास कमी मुहुर्त अशा प्रकारे अंतर्मुहुर्तात जाणले पाहिजे. ।।२८।।

(विशेषार्थ:- गाथेत आलेले 'निगोद वासम्मि' शब्दाचे संस्कृत निगोत वासे' आहे. निगोद शब्द एकेंद्रिय वनस्पति कायिक जीवांच्या साधारण भेदात रूढ आहे. तसेच निगोत शब्द पांची इंद्रियांच्या सम्मूर्च्छन

www.vitragvani.com



जन्मापासून उत्पन्न होणाऱ्या लब्धपर्याप्तक जीवांसाठी प्रयुक्त होतो म्हणून येथे जे ६६३३६ वेळा मरणाची संख्या आहे. ती पांची इंद्रीयाना सम्मिलित समजावी ॥२८॥)

या अंतर्मुहूर्ताच्या जन्म मरणात क्षुद्रभवाचा विशेष सांगतात :-

वियलिंदए असीदी सट्ठी चालीसमेव जाणेह ।
पंचिंदिय चउवीसं खुद्दभवंतोमुहुत्तस्स ॥२९॥

विकलेंद्रियाणामशीतिं षष्टिं चत्वारिंशतमेव जानीहि ।
पंचेन्द्रियाणां चतुर्विंशतिं क्षुद्रभवान् अन्तर्मुहूर्त्तस्य ॥२९॥

अर्थ :— या अंतर्मुहुर्ताच्या भवात दोन इंद्रियाचे क्षुद्रभव ८०, तीनइंद्रियाचे-६० चारइंद्रियाचे-४० आणि पंचेंद्रियाचे - २४ अशा प्रकारे ११ स्थानाचे भव तर एक एकाचे ६ हजार वेळा त्याचे ६६१३२ झाले आणि या गाथेत सांगितले ते भव तर एक एकाचे ६ हजार वेळा त्याचे ६६१३२ झाले आणि या गाथेत सांगितले ते भव दोन इंद्रिय आदि चे २०४ असे ६६३३६ एका अंतर्मुहुर्तात क्षुद्रभव सांगितले आहेत ॥२९॥

पुढे सांगतात कीं, हे आत्मन्! तू या दीर्घ संसारात पूर्वोक्त प्रकार सम्यक्‌दर्शनादि रत्नत्रयाच्या प्राप्ति शिवाय भ्रमण केले, म्हणून आता रत्नत्रय धारण कर . :-

रयणत्तये अलद्धे एवं भमिओसि दीहसंसारे ।
इय जिणवरेहिं भणियं तं रयणत्तं समायरह ॥३०॥

रत्नत्रये अलब्धे एवं भ्रमितोऽसि दीर्घसंसारे ।
इति जिणवरैर्भणितं तत् रत्नत्रयं समाचर ॥३०॥

अर्थ :— हे जीव ! तू सम्यग्दर्शन -ज्ञान-चारित्ररूप रत्नत्रयाला प्राप्त केले नाही, म्हणून दीर्घकालापासून अनादि संसारात प्रथम सांगितल्याप्रमाणे भ्रमण केले अशा प्रकारे जाणून आता तू त्या रत्नत्रयाचे आचरण कर, अशा प्रकारे जिनेश्वरदेवाने सांगितले आहे.

भावार्थ :— निश्चय रत्नमय प्राप्त केल्याशिवाय हा जीव मिथ्यात्वाच्या उदयाने संसारात भ्रमण करतो, म्हणून रत्नत्रयाच्या आचरणाचा उपदेश आहे. ॥३०॥ पुढे शिष्य विचारतो कीं, ते रत्नमय कसे आहे ? त्याचे समाधान करतात कीं, रत्नत्रय अशा प्रकारे आहे :—

अप्पा अप्पम्मि रओ सम्माइट्ठी हवेइ फुडु जीवो ।
जाणइ तं सण्णाणं चरदिह चारित्तमग्गुत्ति ॥३१॥

आत्मा आत्मनि रतः सम्यग्दृष्टिः भवति स्फुटं जीवः ।
जानाति तत् संज्ञानं चरतीह चारित्रं मार्ग इति ॥३१॥

www.vitragvani.com



अर्थ :— जो आत्मा आत्म्यामध्यें रत होवून यथार्थ रूपाचा अनुभव करून रागद्वेषरूप न परिणामित होणे सम्यक्चारित्र आहे. अशा प्रकारे हे निश्चय रत्नत्रय आहे, मोक्षमार्ग आहे.

भावार्थ :— आत्म्याचे श्रध्दान ज्ञान आचरण निश्चय रत्नत्रय आहे आणि बाह्यत: यांचा व्यवहार - जीव अजीवादि तत्त्वांचे श्रध्दान, तसेच जाणणे आणि परद्रव्य, परभावाचा त्याग करणे अशा प्रकारे निश्चय तर प्रधान आहे, यांच्या शिवाय व्यवहार संसार स्वरूपच आहे. व्यवहार हा निश्चयाचे साधनस्वरूप आहे याच्या शिवाय निश्याची प्राप्ति नाही आणि निश्चयाची प्राप्ति झाल्या नंतर व्यवहार कांहींच नाही. असे जाणावे ।।३१।।

पुढे संसारात या जीवाने जन्म मरण केले आहे ते कुमरण होते, आता सुमरणाचा उपदेश करतात :-

अण्णे कुमरणमरणं अणेयजम्मंतराइं मरिओसि ।
भावहि सुमरणमरणं जरमरणविणासणं जीव ! ।।३२।।

अन्यस्मिन् कुमरणमरणं अनेकजन्मान्तरेषु मृत: असि ।
भावय सुमरणमरणं जन्ममरणविनाशनं जीव ! ।।३२।।

अर्थ :— हे जीव ! या संसारात अनेक जन्मांतरात अन्य कुमरण जसे असते तसे तूं मरणाला प्राप्त झालास आता तू ज्या मरणाने जन्म मरणाचा नाश होईल अशा प्रकारच्या सुमरणाची भावना कर अर्थात् समाधिमरण प्राप्त करून घे.

भावार्थ :— अन्य शास्त्रामध्यें संक्षेपाने १७ प्रकारचे मरण वर्णन केले आहेत. ते अशा प्रकारे आहेत. १. आविचिकामरण २. तभ्दवमरण ३. अवाधिमरण ४. आद्यान्तमरण ५. बालमरण ६. पंडितमरण ७. आसन्नमरण ८. बालमरण ९. सशल्यमरण १०. पलायमरण ११. वशार्त्तमरण १२. विप्राणसमरण १३. गृध्द्रपृष्टमरण १४. भक्तप्रत्यारव्यानमरण १५. इंगिनिमरण १६. प्रायोपगमनमरण १७. केवलीमरण असे १७. प्रकार आहेत.

यांचे स्वरूप अशा प्रकारे आहे - आयुकर्माचा उदय - समय समयाला घटतो ते समय समय मरण आहे, हे आवीचिकामरण आहे ।।१ ।।

वर्तमान पर्यायाचा अभाव तद्भवमरण आहे ।।२ ।।

जसे मरण वर्तमान पर्यायाचे असेल तसेच पुढच्या पर्यायाचे असेल ते अवधीमरण आहे. याचे दोन प्रकार आहेत. जसे प्रकृति, स्थिति, अनुभाग वर्तमानाचा उदय आला तसाच पुढे उदय येईल. १) सर्वावधिमरण आहे आणि एकदेश बंध - उदय असेल तर (२) देशावधिमरण म्हटले जाते ।।३ ।।

---

१. येथे असे समजू नये कीं प्रथम व्यवहार आहे आणि नंतर निश्चय आहे परंतु भूमिकानुसार प्रारंभापासूनच निश्चय व्यवहार बरोबरच असतो. निमित्ताचा अर्थ शास्त्रामध्यें सांगितला आहे त्या प्रमाणेच होतो.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



वर्तमान पर्यायाची स्थिति आदि जसा उदय होता तसाच पुढे सर्वथा किंवा देशता बंध - उदय न होणे ते आद्यन्त मरण आहे ।।४।।

पांचवे बालमरण आहे हे पाच प्रकारचे आहे - १. अव्यक्त बाल २. व्यवहारबाल ३. ज्ञानबाल ४. दर्शनबाल ५. चारित्रबाल जे धर्म, अर्थ, काम, जाणत नाहीत ज्यांचे शरीर या आचरणाकरीतां समर्थ नाही ते अव्यक्त बाल' आहे. जो लोक व्यवहार आणि शास्त्र व्यवहार जाणत नाहीत तसेच बालक अवस्था असेल तर 'व्यवहारबाल' म्हणतात. वस्तुच्या यथार्थ ज्ञान रहित 'ज्ञानबल' आहे. तत्त्व श्रध्दानरहित मिथ्यादृष्टि 'दर्शनबाल' आहे. चारित्र रहित प्राणि चारित्रबाल आहे. असे मरण ते बालमरण आहे येथे प्रधानरुपाने दर्शनबालाचेचं ग्रहण आहे. कारण कीं, सम्यक्‌दृष्टि 'दर्शनबाल' आहे. चारित्र रहित प्राणि चारित्रबाल आहे. असे मरण ते बालमरण आहे येथे प्रधानरूपाने दर्शनबालाचेच ग्रहण आहे. कारण कीं, सम्यक्‌दृष्टिला अन्य बालपणा असून ही दर्शन पंडिताच्या सद्‌भावाने पंडितमरणच म्हणतात. दर्शन बालाचे मरण संक्षेपाने २ प्रकारचे सांगितले आहे. इच्छाप्रवृत्त आणि अनिच्छा प्रवृत्त अग्निने, धुराने शस्त्राने, विषाने, जलाने, पर्वतावरून पडल्याने, अतिशीत उष्ण बाधा झाल्याने बंधनाने, क्षुधातृषेचा अवरोध केल्याने जीभ उखडल्यामुळें आणि विरुध्द आहार केल्यामुळे बाल (अज्ञानी) इच्छापूर्वक मरण प्राप्त करणारा तो इच्छाप्रवृत्त होय तसेच जगण्याला उत्सुक असणारा जर मृत झाला तर तो अनिच्छाप्रवृत्त होय ।।५।। पंडितमरण चार प्रकारचे आहे - १) व्यवहार पंडित २) सम्यक्त्वपंडित ३) ज्ञानपंडित ४) चारित्र पंडित लोकशास्त्राच्या व्यवहारात प्रवीण असेल तो व्यवहार पंडित आहे. सम्यक्त्वा सहित असेल तर तो सम्यक्त्व पंडित आहे सम्यक्‌ज्ञानासहीत असेल तर ज्ञान पंडित आहे. सम्यक् चारित्रासहित असेल तर चारित्र पंडित आहे. येथे दर्शन - ज्ञान - चारित्र सहित पंडिताचे ग्रहण आहे कारण कीं, व्यवहार पंडित मिथ्यादृष्टि बालमरणात येतो ।।६।।

मोक्ष मार्गात प्रर्वतन करणारा साधु संघातून सुटला त्याला आसन्न म्हणतात. यात पार्श्वस्थ, स्वच्छंद, कुशील, संसक्त ही येतात अशा प्रकारे पंचप्रकार भ्रष्ट साधूंचे मरण 'आसन्नमरण' आहे ।।७।।

सम्यक्‌दृष्टि श्रावकाचे मरण 'बालपंडितमरण' आहे ।।८।। सशल्य मरण दोन प्रकारचे आहे - मिथ्यादर्शन, माया, निदान हे तीन शल्य तर 'भावशल्य' आहे आणि पंच स्थावर तसेच त्रसा मध्यें असैनी हे द्रव्यशल्यासहित आहेत. अशा प्रकारे 'सशल्यमरण' आहे ।।९।।

जे प्रशस्तक्रियेमध्यें आळशी आहेत, व्रतादिका मध्यें शक्तीला लपवतात, ध्यानादि पासून दूर जातात या प्रकारचे मरण 'पलायमरण' आहे ।।१०।।

वशार्त्तमरण - चार प्रकारचे आहे - हे आर्तरौद्र, ध्यानसहित मरण आहे, पाच इंद्रियाच्या विषयात राग द्वेषा सहित मरण 'इन्द्रियवशार्त्तमरण' आहे साता असाता वेदनासहित मरण 'वेदनावशार्त्तमरण' आहे. क्रोध, मान, माया, लोभ कषायाने वश मरण कषायवशार्त्तमरण आहे. हास्य विनोद कषायाच्या वशाने मरण येणे 'नोकषायवशार्त्तमरण' आहे ।।११।।

जो आपले व्रत करताना उपसर्ग आला, तो सहन झाला नाही आणि भ्रष्ट होण्याचे भय निर्माण झाले तर तेंव्हा अशक्त होवून अन्न पाण्याचा त्याग करून मरण आले तर त्याला 'विप्राणसमरण' असे म्हणतात ।।१२।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

शस्त्र ग्रहण करून मरण आले तर त्याला 'गृध्रपुष्ठमरण' असे म्हणतात ।।१७।।

अनुक्रमाने अन्नपात्रिका यथाविधि त्याग करून मरण आले तर ते 'भक्तप्रत्याख्यानमरण' म्हटले आहे.

सन्यास घेवून आणि दुसऱ्याकडून वैयावृत्य (सेवा) घेवून मरण येते त्याला 'इंगिनीमरण' म्हणतात ।।१५।।

प्रायोपगमन सन्यास करतात आणि कोणाकडून करून घेत नाहीत. तसेच स्वत: ही करत नाही. वैयवृत्य, प्रतिमायोगात राहातात ते प्रायोपगमनमरण होय।।१६ ।।

केवली मुक्तिप्राप्त हो 'केवलिमरण' आहे ।।१७।।

अशा प्रकारे सतरा प्रकार आहे. याचे सोपेरूप अशा पद्धतीने आहे – मरण पाच प्रकारचे आहे — १. पंडितपंडित, २. पंडित, ३. बालपंडित, ४.बाल, ५. बालबाल जो दर्शन ज्ञान चारित्र्याच्या अतिशय जवळ आहे तो पंडितपंडित आहे आणि त्यांची प्रकर्षना ज्यांच्यात नसते ते पंडित आहे. सम्यग्दृष्टि श्रावक हा बालपंडित आणि पहिले चार प्रकारचे पंडित म्हणतील त्याच्यातले एक पण भाव ज्याचे नाही तो बाल आहे. तसेच जो सगळ्यात न्यून आहे ते बालबाल आहे. याच्यात पंडितपंडित मरण, पंडितमरण, आणि बालपंदितमरण हे तीन प्रशस्त सुमरण सांगितले आहे. अन्य पद्धतीने ते कुमरण आहे. अशाप्रकारे जे सम्यग्दर्शन ज्ञान-चरित्र एक देशसहित मरे असे सुमरण करण्याचा उपदेश आहे. ।।३३ ।।

पुढे ते, जीव संसारात भ्रमण करत आहे, त्या भ्रमणाच्या परावर्तनाचे स्वरूप मनात धरून निरूपण करत आहे. पहिल्यांदा या सामान्यरूपाने लोकांच्या प्रदेशाच्या अपेक्षाने सांगत आहेत :—

**सो णत्थि दव्वसमणो परमाणुपमाणमेत्त ओ णिलओ ।**
**जत्थ ण जाओ ण मओ तियलोयपमाणिओ सव्वो ।।३३।।**

सः नास्ति द्रव्यश्रमणः परमाणुप्रमाणमात्रो निलयः ।
यत्र न जातः न मृतः त्रिलोकप्रमाणकः सर्वः ।।३३।।

अर्थ :— हा जीव द्रव्यलिंगधारक मुनिपण असून ही जे तीन लोक प्रमाण सर्व स्थानात आहे. त्या एक परमाणू प्रमाण इतके ही असे स्था न नाही कीं, जेथे जन्म मरण केले नाही.

भावार्थ :— द्रव्यलिंग धारण करून सुध्दा या जीवाने सर्व लोकात अनंत वेळा जन्म, मरण केले. परंतु असा कोणताही प्रदेश बाकी राहिला नाही जेथे जन्म, मरण केले नाही. अशा प्रकारे 'भाव लिंग'' शिवाय द्रव्य लिंगाने मोक्षाची (निज परमामदशेची) प्राप्ति होणार नाही असे जाणावे ।।३३ ।।

पुढे या अर्थाला दृढ करण्यासाठी भावलिंगला प्रधान करत आहे :—

**कालमणंतं जीवो जम्मजरामरणपीडिओ दुक्खं ।**
**जिणलिंगेण वि पत्तो परंपराभावरहिएण ।।३४।।**

कालमनंतं जीवः जन्मजरामरणपीडितः दुःखम् ।
जिनलिंगेन अपि प्राप्तः परम्पराभावरहितेन ।।३४।।

www.vitragvani.com



अर्थ :— हा जीव या संसारात ज्यात परंपरा भावलिंग न झाल्याने अनंतकाल पर्यंत जन्म, जरा, मरणाने पीडित दु:खाला प्राप्त झाला आहे.

भावार्थ :— द्रव्यलिंग धारण केले आणि त्यात परंपरेने ही भावलिंगाची प्राप्ति झाली नाही म्हणून द्रव्यलिंग निष्फल गेले, मुक्तीची प्राप्ति झाली नाही संसारातच भ्रमण करत राहिला. अशा प्रकारचा येथे आशय आहे द्रव्यलिंग आहे ते भावलिंगाचे साधन आहे. परंतु काळलब्धि शिवाय द्रव्य लिंग धारण करून ही भाव लिंगाची प्राप्ति होत नाही म्हणून द्रव्यलिंग निष्फल जाते. अशा प्रकारे मोक्ष मार्गात प्रधान भावलिंगच आहे. येथे कोणी म्हणाले कीं, अशा प्रकारे असेल तर द्रव्यलिंग प्रथम धारण कां करायचे? त्याला उत्तर देतात कीं, असे मानले तर व्यवहाराचा लोप होतो. म्हणून द्रव्यलिंग धारण केले कीं सिध्दि मिळेल असे समजूं नये. भावलिंगाला प्रमुख मानून त्याच्या सन्मुख उपयोग ठेवणे द्रव्यलिंगाला यत्नपूर्वक साधणे अशा प्रकारचे श्रध्दान योग्य आहे ।।३४।।

पुढे पुद्‌गल द्रव्याला प्रधान करून भ्रमण सांगतात :-

पडिदेससमयपुग्गलआउगपरिणामणामकालट्ठं ।
गहिउज्झियाइं बहुसो अणंतभवसायरे जीवो ।।३५।।

प्रतिदेशसमयपुद्गलायुः परिणामनामकालस्थम् ।
गृहीतोज्झितानि बहुशः अनन्तभवसागरे जीवः ।।३५।।

अर्थ :— या जीवाने या अनंत अपार भवसमुद्रात लोकाकाशाचे जितके प्रदेश आहेत त्यात प्रति समयी, पर्यायाच्या आयु प्रमाण काल, आणि आपल्या प्रमाणे योग कषायाचे परिणमन स्वरूप परिणाम आणि गति जाति आदि नाम कर्माच्या उदयाने झालेला नाम आणि काल जसे उत्सर्पिणी अवसर्पिणी त्यातले पुद्‌गलाचे परमाणूरूप स्कंद त्याना अनेक वेळा ग्रहण केले आणि सोडले ( तरी ही मुक्त झाला नाही) .

भावार्थ :— भाव लिंगा शिवाय जितके पुद्‌गल स्कंध आहेत त्या सर्वांना ग्रहण केले आणि सोडले. तरीही मुक्त झाला नाही . ।।३५।।

---

काललब्धि: ख समय निजस्वरूप परिणामाची प्राप्ति; ( आत्मावलोकन गा. ९)

काललब्धिचा अर्थ स्वकालाची प्राप्ति आहे (३) ''यदायं जीव: आगमभाष या कालादि लब्धिरूप मध्यात्म भाषया शुध्दात्माभिमुखं परिणामरूपं स्वसंवेदनज्ञानं लभते

अर्थ :— जेंव्हा हा जीव आगमभाषेने कालादि लब्धिला प्राप्त करतो तसेच अध्यात्म भाषेने शुध्दात्म्याच्या सन्मुख परिणाम स्वसंवेदन ज्ञानाला प्राप्त करतो' (पंचास्तिकाय गा १५०-५१ जयसेनाचार्य टीका )

४) विशेषत: मोक्ष मार्ग प्रकाशक अ - ६ पाहावा.

पुढे क्षेत्राला प्रधान करून वर्णन करत आहेत :-

तेयाला तिण्णि सया रज्जूणं लोयखेत्तपरिमाणं ।
मुत्तूणट्ठ पएसा जत्थ ण ढुरुढुल्लिओ जीवो ॥३६॥

त्रिचत्वारिंशत् त्रीणि शतानि रज्जूनां लोकक्षेत्रपरिमाणं ।
मुक्त्वाऽष्टौ प्रदेशान् यत्र न भ्रमितः जीवः ॥३६॥

अर्थ :— हे लोक ३४३ राजू परिमाण क्षेत्र आहे त्या मध्यें मेरूच्या खाली गोस्तनाकार आठ प्रदेश आहेत येवढे सोडून दुसरा कोणताही प्रदेश असा नाही ज्यात जीवाचे जन्म, मरण झाले नाही.

भावार्थ :— 'ढुरूढुल्लिओ' अशा प्रकारचा प्राकृत मध्यें भ्रमण या अर्थाचा शद्ब आहे आणि क्षेत्र परावर्तनात मेरूच्या खाली आठ प्रदेश 'लोका'च्या मध्यात आहेत. त्याना सोडून जीव आपल्या आपल्या प्रदेशाच्या मध्यदेशात उपजत आहे तेथून क्षेत्रपरावर्तनाचा प्रारंभ केला जातो. म्हणून त्याना पुन्हा भ्रमण मध्ये घेत नाहीत.

पुढे हा जीव शरिरसहित उत्पन्न होतो आणि मरतो त्या शरीरात रोग होतात, त्यांची संख्या सांगत आहेत.

एक्केक्कंगुलिवाही छण्णवदी होंति जाण मणुयाणं ।
अवसेसे य सरीरे रोया भण कित्तिया भणिया ॥३७॥

एकैकांगुलौ व्याधयः षण्णवतिः भवंति जानीहि मनुष्यानां ।
अवशेषे च शरीरे रोगाः भण कियन्तः भणिताः ॥३७॥

अर्थ :— या मनुष्याच्या शरीरात एकएका अगुंळात ९६ - ९६ रोग असतात तर विचार करा कीं सर्व शरीरात किती रोग असतील ?

पुढे सांगतात की हे जीवा ! त्या रोगांचे दु:ख तूं सहन केले आहेस.

ते रोया वि य सयला सहिया ते परवसेण पुव्वभवे ।
एवं सहसि महाजस किं वा बहुएहिं लविएहिं ॥३८॥

ते रोगा अपि च सकलाः सोढास्त्वया परवशेण पूर्वभवे ।
एवं सहसे महायशः ! किं वा बहुभिः लपितैः ॥३८॥

हे महायश ! हे मुने तू पूर्वोक्त सर्व रोगांचा पूर्वभवात परवश सहन केले आहेत अशा प्रकारे पुन्हा सहन करशील. आणखी काय सांगायचे ?

भावार्थ :— हा जीव पराधीन होवून सर्व दु:ख सहन करत आहे. जर ज्ञान भावना केली आणि दु:ख आल्यानंतर त्यामुळें चलायमान झालो नाही अशा प्रकारे स्ववश होवून केले तर कर्माचा नाश करून मुक्त होतो असे जाणावे ।।३८।।

पुढे सांगतात कीं, अपवित्र गर्भावासात ही राहिला :-

पित्तंतमुत्तफेफसकालिज्जयरुहिरखरिसकिमिजाले ।
उयरे वसिओसि चिरं नवदसमासेहिं पत्तेहिं ।।३९।।

पित्तांत्रमूत्रफेफसयकृद्रुधिरखरिसकृमिजाले ।
उदरे उषितोऽसि चिरं नवदशमासैः प्राप्तैः ।।३९।।

अर्थ :— हे मुने ! तू मलिन अपवित्र उदरात ९ महिने ते १० महिने राहिला. उदर कसे आहे? ज्यात पित्त आणि आतड्याने वेष्टित मूत्राचे स्त्रवण फुप्फुसे म्हणजे जे रक्ताशिवाय मेद (फुलतो) वाढतो, कालिज्ज अर्थात् काळीज (हृदय) रक्त, (खरिस) अपक्वमला ने भरलेले रक्त, श्लेष्म, कृमिजल, अर्थात् लट आदि जीवांचे समुह हे सर्व मिळतात अशा प्रकारच्या स्त्रिच्या शरीरात अनेक वेळा राहिला ।।३९।।

पुढे असे म्हणतात

दियसंगट्ठियमसणं आहारिय मायभुत्तमण्णांते ।
छद्दिखरिसाण मज्झे जठरे वसिओसि जणणीए ।।४०।।

द्विजसंगस्थितमशनं आहृत्य मातृभुक्तमन्नान्ते ।
छर्दिखरिसयोर्मध्ये जठरे उषितोऽसि जनन्याः ।।४०।।

अर्थ :— हे जीव ! तू जननीच्या उदरात राहिलास, तेथे माता,पित्याच्या भोगाच्या शेवटी, वामकअन्न, रक्तात मिसळलेला अपक्मल, या मध्यें राहिलास कसा राहिलास? आईने खालेल्या अन्नाचा रस बनतो त्यावर तुझे पोषण झाले ।।४०।।

पुढे सांगतात कीं, गर्भातून निघाल्यानंतर अशा प्रकारे बालपण भोगले :-

सिसुकाले य अयाणे असुईमज्झम्मि लोलिओसि तुमं ।
असुई असिया बहुसो मुणिवर ! वालत्तपत्तेण ।।४१।।

शिशुकाले च अज्ञाने अशुचिमध्ये लोलितोऽसि त्वम् ।
अशुचिः अशिता बहुशः मुनिवर ! बालत्वप्राप्तेन ।।४१।।

www.vitragvani.com



अर्थ :— हे मुनिवर ! तूं बचवचन लहान असतांना अज्ञानी अवस्थेत अशुचि (अपवित्र) स्थानात अशुचि मध्ये झोपला आणि अनेकवेळा अशुचि वस्तु खाल्ल्या बालपणात अशा प्रकारे कृति केल्या.

भावार्थ :— येथे मुनिवर असे संबोधन आहे ते मागील प्रमाणे समजावे. बाहयाचरणात मुनि असणाऱ्याना येथे प्रधान रूपाने उपदेश केला आहे कीं, बाहय आचरण केले ते तर मोठे कार्य केले, परंतु भावांच्या शिवाय, हे निष्फल आहे म्हणून 'भावाच्या' सन्मुख राहा भावांच्या विना हे अपवित्र स्थान मिळाले आहे ।।४१।।

पुढे म्हणतात कीं, देह अशा प्रकारे आहे त्याचा विचार करा :-

मंसट्ठिसुक्कसोणियपित्तंतसवत्तकुणिमदुग्गंधं ।
खरिसवसापूय`खिब्भिस भरियं चिंतेहि देहउडं ।।४२।।

मांसास्थिशुक्रश्रोणितपित्तांत्रस्रवत्कुणिमदुर्गन्धम् ।
खरिसवसापूयकिल्विषभरितं चिन्तय देहकुटम् ।।४२।।

अर्थ :— हे मुने ! तू देहरूप घटाला अशा प्रकारे विचार, कसा आहे हा देह घट? मांस, हाड, शुक्र (वीर्य) शोणित (रूधिर), पित्त (उष्णविकार) आणि आत्र (आतडी) आदि द्वारे तत्काल मृतकाची दुर्गंधी आहे तसेच रक्तात मिसळलेला अपक्व:मल वसा (मेद), पूय (खराबखून) आणि राध सगळ्या मलिन वस्तुने पूर्ण भरला आहे. अशा प्रकारे देहरूप घटाचा विचार करा.

भावार्थ :— हा जीव तर पवित्र आहे शुध्दज्ञानमयी आहे आणि हा देह अशा प्रकारे आहे यात राहणे अयोग्य आहे असे सांगितले आहे.

पुढे म्हणतात कीं, जो कुटुम्बातून सुटला (दूर झाला) म्हणजे सुटला असे नाही जो 'भावाने' सुटतो त्यालाच सुटला असे म्हणतात.

भावविमुत्तो मुत्तो ण य मुत्तो बंधवाइमित्तेण ।
इय भाविऊण उज्झसु गंधं अब्भंतरं धीर ।।४३।।

भावविमुक्तः मुक्तः न च मुक्तः बांधवादिमित्रेण ।
इति भावयित्वा उज्झय गन्धमाभ्यन्तरं धीर ! ।।४३।।

अर्थ :— जो मुनि भावापासून मुक्त झाला त्यालाच मुक्त असे म्हणतात आणि बांधव आदि कुटुम्ब तसेच मित्र आदि पासून मुक्त झाला त्याला मुक्त म्हणत नाहीत. म्हणून हे धीर मुनि ! तू अशा प्रकारे जाणून अभ्यन्तर वासना सोड.

भावार्थ :— जो बाह्य बांधव कुटुंब तसेच मित्र याला सोडून निर्गंथ झाला अंतरंगातील ममत्व भावरूप वासना तसे इष्ट अनिष्टा मध्यें राग द्वेष वासना सुटली नाही तर त्याला निर्ग्रंथ म्हणत नाहीत. अंतरंगातील

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



वासना सुटल्यानंतर निर्गंथ होतो म्हणून असा उपदेश आहे कीं, अंतरंगातील मिथ्यात्व कषाय सोडून भावमुनि बनले पाहिजे ।।४३।।

पुढे सांगतात कीं, जे पहिले मुनि झाले त्यानी भावशुध्दिशिवाय सिध्दि मिळविली नाही. प्रथम बाहुबलीचे उदाहरण पाहूं या :-

देहादिचत्तसंगो माणकसाएण कलुसिओ धीर ! ।
अत्तावणेण जादो बाहुवली कित्तियं` कालं ।।४४।।

देहादित्यक्तसंगः मानकषायेन कलुषितः धीर ! ।
आतापनेन जातः बाहुवली कियन्तं कालम् ।।४४।।

अर्थ :— पहा ! बाहुबली श्री ॠषभदेवांचे पुत्र देहादिक परिग्रहाला सोडून निर्ग्रंथ मुनि झाले. तरीही मान कषायाने कलुषित परिणाम असल्यामुळे कांहीं काळपर्यंत आतापन योग धारण करून स्थित झाला. तरीही सिध्दि मिळाली नाही.

भावार्थ :— बाहुबलीना भरतचक्रवर्तिने विरोध करून युध्द प्रारंभ केला, भरताचा अपमान झाला. त्या नंतर बाहुबली विरक्त होवून निर्गंथमुनि झाले परंतु कांहीं मानकषाय राहिला होता. भरताच्या भूमिवर मी कसा राहूं या भावनेची कलुषता होती. त्यामुळे कायोत्सर्ग ध्यानात १ वर्ष उभे राहिले, परंतु केवल ज्ञान प्राप्त झाले नाही. नंतर कलुषता नष्ट झाली तेंव्हा केवलज्ञान उत्पन्न झाले. म्हणून म्हणतात कीं, असे महान पुरूष मोठ्या शक्तीचे धारक असूनही भावशुध्दि शिवाय सिध्दि मिळाली नाही तर मग बाकीच्यांची काय गोष्ट? म्हणून भाव शुध्द केले पाहिजेत असा उपदेश आहे ।।४४।।

पुढे मधुपिंगल मुनिचे उदाहरण सांगत आहेत-

महुपिंगो णाम मुणी देहाहारादिचत्तवावारो ।
सवणत्तणं ण पत्तो णियाणमित्तेण भवियणुय ।।४५।।

मधुपिंगो नाम मुनिः देहाहारादित्यक्तव्यापारः ।
श्रमणत्वं न प्राप्तः निदानमात्रेण भव्यनुत ! ।।४५।।

अर्थ :— मधुपिंग नांवाचे मुनि देह, आहारादि व्यापार त्यागून ही किंचित नावापुरतेंही भावश्रमणपणाला प्राप्त झाले नव्हते त्यामुळें सिध्दि प्राप्त करूं शकले नाहीत.

भावार्थ :— मधुपिंगल नांवाच्या मुनिंची कथा पुराणामध्ये आहे ती संक्षेपाने अशी आहे - या भरत क्षेत्राच्या सुरम्यदेशात पोदनापुराचा राजा तृणपिंगलेचा पुत्र मधुपिंगल होता. ते चारण युगल नगराचे राजे सुयोधनची

www.vitragvani.com



पुत्री सुलसाच्या स्वयंवराला आले होते. तेथे साकेत पुरीचा राजा सगर आला होता. सगरच्या मंत्रीने मधुपिंगलाला नव्या सामुद्रिक शास्त्राप्रमाणे दोषी बनवले कीं, याचे डोळे पिंगट (मांजरासारखे) आहेत. जी कन्या यांच्या बरोबर लग्न करेल ती मरणाला प्राप्त करेल. तेंव्हा कन्याने सगराच्या गळ्यात वरमाला घातली मधुपिंगलला वरले नाही, तेंव्हा मधुपिंगलाने विरक्त होवून दीक्षा घेतली.

पुन्हा कारण पाहून सगराच्या मंत्र्याचे कपट जाणून क्रोधाने म्हणाला माझ्या तपाचे फल हे आहे ''पुढच्या जन्मात सगराचे कुल नष्ट करेन'' त्या नंतर मधुपिंगल मरून महाकालासुर नांवाचा असुर देव झाला. तेंव्हा सगराला मंत्र्यासहित मारण्याचा उपाय शोधत होता. त्याला क्षीरकद्म्ब ब्राह्मणाचा पुत्र पापी पर्वत भेटला, तेंव्हा त्याला पशुची हिंसा करणारा यज्ञाचा सहायक झाला असे म्हटले. सगर राजाला यज्ञाचा उपदेश करून यज्ञ केला. तेव्हा पर्वतने सगरकडून यज्ञ करवला पशुला होमात टाकले. त्या पापामुळें सगर सातव्या नरकात गेला, आणि कलासुर सहायक झाला. यज्ञ करणारा स्वर्गाला जातो असे सांगितले असे मधुपिंगलमुनिने महाकालसुर बनून महापाप कमवले म्हणून आचार्य म्हणतात कीं, मुनि झाल्यानंतर ही भाव बिघडले तर सिध्दिला जात नाही. याची कथा पुराणात विस्ताराने आहे.

पुढे वशिष्ठ मुनिचे उदाहरण सांगतात :-

अग्गणं च वसिट्ठमुणि पत्तो दुक्खं नियाणदोसेण ।
सो णत्थि वासठाणो जत्थ ण दुरुदुल्लिओ जीवो ।।४६।।

अन्यश्च वसिष्ठमुनिः प्राप्तः दुःखं निदानदोषेण ।
तन्नास्ति वासस्थानं यत्र न भ्रमितः जीव ! ।।४६।।

<u>अर्थ :</u>— आणखी एक वसिष्ठ नांवाचे मुनि निदानाच्या दोषाने दु:खाला प्राप्त झाले. म्हणून लोकात असे निवासस्थान नाही ज्यात हा जीव जन्ममरणासहित भ्रमणाला प्राप्त झाला नाही.

<u>भावार्थ :</u>— वसिष्ठ मुनिंची कथा अशी आहे - गंगा आणि गंधवती या दोन्ही नद्यांचा जेथे संगम झाला तेथे जठरकौशिक नांवाच्या तापसाची कुटी होती. तेथे एक 'वसिष्ठ' नांवाचे मुनि पंचाग्नि तप करत होता. तेथे गुणभद्र आणि वीरभ्रद नावाचे दोन चारण मुनि आले, ते वसिष्ठ मुनिना म्हणाले तूं अज्ञानतप करत आहेस त्यात जीवांची हिंसा होते. तेंव्हा तपस्वीने प्रत्यक्ष हिंसा पाहून विरक्त झाल्याने जैन दीक्षा घेतली. मासोपवाससहित आतपनयोग स्थापित केला. त्या तपाच्या महात्मामुळें सात व्यंतरदेवाने येवून म्हटले, आता माझे कांही प्रयोजन नाही. पुढच्या जन्मि तुझी आठवण करेन. नंतर वसिष्ठाने मथुरापुरी मध्यें येवून मासोपवाससहित आतपन योग स्थापित केला.

त्याला मथुरापुरीचे राजा उग्रसेनाने पाहिल्यानंतर भक्तीवश होवून हा विचार केला कीं, मी यांचे पारणे करेन. नगरात घोषणा केली कीं, या मुनिनां कोणी आहार देवूं नये. नंतर पारण्याच्या दिवशी नगरात

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

आले तेथे अग्निचा उपद्रव पाहून अंतराय जाणून परत गेले. नंतर मासोपवास केला पुन्हा पारण्याच्या दिवशी नगरात आले तेंव्हा राजा जरासंधाचे पत्र आले त्याच्या निमित्ताने राजाचे चित्त व्यग्र होते म्हणून मुनींना पडघावले नाही. तेव्हा अंतराय मानून परत वनात जाताना लोकांची वचने ऐकली ''राजा मुनिना आहार देत नाहीत आणि दुसऱ्यालाही देवूं देत नाहीत. हे ऐकून राजावर क्रोध करत शाप दिला कीं, राजाचा पुत्र होवून राज्य करणार या तपाचे हे माझे फल असेल अशा प्रकारे शापाने मृत झाला.

राजा उग्रसेनाची राणी पद्मावतीच्या गर्भात आला. मासपूर्ण झाल्यानंतर जन्म घेतला तेंव्हा त्याला क्रूरदृष्टी जाणून काशाच्या पेटीत ठेवले आणि सर्व वृत्तांना सहित यमुना नदीत सोडले. कौशिम्बी पुरात मंदोदरी नांवाच्या कलालीने त्याला घेवून जावून पुत्रबुध्दिने त्याचे पालन केले. आणि 'कंस' असे त्याचे नांव ठेवले, जेंव्हा तो मोठा झाला तेंव्हा बालकाबरोबर खेळताना सर्वांना दु:ख देत असे तेंव्हा मंदोदरीने दु:खाने त्याला काढून टाकले. मग हा कंस शौर्यपूराला गेला तेथे वसुदेव राजाचे सेवक बनून राहिला नंतर जरासंधाला प्रतिनारायणाचे पत्र आले कीं, जो पादेनपुरचा राजा सिंहरथाला बांधून आणेल त्याला अर्धेराज्य व मुलगी देवून विवाहीत करू. तेंव्हा वसुदेव तेथे कंसासहित जावून युध्द करून त्या सिंहरथाला बांधून घेवून आला. नंतर जरासंधाने त्याचे कुल जाणण्यासाठी मंदोदरीला बोलावून कुलाचा निश्चय करून त्याच्या बरोबर जीवंयशा सुपुत्रीचा विवाह केला. तेंव्हा कंसाने मथुरेचा राजा पिता उग्रसेन आणि पद्मावती मातेला बंदिखान्यात ठेवले नंतर कृष्ण नारायण मृत्यूला प्राप्त झाला याची सविस्तर कथा उत्तरपुराणात सविस्तर वाचण्यास मिळेल. अशा प्रकारे वसिष्ठ मुनिला सिध्दि मिळूं शकली नाही. म्हणून भावलिंगानेच सिध्दि मिळूं शकते ।।४८।।

पुढे म्हणतात कीं, भावरहित ८४ लाख योनित भ्रमण करतो :-

सो णत्थि तं पएसो चउरासीलक्खजोणिवासम्मि ।
भावविरओ वि सवणो जत्थ ण दुरुदुल्लिओ जीवो ।।४७।।

सः नास्ति तं प्रदेशः चतुरशीतिलक्षयोनिवासे ।
भावविरतः अपि श्रमणः यत्र न भ्रमितः जीवः ।।४७।।

अर्थ :— या संसारात ८४ लाख योनीमध्यें असा कोणताही प्रदेश नाही ज्यात हा जीव द्रव्यलिंगी मुनि होवून सुध्दां भावरहित असल्यामुळें भ्रमण केले नाही.

भावार्थ :— द्रव्यलिंग धारण करून निर्ग्रंथ मुनि बनून शुध्द स्वरूपाचा अनुभव स्वरूप 'भावा' शिवाय हा जीव ८४ लाख योनिमध्यें भ्रमणच करत राहिला, असे स्थान राहिले नाही ज्यात मरण झाले नाही.

पुढे ८४ लाख योनिचे भेद सांगतात - पृथ्वी, आप, तेज, वायू, नित्य, निगोद आणि इतर निगोद हे तर ७-७ लाख आहेत, एकूण ४२ लाख झाले. वनस्पति १० लाख, दोनइंद्रिय, ३ इंद्रिये, ४ इंद्रिये, हे २-२ लाख

www.vitragvani.com



आहेत. पंचेद्रिय तीर्थंच ४ लाख, नारक - ४ लाख, देव - ४ लाख, मनुष्य - १४ लाख अशा प्रकारे ८४ लाख जीवांचे उत्पन्न होण्याचे स्थान आहे. ॥४७॥

पुढे म्हणतात कीं, द्रव्यमात्रेने लिंगी होत नाही, भावाने लिंगी होते :-

भावेण होइ लिंगी ण हु लिंगी होइ दव्वमित्तेण ।
तम्हा कुणिज्ज भावं किं कीरइ दव्वलिंगेण ॥४८॥

भावेन भवति लिंगी न हि भवति लिंगी द्रव्यमात्रेण ।
तस्मात् कुर्याः भावं किं क्रियते द्रव्यलिंगेन ॥४८॥

अर्थ :— लिंगी होतो तो भाव लिंगानेच होतो. द्रव्य लिंगाने लिंगी होत नाही हे प्रकट आहे, म्हणून भावलिंगच धारण करावे. द्रव्यलिंगाने काय सिध्द होते?

भावार्थ :— आचार्य म्हणतात कीं, या पेक्षा अधिक काय सांगणार भाव लिंगा शिवाय लिंगी नामच होत नाही. कारण कीं, भाव शुध्द पाहिला नाही तर लोकच म्हणतील कीं हे कसेल मुनि आहेत ? कपटी आहेत द्रव्यलिंगाने कांहीं सिध्दि नाही, म्हणून भावलिंगच धारण करावे ॥४८॥

पुढे हेच दृढ करण्यासाठी द्रव्यलिंग धारकाला उलटा उपद्रव झाला त्याचे उदाहरण सांगतात :—

दंडयणयरं सयलं डहिओ अब्भंतरेण दोसेण ।
जिणलिंगेण वि बाहू पडिओ सो रउरवे णरये ॥४९॥

दण्डकनगरं सकलं दग्ध्वा अभ्यन्तरेण दोषेण ।
जिनलिंगेनापि बाहुः पतितः सः रौरवे नरके ॥४९॥

अर्थ :— पहा बाहु नामक मुनि बाह्य जिनलिंग सहित होते. तरीही अभ्यंतर दोषामुळे समस्त दंडक नामक नगराला दग्ध केले आणि सप्रम पृथ्वीच्या रौरव नांवाच्या बिळात पडला.

भावार्थ :— द्रव्यलिंग धारण करून काही तप केले, त्यामुळे काही सामर्थ्य वाढले, तेंव्हा काही कारण काढून क्रोधाने आपला आणि दुसऱ्याला उपद्रव देणारे कारण शोधले म्हणून द्रव्यलिंग भाव सहित धारण करणेच श्रेष्ठ आहे आणि केवल द्रव्यलिंग तर उपद्रवाचे कारण होते. हे बाहु मुनिचे उदाहरणाने सांगितले आहे.

ती कथा अशी आहे —

दक्षिण दिशेला कुंभ्यकारकटक नगरात दंडक नांवाचा राजा राहात होता. त्याचा बालक नांवाचा मंत्री होता तेथे अभिनंदन आदि ५०० मुनि आले होते. त्यानी बालक नांवाच्या मंत्र्याला वादात जिंकले होते. तेंव्हा मंत्रीने क्रोधाने एका 'भांडा'ला मुनिचे रुप दिले, राजाची राणी सुव्रता बरोबर रमण करताना राजाला

www.vitragvani.com



दाखवले. तेंव्हा राजाने दिगंबरावर क्रोध करून ५०० मुनिना घाणीत टाकले व ते मुनि उपसर्ग सहन करून परम समाधीने सिद्धिला प्राप्त झाले.

पुन्हा त्या नगरात बाहु नांवाचे एक मुनि आले. त्याना लोकानी सल्ला दिला कीं, येथला राजा दुष्ट आहे म्हणून आपण नगरात प्रवेश करू नये. प्रथम ५०० मुनिना घाणीत (दलदलीत) फेकले आहे ते आपलीही तशीच हालत करतील. तेव्हा लोकांच्या वचनाने बाहु मुनिना क्रोध उत्पन्न झाला. अशुभ तेजस समुद्घाताने राजाला मंत्र्या सहित सर्व नगराला भस्मसात केले. राजा आणि मंत्री सातव्या नरकात रौख नांवाच्या विळात पडले. तेथे बहुमनी ही मृत होवून रौख बिलात पडले. अशाप्रकारे द्रव्यलिंगात भावाच्या दोषामुळे उपद्रव होतात. म्हणून भावलिंगाचा प्रधान उपदेश आहे. ।।४९।।

पुढे याच अर्थाने दीपायन मुनिचे उदाहरण सांगतात :—

**अवरो वि दव्वसवणो दंसणवरणाणचरणपब्भट्ठो ।**
**दीवायणुत्ति णामो अणंतसंसारिओ जाओ ।।५०।।**

अपरः अपि द्रव्यश्रमणः दर्शनवरज्ञानचरणप्रभ्रष्टः ।
दीपायन इति नाम अनंतसांसारिकः जातः ।।५०।।

अर्थ :— आचार्य सांगतात कीं, जसे पहिले बाहुमुनि प्रमाणेच आणखी दीपायन नांवाचे द्रव्यश्रमण सम्यक्दर्शनज्ञान चारित्राने भ्रष्ट होवून अनंत संसारी झाला आहे.

भावार्थ :— मागच्याप्रमाणे यांची कथा संक्षेपाने अशा प्रकारे आहे. ९ व्या बलभद्राने श्रीनेमीनाथ तीर्थंकराना विचारले कीं, हे स्वामिन् ! ही द्वारकापुरी समुद्रात आहे, तिची स्थिति किती समय पर्यंत आहे ? तेंव्हा भगवंतानी सांगितले कीं, रोहिणीचा भाई दीपायन तुझ्या मामा १२ वर्षानंतर मद्यपानाने क्रोध करून या नगरीला जाळून टाकेल. अशाप्रकारे भगवंताचे विचार अैकल्यानंतर दीपायज दीक्षा घेवून पूर्व देशात गेला. १२ वर्षेव्यतित करण्यासाठी 'तप' करणे सुरु केले. आणि बलभद्र नारायणाने द्वारिकेमध्ये मद्यनिषेधाची घोषणा केली. मद्याची भांडी तसेच त्याची सामुग्री मद्य बनवणाऱ्यानी बाहेर पर्वतादिमध्यें फेकून दिली. तेव्हा भांड्यातील मदिरा तसेच मद्याची सामुग्री पाण्यात पसरली.

मग १२ वर्षे संपली असे जाणून दीपायन द्वारिकेला येवून नगराच्या बाहेर आतपन योग धारण करून स्थित झाले. भगवंताच्या वचनाची आठवण ठेवली नाही. नंतर शंभवकुमारादि क्रिडा केल्याने तहानलेले होते त्यानी कुंडांतील जल समजून ते पिवून टाकले. त्या मद्याच्या निमित्ताने कुमार उन्मत्त झाले. तेथे दीपायन मुनिना उभे राहिलेले पाहून म्हणाले हा द्वरिका भस्म करणारा दीपायन आहे. अशाप्रकारे सांगून त्याला दगडाने मारू लागले. तेंव्हा दीपायन जमिनीवर खाली पडला. त्याला क्रोध उत्पन्न झाला त्यामुळे

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



त्याने द्वारीका जाळून भस्म केली. अशाप्रकारे दीपायन भावशुद्धि होण्याऐवजी अनंत संसारी झाला. ||५०||

पुढे भावशुद्धि सहित मुनि झाले, त्यानी सिद्धि मिळवली त्याचे उदाहरण सांगतात —

भावसमणो य धीरो जुवईजणवेढिओ विसुद्धमई ।
णामेण सिवकुमारो परीत्तसंसारिओ जादो ॥५१॥

भावश्रमणश्च धीरः युवतिजनवेष्टितः विशुद्धमतिः ।
नाम्ना शिवकुमारः परित्यक्तसांसारिकः जातः ॥५१॥

अर्थ :— शिवकुमार नांवाचे भाव श्रमण स्त्रियांनी वेढलेले होते तरी सुद्धा विशुद्धि बुद्धिचे धारक असल्यामुळे संसार त्यागते झाले.

भावार्थ :— शिवकुमारने भावाच्या शुद्धतेने ब्रह्मस्वर्गात विद्युन्माली देव होवून तेथून जंबूस्वामी केवली होवून मोक्ष प्राप्त केला. त्यांची कथा अशाप्रकारे आहे —

या जंबूद्विपाच्या पूर्व विदेहात पुष्कलावती देशाच्या वीतशोकपुरात महापद्रम राजा वनमाला राणीला शिवकुमार नांवाचा पुत्र झाला. तो एक दिवस मित्रासहित वनक्रिडा करून नगरात येत होता. त्याने मार्गात लोकाना पुजेची सामुग्री घेवून जाताना पाहिले. तेंव्हा त्याने त्यांच्या मित्राला विचारले. हे कोठे जात आहेत ? मित्राने सांगितले हे सागरदत्त नांवाच्या ऋद्धिधारी मुनिला पुजण्यासाठी वनात चालले आहेत. तेंव्हा शिवकुमारने मुनिंच्या जवळ जावून आपला पूर्वभव ऐकून संसारातून विरक्त होवून दीक्षा घेतली आणि दृढधर नांवाच्या श्रावकाच्या घरी प्रासुक आहार घेतला. त्यानंतर स्त्रियांच्या जवळ असिधाराव्रत परम ब्रह्मचर्याचे पालन करून १२ वर्षेपर्यंत तप करून शेवटी संन्यास मरण करून ब्रह्मकल्पात विद्युन्माली देव झाले. त्यानंतर जम्बूकुमार झाले दीक्षा घेवून केवलज्ञान प्राप्त करून मोक्षाला गेले. यांची विस्ताराने कथा जम्बूचरीत्रात वाचायला मिळेल. अशाप्रकारे भावलिंग प्रधान आहे. ||५१||

पुढे शास्त्र ही वाचा आणि सम्यक्दर्शनरूप भाव विशुद्ध झाला नाही तर सिद्धिला प्राप्त करूं शकत नाही. त्याचे उदाहरण म्हणून अभव्यसेनांचे उदाहरण देतात:—

केवलिजिणपण्णत्तं एयादसअंग सयलसुयणाणं ।
पढिओ अभव्वसेणो ण भावसवणत्तणं पत्तो ॥५२॥

केवलिजिनप्रज्ञप्तं एकादशांगं सकलश्रुतज्ञानम् ।
पठितः अभव्यसेनः न भावश्रमणत्वं प्राप्तः ॥५२॥

अर्थ :— अभव्यसेन नांवाचे द्रव्यलिंगी मुनिने केवली भगवंतानी सांगितलेले ११ अंग वाचले. या ११ अंगाना

www.vitragvani.com



'पूर्ण श्रुतज्ञान' असे ही म्हणतात. कारण कीं, इतका अभ्यास केल्यानंतर अर्थाच्या अपेक्षेने ही 'पूर्णश्रुतज्ञान' ही होते. अभव्यसेनानी इतका अभ्यास केला तरी ही भावश्रमणपणाला प्राप्त झाले नाहीत.

भावार्थ :— येथे आशय असा आहे कीं, केवळ बाह्य क्रियेने सिद्धि मिळत नाही आणि केवळ शास्त्र वाचून सिद्धि मिळते असे ही नाही, कारण कीं, अभव्यसेन द्रव्यमुनि झाले आणि ११ अंग ही वाचले तरीही जिनवचनाची प्रतिति झाली नाही. कारण भाव लिंग प्राप्त झाले नव्हते. अभव्यसेनांची कथा पुराणात प्रसिद्ध आहे. तेथून ती जाणून घ्यावी. ।।५२।।

पुढे शास्त्र वाचल्याशिवाय शिवभूति मुनिने तुषमाषाची घोकणी करत भाव विशुद्धी करून मोक्ष प्राप्त करून घेतले. त्याचे उदाहरण सांगतात :—

तुसमासं घोसंतो भावविसुद्धो महाणुभावो य ।
णामेण य सिवभूई केवलणाणी फुडं जाओ ।।५३।।

तुषमाषं घोषयन् भावविशुद्धः महानुभावश्च ।
नाम्ना च शिवभूतिः केवलज्ञानी स्फुटं जातः ।।५३।।

अर्थ :— आचार्य सांगतात कीं, शिवभूति मुनिने शास्त्रे वाचली नव्हती परंतु 'तुष माष' असे शद्ब घोकत भावांची विशुद्धतेने महानुभाव होवून केवलज्ञान प्राप्त करून घेतले हे प्रसिद्ध आहे.

भावार्थ :— कोणी समजत असेल कीं, शास्त्र वाचल्याने सिद्धि मिळते तर तसेही नाही. शिवभूति मुनिने तुषमाष असा शद्ब सतत घोकून भावांची विशुद्धता करून केवलज्ञान प्राप्त करून घेतले. याची कथा अशा प्रकारे आहे. एक शिवभूति नांवाचे मुनि होते. त्यानी गुरूंच्या जवळ शास्त्रांचा अभ्यास केला परंतु फल मिळाले नाही. तेंव्हा गुरू ने एक शद्ब शिकवला कीं, ''मा रूष मा तुष'' तो हा शद्ब घोकत राहिला. याचा अर्थ असा आहे कीं, रोष करू नका, तोष करू नका अर्थात् राग द्वेष करू नका म्हणजे सर्व सिद्धि प्राप्त होईल.

पुन्हा हे ही शुद्ध लक्षात राहिले नाही तर ''तुष माष'' असा पाठ घोकू लागला. दोन्ही पदांचे रूकार आणि तुकार विसरून गेले आणि 'तुषमाष' अशा प्रकारेच लक्षात राहिले. ते च पाठ करत राहिले तेंव्हा कोणीतरी एक बाई उडदाची दाळ धुवत होती तिला कोणीतरी विचारले कीं, तू काय करतेस ? तेंव्हा ती

---

१. मुद्रित संस्कृत सटीक प्रतिमध्यें ही गाथा अशाप्रकारे आहे :—

अंगाइं दस य दुण्णिय य च उदसपुव्वाइं सयल सुयणाणं ।
पढिओ अभव्वसेणो ण भावसवणत्तणं पत्तो ।।५२।।
अंगानि दश च द्वे च चतुर्दशपूर्वाणि सकलश्रुतज्ञानम् ।
पठितश्च अभव्यसेन: न भावश्रमणत्वं प्राप्त: ।।५२।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



म्हणाली तुष आणि माष निरनिराळे करत आहे. ते ऐकून त्या मुनिने 'तुषमाष' शब्दाचा भावार्थ हे शरीर तुष आहे आणि हा आत्मा माष आहे. दोन्ही भिन्न भिन्न आहेत. अशाप्रकारे भाव जाणून आत्म्याचा अनुभव करू लागला. चिन्मात्र शुद्ध आत्म्याला जाणून त्यात लीन झाला, तेंव्हा घाति कर्मांचा नाश करून केवलज्ञान प्राप्त केले. अशाप्रकारे भावांच्या विशुद्धतेने सिद्धि प्राप्त झाली. यावरून भावशुद्ध करा. असा उपदेश मिळतो. ।।५३।।

पुढे हा अर्थ सामान्यरूपाने सांगतात :—

भावेण होइ णग्गो वाहिरलिंगेण किं च णग्गेण।
कम्मपयडीय णियरं णासइ भावेण दव्वेण ।।५४।।

भावेन भवति नग्नः बहिर्लिंगेन किं च नग्नेन ।
कर्मप्रकृतीनां निकरं नाशयति भावेन द्रव्येण ।।५४।।

अर्थ :— भावाने नग्न होतो, बाह्यत: नग्न होवून काय कार्य होते ? अर्थात् होत नाही, कारण कीं, भावसहित द्रव्यलिंगाने कर्मप्रकृतिच्या समुहाचा नाश होतो.

भावार्थ :— आत्म्याच्या कर्म प्रकृतिच्या नाशाने निर्जरा तसेच मोक्ष होणे कार्य आहे. हे कार्य द्रव्य लिंगाने होत नाही. भाव सहित द्रव्य लिंग झाल्याने कर्मांची निर्जरा नांवाचे कार्य होते. केवळ द्रव्यलिंगाने होत नाही. म्हणून भाव सहित द्रव्यलिंग धारण करण्याचा उपदेश आहे. ।।५४।।

पुढे हाच अर्थ दृढ करतात :—

णग्गत्तणं अकज्जं भावणरहियं जिणेहिं पण्णत्तं ।
इय णाऊण य णिच्चं भाविज्जहि अप्पयं धीर ।।५५।।

नग्नत्वं अकार्यं भावरहितं जिनैः प्रज्ञप्तम् ।
इति ज्ञात्वा नित्यं भावयेः आत्मानं धीर ! ।।५५।।

अर्थ :— भाव रहित नग्नत्व अकार्य आहे, कांही कार्य करणारे नाही असे जिनदेव म्हणतात. अशाप्रकारे जाणून हे धीर, हे धैर्यवान मुने ! निरंतर नित्य आत्म्याची भावना कर.

भावार्थ :— आत्म्याची भावना नग्नत्वाशिवाय कोणतेही कार्य करणारी नाही. म्हणून चिदानंद स्वरूप आत्म्याची भावना निरंतर करा. आत्म्याच्या भावनेसहित नग्नत्व सफल होते. ।।५५।।

www.vitragvani.com



पुढे शिष्य विचारतात भावलिंगाला प्रधान करून निरूपण केले ते भावलिंग कसे आहे ? याचे समाधान करण्यासाठीं भावलिंगाचे निरूपण करतात.

देहादिसंगरहिओ माणकसाएहिं सयलपरिचत्तो ।
अप्पा अप्पम्मि रओ स भावलिंगी हवे साहू ।।५६।।

देहादिसंगरहितः मानकषायैः सकलपरित्यक्तः ।
आत्मा आत्मनि रतः स भावलिंगी भवेत् साधु ।।५६।।

अर्थ :— भाव लिंगी साधू असा असतो, — देहादिक परिग्रहाने रहित असतो तसेच मान, कषायाने रहित असतो आणि आत्म्यात लीन असतो. तोच आत्मा भावलिंगी आहे.

भावार्थ :— आत्म्याच्या स्वाभाविक परिणामाला 'भाव' म्हणतात. उस-रूप म्हणजे त्याप्रमाणे लिंग (चिन्ह) लक्षण तसेच रूप असेल तर ते भाव लिंग आहे. आत्मा अमूर्तिक, चेतनारूप आहे, त्याचा परिणाम दर्शनज्ञान आहे. त्यांच्यात कर्माच्या निमित्ताने (पराश्रय केल्याने) बाह्यत: शरिरादिक मूर्तिक पदार्थाचा संबंध आहे आणि अंतरंग मिथ्यात्व आणि रागद्वेष आदि कषायांचा भाव आहे.

म्हणून म्हणतात कीं, :—

बाह्यत: देहादिक परिग्रहाने रहित आणि अंतरंग रागादिक परीणामात अहंकाररूप मानकषाय, परभावात आपलेपणा मानणे या भावाने रहित असेल, आणि आपल्या ज्ञानदर्शनरूप चेतनाभावाने लीन असाल तर ते भावलिंग आहे ज्याना अशाप्रकारचे भाव होतील ते भावलिंगी साधू आहे. ।।५६ ।।

पुढे या अर्थाला स्पष्ट करून सांगतात :—

ममत्तिं परिवज्जामि णिम्ममत्तिमुवट्ठिदो ।
आलंबणं च मे आदा अवसेसाइं वोसरे ।।५७।।

ममत्वं परिवर्जामि निर्ममत्वमुपस्थितः ।
आलंबनं च मे आत्मा अवशेषानि व्युत्सृजामि ।।५७।।

अर्थ :— भावलिंगी मुनिचे अशा प्रकारचे भाव असतात, — मी परद्रव्य आणि परभावाने ममत्व (आपले मानणे) सोडतो आणि माझा निजभाव ममत्वरहित आहे त्याचा अंगिकार करून स्थित झालो आहे. आता मला आत्म्याचेच अवलंबन आहे अन्य सर्व सोडले आहे.

भावार्थ :— सर्व परद्रव्याचे आलंबन सोडून आपल्या आत्मस्वरूपात स्थित होणे असे भावलिंग आहे ।।५७।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे सांगतात कीं, ज्ञान, दर्शन, संयम, त्याग, संवर आणि योग हे भाव भावलिंगी मुनिंचे असतात. हे अनेक आहेत तरीही आत्माच आहे तरीही यापेक्षा ही अभेदाचाच अनुभव करतो :—

**आदा खु मज्झ णाणे आदा मे दंसणे चरित्ते य ।**
**आदा पच्चक्खाणे आदा मे संवरे जोगे ॥५८॥**

आत्मा खलु मम ज्ञाने आत्मा मे दर्शने चरित्रे च ।
आत्मा प्रत्याख्याने आत्मा मे संवरे योगे ॥५८॥

अर्थ :— भावलिंगी मुनि विचारतात कीं, — माझे ज्ञानभाव प्रकट आहेत त्यात आत्म्याचीच भावना आहे. ज्ञान कोणती निराळी वस्तु नाही. ज्ञान आहे तोच आत्मा आहे, अशाप्रकारे दर्शनात ही आत्माच आहे. ज्ञानात स्थिर राहणे चारित्र आहे त्यात ही आत्माच आहे. प्रत्याख्यान (अर्थात् शुद्धनिश्चय नयाचे विषयभूत स्वद्रव्याच्या अलंबनाच्या बलाने) आगामी परद्रव्याचे भावरूप परिणमन आहे. या भावात ही माझा आत्माच आहे आणि योगाचा अर्थ एकाग्रचिंतारूप समाधि-ध्यान आहे. या भावात ही माझा आत्माच आहे.

भावार्थ :— ज्ञानादिक कांही भिन्न पदार्थ नाहीत, आत्म्याचेच भाव आहेत, संज्ञा, संख्या, लक्षण आणि प्रयोजनाच्या भेदाने भिन्न म्हणतात. तेथे अभेददृष्टिने पाहिले तर हे सर्व भाव आत्माच आहेत म्हणून भावलिंगी मुनिंचा अभेद अनुभवण्यात विकल्प नाही. म्हणून निर्विकल्प अनुभव सिद्धी आहे हे जाणून अशा प्रकारे सांगतात ॥५८॥

पुढे हाच अर्थ दृढ करताना सांगतात :—

* अनुष्टुप् श्लोक *

**एगो मे सस्सदो अप्पा णाणदंसणलक्खणो ।**
**सेसा मे बाहिरा भावा सव्वे संजोगलक्खणा ॥५९॥**

एकः मे शाश्वतः आत्मा ज्ञानदर्शनलक्षणः ।
शेषाः मे बाह्याः भावाः सर्वे संयोगलक्षणाः ॥५९॥

अर्थ :— भावलिंगी मुनि विचारतात कीं, — ज्ञान, दर्शन, लक्षण रूप आणि शाश्वत अर्थात् नित्य असा आत्मा आहे तोच एक माझा आहे. शेष भाव आहेत ते माझ्यापेक्षा निराळे (बाह्य) आहेत. ते सगळे संयोगरूप आहेत, परद्रव्य आहेत.

भावार्थ :— ज्ञानदर्शन स्वरूप नित्य एक आत्मा आहे ते माझे रूप आहे, एक स्वरूप आहे आणि अन्य परद्रव्य आहे ते माझ्यापेक्षा निराळे (बाह्य) आहे. सर्व संयोगस्वरूप आहे, भिन्न आहे ही भावना भाव लिंगी मुनिंची आहे. ॥५९॥

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

पुढे सांगतात कीं, जो मोक्षाची इच्छा करतो त्यानी अशाप्रकारे आत्म्याची भावना करावी :—

भावेह भावसुद्धं अप्पा सुविसुद्धणिम्मलं चेव ।
लहु चउगइ चइऊणं जइ इच्छसि सासयं सुक्खं ॥६०॥

भावय भावशुद्धं आत्मानं सुविशुद्धनिर्मलं चैव ।
लघु चतुर्गति च्युत्वा यदि इच्छसि शाश्वतं सौख्यम् ॥६०॥

अर्थ :— हे मुनि जनो ! जर चतुर्गति संसारातून सुटून शिघ्र, शाश्वत, सुखरूप मोक्षाची तुम्ही इच्छा करत असाल तर भावाने शुद्ध जसे होत जाल तसे अतिशय विशुद्ध निर्मल आत्म्याला प्राप्त करून घ्याल.

भावार्थ :— जर संसारातून निवृत्त होवून मोक्षाची इच्छा करत असाल तर द्रव्यकर्म, भावकर्म आणि नो कर्मांने रहित शुद्ध आत्म्याची भक्ती करा अशा प्रकारचा उपदेश आहे. ॥६० ॥

पुढे म्हणतात कीं, जो आत्म्याला भजतो त्याने त्याचा स्वभाव जाणून भक्ती करावी, म्हणजे तो मोक्ष प्राप्त करतो :—

जो जीवो भावंतो जीवसहावं सुभावसंजुत्तो ।
सो जरमरणविणासं कुणइ फुडं लहइ णिव्वाणं ॥६१॥

यः जीवः भावयन् जीवस्वभावं सुभावसंयुक्तः ।
सः जरामरणविनाशं करोति स्फुटं लभते निर्वाणम् ॥६१॥

अर्थ :— जो भव्य पुरूष जीवाचा स्वभाव जाणतो तो जरा मरणाचा विनाश करून निर्वाण प्राप्त करून घेतो.

भावार्थ :— 'जीव' अशा शब्द लोकात प्रसिद्ध आहे, परंतु याचा स्वभाव कसा आहे ? अशा प्रकारचे लोकाना यथार्थ ज्ञान नाही आणि मतांतराच्या दोषामुळे याचे स्वरूप विपर्यय होत आहे. म्हणून याचे यथार्थ स्वरूप जाणून भावना करतात ते संसारातून निवृत्त होवून मोक्ष प्राप्त करून घेतात. ॥६१ ॥

पुढे जीवाचे सर्वज्ञदेवाने सांगितलेले स्वरूप सांगत आहेत :—

जीवो जिणपण्णत्तो णाणसहाओ य चेयणासहिओ ।
सो जीवो णायव्वो कम्मक्खयकरणणिम्मित्तो ॥६२॥

जीवः जिनप्रज्ञप्तः ज्ञानस्वभावः च चेतनासहितः ।
सः जीवः ज्ञातव्यः कर्मक्षयकरणनिमित्तः ॥६२॥

अर्थ :— जिन सर्वज्ञदेवाने जीवाचे स्वरूप अशाप्रकारे सांगितले आहे — जीव चेतने सहित असून ज्ञान स्वभावी आहे, अशाप्रकारे जीवाची भावना करणे, जे कर्माच्या क्षयाचे निमित्त जाणले पाहिजे.

भावार्थ :— जीवाला चेतने सहित असे विशेषण लावण्याचे कारण 'चार्वाक' जीवाला चेतनेसहित मानत नाहीत म्हणून त्याचे निराकरण केले आहे. ज्ञानस्वभाव विशेषणाने सांख्यमती ज्ञानाला प्रधान धर्म मानतात, जीवाला उदासीन नित्य चेतनारूप मानतो त्याचे निराकरण आहे, आणि नैयायिकमती गुण-गुणीचा भेद मानून ज्ञानाला नेहमी भिन्न मानतात त्याचे निराकरण केले आहे. अशा प्रकारे जीवाच्या स्वरूपाला जाणून घेणे कर्माच्या क्षयाचे निमित्त होते. अन्यप्रकार मिथ्याभाव आहेत. ।।६२।।

पुढे सांगतात कीं, जो पुरूष जीवाचे अस्तित्व मानतात ते सिद्ध आहेत :—

जेसिं जीवसहावो णत्थि अभावो य सव्वहा तत्थ ।
ते होंति भिण्णदेहा सिद्धा वचिगोयरमतीदा ।।६३।।

येषां जीवस्वभावः नास्ति अभावः च सर्वथा तत्र ।
ते भवन्ति भिन्नदेहाः सिद्धाः वचोगोचरातीताः ।।६३।।

अर्थ :— ज्या भव्यजीवाना जीव नांवाचा पदार्थ सद्‌भावरूप आहे आणि सर्वथा अभावरूप नाही ते भव्यजीव देहापासून भिन्न तसेच वचन गोचरातीत सिद्ध होतात.

भावार्थ :— जीव द्रव्यपर्यायस्वरूप आहे, कथंचित् आस्तिस्वरूप आहे कथंचित् नास्तिस्वरूप आहे. पर्याय अनित्य आहे, या जीवाच्या कर्माच्या निमित्ताने मनुष्य, तीर्यंच देव आणि नारक पर्याय असतात. त्याचा कदाचित् अभाव पाहून जीवाचा सर्वथा अभाव मानतात. त्याना संबोधन करण्यासाठी असे म्हटले आहे कीं, जीवाचा द्रव्यदृष्टिने स्वभाव नित्य आहे. पर्यायाचा अभाव झाल्यानंतर सर्वथा अभाव मानत नाहीत, तो देहापासून भिन्न होवून सिद्ध परमात्मा होतो. ते सिद्ध वचनगोचर नाही जे देहाला नष्ट होताना पाहून जीवाचा सर्वथा नाश मानतात ते मिथ्यादृष्टि आहेत ते सिद्ध-परमात्मा कसे असतील ? अर्थात् तसे नसतील ।।६३।।

पुढे म्हणतात कीं, जे जीवाचे स्वरूप वचन अगोचर आहे आणि अनुभवगम्य आहे ते अशा प्रकारे आहे :—

अरसमरूवमगंधं अव्वत्तं चेयणागुणमसद्दं ।
जाणमलिंगग्गहणं जीवमणिद्दिट्ठसंठाणं ।।६४।।

अरसमरूपमगंधं अव्यक्तं चेतनागुणं अशब्दम् ।
जानीहि अलिंगग्रहणं जीवं अनिर्दिष्टसंस्थानम् ।।६४।।

अर्थ :— हे भव्य ! तू जीवाचे स्वरूप अशा प्रकारे जाण — कसे आहे ? अरस अर्थ पांच प्रकारचे आंबट, गोड, कडू, तुरट, खारट, रसानी रहित आहे. काळा, पिवळा, लाल, सफेद आणि हिरवा (रंगरहित) अशा प्रकारे अरूप अर्थात् पांच प्रकारचे रूपाने रहित आहे. दोन प्रकारच्या गंधाने रहित आहे. अव्यक्त अर्थात् इंद्रियगोचर व्यक्त नाही. चेतन गुणवाला आहे. अशद्ब अर्थात् शद्ब रहित आहे. अलिंगग्रहण अर्थात् ज्याचे कोणतेही चिन्ह

www.vitragvani.com



इंद्रियद्वारे ग्रहण होत नाही. अनिर्दिष्ट संस्थान अर्थात् चौकोन गोल आदि काही आकार त्याचा सांगता येत नाही. अशा प्रकारे जीवाचे वर्णन आहे.

भावार्थ :— रस, रूप, गंध, शद्ब हे तर पुद्‌गलाचे गुण आहेत या व्यतिरिक्त जीव आहे, अव्यक्त, अलिंगग्रहण, अनिर्दिष्टसंस्थान म्हटले आहे, हे ही पुद्‌गलाच्या स्वभावाच्या अपेक्षेने निषेधरूपच जीव म्हटला आहे आणि चेतनागुण म्हटले आहे तर तो जीवाचा स्वभाव आहे. निषेध अपेक्षेने तर बचनाच्या अगोचर जाणावे आणि विधि अपेक्षेने स्वसंवेदन गोचर जाणावे. अशाप्रकारे जीवाचे स्वरूप जाणून तो अनुभव गोचर करावा. हे समयसारात ४९, प्रवचनसार १७२, नियमसरात ४६, पंचास्तिकायमध्यें १२७, धवलाटीका पु.—३, पृ.२ लघुद्रव्यसंग्रह गाथा – ५ आदि ग्रंथात आहे. याचे वर्णन टीकाकारानी विशेष केले आहे. ते तेथून जाणून घ्यावे. ।।६४।।

पुढे जीवाचा स्वभाव ज्ञानस्वरूप (भावना) सांगितला आहे. ते ज्ञान किती प्रकारचे आहे ते सांगत आहेत:—

भावहि पंचपयारं णाणं अण्णाणणासणं सिग्घं ।
भावणभावियसहिओ दिवसिवसुहभायणो' होइ ।।६५।।

भावय पंचप्रकारं ज्ञानं अज्ञाननाशनं शीघ्रम् ।
भावनाभावितसहितः दिवशिवसुखभाजनं भवति ।।६५।।

अर्थ :— हे भव्यजन ! तू हे ज्ञान (५ प्रकारे) आहे त्याची भक्ती कर. कसे आहे हे ज्ञान ? अज्ञानाचा नाश करणारे आहे. कशी भक्ती करा ? भावनेने भरलेला जो भाव त्या सहित भक्ती करा. त्यामुळे तू दिव (स्वर्ग) आणि शिव (मोक्ष) प्राप्त करण्यास योग्य होशील.

भावार्थ :— जरी ज्ञान जाणण्याच्या स्वभावामुळे एक प्रकारचे आहे तरी ही कर्माच्या क्षयोपशम आणि क्षयाच्या अपेक्षेने पांच प्रकारचे आहे. त्यात मिथ्यात्वभावाच्या अपेक्षेने मति, श्रुत आणि अवधि हे तीन मिथ्याज्ञान ही म्हटले जाते. म्हणून मिथ्याज्ञानाचा अभाव करण्यासाठी मति, श्रुत, अवधि, मन:पर्याय आणि केवलज्ञानस्वरूप पांच प्रकारचे सम्यक्‌ज्ञान जाणून त्यांची भक्ती कर. परमार्थ विचाराने ज्ञान एकाच प्रकारचे आहे. ही ज्ञानाची भावना स्वर्ग - मोक्ष देणारे आहे ।।६५।।

पुढे सांगतात कीं, वाचणे, ऐकणे सुद्धां 'भाव' असल्याशिवाय काही नाही :—

पढिएणवि किं कीरइ किं वा सुणिएण भावरहिएण ।
भावो कारणभूदो सायारणयारभूदाणं ।।६६।।

पठितेनापि किं क्रियते किं वा श्रुतेन भावरहितेन ।
भावः कारणभूतः सागारानगारभूतानाम् ।।६६।।

www.vitragvani.com



अर्थ :— भावरहित वाचण्या, ऐकण्याचा काय फायदा ? अर्थात् काहीं ही कार्यकारी नाही, म्हणून श्रावकत्व तसेच मुनित्व याचे कारणभूत भावच आहेत.

भावार्थ :— मोक्षमार्गात सर्वदेश व्रतांच्या प्रवृत्तिरूप मुनि - श्रावकपणा आहे. त्या दोन्हीला कारणभूत निश्चय सम्यक्‌दर्शनादिक भाव आहेत. भावाशिवाय व्रतवैकल्ये काही कार्यकारी नाहीत, म्हणून असा उपदेश आहे कीं, भावाशिवाय वाचणे, ऐकणे आदि ने काय होणार ? केवळ खेदमात्र आहे ! म्हणून भावासहित जे कराल ते सफल आहे. येथे असा आशय आहे कीं, कोणी म्हणत असेल कीं, वाचणे ऐकणे हे च ज्ञान आहे तर तसे नाही. वाचून ऐकून आपल्याला ज्ञानस्वरूप जाणून अनुभव करा म्हणजे भाव समजेल ! म्हणून वेळोवेळी (वरचेवर) सतत भावनेने भाव लावल्यानंतर सिद्धि मिळते. ।।६६।।

पुढे म्हणतात कीं, जर बाह्य नग्नतेने सिद्धि असेल तर नग्नतर सगळेच होतात :—

दव्वेण सयल णग्गा णारयतिरिया य सयलसंघाया ।
परिणामेण असुद्धा ण भावसवणत्तणं पत्ता ।।६७।।

द्रव्येण सकला नग्नाः नारकतिर्यंचश्च सकलसंघाताः ।
परिणामेन अशुद्धाः न भावश्रमणत्वं प्राप्ताः ।।६७।।

अर्थ :— द्रव्य दृष्टीने तर सर्व प्राणी नग्न असतात. नारकी जीव आणि तिर्यंच जीव तर निरंतर वस्त्रादिने रहित नग्नच राहातात. 'सकल संघात' म्हणण्याने अन मनुष्यादि ही कारण पाहून नग्न होतात तरी ते परिणामाने अशुद्ध आहेत. म्हणून भावश्रमणपणाला प्राप्त होत नाहीत.

भावार्थ :— जर नग्न राहिल्यानेच मुनिलिंग होत असेल तर नारकी तीर्यंच आदि सर्व जीव समुह नग्न असतात ते सर्व मुनि म्हणवले असते म्हणून मुनिपण तर भावशुद्ध झाल्यानंतरच येते. अशुद्धभाव झाल्यानंतर द्रव्यरूपाने नग्न ही झाले तरी भावमुनिपणा येत नाही. ।।६७।।

पुढे हा अर्थ दृढ करण्यासाठी केवळ नग्नपणाची निष्फलता दाखवत आहेत :—

णग्गो पावइ दुक्खं णग्गो संसारसायरे भमई ।
णग्गो न लहइ बोहिं जिणभावणवज्जिओ सुइरं ।।६८।।

नग्नः प्राप्नोति दुःखं नग्नः संसारसागरे भ्रमति ।
नग्नः न लभते बोधिं जिनभावनावर्जितः सुचिरं ।।६८।।

अर्थ :— नग्न नेहमी दु:खी होतो, नग्न नेहमी संसार समुद्रात भ्रमण करतो आणि नग्न 'बोधि' अर्थात् सम्यक्‌दर्शन, ज्ञान, चारित्ररूप स्वानुभव प्राप्त करूं शकत नाही, कसा आहे तो नग्न जो जिनभावनेने रहित आहे.

www.vitragvani.com



<u>भावार्थ :</u>— 'जिनभावना' जी सम्यक्दर्शन भावना त्याने रहित जो जीव आहे तो नग्न जरी राहिला तरी 'बोधी' जो सम्यक्दर्शन, ज्ञान-चरित्र स्वरूप मोक्षमार्गाला प्राप्त करूं शकत नाही. म्हणून संसार समुद्रात भ्रमण करणारा संसारातच दु:खी होतो तसे वर्तमानात ही जे पुरूष नग्न होतात ते दु:खी होतात. सुख तर भावमुनि नग्न झाले तर तेच प्राप्त करूं शकतात. ॥६८॥

पुढे हा अर्थ दृढ करण्यासाठी सांगतात जे फक्त द्रव्यनग्न होवून मुनि म्हणतात असतील तर ते अपयशी आहेत :—

अयसाण भायणेण य किं ते णग्गेण पावमलिणेण ।
पेसुण्णहासमच्छरमायाबहुलेण सवणेण ॥६९॥

अयशसां भाजनेन च किं ते नग्नेन पापमलिनेन ।
पैशून्यहासमत्सरमायाबहुलेन श्रमणेन ॥६९॥

<u>अर्थ :</u>— हे मुने ! तुझ्या अशा नग्नपणाने तसेच मुनिपणाचे साध्य काय आहे ? ते कसे आहे ? — पैशून्य अर्थात् आपल्या बरोबर वाल्याशी ईर्षा ठेवून दुसऱ्याला कमी लेखण्याची बुद्धि, माया अर्थात् कुटिल परिणाम, हे भाव त्यात प्रामुख्याने मिळतात, म्हणून ते पापाने मलिन आहेत आणि त्यात अयश अर्थात् अपर्किर्ति आहे.

<u>भावार्थ :</u>— पैशून्य आदि पापासून मलिन अशा प्रकारे नग्न स्वरूप मुनिपणा पासून साध्य काय आहे ? उलट अपकीर्ति होवून व्यवहार धर्माचे हसे करणारे ते होते. म्हणून भावलिंगी होणेच योग्य आहे — असा उपदेश आहे. ॥६९॥

पुढे अशा प्रकारे भावलिंगी होण्याचा उपदेश करतात :—

पयडहिं जिणवरलिंगं अब्भिंतरभावदोसपरिसुद्धो ।
भावमलेण य जीवो बाहिरसंगम्मि मयलियई ॥७०॥

प्रकटय जिनवरलिंगं अभ्यन्तरभावदोषपरिशुद्धः ।
भावमलेन च जीवः बाह्यसंगे मलिनयति ॥७०॥

<u>अर्थ :</u>— हे आत्मन् ! तू अन्यन्तर भावदोषाने अत्यन्त शुद्ध असे जिनवर लिंग अर्थात् बाह्य निर्ग्रंथ लिंग प्रकट करून; भावशुद्धि शिवाय द्रव्यलिंग बिघडेल कारण की भावमिलन जीव बाह्य परिग्रहात मलिन होतात.

<u>भावार्थ :</u>— जर भाव शुद्ध करून द्रव्यलिंग धारण केले तर भ्रष्ट होणार नाही आणि भाव मलिन असतील तर बाह्य परिग्रहाच्या संगतिने द्रव्यलिंग ही बिघडेल म्हणून प्रधान रूपाने भावलिंगाचाच उपदेश आहे. विशुद्ध भावाशिवाय बाह्यवेश धारण करणे योग्य नाही. ॥७०॥

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे सांगतात कीं, जो भावरहित नग्न मुनि आहेत ते हास्याला पात्र आहेत :—

धम्मम्मि णिप्पवासो दोसावासो य इच्छुफुल्लसमो ।
णिप्फलणिग्गुणयारो णडसवणो णग्गरूवेण ॥७१॥

धर्मे निप्रवासः दोषावासः च इक्षुपुष्पसमः ।
निष्फलनिर्गुणकारः नटश्रमणः नग्नरूपेण ।।७१।।

अर्थ :— धर्म अर्थात् आपला स्वभाव तसेच दसलक्षण स्वरूपात ज्यांचा वास नाही तो जीव दोषांचा आवास आहे अथवा ज्यात दोष राहातात ते इक्षुच्या फुलाप्रमाणे आहे. ज्याला ना फळ लागते आणि ना त्यात गंधादिक गुण आहेत. म्हणून असे मुनि तर नग्नरूप करून नटश्रमण अर्थात् नाचणाऱ्या 'भांडा'च्या सोंगाप्रमाणे आहेत.

भावार्थ :— ज्यांना धर्माची इच्छा नाही त्यांच्यात क्रोधादिक दोष राहातात जर त्यानी दिगंबररूप धारण केले तर ते मुनि (उसाच्या) च्या फुला प्रमाणे निर्गुण आणि निष्फल आहेत. अशा मुनिना मोक्षरूप फल मिळत नाही. सम्यग्ज्ञानादिक गुण ज्यात नाहीत ते नग्न झाल्यानंतर 'भांड' सारखे सोंग दिसते. भांड जेंव्हा नाचतात तेंव्हा श्रृंगारादिक करून नाचले तर शोभते. नग्न होवून नाचले तर हास्यालाच पात्र होतात. तसेच केवळ द्रव्यनग्न हास्याचे स्थान आहे. ।।७१।।

पुढे अशा अर्थाच्या समर्थनरूप सांगतात कीं, द्रव्यलिंगी बोधि-समाधि जशी जिनमार्गात सांगितली आहे तशी मिळत नाही :—

जे रायसंगजुत्ता जिणभावणरहियदव्वणिग्गंथा ।
न लहंति ते समाहिं बोहिं जिणसासणे विमले ॥७२॥

ये रागसंगयुक्ताः जिनभावनारहितद्रव्यनिर्ग्रंथाः ।
न लभंते ते समाधिं बोधिं जिनशासने विमले ।।७२।।

अर्थ :— जे मुनि राग (अभ्यंतर), परद्रव्याची प्रीति व परिग्रहाने युक्त आहेत आणि जिनभावना अर्थात् शुद्ध स्वरूपाच्या भावनेने रहित आहेत ते द्रव्यनिर्ग्रंथ आहेत. तरी ही निर्मल जिनशासनात जे समाधि अर्थात् धर्मशुल्कध्यान आणि बोधि अर्थात् सम्यक्दर्शन ज्ञान, चारित्रस्वरूप मोक्षमार्ग प्राप्त करून घेत नाहीत.

भावार्थ :— द्रव्यलिंगी अभ्यन्तर राग सोडत नाहीत, परमात्म्याचे ध्यान करत नाहीत, तर त्याना कसा मोक्ष मिळेल तसेच समाधी मरण कसे येईल ? ।।७२ ।।

www.vitragvani.com



पुढे म्हणतात कीं, प्रथम मिथ्यात्व आदि दोष सोडून 'भाव' सहित नग्न होत जा नंतर द्रव्य मुनि बनावे हा मार्ग आहे.

भावेण होइ णग्गो मिच्छत्ताई य दोस चइऊणं ।
पच्छा दव्वेण मुणी पयडदि लिंगं जिणाणाए ॥७३॥

भावेन भवति नग्नः मिथ्यात्वादीन् च दोषान् त्यक्त्वा ।
पश्चात् द्रव्येण मुनिः प्रकटयति लिंगं जिनाज्ञया ॥७३॥

अर्थ :— प्रथम मिथ्यात्वादि दोषाना सोडून आणि भावाने अंतरंग नग्न व्हा शुद्धात्म्याचे एकरूप होवून श्रद्धान, ज्ञान, आचरण करा नंतर द्रव्यमुनि बाह्यलिंग जिन आज्ञेने प्रकट करा हा मार्ग आहे.

भावार्थ :— 'भाव' शुद्ध झाल्याशिवाय (प्रथमच) अगोदरच दिगंबर रूप केले तर नंतर भाव बिघडले तर भ्रष्ट होईल आणि भ्रष्ट होवून ही मुनि म्हणवले गेले तर मार्गाचे हसे होईल. म्हणून जिनआज्ञा हीच आहे कीं, भाव शुद्ध करून बाह्यमुनिपण प्रकट करा. ॥७३॥

पुढे म्हणतात कीं, शुद्धभावच स्वर्गमोक्षाचे कारण आहे. मलिनभाव संसाराचे कारण आहे :—

भावो वि दिव्वसिवसुक्खभायणे भाववज्जिओ सवणो ।
कम्ममलमलिणचित्तो तिरियालयभायणो पावो ॥७४॥

भावः अपि दिव्यशिवसौख्यभाजनं भाववर्जितः श्रमणः ।
कर्ममलमलिनचित्तः तिर्यगालयभाजनं पापः ॥७४॥

अर्थ :— भावच स्वर्ग मोक्षाचे कारण आहे. आणि भाव रहित श्रवण पापरूप आहेत, तिर्यंच गतिचे स्थान आहे तसेच कर्ममलाने मालिन चित्तवाला आहे.

भावार्थ :— भावाने शुद्ध आहे तो तर स्वर्ग — मोक्षाला पात्र आहे आणि भावाने मलिन आहे. तो तिर्यंच गतिमध्ये निवास करतो. ॥७४॥

पुढे पुन्हा 'भावां'च्या फलाचे महात्म्य सांगतात :—

खयरामरमणुयकरंजलिमालाहिं च संथुया विउला ।
चक्कहररायलच्छी लब्भइ बोही सुभावेण ॥७५॥

खचरामरमनुजकरांजलिमालाभिश्च संस्तुता विपुला ।
चक्रधरराजलक्ष्मीः लभ्यते बोधिः सुभावेन ॥७५॥

अर्थ :— सुभाव अर्थात् सद्भावाने मंदकषायरूप, विशुद्धभावाने चक्रवर्ति आदि राजांची विपुल अर्थात मोठी लक्ष्मी प्राप्त करून घेतो. कसे आहेत हे विद्याधर (खचर) अमर, देव आणि मनुष्यानी हात जोडून

www.vitragvani.com



नमस्कार करून स्तुति करण्यायोग्य आहेत आणि हा केवळ लक्ष्मीच प्राप्त करतो असे नाही तर बोधि म्हणजे रत्नत्रयात्मक मोक्षमार्ग ही प्राप्त करतो.

भावार्थ :— विशुद्ध भावांचे हे महात्म्य आहे ।।७५।।

पुढे भावांचे भेद सांगत आहेत :—

भावं तिविहपयारं सुहासुहं सुद्धमेव णायव्वं ।
असुहं च अट्टरुद्दं सुह धम्मं जिणवरिंदेहिं ।।७६।।

भावः त्रिविधप्रकारः शुभोऽशुभः शुद्ध एव ज्ञातव्यः ।
अशुभश्च आर्त्तरौद्रं शुभः धर्म्यं जिनवरेन्द्रैः ।।७६।।

अर्थ :— जिनवर देवाने तीन प्रकारचे भाव सांगितले आहेत १) शुभ, २) अशुभ, ३) शुद्ध आर्त्त आणि रौद्र हे अशुभ ध्यान आहे तसेच धर्मध्यान शुभ आहे ।।७६।।

सुद्धं सुद्धसहावं अप्पा अप्पम्मि तं च णायव्वं ।
इदि जिणवरेहिं भणियं जं सेयं तं समायरह ।।७७।।

शुद्धः शुद्धस्वभावः आत्मा आत्मनि सः च ज्ञातव्यः ।
इति जिनवरैः भणितं यः श्रेयान् तं समाचर ।।७७।।

अर्थ :— शुद्ध स्वभाव ही आपल्यातच आहे अशा प्रकारे जिनवर देवाने म्हटले आहे ते जाणून यात जे कल्याण रूप आहे त्याचा अंगिकार करा.

भावार्थ :— भगवंतानी भाव तीन प्रकारचे सांगितले आहेत, १) शुभ, २) अशुभ, ३) शुद्ध. अशुभतर आर्त आणि रौद्र ध्यान आहे ते तर अति मलिन आहे. त्याज्य आहे, धर्मध्यान शुभ आहे अशाप्रकारे हे कथंचित् उपादये आहे कारण कीं, हे आत्म्याचे स्वरूप आहे. अशा प्रकारे हेय, उपादये जाणून त्याग आणि ग्रहण केले पाहिजे, म्हणून असे म्हटले आहे कीं, जे कल्याणकारी आहे ते अंगीकार करणे हा जिनदेवाचा उपदेश आहे. ।।७७।।

पुढे म्हणतात कीं, जिन शासनाचे अशा प्रकारे महत्त्व आहे :—

पयलियमाणकसाओ पयलियमिच्छत्तमोहसमचित्तो ।
पावइ तिहुवणसारं बोही जिणसासणे जीवो ।।७८।।

प्रगलितमानकषायः प्रगलितमिथ्यात्वमोहसमचित्तः ।
आप्नोति त्रिभुवनसारं बोधिं जिनशासने जीवः ।।७८।।

अर्थ :— हा जीव 'प्रगलित मान कषाय:' अर्थात् ज्यांचा मान कषाय प्रकर्षाने गळून गेला आहे, कोणत्याही

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



परद्रव्यामुळे अहंकाररूप गर्व करत नाही आणि ज्याच्या मिथ्यात्वाचा उदयरूप मोह ही नष्ट झाला आहे म्हणून 'समचित्त' आहे. परद्रव्यात ममकाररूप मिथ्यात्व आणि इष्ट अनिष्ट बुद्धिरूप राग द्वेष ज्याना नाही ते जिनशासनात तीन भुवनात सार अशी बोधि अर्थात् रत्नत्रयात्मक मोक्षमार्गाला प्राप्त करतो.

भावार्थ :— मिथ्यात्वभाव आणि कषायभावाचे स्वरूप अन्य मतामध्ये यथार्थ नाही. हे कथन या वीतरागरूप जिनमतात आहे म्हणून हा जीव मिथ्यात्व कषायाच्या अभावरूप मोक्षमार्ग तीन लोकात सार जिनमताच्या सेवनाने मिळते अन्यत्र नाही.

पुढे म्हणतात कीं, जिनशासनात असे मुनिच तीर्थंकर प्रकृति बांधतात :—

**विसयविरत्तो सवणो छद्दसवरकारणाइं भाऊण ।**
**तित्थयरनामकम्मं बंधइ अइरेण कालेण ॥७९॥**

विषयविरक्तः श्रमणः षोडशवरकारणानि भावयित्वा ।
तीर्थंकरनामकर्म, बध्नाति अचिरेण कालेन ॥७९॥

अर्थ :— ज्याचे चित्त इंद्रियविषयापासून विरक्त आहे असा श्रमण अर्थात मुनि आहे. ते सोलहकारण भावना भावून 'तीर्थंकर' नाम प्रकृतिला थोड्याच वेळात बांधतो.

भावार्थ :— हे भावाचे महत्त्व आहे (सर्व वीतराग कथित तत्त्वज्ञान सहित स्वसन्मुखता सहित) विषयापासुन विरक्त भाव होवून सोलहकारण भावना भावली तर त्याचा अचिंत्य महिमा तीन लोकाना पूज्य 'तिर्थंकर' नाम प्रकृतिला बांधतो आणि त्याचा उपभोग घेवून मोक्षाला प्राप्त होतो. हे सोलह कारण भावनांची नांवे आहेत. १) दर्शनविशुद्धि, २) विनयसंपन्नता, ३) शीलव्रतेष्वनतिचार, ४) अभीक्ष्णज्ञानोपयोग, ५) संवग, ६) शक्तितस्त्याग, ७) शक्तितस्तप, ८) साधु समाधि, ९) वैयावृत्यकरण, १०) अर्हद्भक्ति, ११) आचार्यभक्ति, १२) बहुश्रुतभक्ति, १३) प्रवचनभक्ति, १४) आवश्यकापरिहाणि, १५) सन्मार्ग प्रभावना, १६) प्रवचन वात्सल्य अशा प्रकारच्या १६ भावना आहेत.

यांचे स्वरूप तत्वार्थसूत्राच्या टीकेतून जाणावे यात सम्यक्दर्शन प्रधान आहे. हे नसेल आणि १५ भावनांचा व्यवहार असेल तर तो कार्यकारी होत नाही आणि हे होत असेल तर १५ भावनांचे कार्य ही करेल असे जाणावे. ॥७९॥

पुढे भावाच्या विशुद्धतेचे निमित्त कारण सांगतात :—

**बारसविहतवयरणं तेरसकिरियाउ भाव तिविहेण ।**
**धरहि मणमत्तदुरियं णाणांकुसएण मुणिपवर ॥८०॥**

द्वादशविधतपश्चरणं त्रयोदश क्रियाः भावय त्रिविधेन ।
धर मनोमत्तदुरितं ज्ञानांकुशेन मुनिप्रवर ! ॥८०॥

अर्थ :— हे मुनिप्रवर ! मुनिमध्ये श्रेष्ठ ! तू १२ प्रकारच्या तपाचे आचरण कर आणि १३ प्रकारच्या क्रिया मन, वचन, कायेने भक्तिकर आणि ज्ञानरूपी अंकुशाने मनरूप मतवाले हत्तीला आपल्याकडे वश कर.

भावार्थ :— हा मनरूपी हत्ती फारच मदोनमत्त आहे, तो तपश्चरण क्रियादिकासहित ज्ञानरूप अंकुशाने वश होतो. म्हणून हा उपदेश आहे अन्य कोणत्याही प्रकारे वश होत नाही. बारा तपांची नांवे — १) अनशन, २) अवमौदूर्य, ३) वृत्तिपरिसंख्यान, ४) रसपरित्याग, ५) विविक्तशय्यासन, ६) कायक्लेश हे ६ प्रकारचे बाह्यरूप आहेत आणि १) प्रायाश्चित, २) विनय, ३) वैयावृत्य, ४) स्वाध्याय, ५) व्युत्सर्ग, ६) ध्यान हे ६ प्रकारचे अभ्यन्तर तप आहेत. यांचे स्वरूप तत्त्वार्थसूत्राच्या टीकेवरून जाणावे. १३ क्रिया अशा प्रकारे आहेत. — पंचपरमेष्ठीला नमस्कार या ५ क्रिया ६ आवश्यक क्रिया[1], निषाधिक क्रिया[2] आणि आसिकाक्रिया. अशा प्रकारे भाव शुद्ध होण्याची कारणे सांगितली. ॥८०॥

पुढे द्रव्य — भावरूप सामन्यरूपाने लिंगाचे स्वरूप सांगत आहेत :—

पंचविहचेलचायं खिदिसयणं दुविहसंजमं भिक्खू ।
भावं भावियपुव्वं जिणलिंगं णिम्मलं सुद्धं ॥८१॥

पंचविधचेलत्यागं क्षितिशयनं द्विविधसंयमं भिक्षु ।
भावं भावयित्वा पूर्वं जिनलिंगं निर्मलं शुद्धम् ॥८१॥

अर्थ :— निर्मलशुद्ध जिनलिंग अशा प्रकारे आहे, जेथे पांच प्रकारच्या वस्त्राचा त्याग आहे, भूमिवर शयन आहे, २ प्रकारचा संयम आहे, भिक्षा भोजन आहे, भावितपूर्व अर्थात् प्रथम शुद्ध आत्म्याचे स्वरूप परद्रव्याहून भिन्न सम्यक्दर्शन-ज्ञान-चारित्रमय झाले. त्याला वरचेवर भावनेने अनुभवले अशा प्रकारे ज्यात भाव आहे, असे निर्मल अर्थात् बाह्यमलरहित शुद्ध अर्थात् अन्तर्मलरहित जिनलिंग आहे.

भावार्थ :— येथे लिंगद्रव्य 'भावा'प्रमाणे २ प्रकारचे आहे. द्रव्य तर बाह्य त्यागाच्या अपेक्षेने आहे. ज्यात ५ प्रकार असे आहेत. १), अंडज अर्थात् रेशमाने बनलेले, २) बोंडूज अर्थात् कापसाने बनलेले, ३) रोमज - अर्थात् लोकरीने बनलेले ४ वलकलज अर्थात् वृक्षाच्या साली पासून बनलेले, ५) चर्मज अर्थात् मृग आदिच्या कातडीने बनलेले.

---

१. निषिधिका — जिन मंदिरात प्रवेश करताच गृहस्थ किंवा व्यंतरादि देव उपस्थित आहेत असे मानून आज्ञार्थ 'नि:सही' शद्ब तीन वेळा म्हटले जातात किंवा सम्यक् दर्शन, ज्ञान, चारित्र्यात स्थिर राहाणे नि:सही आहे.

२. धर्मस्थानापासून बाहेर निघताना विनय सहित निरोपाची आज्ञा मागण्यासाठी ''आसिका'' शद्ब म्हणतात किंवा पाप क्रियेने मन मोडणे 'आसिका' आहे.

अशा प्रकारे ५ प्रकार सांगितले. हे उपलक्षणात्मक आहेत या शिवाय ही आणखी वस्त्र ग्राह्य आहेत. म्हणून सर्व वस्त्रमात्रच त्याग जाणावा.

भूमिवर झोपणे, बसणे, यात काष्ठ, तृण ही मोजावे. इंद्रिय आणि मन वश करणे, षट्कायिक जीवांची रक्षा करणे अशा प्रकारे २ प्रकारचा संयम आहे. भिक्षा भोजन करणे ज्यात कृत, कारित, अनुमोदनेचा दोष लागत नाही व ४६ दोष टाळून ३२ अंतराय टाळून विधिनुसार आहार करावा. अशा प्रकारचे बाह्य लिंग आहे. अशा प्रकारे २ प्रकारचे शुद्ध जिनलिंग सांगितले आहे. अन्य प्रकार जे श्वेतांबरादिक सांगतात ते जिनलिंग नाहीत. ।।८१ ।।

पुढे जिनधर्माचा महिमा सांगतात :—

जह रयणाणं पवरं वज्जं जह तरुगणाण गोसीरं ।
तह धम्माणं पवरं जिणधम्मं भाविभवमहणं ।।८२।।

यथा रत्नानां प्रवरं वज्रं यथा तरुगणानां गोशीरम् ।
तथा धर्माणां प्रवरं जिनधर्मं भाविभवमथनम् ।।८२।।

अर्थ :— जसे रत्नामध्यें श्रेष्ठ रत्न उत्तम हिरा आहे आणि जसे तरूगणा (मोठेवृक्ष) मध्यें बावनचंदन (गोशीर) आहे. तसे धर्मात उत्तम भाविभवमथन (आगामी संसाराचे मंथन करणारा) जिनधर्म आहे, यामुळे मोक्ष मिळतो.

भावार्थ :— 'धर्म' असे सामान्य नाम तर लोकात प्रसिद्ध आहे आणि 'लोक' अनेक प्रकारानी क्रियाकांडादिकच धर्म समजून सेवन करतात, परंतु परीक्षा केल्यानंतर मोक्षाची प्राप्ती करणारा जिनधर्मच आहे. अन्य सगळे संसाराचे कारण आहेत. ते क्रियाकांडादिक संसारातच ठेवतात, कदाचित् संसारातील भोगांची प्राप्ति करून देतात तरीही परत भोगात लीन झाल्यामुळे एकेंद्रियादि पर्याय प्राप्त करून घेतात आणि नरकात जातात. असे अन्यधर्म नाम मात्र आहेत. म्हणून उत्तम जिनधर्मच जाणावा. ।।८२ ।।

पुढे शिष्य विचारतो कीं, जिनधर्माला उत्तम म्हटले तर धर्माचे स्वरूप काय आहे ?

पुढे शिष्य सांगतात कीं, धर्म अशाप्रकारे आहे.

पूयादिसु वयसहियं पुण्णं हि जिणेहिं सासणे भणियं ।
मोहक्खोहविहीणो परिणामो अप्पणो धम्मो ।। ८३ ।।

पूजादिषु व्रतसहितं पुण्यं हि जिनैः शासने भणितम् ।
मोहक्षोभविहीनः परिणामः आत्मनः धर्मः ।।८३।।

अर्थ :— जिन शासनामध्यें जिनेंद्र देवाने अशा प्रकारे म्हटले आहे कीं, पूजा आदिमध्ये असणे आणि व्रत वैकल्ये करणे हे पुण्यच आहे तसेच मोहाच्या क्षोभाने रहित जो आत्म्याचा परिणाम तो 'धर्म' आहे.

भावार्थ :— लौकिकजन तसेच अन्यमती म्हणतात कीं, पूजा आदि शुभक्रियेमध्ये आणि व्रतक्रियासहित आहे तो जिनधर्म आहे, परंतु असे नाही जिनमतामध्यें जिनभगवंताने अशाप्रकारे म्हटले आहे कीं, पूजादिकामध्ये आणि व्रतसहित असणे हे 'पुण्य' आहे यात पूजा आणि आदि शब्दाने भक्ती, वंदना,वैयवृत्य आदि समजणे हे तर देव गुरू शास्त्रसाठी असते आणि उपवास, आदि व्रते आहेत त्या शुभक्रिया आहेत यात आत्म्याचा रागसहित शुभपरिणाम आहे. त्यामुळे पुण्य कर्म होते म्हणून त्याला पुण्य म्हणतात. त्याचे फल स्वर्गादिक भोगाची प्राप्ति आहे.

मोहाच्या क्षोभाने रहित आत्म्याच्या परिणामाला धर्म समजावे. मिथ्यात्व तर अतत्त्वार्थश्रद्धान आहे. क्रोध-मान-अरति-शोक-भय-जुगुप्सा या ६ दोष प्रकृति आहेत आणि माया, लोभ, हास्य, रति हे चार तथा पुरूष, स्त्री, नपंसुक हे तीन विकार, अशा सात प्रकृति राग रूप आहेत. यांच्या निमित्ताने आत्म्याचे ज्ञान, दर्शन स्वभाव, विकारसहित, क्षोभरूप, चलाचल, व्याकुळ होतो. म्हणून या विकाराने रहित असाल तेंव्हा शुद्धदर्शनज्ञानरूप निश्चय असेल तो आत्म्याचा धर्म आहे. या धर्मामुळे आत्म्याच्या आगामी कर्माचा आस्त्रव थांबून संवर होतो आणि प्रथम बांधलेल्या कर्माची निर्जरा होते. संपूर्ण निर्जरा होईल तेंव्हा मोक्ष मिळतो तसेच एकदेश मोहाच्या क्षोभाची हानि होते म्हणून शुंभपरिणामाला ही उपचाराने धर्म म्हणतात आणि जो केवळ शुभपरिणामालाच धर्म मानून संतुष्ट आहे त्याना धर्माची प्राप्ति नाही हा जिनमताचा उपदेश आहे. ।।८३।।

पुढे म्हणतात कीं, 'पुण्या'लाच धर्म जाणून श्रद्धान करतो त्याला फक्त भोग (निमित्त) मिळतात, कर्मक्षयाचे निमित्त नाही :—

सद्दहदि य पत्तेदि य रोचेदि च तह पुणो वि फासेदि ।
पुण्णं भोयणिमित्तं ण हु सो कम्मक्खयणिमित्तं ।।८४।।

श्रद्दधाति च प्रत्येति च रोचते च तथा पुनरपि स्पृशति ।
पुण्यं भोगनिमित्तं न हि तत् कर्मक्षयनिमित्तम् ।।८४।।

अर्थ :— जो पुरूष पुण्याला धर्म जाणून श्रद्धान करतात, प्रतिति करतात, रूचि करतात आणि स्पर्श करतात त्यांना पुण्य भोगाचे निमित्त आहे. यामुळे स्वर्गादिक भोग मिळतात आणि ते पुण्य कर्माच्या क्षयाचे निमित्त होत नाही. हे स्पष्ट जाणले पाहिजे.

भावार्थ :— शुभक्रियारूप पुण्याला धर्म जाणून त्याचे श्रध्दान, ज्ञान, आचरण करतात त्याला पुण्यकर्माचा बंध होतो. त्यामुळे स्वर्गादिक भोगांची प्राप्ति होते आणि त्यामुळे कर्माचा क्षयरूप संवर निर्जरा मोक्ष होत नाही. ।।८४।।

www.vitragvani.com



पुढे म्हणतात कीं, जो आत्म्याचा स्वभावरूप धर्म आहे तेच मोक्षाचे कारण आहे. असा नियम आहे :-

अप्पा अप्पम्मि रओ रायादिसु सयलदोसपरिचत्तो ।
संसारतरणहेदू धम्मोत्ति जिणेहिं णिद्दिट्ठं ॥८५॥

आत्मा आत्मनि रतः रागादिषु सकलदोषपरित्यक्तः ।
संसारतरणहेतुः धर्म इति जिनैः निर्दिष्टम् ॥८५॥

<u>अर्थ:</u>— जर आत्मा रागादिक समस्त दोषानी रहित होवून आत्त्म्यात रत झाला तर अशा धर्माला जिनेश्वरदेवाने संसारसमुद्रातून तरण्याचे कारण म्हटले आहे.

<u>भावार्थ :</u>— जे प्रथम सांगितले होते कीं, मोहाच्या क्षोभाने रहित आत्म्याचा परिणाम आहे, तो धर्म आहे, असा धर्मच संसारातून पार करून मोक्षाचे कारण भगवंतानी म्हटले आहे. हा नियम आहे ॥८५॥

पुढे हाच अर्थ दृढ करण्यासाठीं म्हणतात कीं, जो आत्म्यासाठीं इष्ट करत नाही आणि समस्त पुण्याचे आचारण करतो तरीही सिध्दि प्राप्त होत नाही.

अह पुणु अप्पा णिच्छदि पुण्णाइं करेदि णिरवसेसाइं ।
तह वि ण पावदि सिद्धिं संसारत्थो पुणो भणिदो ॥८६॥

अथ पुनः आत्मानं नेच्छति पुण्यानि करोति निरवशेषानि ।
तथापि न प्राप्नोति सिद्धिं संसारस्थः पुनः भणितः ॥८६॥

<u>अर्थ :</u>— अथवा जो पुरूष आत्म्याचे चिंतन करत नाही, त्याचे स्वरूप जाणत नाही, अंगिकार करत नाही आणि सर्व प्रकारचे समस्त पुण्य करतो तरीही सिद्धि (मोक्ष) प्राप्त करून घेत नाही आणि संसारातच भ्रमण करत राहातो.

<u>भावार्थ :</u>— आत्म्याचा धर्म धारण केल्याशिवाय सर्व प्रकारच्या पुण्याचे आचरण केले तरी ही मोक्ष मिळत नाही, संसारातच राहातो. कदाचित् स्वर्गादिक भोग मिळाले तर भोगात आसक्त होवून राहातो. तेथून एकेंद्रिय जीव धारण करून संसारातच भ्रमण करतो.

पुढे या मुळेच आत्म्याचे श्रध्दान करा, प्रयत्नपूर्वक जाणा, मोक्ष प्राप्त करा, असा उपदेश केला आहे :-

एएण कारणेण य तं अप्पा सद्दहेह तिविहेण ।
जेण य लभेह मोक्खं तं जाणिज्जह पयत्तेण ॥८७॥

एतेन कारणेन च तं आत्मानं श्रद्धत्त त्रिविधेन ।
येन च लभध्वं मोक्षं तं जानीत प्रयत्नेन ॥८७॥

अर्थ :— मागे सांगितले आहेच कीं, आत्म्याचा धर्म तर मोक्ष आहे त्याच मुळें म्हणतात कीं, हे भव्य जीवा, तुम्ही त्या आत्म्याला प्रयत्नपूर्वक सर्व प्रकारचे उद्यम करून यथार्थ जाणा. त्या आत्म्याचे श्रध्दान करा, प्रतिति करा, आचरण करा मन-वचन, कायेने असे करा कीं, ज्या मुळें मोक्ष मिळेल.

भावार्थ :— ज्याना जाणणे आणि श्रध्दान केल्याने मोक्ष मिळतो त्याला जाणावे आणि श्रध्दान करावे म्हणजे मोक्ष प्राप्त होईल. म्हणून आत्म्याला जाणण्याचे कार्य सर्व प्रकारचे प्रयोग करून केले पाहिजे त्या मुळेच मोक्ष प्राप्ति होईल. म्हणून भव्यजीवाना हा उपदेश केला आहे. ।।८७।।

पुढे म्हणतात कीं, बाहय हिंसादिक क्रियेशिवाय च अशुध्द भावाने तंदुलमत्स्य जीव ही ७ व्या नरकात गेला, तर अन्य मोठ्या जीवांची काय कथा ?

मच्छो वि सालिसित्थो असुद्धभावो गओ महाणरयं ।
इय णाउं अप्पाणं भावह जिणभावणं णिच्चं ।।८८।।

मत्स्यः अपि शालिसिक्थः अशुद्धभावः गतः महानरकम् ।
इति ज्ञात्वा आत्मानं भावय जिनभावनां नित्यम् ।।८८।।

अर्थ :— हे भव्यजीव ! तू पहा तन्दुल मत्स्य सुध्दां अशुध्दभाव स्वरूप झाल्यामुळें ७ व्या नरकात (महानरक) गेला, म्हणून तुला उपदेश देतात कीं, आपल्या आत्म्याला जाणण्यासाठीं निरंतर जिनभावना कर.

भावार्थ :— अशुध्द भावाच्या महात्म्याने तंदुलमत्स्यासारखा अल्पजीवी सुध्दा ७ व्या नरकात गेला, तर अन्य मोठे जीव नरकात कां जाणार नाहीत ?

या करीतां भाव शुध्द करण्याचा उपदेश आहे. भाव शुध्द झाल्याने आपल्या दुसऱ्याचे स्वरूप जाणले जाते. आपल्या आणि दुसऱ्याच्या स्वरूपाचे ज्ञान जिनदेवाच्या आज्ञेची भावना निरंतर भावल्याने होते. म्हणून जिनदेवाच्या आज्ञेची भावना निरंतर करणे योग्य आहे.

तन्दुल मत्स्याची कथा अशी आहे - काकंदीपुरीचा राजा सुर सेन होता तो मांस भक्षी झाला. अत्यन्त लोलुपी, निरंतर मांस भक्षण करणारा होता. त्याचा 'पितृप्रिय' नावांचा स्वैपाकी होता. तो अनेक जीवांचे मांस निरंतर भक्षण करायला लावत होता. त्याला साप चावला त्यामुळे मृत्यु येवून स्वयंभूरमण समुद्रात महामत्स्य झाला. राजा सूरसेन ही मरून तेथेच महामत्स्याच्या कानात तंदुल मत्स्य झाला.

तेथे महामत्स्याच्या मुखात अनेक जीव आंत येत आणि बाहेर जात असतात, तेंव्हा तंदुल मत्स्य त्याना पाहून विचार करत असे कीं, हा महामत्स्य किती अभागी आहे जो तोंडात आलेल्या जीवाला खात नाही. जर माझे शरीर इतके मोठे असते तर या समुद्रातील सर्व जीवाना खाल्ले असते अशा पापी भावांमुळे जीवाला न खाता ही ७ व्या नरकात गेला आणि महामत्स्य तर खाणाराच होता त्यामुळें तो तर नरकात जाणारच होता.

म्हणून अशुध्द भाव सहित बाह्य पाप करणे तर नरकाचे कारण आहेच परंतु बाह्य हिंसादिक पाप न करता ही केवळ अशुध्द भाव ही त्या प्रमाणेच आहेत. म्हणून 'भावा' मधले अशुध्द ध्यान सोडून शुभ ध्यान

www.vitragvani.com



करणे योग्य आहे. येथे असे ही जाणावे कीं, प्रथम राज्य मिळाले होते ते पुण्याई चे फल होते. नंतर कुभाव झाल्यामुळें नरकात गेला म्हणून आत्मज्ञाना शिवाय केवळ पुण्य हे मोक्षाचे साधन नाही ।।८८।।

पुढे म्हणतात कीं, भावारहिताना बाह्य परिग्रहाचा त्यागादिक सर्व निष्प्रयोजनच आहे :-

बाहिरसंगच्चाश्रो गिरिसरिदरिकंदराइ आवासो ।
सयलो झाणज्झयणो णिरत्थश्रो भावरहियाणं ।।८९।।

बाह्यसंगत्यागः गिरिसरिद्दरीकंदरादौ आवासः ।
सकलं ध्यानाध्ययनं निरर्थकं भावरहितानाम् ।।८९।।

अर्थ :— जो पुरूष भाव रहित आहे. शुध्द आत्म्याच्या भावनेने रहित आहे आणि बाह्याचरणाने संतुष्ट आहे. त्यांचा बाह्य परिग्रहाचा त्याग निरर्थक आहे. गिरी, दरी, कंदर (गुहा) नदीकांठ इत्यादि राहाणे निरर्थक आहे. ध्यान करणे आसन द्वारे मनाचा निरोध करणे, अध्ययन हे सर्व निरर्थक आहे.

भावार्थ :— बाह्य क्रियेचे फल आत्मज्ञानासहित असेल तर ते सफल होते अन्यथा सर्व निरर्थक आहे. पुण्याचे फल सुध्दां संसाराचेच कारण आहे मोक्ष फल नाही. ।।८९।।

पुढे उपदेश करतात कीं, भाव शुध्दि साठी इंद्रियादिना वश करा. भाव शुध्दि शिवाय बाह्य वेशाचे अवडंबर करूं नका -

भंजसु इन्दियसेणं भंजसु मणमक्कडं पयत्तेण ।
मा जणरंजणकरणं बाहिर वयवेस तं कुणसु ।।९०।।

भंग्धि इन्द्रियसेनां भंग्धि मनोमर्कटं प्रयत्नेन ।
मा जनरंजनकरणं बहिर्व्रतवेष ! त्वंकार्षीः ।।९०।।

अर्थ :— हे मुने ! तूं इंद्रियाच्या सेनेला वश कर विषयात रमू नकोस, मनरूपी माकडाला प्रयत्नपूर्वक पुरूषार्थ करून वशीभूत कर आणि बाह्य व्रते लोकांची रंजन करणारी धारण करूं नकोस.

भावार्थ :— बाह्य मुनिचा पोषाख लोकांचे रंजन करणारा आहे, म्हणून हा उपदेश केला आहे, लोकरंजनाने कांहीं परमार्थ सिध्दि होत नाही म्हणून इंद्रिय आणि मनाला वश केल्याशिवाय केवळ लोकरंजन करणारा वेश धारण करून परमार्थ सिध्दि मिळत नाही. ।।९०।।

पुढे आणखी उपदेश सांगतात :-

णवणोकसायवग्गं मिच्छत्तं चयसु भावसुद्धीए ।
चेइयपवयणगुरुणं करेहिं भत्तिं जिणाणाए ।।९१।।

नवनोकषायवर्गं मिथ्यात्वं त्यज भावशुद्ध्या ।
चैत्यप्रवचनगुरूणां कुरु भक्तिं जिनाज्ञया ।।९१।।

www.vitragvani.com



अर्थ:— हे मुने ! तू जे श्रुतज्ञान तीर्थंकर भगवंतानी सांगितले आणि गणधर देवाने रचले अर्थात् शास्त्ररूप रचना केली त्याची सम्यक् प्रकारे भाव शुध्द करून निरंतर भावना करा. कसे आहे ते श्रुतज्ञान ? अतुल आहे इतर मताचे श्रुतज्ञान याच्या जवळपास ही नाही ।।९२।।

असे केल्याने काय होते? म्हणून म्हणतात :-

पाऊण णाणसलिलं णिम्महतिसडाहसोसउम्मुक्का ।
हुंति सिवालयवासी तिहुवणचूडामणी सिद्धा ।।९३।।

प्राप्य ज्ञानसलिलं निर्मथ्यतृषादाहशोषोन्मुक्ता ।
भवंति शिवालयवासिनः त्रिभुवनचूडामणयः सिद्धाः ।।९३।।

अर्थ:— पूर्वोक्त प्रकार भाव शुध्द केल्यानंतर ज्ञानरूपी जलाला पिवून सिध्द होतात, कसे आहेत सिध्द? निर्मथ्य अर्थात् मंथले जात नाहीत असे तृषा, दाह शोषाने रहित आहेत. अशा प्रकारे सिध्द होते, ज्ञानरूपी जल पिण्याचे हे फल आहे. सिध्दशिवालय अर्थात् मुक्तीरूपी महालात राहणारे आहेत, लोकांच्या शिखरावर ज्याचे स्थान आहे, म्हणजे कसे आहेत ? तीन भुवनाचे चुडामणी आहेत, मुकुटमणि आहेत, तसेच तीन भुवनात असे सुख नाही, असे परमानंद अविनाशी सुखाला ते भोगत आहेत अशा प्रकारे ते तीन भुवनाचे मुकुटमणि आहेत. ।।

भावार्थ:— शुध्द भाव करून ज्ञानरूप जल पीवून तृष्णा, दाह, शोष मिटवला जातो म्हणून असे म्हटले आहे कीं, परमानंदरूप सिध्द होते. ।।९३।।

पुढे भावशुध्दिसाठी पुन्हा उपदेश करत आहेत :-

दस दस दोसुपरीसह सहदि मुणी ! सयलकाल काएण ।
सुत्तेण अप्पमत्तो संजमघादं पमुत्तूण ।।९४।।

दश दश द्वौ सुपरीषहान् सहस्व मुने ! सकलकालं कायेन ।
सूत्रेण अप्रमत्तः संयमघातं प्रमुच्य ।। ९४ ।।

अर्थ:— हे मुने ! तू दहा दहा आणि दोन अर्थात् २२ जे सुपरिषह अर्थात् अतिशयकार सहण्यायोग्य सूत्राने अर्थात् जसे जिनवचनात सांगितले आहेत. त्याच पध्दतिने नि:प्रमादी होवून संयमाचा घात करून आणि तुझ्या कायेने निरंतर सदाकाल सहन कर

भावार्थ:— जसे संयम न बिघडता प्रमादाचे निवारण होईल. तसेच निरंतर मुनि क्षुधा, तृषा, आदि २२ परिषह सहन करतील. याना सहन करण्याचे प्रयोजन सूत्रात असे सांगितले आहे कीं, — हे सहन केल्याने कर्माची निर्जरा होते. आणि संयमाच्या मार्गाने सुट होत नाही, परिणाम दृढ होतात. ।।९४।।

www.vitragvani.com



पुढे सांगतात कीं, जो परिषद सहन करण्यासाठी दृढ असतो, तो उपसर्ग आल्यानंतर ही दृढ राहातो, च्युत होत नाही. त्याचा दृष्टांत देतात :—

जहपत्थरो ण भिज्जइ परिट्ठिओ दीहकालमुदकेण[1] ।
तह साहू वि ण भिज्जइ उवसग्गपरीषहेहिंतो ।।९५।।

यथा प्रस्तरः न भिद्यते परिस्थितः दीर्घकालमुदकेन ।
तथा साधुरपि न भिद्यते उपसर्गपरीषहेभ्यः ।।९५।।

अर्थ :— जसे दगड पाण्यात बराच काळ राहिले तरी त्याचे भेदन होत नाही तसेच साधू उपसर्ग परिषहाने भेदला जात नाही.

भावार्थ :— (दगड) पाषाण इतका कठिण असतो कीं, जरी तो पाण्यात बराच काळ पर्यंत राहिला तरी त्यात पाणी प्रवेश करत नाही, त्याचप्रमाणे साधुचे परिणाम असे दृढ असतात कीं, उपसर्ग परिषह आल्यानंतर ही संयमाच्या परिणामाने च्युत होत नाही आणि प्रथम सांगितल्याप्रमाणे संयमाचा घात होत नाही, परिषह सहन करतो. जर कदाचित् संयमाचा घात होतो असे वाटले तर तसा घात होणार नाही याची काळजी घेतात.

पुढे परिषह आल्यानंतर भाव शुद्ध राहातील असा उपाय सांगतात :—

भावहि अणुवेक्खाओ अवरे पणवीसभावणा भावि ।
भावरहिएण किं पुण बाहिरलिंगेण कायव्वं ।।९६।।

भावय अनुप्रेक्षाः अपराः पंचविंशतिभावनाः भावय ।
भावरहितेन किं पुनः बाह्यलिंगेन कर्त्तव्यम् ।।९६।।

अर्थ :— हे मुने ! तू अनुप्रेक्षा अर्थात् अनित्य आदि १२ अनुप्रेक्षा आहेत त्यांची भक्ती कर, आणि अपर अर्थात् अन्य ५ महाव्रतांची २५ भावना सांगितल्या आहेत. त्यांची भक्तीकर, भावरहित जे बाह्यलिंग आहे त्याचे कर्तव्य काय आहे ? अर्थात् काहींच नाही.

भावार्थ :— कष्ट आले तर १२ अनुप्रेक्षांचे चिंतन करावे. त्यांची नांवे अशी आहेत १. अनित्य, २. अशरण, ३. संसार, ४. एकत्व, ५. अन्यत्व, ६. अशुचित्त्व, ७. आस्रव, ८. संवर, ९. निर्जरा, १०. लोक, ११. बाधिदुर्लभ, १२. धर्म यांचे आणि आणखी २५ भावनांची भक्ती करणे हा चांगला उपाय आहे. यांचे वारंवार चिंतन केल्याने कष्टातही परिणाम बिघडत नाहीत. म्हणून हा उपदेश आहे. ।।९६ ।।

---

१. एका प्रतित 'पिऊण' असा पाठ आहे ज्याचे संस्कृत 'पीत्वा' अर्थात 'पीकर', पिवून ।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे पुन्हा भाव शुद्ध ठेवण्यासाठी ज्ञानाचा अभ्यास करतात :—

सव्वविरओ वि भावहि णव य पयत्थाइं सत्त तच्चाइं।
जीवसमासाइं मुणी चउदसगुणठाणणामाइं ॥९७॥

सर्वं विरतः अपि भावय नव पदार्थान् सप्त तत्त्वानि ।
जीवसमासान् मुने ! चतुर्दशगुणस्थाननामानि ॥९७॥

अर्थ :— हे मुने ! तू सर्व परिग्रहादि पासून विरक्त झाला आहेस, महाव्रतासहित आहेस तरी ही भाव विशुद्धि साठी ९ पदार्थ, सप्त तत्त्व, १४ जीव समास १४ गुणस्थाने यांची नांवे लक्षणे भेद इत्यादिंची भावना कर.

भावार्थ :— पदार्थांच्या स्वरूपाचे चिंतन करणे भाव शुद्धिचा मोठा उपाय आहे. म्हणून हा उपदेश आहे. यांचे नांव स्वरूप अन्य ग्रंथावरून जाणावे. ॥९७॥

पुढे भाव शुद्धिसाठी अन्य उपाय सांगतात :—

णवविहबंभं पयडहि अब्बंभं दसविहं पमोत्तूण ।
मेहुणसण्णासत्तो भमिओसि भवण्णवे भीमे ॥९८॥

नवविधब्रह्मचर्यं प्रकटय अब्रह्म दशविधं प्रमुच्य ।
मैथुनसंज्ञासक्तः भ्रमितोऽसि भवार्णवे भीमे ॥९८॥

अर्थ :— हे जीव ! तूं पहिल्या १० प्रकारचे अब्रह्म आहेत ते सोडून ९ प्रकारचे ब्रह्मचर्य आहेत त्याना प्रकट कर, भाव प्रत्यक्षकर हा उपदेश यासाठी दिला आहे कीं, तू कामवासनेची अभिलाषेच्या मैथून कर्मात आसक्त होवून अशुद्ध भावाने या भयानक संसाररूपी समुद्रात भ्रमण करत आहेस.

भावार्थ :— हा प्राणी मैथून संज्ञेत आसक्त होवून गृहस्थापना आदिक अनेक उपायाने स्त्री सेवनादिक अशुद्ध भावाने अशुभकार्यात प्रवर्ततो त्यामुळे या भयानक संसार समुद्रात भ्रमण करतो म्हणून हा उपदेश आहे कीं, — १० प्रकारचे अब्रह्मसोडून ९ प्रकारच्या ब्रह्मचर्याचा अंगिकार कर १० प्रकारचे अब्रह्म असे आहेत — १. स्त्रीयांचे चिंतन, २. मागची चिंता असणे, ३. मागे निश्वास सोडणे, ४. ज्वर होणे, ५. दाह होणे, ६. कामाची रूची होणे, ७. मूर्च्छा येणे, ८. उन्माद होणे, ९. जगण्यात संदेह उत्पन्न होणे, १०. मरण येणे असे १० प्रकारचे अब्रह्म आहेत.

९ प्रकारचे ब्रह्मचर्य असे आहे — ९ कारणानी ब्रह्मचर्य बिघडते त्यांची नांवे १. स्त्री सेवनाची अभिलाषा, २. स्त्रीयांच्या अंगाचा स्पर्श, ३. पुष्ट रसांचे सेवन, ४. स्त्रीया जवळ शय्या सेवन, ५. स्त्रीयांच्या

तोंडाकडे डोळ्याकडे पाहाणे, ६. स्त्रीयांचा सत्कार, पुरस्कार करणे, ७. पूर्वि केलेल्या स्त्री सेवनाची आठवण काढणे, ८. पुढे भविष्यात स्त्री सेवनाची अभिलाषा ठेवणे, ९. मनोवांछित इष्ट विषयाचे सेवन करणे. या सर्वांचा त्याग करणे हे नवभेदरूप ब्रह्मचर्य आहे अथवा मन, वचन, काय-कृत- कारित अनुमोदनाने ब्रह्मचर्याचे पालन करणे असे ही ९ प्रकार आहेत. असे वागणे ही भाव शुद्ध होण्याचा उपाय आहे. ।।९८ ।।

पुढे सांगतात कीं, जो भाव सहित मुनि आहे म्हणून आराधनेचे चतुष्क प्राप्त करतो :—

**भावसहिदो य मुणिणो पावइ आराहणाचउक्कं च ।**
**भावरहिदो य मुणिवर भमइ चिरं दीहसंसारे ।।९९।।**

भावसहितश्च मुनिनः प्राप्नोति आराधनाचतुष्कं च ।
भावरहितश्च मुनिवर ! भ्रमति चिरं दीर्घसंसारे ।।९९।।

<u>अर्थ :</u>— हे मुनिवर ! जो भावसहित आहे म्हणून दर्शन, ज्ञान, चारित्र, तप असे आराधनेचे चतुष्कप्राप्त करतो ते मुनिमध्यें प्रधान आहेत आणि जो भावरहित मुनि आहे तो बराचकाल पर्यंत दीर्घसंसारात भ्रमण करतो.

<u>भावार्थ :</u>— निश्चय सम्यक्त्वाचे शुद्ध आत्म्याचे अनुभूतिरूप श्रद्धानाचा भाव आला तर त्याला चार आराधना प्राप्त होतात, त्याचे फल अरहंत, सिद्ध, पद आहे. आणि अशा भावानी रहित असेल तर आराधना प्राप्त होत नाही, त्याचे फल संसारात भ्रमण आहे. असे जाणून भाव शुद्ध करण्याचा उपदेश दिला आहे. ९९ ।।

पुढे भावा चे फल विशेषरूपाने सांगत आहेत :—

**पावंति भावसवणा कल्लाणपरंपराइं सोक्खाइं ।**
**दुक्खाइं दव्वसवणा णरतिरियकुदेवजोणीए ।।१००।।**

प्राप्नुवंति भावश्रमणाः कल्याणपरंपराः सौख्यानि ।
दुःखानि द्रव्यश्रमणाः नरतिर्यक्कुदेवयोनौ ।।१००।।

<u>अर्थ :</u>— जो भावश्रमण आहे, भावमुनि आहे, ते ज्यांच्यात कल्याणाची परंपरा आहे, सुख प्राप्त करून घेतात आणि जे द्रव्यश्रवण आहेत ते तिर्यंच मनुष्य, कुदेव योनित, दु:खाला प्राप्त करून घेतात.

<u>भावार्थ :</u>— भावमुनि सम्यक्दर्शनसहित आहेत ते सोलह कारण भावना भावून गर्भ, जन्म, तप, ज्ञान, निर्वाण पंचकल्याणक सहित तीर्थंकर पद प्राप्त करून मोक्ष मिळवतात आणि जे सम्यक्दर्शन रहित द्रव्यमुनि आहेत ते तिर्यंच, मनुष्य, कुदेव योनि प्राप्त करून घेतात. हे भावाच्या विशेष फलाचे वैशिष्ट्य आहे.

पुढे म्हणतात कीं, अशुद्ध भावाने, अशुद्ध आहार केला तर दुर्गतिच प्राप्त होईल :—

**छायालदोसदूसियमसणं गसिउं असुद्धभावेण ।**
**पत्तोसि महावसणं तिरियगईए अणप्पवसो ।।१०१।।**

षट्चत्वारिंशद्दोषदूषितमशनं ग्रसितं अशुद्धभावेन ।
प्राप्तः असि महाव्यसनं तिर्यग्गतौ अनात्मवशः ।।१०१।।

www.vitragvani.com



अर्थ :— हे मुने ! तू ने अशुद्धभावाने ४६ दोषाने दूषित अशुद्ध अशन (आहार) घेतल्याने तिर्यंचगतिमध्यें पराधीन होवून महान कष्ट प्राप्त केले.

भावार्थ :— मुनि ४६ दोषानी रहित शुद्ध आहार करतात. ३२ अंतराय टाळतात, १४ मलदोष रहित करतात. म्हणून जे मुनि असून सदोष आहार केला तर त्यांचे भावही शुद्ध राहात नाहीत. त्यांचा उपदेश आहे कीं, — हे मुने ! तू दोषरहित अशुद्ध आहार केला, म्हणून तिर्यंच गतिमध्यें प्रथम भ्रमण केले आणि कष्ट सहन केले म्हणून भाव शुद्ध करून शुद्ध आहार करा ज्यामुळें पुन्हा भ्रमण करावे लागणार नाही. ४६ दोषात १६ तर उद्गम दोष आहेत. ते आहाराचे आहेत, हे श्रावकामध्यें अश्रित आहेत. १६ उत्पादन दोष आहेत. हे मुनिमध्यें आश्रित आहेत १० दोष एषणेचे आहेत हे आहाराचे आश्रित आहेत. चार प्रमाणादिक आहेत यांची नांवे तसेच स्वरूप 'मूलाचार' 'आचारसार' ग्रंथातून जाणावे. ।।१०१ ।।

पुढे पुन्हा सांगतात :—

सच्चित्तभत्तपाणं गिद्धीं दप्पेणऽधी पभुत्तूण ।
पत्तोसि तिव्वदुक्खं अणाइकालेण तं चित्त ।।१०२।।

सचित्तभक्तपानं गृद्ध्या दर्पेण अधीः प्रभुज्य ।
प्राप्तोऽसि तीव्रदुःखं अनादिकालेन त्वं चिन्तय ।।१०२।।

अर्थ :— हे जीवं ! तू दुर्बुद्धी (अज्ञानी) होवून अतिचार सहित तसेच अतिगर्वाने, सचित्त भोजन तसेच पान, जीव सहित आहार पाणी सेवन करून संसारात तीव्र नरकादिचे दु:ख प्राप्त केले. आता मुनि होवून भाव शुद्ध करून अशुद्ध (सचित्त) आहार पाणी करू नका नाही तर पुन्हा पूर्ववत दु:ख भोगावे लागेल. ।।१०२ ।।

पुढे पुन्हा म्हणतात :—

कंदं मूलं वीयं पुप्फं पत्तादि किंचि सच्चित्तं ।
असिऊण माणगव्वं भमिओसि अणंतसंसारे ।।१०३।।

कंदं मूलं बीजं पुष्पं पत्रादि किंचित् सचित्तम् ।
अशित्वा मानगर्वे भ्रमितः असि अनंतसंसारे ।।१०३।।

अर्थ :— कंद, जमीकंद, आदि बीज चणे आदि अन्नादिक, मूल, आले, मुळा, गाजर आदि पुष्प, फल, पत्र, नागरवेल आदि जी कोणती सजीव वस्तु भक्षण केली त्यामुळेच तू अनंत संसारात भ्रमण केले.

भावार्थ :— कन्दमूलादिक सचित्त अनन्तजीवांची काया आहे तसेच अन्य वनस्पति बीजादिक सचित्त आहेत त्यांचे भक्षण केले. प्रथम तो मान करतो कीं, आम्ही तपस्वी आहोत, आमचा घर संसार नाही. वनातील फुले, फळ खावून तपस्या करतात असे मिथ्यादृष्टी तपस्वी होवून मान करून खाल्ले तसेच गर्वाने माजल्यामुळे दोष न समजून स्वच्छंद होवून सर्वभक्षी झाला असे या कंदादिकाना खावून या संसारात भ्रमण

www.vitragvani.com



केले. आता मुनि होवून यांचे भक्षण करूं नको असा उपदेश आहे. अन्यमताचे तपस्वी कंदमूलादिक फल फूल खावून आपल्याला महंत मानतात, त्यांचा निषेध आहे. ॥१०३॥

पुढे विनय वगैरेचा उपदेश करत आहेत :—

विणयं पंचपयारं पालहि मणवयणकायजोएण ।
अविणयणरा सुविहियं तत्तो मुत्तिं न पावंति ॥१०४॥

विनयः पंचप्रकारं पालय मनोवचनकाययोगेन ।
अविनतनराः सुविहितां ततो मुक्तिं न प्राप्नुवंति ॥१०४॥

अर्थ :— हे मुनि ! ज्या कारणाने अविनयी मनुष्य चांगल्या प्रकारे मुक्तीला प्राप्त करत नाही अर्थात् अभ्युदय तीर्थंकरादि सहित मुक्ती प्राप्त करून घेत नाहीत म्हणून आम्ही उपदेश करत आहोत कीं, — हाथ जोडणे, पाया पडणे, आल्या नंतर उठणे, पुढे जाणे आणि अनुकुल वचन सांगणे असे ५ प्रकारचे विनय अथवा ज्ञान, दर्शन, चारित्र, तप, आणि यांचे धारक पुरूष यांचा विनय करणे असे ५ प्रकारच्या विनयाचे तू मन, वचन, कार्य या तिन्ही योगाने पालन कर.

भावार्थ :— विनयाशिवाय मुक्ती नाही. म्हणून विनयाचा उपदेश आहे. विनयात फार गुण असतात. ज्ञानाची प्राप्ति होते. मानकषायाचा नाश होतो, शिष्टाचाराचे पालन होते. कलहाचे निवारण होते. इत्यादि गुण जाणावे. म्हणून जो सम्यक्दर्शनादिने महान आहे त्यांचा विनय करा हा उपदेश आहे आणि जो विनयाशिवाय जिनमार्गातून भ्रष्ट झाले आणि जे वस्त्रादिकासहित मोक्षमार्ग मानतात त्याचा निषेध आहे. ॥१०४॥

णियसत्तिए महाजस भत्तीराएण णिच्चकालम्मि ।
तं कुण जिणभत्तिपरं विज्जावच्चं दसवियप्पं ॥१०५॥

निजशक्त्या महायशः ! भक्तिरागेण नित्यकाले ।
त्वं कुरु जिनभक्तिपरं वैयावृत्यं दशविकल्पम् ॥१०५॥

अर्थ :— हे महायश ! हे मुने ! जिनभक्तित तत्पर होवून भक्तीच्या रागाने त्या दहा भेद रूप वैयावृत्याला सदाकाल तू आपल्या शक्तिनुसार कर. 'वैयावृत्य' दुसऱ्याचे दुःख (कष्ट) पाहून त्याची सेवा, चाकरी, करायला सांगतात. यांचे १० भेद आहेत — १. आचार्य, २. उपाध्याय, ३. तपस्वी, ४. शैक्ष्य, ५. ग्लान, ६. गण, ७. कुल, ८. संघ, ९. साधु, १०. मनोज्ञ हे १० भेद मुनिचे आहेत. त्यांचे वैयावृत्य (सेवा) सेवा करतात म्हणून १० भेद सांगितले आहेत. ॥१०५॥

पुढे आपल्या दोषाना गुरू जवळ सांगावे, असा उपदेश करतात :—

जं किंचि कयं दोसं मणवयकाएहिं असुहभावेण ।
तं गरहि गुरुसयासे गारव मायं च मोत्तूण ॥१०६॥

यः कश्चित् कृतः दोषः मनोवचः कायैः अशुभभावेन ।
तं गर्ह गुरुसकाशे गारवं मायां च मुक्त्वा ॥१०६॥

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



<u>अर्थ :</u>— हे मुने ! जे काहीं मन, वचन, कायेच्या द्वारे अशुभ भावाने प्रतिज्ञेत दोष लागला असेल त्याला गुरूच्या जवळ आपला गौरव (महंतपणाचा गर्व)सोडून आणि माया (कपट) सोडून मन, वचन, कायेला, सरळ करून वचनद्वारे प्रकाशित कर.

<u>भावार्थ :</u>— सत्पुरूष मुनि आहेत. ते दुर्जनांचे वचन जे, निष्ठूर, दयारहित, कठोर, कडू, वचने ऐकून घेतात ते कां सहन करतात ? कर्माचा नाश होण्याकरीता सहन करतात. प्रथम अशुभ कर्म बांधले होते, त्यामुळे दुर्जनानी कटु वचने सांगितली आपण ती ऐकली, ते उपशम परिणामाने आपण सहन केले. तेंव्हा अशुभ कर्म उदयाला येवून खिरले. अशी कटु वचने सहज केल्याने कर्माचा नाश होतो.

ते मुनि सत्पुरूष कसे आहेत ? आपल्या भावाने, वचनादिकाने, निर्ममत्व आहे, वचनाने तसेच मानकषायाने आणि देहादिकाचे ममत्त्व नाही ममत्त्व असेल तर दुर्वचन सहन होत नाहीत, म्हणून ममत्वाच्या अभावाने दुर्वचन सहन करतात. म्हणून मुनि होवून कोणावर क्रोध करू नये हा उपदेश आहे. लौकिकात सुद्धा जे मोठे पुरूष आहेत ते दुर्वचन ऐकून क्रोध करत नाहीत तेंव्हा मुनिनी हे सहन करणे उचितच आहे. जे क्रोध करतात ते नांवालाच तपस्वी आहेत. खरे तपस्वी नाहीत. ||१०७||

पुढे क्षमेचे फल सांगत आहेत :—

पावं खवइ असेसं खमाय पडिमंडिओ य मुणिपवरो ।
खेयरअमरणराणं पसंसणीओ धुवं होइ ||१०८||

पापं क्षिपति अशेषं क्षमया परिमंडितः च मुनिप्रवरः ।
खेचरामरनराणां प्रशंसनीयः ध्रुवं भवति ||१०८||

<u>अर्थ :</u>— जे श्रेष्ठमुनि क्रोधाच्या अभावरूप क्षमेने मंडित आहेत ते मुनि समस्त पापांचा क्षय करतात आणि विद्याधर देव मनुष्याद्वारे प्रशंसा करण्यायोग्य निश्चयाने होतात.

<u>भावार्थ :</u>— क्षमा गुण फार महत्त्वाचा आहे. यामुळे ते पुरूष सगळ्यानी स्तुती करावे असे असतात. जे मुनि आहेत त्याना उत्तमक्षमा असते. ते तर सर्व मनुष्य, देव, विद्याधरांच्या स्तुतीला पात्र असतातच, आणि त्यांच्या सर्व पापांचा क्षय होतोच. म्हणून क्षमा करणे योग्य आहे असा उपदेश आहे. क्रोधी सर्वाची निंदा करतो म्हणून क्रोधाला सोडणे श्रेष्ठ आहे. ||१०८||

पुढे अशा क्षमा गुणाला जाणून क्षमा करणे आणि क्रोध सोडणे असे म्हणतात :—

इय णाऊण खमागुण खमेहि तिविहेण सयलजीवाणं ।
चिरसंचियकोहसिहिं वरखमसलिलेण सिंचेह ||१०९||

इति ज्ञात्वा क्षमागुण ! क्षमस्व त्रिविधेन सकलजीवान् ।
चिरसंचितक्रोधशिखिनं वरक्षमासलिलेन सिंच ||१०९||

अर्थ :— हे क्षमागुणी मुने ! पूर्वोक्त प्रकारे क्षमागुणाला जाण आणि सर्व जीवावर मन, वचन, कायेने क्षमा कर, तसेच बऱ्याच कालापासून संचित क्रोधरूपी अग्निला क्षमारूप चलाने सिंचून त्याचे शमन कर.

भावार्थ :— क्रोधरूपी अग्नि पुरूषाच्या भल्या गुणाला दग्ध करणारी आहे आणि परजीवांचा घात करणारी आहे. म्हणून याला क्षमारूप जलाने विझवावे अन्य प्रकाराने ही विझत नाही. क्षमा गुण सर्व गुणात प्रधान आहे. म्हणून हा उपदेश आहे की, क्रोधाला सोडून क्षमा ग्रहण करा. ।।१०९।।

पुढे दीक्षाकालादिकाचा उपदेश करतात :—

दिक्खाकालाईयं भावहि अवियारदंसणविसुद्धो ।
उत्तमबोहिणिमित्तं असारसाराणि मुणिऊण ।।११०।।

दीक्षाकालादिकं भावय अविकारदर्शनविशुद्धः ।
उत्तमबोधिनिमित्तं असारसाराणि ज्ञात्वा ।।११०।।

अर्थ :— हे मुने ! तू संसाराला असार जाणून उत्तमबोधि अर्थात् सम्यक्दर्शन ज्ञान चारित्र्याच्या प्राप्ति निमित्त अविकार अर्थात् अतिचाररहित निर्मल सम्यक्दर्शन सहित होवून दीक्षाकाल आदिची भावना कर.

भावार्थ :— दीक्षा घेतात तेंव्हा संसार, (शरीर) भोगाला (विशेषत:) असार जाणून अत्यंत वैराग्य उत्पन्न होते. तसेच त्यांच्या आदि शद्वाने रोगोत्पत्ति, मरण-कालादिक जाणणे. त्यावेळी जसे भाव होते तसेच संसाराला असार जाणून विशुद्ध सम्यग्दर्शन सहित होवून उत्तमबोधि ज्यामुळे केवलज्ञान उत्पन्न होते. त्यासाठी दीक्षाकालादिची निरंतर भावना करणे योग्य आहे. असा उपदेश आहे. ।।११०।।

(नेहमी लक्षात ठेवावे :— काय ? सम्यक्दर्शन-ज्ञान-चारित्राची वृद्धी करण्यासाठी हे मुनि ! दीक्षेच्या वेळचे अपूर्व उत्साहमय तीव्र विरक्त दशेला, कोणत्यातरी रोगात्पत्तिच्या वेळचे उग्र, ज्ञान-वैराग्य-संपत्तिला. दु:खाच्या वेळी प्रकटलेल्या उदासिनभावनेला, कोणता उपदेश तसेच तत्त्वविचाराच्या धन्य वेळी जगातील पवित्र अंतभावनेला लक्षात ठेवावे, निरंतर स्वसन्मुखज्ञातापणाचा धीर अर्थ स्मरणात ठेवावा, हे विसरू नका)

पुढे भावलिंग शुद्ध करून द्रव्यलिंग सेवनाचा उपदेश करत आहेत :—

सेवहि चउविहलिंगं अब्भंतरलिंग सुद्धिमावण्णो ।
बाहिरलिंगमकज्जं होइ फुडं भावरहियाणं ।।१११।।

सेवस्व चतुर्विधलिंगं अभ्यंतरलिंगशुद्धिमापन्नः ।
बाह्यलिंगमकार्यं भवति स्फुटं भावरहितानाम् ।।१११।।

अर्थ :— हे मुनिवर ! तू अभ्यन्तरलिंगाची शुद्धि अर्थात् शुद्धतेला प्राप्त होवून चार प्रकारच्या बाह्य लिंगाचे सेवन करा. कारण कीं, जे भाव रहित असतात त्यांचे बाह्यलिंग कार्यकारी राहात नाही.

भावार्थ :— जे भावाच्या शुद्धतेने रहित आहेत, ज्याना आपल्या आत्म्याचे यथार्थ, ज्ञान, आचरण नाही, त्यांचे बाह्यलिंग काही कार्यकारी नाही. कारण मिळताच बिघडतात, म्हणून हा उपदेश आहे — प्रथम भावाची शुद्धता करून द्रव्यलिंग धारण करा. हे द्रव्यलिंग चार प्रकारचे सांगितले आहे. ते खालीलप्रमाणे आहेत — १. डोक्याचे, २. दाढीचे, ३. मिशांच्या केसांचा लोच करणे. तीन चिन्ह तर हे आणि चौथे खालचे केस ठेवणे किंवा १. वस्त्रत्याग, २. केश लोच करणे, ३. शरीराला स्नानादि संस्कार न करणे. ४, प्रतिलेखन मयूरापिच्छी ठेवणे असे ही ४ प्रकारचे बाह्यलिंग सांगितले आहेत. असे सर्व बाह्य वस्त्रादिने रहित नग्न राहाणे असे नग्नरूप भाव विशुद्धि शिवाय हसण्याचे स्थान होते आणि काही उत्तम फळ ही मिळत नाही. ।।१११।।

पुढे म्हणतात कीं, भाव बिघडल्यामुळे चार संज्ञा आहेत, त्यामुळे संसार भ्रमण होते हे दाखवतात :—

**आहारभयपरिग्गहमेहुणसण्णाहि मोहिओसि तुमं ।**
**भमिओ संसारवणे अणाइकालं अणप्पवसो ।।११२।।**

आहारभयपरिग्रहमैथुनसंज्ञाभिः मोहितः असि त्वम् ।
भ्रमितः संसारवने अनादिकालं अनात्मवशः ।।११२।।

अर्थ :— हे मुने ! तू आहार, भय, मैथुन, परिग्रह या ४ संज्ञेने मोहित होवून अनादिकालापासून पराधिन होवून संसाररूप वनात भ्रमण केले.

भावार्थ :— 'संज्ञा' नांवाच्या इच्छेने जागे राहून आहाराची इच्छा होणे, भय होणे, मैथुनाची इच्छा होणे आणि परिग्रहाची वांछा प्राण्याला निरंतर नेहमी असते. ही जन्मोजन्मी चालू राहाते. जन्म घेताच तत्काल प्रकट होते या निमित्ताने कर्माचा बंध करून संसारवनात भ्रमण करतो, म्हणून मुनिनां हा उपदेश आहे कीं, आता या संज्ञाचा अभाव करा. ।।११२।।

पुढे म्हणतात कीं, बाह्य उत्तरगुणाची प्रवृत्ति ही भाव शुद्ध करून करावी :—

**बाहिरसयणत्तावणतरुमूलाईणि उत्तरगुणाणि ।**
**पालहि भावविसुद्धो पूयालाभं ण ईहंतो ।।११३।।**

बहिःशयनातापनतरुमूलादीन् उत्तरगुणान् ।
पालय भावविशुद्धः पूजालाभं न ईहमानः ।।११३।।

अर्थ :— हे मुनिवर ! तू भावाने विशुद्ध होवून पूजा लाभादिकाला न इच्छिता बाह्यशयन, आतापन, वृक्षमूलयोग धारण करणे इत्यादि उत्तरगुणांचे पालन कर.

भावार्थ :— शीत कालामध्यें बाहेर खुल्या मैदानात झोपणे, बसणे, ग्रिष्मकाळात पर्वताचे शिखरावर सूर्यसन्मुख आतपनयोग धरणे, वर्षाकालात वृक्षाच्या खाली योग धरणे जेथे थेंब वृक्षावर पडल्यानंतर एकत्र

www.vitragvani.com



होवून शरीरावर पडतात यात कधी पासुकाचा ही संकल्प असतो, अनेक गोष्टी सोडलेल्या असतात हे सगळे घेवून हा उत्तरगुण आहे, यांचे पालनही भाव शुद्ध करून करावे भाव शुद्धि शिवाय केले तर तात्काल बिघडतील आणि फल काहीही मिळणार नाही, म्हणून भाव शुद्ध करून मग करण्याचा उपदेश आहे. असे समजू नये कीं, याना बाह्यत: करण्याचा निषेध करतात. हे ही करावे आणि भाव ही शुद्ध करणे हा आशय आहे. केवळ पूजा लाभादिसाठी आपले मोठेपणा दाखवण्यासाठी केले तर काही फलाची प्राप्ति होणार नाही. ॥११३॥

पुढे तत्त्वाची भक्ती करण्याचा उपदेश करतात :—

भावहि पढमं तच्चं बिदियं तदियं चउत्थ पंचमयं ।
तियरणसुद्धो अप्पं अणाइणिहणं तिवग्गहरं ॥११४॥

भावय प्रथमं तत्त्वं द्वितीयं तृतीयं चतुर्थं पंचमकम् ।
त्रिकरणशुद्धः आत्मानं अनादिनिधनं त्रिवर्गहरम् ॥११४॥

अर्थ :— हे मुने ! तू प्रथम जीव तत्त्वाचे चिन्तन कर, दुसऱ्यांदा अजीव तत्त्वाचे चिंतन कर. तिसऱ्यांदा आस्त्रव तत्त्वाचे चिंतन कर. चौथे बंधतत्त्वाचे चिंतन कर, पांचवे संवरतत्त्वाचे चिंतन कर आणि त्रिकरण अर्थात् मन, वचन, काय कृत कारित अनुमोदनाने शुद्ध होवून आत्मस्वरूपाचे चिंतन कर. जो आत्मा अनादिनिधन आहे आणि त्रिवर्ग अर्थात् धर्म, अर्थ, तसेच काम यांचे हरण करणारा आहे.

भावार्थ :— प्रथम 'जीवतत्त्वाची' भावना तर सामान्य जीव दर्शन-ज्ञानमयी चेतना स्वरूप आहे, त्याची भावना करावी. नंतर 'मी आहे' अशा प्रकारची आत्मतत्त्वाची भावना करणे. दुसरे अजीव तत्त्वं आहे. ते सामान्य अचेतन जड़ तत्त्व आहे. हे पांच भेदरूप पुद्गल धर्म, अधर्म, आकाश, काल आहे याचा विचार करणे, नंतर भावना करा की हे जे आहे ते मी नाही. तिसरे आस्त्रव तत्त्व आहे ते जीव-पुद्गलाचे संयोग जनित भाव आहेत. यांच्यात अनादि कर्मासंबंधी जीवाचे भाव (आस्त्रभाव) ते राग -द्वेष-मोह आहेत आणि अजीव पुद्गलाच्या भावकर्माच्या उदयरूप मिथ्यात्त्व अविरत, कषाय आणि योग द्रव्यास्त्रव आहे. यांची भावना करणे कीं, हे (असद्भूत नय अपेक्षा) माझ्यात येतात, (अशुद्ध निश्चय नयाने) राग, द्वेष, मोह, भाव माझे आहेत. यांच्यामुळे कर्माचा बंध होतो. त्यामुळे संसार होतो. म्हणून यांचा कर्ता होवूं नका ('स्व' ला जाणून राहावे)

चौथे 'बंधतत्त्व' आहे ते राग, द्वेष, मोहाचे परिणमन आहे, तो तर माझ्या चेतनेचा विभाव आहे. यामुळे जे बांधले जातात ते पुद्गल आहेत, कर्म पुद्गल आहेत, कर्म पुद्गल ज्ञानावरण आदि आठ प्रकारे बांधले जातात. ते स्वभाव-प्रकृति, स्थिति, अनुभाग आणि प्रदेशरूप चार प्रकारे बांधले जातात ते माझे विभाव तसेच पुद्गल कर्म सर्व हेय आहेत, संसाराचे कारण आहेत, मला राग, द्वेष, मोहरूप व्हायचे नाही. अशा प्रकारची भावना करावी.

पांचवे 'संवरतत्त्व' आहे ते रागद्वेष मोहरूप जीवाचे विभाव आहेत, ते न होणे आणि दर्शन-ज्ञानरूप चेतना भाव स्थिर होणे हे संवर आहे, तो आपला भाव आहे आणि यामुळे पुद्‌गलकर्म जनित भ्रमण मिटते.

अशा प्रकारे या पांच तत्त्वाची भावना करण्यात आत्मतत्त्वाची भावना प्रधान आहे. त्यामुळे कर्माची निर्जरा होवून मोक्ष मिळतो. आत्म्याचा भाव अनुक्रमाने शुद्ध होणे हा 'निर्जरा' तत्त्व झाले आणि सर्व कर्मांचा अभाव होणे हे मोक्ष तत्त्व झाले. अशाप्रकारे सात तत्त्वाची भावना करणे. म्हणून आत्मतत्त्वाचे वर्णन करतात कीं, आत्मतत्त्व कसे आहे ? ते धर्म, अर्थ, काम, या त्रिवर्गाचा अभाव करतो. याची भक्ती केल्याने (भावना) त्रिवर्गापेक्षा भिन्न चौथा पुरूषार्थ 'मोक्ष' मिळतो. हा आत्मा ज्ञान-दर्शनमयी-चेतनास्वरूप अनादिनिधन आहे. याला आदि ही नाही आणि निधन ही नाही 'भावना' नामाचां वरेचवर अभ्यास करा, चिंतन करा, ते मन-वचन-कायाने आपण करा तसेच दुसऱ्याकडून करवून घ्या आणि करणाऱ्याना भले जाणा असे त्रिकरण शुद्ध करून भावना करावी. माया-मिथ्या-निदान, शल्य न ठेवणे, ख्याति, लाभ, पूजेचा आशय न ठेवणे. अशा प्रकारची तत्त्वाची भावना केल्याने भाव शुद्ध होतात.

'स्त्री आदि पदार्थ आणि भेद ज्ञानाचा विचार' यांचे उदाहरण असे आहे कीं जेंव्हा स्त्री आदि इंद्रियगोचर असतील तेंव्हा त्यांच्या विषयात विचार करणे कीं, ही स्त्री आहे, ते काय आहे ? जीव नांवाच्या तत्त्वाचा (असमान जातीय) एक पर्याय आहे, त्याचे शरीर आहे ते तर पुद्‌गल पर्याय आहे. तो हावभाव, हालचाली करतो, तो या जीवाचा विकार आहे, हे आस्रव तत्त्व आहे आणि बाह्य हालचाली (चेष्टा) पुद्‌गलाची आहे. या विकाराने या स्त्रीच्या आत्म्याना कर्म बंध होतो.

हे विकार त्यांचे झाले नाहीत तर आस्रव, बंध, होणार नाही. कदाचित् मी ही हे पाहून विकाररूप परिणमन केले तर मला ही आस्रव बंध होतील म्हणून मी विकाररूप न होणे हे संवर तत्त्व आहे. शक्य झाले तर काही उपदेश देवून यांचे विकार दूर करूं (असा विकल्पराग आहे) तो राग ही करण्यासारखा नाही — स्व सन्मुख ज्ञातापणात धैर्य राखणे योग्य आहे अशा प्रकारे तत्वाच्या भावनेने आपला भाव अशुद्ध होत नाही, म्हणून जो दृष्टिगोचर पदार्थ आहे त्यांच्यात अशा प्रकारची तत्त्वाची भावना ठेवणे हा तत्त्वाच्या भावनेचा उपदेश आहे. ।।११४।।

पुढे सांगतात कीं, अशा तत्त्वाची भावना जो पर्यंत नाही तो पर्यंत मोक्ष मिळत नाही :—

**जाव ण भावइ तच्चं जाव ण चिंतेइ चिंतणीयाइं ।**
**ताव ण पावइ जीवो जरमरणविवज्जियं ठाणं ।।११५।।**

यावन्न भावयति तत्त्वं यावन्न चिंतयति चिंतनीयानि ।
तावन्न प्राप्नोति जीवः जरामरणविवर्जितं स्थानम् ।।११५।।

<u>अर्थ :</u>— हे मुने ! जो पर्यंत हा जीवादि तत्त्वांची भावना (भक्ति) करत नाही आणि चिन्तन करण्यायोग्य चे चिंतन करत नाही, तो पर्यंत जरा आणि मरणाने रहित मोक्ष स्थानाला प्राप्त करत नाही.

www.vitragvani.com



<u>भावार्थ :</u>— तत्त्वाची भावना तर मागे सांगितली, ती चिंतन करण्यायोग्य धर्म शुल्क ध्यानाच्या विषयभूत ध्येय वस्तु आपले शुद्ध दर्शनमयी चेतनाभाव आणि असेच अरंहंत सिद्ध परमोष्ठिचे स्वरूप त्याचे चिंतन जो पर्यंत या आत्म्याचे होत नाहीत तो पर्यंत संसारातून निवृत्त होणे नाही, म्हणून तत्त्वाची भावना आणि शुद्ध स्वरूपाच्या ध्यानाचा उपाय निरंतर ठेवणे हा उपदेश आहे. ।।११५।।

पुढे म्हणतात कीं, पाप-पुण्य आणि बंध-मोक्षाचे कारण परिणामच आहे :—

पावं हवइ असेसं पुण्णमसेसं च हवइ परिणामा ।
परिणामादो बंधो मुक्खो जिणसासणे दिट्ठो ।।११६।।

पापं भवति अशेषं पुण्यमशेषं च भवति परिणामात् ।
परिणामाद्बंधः मोक्षः जिनशासने दृष्टः ।।११६।।

<u>अर्थ :</u>— पाप-पुण्य, बंध-मोक्षाचे कारण परिणामालाच म्हटले आहे जीवाचे मिथ्यात्व, विषय-कषाय, अशुभलेश्यारूप, तीव्र परिणाम असतात, त्याना तर पापास्त्रवाचा बंध होतो. परमेष्ठीची भक्ती, जीवावर दया इत्यादि मंदकषाय, शुभलेश्यारूप परिणाम होतात. यामुळे पुण्यास्त्रवाचा बंध होतो. शुद्ध परिणाम रहित विभावरूप परिणामाने बंध होतो. शुद्धभावना सन्मुख राहाणे. त्याच्या अनुकुल शुभ परिणाम राखणे, अशुभ परिणाम सर्वथा दूर करणे हा उपदेश आहे. ।।११६।।

पुढे पुण्य-पापाचा बंध भावाने होतो त्या बद्दल सांगतात; प्रथम पाप बंधाचे परिणाम सांगतात :—

मिच्छत्त तह कसायाऽसंजमजोगेहिं असुहलेसेहिं ।
बंधइ असुहं कम्मं जिणवयणपरम्मुहो जीवो ।।११७।।

मिथ्यात्वं तथा कषायासंयमयोगैः अशुभलेश्यैः ।
बध्नाति अशुभं कर्म जिनवचनपराङ्मुखः जीवः ।।११७।।

<u>अर्थ :</u>— मिथ्यात्व, कषाय, असंयम, आणि योग ज्यामध्यें अशुभ लेश्या प्राप्त केली जाते. अशा प्रकारच्या भावाने हा जीव जिनवचनापासून परांगमुख होतो. अशुभ कर्माला बांधतो तो पाप ही बांधतो.

<u>भावार्थ :</u>— 'मिथ्यात्वभाव' तत्त्वार्थाचा श्रद्धान रहित परिणाम आहे. 'कषाय' क्रोधादिक आहेत. 'असंयम' परद्रव्याचे ग्रहणरूप आहेत. त्यागरूप भाव नाही अशाप्रकारे इंद्रियाच्या विषयाची प्रिति आणि जीवांचे विराधना सहित भाव आहेत. 'योग' मन-वचन-कायेच्या निमित्ताने आत्मप्रदेशाना चालायचे आहे. हे भाव जेंव्हा तीव्र कषाया सहित कृष्ण, नील, कपेत, अशुभ लेश्यारूप असतील तेंव्हा या जीवाला पापाचा बंध होतो. पाप बंध करून घेणारा जीव कसा आहे ? त्याला जिनवचनाची श्रद्धा नाही या विशेषणाचा आशय

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

असा आहे कीं, अन्यमताची श्रद्धा ठेवणारे जर कदाचित् शुभलेश्येच्या निमित्ताने पुण्याचा बंध झाला तरी ते पापातच मोजले जाते. आणि जे जिन आज्ञेप्रमाणे चालतात त्यानी कदाचित् पाप ही बांधले तरी तो पुण्य जीवाच्या पंक्तितच मोजला जातो. मिथ्यादृष्टिला पापी 'जीवा'मध्ये गणले आहे. आणि सम्यक्दृष्टिला पुण्यवान जीवात मानले आहे. अशा प्रकारे पापबंधाचे कारण आहे. ॥११७॥

पुढे याच्या उलट जीव आहे. तो पुण्य बांधतो असे म्हणतात :—

तव्विवरीओ बंधइ सुहकम्मं भावसुद्धिमावण्णो ।
दुविहपयारं बंधइ संखेपेणेव वज्जरियं ॥११८॥

तद्विपरीतः बध्नाति शुभकर्म भावशुद्धिमापन्नः ।
द्विविधप्रकारं बध्नाति संक्षेपेणैव कथितम् ॥११८॥

अर्थ :— त्या पूर्वोक्त जिनवचनांची श्रद्धा ठेवणारा मिथ्यात्वरहित सम्यक्दृष्टि जीव शुभकर्माला बांधतो, तसेच ज्यांनी भावांची शुद्धी प्राप्त केली आहे असे दोन्ही प्रकारचे जीव शुभाशुभ कर्माला बांधतात हे संक्षेपाने जिनभगवंताने सांगितले आहे.

भावार्थ :— मागे सांगितले होते कीं, जिनवचना पासून परांगमुख मिथ्यात्व सहित जीव आहेत, त्यांच्या विपरीत जिन आज्ञेचे पालन करणारा सम्यक्दृष्टि जीव विशुद्ध भावाला प्राप्त होवून शुभकर्माला बांधतो, कारण कीं, याच्या सम्यक्त्वाच्या महात्म्याने असे उज्ज्वलभाव आहेत ज्यामुळे मिथ्यात्वाचे बरोबर पाप प्रकृतिंचा अभाव आहे. कदाचित् किंचित कोणी पाप प्रकृति बांधली तर त्याचा अनुभाग मंद होतो, काही तीव्र पापफलाचा दाता नाही. म्हणून सम्यक्दृष्टि शुभकर्मालाच बांधणारा आहे अशा प्रकारे शुभ-अशुभ कर्माच्या बंधाचा संक्षेपाने विधान सर्वज्ञ देवाने सांगितले आहे. ते जाणून घेतले पाहिजे. ॥११८॥

पुढे सांगतात कीं, हे मुने ! तू अशी भावना कर :—

णाणावरणादीहिं य अट्ठहि कम्मेहिं वेढिओ य अहं ।
डहिऊण इण्हिं पयडमि अणंतणाणाइगुणचित्तां ॥११९॥

ज्ञानावरणादिभिः च अष्टभिः कर्मभिः वेष्टितश्च अहं ।
दग्ध्वा इदानीं प्रकटयामि अनन्तज्ञानादिगुणचेतनां ॥११९॥

अर्थ :— हे मुनिवर ! तू अशी भावना कर कीं, मी ज्ञानावरणादि आठ कर्मानी वेष्टित आहे म्हणून त्याला भस्म करून अनंतज्ञानादि गुण निज स्वरूप चेतनेला प्रकट करतात.

भावार्थ :— आपल्याला कर्मानि वेष्टित झाल्याने आणि त्यांच्याकडून अनंत ज्ञानादिगुण अच्छादित झाल्याने कर्माचा नाश करण्याचा विचार करावा म्हणून कर्माच्या बंधाची आणि अभावाची भावना करण्याचा उपदेश आहे. कर्माचा अभाव शुद्धस्वरूपाच्या ध्यानाने होतो म्हणून ते करण्याचा उपदेश आहे.

www.vitragvani.com



कर्म आठ आहेत — १. ज्ञानावरण, २. दर्शनावरण, ३. मोहनीय, ४. अंतराय हे चार घाति कर्म आहेत यांच्या ४७ प्रकृति आहेत. केवलज्ञानावरणाने अनंतज्ञान आच्छादित आहे. केवलदर्शनावरणाने अनंतदर्शन आच्छादित आहे. मोहनीयामुळे अनंतसुख प्रकट होत नाही आणि अंतरायाने अनंतवीर्य प्रकट होत नाही. यासाठी यांचा नाश करा चार अघाति कर्म आहेत त्यामुळे अव्याबाध, अगुरूलघु, सूक्ष्मता, आणि अवगाहन हे गुण (निर्मल पर्याय) प्रकट होत नाहीत. या अघाति कर्माच्या १०१ प्रकृति आहेत. घाति कर्माचा नाश झाल्यानंतर अघाति कर्माचा स्वयमेव अभाव होतो. असे जाणावे ।।११९।।

पुढे या कर्माचा नाश करण्यासाठी अनेक प्रकारचा उपदेश आहे. तो संक्षेपाने सांगतात :—

**सीलसहस्सट्ठारस चउरासीगुणगणाण लक्खाइं ।**
**भावहि अणुदिणु णिहिलं असप्पलावेण किं बहुणा ।।१२०।।**

शीलसहस्राष्टादश चतुरशीतिगुणगणानां लक्षाणि ।
भावय अनुदिनं निखिलं असत्प्रलापेन किं बहुना ।।१२०।।

अर्थ :— शील १८००० भेदरूप आहे आणि उत्तर गुण ८४ लाख आहेत आचार्य म्हणतात कीं हे मुनि ! खूप खोट्या, प्रलापरूप निरर्थक वचनांचा काय फायदा ? या शीलाना आणि उत्तरगुणांची तू सतत भावना कर याची भावना, चिंतन, अभ्यास, निरंतर चालू ठेव आणि त्याची प्राप्ति होईल असे करा.

भावार्थ :— 'आत्मा-जीव' नांवाची वस्तु अनंतधर्म स्वरूप आहे संक्षेपाने यांच्या दोन परिणति आहेत. एक स्वाभाविक एक विभावरूप यांच्यात स्वाभाविक तर शुद्धदर्शन ज्ञानमयी, चेतना परिणाम आहे आणि विभाव परिणाम कर्माच्या निमित्ताने आहेत हे प्रधानरूपाने तर मोहकर्माच्या निमित्ताने झाले आहेत. संक्षेपाने मिथ्यात्व रोग द्वेष आहे, यांच्या विस्ताराने अनेक भेद होतात. अन्य कर्माच्या उदयाने विभाव होतात त्यांच्यात पौरूष प्रधान नाही. म्हणून उपदेश अपेक्षेने ते गौण आहेत अशा प्रकारे हे शील आणि उत्तरगुण स्वभाव विभाव परिणतिच्या भेदाने भेदरूप करून सांगितले आहेत.

शीलाची प्ररूपणा दोन प्रकारची आहे — एक तर स्व द्रव्य - परद्रव्याच्या विभागाच्या अपेक्षा आहे आणि दुसरे स्त्री च्या संसर्गाची अपेक्षा आहे . परद्रव्याचा संसर्ग मन, वचन, कायेने आणि कृत, कारित, अनुमोदनाने करू नये. यांचे आपसात जुळणी केल्याने ९ भेद होतात. आहार, भय, मैथून आणि परिग्रह या चार संज्ञा आहेत. यांच्यामुळे परद्रव्याचा संसर्ग होतो त्यांचे न होणे अशा ९ भेदाचे ४ संज्ञा बरोबर गुणाकार केल्यास ३६ होतात. पांच इंद्रियाच्या निमित्ताने विषयाचा संसर्ग होतो, त्यांच्या प्रवृत्तिच्या अभावरूप ५ इंदियांचे ३६ गुण केल्यानंतर १८० होतात. पृथ्वी, आप, तेज, वायू प्रत्येक, साधारण हे एकेंद्रिय आणि २ इंद्रिय, ३ इंद्रिय, ४ इंद्रिय, ५ इंद्रिय असे दहा भेद रूप जीवांचा संसर्ग यांच्या हिंसारूप प्रवर्तनेने परिणाम निभावरूप होतात ते करू नयेत. अशा १८० भेदाचे १० पट केल्याने १८०० होतात. क्रोधादिक कषाय आणि असंयम परिणामाने परद्रव्यासंबंधी विभाग परिणाम होतात त्यांच्या अभावरूप दसलक्षण धर्म आहेत,

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



त्याचे १० पट केल्याने १८००० होतात. अशा परद्रव्याच्या संसर्गरूप कुशीलाचे अभावरूप शीलाचे १८००० भेद आहेत. यांच्या पालनाने परम ब्रह्मचर्य होते, ब्रह्म (आत्मा) त. प्रवर्तन आणि रमण्यात ब्रह्मचर्य म्हणतात.

स्त्री च्या संसर्गाची अपेक्षा अशा प्रकारे आहे — स्त्री यांचे दोन प्रकारचे वर्णन आहे, अचेतन स्त्री काष्ठ पाषाण लेप यांचे बनवलेले पुतळे हे तीन यांचा मन आणि काय दोन्हीशी संसर्ग होतो याचे दुप्पट केले तर ६ होतात. त्यांना कृत, कारीत, अनुमोदीत ने गुणल्यामुळे त्यांचे १८ प्रकार होतात. पांच इंद्रियाने गुणाकार केल्यास ९० होतात. द्रव्य, भावाने गुणल्यास १८० होतात. क्रोध, मान, माया, लोभ या ४ कषयानी गुणाकार केल्या ७२० होतात. चेतन स्त्री देवी, मनुष्यिणी, तिर्यंचिणी अशा तीन, या तिन्हाला मन, वचन, कायेने गुणल्यानंतर ९ होतात. याना कृत कारीत अनुमोदनाने गुणल्यास २७ होतात. याना ५ इंद्रियाने गुणल्याने १३५ होतात. याना द्रव्य, आणि भाव या दोन्हीने गुणल्यानंतर २७० होतात. याना ४ संज्ञेने गुणल्यास १०८० होतात. याना अनंतानुबंधी अपत्यारव्यानावरण प्रत्याख्यानावरण, संज्वलन, क्रोध, मान, माया, लोभ या १६ कषायाने गुणल्यास १७२८० होतात. असे अचेतन स्त्री चे ७२० मिसळल्या नंतर १८००० होतात. असे स्त्रियांच्या संसर्गाने विकार परिणाम होतात, ते कुशील आहे, यांच्या अभाव रूप परिणाम शील आहे यांची पण 'ब्रह्मचर्य' संज्ञा आहे.

८४ लाख उत्तरगुण असे आहेत जे आत्म्याच्या विभाव परिणामांच्या अपेक्षा भेदाने आहेत. त्यांच्या अभावाने हे गुणांचे भेद आहेत. त्या विभावांच्या भेदाची गणना संक्षेपानी अशी आहे. — १. हिंसा, २. अनृत, ३. स्तेय, ४. मैथून, ५. परिग्रह, ६. क्रोध, ७. मान, ८. माया, ९. लोभ, १०. भय, ११. जुगुप्सा, १२. अरति, १३. शोक, १४. मनोदुष्टत्व, १५. वचनदुष्टत्व, १६. कायादुष्टत्व, १७. मिथ्यात्व, १८. प्रमाद, १९. पैशुन्य, २०. अज्ञान, २१. इंद्रियाचा अनुग्रह असे २१ दोष आहेत. याना अतिक्रम व्यक्तिक्रम अतिचार, अनाचार या चारीने गुणल्यानंतर ८४ होतात. पृथ्वी, आप, तेज, प्रत्येक साधारण हे स्थावर एकेंद्रिय जीव ६ आणि विकल-३, पंचेंद्रिय-१ असे जीवाचे-१० भेद यांचा परस्पर आरंभापासून घात होतो यांना परस्पर गुणल्यानंतर १०० होतात याना ८४ ने गुणल्यावर ८४०० होतात यांना १० शील-विराधनेने गुणल्यानंतर ८४००० होतात. या दहांची नांवे अशी आहेत — १. स्त्री संसर्ग, २. पुष्टरसभोजन, ३. गंधमाल्यकाग्रहण, ४. सुंदरशयना रानांचे ग्रहण, ५. भूषणे (दागिने घालणे), ६. गायन वादनाचे प्रसंग, ७. धनाचे संप्रयोजन, ८. कुशील चा संसर्ग, ९. राजसेवा, १०. रात्री संचरण हे १० शील 'विराधना' करणारे आहेत. यांच्या आलोचनेचे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| *अचेतन : स्त्री | काष्ठ, पाषाण चित्राम | मन काय | कृत कारित अनुमोदना | इन्द्रियाँ ५ | द्रव्य भाव | क्रोध, मान, माया, लोभ, | |
| | ३ × | २ × | ३ × | ५ × | २ × | ४ | = ७२० |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चेतन : स्त्री | देवी मनुष्यिणी तिर्यंचिणी | मन वचन काय | कृत कारित अनुमोदना | इन्द्रियाँ ५ | द्रव्य भाव | आहार परिग्रह भय, मैथुन | अनंतानुबंधी अप्रत्याख्यानावरण प्रत्याख्यानावरण संज्वलन | क्रोध मान, माया लोभ | |
| | ३ × | ३ × | ३ × | ५ × | २ × | ४ × | ४ × | ४ | = १७२८० |

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



१० दोष आहेत. गुरूंच्या जवळ लागलेल्या दोषांची आलोचना केली ती पूर्ण केली नाही काही शल्य ठेवले त्यांचे १० भेद केले आहेत यांना गुणल्यानंतर आठ लाख चाळीस हजार होतात. आलोचनेला धरून प्रायाश्चिताचे १० भेद आहेत यांच्या गुणाकार केल्यानंतर ८४ लाख होतात. यांची भावना करा, चिन्तन अभ्यास करा. यांची संपूर्ण प्राप्ति होण्याचा उपाय ठेवा यावर यांच्या भावनेचा (भक्तीचा) उपदेश आहे.

आचार्य म्हणतात कीं, वरचेवर बडबड केल्याने काही साध्य नाही जे काही आत्म्याच्या प्रवृत्तिच्या व्यवहाराचे भेद आहेत त्यांची गुण संज्ञा आहे त्यांची भावना राखणे येथे इतके आणखी जाणावे कीं, गुणस्थान १४ सांगितले आहेत त्या परिपाटीप्रमाणे गुण दोषांचा विचार आहे. मिथ्यात्व, सासादान, मिश्र या तिन्हीमध्यें तर विभावपरिणतिच आहे. यांच्यात गुणांचा विचारच नाही. अविरत देशाविरत आदिमध्यें शीलगुणाचा एक देश येतो (एक भाग) अविरतामध्यें मिथ्यात्व अनंतानुबंधी कषायाच्या अभावरूप गुणाचा एकदेश सम्यक्त्व आणि तीव्र रागद्वेषाच्या अभावरूप गुण येतात आणि देशाविरतमध्यें काही व्रताचा एकदेश येतो. प्रमत्तामध्यें महाव्रतरूप सामायिक चारित्र्याचा एक देश येतो कारण कीं, पापासंबंधी राग द्वेष तर तेथे नाही, परंतु धर्मासंबंधी राग आहे आणि सामायिक राग-द्वेषाच्या अभावाचे नाम आहे, म्हणून सामायिकाला एकदेशच म्हटले आहे. येथे स्वरूपाला सन्मुख झाल्याने क्रिया कांडाच्या संबंधात प्रमाद आहे म्हणून प्रमत्त नाम दिले आहे. अप्रमत्तात स्वरूप साधनेत तर प्रमाद नाही. परंतु काही स्वरूपाच्या साधनेचा राग व्यक्त आहे. म्हणून येथे ही सामायिकाला एकदेशच म्हटले आहे. अपूर्वकारण, अनिवृत्तिकरणात राग व्यक्त नाही. अव्यक्त कषायाचा सद्भाव आहे. म्हणून सामायिक चारित्र्याची पूर्णता सांगितली. सूक्ष्म सांपरायात अव्यक्तकषाय ही सूक्ष्म राहातात म्हणून याचे नांव सूक्ष्मसांपराय ठेवले. उपशान्त मोह, क्षीणमोहात, कषायाचा अभावच आहे. म्हणून जसे आत्म्याचे मोहविकार रहित शुद्ध स्वरूप होते त्याचा अनुभव झाला. म्हणून 'यथारख्यात चारित्र' नांव ठेवले. असे मोहकर्माच्या अभावाच्या अपेक्षेने तर येथेच उत्तरगुणाची पूर्णता सांगितली जाते, परंतु आत्म्याचे स्वरूप अनंतज्ञानादि स्वरूप आहे. म्हणून घाति कर्माचा नाश झाल्यानंतर अनंतज्ञानादि प्रकट होतात तेंव्हा संयोग केवली म्हणतात. यात ही काही योगांची प्रवृत्ति आहे. म्हणून 'योगकेवली' १४ वे गुणस्थान आहे. यात योगाची प्रवृत्ति मिटली जावून आत्मा अवस्थित १४ वे गुणस्थान आहे. यात योगाची प्रवृत्ति मिटली जावून आत्मा अवस्थित होतो. तेंव्हा ८४ लाख उत्तर गुणांची पूर्णता सांगितली जाते. अशा प्रकारे गुणस्थानाच्या अपेक्षेने उत्तरगुणांची प्रवृत्ति विचारात घेण्यायोग्य आहे हे बाह्य अपेक्षा भेद आहेत, अंतरंग अपेक्षेने विचार केला तर संख्यात असंख्यात, अनंत भेद होतात, अशा प्रकारे जाणले पाहिजेत ।।१२०।।

पुढे भेदाचे विकल्पाने रहित होवून ध्यान करण्याचा उपदेश करतात :-

झायहि धम्मं सुक्कं अट्ट रउद्दं च झाण मुत्तूण ।
रुद्दट्ट झाइयाइं इमेण जीवेण चिरकालं ।।१२१।।

ध्याय धर्म्यं शुक्लं आर्त्तं रौद्रं च ध्यानं मुक्त्वा ।
रौद्रार्त्ते ध्याते अनेन जीवेन चिरकालम् ।।१२१।।

www.vitragvani.com



अर्थ :— हे मुने तू आर्त - रौद्र ध्यानाला सोड आणि धर्मशुक्ल ध्यान आहे तेच तू कर. कारण कीं, रौद्र आणि आर्तध्यान तर या जीवाने अनादि कालापासून बरेच केले आहे.

भावार्थ :— आर्त्त रौद्र ध्यान अशुभ आहे संसाराचे कारण आहे ही दोन्ही ध्याने जीवा शिवाय उपदेश ही अनादि पासून मिळाले आहेत. म्हणून ते सोडण्याचा उपदेश केला आहे. धर्म शुक्ल ध्यान स्वर्ग मोक्षाचे कारण आहेत. यांचे ध्यान कधी केले नाही. म्हणून यांचे ध्यान करण्याचा उपदेश केला आहे. ध्यानाचे स्वरूप 'एकाग्रचिंता निरोध' म्हटले आहे - धर्म ध्यानात तर धर्मानुरागाचा सद्भाव आहे. म्हणून धर्माच्या मोक्षमार्गाच्या कारणात रागसहित एकाग्र चिंता निरोध होतो. म्हणून शुभरागाचे निमित्ताने पुण्यबंध ही होतो आणि शुध्द भावाच्या निमित्ताने पापकर्माची निर्जरा ही होते. शुक्ल ध्यानात ८ वे ९ वे १० वे गुणस्थानात तर अव्यक्त राग आहे. तेथे अनुभव अपेक्षेने उपयोग उज्ज्वल आहे, म्हणून शुक्ल नांव ठेवले आहे. आणि यामुळे वरच्या गुणस्थानात राग-कषायाचा अभावाच आहे. म्हणून सर्वथाच उपयोग उज्ज्वल आहे. ते शुक्लध्यान युक्त आहे. इतकी आणखी विशेषता आहे कीं, उपयोगाचे एकाग्रपण असलेली ध्यानाची स्थिती अंतर्मुहुर्ताची सांगितली आहे. त्या अपेक्षेने १३ व्या १४ व्या गुणस्थानात ध्यानाचा उपचार आहे आणि योगक्रियेच्या स्तंभनाच्या अपेक्षेने ध्यान म्हटले आहे. हे शुक्लध्यान कर्माची निर्जरा करून जीवाला मोक्ष प्राप्त करून देतो. असा ध्यानाचा उपदेश जाणावा. ॥१२१॥

आता सांगतात कीं, हे ध्यान भावलिंगी मुनिना मोक्ष प्राप्त करून देते :-

जे के वि दव्वसवणा इंदियसुहआउला ण छिंदंति ।
छिंदंति भावसवणा झाणकुठारेहिं भवरुक्खं ॥१२२॥

ये केऽपि द्रव्यश्रमणा इन्द्रियसुखाकुलाः न छिंदन्ति ।
छिन्दन्ति भावश्रमणाः ध्यानकुठारैः भववृक्षम् ॥१२२॥

अर्थ :— कितीतरी द्रव्यलिंगी श्रमण आहेत. ते इंद्रिय सुखात व्याकुल आहेत त्यांचे हे धर्म - शुक्ल ध्यान होत नाही. ते तर संसार रूपी वृक्षाला काटण्याला समर्थ नाहीत आणि जे भाव लिंगी श्रमण आहेत ते ध्यान रूपी कुऱ्हाडीने संसाररूपी वृक्षाला तोडून टाकतात.

भावार्थ :— जे मुनि द्रव्यलिंग तर धारण करतात, परंतु त्याना परमार्थ सुखाचा अनुभव होत नाही. म्हणून या लोकी, परलोकात ते इंद्रियाच्या सुखाचीच इच्छा करतात. तपश्चरणादिक ही याच अभिलाषेने करतात त्याना धर्म - शुक्ल ध्यान कसे होईल? अर्थात् होत नाही. ज्यानी परमार्थ सुखाचा आस्वाद घेतला आहे त्याना इंद्रियसुख, दु:ख आहे असे स्पष्ट भासित झाले आहे. म्हणून परमार्थ सुखाचा उपाय धर्म शुक्ल ध्यान आहे ते करून संसाराचा अभाव करतात, म्हणून भावलिंगी होवून ध्यानाचा अभ्यास केला पाहिजे ॥१२२॥

www.vitragvani.com



पुढे याचा अर्थ दृष्टांत देवून दृढ करत आहेत :-

जह दीवो गब्भहरे मारुयवाहाविवज्जिओ जलइ ।
तह रायानिलरहिओ झाणपईवो वि पज्जलइ ॥१२३॥

यथा दीपः गर्भगृहे मारुतबाधाविवर्जितः ज्वलति ।
तथा रागानिलरहितः ध्यानप्रदीपः अपि प्रज्वलति ॥१२३॥

अर्थ :— जसा दीपक गर्भगृह अर्थात् जेथे वाऱ्याचा संचार नाही अशा मधल्या घरात बाधा रहित निश्चल होवून (जळतो) तेवतो; तसेच अंतरंग मनात रागरूपी वाऱ्याने (हवेने) रहित ध्यान रूपी दीपक ही जळतो, एकाग्र होवून स्थिर होतो. आत्मरूपाला प्रकाशित करतो.

भावार्थ :— मागे सांगितले होते कीं, जो इंद्रिय सुखाने व्याकुल आहे त्याला शुभध्यान होत नाही, या साठीं दीपकाचे उदाहरण दिले आहे. जेथे इंद्रिय सुखाचा राग रूपी हवा (पवन) आहे तेथे ध्यानरूपी दिपक निर्बाध रितीने कसा प्रकाश देवू शकेल ? अर्थात् देणार नाही, आणि ज्याना हा रागरूपी पवन बाधा करत नाही त्यांचा ध्यानरूपी दिपक निश्चल राहातो ॥१२३॥

पुढे म्हणतात कीं, ध्यानात जे परमार्थ ध्येय शुध्द आत्म्याचे स्वरूप आहे त्या स्वरूपाच्या आराधनेत नायक (प्रधान) पंचपरमेष्ठी आहेत. त्यांचे ध्यान करण्याचा उपदेश करत आहेत.

झायहि पंच वि गुरवे मंगलचउसरणलोयपरियरिए ।
णरसुरखेयरमहिए आराहणणायगे वीरे ॥१२४॥

ध्याय पंच अपि गुरून् मंगलचतुः शरणलोकपरिकरितान् ।
नरसुरखेचरमहितान् आराधनानायकान् वीरान् ॥१२४॥

अर्थ :— हे मुने ! तू पंच गुरू अर्थात् पंच परमेष्ठिचे ध्यान कर. येथे 'अपि' शुध्द शुध्दात्म स्वरूपाच्या ध्यानाला सूचित करतो. पंचपरमेष्ठी कशा आहेत? मंगल अर्थात् पापाचा नाशक अथवा सुखदायक आणि चार शरण तसेच 'लोक' अर्थात् लोकातील प्राणी अरहंत, सिध्द साधु, केवली प्रणीत धर्म हे परिकरित म्हणजे युक्त आहेत. नर - सुर-विद्याधर सहित आहेत पूज्य आहेत. म्हणून ते लोकोत्तम म्हटले जातात. आराधनेचे नायक आहेत, वीर आहेत कर्माला जिकंण्यासाठी सुभट आहेत आणि विशिष्ट लक्ष्मीला प्राप्त करतात. अशा पंच परम गुरूचे ध्यान कर.

भावार्थ :— येथे पंच परमेष्ठीचे ध्यान करण्यासाठीं सांगितले आहे. त्या ध्यानात विघ्नाला दूर करणारे ' चार मंगलरूप' सांगितले आहेत ते हेच आहेत 'चार शरण' आणि 'लोकोत्तम' सांगितले आहेत ते ही हेच आहेत. आराधना दर्शन, - ज्ञान- चारित्र - तप हे चार आहेत. यांचे नायक (स्वामी) ही हेच आहेत, कर्मांना जिंकणारे ही हेच आहेत. म्हणून ध्यान करणाऱ्यासाठी यांचे ध्यान श्रेष्ठ आहे. शुध्द स्वरूपाची प्राप्ति यांच्या ध्यानामुळेच होते. म्हणून हा उपदेश आहे ॥१२४॥

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे ध्यान म्हणजे ज्ञानाचे एकाग्र होणे सांगितले आहे, म्हणून ज्ञानाचा अनुभव करण्याचा उपदेश करतात :-

णाणमयविमलसीयलसलिलं पाऊण भविय भावेण ।
बाहिजरमरणवेयणडाहविमुक्का सिवा होंति ॥१२५॥

ज्ञानमयविमलशीतलसलिलं प्राप्य भव्याः भावेन ।
व्याधिजरामरणवेदनादाहविमुक्ताः शिवाः भवन्ति ॥१२५॥

अर्थ :— भव्य जीव ज्ञानमयी निर्मल शीतल जलाला सम्यक्त्वभाव सहित पीवून आणि व्याधी स्वरूप जरा मरणाची वेदना (पीडा) भस्म करून मुक्त अर्थात संसार रहित 'शिव' अर्थात् परमानंद सुखरूप होतात.

भावार्थ :— जसे निर्मल आणि शीतल जल पिण्यामुळे पित्ताचे दाहरूप व्याधी मिटून शांती मिळते. तसेच हे ज्ञान आहे ते जेंव्हा रागादिक मलाने रहित निर्मल आणि आकुलता रहित शांतभावरूप होते, त्याची भावना करून रूचि श्रध्दा प्रतिति रूप, त्यात तन्मय झालो तर जरा, मरणरूप दाह, वेदना मिटते. आणि संसारातून निवृत्त होवून सुखरूप होतो. म्हणून भव्य जीवाला हा उपदेश आहे कीं, ज्ञानात लीन होत जावो. ॥१२५॥

पुढे म्हणतात कीं, या ध्यानरूप अग्निने संसाराचे बीज 'आठकर्म' एक वेळ दग्ध झाले म्हणजे परत संसारात येत नाही. हे बीज भावमुनिचें पूर्णदग्ध झालेले असते. :-

जह बीयम्मि य दड्ढे ण वि रोहइ अंकुरो य महिबीढे ।
तह कम्मबीयदड्ढे भवंकुरो भावसवणाणं ॥१२६॥

यथा बीजे च दग्धे नापि रोहति अंकुरश्च महीपीठे ।
तथा कर्मबीजदग्धे भवांकुरः भावश्रमणानाम् ॥१२६॥

अर्थ :— जसे पृथ्वीतलावर बीज जळून गेल्यावर त्याला परत अंकुर येत नाही, तसेच भावलिंगी श्रमणाचा संसाराचे कर्मरूपी बीज नष्ट होते म्हणून संसाररूपी अंकुर पुन्हा फुटत नाही.

भावार्थ :— संसाराचे बीज म्हणजे ज्ञानावरणादि कर्म आहे. हे कर्म भावश्रमणाच्या ध्यानरूप अग्निने भस्म होतात. म्हणून पुन्हा संसाररूप अंकुर फुटतच नाही. म्हणून भावश्रमण होवून धर्म शुल्क ध्यानाने कर्माचा नाश करणे योग्य आहे. हा उपदेश दिला आहे. कोणी सर्वथा एकांती अन्यथा म्हणाले कीं, कर्म अनादि आहे, त्याला अंत ही नाही. त्याचा ही हा निषेध आहे. बीज अनादि आहे ते एकदा दग्ध झाले कीं, नंतर काही उगवत नाही त्याचप्रमाणे हे जाणावे. ॥१२६॥

भावसवणो वि पावइ सुक्खाइं दुहाइं दव्वसवणो य ।
इय णाउं गुणदोसे भावेण य संजुदो होइ ॥१२७॥

भावश्रमणः अपि प्राप्नोति सुखानि दुःखानि द्रव्यश्रमणश्च ।
इति ज्ञात्वा गुणदोषान् भावेन च संयुतः भव ॥१२७॥

www.vitragvani.com



अर्थ :— भावश्रमण तर सुखप्राप्त करून घेतो आणि द्रव्यश्रमण दु:ख प्राप्त करून घेतो. अशा प्रकारे गुण दोषाला जाणून हे जीव ! तू भाव सहित संयमी (बन) हो !

भावार्थ :— सम्यक्‌दर्शनसहित भावश्रमण होतो, तो संसाराचा अभाव करून सुख प्राप्त करून घेतो, आणि मिथ्यात्वासहित द्रव्यश्रमण नुसता वेषधारी होतो. हा संसाराचा अभाव करू शकत नाही. त्या मुळें दु:खाला प्राप्त होतो. म्हणून उपदेश करतात कीं, दोन्ही चे गुण - दोष जाणून भाव संयमी होणे योग्य आहे. हे सगळ्या उपदेशाचे सार आहे. ।।१२७।।

पुढे पुन्हा याचा उपदेश संक्षेपाने करतात :-

तित्थयरगणहराइं अब्भुदयपरंपराइं सोक्खाइं ।
पावंति भावसहिया संखेवि जिणेहिं वज्जरियं ।।१२८।।

तीर्थंकरगणधरादीनि अभ्युदयपरंपराणि सौख्यानि ।
प्राप्नुवंति भावश्रमणाः संक्षेपेण जिनैः भणितम् ।।१२८।।

अर्थ :— जे भाव सहित मुनि आहेत ते अभ्युदय सहित तीर्थंकर - गणधर आदि पदवीच्या सुखाना प्राप्त होतात हे संक्षेपाने सांगितले आहे.

भावार्थ :— तीर्थंकर गणधर चक्रवर्ती आदि पदाचे सुख अभ्युदयासहित आहेत. ते भाव सहित सम्यक्‌दृष्टी मुनि प्राप्त करून घेतात. हे सर्व उपदेश संक्षेपाने सांगितला आहे. म्हणून भावसहित मुनि होणे योग्य आहे ।।१२८।।

पुढे आचार्य म्हणतात कीं, जो भाव श्रमण आहे ते धन्य आहेत त्याना आमचा नमस्कार असो :-

ते धण्णा ताण णमो दंसणवरणाणचरणसुद्धाणं ।
भावसहियाण णिच्चं तिविहेण पणट्ठमायाणं ।।१२९।।

ते धन्याः तेभ्यः नमः दर्शनवरज्ञानचरणशुद्धेभ्यः ।
भावसहितेभ्यः नित्यं त्रिविधेन प्रणष्टमायेभ्यः ।।१२९।।

अर्थ :— आचार्य म्हणतात कीं, जे मुनि सम्यक्‌दर्शन श्रेष्ठ (विशिष्ट) ज्ञान आणि निर्दोष चारित्र याने शुध्द आहेत म्हणून भाव सहित आहेत आणि प्रनष्ट झाली आहे. माया ज्यांची अर्थात् कपट परिणाम नष्ट झाले आहेत असे ते धन्य आहेत त्याना आमचा मन, वचन, कायेने सदा नमस्कार असो.

भावार्थ :— भावलिंगीयामध्ये जे दर्शन - ज्ञान - चारित्र्याने युक्त आहेत त्यांच्या प्रति आचार्यांची भक्ती उत्पन्न झाली त्यांना धन्य म्हणून नमस्कार केला आहे. तो योग्यच आहे. जे मोक्षमार्गात अनुसक्त आहेत, त्यांच्यात मोक्षमार्गामध्ये प्रधानता दिसते त्यांना नमस्कार केलाच पाहिजे ।।१२९।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे म्हणतात कीं, जे भावश्रमण आहेत ते देवादिकाची ऋध्दि पाहून मोहाला प्राप्त होत नाहीत :-

इड्ढिमतुलं विउव्विय किण्णरकिंपुरिसअमरखयरेहिं ।
तेहिं वि ण जाइ मोहं जिणभावणभाविओ धीरो ।।१३०।।

ऋद्धिमतुलां विकुर्वद्भिः[1] किंनरकिंपुरुषामरखचरैः ।
तैरपि न याति मोहं जिनभावनाभावितः धीरः ।।१३०।।

अर्थ :— जिनभावना (सम्यक्त्व भावना) ने युक्त जीव किंन्नर, किंपुरूष देव ; कल्पवासी देव आणि विद्याधर यांनी विक्रियारूप विस्तार केला गेलाल्या अतुल ऋध्दिनी मोहाला प्राप्त होत नाही, कारण कीं, सम्यक्दृष्टि जीव कसा आहे ? ते धीरवान, दृढबुध्दि, अर्थात् नि:शकित अंगाचे धारक आहेत.

भावार्थ :— ज्यांचे जिन सम्यक्त्व दृढ आहे त्यांना संसाराची ऋद्धि तृणवत् आहे. परमार्थ सुखाची भावना असेल तर विनाशाच्या ऋद्धिची इच्छा कां होईल ? ।।१३० ।।

पुढे याचेच समर्थन करतात कीं, अशी ऋद्धिची इच्छा ही करत नाहीत तर अन्य सांसारिक सुखाची काय कथा ? :—

किं पुण गच्छइ मोहं णरसुरसुक्खाण अप्पसाराणं ।
जाणंतो पस्संतो चिंतंतो मोक्ख मुणिधवलो ।।१३१।।

किं पुनः गच्छति मोहं नरसुरसुखानां अल्पसाराणाम् ।
जानन् पश्यन् चिंतयन् मोक्षं मुनिधवलः ।।१३१।।

अर्थ :— सम्यक् दृष्टिजीव पूर्वोक्त प्रकारच्या ऋद्धिची इच्छा करत नाहीत तो मुनिधवल अर्थात् मुनिप्रधान आहे. तो अन्य जे मनुष्य देवांचे सुख भोगादिक ज्यांच्यात अल्प (सार) आहे, जे मोह करत नाही, कसे आहेत मुनिधवल ? मोक्ष जाणतात, त्यांच्याकडेच दृष्टी आहे त्यांचेच चिंतन करतात.

भावार्थ :— जे मुनिप्रधान आहेत त्यांची भावना मोक्ष सुखातच आहे. ते मोठ मोठ्या देव विद्याधरांची पसरलेली विक्रिया ऋध्दिमध्ये ही लालसा करत नाहीत तर किंचित्मात्र विनाश होणारा माणूस, देवांच्या भोगादिकाचे सुख त्याची इच्छा कशी करतील? अर्थात् करणार नाहीत ।।१३१ ।।

पुढे उपदेश करतात कीं, जो पर्यंत जरा आदि येत नाही तो पर्यंत आपले हित करून घ्या.

उत्थरइ जा ण जरओ रोयग्गी जा ण डहइ देहउडिं ।
इन्दियबलं न वियलइ ताव तुमं कुणहि अप्पहियं ।।१३२।।

आक्रमते यावन्न जरा रोगाग्निर्यावन्न दहति देहकुटीम् ।
इन्द्रियबलं न विगलति तावत् त्वं कुरु आत्महितम् ।।१३२।।

---

१ संस्कृत मुद्रित प्रतिमें 'विकृतां' पाठ आहे.

अर्थ :— हे मुने ! जो पर्यंत तुम्हाला म्हातारण येत नाही तसेच जो पर्यंत रोगरूपी अग्नि तुझ्या देहरूपी कुटीला भस्म करत नाही आणि जो पर्यंत इंद्रियांचे बल घटत नाही तो पर्यंत आपले हित करून घ्या. ।।१३२।।

भावार्थ :— वृध्दावस्थेत शरीर रोगाने जर्जरित होते, इंद्रिये क्षीण होतात तेंव्हा असमर्थ होवून या लोकीचे कार्य, उठणे, बसणे करूं शकत नाही. तेंव्हा परलोकासंबंधी तपश्चरणादिक तसेच ज्ञानाभ्यास आणि स्वरूपाचे अनुभावादि कार्य कसे करणार ? म्हणून हा उपदेश आहे कीं, जो पर्यंत सामर्थ्य आहे तो पर्यंत आपले हितरूप कार्य करा ।।१३२।।

पुढे अहिंसा धर्माच्या उपदेशाचे वर्णन करत आहेत :-

छज्जीव षडायदणं णिच्चं मणवयणकायजोएहिं ।
कुरु दय परिहर मुणिवर भावि अपुव्वं महासत्तं ।।१३३।।

[२]षट्जीवान् षडायतनानां नित्यं मनोवचनकाययोगैः ।
कुरु दयां परिहर मुनिवर भावय अपूर्वं महासत्त्वम् ।।१३३।।

अर्थ :— हे मुनिवर ! तू षट्कायिक जीवावर दया कर आणि षट् अनायतनाला मन, वचन, कायच्या योगाने सोड, तसेच अपूर्व जे पूर्वि झाले नाही असा महासत्त्व अर्थात् सर्व जीवात व्यापक (ज्ञायक) महासत्त्व चेतना भावाची भक्ती कर.

भावार्थ :— अनादिकालापासून जीवाचे स्वरूप चेतना स्वरूप जाणले नाही. म्हणून जीवाची हिंसा केली म्हणून हा उपदेश आहे कीं, आता जीवात्म्याचे स्वरूप जाणून षट्कायिक जीवावर दया कर. अनादि कालापासून आप्त, आगम, पदार्थाचा आणि त्यांची सेवा करणारांचे स्वरूप जाणले नाही म्हणून अनात्म आदि सहा अनाप्रन जे मोक्ष मार्गाचे स्थान नाही त्याना चांगले समजून सेवन केले म्हणून हा उपदेश आहे कीं, अनायतनाचा परिहार कर (नाश कर) जीवाच्या स्वरूपाचे उपदेशक हे दोन्हि ही तूं जाणले नाहीत, भावना केली नाही म्हणून आता भावना कर असा उपदेश आहे ।।१३३।।

पुढे म्हणतात कीं, जीवाचा तसेच उपदेश करणाऱ्यांचे स्वरूप न जाणल्यामुळे सर्व जीवांच्या प्राणांचा आहार केला अशा प्रकारे सांगतात :-

दसविहपाणाहारो अणंतभवसायरे भमंतेण ।
भोयसुहकारणट्ठं कदो य तिविहेण सयलजीवाणं ।।१३४।।

दशविधप्राणाहारः अनंतभवसायरे भ्रमता ।
भोगसुखकारणार्थं कृतश्च त्रिविधेन सकलजीवानां ।।१३४।।

अर्थ :— हे मुने ! तुम्ही अनंतभवसागरात भ्रमण करत, सकलत्रस, स्थावर जीवांच्या दहा प्रकारच्या प्राणांचा आहार, भोग सुखाच्या कारणासाठी मन, वचन, कायेने केला.

www.vitragvani.com



भावार्थ :— अनादिकालापासून जिनमताच्या उपदेशाशिवाय अज्ञानी होवून तू त्रस, स्थावर जीवाच्या, प्राणांचा आहार केला म्हणून आता जीवाचे स्वरूप जाणून जीवांना दया, दाखव, भोगाभिलाषा सोड हा उपदेश आहे ।।१२४।।

पुन्हा सांगतात कीं, अशा प्राण्यांच्या हिंसेमुळे संसारात भ्रमण करून दु:ख प्राप्त केले :-

पाणिवहेहि महाजस चउरासीलक्खजोणिमज्झम्मि ।
उप्पजंत मरंतो पत्तोसि निरंतरं दुक्खं ।।१३५।।

प्राणिवधैः महायशः ! चतुरशीतिलक्षयोनिमध्ये ।
उत्पद्यमानः म्रियमाणः प्राप्तोऽसि निरंतरं दुःखम् ।।१३५।।

अर्थ :— हे मुने ! हे महायश ! तूं प्राण्यांच्या घाताने ८४ लाख योनी मध्यें उत्पन्न होवून आणि मृत होवून निरंतर दु:ख प्राप्त केले.

भावार्थ :–जिनमताच्या उपदेशा शिवाय, जीवाच्या हिंसेने हा जीव ८४ लाख योनित उत्पन्न होतो आणि मरतो. हिंसेने कर्मबंध होतो, कर्मबंधाच्या उदयाने उत्पत्तिमरणरूप संसार होतो. अशा प्रकारे जन्ममरणाचे दु:ख सहन करतो म्हणून जीवदयेचा उपदेश केला आहे. ।।१३५।।

पुढे त्या दयेचा उपदेश करतात :-

जीवाणमभयदाणं देहि मुणी पाणिभूयसत्ताणं ।
कल्लाणसुहणिमित्तं परंपरा तिविहसुद्धीए ।।१३६।।

जीवानामभयदानं देहि मुने प्राणिभूतसत्त्वानाम् ।
कल्याणसुखनिमित्तं परंपरया त्रिविधशुद्ध्या ।।१३६।।

अर्थ :— हे मुने ! जीवाला आणि प्राणीभूत सत्त्वाला आपल्या परंपरेने कल्याण आणि सुख होण्यासाठीं मन, वचन, काय, च्या शुध्दतेने अभयदान दे.

भावार्थ :—'जीव' पंचेंद्रियाला म्हणतात, 'प्राणी' विकलत्रयाला म्हणतात, 'भूत' वनस्पतिला म्हणतात आणि 'सत्त्व' पृथ्वी, आप, तेज वायूला म्हणतात. या सर्व जीवाना आपल्या प्रमाणेच जाणून अभयदान देण्याचा उपदेश आहे. यामुळे शुभ प्रकृतिंचा बंध झाल्याने अभ्युदयाचे सुख मिळते. परंपरेने तीर्थंकर पद प्राप्त करून मोक्षपद प्राप्त करतो. हा उपदेश आहे ।।१३६ ।।

www.vitragvani.com



पुढे जीव षट्‌अनायतनाच्या प्रसंगाने मिथ्यात्वाने संसारात भ्रमण करतो. त्याचे स्वरूप सांगतात. प्रथम मिथ्यात्वाचे भेद सांगतात :-

असियसय किरियवाई अक्किरियाणं च होई चुलसीदी ।
सत्तट्ठी अण्णाणी वेणैया होंति बत्तीसा ।।१३७।।

अशीतिशतं क्रियावादिनामक्रियमाणं च भवति चतुरशीतिः ।
सप्तषष्टिरज्ञानिनां वैनयिकानां भवति द्वात्रिंशत् ।।१३७।।

<u>अर्थ :</u>— १८० क्रियावादी आहेत. ८४ अक्रियावादिंचे भेद आहेत, अज्ञानी ६७ भेदरूप आहेत आणि विनयवादी ३२ आहेत.

<u>भावार्थ :</u>— वस्तुचे स्वरूप अनंतधर्मस्वरूप सर्वज्ञाने म्हणले आहे, हे प्रमाण आणि नयाने सत्यार्थ सिध्द होतो. ज्यांच्या मतात सर्वज्ञ नाही तसेच सर्वज्ञाच्या स्वरूपाच्या यथार्थरूपाने निश्चय करून त्याचे श्रध्दान केले नाही, असा अन्यवादीने वस्तुचा एकधर्म ग्रहण करून त्याचा पक्षपात केला कीं, आम्ही अशाप्रकारे मानले आहे ते असेच आहे. अन्य प्रकार नाही. अशा प्रकारे विधि - निषेध करून एक - एक धर्माचे पक्षपाती झाले. त्यांचे हे संक्षेपाने ३६३ भेद झाले आहेत.

<u>क्रियावादी :</u> — गमन करणे, बसणे, उभे राहाणे, खाणे, पीणे, झोपणे, उत्पन्न होणे, नष्ट होणे, पाहाणे, जाणणे, करणे, भोगणे, भूलणे, आठवणे, प्रीति करणे, हर्ष करणे, विषाद करणे, द्वेष करणे, जगणे, मरणे, इत्यादि क्रिया आहेत. याना जीवादिक पदार्थांनी पाहून कोणती ना कोणती क्रियेचा पक्ष घेतला आहे. असे परस्पर क्रियाविवादाने भेद झाले आहेत. यांचे संक्षेपाने १८० भेद निरूपण केले आहेत. विस्तार केला तर बरेच होतात.

कित्येक अक्रियावादी आहेत. हे जीवादिक पदार्थात क्रियेचा अभाव मानून आपसात विवाद करतात, कित्येक म्हणतात कांहीं करत नाही, कित्येक म्हणतात, भोगत नाहीत, कांही म्हणतात उत्पन्न होत नाहीत कांहीं म्हणतात नष्ट होत नाहीत, कांहीं म्हणतात गमन करत नाहीत आणि कांहीं म्हणतात थांबत नाहीत इत्यादि क्रियाच्या अभावाच्या पक्षपाताने सर्वथा एकान्ति होतात यांचे संक्षेपाने १८४ भेद आहेत.

कित्येक अज्ञानवादी आहेत, यातले कांहीं तर सर्वज्ञतेचा अभाव मानतात कांहीं म्हणतात जीव अस्ति आहे हे कोण जाणतो ? कित्येक म्हणतात जीव नास्ति आहे हे कोण जाणतो? कित्येक म्हणतात जीव नित्य आहे हे कोण जाणतो ? कोणी म्हणतात जीव अनित्य आहे हे कोण जाणतो इत्यादि संशय -विपर्यय - अनध्यवसायरूप होवून विवाद करतात याचे संक्षेपाने ६७ भेद आहेत.

कित्येक विनयवादी आहेत त्यातले कांहीं म्हणतात देवादिकाच्या विनयाने सिध्दि आहे, कांहीं म्हणतात गुरूच्या विनयाने सिध्दि आहे, कित्येक म्हणतात कीं, आईच्या विनयाने तसेच कांहीं म्हणतात कीं, पित्याच्या विनयाने सिध्दि आहे. कित्येक म्हणतात कीं, राजाच्या विनयाने सिध्दि आहे कांहीं

म्हणतात सगळ्याच्या विनयाने सिध्दि आहे. इत्यादि विवाद करतात. यांचे संक्षेपाने ३२ भेद आहेत. अशा प्रकारे सर्वथा एकांतीयांचे ३६३ भेद संक्षेपाने आहेत. विस्तार केल्यानंतर बरेच प्रकार होतात. यांच्यात कित्येक ईश्वरवादी आहेत, कांहीं कालवादी आहेत, कांहीं स्वभाववादी आहेत, कांहीं विनयवादी आहे कित्येक आत्मवादि आहेत. यांचे स्वरूप गोमट्टसारदि ग्रंथांमधून जाणावे. असे मिथ्यात्वाचे भेद आहेत ।।१३७।।

पुढे म्हणतात कीं, अभव्यजीव आपल्या प्रकृतिला सोडत नाहीत. त्याचे मिथ्यात्व मिळत नाही :-

ण मुयइ पयडि अभव्वो सुट्ठु वि आयण्णिऊण जिणधम्मं ।
गुडदुद्धं पि पिबंता ण पण्णया णिव्विसा होंति ।।१३८।।

न मुंचति प्रकृतिमभव्यः सुष्ठु अपि आकर्ण्य जिनधर्मम् ।
गुडदुग्धमपि पिबंतः न पन्नगाः निर्विषाः भवंति ।।१३८।।

<u>अर्थ :</u>— अभव्यजीव भल्या प्रकारे जिनधर्माला ऐकून ही आपल्या प्रकृतिला सोडत नाही. येथे दृष्टांत आहे कीं, सर्प गुळासहित दूध पीत राहून ही विषरहित होत नाही.

<u>भावार्थ :</u>— जे कारण मिळून ही सुटत नाहीत त्याला प्रकृति किंवा 'स्वभाव' म्हणतात. अभव्याचा हा स्वभाव आहे कीं, ज्या मध्यें अनेकान्त तत्त्व स्वरूप आहे असा वीतराग विज्ञान स्वरूप ऐकून ही ज्यांचा मिथ्या स्वरूप भाव बदलत नाही ते वस्तुचे स्वरूप आहे. हे कोणीही बनवलेले नाही. येथे उपदेश अशा प्रकारे जाणावा कीं, जरी अभव्यरूप प्रकृति सर्वगम्य आहे, तरीही अभव्याच्या प्रकृति प्रमाणे आपली प्रकृति न ठेवता, मिथ्यात्वाला सोडणे हा उपदेश आहे ।।१३८।।

पुढे हाच अर्थ दृढ करतात :-

मिच्छत्तछण्णदिट्ठी दुद्धीए दुम्मएहिं दोसेहिं ।
धम्मं जिणपण्णत्तं अभव्वजीवो ण रोचेदि ।।१३९।।

मिथ्यात्वछन्नदृष्टिः दुर्धिया दुर्मतैः दोषैः ।
धर्मं जिनप्रज्ञप्तं अभव्यजीवः न रोचयति ।।१३९।।

<u>अर्थ :</u>— दुर्मत जे सर्वथा एकान्ती मत, तसेच प्ररूपित अन्यमत, ते ही झालेले दोष, त्यांच्याद्वारे आपल्या दुर्बुध्दिने (मिथ्यात्वाने) आच्छादित आहे बुध्दि ज्यांची असा अभव्य जीव आहे त्यांना जिनप्रणीत धर्म रूचत नाही तो त्यांची श्रध्दा करत नाही, त्यात रूची घेत नाही.

<u>भावार्थ :</u>— मिथ्यात्वाच्या उपदेशाने आपल्या दुर्बुध्दिद्वारे मिथ्यादृष्टि आहेत, त्याना जिनधर्म रूचत नाही. तेंव्हा ज्ञात होते कीं, हे अभव्य जीवाचे भाव आहेत. यथार्थ अभव्यजीवाला तर सर्वज्ञ जाणतात परंतु हे अभव्य जीवाचे चिन्ह आहेत, हे परीक्षा करून जाणले जातात ।।१३९।।

www.vitragvani.com



पुढे सांगतात कीं, असे मिथ्यात्वाच्या निमित्ताने दुर्गतिला प्राप्त होतात :-

कुच्छियधम्मम्मि रओ कुच्छियपासंडिभत्तिसंजुत्तो ।
कुच्छियतवं कुणंतो कुच्छियगइभायणो होइ ॥१४०॥

कुत्सितधर्मे रतः कुत्सितपाषण्डिभक्तिसंयुक्तः ।
कुत्सिततपः कुर्वन् कुत्सितगतिभाजनं भवति ॥१४०॥

अर्थ :— आचार्य म्हणतात कीं, जो कुत्सित (निंद्य) मिथ्याधर्मात रत लीन आहे, जो पाखंडी निंद्यवेषधारी भक्ति करणारा आहे, जो निंद्य मिथ्याधर्म पाळतो, मिथ्यादृष्टिची भक्ति करतो आणि मिथ्या अज्ञानतप करतो तो दुर्गतीला प्राप्त होतो, म्हणून मिथ्यात्व सोडा हा उपदेश आहे. ॥१४० ॥

पुढे या अर्थाला दृढ करताना असे म्हणतात कीं, अशा मिथ्यात्वाने मोहित जीव संसारात भ्रमण करतो :—

इय मिच्छत्तावासे कुणयकुसत्थेहिं मोहिओ जीवो ।
भमिओ अणाइकालं संसारे धीर चिंतेहि ॥१४१॥

इति मिथ्यात्वावासे कुनयकुशास्त्रैः मोहितः जीवः ।
भ्रमितः अनादिकालं संसारे धीर ! चिन्तय ॥१४१॥

अर्थ :— इति अर्थात् पूर्वोक्त प्रकार मिथ्यात्वाचा आवास हा मिथ्यादृष्टियांचा संसार त्यात (कुनय) सर्वथा एकान्तसहित कुशास्त्राने मोहित (बेहोश) झालेला हा जीव अनादिकालापासून संसारात भ्रमण करत आहे. असे हे धीरवान मुने ! तू विचार कर.

भावार्थ :— आचार्य सांगतात कीं, पूर्वोक्त ३६३ कुवादियानी सर्वथा एकांतपक्षरूप कुनयद्वारे रचलेल्या शास्त्राने मोहित होवून हा जीव संसारात अनादिकालापासून भ्रमण करत आहे, म्हणून हे धीर मुनि ! आता अशा कुवादियांची संगती ही करूं नको हा उपदेश आहे. ॥१४१ ॥

पुढे म्हणतात कीं, पूर्वोक्त ३६३ पाखंडींचा मार्ग सोडून जिनमार्गात मन लावा :—

पासंडी तिण्णि सया तिसट्ठिभेया उमग्ग मुत्तूण ।
रुंभहि मणु जिणमग्गे असप्पलावेण किं बहुणा ॥१४२॥

पाखण्डिनः त्रीणि शतानि त्रिषष्टिभेदाः उन्मार्गं मुक्त्वा ।
रुन्द्धि मनः जिनमार्गे असत्प्रलापेन किं बहुना ॥१४२॥

अर्थ :— हे जीव ! तीनशे त्रेसष्ठ पाखंडी मार्ग सोडून जिनमार्गात आपल्या मनाला गुंतव हे थोडक्यात आहे. आणखी निरर्थक प्रलाप करण्यात काय अर्थ आहे ?

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



भावार्थ :— अशाप्रकारे मिथ्यात्वाचे वर्णन केले आहे. आचार्य म्हणतात कीं, निरर्थक वचनालापाचा काय फायदा ? थोडक्यात असे सांगत आहेत कीं, ३६३ कुवादि पाखंडी मार्ग सांगतात ते सोडून जिनमार्गात मन गुंतवा दुसरीकडे जावू देवू नका येथे आणखी विशेष लक्षात ठेवावे कीं, कालदोषाने या पंचमकाळात अनेक पक्ष आणि मतमतांतरे झाली आहेत, त्यांच्याकडे लक्ष न देता सर्वथा एकान्ताचा पक्ष सोडून अनेकान्तरूप जिनवचनाला शरण जा ॥१४२॥

पुढे सम्यक्‌दर्शनाचे निरूपण करतात, प्रथम म्हणतात कीं, सम्यक्‌दर्शनरहित 'चालणारा ही मृतच आहे :—

जीवविमुक्को सवओ दंसणमुक्को य होइ चलसवओ ।
सवओ लोयअपुज्जो लोउत्तरयम्मि चलसवओ ॥१४३॥

जीवविमुक्तः शवः दर्शनमुक्तश्च भवति चलशवः ।
शवः लोके अपूज्यः लोकोत्तरे चलशवः ॥१४३॥

अर्थ :— लोकात जीव रहित शरीराला 'शव' म्हणतात, 'मृतक' किंवा 'मुडदा' म्हणतात, तसेच सम्यक्‌दर्शनरहित पुरूष 'चलता हुआ मृतक' चालत असूनही मृत आहे. मृतक तर लोकात अपूज्य आहेत. अग्निने जाळले जाते किंवा पृथ्वीमध्यें गाढले जाते, आणि 'दर्शनरहित चालणारा मुडदा' लोकोत्तर जे मुनि सम्यक्‌दृष्टि त्यांच्यात अपूज्य आहेत. ते त्याना वंदनादि करत नाहीत. मुनिवेष धारण करतात तरी ही त्यांना संघाबाहेर ठेवतात अथवा परलोकात निंदयगति मिळवून अपूज्य होतात.

भावार्थ :— सम्यग्दर्शना शिवाय पुरूष मृततुल्यच आहे.

पुढे सम्यक्त्वाचा मोठेपणा सांगत आहेत :—

जह तारयाण चंदो मयराओ मयउलाण सव्वाणं ।
अहिओ तह सम्मत्तो रिसिसावयदुविहधम्माणं ॥१४४॥

यथा तारकाणां चन्द्रः मृगराजः मृगकुलानां सर्वेषाम् ।
अधिकः तथा सम्यक्त्वं ऋषिश्रावकद्विविधधर्माणाम् ॥१४४॥

अर्थ :— जसे तारकांच्या समुहात चंद्र मोठा आहे आणि मृगकुल अर्थात् पशूंच्या समुहात मृगराज (सिंह) अधिक आहे, तसेच ते ऋषि (मुनि) आणि श्रावक या दोन्ही प्रकारच्या धर्मात सम्यक्त्व आहे ते अधिक आहे.

भावार्थ :— व्यवहार धर्माची जितक्या प्रवृत्ति आहेत त्यात सम्यक्त्व अधिक आहे, याच्या शिवाय सर्व संसारमार्ग बंधाचे कारण आहे. ॥१४४॥

www.vitragvani.com



पुन्हा सांगतात :—

जह फणिराओ सोहइ[1] फणमणिमाणिक्ककिरणविप्फुरिओ ।
तह विमलदंसणधरो जिणभत्तीपवयणे[2] जीवो ॥१४५॥

यथा फणिराजः शोभते फणमणिमाणिक्यकिरणविस्फुरितः ।
तथा विमलदर्शनधरः जिनभक्तिः प्रवचने जीवः ॥१४५॥

अर्थ :— जसे फणिराज (धरणेंद्र) ज्यांच्या सहस्त्र फण्यामध्ये असलेल्या मण्यातील लाल माणकाच्या किरणाने विस्फुरित शोभायमान होतात तसेच जिनभक्तिसहित निर्मल सम्यक्‌दर्शनाचे धारक जीव मोक्षमार्गाच्या प्ररूपणात शोभायमान होतात.

भावार्थ :— सम्यक्त्वसहित जीवाची जिनप्रवचनात बरीच अधिकता आहे. जेथे, तेथे (सर्वत्र) शास्त्रामध्यें सम्यक्‌त्वाचीच प्रधानता सांगितली आहे. ॥१४५॥

पुढे सम्यक्‌दर्शनासहित लक्षणे सांगितली आहेत त्याचा महिमा सांगत आहेत :—

जह तारायणसहियं ससहरबिंबं खमंडले विमले ।
भाविय [3]तववयविमलं [4]जिणलिंगं दंसणविसुद्धं ॥१४६॥

यथा तारागणसहितं शशधरबिंबं खमंडले विमले ।
भावितं तपोव्रतविमलं जिनलिंगं दर्शनविशुद्धम् ॥१४६॥

अर्थ :— जसे निर्मल आकाशमंडलात तारांच्या सहित चंद्रमाचे बिंब शोभायमान दिसते, तसेच जिनशासनात दर्शन विशुद्ध आणि भावाने केलेले तप तसेच व्रताती निर्मल जिनलिंग आहे ते शोभायमान आहे. ॥१४६॥

भावार्थ :— जिनलिंग अर्थात् 'निर्ग्रंथ मुनिवेष' जरी तपव्रत सहित निर्मल आहे, तरी ही सम्यक्‌दर्शनाशिवाय शोभा देत नाही. ते असेल तरच अत्यन्त शोभायमान होते. ॥१४६॥

---

१. मुद्रित संस्कृत प्रतित 'रहेइ' पाठ आहे ज्याचे संस्कृत छायेत 'राजते' (पाठान्तर) पाठ केला आहे.

२. मुद्रित संस्कृत प्रतित 'जिणभक्तिपवयणो' असे एकपदरूप पद आहे, ज्याचे संस्कृत ''जिभक्ति प्रवचन'' आहे हा पाठ यतिभंगाप्रमाणे वाटतो.

३. मुद्रित संस्कृत प्रतित 'तहवयविमल' असां पाठ आहे. ज्याचे संस्कृत 'तथा व्रतविमल' आहे.

४. या गाथेचा चतुर्थवाद यतिभंग यांची जागा जिणलिंग दंसणेण सुविसुद्ध होणे ठीक वाटते.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे सांगतात कीं, असे जाणून दर्शनरत्नाला धारण करा. असा उपदेश करतात :—

इय णाउं गुणदोसं दंसणरयणं धरेह भावेण ।
सारं गुणरयणाणं सोवाणं पढममोक्खस्स ॥१४७॥

इति ज्ञात्वा गुणदोषं दर्शनरत्नं धरतभावेन ।
सारं गुणरत्नानां सोपानं प्रथमं मोक्षस्य ॥१४७॥

अर्थ :— हे मुने ! तू 'इति' अर्थात् पूर्वोक्त प्रकार सम्यक्त्वाच्या गुण आणि मिथ्यात्वाच्या दोषां नां जाणून सम्यक्त्वरूपी रत्नाला भावपूर्वक धारण कर. हे गुणरूपी रत्नामध्यें सार आहे, आणि मोक्षरूपी मंदिराची पहिली पायरी आहे अर्थात् चढण्यासाठी पहिली शिडी आहे.

भावार्थ :— जितके ही व्यवहार मोक्षमार्गाचे अंग आहेत (गृहस्थाच्या दान पूजादिक आणि मुनिंची महाव्रते शील संयमादिक) त्या सर्वांचे सार सम्यक्दर्शन आहे, यामुळे सर्व सफल आहे. म्हणून मिथ्यात्वाला सोडून सम्यक्दर्शनाचा अंगिकार करा, हा प्रधान उपदेश आहे. ॥१४७॥

पुढे सांगतात कीं, सम्यक्दर्शन कोणाला होते ? जो जीव, जीवपदार्थाच्या स्वरूपाला जाणून त्याची भावना करतात, त्याचे श्रद्धान करून आपल्याला जीवपदार्थ जाणून त्याची भावना अनुभवद्वारे प्रतिति करतात त्यानाच होते. म्हणून आता हा जीवपदार्थ कसा आहे ? त्याचे स्वरूप सांगतात :—

कत्ता भोइ अमुत्तो सरीरमित्तो अणाइनिहणो य ।
दंसणणाणुवओगो जीवो णिद्दिट्ठो जिणवरिंदेहिं ॥१४८॥

कर्त्ता भोक्ता अमूर्त्तः शरीरमात्रः अनादिनिधनः च ।
दर्शनज्ञानोपयोगः जीवः निर्दिष्टः जिनवरेन्द्रैः ॥१४८॥

अर्थ :— 'जीव' नांवाचा पदार्थ आहे तो कसा आहे ? — कर्त्ता आहे, भोक्ता आहे, अमूर्ति आहे, शरीरप्रमाण आहे, अनादिनिधन आहे, दर्शन-ज्ञान उपयोगवाला आहे, अशा प्रकारे जिनवरेंद्र सर्वज्ञदेव वीतराग ने सांगितले आहे.

भावार्थ :— येथे 'जीव' नामक पदार्थाचे सहा विशेषणे सांगितली आहेत. याचा आशय असा आहे कीं —

१. 'कर्ता' म्हटले तर निश्चयनयाने तर आपल्या अशुद्ध भावाचे अज्ञान अवस्थेत आपणच कर्ता आहात तसेच व्यवहारनयाने ज्ञानावर्णादि पुद्गल कर्मांचा कर्ता आहे आणि शुद्ध नयाने आपल्या शुद्धभावाचा कर्ता आहे.

२. 'भोक्ता' म्हटले तर निश्चयनयाने आपल्या ज्ञान-दर्शनमयी चेतना भावाचा भोक्ता आहे आणि व्यवहार नयाने पुद्गल कर्माचे फल जे सुख दु:ख आदिचा भोक्ता आहे.

www.vitragvani.com



३. 'अमूर्तिक' म्हटले, ते निश्चयाने तर स्पर्श, गंध, वर्ण, शद्ब हे पुद्‌गलाचे गुण पर्याय आहेत, यांच्या रहित अमूर्तिक आहे, आणि व्यवहाराने जो पर्यंत पुद्‌गलकर्माने बांधला आहे, तो पर्यंत 'मूर्तिक' ही आहेत.

४. 'शरीरपरिमाण' म्हटले आहे, ते निश्चयाने तर असंख्यात प्रदेशी लोकपरिमाण आहे, परंतु संकोच-विस्तार शक्तिने काही कमी प्रदेश प्रमाण आकारात राहाते.

५. 'अनादिनिधन' :— म्हटले आहे, ते पर्याय दृष्टिने पाहिल्यानंतर तर उत्पन्न होते नष्ट होते. तरीही द्रव्यदृष्टिने पाहिले तर अनादिनिधन नेहमी नित्य अविनाशी आहे.

६. दर्शन-ज्ञान 'उपयोगसहित' म्हटले आहे, ते पाहण्या, जाणण्यारूप उपयोगस्वरूप चेतनारूप आहे.

या विशेषणाने अन्यमती अन्यप्रकारे सर्वथा एकान्तरूप मानतात त्याचा निषेध ही जाणला पाहिजे. 'कर्ता' विशेषणाने तर सांख्यमती सर्वथा अकर्ता मानतात त्याचा निषेध आहे. 'भोक्ता' विशेषणाने बौद्धमति क्षणिक मानून सांगतात कीं, कर्माला करणारा तर निराळा आहे तसेच भोगनेवाला ही निराळा आहे या निषेध आहे. जो जीव कर्म करतो त्याचे फल ही तोच जीव भोगतो. या कथनाने बौद्धमताच्या सांगण्याचा निषेध आहे. 'अमूर्ति' म्हटल्याने मिमांसादिक या शरीरसहित मूर्तिकच मानतात, त्यांचा निषेध आहे. 'शरिरप्रमाण' म्हटल्याने नैयायिक, वैशेषिक, वेदान्ती आदि सर्वथा, सर्वव्यापक, मानतात त्यांचा निषेध आहे.

'अनादिनिधन' म्हटल्याने बौद्धमति सर्वथा क्षणस्थायी मानतात त्याचा निषेध आहे.

अशाप्रकारे सर्वज्ञानी सांगितलेले जीवाचे स्वरूप जाणून आपल्याला असे मानून श्रद्धा, रूचि, प्रतीति केली पाहिजे. जीव म्हटल्यानंतर त्या बरोबरच अजीव पदार्थ ही समजला जातो. अजीव नसते तर जीव नांव कसे आले असते, म्हणून अजीवाचे स्वरूप सांगितले आहे. तसेच त्याचे श्रद्धान आगमानुसार करणे. अन्य आस्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष, या भावांची प्रवृत्ति होते. यांचे आगमानुसार स्वरूप जाणून श्रद्धान केल्यामुळे सम्यक्‌दर्शनाची प्राप्ति होते. अशा प्रकारे जाणावे. ॥१४८॥

पुढे सांगतात कीं, हा जीव 'ज्ञान-दर्शन उपयोगमयी आहे,' परंतु अनादि पौद्‌गलिक कर्माच्या संयोगाने याचे ज्ञान दर्शनाची पूर्णता होत नाही. म्हणून अल्पज्ञान-दर्शन अनुभवाला येते आणि त्यात ही अज्ञानाच्या निमित्ताने इष्ट-अनिष्ट बुद्धिरूप राग-द्वेष-मोह भावाचे द्वारे ज्ञान-दर्शनात कलुषतारूप सुखदु:खादिक भाव अनुभवाला येतात. हा जीव निजभावनारूप सम्यक्‌दर्शनाला प्राप्त होते. तेंव्हा ज्ञान-दर्शन-सुख वीर्याचे घातक कर्मांचा नाश होतो. असे दाखवतात :—

दंसणणाणावरणं मोहणियं अंतराइयं कम्मं ।
णिट्ठवइ भवियजीवो सम्मं जिणभावणाजुत्तो ॥१४९॥

दर्शनज्ञानावरणं मोहनीयं अन्तरायकं कर्म ।
निष्ठापयति भव्यजीवाः सम्यक् जिनभावनायुक्तः ॥१४९॥

<u>अर्थ :</u>— सम्यक प्रकारे जिनभावनासे युक्त भव्यजीव आहेत ते ज्ञानावरण, दर्शनावरण, मोहनीय, अंतराय, या चार घातिकर्माचे निष्ठापन करते अर्थात् संपूर्ण अभाव करतो.

www.vitragvani.com



भावार्थ :— दर्शनाचे घातक दर्शनावरण कर्म आहे, ज्ञानाचे घातक ज्ञानावरण कर्म आहे, सुखाचे घातक मोहनीय कर्म आहे, वीर्याचे घातक अंतराय कर्म आहे यांचा नाश कोण करते ? सम्यक्‌प्रकारे जिनभावना भावून अर्थात् जिन आज्ञा मानून जीव-अजीव आदि तत्त्वाचे यथार्थ निश्चय करून श्रद्धावान असा जीव असतो. म्हणून जिन आज्ञा मानून यथार्थ श्रद्धान करावे असा उपदेश आहे. ॥१४८॥

पुढे म्हणतात कीं, या घाति कर्माचा नाश झाल्यानंतर 'अनंतचतुष्टय' प्रकट होतात :—

**बलसोक्खणाणदंसण चत्तारि वि पायडा गुणा होंति ।**
**णट्ठे घाइचउक्के लोयालोयं पयासेदि ॥१५०॥**

बलसौख्यज्ञानदर्शनानि चत्वारोऽपि प्रकटा गुणा भवंति ।
नष्टे घातिचतुष्के लोकालोकं प्रकाशयति ॥१५०॥

अर्थ :— पूर्वोक्त चार घाति कर्मांचा नाश झाल्यानंतर अनंतर ज्ञान-दर्शन-सुख आणि बल (वीर्य) हे चार गुण प्रकट होतात. जेंव्हा जीवाच्या या गुणांची पूर्ण निर्मल दशा प्रकट होते. तेंव्हा लोकालोकाला प्रकाशित करते.

भावार्थ :— घातिकर्माचा नाश झाल्यानंतर अनंतदर्शन, अनंतज्ञान, अनंतसुख, आणि अनंतवीर्य हे 'अनंतचतुष्टय' प्रकट होतात. अनंतदर्शनाने सहा द्रव्याने भरलेल्या या लोकात अनंतानंतर जीवा त्यांच्या अनंतानंतपट पुद्‌गल तसेच धर्म-अधर्म-आकाश हे तीनद्रव्ये आणि असंख्यात कालाणु या सर्व द्रव्यांची अतीत अनागत आणि वर्तमान काल संबंधी अनंत पर्यायाला भिन्न भिन्न पणे एकासमयात स्पष्ट पाहातात आणि जाणतात. अनंत सुखाने अत्यन्तसृप्तिरूप आहे आणि अनंतशक्ति द्वारे आता कोणत्याही निमित्ताने अवस्था बदलत नाही. असे अनन्त चतुष्टयरूप जीवाचा निजस्वभाव प्रकट होतो, म्हणून जीवाच्या स्वरूपाचे असे परमार्थाने श्रद्धान करणे तेच सम्यक्‌दर्शन आहे. ॥१५०॥

पुढे ज्यांचे अनंतचतुष्टय प्रकट होतात त्याला परमात्मा म्हणतात, त्यांची अनेक नांवे आहेत, त्यांच्यातील काही प्रकट करून सांगतात :—

**णाणी सिव परमेट्ठी सव्वण्हू विण्हु चउमुहो बुद्धो ।**
**अप्पो वि य परमप्पो कम्मविमुक्को य होइ फुडं ॥१५१॥**

ज्ञानी शिवः परमेष्ठी सर्वज्ञः विष्णुः चतुर्मुखः बुद्धः ।
आत्मा अपि च परमात्मा कर्मविमुक्तः च भवति स्फुटम् ॥१५१॥

अर्थ :— परमात्मा ज्ञानी आहे, शिव आहे, परमेष्ठी आहे, सर्वज्ञ आहे, विष्णू आहे. चतुर्मुख ब्रह्मा आहे, बुद्ध आहे, आत्मा आहे, आणि कर्म रहित आहे, हे स्पष्ट जाणा.

भावार्थ :— 'ज्ञानी' म्हटल्याने सांख्यमति ज्ञानरहित उदासिन चैतन्यमात्र मानतात त्याचा निषेध आहे. 'शिव' आहे अर्थात् सर्व कल्याणाने परीपूर्ण आहे. जसे सांख्यमती नैयायिक वैशेषिक मानतात तसे नाही.

www.vitragvani.com



'परमेष्ठी' आहे, ते परम (उत्कृष्ट) पदात स्थित आहेत अथवा उत्कृष्ट इष्टत्व स्वभाव आहे. जसे अन्यमती काही आपले इष्ट मानून त्याला परमेष्ठी म्हणतात. तसे नाही 'सर्वज्ञ' आहे अर्थात् सर्व लोकालोकाला जाणतात, अन्य किती ही कोणत्याही एका प्रकरणासंबंधी सर्वजण जाणतात त्याला ही सर्वज्ञ म्हणतात पण तसे नाही. 'विष्णू' आहे अर्थात् ज्याचे ज्ञान सर्व ज्ञेयात व्यापक आहे - अन्यमति वेदान्ति आदि म्हणतात कीं, सर्व पदार्थात आपण आहात पण तसे नाही.

'चतुर्मुख' म्हटल्याने केवली अरहंताच्या समवशरणामध्यें चारमुख चारी दिशेला दिसतात असे अतिशय आहे, म्हणून चतुर्मुख म्हणतात असा ब्रह्मा कोणी नाही. 'बुद्ध' आहे अर्थात् सर्वांचा ज्ञाता आहे - बौद्ध क्षणिकाला बुद्ध म्हणतात तसे काही नाही. 'आत्मा' आपल्या स्वभावात निरंतर प्रवर्तमान आहे - अन्यमती वेदान्ती सर्वत्र प्रवर्तमान होतात. आत्म्याला मानतात पण तसे नाही. ''परमात्मा' आहे अर्थात् आत्म्याचे पूर्णरूप 'अनन्तचतुष्टय' ज्यांचे प्रकट झाले आहे, म्हणून परमात्मा आहे कर्म जे आत्म्याचे स्वभावाचे घातक घातिकर्मांने रहित झाले आहेत म्हणून 'कर्म विमुक्त' आहेत, अथवा काही करण्यायोग्य काम राहिले नाही म्हणूनही कर्मविमुक्त आहेत. सांख्यमती, नैयायिक, नेहमीच कर्म रहित मानतात तसेही नाही. असे परम्यात्म्याचे सार्थक नाम आहे. अन्यमती आपले इष्ट एकच सांगतात त्यांचा सर्वथा एकांताच्या अभिप्रायाद्वारे अर्थ बिघडतो म्हणून यथार्थ नाही. अरहंताचे हे नांव नयविवक्षेने सत्यार्थ आहे असे जाणा. ।।१५१।।

पुढे आचार्य म्हणतात कीं, असे देव मला उत्तम बुद्धि देवो —

इम घाइकम्ममुक्को अट्ठारहदोसवज्जियो सयलो ।
तिहुवणभवणपदीवो देऊ मम उत्तमं बोहिं ॥१५२॥

इति घातिकर्ममुक्तः अष्टादशदोषवर्जितः सकलः ।
त्रिभुवनभवनप्रदीपः ददातु मह्यं उत्तमां बोधिम् ।।१५२।।

अर्थ :— अशा प्रकारे घातिकर्मांने रहित, क्षुधा, तृषा, आदि पूर्वोक्त १८ दोषाने रहित, सकल (शरीरसहित) आणि तीन भुवनरूपी भवनाला प्रकाशित करण्यासाठी प्रकृष्टदीपक तुल्य देव आहेत, ते मला उत्तम बोधि (—सम्यक्दर्शन, ज्ञान, चारित्र) ची प्राप्ति देवो अशा प्रकारची आचार्यांनी प्रार्थना केली आहे.

भावार्थ :— येथे आणखी पूर्वोक्त प्रकार जाणणे, परंतु 'सकल' विशेषणाचा हा आशय आहे कीं, मोक्षमार्गाची प्रवृत्ति करण्याचा जो उपदेश आहे तो वचनाच्या प्रवर्तनाशिवाय होत नाही, म्हणून अरहंताचे आयु कर्माच्या उदयाने शरिसहित अवस्थान राहाते आणि सुस्वर आदि नाम कर्माच्या उदयाने वचनाची प्रवृत्ति होते. अशाप्रकारे अनेक जीवांचे कल्याण करणारा उपदेश होत राहातो. अन्यमतिना असे अवस्थान (अशी स्थिती) परमात्म्याला संभव नाही. म्हणून उपदेशाची प्रवृत्ति होत नाही. तेंव्हा मोक्षमार्गाचा उपदेश ही मिळत नाही. अशा प्रकारे जाणावे ।।१५२।।

पुढे म्हणतात कीं, जे असे अरहंत जिनेश्वराच्या चरणी नमस्कार करतात ते संसाराची जन्मरूप वेलाला काटतात.

जिणवरचरणंबुरुहं णमंति जे परमभत्तिराएण ।
ते जम्मवेलिमूलं खणंति वरभावसत्थेण ॥१५३॥

जिनवरचरणांबुरुहं नमंति ये परमभक्तिरागेण ।
ते जन्मवल्लीमूलं खनंति वरभावशस्त्रेण ॥१५३॥

अर्थ :— जो पुरूष परमभक्ति अनुरागाने जिनवराच्या चरणकमलाला नमस्कार करतात ते श्रेष्ठभावरूप 'शस्त्रा' ने जन्म अर्थात् संसाररूपी वेलाचे मूळ जे मिथ्यात्व आदि कर्म त्याला नष्ट करतात.

भावार्थ :— आपली श्रद्धा - रूचि प्रतिति ने जे जिनेश्वर देवाला नमस्कार करतात, त्यांचे सत्यार्थ स्वरूप सर्वज्ञ वीतरागीपणाला जाणून भक्तीच्या अनुरागाने नमस्कार करतात तेंव्हा ज्ञात होते कीं, सम्यक्दर्शनाच्या प्राप्तिचे हे चिन्ह आहे. म्हणून समजते कीं, यामुळें मिथ्यात्वाचा नाश होतो. आता आगामि संसाराची वृद्धि होणार नाही असे सांगितले आहे. ॥१५३॥

पुढे म्हणतात कीं, जो जिनसम्यक्त्वाला प्राप्त पुरूष आहे तो आगामी कर्मानें लिप्त होत नाही :—

जह सलिलेण ण लिप्पइ कमलिणिपत्तं सहावपयडीए ।
तह भावेण ण लिप्पइ कसायविसएहिं सप्पुरिसो ॥१५४॥

यथा सलिलेन न लिप्यते कमलिनीपत्रं स्वभावप्रकृत्या ।
तथा भावेन न लिप्यते कषायविषयैः सत्पुरुषः ॥१५४॥

अर्थ :— जसे कमलिनीचे पत्र आपल्या स्वभावानेच जलाने लिप्त होत नाही तसेच सम्यक्दृष्टि सत् पुरूष आहेत ते आपल्या भावानेच क्रोधादिक कषाय आणि इंद्रियांच्या विषयाने लिप्त होत नाहीत.

भावार्थ :— सम्यक्दृष्टि पुरूषाचे मिथ्यात्व आणि अनंतानुबंधी कषायाचा तर सर्वथा अभाव आहे, अन्य कषायांचा यथासंभव अभाव आहे. मिथ्यात्व अनंतानुबंधीच्या अभावाने असा भाव होतो. जो परद्रव्याच्या कर्तुत्वाची बुद्धि तर नाही, परंतु शेष कषयांच्या उदयाने थोडा राग-द्वेष होतो. त्याला कर्माच्या उदयाच्या निमित्ताने जाणतात, म्हणून त्यातही कर्तुत्वबुद्धि नाही. तो हि त्या भावाना रोगासमान झाल्याचे जाणून चांगले समजत नाही. अशा प्रकारे आपल्या भावानेच कषाय - विषयाची प्रीति बुद्धि नाही, म्हणून त्यांनी ते लिप्त होत नाहीत, जलकमलवत निर्लेप राहातात यामुळे आगामी कर्माचा बंध होत नाही, संसाराची वृद्धि होत नाही, असा आशय आहे. ॥१५४॥

www.vitragvani.com



पुढे आचार्य म्हणतात कीं, जो पूर्वोक्त भावसहित सम्यक्‌दृष्टि सत्पुरूष आहेत ते ही सकलशील संयमादि गुणाने संयुक्त आहेत, अन्य नाही :—

ते वि य भणामिहं जे सयलकलासीलसंजमगुणेहिं ।
बहुदोसाणावासो सुमलिणचित्तो ण सावयसमो सो ।।१५५।।

तान् अपि च भणामि ये सकलकलाशीलसंयमगुणैः ।
बहुदोषाणामावासः सुमलिनचित्तः न श्रावकसमः सः ।।१५५।।

अर्थ :— पुर्वोक्त भावासहित सम्यक्‌दृष्टि पुरूष आहेत आणि शील, संयम, गुणामुळे सकल कला अर्थात् संपूर्ण कलावान् जे होतात. त्यानाच आम्ही मुनि म्हणतो. जे सम्यक्‌दृष्टि नाहीत, मलिनचित्तासहित मिथ्यादृष्टि आहेत आणि बऱ्याच दोषांचे स्थान आहेत ते तर वेष धारण करतात तरीही ते श्रावकाप्रमाणे ही नाहीत.

भावार्थ :— जो सम्यक्‌दृष्टि आहे आणि शील (— उत्तरगुण) तसेच संयम (— मूलगुण) सहित आहेत ते मुनि आहेत. जो मिथ्यादृष्टि आहे अर्थात् ज्याचे चित्त मिथ्यात्वाने मलिन आहे आणि ज्यात क्रोधादि विकाररूप बरेच दोष मिळतात तो तर मुनि चा वेष धारण करतो तरी ही तो श्रावकाप्रमाणे ही नाही, श्रावक सम्यक्‌दृष्टि असेल आणि गृहस्थाचार पापासहित असेल, तरही त्याच्यासारखा तो केवळ वेष धारण करणारा मुनि नाही असे आचार्यांनी म्हटले आहे. ।।१५५।।

पुढे म्हणतात कीं, सम्यक्‌दृष्टि होवून ज्यानी कषायरूप सुभट जिंकले आहेत तेच धीर वीर आहेत :—

ते धीरवीरपुरिसा खमदमखग्गेण विप्फुरंतेण ।
दुज्जयपबलबलुद्धरकसायभड णिज्जिया जेहिं ।।१५६।।

ते धीरवीरपुरुषाः क्षमादमखड्गेण विस्फुरता ।
दुर्जयप्रबलबलोद्धतकषायभटाः निर्जिता यैः ।।१५६।।

अर्थ :— ज्या पुरूषानी क्षमा आणि इंद्रियांचे दमन केले आहे मलिनता रहित उज्ज्वल तीक्ष्ण खडगाने ज्याना जिंकणे कठिण आहे अशा दुर्जय, प्रबल तथा बलवान, कषायरूप सुभटाना जिंकतात तेच धीर, वीर सुभट आहेत. अन्य संग्रामादि मध्यें जिंकणारे तर नुसते 'म्हणायलाच सुभट' आहेत.

भावार्थ :— युद्धात जिंकणारे शूर, वीर तर लोकात खूप आहेत परंतु कषायाना जिंकणारे विरळे आहेत, ते मुनिप्रधान आहेत आणि तेच शूर वीरात प्रधान आहेत. जे सम्यक्‌दृष्टि होवून कषायाना जिंकून चारित्रवान् होतात ते मोक्ष मिळवतात असा आशय आहे. ।।१५६।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे म्हणतात कीं, जे आपण दर्शन-ज्ञान-चारित्ररूप होतात ते दुसऱ्यानाही त्यांच्या प्रमाणेच करतात, ते धन्य आहेत :—

धण्णा ते भयवंता दंसणणाणग्गपवरहत्थेहिं ।
विसयमयरहरपडिया भविया उत्तारिया जेहिं ॥१५७॥

ते धन्याः भगवंतः दर्शनज्ञानाग्रप्रवरहस्तैः ।
विषयमकरधरपतिताः भव्याः उत्तारिताः यैः ॥१५७॥

अर्थ :— ज्या सत्पुरूषाने विषयरूप समुद्रात पडलेल्या भव्यजीवाला दर्शन आणि ज्ञानरूपी मुख्य दोन्ही हातानी पार केले, ते मुनि प्रधान भगवान इंद्रादिकानी पूज्य ज्ञानी धन्य आहेत.

भावार्थ :— या संसार समुद्रातून आपण तरतात आणि दुसऱ्याला तारून नेतात ते मुनि धन्य आहेत. धनादिक सामुग्रीसहितना धन्य म्हणतात, ते म्हणायलाच धन्य आहेत.

पुढे पुन्हा अशा मुनिंचा महिमा गातात :—

मायावेल्लि असेसा मोहमहातरुवरम्मि आरूढा ।
विसयविसपुप्फफुल्लिय लुणंति मुणि णाणसत्थेहिं ॥१५८॥

मायवल्लीं अशेषां मोहमहातरुवरे आरूढाम् ।
विषयविषपुष्पपुष्पितां लुनंति मुनयः ज्ञानशस्त्रैः ॥१५८॥

अर्थ :— माया (कपट) रूपी बेल जी मोहरूपी महावृक्षावर चढली आहे तसेच विषयरूपी विषाच्या फुलाने फुलत आहे त्याना मुनि ज्ञानरूपी शस्त्राने समस्ततया काटतात अर्थात् नि:शेष करतात.

भावार्थ :— हे माया, कषाय गूढ आहे, याचा विस्तार ही बराच आहे मुनिपर्यंत पसरते, म्हणून जे मुनि ज्ञानाने ही काटतात तेच खरे मुनि आहेत. तेच मोक्ष प्राप्त करून घेतात ॥१५८॥

पुढे पुन्हा त्या मुनिंच्या सामर्थ्याचे वर्णन करतात :—

मोहमयगारवेहिं य मुक्का जे करुणभावसंजुत्ता ।
ते सव्वदुरियखंभं हणंति चारित्तखग्गेण ॥१५९॥

मोहमदगारवैः च मुक्ताः ये करुणभावसंयुक्ताः ।
ते सर्वदुरितस्तंभं घ्नंति चारित्रखड्गेन ॥१५९॥

अर्थ :— जे मुनि मोह-मद-गौरवाने रहित आहेत आणि करूणाभाव सहित आहेत, तेच चारित्ररूपी खडगाने पापरूपी स्तंभाचे हनन करतात अर्थात् मूळापासून काटतात.

भावार्थ :— परद्रव्याचा ममत्त्वभाव असणे याला 'मोह' म्हणतात. 'मंद-जाति आदि परद्रव्याच्या संबंधाने सर्व होणे याला 'मद' म्हणतात. 'गौरव' तीन प्रकारचा आहे — ऋद्धिगौरव, सात गौरव आणि रसगौरव जे काही तपोबलाने आपली महंतता लोकात होईल त्याचा आपल्याला मद होणे त्यात हर्ष म्हणजे तो 'ऋद्धिगौरव' आहे. जर आपल्या शरीरात रोगादिक उत्पन्न झाले नाहीत तर सुख मानणे तसेच प्रभादयुक्त होवू आपला महंतपणा मानणे हा 'सात गौरव' आहे. जर मिष्ट, पुष्ठ, रसदार आहारादिक मिळाले तर त्याच्या निमित्ताने प्रमत्त होवून शयनादिक करणे हा रसगौरव आहे. मुनि अशा प्रकारच्या गौरवाने रहित आहेत. आणि परजीवाच्या करूणाने सहित आहेत, असे नाही कीं, परजीवा विषयी मोह ममत्त्व नाही म्हणून निर्दय होवून त्याना मारतात, पंरतु जो पर्यंत राग अंश राहातो तो पर्यंत परजीवाची करूणा करतात, उपकार बुद्धि राहाते. अशाप्रकारे ज्ञानी मुनि पाप जे अशुभकर्म त्याचा चारित्र्याच्या बलाने नाश करतात.

पुढे म्हणतात कीं, जे अशा प्रकारे मूल गुण आणि उत्तरगुणाने मंडित मुनि आहेत ते जिनमतात शोभायमान आहेत :—

गुणगणमणिमालाए जिणमयगयणे णिसायरमुणिंदो ।
तारावलिपरियरिओ पुण्णिमइंदुव्व पवणपहे ॥१६०॥

गुणगणमणिमालया जिनमतगगने निशाकरमुनींद्रः ।
तारावलीपरिकरितः पूर्णिमेन्दुरिव पवनपथे ।।१६०।।

अर्थ :— जसे (पवनपथात) आकाशात ताऱ्यांच्या पंक्तित परिवाराने वेष्टित पूर्णिमेचा चंद्र शोभायमान असतो तसेच जिनमतरूप आकाशात गुणांच्या समूहरूपी मण्यांची माला मुनीन्द्ररूप चंद्रमा शोभायमान होतो.

भावार्थ :— २८ मूलगुण, १० लक्षणे, धर्म ३ गुप्ति आणि ८४ लाख उत्तरगुणांच्या माळेसहित मुनि जिनमतात चंद्रमा समान शोभायमान होतो असे मुनि अन्यमतात नाहीत. ।।१६०।।

पुढे म्हणतात कीं, ज्यांचे अशाप्रकारे विशुद्धभाव आहेत ते सत्पुरूष तीर्थंकर आदि पदाचे सुख प्राप्त करतात.

चक्कहररामकेसवसुरवरजिणगणहराईसोक्खाइं ।
चारणमुणिरिद्धीओ विसुद्धभावा णरा पत्ता ॥१६१॥

चक्रधररामकेशवसुरवरजिनगणधरादिसौख्यानि ।
चारणमुन्यर्द्धीः विशुद्धभावा नराः प्राप्ताः ।।१६१।।

अर्थ :— विशुद्ध भाव असणारे नर मुनि ते चक्रधर (चक्रवर्ति, सहाखंडाचा राजा) राम (–बलभद्र) केशव (–नारायण अर्ध्दचक्री) सुरवर (–देवांचा इंद्र) जिन (तीर्थंकर पंचकल्याणक सहित, तीन लोकात पूज्य पद)

www.vitragvani.com



गणधर (– चार ज्ञान आणि सप्तऋद्धिचे धारक मुनि) यांच्या सुखाचा तसेच चारणमुनि (ज्याना आकाशगामिनी आदि ऋद्धियाँ प्राप्त आहेत) ऋद्धिला प्राप्त होतात.

भावार्थ :— प्रथम अशाप्रकारे निर्मल भावांचे धारक पुरूष झाले ते अशा प्रकारच्या पदाच्या सुखाना प्राप्त झाले, आता जे असे होतील ते (सुख) मिळवतील असे जाणावे ।।१६१ ।।

सिवमजरामरलिंगमणोवममुत्तमं परमविमलमतुलं ।
पत्ता वरसिद्धिसुहं जिणभावणभाविया जीवा ।।१६२।।

शिवमजरामरलिंगं अनुपममुत्तमं परमविमलमतुलम् ।
प्राप्तो वरसिद्धिसुखं जिनभावनाभाविता जीवाः ।।१६२।।

अर्थ :— जो जिन भावनेने भावित जीव आहे ते ही सिद्धि अर्थात् मोक्षाचे सुख प्राप्त करून घेतात. कसे आहे सिद्धि सुख ? शिव आहे कल्याणरूप आहे, कशाप्रकारे उपद्रवसहित नाही, 'अजरामरलिंग' आहे, अर्थात ज्याचे चिन्ह वृद्ध होणे आणि मरणे या दोन्हीनी रहित आहे, 'अनुपम' आहे 'परम' (सर्वोत्कृष्ट) आहे. महार्घ्य आहे अर्थात् महान अर्घ्य पूज्य प्रशंसेच्या योग्य आहे. 'विमल' आहे. कर्मांचे मल तसेच रागादिकमलाने रहित आहे. अतुल आहे याच्या बरोबरीचे संसाराचे सुख नाही, अशा सुखाला जिन-भक्त प्राप्त करून घेतो, अन्य मतिचे भक्त प्राप्त करून घेत नाहीत. ।।१६२ ।।

पुढे आचार्य प्रार्थना करतात कीं, जे अशा सिद्धसुखाला प्राप्त झाले ते सिद्ध भगवान मला भावांची शुद्धता देवोत् :—

ते मे तिहुवणमहिया सिद्धा सुद्धा णिरंजणा णिच्चा ।
दिंतु वरभावसुद्धिं दंसण णाणे चरित्ते य ।।१६३।।

ते मे त्रिभुवनमहिताः सिद्धाः सुद्धाः निरंजनाः नित्याः ।
ददतु वरभावशुद्धिं दर्शने ज्ञाने चारित्रे च ।।१६३।।

अर्थ :— सिद्ध भगवान मला दर्शन ज्ञानात आणि चारित्र्यात श्रेष्ठ उत्तम भावाची शुद्धता देवो ! कसे आहेत सिद्ध भगवान ? तीन भुवनात पूज्य आहेत, शुद्ध आहेत अर्थात् द्रव्यकर्म आणि नो कर्मरूप मलाने रहित आहेत निरंजन आहेत, अर्थात् रागादि कर्मांने रहित आहेत, ज्याना कर्मांची उत्पत्ति नाही, नित्य आहेत — प्राप्त स्वभावाचा पुन्हा नाश नाही.

भावार्थ :— आचार्यांनी शुद्धभावाचे फल सिद्ध अवस्था आणि जे निश्चयाने या फलाला प्राप्त झालेले सिद्ध याना ही प्रार्थना केली आहे कीं, शुद्ध भावाची पूर्णता आम्हाला प्राप्त होवो. ।।१६३ ।।

www.vitragvani.com



पुढे भावाच्या कथनाचा संकोच करतात :—

**किं जंपिएण बहुणा अत्थो धम्मो य काममोक्खो य ।**
**अण्णे वि य वावारा भावम्मि परिट्ठिया सव्वे ।।१६४।।**

किं जल्पितेन बहुना अर्थः धर्मः च काममोक्षः च ।
अन्ये अपि च व्यापाराः भावे परिस्थिताः सर्वे ।।१६४।।

अर्थ :— आचार्य म्हणतात कीं, जास्ती काय सांगायचे ? धर्म, अर्थ, काम, मोक्ष आणि अन्य जे काही व्यापार आहेत ते सर्व शुभ अवस्थेत समस्तरूपाने स्थित आहेत.

भावार्थ :— पुरूषाचे चार प्रयोजन प्रधान आहेत — धर्म, अर्थ, काम, मोक्ष अन्य ही जे काही मंत्र साधनादिक व्यापार आहेत ते आत्म्याचे शुद्धचैतन्य परिणाम स्वरूप भावात स्थित आहेत. शुद्ध भावाने सर्व सिद्धि आहे, अशाप्रकारे संक्षेपाने म्हणणे जाणा, अधिक काय सांगायचे ? ।।१६४।।

पुढे या भावपाहुडला पूर्ण करतात, याच्या वाचनाने ऐकण्याने आणि भाव करण्याचा (चिन्तनाचा) उपदेश करतात :—

**इय भावपाहुडमिणं सव्वं बुद्धेहि देसियं सम्मं ।**
**जो पढइ सुणइ भावइ सो पावइ अविचलं ठाणं ।।१६५।।**

इति भावप्राभृतमिदं सर्वबुद्धैः देशितं सम्यक् ।
यः पठति शृणोति भावयति सः प्राप्नोति अविचलं स्थानम् ।।१६५।।

अर्थ :— अशाप्रकारे या भावपाहुडाचा सर्वबुद्ध - सर्वज्ञदेवाने उपदेश दिला आहे. हे जे भव्यजीव सम्यक् प्रकारे वाचतात, ऐकतात आणि याचे चिंतन करतात ते शाश्वत सुखाचे जे स्थान त्या मोक्षाला प्राप्त करतात.

भावार्थ :— हा भावपाहुड ग्रंथ सर्वज्ञाच्या परंपरेने अर्थ घेवून आचार्यांने सांगितला आहे. म्हणून सर्वज्ञाचाच उपदेश आहे, केवळ छद्मस्थाचा सांगितलेला नाही, म्हणून आचार्यांने आपले कर्तव्य प्रधान करून सांगितले आहे. शुद्ध भावाने मोक्ष होतो आणि याच्या वाचनाने शुद्धभाव घेतात. (नोंद - येथे स्वाश्रयी निश्चयात शुद्धता केली तर निमित्तात शास्त्र पठनादि मध्यें व्यवहाराने निमित्तकारण - पंरपराकारण म्हटले जाते. अनुपचार = निश्चयाशिवाय उपचार = व्यवहार कसला ?) अशा प्रकारे त्याचे वाचन, ऐकणे, धारणा, आणि भावना करणे ही परंपरा मोक्षाचे कारण आहे. म्हणून हे भव्यजीवा ! या भावपाहुडाला वाचा, ऐका, ऐकवा, भावना करा आणि निरंतर अभ्यास करा, ज्यामुळें भाव शुद्ध होतील आणि सम्यक्दर्शन - ज्ञान - चारित्राच्या पूर्णतेला प्राप्त होवून मोक्षाला प्राप्त करा तसेच तेथे परमानंदरूप शाश्वत सुखाला भोगा.

अशा प्रकारे श्री कुन्दकुन्दनामक आचार्यांनी भावपाहुडग्रंथ पूर्ण केला.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

याचा सारांश अशा प्रकारे आहे —

जीवनांवाच्या वस्तुचा एक असाधारण शुद्ध अविनाशी चेतना स्वभाव आहे. यांची शुद्ध, अशुद्ध दोन परिणति आहेत. शुद्धदर्शन - ज्ञानोपयोगरूप परिणमन 'शुद्ध परिणति' आहे, याला शुद्धभाव म्हणतात. कर्माच्या निमित्ताने राग-द्वेष-मोहादिक विभावरूप परिणमन 'अशुद्ध परिणति' आहे. याला अशुद्धभाव असे म्हणतात. कर्माचे निमित्त अनादिपासून म्हणून अशुद्धभावरूप अनादि पासून परिणमन करत आहे. या भावापासून शुभ अशुभ कर्माचा बंध होतो, या बंधाच्या उदयाने पुन्हा शुभ किंवा अशुभ भावरूप (– अशुद्ध भावरूप) परिणमन करतो. अशाप्रकारे अनादि पासून क्रम चालत आला आहे. जेंव्हा इष्टदेवतादिंची भक्ति, जीवांची दया, उपकार मंदकपायरूप परिणमन करतो तेंव्हा तर शुभकर्माचा बंध करतो. या निमित्ताने देवादिक पर्याय प्राप्त करून काही सुखी होतो. जेंव्हा विषय- कषाय तीव्र परिणामरूप परिणमन करते, तेंव्हा पापाचा बंध करतो, याच्या उदयाने नरकादिक पर्याय प्राप्त करून दु:खी होतो.

अशा प्रकारे संसारात अशुद्धभावाने अनादिकालापासून हा जीव भ्रमण करतो जेंव्हा असा काळ येतो कीं, ज्यात जिनेश्वरदेव सर्वज्ञ वीतरागाच्या उपदेशाची प्राप्ति होते आणि त्याचे श्रद्धान रूचि प्रतीति आचारण करतात तेंव्हा स्व आणि पर चे भेदज्ञान करून शुद्ध-अशुद्ध भावाचे स्वरूप जाणून आपले हित-अहिताचे श्रद्धान रूचि प्रतिति आचरण होणे तेंव्हा शुद्धदर्शनज्ञानमयी शुद्ध चेतना परिणमनाला तो 'हित' जाणतो याचे फल संसाराची निवृत्ति आहे हे जाणा आणि अशुद्धभावाचे फल संसार आहे याला जाणा, तेंव्हा शुद्धभावाचे ग्रहण आणि अशुद्धभावच्या त्यागाचा उपाय करा. उपायाचे स्वरूप जसे सर्वज्ञ वीतरागाच्या आगमात सांगितले आहे तसे कर.

यांचे स्वरूप निश्चयव्यवहारात्मक सम्यक्‌दर्शन ज्ञान सम्यक्‌चारित्र स्वरूप मोक्षमार्ग सांगितला आहे. शुद्ध स्वरूपाचे श्रद्धान, ज्ञान, चारित्र्याला, 'निश्चय' म्हटले आहे आणि जिनदेव सर्वज्ञ वीतराग तसेच त्यांचे वचन आणि त्या वचनानुसार प्रवर्तनवाले मुनि श्रावक त्यांची भक्ति वंदना, विनय, वैयावृत्य करणे 'व्यवहार' आहे. कारण कीं, हे मोक्षमार्गात प्रवर्तन करण्यासाठीं उपकारी आहे. उपकारकर्त्याचा उपकार मानणे न्याय आहे, उपकार लोपणे अन्याय आहे. स्वरूपाचे साधक अहिंसा आदि महाव्रत तसेच रत्नत्रयरूप प्रवृत्ति, समिति, गुप्तिरूप, प्रवर्तना आणि यात दोष लागल्यानंतर आपली निंदा, गर्हादिकरणे, गुरूनी दिलेले प्रायाश्चित घेणे शक्तीनुसार तप करणे, परिषह सोसणे, दशलक्षण धर्मात प्रवर्तणे इत्यादि शुद्धात्म्याच्या अनुकुल क्रियारूप प्रवर्तना, यात काही रागाचा अंश असतो तो पर्यंत शुभकर्माचा बंध होतो. तरी सुद्धा तो प्रधान नाही, कारण कीं, यात प्रवर्तन करणाऱ्याच्या शुभकर्माच्या फलाची इच्छा नाही. म्हणून अबंधतुल्य आहे. इत्यादि प्रवृत्ति आगमोक्त 'व्यवहार मोक्षमार्ग' आहे. यात प्रवृत्तिरूप परिणाम आहे, तरी सुद्धा निवृत्तिप्रधान आहे, म्हणून निश्चयमोक्षमार्गात विरोध नाही.

www.vitragvani.com



अशा प्रकारे निश्चय व्यवहार स्वरूप मोक्षमार्गाचा सारांश आहे, याला शुद्धभाव म्हटले आहे. यात ही सम्यक्दर्शनाला प्रधान म्हटले आहे, कारण कीं, सम्यक्दर्शनाशिवाय सर्व व्यवहार मोक्षाचे कारण नाही आणि सम्यक्दर्शनाच्या व्यवहारात जिनदेवाची भक्ति प्रधान आहे, हे सम्यक्दर्शन सांगण्यासाठी मुख्य लक्षण आहे, म्हणून जिनभक्ती निरंतर करणे आणि जिन आज्ञा मानून आगमोक्त मार्गात प्रवर्तन करणे हा श्री गुरूचा उपदेश आहे. अन्य जिन आज्ञा शिवाय सर्व कुमार्ग आहेत. त्यांचा संपर्क सोडावा अशा प्रकारे केल्याने आत्मकल्याण होते.

* छप्पय *

जीव सदा चिदभाव एक अविनाशी धारै ।
कर्म निमितकू पाय अशुद्धभावनि विस्तारै ।
कर्मशुभाशुभ बांधि उदै भरमै संसारै ।
पावै दु:ख अनन्त च्यारि गतिमै डुलि सारै ।।
सर्वज्ञ देशना पायकै तजै भाव मिथ्यात्व जब ।
निजशुद्ध भाव धरि कर्महरि लहै मोक्ष भरमै न तब ।।

* दोहा *

मंगलमय परमातमा, शुद्ध भाव अविकार ।
नमूं पाय पाऊं स्वपद, जाचू यहै करार ।।२।।

इति श्री कुन्दकुन्द स्वामिविरचित भावप्राभृताच्या जयपूरनिवासी पं. जयचंद्रजी छाबडा कृत देशभाषामय वचनिकेचा **डॉ. रेखा जैन** कृत भाव पाहुड चा मराठी भाषानुवाद समाप्त होत आहे. (५)

---

१. 'शुद्धभावा'चे निरूपण दोन प्रकारे क़ेले आहे जसे मोक्षमार्ग दोन नाहीत परंतु त्याचे निरूपण २ प्रकारचे आहे. अशा प्रकारे शुद्धभावाला जेथे २ प्रकारचे म्हटले आहे तेथे निश्चयनयाने आणि व्यवहार नयाने म्हटले आहे असे समजावे. निश्चय सम्यक्दर्शनादि आहे त्यांना ही व्यवहार मान्य आहे आणि त्यानाच निरतिचार व्यवहार रत्नत्रयादिमध्यें व्यवहाराने 'शुद्धत्व' अथवा 'शुद्ध' संप्रयोगत्व चा आरोप येतो ज्याला व्यवहारात 'शुद्धभाव' म्हणतात. त्यालाच निश्चयाने अशुद्ध म्हटले आहे – विरूद्ध म्हटले आहे. परंतु व्यवहार नयाने व्यवहार विरूद्ध नाही.

www.vitragvani.com



# ✻ अथमोक्ष पाहुड ✻

—: ६ :—

ॐ नम: सिद्धेभ्य: ।

मोक्ष पाहुडचा मराठी अनुवाद लिहित आहे

प्रथम मंगल म्हणून सिद्धाला नमस्कार करतात :—

✻ दोहा ✻

अष्ट कर्मको नाश करि, शुद्ध अष्ट गुण पाय ।
भये सिद्ध निज ध्यानतैं, नमूं मोक्षसुखदाय ।।१।।

अशा प्रकारे मंगल करण्यासाठीं सिध्दाना नमस्कार करून श्री कुंदकुंद आचार्यकृत 'मोक्षपाहुड' ग्रंथ प्राकृत गाथा बंध आहे, त्याचा अनुवाद करताना प्रथम आचार्य मंगलं चिंतण्यासाठी परमात्म्याला नमस्कार करतात:-

णाणमयं अप्पाणं उवलद्धं जेण झडियकम्मेण ।
चइऊण य परदव्वं णमो णमो तस्स देवस्स ।।१।।

ज्ञानमय आत्मा उपलब्धः येन क्षरितकर्मणा ।
त्यक्त्वा च परद्रव्यं नमो नमस्तस्मै देवाय ।।१।।

अर्थ :— आचार्य म्हणतात कीं, ज्यांचे परद्रव्याला सोडून द्रव्यकर्म, भावकर्म, आणि नो कर्म खिरले आहेत आणि ज्यानी निर्मल ज्ञानमयी आत्म्याला प्राप्त केले आहे अशा प्रकारच्या देवाना आमचा नमस्कार असो, नमस्कार असो दोनदां सांगून अति प्रीतिंयुक्त भाव सांगितले आहेत.

भावार्थ :— हा मोक्ष पाहुडाचा प्रारंभ आहे. येथे ज्यांनी समस्त परद्रव्याला सोडून कर्माचा अभाव करून केवल ज्ञानानंद स्वरूप मोक्षपदाला प्राप्त केले आहे. त्या देवाला मंगलांसाठी नमस्कार केला ते युक्तच आहे.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



जेथे जसे प्रकरण तेथे तशी योग्यता येथे भावमोक्ष तर अरहंतांना आहे, आणि द्रव्य- भाव दोन्ही प्रकारचे मोक्ष सिध्द परमेष्ठिचे आहेत म्हणून दोन्हीना ही नमस्कार जाणावा ।।१।।

पुढे अशा प्रकारे नमस्कार करून ग्रंथ करण्याची प्रतिज्ञा करतात :-

णमिऊण य तं देवं अणंतवरणाणदंसणं सुद्धं ।
वोच्छं परमप्पाणं परमपयं परमजोईणं ।।२।।

नत्वा च तं देवं अनंतवरज्ञानदर्शनं शुद्धम् ।
वक्ष्ये परमात्मानं परमपदं परमयोगिनाम् ।।२।।

अर्थ :— आचार्य म्हणतात कीं, त्या पूर्वोक्त देवाला नमस्कार करून परमात्मा जो उत्कृष्ट शुध्द आत्मा त्याला, परम योगीश्वर जो उत्कृष्ट योग्य ध्यान करणाऱ्या मुनिराजा साठी सांगतो. कसे आहेत पूर्वोक्त देव? ज्याना अनंत आणि श्रेष्ठ ज्ञान - दर्शन प्राप्त झाले आहे विशुध्द आहे - कर्ममलाने रहित आहे, ज्यांचे पद परम उत्कृष्ट आहे. (ते पूर्वोक्त देवाचे वर्णन आहे.)

भावार्थ :— या (ग्रथांत) पाहुडात मोक्ष कोणत्या कारणाने मिळेल आणि मोक्षपद कसे आहे, त्याचे वर्णन केले आहे. त्याची प्रतिज्ञा केली आहे योगीश्वरासाठी सांगतात, याचा आशय असा आहे कीं, अशा मोक्षपदाला शुध्दपरमात्म्याच्या ध्यानाद्वारे प्राप्त ते करतात, त्या ध्यानाची योग्यता योगीश्वराना प्रधान रूपाने प्राप्त केली जाते. गृहस्थासाठीं हे ध्यान प्रधान नाही ।।२।।

पुढे म्हणतात कीं, ज्या परमात्म्याना सांगण्याची प्रतिज्ञा केली आहे. त्याना योगी, ज्ञानी, मुनि जाणून त्यांचे ध्यान करून परमपदाला प्राप्त करतात :-

जं जाणिऊण जोई जोअत्थो जोइऊण अणवरयं ।
अव्वाबाहमणंतं अणोवमं लहइ णिव्वाणं ।।३।।

यत् ज्ञात्वा योगी योगस्थः दृष्ट्वा अनवरतम् ।
अव्याबाधमनंतं अनुपमं लभते निर्वाणम् ।।३।।

अर्थ :— पुढे सांगतात कीं, परमात्म्याला जाणून योगी (-मुनि) ध्यानात स्थित होवून निरंतर त्या परमात्म्याला अनुभव गोचर करून निर्वाणाला प्राप्त होतो. कसे आहे निर्वाण? 'अव्याबाध'- जेथे कोणत्याही प्रकारची बाधा नाही 'अनंत' आहे— ज्याचा नाश नाही असे! 'अनुपम' - ज्याला कोणतीही उपमा नाही असे!

भावार्थ :— आचार्य म्हणतात कीं, अशा परमात्म्याला पुढे म्हणतात ज्यांच्या ध्यानात मुनि निरंतर अनुभव

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



करून केवलज्ञान प्राप्त करून घेतात, निर्वाणाला प्राप्त करून घेतात. येथे हे तात्पर्य आहे कीं, परमात्म्याच्या ध्यानाने मोक्ष प्राप्त होतो ।।३।।

पुढे परमात्मा कसा आहे असे सांगण्यासाठीं आत्मा तीन प्रकार दाखवतात :-

**तिपयारो सो अप्पा परमंतरबाहिरो हु देहीणं।**
**तत्थ परो झाइज्जइ अंतोवाएण चयहि बहिरप्पा ।।४।।**

त्रिप्रकारः स आत्मा परमन्तः बहिः स्फुटं देहिनाम् ।
तत्र परं ध्यायते अन्तरुपायेन त्यज बहिरात्मानम् ।।४।।

<u>अर्थ :</u>— प्राण्यांचा आत्मा तीन प्रकारचा आहे, अंतरात्मा, बहिरात्मा, आणि परमात्मा. अंतरात्म्याच्या उपायाद्वारे बहिरात्म्याला सोडून परमात्म्याचे ध्यान केले पाहिजे. ।।४।।

<u>भावार्थ :</u>— बहिरात्म्याला सोडून अंतरात्मारूप होवून, परमात्म्याचे ध्यान केले पाहिजे त्यामुळें मोक्ष प्राप्त होतो. ।।४।।

पुढे तीन प्रकारच्या आत्म्याचे स्वरूप सांगतात :-

**अक्खाणि बाहिरप्पा अंतरअप्पा हु अप्पसंकप्पो ।**
**कम्मकलंकविमुक्को परमप्पा भण्णए देवो ।।५।।**

अक्षाणि बहिरात्मा अन्तरात्मा स्फुटं आत्मसंकल्पः ।
कर्मकलंकविमुक्तः परमात्मा भण्यते देवः ।।५।।

<u>अर्थ :</u>— अक्ष अर्थात् स्पर्शन आदि इंद्रिये तो तर बाह्य आत्मा आहे कारण कीं, इंद्रियामुळें स्पर्श, आदि विषयाचे ज्ञान होते तेंव्हा लोक म्हणतात अशी जी इंद्रिये आहेत तोच आत्मा आहे अशा प्रकारे इंद्रियाना बाह्य आत्मा म्हणतात. अंतरात्मा म्हणजे अंतरंगात आत्म्याचा प्रकट अनुभवगोचर संकल्प आहे, शरीर आणि इंद्रियापासून भिन्न मनाद्वारे पाहणे जाणणे वाला आहे तो मी आहे अशा प्रकारे स्वसंवेदनगोचर संकल्प तो अंतरात्मा आहे. तसेच परमात्मा कर्म जे द्रव्यकर्म ज्ञानावरणादिक तथा भावकर्म जे रागद्वेष मोहादिक आणि नो कर्म जे शरीरादिक कलंकमल त्यापासून विमुक्त - रहित अनंतज्ञानादिक गुण सहित तोच परमात्मा आहे तोच देव आहे. दुसऱ्याना देव म्हणणे उपचार आहे.

<u>भावार्थ :</u>— बाहय आत्मा इंद्रियाना म्हटले आहे. अंतरात्मा देहात स्थित पाहणे, जाणणे ज्यामुळे होते असा मनाचा संकल्प आहे आणि परमात्मा कर्मकलंकाने रहित असे म्हटले आहे. येथे असे सांगितले आहे कीं, हा जीव अंतरंगात आत्म्याला जाणतो तेंव्हा तो सम्यक्‌दृष्टि होतो तेंव्हा तो अंतरात्मा आहे आणि हा जीव जेंव्हा परमात्म्याच्या ध्यानाने कर्मकलंकाने रहित होतो तेंव्हा प्रथम केवलज्ञान प्राप्त करून अरहंत होते, नंतर सिध्दपद प्राप्त करतो या दोन्हीला परमात्मा म्हणतात. अरहंत तर भाव कलंक रहित आहेत आणि सिध्द द्रव्य

www.vitragvani.com



- भावरूप दोन्ही प्रकारच्या कलंकाने रहित आहेत अशा प्रकारे जाणा ।।५।।

पुढे त्या परमात्म्याचे विशेषणाद्वारे स्वरूप सांगतात -

**मलरहिओ कलचत्तो अणिंदिओ केवलो विसुद्धप्पा ।**
**परमेट्ठी परमजिणो सिवंकरो सासओ सिद्धो ।।६।।**

मलरहितः कलत्यक्तः अनिंद्रियः केवलः विशुद्धात्मा ।
परमेष्ठी परमजिनः शिवंकरः शाश्वतः सिद्धः ।।६।।

<u>अर्थ :</u>— परमात्मा असा आहे. मलरहित आहे - द्रव्यकर्मभावकर्मरूप मलाने रहित आहे शरीर रहित आहे. अनिंद्रिय (इंद्रियरहित) आहे. अथवा अनिंदित अर्थात् कोणत्याही प्रकारे निंदायुक्त नाही. सर्व प्रकारे प्रशंसा योग्य आहे. केवल (केवलज्ञानमयी) आहे. विशुध्दात्मा - ज्याच्या आत्म्याचे स्वरूप विशेषरूपाने शुध्द आहे. ज्ञानात ज्ञेयाचे आकार झळकतात तरी ही त्यांच्या रूप होत नाही आणि ना त्यांच्याशी राग द्वेष आहे, परमेष्ठी आहे, परमजिन आहे, सर्व कर्मांना जिंकले आहे, शिवशंकर आहे. भव्य जीवाला परममंगल तथा मोक्ष देणारे आहे. शाश्वता ( अविनाशी) आहे, सिध्द आहे - आपल्या स्वरूपाची सिध्दि करून निर्वाणपदाला प्राप्त झाला आहे.

<u>भावार्थ :</u>— असा परमात्मा आहे जो अशा प्रकारच्या परमात्म्याचे ध्यान करतो तो असाच होतो. ।।६ ।।

पुढे ही हाच उपदेश करतात :-

**आरुहवि अंतरप्पा बहिरप्पा छंडिऊण तिविहेण ।**
**झाइज्जइ परमप्पा उवइट्ठं जिणवरिंदेहि ।।७।।**

आरुह्य अंतरात्मानं बहिरात्मानं त्यक्त्वा त्रिविधेन ।
ध्यायते परमात्मा उपदिष्टं जिनवरेन्द्रैः ।।७।।

<u>अर्थ :</u>— बहिरात्मपणाला मन, वचन, कायेने, सोडून अंतरात्म्याचा आश्रय घेवून परमात्म्याचे ध्यान करा, हा जिनवरेंद्र तीर्थंकर परमदेवाने उपदेश दिला आहे.

<u>भावार्थ :</u>— परमात्म्याचे ध्यान करण्याचा उपदेश प्रधान करून सांगितला आहे यामुळे मोक्ष प्राप्त होतो ।।७।।

पुढे बहिरात्म्याची प्रवृत्ति सांगतात :-

**बहिरत्थे फुरियमणो इंदियदारेण णियसरूवचुओ ।**
**णियदेहं अप्पाणं अज्झवसदि मूढदिट्ठीओ ।।८।।**

बहिरर्थे स्फुरितमनाः इन्द्रियद्वारेण निजस्वरूपच्युतः ।
निजदेहं आत्मानं अध्यवस्यति मूढदृष्टिस्तु ।।८।।

www.vitragvani.com



अर्थ :— मूढ दृष्टि अज्ञानी मोही मिथ्यादृष्टि आहे तो बाह्यपदार्थ-धन-धान्य कुटुंब आदि इष्ट पदार्थात स्फुरित (तत्पर) मनाचा आहे. तसेच इंद्रियाच्या द्वारे आपल्या स्वरूपापासून च्युत आहे आणि इंद्रियानाच आत्मा जाणतो असा असून आपल्या देहालाच आत्मा जाणतो, निश्चय करतो अशा प्रकारे मिथ्यादृष्टि बहिरात्मा आहे.

भावार्थ :— असा बहिरात्म्याचा भाव आहे त्याला सोडावे ।।८।।

पुढे सांगतात कीं, मिथ्यादृष्टि आपल्या देहा प्रमाणे दुसऱ्याचा देह पाहून त्याला दुसऱ्याचा आत्मा मानतात :-

णियदेहसरित्थं* पिच्छिऊण परविग्गहं पयत्तेण ।
अच्चेयणं पि गहियं झाइज्जइ परमभाएण ।।९।।

निजदेहसदृशं दृष्ट्वा परविग्रहं प्रयत्नेन ।
अचेतनं अपि गृहीतं ध्यायते परमभावेन ।।९।।

अर्थ :— मिथ्यादृष्टि पुरूष आपल्या देहाच्या समान दुसऱ्याच्या देहाला पाहून हा देह अचेतन आहे तरी ही मिथ्याभावाने आत्मभावद्वारे मोठा प्रयत्न करून परच्या आत्म्याचे ध्यान करतो अर्थात समजतो.

भावार्थ :— बहिरात्मा मिथ्यादृष्टिच्या मिथ्यात्व कर्माच्या उदयाने (उदयाने वश झाल्याने) मिथ्याभाव आहे म्हणून तो आपल्या देहाला आत्मा जाणतो तसेच पर चा देह अचेतन आहे तरीही त्याला परचा आत्मा मानतो (अर्थात् पराला ही देहात्मबुध्दिने मानतो आणि अशा मिथ्या भावासहित ध्यान करतो.) आणि त्यात खूप प्रयत्न करतो म्हणून असे भाव सोडणे हे तात्पर्य आहे ।।९ ।।

पुढे म्हणतात कीं, अशा मान्यतेने 'पर' मनुष्यामध्ये मोहाची प्रवृत्ति होते :-

सपरज्झवसाएणं देहेसु य अविदिदत्थमप्पाणं ।
सुयदाराईविसए मणुयाणं वड्ढए मोहो ।।१०।।

स्वपराध्यवसायेन देहेषु च अविदितार्थमात्मानम् ।
सुतदारादिविषये मनुजानां वर्द्धते मोहः ।।१०।।

अर्थ :— अशा प्रकारे देहात स्व - परच्या अध्यवसाय (निश्चय) च्या द्वारे ज्या मनुष्याने पदार्थाच्या स्वरूपाला जाणले नाही त्यांची (सुत दारादिक) बायका, मुले यांच्या जीवात मोहाची प्रवृत्ति होते. कसा आहे माणूस - ज्याने पदार्थांचे स्वरूप (अर्थात् आत्मा) जाणला नाही असे आहेत.

दुसरा अर्थ :— (अर्थ :- अशा प्रकारे देहात स्व पर चे अध्यवसाय (निश्चय) च्या द्वारे ज्या मनुष्याने पदार्थाच्या स्वरूपाला जाणले नाही त्यांच्या सुतदारादिक जीवात मोहाची प्रवृत्ति होते. ( भाषा परिवर्तनकाराने हा अर्थ लिहिला आहे)

www.vitragvani.com



भावार्थ :— ज्या माणसाने जीव अजीव पदार्थाचे स्वरूप यथार्थ जाणले नाही त्यांच्या देहात स्वपराध्यवसाय आहे. आपल्या देहाला आपला आत्मा जाणतात आणि परच्या देहाला पर चा आत्मा जाणतात त्यांचे पुत्र स्त्री आदि कुटुंबामध्यें मोह (ममत्व) होतो. जेव्हा हे जीव अजीवाच्या स्वरूपाला जाणते तेंव्हा देहाला अजीव मानतो, आत्म्याला अमूर्तिक चैतन्य जाणतो, आपल्या आत्म्याला आपला मानतो, आणि परच्या आत्म्याला पर जाणतो तेव्हा परामध्ये ममत्व राहात नाही. म्हणून जीवादिक पदार्थाचे स्वरूप चांगल्या प्रकारे जाणून मोह करू नका हे सांगितले आहे ।।१० ।।

पुढे म्हणतात कीं, मोहकर्माच्या उदयाने ( उदयात युक्त झाल्याने) मिथ्या ज्ञान आणि मिथ्याभाव होतात त्यामुळें आगामी भावात ही हा मनुष्य देहाची इच्छा करतो.

मिच्छाणाणेसु रश्रो मिच्छाभावेण भाविश्रो संतो ।
मोहोदएण पुणरवि श्रंगं ' सम्मएणए मणुश्रो ॥११॥

मिथ्याज्ञानेषु रतः मिथ्याभावेन भावितः सन् ।
मोहोदयेन पुनरपि अंगं मन्यते मनुजः ।।११।।

अर्थ :— हा मनुष्य मोहकर्माच्या उदयाने (उदयाला वश होवून) मिथ्याज्ञानाच्या मिथ्याभावाने पुन्हा पुढच्या जन्मात या देहाला चांगले समजून त्याची इच्छा करतो.

भावार्थ :— मोह कर्माची प्रकृति मिथ्यात्वाच्या उदयाने (उदयाने वश झाल्याने) ज्ञान ही मिथ्या होते. परद्रव्याला आपले जाणतो आणि त्या मिथ्यात्वाच्या द्वारे मिथ्याश्रध्दान होते. त्यामुळें निरंतर परद्रव्यात ही भावना असते कीं, हे मला नेहमी प्राप्त होवो यामुळें हा प्राणी आगामी देहाला भले जाणून इच्छा करतो ।।११ ।।

पुढे म्हणतात कीं, जे मुनि देहात अपेक्षा धरत नाहीत, देहाची इच्छा करत नाहीत, त्याचे ममत्व करत नाहीत ते निर्वाण प्राप्त करून घेतात :-

जो देहे णिरवेक्खो णिद्दंदो णिम्ममो णिरारंभो ।
श्रादसहावे सुरश्रो जोई सो लहइ णिव्वाणं ॥१२॥

यः देहे निरपेक्षः निर्द्वन्दः निर्ममः निरारंभः ।
आत्मस्वभावे सुरतः योगी स लभते निर्वाणम् ।।१२।।

अर्थ :— जो योगी ध्यानी मुनि, देहात निरपेक्ष आहे अर्थात् देहाला निरपेक्ष आहे अर्थात् देहाची इच्छा करत नाहीत, उदासीन आहेत, निर्द्वन्द आहेत - रागद्वेषरूप इच्छा अनिष्ट मान्यतेने रहित आहे, निर्ममत्त्व आहे - देहादिकामध्यें 'हे माझे' अशा बुध्दिरहित आहे, निरारंभ आहे, - या शरीरासाठीं तसेच अन्य लौकिक प्रयोजनासाठीं आरंभापासून रहित आहे आणि आत्मस्वभावात रत आहेत, लीन आहेत, निरन्तर स्वभावाच्या भावना सहित आहे ते मुनि निर्वाण प्राप्त करतात.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



भावार्थ :— जे बहिरात्माला भावाला सोडून अन्तरात्मा बनण्यासाठी परमात्म्यात लीन होतात तेच मोक्ष प्राप्त करतात. हा उपदेश सांगितला आहे.

पुढे बंध आणि मोक्षाच्या कारणाचा संक्षेपरूप आगमचा वचन सांगत आहे :—

**परदव्वरओ बज्झदि विरओ मुच्चेइ विविहकम्मेहिं ।**
**एसो जिणउवदेसो [1]समासओ बंधमुक्खस्स ॥१३॥**

परद्रव्यरतः बध्यते विरतः मुच्यते विविधकर्मभिः ।
एषः जिनोपदेशः समासतः बंधमोक्षस्य ॥१३॥

अर्थ :— जो जीव परद्रव्यात रत आहे, रागी आहे तो तर अनेक प्रकाराच्या कर्मानी बांधला जातो. कर्मोंचा बंध करतो आहे जो परद्रव्यापासून विरत आहे — रागी नाही, तो अनेक प्रकारच्या कर्मापासून सुटतो हा बंधाचा आणि मोक्षाचा थोडक्यात जिनदेवाचा उपदेश आहे.

भावार्थ :— बंध मोक्षाच्या कारणाची कथा अनेक प्रकारानी आहे त्याचा हा सारांश आहे :- परद्रव्याशी रागभाव तर बंधाचे कारण आहे आणि विराग भाव मोक्षाचे कारण आहे, अशा प्रकारे संक्षेपाने जिनेंद्रांचा उपदेश आहे ॥१३॥

पुढे सांगतात कीं, जो स्वद्रव्यात रत आहे तो सम्यक्दृष्टि असतो आणि कर्माचा नाश करतो :-

**सद्दव्वरओ सवणो सम्माइट्ठी हवेइ [2]सो साहू ।**
**सम्मत्तपरिणदो उण खवेइ [3]दुट्ठट्ठकम्माइं ॥१४॥**

स्वद्रव्यरतः श्रमणः सम्यग्दृष्टि भवति सः साधुः ।
सम्यक्त्वपरिणतः पुनः [4]क्षपयति दुष्टाष्टकर्माणि ॥१४॥

अर्थ:— जे मुनि स्वद्रव्य अर्थात् आपल्या आत्म्यात रत आहेत, रूचि सहित आहेत ते नियमाने सम्यक्दृष्टि आहेत आणि तेच सम्यक्त्व भावरूप परिणमन करून दुष्ट आठ कर्माचा क्षय - नाश करतात.

भावार्थ :— हे ही कर्म नाश करण्याच्या कारणांचे संक्षेपात कथन आहे. जे आपल्या स्वरूपाची श्रध्दा, रूचि प्रतिति आचरणाने युक्त आहे ते नियमाने सम्यक्दृष्टि आहेत, अशा सम्यक्त्वभावाने परिणमन करून मुनि आठ कर्मांचा नाश करून निर्वाणाला प्राप्त करतात ॥१४॥

पुढे म्हणतात कीं, जे परद्रव्यात रत आहेत ते मिथ्यादृष्टि होवून कर्माला बांधतात :—

**जो पुण परदव्वरओ मिच्छादिट्ठी हवेइ सो साहू ।**
**मिच्छत्तपरिणदो उण बज्झदि दुट्ठट्ठकम्मेहिं ॥१५॥**

यः पुनः परद्रव्यरतः मिथ्यादृष्टिः भवति सः साधुः ।
मिथ्यात्वपरिणतः पुनः बध्यते दुष्टाष्टकर्मभिः ॥१५॥

www.vitragvani.com



अर्थ :— पुन: अर्थात् पुन्हा जे साधु परद्रव्यात रत आहेत, रागी आहेत ते मिथ्यादृष्टि असतात आणि ते मिथ्यात्वभावरूप परिणमन करून दुष्ट अष्ट कर्मानि बांधले जातात.

भावार्थ :- हे थोडक्यात बंधाचे कारण आहेत. येथे साधू म्हणून असे सांगतात कीं, जे बाहय परिग्रह सोडून निग्रंथ होतात तरी ही मिथ्यादृष्टि होवून संसारातील दु:ख देणाऱ्या अष्टकर्मानि बांधले जातात ।।१५।।

पुढे म्हणतात कीं, परद्रव्यानेच दुर्गति होते आणि स्वद्रव्याने सुगति होते :-

परदव्वादो दुग्गइ सद्दव्वादो हु सग्गई होई ।
इय णाऊण सदव्वे कुणह रई विरय इयरम्मि ।।१६।।

परद्रव्यात् दुर्गतिः स्वद्रव्यात् स्फुटं सुगतिः भवति ।
इति ज्ञात्वा स्वद्रव्ये कुरुत रतिं विरतिं इतरस्मिन् ।।१६।।

अर्थ :— परद्रव्यामुळे दुर्गति होते आणि स्वद्रव्याने सुगति होते. हे स्पष्ट जाणा म्हणून हे भव्यजीवा ! तुम्ही अशा प्रकारे जाणून स्वद्रव्यात रति (प्रेम) करा आणि अन्य जे परद्रव्य त्यांच्याशी विरती करा.

भावार्थ :— लोकात ही ही रीत आहे कीं, आपल्या द्रव्यात रति करून आपणच भोगतो, तो सुख प्राप्त करून घेतो, त्याला कोणतीच अडचण येत नाही आणि परद्रव्याशी प्रीति करून इच्छे प्रमाणे भोगतो त्याला दु:ख होते कष्ट उठवावे लागतात. म्हणून आचार्यांनी संक्षेपाने उपदेश दिला आहे कीं. आपल्या आत्मस्वभावात रत राहा त्यामुळें सुगति मिळेल, स्वर्गादिक यामुळेच मिळतात आणि मोक्ष ही यामुळेच मिळतो आणि परद्रव्यात प्रीति करूं नका यामुळे दुर्गती मिळते संसारात भ्रमण होते.

येथे कोणी म्हणतात स्वद्रव्यात लीन झाल्यामुळे मोक्ष मिळतो आणि सुगति, दुर्गति तर परद्रव्याच्या प्रीतिमुळे होते, त्याना विचारतात कीं, हे सत्य आहे परंतु येथे या आशयाने म्हटले आहे कीं, परद्रव्यापासून विरक्त होवून स्वद्रव्यात लीन झाला तर खूप विशुध्दता येते, त्या विशुध्दतेच्या निमित्ताने शुभकर्म बांधले जातात आणि जेंव्हा अत्यंत विशुध्दता होते. तेंव्हा कर्माची निर्जरा होवून मोक्ष मिळतो म्हणून सुगति दुर्गति होणे म्हटले आहे ते युक्त आहे अशा प्रकारे जाणावे ।।१६।।

पुढे शिष्य विचारतात कीं, परद्रव्य कसे आहे? त्याचे उत्तर आचार्य सांगतात :-

आदसहावादण्णं सच्चित्ताचित्तमिस्सियं हवइ ।
तं परदव्वं भणियं अवितत्थं सव्वदरसीहिं ।।१७।।

आत्मस्वभावादन्यत् सचित्ताचित्तमिश्रितं भवति ।
तत् परद्रव्यं भणितं अवितत्थं सर्वदर्शिभिः ।।१७।।

अर्थ :— आत्मस्वभावापासून अन्य सचित्त तर स्त्री, पुत्रादिक, जीवसहित वस्तु तसेच अचित्त धन, धान्य, हिरण्य, सुवर्णादिक अचेतन वस्तु आणि मिश्र आभूषणादि सहित मनुष्य तसेच कुटुंबसहित गृहादिक हे सर्व परद्रव्य आहे, अशा प्रकारे ज्यानी जीवादिक पदार्थांचे स्वरूप जाणले नाही त्याना समजावण्यासाठीं सर्वदर्शी सर्वज्ञ भगवंतानी सांगितले आहे किंवा 'अवितत्थं' म्हणजेच सत्यार्थ सांगितला आहे.

भावार्थ :— आपला ज्ञान स्वरूप आत्म्याशिवाय अन्य चेतन, अचेतन मिश्र वस्तु आहेत त्या सर्व परद्रव्य आहेत अशा प्रकारे अज्ञानीला समजावण्यासाठीं सर्वज्ञदेवाने म्हटले आहे ।।१७।।

पुढे म्हणतात कीं, आत्मस्वभाव स्वद्रव्य म्हटले आहे ते अशा प्रकारे आहे :-

दुट्ठट्ठकम्मरहियं अणोवमं णाणविग्गहं णिच्चं ।
सुद्धं जिणेहिं कहियं अप्पाणं हवइ सद्दव्वं ।।१८।।

दुष्टाष्टकर्मरहितं अनुपमं ज्ञानविग्रहं नित्यम् ।
शुद्धं जिनैः भणितं आत्मा भवति स्वद्रव्यम् ।।१८।।

अर्थ :— संसाराचे दु:ख देणारे ज्ञानावरणादिकदुष्ट अष्टकर्मांने रहित आणि ज्याला कोणाची उपमा नाही असा अनुपम, ज्याला ज्ञान च शरीर आहे आणि ज्याचा नाश नाही असा अविनाशी नित्य आहे आणि शुध्द अर्थात् विकार रहित केवलज्ञानमयी आत्मा जिनभगवान् सर्वज्ञानी सांगितला आहे तेच स्वद्रव्य आहे.

भावार्थ :— ज्ञानानंद मय, अमूर्तिक, ज्ञानमूर्ति, आपला आत्मा आहे तेच एक स्वद्रव्य आहे, अन्य सगळे चेतन, अचेतन, मिश्र परद्रव्य आहेत ।।१८ ।।

पुढे म्हणतात कीं, जे अशा निजद्रव्याचे ध्यान करतात ते निर्वाण मिळवतात :-

जे झायंति सदव्वं परदव्वपरम्मुहा हु सुचरित्ता ।
ते जिणवराण मग्गे अणुलग्गा लहदि णिव्वाणं ।।१९।।

ये ध्यायंति स्वद्रव्यं परद्रव्य पराङ्मुखास्तु सुचरित्राः ।
ते जिनवराणां मार्गे अनुलग्नाः लभंते निर्वाणम् ।।१९।।

अर्थ :— जो मुनि परद्रव्यापासून पराङ्मुख होवून स्वद्रव्य जे निज आत्मद्रव्याचे ध्यान करतात ते प्रकट सुचरित्रा अर्थात् निर्दोष चारित्रयुक्त होवून जिनवर तीर्थंकारांच्या मार्गाचे अनुसरण करून निर्वाण प्राप्त करतात.

भावार्थ :— परद्रव्याचा त्याग करून जे आपल्या स्वरूपाचे ध्यान करतात ते निश्चय चारित्र्यरूप होवून जिनमार्गाला लागतात ते मोक्षाला प्राप्त करतात ।।१९ ।।

पुढे म्हणतात कीं, जिनमार्गात लागलेला योगी शुध्दात्म्याचे ध्यान करून मोक्षाला प्राप्त करून घेतो तो काय स्वर्ग प्राप्त करून घेणार नाही? अवश्य प्राप्त करून घेतो :—

जिणवरमएण जोई झाणे झाएह सुद्धमप्पाणं ।
जेण लहइ णिव्वाणं ण लहइ किं तेण सुरलोयं ।।२०।।

जिनवरमतेन योगी ध्याने ध्यायति शुद्धमात्मानम् ।
येन लभते निर्वाणं न लभते किं तेन सुरलोकम् ।।२०।।

www.vitragvani.com



अर्थ :— योगी ध्यानि मुनि जे जिनवर भगवंताच्या मताने शुध्द आत्म्याचे ध्यान करतात ते निर्वाण प्राप्त करून घेतात, ते स्वर्गलोक प्राप्त करून घेणार नाहीत कां? अवश्य प्राप्त करून घेतात ।।२०।।

भावार्थ :— कोणी म्हणत असतील कीं, जे जिनमार्गात लागून आत्म्याचे ध्यान करतो तो मोक्ष प्राप्त करून घेतो. आणि स्वर्ग मिळवू शकत नाही, त्याना सांगतात कीं, जिनमार्गात प्रवर्तन करणारा शुध्द आत्म्याचे ध्यान करून मोक्ष प्राप्त करून घेतो त्याला स्वर्गलोक मिळवणे काय कठिण आहे ? तो तर त्याच्या मार्गातच आहे. ।।२०।।

पुढे हा अर्थ दृष्टान्त द्वारा दृढ करतात:-

जो जाइ जोयणसयं दियहेणेक्केण लेइ गुरुभारं ।
सो किं कोसद्धं पि हु ण सक्कए जाहु भुवणयले ।।२१।।

यः याति योजनशतं दिवसेनैकेन लात्वा गुरुभारम् ।
स किं क्रोशार्द्धमपि स्फुटं न शक्नोति यातुं भुवनतले ।।२१।।

अर्थ :— जो पुरूष मोठा भारा घेवून एका दिवसात १०० योजन चालतो तो या पृथ्वीतलावर अर्धा कोस कां चालणार नाही? हे स्पष्ट ओळखा.

भावार्थ :— जो पुरूष मोठे ओझे घेवून एका दिवसात १०० योजने चालतो त्याला १/२ कोस चालणे तर अत्यंत सोपे आहे. असेच जिनमार्गाने मोक्ष प्राप्त करणे तर अत्यन्त सोपे आहे ।।२१।।

पुढे याच अर्थाचा दुसरा दृष्टांत सांगतात :-

जो कोडिए ण जिप्पइ सुहडो संगामएहिं सव्वेहिं ।
सो किं जिप्पइ इक्कि णरेण संगामए सुहडो ।।२२।।

यः कोट्या न जीयते सुभटः संग्रामकैः सर्वैः ।
स किं जीयते एकेन नरेण संग्रामे सुभटः ।।२२।।

अर्थ :— जर कोणी सुभट युध्दात सर्व युध्द करणाऱ्या बरोबर कोटी लोकाना सुध्दां सहजतेने जिंकत असेल तो सुभट एका मनुष्याला कां जिकंणार नाही ? अवश्य जिंकेल?

भावार्थ :— जो जिनमार्गात प्रवर्तन करतो तो कर्माचा नाश करतो तो स्वर्गाला न जावू देणाऱ्या एका पापकर्माचा नाश करणार नाही कां? अवश्य करेल ।।२२।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

पुढे म्हणतात कीं, स्वर्ग तर तपाने (शुभराग रुपी तपाद्वारे) सर्व प्राप्त करून घेतात, परंतु ध्यानाच्या योगाने स्वर्ग प्राप्त करून घेतात ते त्या ध्यानाच्या योगाने मोक्ष ही प्राप्त करून घेतात.

सग्गं तवेण सव्वो वि पावए किंतु झाणजोएण ।
जो पावइ सो पावइ परलोये सासयं सोक्खं ॥२३॥

स्वर्गं तपसा सर्वः अपि प्राप्नोति किन्तु ध्यानयोगेन ।
यः प्राप्नोति सः प्राप्नोति परलोके शाश्वतं सौख्यम् ॥२३॥

अर्थ :— शुभरागरूपी तपाद्वारे स्वर्गतर सगळेच मिळवतात तरी सुध्दां जे ध्यानाच्या योगाने स्वर्ग मिळवतात तेच धानाच्या योगाने परलोकीत शाश्वत सुख प्राप्त करून घेतात.

भावार्थ :— कायक्लेशादिक तप तर सगळे मताचे धारक करतात ते तपस्वी मंदकषायच्या निमित्ताने सगळे स्वर्गाला प्राप्त करतात. परंतु जे ध्यानाच्या द्वारे स्वर्ग प्राप्त करतात. ते जिनमार्गात सांगितलेल्या ध्यानाच्या योगाने परलोकात ज्याच्यात शाश्वत सुख आहे. अशा निर्वाणाला प्राप्त करतात आहे. ॥२३॥

पुढे ध्यानाच्या योगाने मोक्षप्राप्त करत आहे. त्यांना दृष्टान्त उदाहरणाने दृढ करत आहेत.

अइसोहणजोएणं सुद्धं हेमं हवेइ जह तह य ।
कालाईलद्धीए अप्पा परमप्पओ हवदि ॥२४॥

अतिशोभनयोगेन शुद्धं हेम भवति यथा तथा च ।
कालादिलब्ध्या आत्मा परमात्मा भवति ॥२४॥

अर्थ :— जसे सुवर्ण पाषाण शोधण्याच्या सामुग्रीच्या संबंधाने शुद्ध सुवर्ण होत जाते तसेच काल आदि लाब्धी द्रव्य क्षेत्र काल आणि भावरूप सामुग्रीच्या प्राप्तीने हा आत्मा कर्माच्या संयोगाने अशुद्ध आहे तो परमात्मा होत जातो. ॥२४॥ भावार्थ सुगम आहे.

पुढे सांगतात कीं, संसारात व्रत, तपाने स्वर्ग मिळतो ते व्रत ठिक आहे परंतु अव्रतादिकाने नरकादि गति येते असे अव्रवादिक श्रेष्ठ नाहीत. :—

वर वयतवेहि सग्गो मा दुक्खं होउ णिरइ इयरेहिं ।
छायातवट्ठियाणं पडिवालंताण गुरुभेयं ॥२५॥

वरं व्रततपोभिः स्वर्गः मा दुःखं भवतु नरके इतरैः ।
छायातपस्थितानां प्रतिपालयतां गुरुभेदः ॥२५॥

अर्थ :— व्रत आणि तपाने स्वर्ग मिळतो. तो श्रेष्ठ आहे परंतु अव्रत आणि अतपाने प्राण्याला नरकगतिमध्ये दु:ख होते, हे बरोबर नाही. छाया आणि (आतप) उन्हात बसणाऱ्यांच्या प्रतिपालक कारणामध्यें मोठा भेद आहे.

www.vitragvani.com



भावार्थ :— जसे छायेचे कारण वृक्षादिक आहेत त्यांच्या छायेत जे बसतात ते सुखी होतात आणि आतपाचे कारण सूर्य, अग्नि, आदिक आहेत यांच्या निमित्ताने आतप होतो जे त्यात बसतात ते दु:खाला प्राप्त करतात अशाप्रकारे दोन्हीत मोठा भेद आहे. अशाप्रकारे जो तप आणि व्रताचे आचरण करतो तो स्वर्गाचे सुख प्राप्त करतो आणि जे याचे आचरण करत नाहीत, विषय कषायादिकाचे सेवन करतात ते नरकाच्या दु:खाला प्राप्त करतात. अशाप्रकारे यांच्यामध्ये मोठा भेद आहे. म्हणून येथे सांगण्याचा हा आशय आहे कीं, जो पर्यंत निर्वाण होत नाही तो पर्यंत व्रत-तप आदिमध्यें प्रवर्तन श्रेष्ठ आहे. यामुळे सांसारिक सुखाची प्राप्ति होते आणि निर्वाणाच्या साधनात ही हे सहकारी आहेत. विषयकषायादिच्या प्रवृत्तिचे फल तर केवळ नरकादिचे दु:ख आहे. त्या दु:खाच्या कारणाना सेवन करणे ही तर मोठी चूक आहे. असे जाणावे ॥२५॥

पुढे म्हणतात कीं, संसारात आहे तो पर्यंत व्रत, तप पाळणे श्रेष्ठ सांगितले आहे. परंतु जे संसारातून निघू इच्छितात त्यानी आत्म्याचे ध्यान करावे.

**जो इच्छइ णिस्सरिहुं संसारमहण्णवाउ रुद्दाओ ।**
**कम्मिंधणाण डहणं सो झायइ अप्पयं सुद्धं ॥२६॥**

यः इच्छति निःसर्तुं संसारमहार्णवात् रुद्रात् ।
कर्मेन्धनानां दहनं सः ध्यायति आत्मानं शुद्धम् ॥२६॥

अर्थ :— जे जीव रूद्र अर्थात् प्रचंड संसाररूपी समुद्रातून निघू इच्छितो तो जीव कर्मरूपी इंधनाला दहन करणारा शुध्द आत्मा त्याचे ध्यान करतो.

भावार्थ :— निर्वाणाची प्राप्ति कर्माचा नाश होतो तेंव्हा होते आणि कर्माचा नाश सुध्दात्म्याच्या ध्यानाने होतो. म्हणून जो संसारातून निघून मोक्षाची इच्छा करतो तो शुध्दात्मा, जो कर्ममलाने रहित अनंत चतुष्टय सहित (निज,निश्चय) परमात्मा आहे, त्याचे ध्यान करतो, मोक्षाचा उपाय या शिवाय दुसरा नाही ॥२६॥

पुढे आत्म्याचे ध्यान करण्याची विधि सांगतात :-

**सव्वे कसाय मुत्तं गारवमयरायदोसवामोहं ।**
**लोयववहारविरदो अप्पा झाएइ झाणत्थो ॥२७॥**

सर्वान् कषायान् मुक्त्वा गारवमदरागदोषव्यामोहम् ।
लोकव्यवहारविरतः आत्मानं ध्यायति ध्यानस्थः ॥२७॥

अर्थ :— मुनि सर्व कषायाना सोडून तसेच गर्व, मद, राग, द्वेष तसेच मोह याना सोडून आणि लोक व्यवहारातून विरक्त होवून ध्यानात स्थित झालेल्या आत्म्याचे ध्यान करतो ॥२७॥

भावार्थ :— मुनिनी आत्म्याचे ध्यान अशा प्रकारे करावे - प्रथम क्रोध, मान, माया, लोभ या सर्व कषायाना सोडावे गर्वाला सोडावे. मदाचे, जाति आदि ८ प्रकारचे भेद आहेत त्याना सोडावे, राग द्वेषाला सोडावे आणि

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



लोकव्यवहार जो संघात राहून परस्परविनयाचार, वैयावृत्य, धर्मोपदेश वाचणे, शिकवणे हे ही सोडावे, ध्यानात स्थिर व्हावे अशा प्रकारे आत्म्याचे ध्यान करावे.

येथे कोणी विचारले कीं, सर्व कषायाना सोडायला सांगितले आहे त्यात सर्व गर्व, मदादिक आलेच मग पुन्हा त्याना भिन्न भिन्न कां सांगितले? त्याचे समाधान अशा प्रकारे आहे कीं, या सर्व कषाया मध्यें तर गर्भित आहे परंतु विशेष रूपाने सांगण्यासाठी भिन्न भिन्न सांगितले आहेत. कषायाची प्रवृत्ति अशा प्रकारे आहे - जे आपल्यासाठीं अनिष्ट आहे त्याचा क्रोध करतो दुसऱ्याला कमी लेखून मान करतो, कांही कामानिमित्त कपट करतो आहारादिका मध्ये लोभ करतो. हे प्रमाद आहेत ते रस, ऋध्दि आणि सात अशा तीन प्रकारचे आहेत हे जरी मान कषायात गर्भित आहेत तरीही प्रमादाची बहुलता यात आहे. म्हणून भिन्न रूपाने सांगितले आहेत.

मद; हा जाति, लाभ कुल, रूप,तप,बल,विद्या ऐश्वर्य; यांचा होतो. तो करू नये. राग द्वेष प्रीति - अप्रीतिला म्हणतात कोणावर प्रेम करणे कोणावर प्रेम न करणे अशा प्रकारे लक्षणाच्या भेदाने भेद करून सांगितले आहे मोह नांव 'पर' बरोबर ममत्वभावाचे आहे, संसाराचे महत्व तर मुनिनां नाहीच परंतु धर्मानुरागाने शिष्य आदि मध्यें ममत्वाचा व्यवहार आहे तो ही सोडा. अशा प्रकारे भेद विवक्षेने भिन्न भिन्न सांगितला आहे, हे ध्यानाचे घातक भाव आहेत, याना सोडल्याशिवाय ध्यान होत नाही, म्हणून ज्यामुळे ध्यान होईल असे करावे ।।२७।।

पुढे हेच विशेष रूपाने सांगत आहेत:-

**मिच्छत्तं अण्णाणं पावं पुण्णं चएवि तिविहेण ।**
**मोणव्वएण जोई जोयत्थो जोयए अप्पा ।।२८।।**

मिथ्यात्वं अज्ञानं पापं पुण्यं त्यक्त्वा त्रिविधेन ।
मौनव्रतेन योगी योगस्थः द्योतयति आत्मानम् ।।२८।।

<u>अर्थ :</u>— योगी ध्यानी मुनि आहेत. ते मिथ्यात्व, अज्ञान , पाप-पुण्य याना मन, वचन, कायेने, सोडून मौनव्रताच्या द्वारे ध्यानात स्थित होवून आत्म्याचे ध्यान करतात.

<u>भावार्थ :</u>— कांहीं अन्यमति योगी ध्यानी म्हणवतात, म्हणून जैनलिंगी ही कोणत्या द्रव्यलिंगाला धारण करून ध्यानी मानला गेला तर त्याच्या निषेधाच्या निमित्ताने अशा प्रकारे सांगितले आहे कीं, - मिथ्यात्व आणि अज्ञानाला सोडून आत्म्याच्या स्वरूपाला यथार्थ जाणून सम्यक् श्रध्दान ज्यानी केले नाही त्याना मिथ्यात्व, अज्ञान तर लागलेलेच असते तेंव्हा ध्यान कशाचे होईल? तसेच पुण्य पाप दोन्ही बंधरूप आहे त्यात प्रिति अप्रीति राहाते. जो पर्यंत मोक्षाचे स्वरूपच जाणलेले नाही तर ध्यान कोणाचे होईल आणि (सम्यकप्रकार, स्वरूप गुप्त स्वअस्तिमध्यें स्थित होवून) मन वचनाची प्रवृत्ति सोडून मौन केले नाही तर एकाग्रता कशी होईल?

www.vitragvani.com



म्हणून मिथ्यात्व, अज्ञान, पुण्य पाप, मन,वचन, कायेची प्रवृत्ति सोडणे हेच ध्यानाला योग्य म्हटले आहे. अशा प्रकारे आत्म्याचे ध्यान केल्याने मोक्ष मिळतो. ।।२८।।

पुढे ध्यान करणारा मौन धारण करून राहातो तो कोणता विचार करून राहातो हे सांगत आहेत :-

**जं मया दिस्सदे रूवं तं ण जाणादि सव्वहा ।**
**जाणगं दिस्सदे णंतं तम्हा जंपेमि केण हं ॥२९॥**

यत् मया दृश्यते रूपं तत् न जानाति सर्वथा ।
ज्ञायकं दृश्यते न तत् तस्मात् जल्पामि केन अहम् ।।२९।।

<u>अर्थ :</u>— जे रूप मी पाहातो ते रूप मूर्तिक वस्तु आहे, जड आहे, अचेतन आहे सर्व प्रकारे कांहींच जाणत नाही आणि मी ज्ञायक आहे, अमूर्तिक आहे, हे तर जड अचेतन आहे सर्व प्रकारे कांहींही जाणत नाही. म्हणून मी कोणाशी बोलू?

<u>भावार्थ :</u>— जर दुसरा कोणी परस्पर बोलणारा असेल तेंव्हा परस्पर बोलणे संभव आहे परंतु आत्मा तर अमूर्तिक आहे त्याला वचन बोलायचे नाही आणि जे रूपि पुद्गल आहे ते अचेतन आहेत. कोणाला जाणत नाहीत, पाहात नाहीत, म्हणून ध्यान करणारा म्हणतो कीं, मी कोणाबरोबर बोलू? म्हणून माझे मौन आहे ।।२९।।

पुढे म्हणतात कीं, अशा प्रकारे ध्यान केल्याने सर्व कर्माचा आश्रवाचा निराध करून संचित कर्माचा नाश होतो :-

**सव्वासवणिरोहेण कम्मं खवइ संचियं ।**
**जोयत्थो जाणए जोई जिणदेवेण भासियं ॥३०॥**

सर्वास्रवनिरोधेन कर्म क्षपयति संचितम् ।
योगस्थः जानाति योगी जिनदेवेन भाषितम् ।।३०।।

<u>अर्थ:</u>— योग ध्यानात स्थित झालेला योगी मुनि सर्व कर्माच्या आश्रवाचा निरोध करून संवरयुक्त होवून पाहिले बांधलेली कर्मेजी संचयरूप आहेत त्याचा क्षय करतो अशा प्रकारे जिनदेवाने सांगितले आहे ते जाणा.

<u>भावार्थ :</u>— ध्यानामुळें कर्माचा आश्रव थांबतो त्यामुळे आगामी बंध होत नाही आणि पूर्व संचित कर्माची निर्जरा होते तेंव्हा केवलज्ञान उत्पन्न करून मोक्ष प्राप्त होतो, हे आत्म्याच्या ज्ञानाचे महत्त्व आहे. ।।३०।।

पुढे सांगतात कीं, जे व्यवहारात तत्पर आहेत त्यांना हे ध्यान होत नाही. :-

**जो सुत्तो ववहारे सो जोई जग्गए सकज्जम्मि ।**
**जो जग्गदि ववहारे सो सुत्तो अप्पणो कज्जे ॥३१॥**

यः सुप्तः व्यवहारे सः योगी जागर्ति स्वकार्ये ।
यः जागर्ति व्यवहारे सः सुप्तः आत्मनः कार्ये ।।३१।।

अर्थ :— जो योगी ध्यानी मुनि व्यवहारात निद्रेत असतो तो आपल्या स्वरूपाच्या कामात जागतो आणि जो व्यवहारात जागा असतो तो आपल्या आत्मकार्याबद्दल झोपेत असतो.

भावार्थ :— मुनिचे संसारी व्यवहार तर कांहीं ही नाहीत आणि जर असेल तर तो मुनि कसला? तो तर पाखंडी झाला. धर्माचा व्यवहार संघात राहाणे, महाव्रतादिक पाळणे अशा व्यवहारात ही तत्पर नाहीत. सर्व प्रवृत्तिंची निवृत्ति करून ध्यान करतो तो व्यवहारात झोपलेला म्हणवला जातो आणि आपल्या आत्मरूपात लीन होवून पाहातो, जाणतो, तो आपल्या आत्मकार्यात जागतो. परंतु जो या व्यवहारात तत्पर आहे, सावधान आहे, स्वरूपाची दृष्टी नाही तो व्यवहारात जागणारा म्हणवला जातो. ।।३१ ।।

पुढे हे म्हणतात कीं, योगी पूर्वोक्त कथनाला जाणून व्यवहाराला सोडून आत्मकार्य करतो :-

इय जाणिऊण जोई ववहारं चयइ सव्वहा सव्वं ।
झायइ परमप्पाणं जह भणियं जिणवरिंदेहिं ।।३२।।

इति ज्ञात्वा योगी व्यवहारं त्यजति सर्वथा सर्वम् ।
ध्यायति परमात्मानं यथा भणितं जिनवरेन्द्रैः ।।३२।।

अर्थ :— अशा प्रकारे पूर्वोक्त कथनाला जाणून योगी, ध्यानी, मुनि आहे ते सर्व व्यवहाराला सर्व प्रकारे सोडतो आणि परमात्म्याचे ध्यान करतो. - जसे जिनवरेंद्र तीर्थंकर सर्वज्ञदेवाने सांगितले आहे तसेच परमात्म्याचे ध्यान करतो.

भावार्थ:— सर्वथा सर्व व्यवहाराला सोडण्याला सांगितले, त्याचा आशय अशा प्रकारे आहे कीं, लोकव्यवहार तसेच धर्मव्यवहार सर्व सोडल्यानंतर ध्यान होते. म्हणून जसे जिनदेवने म्हटले आहे तसेच परमात्म्याचे ध्यान करणे. अन्यमती परमात्माका स्वरूप अनेक प्रकाराने अन्यथा सांगतात त्याच्या ध्यानाचा ही ते अन्यथा उपदेश करतात त्याचा निषेध केला आहे. जिनदेवने परमात्म्याचे तसेच ध्यानाचे स्वरूप सांगितले आहे तो सत्यार्थ आहे, प्रमाणभूत आहे तसेच योगीश्वर करतात तेच निर्वाण प्राप्त करतात ।।३२ ।।

पुढे जिनदेवने जशी ध्यान अध्ययनाची प्रवृत्ति सांगितली आहे, तसाच उपदेश करतात :-

पंचमहव्वयजुत्तो पंचसु समिदीसु तीसु गुत्तीसु ।
रयणत्तयसंजुत्तो झाणज्झयणं सया कुणह ।।३३।।

पंचमहाव्रतयुक्तः पंचसु समितिषु तिसृषु गुप्तिषु ।
रत्नत्रयसंयुक्तः ध्यानाध्ययनं सदा कुरु ।।३३।।

अर्थ :— आचार्य सांगतात कीं, जे पांच महाव्रतयुक्त आहेत तसेच पांच समिति व तीन गुप्ति युक्त झाले आहेत

आणि सम्यक्‌दर्शन ज्ञान चारित्ररूपी रत्नत्रयाने संयुक्त झाले आहेत असे मुनिजन हो ! तुम्ही ध्यान आणि अध्ययन शास्त्राचा अभ्यास सदा करा !

भावार्थ :— अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, परिग्रहत्याग हे पांच महाव्रत, ईर्या भाषा, एषणा, आदाननिक्षेपण, प्रतिष्ठापना, या पांच समिति आणि मन, वचन, कायेचे, निग्रहरूप तीन गुप्ति असे १३ प्रकारचे चारित्र जिनदेवाने सांगितले आहे. त्याने युक्त होवून निश्चय, व्यवहाररूप, सम्यक्‌दर्शन ज्ञान चारित्ररूप म्हटले आहे. याने युक्त होवून ध्यान आणि अध्ययन करण्याचा उपदेश आहे. यात ही प्रधान तर ध्यानच आहे आणि जर यात मन रमले नाही तर शास्त्राभ्यासात मन लावावे हे ही ध्यानतुल्यच आहे, कारण कीं, शास्त्रात परमात्म्याच्या स्वरूपाचा निर्णय आहे म्हणून हे ध्यानाचेच अंग आहे. ।।३३।।

पुढे सांगतात कीं, जे रत्नत्रयाची आराधना करतात तो जीव आराधकच आहे :—

रयणत्तयमाराहं जीवो आराहओ मुणेयव्वो ।
आराहणाविहाणं तस्स फलं केवलं णाणं ।।३४।।

रत्नत्रयमाराधयन् जीवः आराधकः ज्ञातव्यः ।
आराधनाविधानं तस्य फलं केवलंज्ञानम् ।।३४।।

अर्थ :— रत्नमय सम्यक्‌दर्शन चारित्र्याची आराधना करून जीवाला आराधक जाणणे आणि आराधनेच्या विधानाचे फल केवल ज्ञान आहे.

भावार्थ :— जो सम्यक्‌दर्शन ज्ञान चारित्र्याची आराधना करतो तो केवलज्ञानाला प्राप्त करतो ते जिनमार्गात प्रसिद्ध आहे. ।।३४।।

पुढे म्हणतात कीं, शुद्धात्मा आहे तो केवळज्ञान आहे आणि तो शुद्धात्मा आहे :—

सिद्धो सुद्धो आदा सव्वण्हू सव्वलोयदरसी य ।
सो जिणवरेहिं भणियो जाण तुमं केवलं णाणं ।।३५।।

सिद्धः शुद्धः आत्मा सर्वज्ञः सर्वलोकदर्शी च ।
सः जिनवरैः भणितः जानीहि त्वं केवलं ज्ञानम् ।।३५।।

अर्थ :— आत्मा कसा आहे हे जिनवर देवानी सांगितले आहे, कसा आहे ? सिद्ध आहे. कोणापासून उत्पन्न झाला नाही, स्वयंसिद्ध आहे, शुद्ध आहे, कर्ममलाने रहित आहे, सर्वज्ञ आहे. सर्वलोकालोकाला जाणणारा आहे आणि सर्व दर्शी आहे, सर्वलोकालोकाला पाहतो अशाप्रकारे असणाऱ्या आत्म्याला हे मुने तू केवलज्ञान जाण किंवा त्या केवलज्ञानीला आत्मा समज ! आत्म्यात आणि ज्ञानात कोणताही प्रदेशभेद नाही, गुणगुणीभेद आहे तो गौण आहे, हे आराधनेचे फल मागे सांगितल्याप्रमाणे केवल ज्ञान आहे. ।।३५।।

www.vitragvani.com



पुढे म्हणतात कीं, जो योगी जिनदेवाच्या मताप्रमाणे रत्नत्रयाची आराधना करतो तो आत्म्याचे ध्यान करतो :—

रयणत्तयं पि जोइ आराहइ जो हु जिणवरमएण ।
सो झायदि अप्पाणं परिहरइ परं ण संदेहो ॥३६॥

रत्नत्रयमपि योगी आराधयति यः स्फुटं जिनवरमतेन ।
सः ध्यायति आत्मानं परिहरति परं न सन्देहः ॥३६॥

अर्थ :— जो योगी ध्यानी मुनि जिनेश्वर देवाच्या मताच्या आज्ञेने रत्नत्रय सम्यक्‌दर्शन ज्ञान चारित्र्याची निश्चयाने आराधना करतो तो प्रकटरूपाने आत्म्याचेच ध्यान करतो, कारण कीं, रत्नत्रय आत्म्याचा गुण आहे आणि गुणगुणीमध्यें भेद नाही. रत्नत्रयाची आराधना आहे ती आत्म्याचीच आराधना आहे तीच परद्रव्याला सोडवते यात संदेह नाही. ॥३६॥

भावार्थ :— सरळ सोपा आहे ॥३६॥

आत्म्यामध्ये रत्नत्रय कसे आहेत त्याचे उत्तर आता आचार्य सांगतात :—

जं जाणइ तं णाणं जं पिच्छइ तं च दंसणं णेय ।
तं चारित्तं भणियं परिहारो पुण्णपावाणं ॥३७॥

यत् जानाति तत् ज्ञानं यत्पश्यति तच्च दर्शनं ज्ञेयम् ।
तत् चारित्रं भणितं परिहारः पुण्यपापानाम् ॥३७॥

अर्थ :— जे जाणले जाते ते ज्ञान आहे, जे पाहतो ते दर्शन आहे आणि जो पाप आणि पुण्याचा परिहार आहे ते चारित्र आहे. अशा प्रकारे जाणावे.

भावार्थ :— येथे जाणणारा, पाहाणारा, त्यागणारा त्याला दर्शन, ज्ञान, चारित्र्य युक्त म्हटले आहे. हे तर गुणीचे गुण आहेत. हे कर्ता असत नाहीत म्हणून जाणणे, पाहाणे, त्यागणे याचा कर्ता आत्मा आहे. म्हणून हे तीन आत्माच आहेत. गुणगुणी मध्यें कोणताही प्रदेशभेद असत नाही. अशा प्रकारे रत्नत्रय आहेत. ते आत्माच आहेत असे जाणावे. ॥३७॥

पुढे हाच अर्थ अन्य प्रकारे सांगतात :—

तच्चरुई सम्मत्तं तच्चगहणं च हवइ सण्णाणं ।
चारित्तं परिहारो पयंपियं जिणवरिंदेहिं ॥३८॥

तत्वरुचिः सम्यक्त्वं तत्त्वग्रहणं च भवति संज्ञानम् ।
चारित्रं परिहारः प्रजल्पितं जिनवरेन्द्रैः ॥३८॥

www.vitragvani.com



अर्थ :— तत्त्वरूचि सम्यक्त्व आहे. तत्त्वाचे ग्रहण सम्यग्ज्ञान आहे, परिहार चारित्र्य आहे, अशाप्रकारे जिनवरेंद्र तीर्थंकर सर्वज्ञदेवाने म्हटले आहे.

भावार्थ :— जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष या तत्त्वांचे श्रद्धान रूचि, प्रतिति, सम्यक्‌दर्शन, आहे. यानाच जाणणे सम्यक्‌ज्ञान आहे आणि परद्रव्याच्या परिहारासंबंधी क्रियांची निवृत्ति चारित्र आहे. अशाप्रकारे जिनेश्वर देवाने सांगितले आहे, याना निश्चय व्यवहार नयाने आगमानुसार साधणे. ॥३८॥

पुढे सम्यक्‌दर्शन प्रधान करून सांगत आहे :—

दंसणसुद्धो सुद्धो दंसणसुद्धो लहेइ णिव्वाणं ।
दंसणविहीणपुरिसो न लहइ तं इच्छियं लाहं ॥३९॥

दर्शनशुद्धः शुद्धः दर्शनशुद्धः लभते निर्वाणम् ।
दर्शनविहीनपुरुषः न लभते तं इष्टं लाभम् ॥३९॥

अर्थ :— जो पुरूष दर्शनाने शुद्ध आहे (दृष्टीशुद्ध आहे) तोच शुद्ध आहे कारण कीं, ज्याचे दर्शन शुद्ध आहे तोच निर्वाण प्राप्त करूं शकतो आणि जे पुरूष सम्यक्‌दर्शनाने रहित आहेत ते पुरूष ईप्सित लाभ अर्थात् मोक्षाला प्राप्त करू शकत नाहीत.

भावार्थ :— लोकात प्रसिद्ध आहे कीं, कोणी पुरूष कोणत्या वस्तुची इच्छा करत असतील आणि त्याची रूचि प्रतिति श्रद्धा होत नसेल तर त्याची प्राप्ति होत नाही म्हणून सम्यक्‌दर्शनच निर्वाणाच्या प्राप्तित प्रधान आहे. ॥३९॥

पुढे सांगतात कीं, असा सम्यक्‌दर्शनाला ग्रहण करण्याचा उपदेश सार आहे त्याला जो मानतो ते सम्यक्त्व आहे :—

इय उवएसं सारं जर मरण हरं खु मण्णए जं तु ।
तं सम्मत्तं भणियं सवणाणं सावयाणं पि ॥४०॥

इति उपदेशं सारं जरामरणहरं स्फुटं मन्यते यत्तु ।
तत् सम्यक्त्वं भणितं श्रमणानां श्रावकाणामपि ॥४०॥

अर्थ :— अशा प्रकारे सम्यक्‌दर्शन, ज्ञान, चारित्र्याचा उपदेश सार आहे, जरा आणि मरणाचे हरण करणारे आहे. याला जो मानतो, श्रद्धान करतो तेच सम्यक्‌त्व म्हटले आहे. हे मुनिंसाठी आणि श्रावकासाठी सर्वांसाठीं सांगितले आहे म्हणून सम्यक्त्वपूर्वक ज्ञानचारित्र्याचा अंगिकार करा.

भावार्थ :— जीवाचे जितके भाव आहेत त्यातील सम्यक्‌दर्शन, ज्ञान, चारित्र हे सार आहे, उत्तम आहे, जीवाचे हीत करणारे आहे. आणि त्यात ही सम्यक्‌दर्शन प्रधान आहे. कारण या शिवाय ज्ञान, चारित्र्य ही

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



मिथ्या म्हटले जाते म्हणून सम्यक्‌दर्शनाला प्रधान समजून प्रथम अंगिकार करावा, हा उपदेश मुनि तथा श्रावक सर्वांना आहे. ।।४०।।

पुढे सम्यक्‌ज्ञानाचे स्वरूप सांगतात :—

जीवाजीवविहत्ती जोई जाणेइ जिणवरमएण ।
तं सण्णाणं भणियं अवियत्थं सव्वदरसीहिं ।।४१।।

जीवाजीवविभक्तिं योगी जानाति जिनवरमतेन ।
तत् संज्ञानं भणितं अवितथं सर्वदर्शिभिः ।।४१।।

अर्थ :— जो योगी, मुनि, जीव, अजीव, पदार्थाचे भेद जिनवराच्या मताप्रमाणे जाणतात ते सम्यक्‌ज्ञान आहे असा सर्वदर्शी-सर्वांना पाहाणारे सर्वज्ञदेवाने सांगितले आहेत म्हणून तोच सत्यार्थ आहे, अन्य छद्‌मस्थानी सांगितलेला सत्यार्थ नाही, असत्यार्थ आहे सर्वज्ञानी सांगितलेलाच सत्यार्थ आहे.

भावार्थ :— सर्वज्ञदेवाने जीव, पुद्‌गल, धर्म, अधर्म, आकाश, काल हे जाती अपेक्षेने ६ द्रव्ये सांगितली आहेत (संख्या, अपेक्षा, एक, एक, एक असंख्या आणि अनंतानंत आहेत) यांच्यात जीवाला दर्शनज्ञानमयी चेतना स्वरूप म्हटले आहे. हे सदा अमूर्तिक आहेत. अर्थात् स्पर्श, रस, गंध, वर्णाने रहित आहेत. पुद्‌गलादि पाच द्रव्याना अजीव म्हटले आहे हे अचेतन आहेत जड आहेत पुद्‌गल हे स्पर्श, रस, गंध, वर्ण शद्ब सहित मूर्तिक (रूपी) आहेत. इंद्रियगोचर आहेत. अन्य अमूर्तिक आहेत. आकाशादि चार तर जसे आहेत तसे राहातात. जीव आणि पुद्‌गलयांचे अनादि संबंध आहेत. छद्‌मस्थाचे इंद्रियगोचर, पुद्‌गलस्कंध आहेत त्याना ग्रहण करून जीव रागद्वेष मोहरूप परिणमन करतो. शरिरादिला आपले मानतो तसेच इष्ट अनिष्ट मानून रागद्वेषरूप होतो. यामुळे नवीन पुद्‌गल कर्मरूप होवून बंधाला प्राप्त होतात, हा निमित्त नैमित्तिक भाव आहे, अशाप्रकारे हा जीव अज्ञानी होवून जीव पुद्‌गलाच्या भेदाला न जाणता मिथ्याज्ञानी होतो म्हणून आचार्य म्हणतात कीं, जिनदेवाच्या मते जीव अजीवाचा भेद जाणून सम्यक्‌दर्शनाचे स्वरूप जाणावे. अशा प्रकारे जिनदेवाने सांगितला तोच सत्यार्थ आहे. प्रमाण नयाच्या द्वारे असेच सिद्ध होते. म्हणून जिनदेव सर्वज्ञाने सर्व वस्तुला प्रत्यक्ष पाहून म्हटले आहे—

अन्यमती छद्‌मस्य आहेत, त्यांनी आपल्या बुद्धिला पटेल तशी कल्पना करून म्हटले आहे, ते प्रमाण सिद्ध नाही. यात काही वेदान्ती तर एक ब्रह्ममात्र सांगतात अन्य काही वस्तुभूत नाही, मायारूप अवस्तु आहे असे मानतात. काही नैयायिक, वैशेषिक जीवाला सर्वथा नित्य, सर्वगत म्हणतात, जीवाचे आणि ज्ञान गुणाचे सर्वथा भेद मानतात आणि अन्यकार्यथोडे आहे त्याना ईश्वर करतो, अशाप्रकारे मानतात. काही सांख्यमती पुरूषाला उदासीन चैतन्यस्वरूप मानून सर्वथा अकर्ता मानतात. ज्ञानाला प्रधान धर्म मानतात.

www.vitragvani.com



काही बौद्धमती सर्व वस्तुला क्षणिक मानतात. सर्वथा अनित्य मानतात. त्यांच्यात ही अनेक मतभेद आहेत. काही विज्ञानाचार्य तत्त्वे मानतात काही सर्वथा शून्य मानतात, कोणी आणखी दुसरे प्रकार मानतात. मिमांसक कर्मकांड म्हणजेच तत्त्व मानतात, जीवाला अणूमात्र मानतात तरीही काही परमार्थ नित्य वस्तु नाही इत्यादि मानतात. चार्वाकमती जीवाला तत्त्व मानत नाहीत. पंचमहाभूतानी जीवाची उत्पत्ति मानतात.

इत्यादि बुद्धिकल्पित तत्त्व मानून परस्परात विवाद करतात हे संयुक्तिक आहे. वस्तुचे पूर्णरूप दिसत नाही, तेंव्हा जसे आंधळे हत्ती विषयी विवाद करतात, तसा विवादच होत राहातो. म्हणून जिनदेव सर्वज्ञानीच वस्तुचे पूर्ण स्वरूप पाहिले आहे तेच सांगितले आहे. हे प्रमाण आणि नयाच्या द्वारे अनेकान्तरूप सिद्ध होते. याची चर्चा हेतुवादाच्या जैनांच्या न्यायशास्त्राने जाणली जाते. म्हणून हा उपदेश आहे — जिनमतामध्यें जीवाजीवाचे स्वरूप सत्यार्थ म्हटले आहे. त्याना जाणणे सम्यक्ज्ञान आहे, अशाप्रकारे जाणून जिनदेवाची आज्ञा मानून सम्यक्ज्ञानाचा अंगिकार करावा यामुळे सम्यक्चारित्र्याची प्राप्ति होते असे जाणावे.

पुढे सम्यक्चारित्र्याचे स्वरूप सांगतात :—

जं जाणिऊण जोई परिहारं कुणइ पुण्णपावाणं ।
तं चारित्तं भणियं अवियप्पं कम्मरहिएहिं ।।४२।।

यत् ज्ञात्वा योगी परिहारं करोति पुण्यपापानाम् ।
तत् चारित्रं भणितं अविकल्पं कर्मरहितैः ।।४२।।

<u>अर्थ :</u>— योगी ध्यानी मुनि या पूर्वोक्त जीवाजीवाचे भेदरूप सत्यार्थ सम्यग्ज्ञानाला जाणून पुण्य तसेच पाप या दोन्हीचा परिहार करतो, त्याग करतो, ते चारित्र्य आहे जो निर्विकल्प आहे अर्थात् प्रवृत्तिरूप क्रियेच्या विकल्पाने रहित आहेत. ते चारित्र घातिकर्माने रहित असे सर्वज्ञदेवाने म्हटले आहे.

<u>भावार्थ :</u>— चारित्र निश्चय व्यवहाराच्या भेदाने दोन प्रकारे आहेत, महाव्रत-समिति गुप्तिच्या भेदाने म्हटले आहे तो व्यवहार आहे. यात प्रवृत्तिरूप क्रिया शुभकर्मरूप बंध करते आणि या क्रियेमध्ये जितका अंश निवृत्ति आहे (अर्थात् त्याच वेळी स्वाश्रयरूप आंशिक निश्चय वीतराग भाव आहे) त्याचे फल बंध न ाही, त्याचे फल कर्माची एकदेश निर्जरा आहे. सर्व कर्मानी रहित आपल्या आत्मस्वरूपात लीन होणे ते निश्चय चारित्र आहे. त्याचे फळ कर्माचा नाश हेच आहे. हे पुण्यपापाच्या परिहाररूप निर्विकल्प आहे. पापाचा त्याग तर मुनिना आहेच आणि पुण्य त्याग ही अशाप्रकारे आहे :—

www.vitragvani.com



शुभक्रियेचे फल पुण्यकर्माचा बंध आहे त्याची इच्छा नाही, बंधाचे नाशक उपाय निर्विकल्प निश्चयचारित्र्याचा प्रधान उद्यम आहे. अशाप्रकारे येथे निर्विकल्प अर्थात् पुण्यपापाने रहित असे निश्चय चारित्र्य सांगितले आहे. १४ व्या गुणस्थानाच्या शेवटी पूर्ण चारित्र प्राप्त होते, ते होताच मोक्ष मिळतो असा सिद्धान्त आहे. ।।४२।।

पुढे म्हणतात कीं, अशा प्रकारे रत्नत्रयसहित होवून तप संयम समितिचे पालन करून शुद्धात्म्याचे ध्यान करणारे मुनि निर्वाणाला प्राप्त करतात :—

जो रयणत्तयजुत्तो कुणइ तवं संजदो ससत्तीए ।
सो पावइ परमपयं झायंतो अप्पयं सुद्धं ।।४३।।

यः रत्नत्रययुक्तः करोति तपः संयतः स्वशक्त्या ।
सः प्राप्नोति परमपदं ध्यायन् आत्मानं शुद्धम् ।।४३।।

<u>अर्थ :</u>— जो मुनि रत्नत्रय संयुक्त होवून संयमी बनून आपल्या शक्तिनुसार तप करतो तो शुद्धात्म्याचे ध्यान करत परमपद निर्वाणाला प्राप्त करतो.

<u>भावार्थ :</u>— जे मुनि संयमी पांचमहाव्रत पांच समिति, तीनगुप्ति हे १३ प्रकारचे चारित्र, त्या प्रवृत्तिचाच व्यवहार चारित्र संयम आहे त्याचा अंगीकार करून आणि पूर्वोक्त प्रकारे निश्चय चारित्र्याने युक्त होवून आपल्या शक्तिनुसार उपवास कायाक्लेशादि बाह्यतप करतो ते मुनि अंतरंग तप ध्यानाच्या द्वारे शुद्ध आत्म्याचे मध्ये एकाग्र चित्त करून ध्यान करत निर्वाणाला प्राप्त होतात. ।।४३।।

(नोंद – जे ६ व्या गुणस्थानाला योग्य स्वाश्रयरूप निश्चयरत्नत्रय सहित आहे त्याला व्यवहार संयम - व्रतादिला व्यवहार चारित्र मानले आहे.)

पुढे म्हणतात कीं, ध्यानी मुनि असे होवून परमात्म्याचे ध्यान करतात :—

तिहि तिण्णि धरवि णिच्चं तियरहिओ तह तिएण परियरिओ ।
दोदोसविप्पमुक्को परमप्पा झायए जोई ।।४४।।

त्रिभिः त्रीन् धृत्वा नित्यं त्रिकरहितः तथा त्रिकेण परिकरितः ।
द्विदोषविप्रमुक्तः परमात्मानं ध्यायते योगी ।।४४।।

<u>अर्थ :</u>— 'त्रिभिः' मन, वचन, कायेने, 'त्रीन्' वर्षा, शीत उष्ण तीन कालयोगाना धारणकरून 'त्रिकरहित:' माया, मिथ्या, निदान तीन शल्याने रहित होवून त्रिकेण परिकरित: दर्शन, ज्ञान, चारित्र्याने मंडित होवून आणि 'द्विदोषविप्रमुक्त:' दोन दोष अर्थात् राग-द्वेष याने रहित होवून येगी ध्यानी मुनि आहे. तो परमात्मा अर्थात् सर्वकर्म रहित शुद्ध परमात्मा त्याचे ध्यान करतो.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

भावार्थ :— मन, वचन, कायेचे तीन कालयोग धारण करून परमात्म्याचे ध्यान करणे अशा प्रकारे कष्टात दृढ राहिला तर ज्ञात होते कीं, यामुळें ध्यानाची सिद्धि आहे. कष्ट पडल्यानंतर चलायमान झाला तर ध्यानाची सिद्धि कोठली ? कोणत्याही प्रकारचे चित्तात्त शल्य राहिल्याने चित्त एकाग्र होत नाही तर ध्यान कसे हाईल ? म्हणून शल्य रहित म्हटले आहे, श्रद्धान, ज्ञान, आचरण यथार्थ झाले नाही तर ध्यान कसे होईल ? म्हणून दर्शन, ज्ञान, चारित्र, मंडित म्हटले आहे आणि राग-द्वेष-इष्ट-अनिष्ट बुद्धि राहिली तर ध्यान कसे होईल ? म्हणून परमात्म्याचे ध्यान करा ते असे होवून करा. हे तात्पर्य आहे. ।।४४।।

पुढे सांगतात कीं, जो अशा प्रकारे होतो तो उत्तम सुख मिळवतो :—

**मयमायकोहरहिओ लोहेण विवज्जिओ य जो जीवो ।**
**णिम्मलसहावजुत्तो सो पावइ उत्तमं सोक्खं ।।४५।।**

मदमायाक्रोधरहितः लोभेन विवर्जितश्च यः जीवः ।
निर्मलस्वभावयुक्तः सः प्राप्नोति उत्तमं सौख्यम् ।।४५।।

अर्थ :— जो जीव मद, माया, क्रोध यांच्या रहित आहे आणि लोभाने विशेषरूपाने रहित आहे तो जीव निर्मल विशुद्ध स्वभावयुक्त होवून उत्तम सुख प्राप्त करून घेतो.

भावार्थ :— लोकात असे आहे कीं, मद अर्थात् अती मानी आणि माया कपट आणि क्रोध याने रहित असाल आणि लोभाने विशेषरहित असाल तो सुखी होतो तीव्र कषायी, अतिआकुलतायुक्त होवून निरंतर दु:खी होतो. म्हणून ही रीत मोक्ष मार्गात ही लक्षात ठेवावी. जो क्रोध, मान, माया, लोभ चार कषायाने रहित होतो तेंव्हा निर्मल भाव होतात आणि तेंव्हा ही यथाख्यात चारित्र प्राप्त करून सुख मिळवतो. ।।४५।।

पुढे म्हणतात कीं, जो विषय कषायात आसक्त आहे, परमात्म्याच्या भावनेने रहित आहे, रौद्रपरिणामी आहे तो जिनमत पराङमुख आहे. म्हणून तो मोक्षाच्या सुखाला प्राप्त करत नाही :—

**विसयकसाएहि जुदो रुद्दो परमप्पभावरहियमणो ।**
**सो ण लहइ सिद्धिसुहं जिणमुद्दपरम्मुहो जीवो ।।४६।।**

विषयकषायैः युक्तः रुद्रः परमात्मभावरहितमनाः ।
सः न लभते सिद्धिसुखं जिनमुद्रापराङ्मुखः जीवः ।।४६।।

अर्थ :— जो जीव विषय-कषायाने युक्त आहे, रौद्र परिणामी आहे, हिंसादिक विषयकषायादिक पापामध्ये हर्षसहित प्रवृत्ति करतो आणि ज्याचे चित्त परमात्म्याच्या भावनेने रहित आहे असा जीव जिनमुद्रेपासून पराङमुख आहे तो असे सिद्धिसुख मोक्ष सुख प्राप्त करू शकत नाही.

भावार्थ :— जिनमताप्रमाणे असा उपदेश आहे कीं, जो हिंसादिक पापासून विरक्त आहे, विषयकषायात आसक्त नाही, आणि परमात्म्याचे स्वरूप जाणून त्या भावनेसहित असणारा जीव मोक्षाला प्राप्त करून घेवू

www.vitragvani.com



शकतो. म्हणून जिनमताच्या मुद्रे पासून जो पराङ्गमुख आहे त्याला मोक्ष कसा मिळणार ? तो तर संसारातच भ्रमण करतो. येथे रूद्राचे विशेषण दिले आहे. त्याचा असा ही आशय आहे कीं, रूद्र ११ असतात. हे विषय-कषायात आसक्त होवून जिनमुद्रे पासून भ्रष्ट होतात. त्याना मोक्ष मिळत नाही यांची कथा पुराणातून जाणावी. ॥४६॥

पुढे म्हणतात कीं, जिन मुद्रेने मोक्ष होतो परंतु हे ज्याना पटत नाही ते संसारातच राहातात.

जिणमुद्द सिद्धिसुहं हवेइ णियमेण जिणवरुद्दिट्ठा ।
सिविणे वि ण रुच्चइ पुण जीवा अच्छंति भवगहणे ॥४७॥

जिनमुद्रा सिद्धिसुखं भवति नियमेन जिनवरोद्दिष्टा ।
स्वप्नेऽपि न रोचते पुनः जीवाः तिष्ठंति भवगहने ॥४७॥

अर्थ :— जिन भगवंताच्या द्वारे सांगितलेली जिनमुद्रा आहे तेच सिद्धि सुख आहे मुक्तिसुख ही आहे, हा कारणात कार्याचा उपचार जाणावा. जिनमुद्रा मोक्षाचे कारण आहे मोक्षसुख त्याचे कार्य आहे. अशी जिनमुद्रा जिनभगवंताने जशी सांगितली तशीच आहे. तर अशी जिनमुद्रा ज्या जीवाला दूर ठेवावी वाटते स्वप्नातही ती आवडत नाही त्याचे स्वप्न आले तरी आवडत नाही तर तो जीव संसाररूपी गहन वनात राहातो. मोक्षाचे सुख प्राप्त करून घेवू शकत नाही. संसारातच राहातो. ॥४७॥

पुढे म्हणतात कीं, परमात्म्याचे ध्यान करतो तो योगी लोभ रहित होवून नविन कर्माचा आस्त्रव करत नाही :—

परमप्पय झायंतो जोई मुच्चेइ मलदलोहेण ।
णादियदि णवं कम्मं णिद्दिट्ठं जिणवरिंदेहिं ॥४८॥

परमात्मानं ध्यायन् योगी मुच्यते मलदलोभेन ।
नाद्रियते नवं कर्म निर्दिष्टं जिनवरेन्द्रैः ॥४८॥

अर्थ :— जो योगी ध्यानी परमात्म्याचे ध्यान करत राहातो तो मल देणारा लोभ कषायातून सुटतो. त्याला लोभ मल लागत नाही त्यामुळे नविनकर्माचा आस्त्रव त्याला होत नाही हे जिनवरेंद्र तीर्थंकर सर्वज्ञदेवाने सांगितले आहे.

भावार्थ :— मुनि असून ही परजन्मसंबंधी प्राप्तिचा लोभ करून निदान केले तर त्याला परमात्म्याचे ध्यान होत नाही. म्हणून जो परमात्म्याचे ध्यान करतो त्याला या लोक परलोकासंबंधी परद्रव्याचा काहींही लोभ होत नाही. म्हणून त्याला नविन कर्माचा आस्त्रव होत नाही असे जिनदेवाने म्हटले आहे. हा लोभ कषाय असा आहे कीं, १० व्या गुणस्थानापर्यंत पोहोचल्यानंतर ही अव्यक्त होवून आत्म्याला मल लागतो. म्हणून त्याला

काटणेच योग्य आहे किंवा जो पर्यंत मोक्षाची इच्छा आणि त्याचा लोभ राहतो तो पर्यंत मोक्ष मिळत नाही. म्हणून लोभाचा अत्यन्त निषेध सांगितला आहे. ।।४८।।

पुढे सांगतात कीं, जो असा निर्लोभी बनून दृढ सम्यक्त्व ज्ञान चारित्रवान होवून परमात्म्याचे ध्यान करतो तो परमपद प्राप्त करतो.

होऊण दिढचरित्तो दिढसम्मत्तेण भावियमईओ।
झायंतो अप्पाणं परमपयं पावए जोई ॥ ४९ ॥

भूत्वा दृढचरित्रः दृढसम्यक्त्वेन भावितमतिः ।
ध्यायन्नात्मानं परमपदं प्राप्नोति योगी ॥ ४९ ॥

अर्थ :— पूर्वोक्त प्रकारे ज्याची मति दृढ सम्यक्त्वाने भावित आहे असे योगी ध्यानी मुनि दृढ चारित्रवान होवून आत्म्याचे ध्यान करत परमपद अर्थात् परमात्मपदाला प्राप्त करतो.

भावार्थ :— सम्यक्दर्शन, ज्ञान चारित्ररूप दृढ होवून परिषह आल्यानंतर ही चलायमान होत नाही अशाप्रकारे आत्म्याचे ध्यान करतो, तो परमपदाला प्राप्त करतो असे तात्पर्य आहे. ।।४८।।

पुढे दर्शन, ज्ञान, चारित्राने निर्वाण होते असे सांगत आले ते दर्शन ज्ञान तर जीवाचे स्वरूप आहे, ते जाणा. परंतु चारित्र काय आहे? अशा शंकेचे उत्तर सांगतात :—

चरणं हवइ सधम्मो धम्मो सो हवइ अप्पसमभावो।
सो रागरोसरहिओ जीवस्स अणण्णपरिणामो ।।५०।।

चरणं भवति स्वधर्मः धर्मः सः भवति आत्मसमभावः ।
स रागरोषरहितः जीवस्य अनन्यपरिणामः ।।५०।।

अर्थ :— स्वधर्म अर्थात् आत्म्याचा धर्म आहे ते चरण अर्थात् चारित्र आहे. धर्म आहे, तो आत्मस्वभाव आहे, सर्व जीवात समानभाव आहे. जो आपलाधर्म आहे, तो सर्व जीवात आहे किंवा सर्व जीवाला आपल्या समान मानायचे आहे आणि जो आत्मस्वभावाने ही (स्वाश्रयाच्याद्वारे) राग द्वेषरहित आहे, कोणाविषयी इष्ट, अनिष्ट बुद्धि नाही असे चारित्र आहे. जसे जीवाचे दर्शन, ज्ञान आहे तसेच अनन्य परिणाम आहेत, जीवाचाच भाव आहे.

भावार्थ :— चारित्र आहे ते ज्ञानात राग द्वेष रहित निराकुलतारूप स्थिरताभाव आहे. तो जीवाचा च अभेदरूप परिणाम आहे, दुसरी कोणती वस्तु नाही ।।५०।।

www.vitragvani.com



पुढे जीवाच्या परिणामाच्या स्वच्छतेला दृष्टांतपूर्वक सांगत आहेत :—

जह फलिहमणि विसुद्धो परदव्वजुदो हवेइ अण्णं सो।
तह रागादिविजुत्तो जीवो हवदि हु अणण्णविहो ।।५१।।

यथा स्फटिकमणिः विशुद्धः परद्रव्ययुतः भवत्यन्यः सः ।
तथा रागादिवियुक्तः जीवः भवति स्फुटमन्यान्यविधः ।।५१।।

अर्थ :— जसा स्फटिकमणि विशुद्ध आहे, निर्मल आहे, उज्ज्वल आहे ते परद्रव्य जे पीत, रक्त, हरित, पुष्पादिने युक्त झाल्याने दुसऱ्या (अन्यसा) सारखा दिसतो. पीतादिवर्णमयी दिसतो. तसेच जीव विशुद्ध आहे स्वच्छस्वभाव आहे परंतु हे (अनित्य पर्यायात आपल्या चुकीमुळें 'स्व' पासून च्युत होतो.) रागाद्वेषादिक भावाने युक्त होवून अन्य अन्य प्रकार होतात ते दिसतात हे स्पष्ट आहे.

भावार्थ :— येथे असे जाणावे कीं, रागादि विकार आहेत ते पुद्गलाचे आहेत आणि हे जीवाच्या ज्ञानात येवून झळकतात त्यावरून ते अशा प्रकारे जाणतात कीं हे भाव माझेच आहेत, जो पर्यंत यांचे भेदज्ञान होत नाही तो पर्यंत जीव अन्य, अन्य प्रकाराने अनुभवाला येतो. येथे स्फटिक मण्याचा दृष्टांत दिला आहे. त्याला अन्यद्रव्य पुष्पादिकाचा रंग लागतो तेंव्हा निराळा दिसतो. अशाप्रकारे जीवाच्या स्वच्छभावाची विचित्रता जाणावी. ।।५१ ।।

म्हणून पुढे म्हणतात कीं, जो पर्यंत मुनिना राग द्वेषाचा अंश असतो तो पर्यंत सम्यक्‌दर्शनाला धारण करूनही असा असतो :—

देव गुरुम्मिय भत्तो साहम्मिय संजदेसु अणुरत्तो ।
सम्मत्तमुव्वहंतो झाणरओ होइ जोई सो ।।५२।।

देवे गुरौ च भक्तः साधर्मिके च संयतेषु अनुरक्तः ।
सम्यक्त्वमुद्वहन् ध्यानरतः भवति योगी सः ।।५२।।

अर्थ :— जो योगी ध्यानी मुनि सम्यक्त्वला धारण करतात आणि जो पर्यंत यथाख्यात चारित्र्याला प्राप्त होत नाहीत. तो पर्यंत अरहंत, सिद्ध, देवात आणि शिक्षा, दीक्षा, देणाऱ्या गुरूमध्यें तर भक्तियुक्त होतातच. यांची भक्ती विनय सहित असते आणि अन्य संयमी मुनि आपल्या समान धर्मा सहित आहेत त्यांच्यातही अनुरक्त असतात, अनुरागसहित असतात तेच मुनि ध्यानात प्रीतिवान होतात आणि मुनि होवून ही देव-गुरू-साधर्मिमध्यें भक्ति व अनुराग सहित नसतील तर त्याना ध्यानात रूचिवान म्हणत नाहीत कारण कीं, ध्यान करणाऱ्याना, ध्यानवाल्याशी रूचि, प्रीति होते. ध्यानवाले आवडले नाहीत तर ज्ञात होते कीं, त्याला ध्यान ही आवडत नाही. असे जाणावे. ।।५२ ।।

www.vitragvani.com



पुढे म्हणतात कीं, ध्यान सम्यक्ज्ञानीला होते तोच तसेच तप करून कर्मांचा क्षय करते :—

**उग्गतवेणण्णाणी जं कम्मं खवदि भवहि बहुएहिं ।**
**तं णाणी तिहि गुत्तो खवेइ अंतोमुहुत्तेण ।।५३।।**

उग्रतपसाऽज्ञानी यत् कर्म क्षपयति भवैर्बहुकैः ।
तज्ज्ञानी त्रिभिः गुप्तः क्षपयति अन्तर्मुहूर्तेन ।।५३।।

अर्थ :— अज्ञानी तीव्र तपाच्या द्वारे बऱ्याच भवात जितक्या कर्मांचा क्षय करतात तितक्या कर्मांचा ज्ञानी मुनि तीन गुप्ति सहित होवून अंतर्मुहुर्तात क्षय करतात.

भावार्थ :— जे ज्ञानाचे सामर्थ्य आहे ते तीव्र तपाचे ही सामर्थ्य नाही कारण कीं, असे आहे कीं, — अज्ञानी अनेक कष्टाला सहन करून तीव्र तपाला करून करोडो भवात जितक्या कर्मांचा क्षय करतो तो आत्मभावनेसहित ज्ञानी, मुनि, तितक्या कर्मांचा अंतर्मुहुर्तात क्षय करतात, हे ज्ञानाचे सामर्थ्य आहे. ।।५३ ।।

पुढे म्हणतात कीं, जे इष्ट वस्तुच्या संबंधाने परद्रव्यात रागद्वेष करतो तो त्या भावाने अज्ञानी होतो. ज्ञानी याच्या उलट आहे :—

**सुहजोएण सुभावं परदव्वे कुणइ रागदो साहू ।**
**सो तेण हु अण्णाणी णाणी एत्तो हु विवरीओ ।।५४।।**

शुभयोगेन सुभावं परद्रव्ये करोति रागतः साधुः ।
सः तेन तु अज्ञानी ज्ञानी एतस्मात्तु विपरीतः ।।५४।।

अर्थ :— शुभ योग अर्थात् आपल्या इष्ट वस्तुच्या संबंधाने परद्रव्यात सुभाव अर्थात् प्रीतिभाव करतो, तो प्रकट राग द्वेष आहे. इष्ट गोष्टीत राग होतो तेंव्हा अनिष्ट वस्तुत आणि जो या पेक्षा उलट आहे परद्रव्यात राग द्वेष करत नाही तो ज्ञानी आहे.

भावार्थ :— ज्ञानी सम्यक्दृष्टि मुनिला परद्रव्यात राग द्वेष नाही कारण कीं, राग त्याला म्हणतात – जो परद्रव्यात सर्वथा इष्ट मानून राग करतो तसेच अनिष्ट मानून द्वेष करतो, परंतु सम्यक्ज्ञानी परद्रव्यात इष्ट अनिष्टाची कल्पना ही करत नाही तर राग द्वेष कसा होईल ? चारित्र मोहाच्या उदयाने वश होवून थोडा धर्मराग होतो त्याला ही रोग समजतात, भला समजत नाहीत, तर दुसऱ्याशी कसा राग होवूं शकेल ? परद्रव्याशी राग द्वेष करतो तो अज्ञानी आहे असे जाणावे ।।५४ ।।

पुढे म्हणतात कीं, जसा परद्रव्यात रागभाव होतो तसे मोक्षाचे निमित्त ही राग झाला तर तो राग ही आस्त्रवाचे कारण आहे त्याला ही ज्ञानी करत नाही :—

www.vitragvani.com



आसवहेदू य तहा भावं मोक्खस्स कारणं हवदि ।
सो तेण हु अण्णाणी आदसहावा हु विवरीओ ।।५५।।

आस्रवहेतुश्च तथा भावः मोक्षस्य कारणं भवति ।
सः तेन तु अज्ञानी आत्मस्वभावात्तु विपरीतः ।।५५।।

अर्थ :— जसे परद्रव्यात रागाला कर्मबंधाचे पाहिले कारण म्हटले आहे तसेच राग भाव जर मोक्षाचे निमित्त ही असेल तर आस्त्रवाचेच कारण आहे, कर्मबंधच करतो; या कारणाने जो मोक्षाला परद्रव्याप्रमाणे इष्ट मानून तसाच रागभाव करतो तो जीव मुनि ही अज्ञानी आहेत. कारण कीं, तो आत्मस्वभावाने विपरीत आहे त्याने आत्मस्वभावाला जाणले नाही.

भावार्थ :— मोक्ष तर सर्व कर्मानें रहित आपलाच स्वभाव आहे, आपल्याला सर्व कर्मापासून रहित व्हायचे आहे म्हणून हा ही रागभाव ज्ञानीला होत नाही जर चारित्रमोहाच्या उदयाला राग असेल तर त्या रागाला ही बंधाचे कारण जाणून रोगाप्रमाणे सोडू इच्छित असेल तर तो ज्ञानी आहेच आणि या रागभावाला भले समजून आपलेसे करत असेल तर तो अज्ञानी आहे. आत्म्याचा स्वभाव सर्व रागादिने रहित आहे ते यानी जाणले नाही, अशा प्रकारे रागभावाला मोक्षाचे कारण आणि चांगले समजून करतात त्याचा निषेध आहे.

पुढे म्हणतात कीं, जो कर्म करण्यानेच सिद्धि मानतो त्याने आत्मस्वभावाला जाणले नाही तो अज्ञानी आहे जिनमताच्या प्रतिकूल आहे :—

जो कम्मजादमइओ सहावणाणस्स खंडदूसयरो ।
सो तेण दु अण्णाणी जिणसासणदूसगो भणिदो ।।५६।।

यः कर्मजातमतिकः स्वभावज्ञानस्य खंडदूषणकरः ।
सः तेन तु अज्ञानी जिनशासनदूषकः भणितः ।।५६।।

अर्थ :— ज्याची बुद्धि कर्मातच उत्पन्न होते असा पुरूष स्वभावज्ञान जे केवलज्ञान त्याला खंडरूप दूषण करणारा आहे, इंद्रियज्ञान खंडखंड रूप आहे, आपल्या आपल्या विषयाला जाणतो जो जीव इतकेच ज्ञानाला मानतो या कारणाने असे मानणारा अज्ञानी आहे, जिनमताला दूषण देतो (आपल्यात महादोष निर्माण करतो)

भावार्थ :— मिमांसक मतवाला कर्मवादी आहे, सर्वज्ञाला मानत नाही, इंद्रियज्ञानालाच ज्ञान मानतो, केवलज्ञानीला मानत नाही यांचा येथे निषेध केला आहे, कारण कीं, जिनमतामध्ये आत्म्याचा स्वभाव सर्वांना जाणणारा केवलज्ञानरूप म्हटला आहे. परंतु तो कर्माच्या निमित्ताने आच्छादित होवून इंद्रियांच्या द्वारे क्षयोपशमाच्या निमित्ताने खंडरूप झाला, तुकड्या, तुकड्याने विषयाला जाणतो (जिनबलद्वारे) कर्माचा नाश झाल्यानंतर केवलज्ञान प्रकट होते तेंव्हा आत्मा सर्वज्ञ होतो. अशाप्रकारे मिमांसकमतवाला

मानत नाही म्हणून तो अज्ञानी आहे. जिनमतांपेक्षा प्रतिकुल आहे, कर्ममात्रेमध्यें त्यांची बुद्धि गतिमान होत आहे. असे मानणारे ही आणखी आहेत. असे जाणावे ।।५६।।

पुढे म्हणतात कीं, जे ज्ञान-चारित्र रहित आहे आणि तप सम्यक्त्व रहित आहे तसेच अन्य क्रिया ही भावपूर्वक होत नसतील तर अशाप्रकारे केवळ लिंग वेशाने काय सुख मिळणार आहे ? अर्थात् काहीच नाही :—

**णाणं चरित्तहीणं दंसणहीणं तवेहिं संजुत्तं ।**
**अण्णेसु भावरहियं लिंगग्गहणेण किं सोक्खं ।।५७।।**

ज्ञानं चारित्रहीनं दर्शनहीनं तपोभिः संयुक्तम् ।
अन्येषु भावरहितं लिंगग्रहणेन किं सौख्यम् ।।५७।।

<u>अर्थ :</u>— जेथे ज्ञान चारित्र रहित आहे, तपयुक्त ही आहे परंतु ते दर्शन अर्थात् सम्यक्त्वाने रहित आहे, अन्य आवश्यक क्रिया आहेत परंतु त्यात ही शुद्धभाव नाही, अशा प्रकारे लिंग-भेष ग्रहण करण्यात काय सुख आहे ?

<u>भावार्थ :</u>— कोणी मुनि वेषाने मुनि झाला आणि शास्त्र पठन ही करत असेल त्याला म्हणतात कीं, – शास्त्र वाचून ज्ञान मिळवले परंतु निश्चय चारित्र जो शुद्धात्म्याचा अनुभवरूप तसेच बाह्य चारित्र निर्दोष केले नाही, तपाचा क्लेश बराच केला. सम्यक्त्व भावना झाली नाही आणि आवश्यक आदि बाह्य क्रिया केल्या परंतु भाव शुद्ध नसतील तर अशा वेषाने फक्त क्लेशच होईल, थोडे ही शांतभावरूप सुख तर होणारच नाही आणि हा वेष परलोकीच्या सुखालाही कारण होत नाही; म्हणून सम्यक्त्वपूर्वक वेष (– जिनलिंग) धारण करणे श्रेष्ठ आहे. ।।५७।।

पुढे सांख्यमती आदिंच्या आशयाचा निषेध करतात :—

**अच्चेयणं पि चेदा जो मण्णइ सो हवेइ अण्णाणी ।**
**सो पुण णाणी भणिओ जो मण्णइ चेयणे चेदा ।।५८।।**

अचेतनेपि चेतनं यः मन्यते सः भवति अज्ञानी ।
सः पुनः ज्ञानी भणितः यः मन्यते चेतने चेतनम् ।।५८।।

<u>अर्थ :</u>— जे अचेतनाला चेतन मानतो तो अज्ञानी आहे आणि जो चेतनेतच चेतनेला मानतो त्याला ज्ञानी म्हटले आहे.

<u>भावार्थ :</u>— सांख्यमती असे म्हणतात कीं, पुरूष तर उदासीन चेतनारूप नित्य आहे. आणि हे ज्ञान आहे, तो प्रधान धर्म आहे. यांच्यामते पुरूषाला उदासीन चेतनारूप मानले आहे. म्हणून ज्ञानाशिवाय तर जो जड़च

www.vitragvani.com



होतो. ज्ञानाशिवाय चेतना कशी ? ज्ञानाला प्रधान धर्म मानले आहे. आणि प्रधान जड़ मानले आहे तेंव्हा अचेतनेत चेतना मानली तर अज्ञानीच झाला.

नैयायिक, वैशेषिक, मतवाले गुण-गुर्णीचे सर्वथा भेद मानतात तेंव्हा त्यानी चेतना गुणाला जीवापासून भिन्न मानले तर जीव अचेतनच राहील. अशाप्रकारे अचेतनात चेतना मानली. भूतवादी चार्वाक – भूत पृथ्वी आदिने चेतनतेची उत्पत्ति मानतो. भूत तर जड़ आहे त्यात चेतनता कशी उपजते ? इत्यादि अन्य ही काही मानतात ते सर्व अज्ञानी आहेत म्हणून चेतनेतच चेतन मानणारा तो ज्ञानी आहे. ।।५८।।

पुढे म्हणतात कीं, तपरहित ज्ञान आणि ज्ञान रहित तप हे दोन्ही ही अकार्य आहे, दोन्ही संयुक्त झाल्यानंतरच निर्वाण आहे :—

तवरहियं जं णाणं णाणविजुत्तो तवो वि अकयत्थो।
तम्हा णाणतवेणं संजुत्तो लहइ णिव्वाणं ।।५९।।

तपोरहितं यत् ज्ञानं ज्ञानवियुक्तं तपः अपि अकृतार्थम् ।
तस्मात् ज्ञानतपसा संयुक्तः लभते निर्वाणम् ।।५९।।

<u>अर्थ :</u>— जे ज्ञान तपरहित आहे आणि जे तप आहे ते ही ज्ञान रहित आहे. तर दोन्ही ही अकार्य आहे. म्हणून ज्ञान, तप, संयुक्त झाल्यावरच निर्वाणाला प्राप्त करतो.

<u>भावार्थ :</u>— अन्यमती सांख्यादिक ज्ञानचर्चा तर बरेचजण करतात आणि म्हणतात कीं, ज्ञानानेच मुक्ती आहे, आणि तप करत नाही, विषय कषायाला प्रधान धर्म मानून स्वच्छंद प्रवर्तन करतात. कित्येक ज्ञानाला निष्फल मानून त्याला यथार्थ जाणत नाहीत आणि तप क्लेशादिने सिद्धि मानून ते करण्यात तत्पर राहातात. आचार्य म्हणतात कीं, हे दोन्ही ही अज्ञानी आहेत जे ज्ञान सहित तप करतात ते ज्ञानी आहेत तेच मोक्षाला प्राप्त करतात, हा अनेकान्तस्वरूप जिनमताचा उपदेश आहे ।।५९ ।।

पुढे याच अर्थाला उदाहरणाने दृढ करत आहेत :—

धुवसिद्धी तित्थयरो चउणाणजुदो करेइ तवयरणं ।
णाऊण धुवं कुज्जा तवयरणं णाणजुत्तो वि ।।६०।।

ध्रुवसिद्धिस्तीर्थंकरः चतुर्ज्ञानयुतः करोति तपश्चरणम् ।
ज्ञात्वा ध्रुवं कुर्यात् तपश्चरणं ज्ञानयुक्तः अपि ।।६०।।

<u>अर्थ :</u>— आचार्य म्हणतात कीं, पहा....... ज्याला नियमाने मोक्ष होतो...... आणि जे चार ज्ञान, मति, श्रुत, अवधि आणि मन: पर्याय याने युक्त आहे असे तीर्थंकर ही तपश्चरण करतात, अशाप्रकारे निश्चयाने जाणून

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

ज्ञानयुक्त होवून ही तप करणे योग्य आहे. (तप-मुनित्व, सम्यक्‌दर्शन-ज्ञान-चारित्र्याच्या एकतेला तप म्हटले आहे.)

भावार्थ :— तीर्थंकर मति-श्रुत-अवधि या तीन ज्ञानासहित तर जन्म घेतात आणि दीक्षा घेताच मन:पर्याय ज्ञान उत्पन्न होते. मोक्ष त्याना नियमाने होतो तरी ही ते तप करतात, म्हणून असे जाणून ज्ञान होत असून ही तप करण्यात तत्पर होणे केवळ ज्ञानाने मुक्ती मानू नये ।।६०।।

पुढे जे बाह्य लिंग सहित आहेत आणि अभ्यंतर लिंग रहित आहेत ते स्वरूपाचरण चारित्र्याने भ्रष्ट होवून मोक्षमार्गाचा विनाश करणारा आहे. म्हणून सामान्यरूपाने म्हणतात :—

बाहिरलिंगेण जुदो अब्भंतरलिंगरहियपरियम्मो ।
सो सगचरित्तभट्ठो मोक्खपहविणासगो साहू ।।६१।।

बाह्यलिंगेन युतः अभ्यंतरलिंगरहितपरिकर्म्मा ।
सः स्वकचारित्रभ्रष्टः मोक्षपथविनाशकः साधुः ।।६१।।

अर्थ :— जो जीव बाह्य लिंग -भेष सहित आहे आणि अभ्यंतर लिंग जे परद्रव्याने सर्वरागादिक ममत्वभाव रहित अशा आत्मानुभावाने रहित आहे तर तो स्वक-चारित्र अर्थात् आपल्या आत्मस्वरूपाचे आचरण-चारित्राने भ्रष्ट आहे, परिकर्म अर्थात् बाह्यत: नग्नता, ब्रह्मचर्यादि शरिसंस्काराने परिवर्तनवान द्रव्यलिंगी झाल्याने ही ते स्व चारित्रपासून भ्रष्ट झाल्याने मोक्षमार्गाचा विनाश करणारे आहे. ।।६१ ।।

(म्हणून मुनि साधुला शुद्धभावाला जाणून निज शुद्ध बुद्ध एकस्वभावी आत्मतत्त्वात नित्य भावना (एकाग्रता) केली पाहिजे.) (श्रुत सागरी टीकेवरून)

भावार्थ :— हे संक्षेपाने जाणावे कीं, जे बाह्यलिंग संयुक्त आहे आणि अभ्यंतर अर्थात् भावलिंग रहित आहे. तो स्वरूपाचरण चारित्राने भ्रष्ट झालेला मोक्षमार्गाचा नाश करणारा आहे. ।।६१ ।।

पुढे म्हणतात कीं, – जे सुखाने भावित ज्ञान आहे ते दु:ख आल्यावर नष्ट होतात म्हणून तपश्चरणसहित ज्ञानाची भक्ती करा :—

सुहेण भाविदं णाणं दुहे जादे विणस्सदि ।
तम्हा जहाबलं जोई अप्पा दुक्खेहि भावए ।।६२।।

सुखेन भावितं ज्ञानं दुःखे जाते विनश्यति ।
तस्मात् यथाबलं योगी आत्मानं दुःखैः भावयेत् ।।६२।।

अर्थ :— सुखाने भरलेले ज्ञान आहे, ते उपसर्ग, परिषहादिने दु:ख उत्पन्न होताच नष्ट होते, म्हणून हा उपदेश आहे कीं, जो योगी ध्यानी मुनि आहेत त्यानी तपश्चरणादिच्या कष्टासहित आत्म्याची भक्ती करावी.

(अर्थात् बाह्यत: जरा ही अनुकूल, प्रतिकुल न मानता निजआत्म्यातच एकाग्रतारूपी भावना करावी ज्यामुळे आत्मशक्ती आणि आत्मिक आनंदाची संवेदना वाढतच जाते.)

भावार्थ :— तपश्चरणाचे कष्ट अंगिकार करून ज्ञानाची भक्ती करा. तर परिषह आल्यानंतर ज्ञानभावने पासून च्युत होवू नये म्हणून शक्तीनुसार दु:ख सहन करत ज्ञानाची पुजा करावी. सुखात असतानाच आवडते तर दु:ख आल्यानंतर व्याकुळ होतात तेंव्हा ज्ञानभावना राहात नाही. म्हणून हा उपदेश आहे. ॥६२॥

पुढे म्हणतात कीं, आहार, आसन, निद्रा, याना जिंकून आत्म्याचे ध्यान करणे :—

**आहारासणणिद्दाजयं च काऊण जिणवरमएण ।**
**झायव्वो णियअप्पा णाऊणं गुरुपसाएण ॥६३॥**

आहारासननिद्राजयं च कृत्वा जिनवरमतेन ।
ध्यातव्यः निजात्मा ज्ञात्वा गुरुप्रसादेन ॥६३॥

अर्थ :— आहार, आसन, निद्रा, यांना जिकून आणि जिनवराच्या मताप्रमाणे गुरूच्या प्रसादाने जाणून निज आत्म्याचे ध्यान करावे.

भावार्थ :— आहार, आसन, निद्रेला जिंकून आत्म्याचे ध्यान करावे असे अन्यमतवालेपण म्हणतात. परंतु त्यांचे विधान यथार्थ नाही. म्हणून आचार्य म्हणतात कीं, जसे जिनमतात म्हटले आहे त्या विधानाला गुरू प्रसाद जाणून ध्यान करणे सफल आहे. जसे जिनसिद्धान्तात आत्म्याचे स्वरूप तसेच ध्यानाचे स्वरूप आणि आहार, आसन, निद्रा यांना जिंकण्याचे विधान सांगितले आहे ते जाणून त्यात प्रवर्तन करावे. ॥६३॥

पुढे आत्म्याचे ध्यान करणे त्या आत्म्याचे स्वरूप कसे आहे ते सांगतात :—

**अप्पा चरित्तवंतो दंसणणाणेण संजुदो अप्पा ।**
**सो झायव्वो णिच्चं णाऊणं गुरुपसाएण ॥६४॥**

आत्मा चारित्रवान् दर्शनज्ञानेन संयुतः आत्मा ।
सः ध्यातव्यः नित्यं ज्ञात्वा गुरुप्रसादेन ॥६४॥

अर्थ :— आत्मा चारित्रवान आहे आणि दर्शनज्ञान सहित आहे. असा आत्मा गुरूच्या प्रसादाने जाणून नित्य ध्यान करावे.

भावार्थ :— आत्म्याचे रूप दर्शन-ज्ञान-चारित्रमयी आहे, याचे रूप जैनगुरूंच्या प्रसादाने जाणले जाते. अन्यमतवाले आपले बुद्धि, कल्पित जसे तसे मानून ध्यान करतात त्याना यथार्थ सिद्धि मिळत नाही. म्हणून जैनमतानुसार ध्यान करणे असा उपदेश आहे. ॥६४॥

www.vitragvani.com



पुढे म्हणतात कीं, आत्म्याला जाणणे, भक्ती करणे आणि विषयातून विरक्त होणे हे उत्तरोत्तर दुर्लभ झाल्याने दु:खाला (दृढतर पुरूषार्थाने) प्राप्त होतात :—

दुक्खे णज्जइ अप्पा अप्पा णाऊण भावणा दुक्खं ।
भावियसहावपुरिसो विसयेसु विरज्जए दुक्खं ।।६५।।

दुःखेन ज्ञायते आत्मा आत्मानं ज्ञात्वा भावना दुःखम् ।
भावितस्वभावपुरुषः विषयेषु विरज्यति दुःखम् ।।६५।।

अर्थ :— प्रथम तर आत्म्याला जाणतात तो मोठ्या कष्टाने जाणला जातो परत तो जाणून त्याची भक्ति करणे, उग्रपुरूषार्थाने परत परत त्याचा अनुभव करणे जिनभावना करणे, असे विषयापासून विरक्त होणे अपूर्वपुरूषार्थाचे काम आहे.

भावार्थ :— आत्म्याला जाणणे, त्याची भक्ति करणे, विषयापासून विरक्त होणे उत्तरोत्तर हा योग मिळणे फार कठिण आहे, म्हणून हा उपदेश आहे कीं, असा सुयोग मिळाल्यानंतर प्रमादी न होणे. ।।६५।।

पुढे म्हणतात कीं, जो पर्यंत विषयात हा मनुष्य प्रवर्तमान असतो तो पर्यंत आत्मज्ञान होत नाही :—

ताम ण णज्जइ अप्पा विसएसु णरो पवट्टए जाम ।
विसए विरत्तचित्तो जोई जाणेइ अप्पाणं ।।६६।।

तावन्न ज्ञायते आत्मा विषयेषु नरः प्रवर्त्तते यावत् ।
विषये विरक्तचित्तः योगी जानाति आत्मानम् ।।६६।।

अर्थ :— जो पर्यंत हा मनुष्य इंद्रियांच्या विषयात प्रवर्तन करतो तो पर्यंत आत्म्याला जाणत नाही, म्हणून योगी ध्यानि मुनि आहेत तो विषयातून विरक्त चित्त होवून आत्म्याला जाणतो.

भावार्थ :— जीवाच्या स्वभावाची, उपयोगाची, अशी स्वच्छता आहे कीं जो ज्या ज्ञेय पदार्थाने उपयुक्त होतो तसाच होतो, म्हणून आचार्य म्हणतात कीं, – जो पर्यंत विषयात चित्त असते, तो पर्यंत तो त्यांच्या स्वरूप राहातो, आत्म्याचा अनुभव होत नाही म्हणून योगी मुनिना अशा प्रकारे विचार करून विषयातून विरक्त होवून आत्म्यात उपयोग लावावा तेंव्हा आत्म्याला जाणूं शकेल, अनुभव करेल, म्हणून विषयातून विरक्त होणे हा उपदेश दिला आहे. ।।६६ ।।

पुढे याच अर्थाला दृढ करतात कीं, आत्म्याला जाणूनही भावनेशिवाय संसारातच राहातो :—

अप्पा णाऊण णरा केई सब्भावभावपब्भट्ठा ।
हिंडंति चाउरंगं विसयेसु विमोहिया मूढा ।।६७।।

आत्मानं ज्ञात्वा नराः केचित् सद्भावभावप्रभ्रष्टाः ।
हिण्डन्ते चातुरंगं विषयेषु विमोहिताः मूढाः ।।६७।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



अर्थ :— कित्येक लोक आत्म्याला जाणून ही आपल्या स्वभावाच्या भावनेने अत्यंत भ्रष्ट होवून विषयात मोहित होवून अज्ञानी मूर्ख, चारगतिरूप संसारात भ्रमण करतात.

भावार्थ :— मागे सांगितले होते आत्म्याला जाणणे, भक्तीकरणे, विषयातून विरक्त होणे हे उत्तरोत्तर दुर्लभ होत जाते, विषयात मग्न असलेला प्रथम तर आत्म्याला जाणत नाही असे म्हटले आहे, आता येथे अशाप्रकारे म्हटले कीं, आत्म्याला जाणून ही विषयात वशीभूत होवून भावना केली तर तो संसारातच भ्रमण करतो. म्हणून आत्म्याला जाणून विषयातून विरक्त होणे हा उपदेश दिला आहे. ।।६७।।

पुढे म्हणतात कीं, जे विषयापासून विरक्त होवून आत्म्याला जाणून भक्ती करतात, ते संसार सोडतात :—

**जे पुण विसयविरत्ता अप्पा णाऊण भावणासहिया ।**
**छंडंति चाउरंगं तवगुणजुत्ता ण संदेहो ।।६८।।**

ये पुनः विषयविरक्ताः आत्मानं ज्ञात्वा भावनासहिताः ।
त्यजन्ति चातुरंगं तपोगुणयुक्ताः न संदेहः ।।६८।।

अर्थ :— पुन्हा जे पुरूष मुनि, विषयातून विरक्त होतात आत्म्याला जाणून भक्ती करत वरचेवर भावनेद्वारा अनुभव करतात ते तप अर्थात् १२ प्रकारचे तप आणि मूलगुण उत्तरगुणाने युक्त होवून संसाराला सोडतात, मोक्ष प्राप्त करतात.

भावार्थ :— विषयातून विरक्त होवून आत्म्याला जाणून भावना करणे. यामुळे संसारातून सुटून मोक्ष प्राप्त करा, असा उपदेश आहे. ।।६८।।

पुढे सांगतात कीं, जर परद्रव्यात थोडा ही राग असेल तर तो पुरूष अज्ञानी आहे, आपले स्वरूप त्याने जाणले नाही :—

**परमाणुपमाणं वा परदव्वे रदि हवेदि मोहादो ।**
**सो मूढो अण्णाणी आदसहावस्स विवरीओ ।।६९।।**

परमाणुप्रमाणं वा परद्रव्ये रतिर्भवति मोहात् ।
सः मूढः अज्ञानी आत्मस्वभावात् विपरीतः ।।६९।।

अर्थ :— ज्या पुरूषाचे परद्रव्यात परमाणू इतके लेशमात्र ही मोह, रागाची प्रीति असेल तर तो पुरूष मूढ आहे, अज्ञानी आहे, आत्मस्वभावा पासून विपरीत आहे.

भावार्थ :— भेदविज्ञान झाल्यानंतर जीव अजीवाला भिन्न जाणावे तेंव्हा परद्रव्याला आपले मानू नये त्यामुळे त्याला (कर्तव्यबुद्धि = स्वामित्वाच्या भावनेने) राग ही होत नाही जर असे झाले तर जाणावे कीं, त्याने

www.vitragvani.com



स्व परचा भेद जाणला नाही, अज्ञानी आहे आत्मस्वभाव प्रतिकूल आहे आणि ज्ञानी झाल्यानंतर चारित्र्यमोहाचा उदय होतो जो पर्यंत थोडा राग असतो, तो कर्मजन्य अपराध मानतात, त्या रागात राग नाही. म्हणून विरक्तच आहे म्हणून ज्ञानी परद्रव्याने रागी म्हटला जात नाही. असे जाणावे. ।।६९।।

पुढे हा अर्थ संक्षेपाने सांगतात :—

अप्पा झायंताणं दंसणसुद्धीण दिढचरित्ताणं ।
होदि धुवं णिव्वाणं विसएसु विरत्तचित्ताणं ।।७०।।

आत्मानं ध्यायतां दर्शनशुद्धीनां दृढचारित्राणाम् ।
भवति ध्रुवं निर्वाणं विषयेषु विरक्तचित्तानाम् ।।७०।।

<u>अर्थ :</u>— पूर्वि सांगितल्याप्रमाणे ज्यांचे चित्त विषयापासून विरक्त आहे. जे आत्म्याचे ध्यान करतात, ज्यांची बाह्य, अभ्यन्तर दर्शनाची शुद्धता आहे आणि ज्यांचे चारित्र्य दृढ आहे त्याना निश्चयाने निर्वाण होते.

<u>भावार्थ :</u>— जे विषयापासून विरक्त आहेत आत्म्याचे स्वरूप जाणून आत्म्याची भावना करतात ते संसारातून सुटतात. हाच अर्थ संक्षेपाने सांगितला आहे कीं, जे इंद्रियांच्या विषयापासून विरक्त होवून बाह्य, अभ्यंतर दर्शनाच्या शुद्धतेने दृढ चारित्र्य पालतात त्याना नियमाने निर्वाणाची प्राप्ति होते. इंद्रियांच्या विषयात आसक्ति सर्व अनर्थाचे मूल आहे. म्हणून यांच्या पासून विरक्त झाल्यानंतर उपयोग आत्म्यात लागला तर कार्य सिद्धि होते. ।।७०।।

पुढे म्हणतात कीं, जो परद्रव्यात राग आहे तेच संसाराचे कारण आहे म्हणून योगीश्वर आत्म्यामध्यें भावना करतात :—

जेण रागो परे दव्वे संसारस्स हि कारणं ।
तेणावि जोइणो णिच्चं कुज्जा अप्पे सभावणा ।।७१।।

येन रागः परे द्रव्ये संसारस्य हि कारणम् ।
तेनापि योगी नित्यं कुर्यात् आत्मनि स्वभावनाम् ।।७१।।

<u>अर्थ :</u>— ज्या कारणामुळें परद्रव्यात राग आहे ते संसाराचेच कारण आहे त्या कारणामुळें योगीश्वर मुनि नित्य आत्म्यात भक्ती करतात.

<u>भावार्थ :</u>— कोणी अशी शंका काढतात कीं, परद्रव्यात राग केल्याने काय होते ? परद्रव्य आहे ते पर आहेच, राग जेंव्हा होतो तेंव्हा होतोच नंतर तो मिटतो, त्याना उपदेश केला आहे कीं, परद्रव्याशी राग केल्याने परद्रव्य आपल्या बरोबर येते. हे प्रसिद्ध आहे आणि आपल्या रागाचा संस्कार दृढ झाला तर परलोकापर्यंत ही जावूं

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



शकतो. हे तर युक्ति सिद्ध आहे आणि जिनागमात रागाने कर्मबंध सांगितला आहे. याचा उदय हे पुनर्जन्माचे कारण म्हटले आहे. अशा प्रकारे परद्रव्यात राग केल्याने संसार होतो. म्हणून योगीश्वर मुनि परद्रव्याचा राग सोडून आत्म्यात निरंतर भावना ठेवतात. ।।७१ ।।

पुढे म्हणतात कीं, अशा समभावाने चारित्र होते :—

णिंदाए य पसंसाए दुक्खे य सुहएसु य ।
सत्तूणं चेव वंधूणं चारित्तं समभावदो ।।७२।।

निंदायां च प्रशंसायां दुःखे च सुखेषु च ।
शत्रूणां चैव बंधूनां चारित्रं समभावतः ।।७२।।

अर्थ :— निंदा -प्रशंसेमध्ये, दु:ख-सुखात आणि शत्रू-बंधु-मित्रात समभाव जो समतापरिणाम, रागद्वेषाने रहित अशा भावाने चारित्र होते.

भावार्थ :— चारित्राचे स्वरूप हे सांगितले आहे कीं, जो आत्म्याचा स्वभाव आहे ते कर्माच्या निमित्ताने ज्ञानात परद्रव्याने इष्ट अनिष्ट बुद्धि होते. या इष्ट, अनिष्ट, बुद्धिच्या अभावाने ज्ञानात उपयोग लागतो त्याला शुद्धोपयोग म्हणतात. तेच चारित्र्य आहे हे होते तेंव्हा निंद्रा, प्रशंसा, दु:ख, सुख, शत्रू, मित्रात समान बुद्धि होते, निंद्रा-प्रशंसेचा द्विधाभाव, मोह कर्माचा उदय आहे, याचा अभावच शुद्धोपयोगरूप चारित्र आहे. ।।७२ ।।

पुढे म्हणतात कीं, कित्येक मूर्ख असे म्हणतात कीं, आता पंचमकाल आहे तो आत्मध्यानाचा काल नाही, त्याचा निषेध करतात :—

चरियावरिया वदसमिदिवज्जिया सुद्धभावपब्भट्ठा ।
केई जंपंति णरा ण हु कालो झाणजोयस्स ।।७३।।

चर्यावृताः व्रतसमितिवर्जिताः शुद्धभावप्रभ्रष्टाः ।
केचित् जल्पंति नराः न स्फुटं कालः ध्यानयोगस्य ।।७३।।

अर्थ :— कित्येक लोक असे आहेत ज्यांची आचार क्रिया आवृत्त झाली आहे. चारित्र्य मोहाचा उदय प्रबल आहे या मुळे चर्चा प्रकट होत नाही त्यामुळें व्रतसमितीने रहित आहे आणि मिथ्या अभिप्रायाच्या कारणाने शुद्धभावाने अत्यंतभ्रष्ट आहे, ते असे सांगतात कीं, – आता पंचमकाल आहे, हा काल प्रकट ध्यान योगाचा नाही. ।।७३ ।।

www.vitragvani.com



ते प्राणी (लोक) कसे आहेत ते पुढे सांगतात :—

सम्मत्तणाणरहिओ अभव्वजीवो हु मोक्खपरिमुक्को ।
संसारसुहे सुरदो ण हु कालो भणइ झाणस्स ॥७४॥

सम्यक्त्वज्ञानरहितः अभव्यजीवः स्फुटं मोक्षपरिमुक्तः ।
संसारसुखे सुरतः न स्फुटं कालः भणति ध्यानस्य ॥७४॥

अर्थ :— पूर्वि सांगितलेल्या ध्यानाचा अभाव सांगणारा जीव सम्यकृत्व आणि ज्ञानाने रहित आहे, अभव्य आहे त्यामुळे मोक्ष रहित आहे आणि संसारातील इंद्रिसुखाला चांगले मानून त्यात रत आहेत, आसक्त आहेत म्हणून म्हणतात कीं, आत्ता ध्यानाचा काल नाही.

भावार्थ :— ज्याना इंद्रियसुख प्रिय वाटते आणि जीवाजीव पदार्थाचे श्रद्धान ज्ञानाने रहित आहेत, ते अशा प्रकारे म्हणतात कीं, आत्ता ध्यानाचा काल नाही यावरून समजते कीं, अशाप्रकारे सांगणारा अभव्य आहे त्याला मोक्ष होणार नाही. ॥७४॥

जो असे मानतो आणि सांगतो की आता ध्यानाचा काल नाही तर त्यानी पांचमहाव्रत, पांचसमिति, तीन गुप्तिचे स्वरूपही जाणले नाही :—

पंचसु महव्वदेसु य पंचसु समिदीसु तीसु गुत्तीसु ।
जो मूढो अण्णाणी ण हु कालो भणइ झाणस्स ॥७५॥

पंचसु महाव्रतेषु च पंचसु समितिषु तिसृषु गुप्तिसु ।
यः मूढः अज्ञानी न स्फुटं कालः भणिति ध्यानस्य ॥७५॥

अर्थ :— जो पांच महाव्रते, पांचसमिति, तीन गुप्ते या बाबतीत मूढ आहे, अज्ञानी आहे अर्थात यांचे स्वरूप जाणत नाही आणि चारित्र मोहाच्या तीव्र उदयाने याचे पालन करू शकत नाहीत ते अशाप्रकारे सांगतात कीं, आत्ता ध्यानाचा काल नाही ॥७५॥

पुढे म्हणतात कीं, आत्ता या पंचमकालात धर्मध्यान होते हे मानत नाहीत. तो अज्ञानी आहे :—

भरहे दुस्समकाले धम्मज्झाणं हवेइ साहुस्स ।
तं अप्पसहावठिदे ण हु मण्णइ सो वि अण्णाणी ॥७६॥

भरते दुःषमकाले धर्मध्यानं भवति साधोः ।
तदात्मस्वभावस्थिते न हि मन्यते सोऽपि अज्ञानी ॥७६॥

अर्थ :— या भरतक्षेत्रात दु:षमकाल पंचमकालात साधु मुनिना धर्मध्यान होते. हे धर्मध्यान आत्मस्वभावात स्थित आहेत अशा मुनिना होते. जे हे मानत नाहीत ते अज्ञानी आहेत त्याना धर्मध्यानाच्या स्वरूपाचे ज्ञान नाही.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



भावार्थ :— जिन सूत्रात या भरतक्षेत्रात पंचमकालात आत्मभावनेत स्थित मुनिंचे धर्मध्यान सांगितले आहे, जे हे मानत नाहीत ते अज्ञानी आहेत, त्याना धर्मध्यानाच्या स्वरूपाचे ज्ञान नाही. ।।७६ ।।

पुढे सांगतात कीं, जे या कालात ही रत्नत्रयाचे धारक मुनि होतात ते स्वर्ग लोकात लोकांतिक पद, इंद्रपद, प्राप्त करून तेथून ते मोक्षाला जातात. अशाप्रकारे जिनसूत्रात सांगितले आहे.

अज्ज वि तिरयणसुद्धा अप्पा झाएवि लहइ इंदत्तं ।
लोयंतियदेवत्तं तत्थ चुआ णिव्वुदिं जंति ।।७७।।

अद्य अपि त्रिरत्नशुद्धा आत्मानं ध्यात्वा लभंते इन्द्रत्वम् ।
लौकान्तिकदेवत्वं ततः च्युत्वा निर्वृतिं यांति ।।७७।।

अर्थ :— आता या पंचमकालात ही जे मुनि सम्यक्‌दर्शन -ज्ञान-चारित्रा शुध्दता युक्त होतात. ते आत्म्याचे ध्यान करून इंद्रपद अथवा लोकान्तिकदेवपदाला प्राप्त करतात आणि तेथून ते निर्वाणाला प्राप्त होतात.

भावार्थ :— कोणी म्हणतात कीं, आता या पंचमकालात जिनसूत्रात मोक्ष (होणे) मिळणे. सांगितले नाही म्हणून ध्यान करणे निष्फल आहे, त्याला सांगतात कीं, हे भाई! मोक्षाला जाण्याचा निषेध तर केला आहे आणि शुक्ल ध्यानाचा निषेध केला आहे परंतु धर्मध्यानाचा निषेध तर केला नाही. अजून ही जे मुनि रत्नत्रयाने शुध्द होवून धर्मध्यानात लीन घेवून आत्म्याचे ध्यान करतात ते मुनि स्वर्गात इन्द्रपदाला प्राप्त होतात अथवा लोकान्तिक देव एकभवावतारी आहेत त्यांच्यात जावून उत्पन्न होतात. तेथून मनुष्य होवून मोक्षपद प्राप्त करतात. अशा प्रकारे धर्मध्यानाने परंपरेने मोक्ष मिळतो, तेंव्हा सर्वथा निषेधकां करता? जे निषेध करतात ते अज्ञानी मिथ्यादृष्टि आहेत त्याना विषय कषायत स्वच्छंद राहायचे असते म्हणून अशा प्रकारे सांगतात ।।७७।।

पुढे सांगतात कीं, जो या कालात ध्यानाचा अभाव मानतात आणि मुनिलिंग प्रथम ग्रहण केले आता त्याला गौण करून पापाला प्रवृत्त करतात ते मोक्षमार्गापासून च्यूत आहेत :-

जे पावमोहियमई लिंगं घेत्तूण जिणवरिंदाणं ।
पावं कुणंति पावा ते चत्ता मोक्खमग्गम्मि ।।७८।।

ये पापमोहितमतयः लिंगं गृहीत्वा जिनवरेन्द्राणाम् ।
पापं कुर्वन्ति पापाः ते त्यक्त्वा मोक्षमार्गे ।।७८।।

---

१. ज्ञानी तर नित्य विवेकी असल्याने चारित्र्य दोष जसा उदयवश झाल्याने नित्य चेतना स्वरूपाचा स्वामी आहे म्हणून रागदिला कर्मोदयात टाकून वीतरागी होवूं इच्छितात अज्ञानीचा तर हेय-उपदेशाचे कांहींच भान नाही. त्याला कर्मोदयात - पुण्यपापातच प्रसिध्द आहेत.

www.vitragvani.com



अर्थ :— ज्यांची बुध्दि पापकर्माने मोहित आहे, ते जिनवरेंद्र तीर्थंकराचे लिंग ग्रहण करून ही पाप करतात ते पापी मोक्षमार्गापासून च्यूत होतात.

भावार्थ :— ज्यानी प्रथम निर्ग्रंथ लिंग धारण केले आणि नंतर पाप बुध्दि उत्पन्न झाली कीं, आता ध्यानाचा काल तर नाही म्हणून कां प्रयास करायचा? असा विचार करून पापात प्रवृत्ति करूं लागतात ते पापी आहेत त्याना मोक्ष मार्ग मिळत नाही ।।७८।।

या कालात धर्मध्यान कोणाला होत नाही परंतु भद्रध्यान (व्रत-भक्ति, दान पूजादिकाचे शुभ भाव ) होते, त्यामुळेच निर्जरा आणि परंपरा मोक्ष मानला आहे आणि अशाप्रकारे ७व्या गुणस्थानापर्यंत भद्रस्थान आणि त्यानंतर धर्म ध्यान मानणाऱ्यांना ही, श्री देवसेनाचार्य कृत 'आराधनासार' नाम देवून एक ग्रंथ बनवला आहे त्याचा उत्तर केकडी निवासी पं. मिलापचंदजी कटारीयाने 'जैन निबंध रत्नमाला' पृष्ठ ४७ ते ६० मध्यें दिले आहे कीं, या कालात धर्मध्यान गुणस्थान ४ ते ७ पर्यंत आगमात म्हटले आहे आधार - सूत्रांच्या टीका, श्री राजवर्तिक, श्लोकवर्तिक, सर्वार्थ सिध्दि आदि)

पुढे म्हणतात कीं, जे मोक्षमार्गापासुन च्युत आहेत ते कसे आहेत :—

जे पंचचेलसत्ता ग्रंथग्गाहीय जायणासीला ।
आधाकम्मम्मि रया ते चत्ता मोक्खमग्गम्मि ।।७९।।

ये पंचचेलसक्ताः ग्रंथग्राहिणः याचनाशीलाः ।
अधः कर्मणि रताः ते त्यक्ताः मोक्षमार्गे ।।७९।।

अर्थ :— पंच आदि प्रकारचे चेल अर्थात् वस्त्रात आसक्त आहेत, अंडज कर्पासज, वल्कल, चर्मज आणि रोमज अशा प्रकारे वस्त्रामध्यें एका वस्त्राला ग्रहण करतात. ग्रंथग्राही अर्थात् परिग्रहाला ग्रहण करणारे आहेत, याचनाशील अर्थात् मागण्याचाच ज्यांचा स्वभाव आहे आणि अध:कर्म अर्थात् पापकर्मात रत आहे, सदोष आहार करतात ते मोक्ष मार्गापासून च्यूत होतात.

भावार्थ :— येथे आशय असा आहे कीं, प्रथम तर निर्ग्रंथ दिंगबर मुनि झाले होते नंतर कालदोषाचा विचार करून चारित्र पालण्यात असमर्थ होवून निर्ग्रंथ लिगांपासून भ्रष्ट होवून वस्त्रादिक अंगिकार करून लागले, परिग्रह ठेवू लागले, याचना करूं लागले, अध:कर्म औद्देशिक आहार करूं लागले त्याचा निषेध आहे ते मोक्षमार्गापासून च्यूत आहेत. प्रथम भद्रबाहु स्वामी पर्यंत निर्ग्रंथ होते, नंतर दुर्भिक्ष काळात भ्रष्ट होवून जे अर्धफालक म्हणवू लागले त्यात श्वेताम्बर झाले, त्यानी हा भेष पुष्ट करण्यासाठी सूत्रे बनविली त्यात कित्येक कल्पित आचरणांचा तसेच साधक कथा लिहिल्या या शिवाय अन्य कितीतरी वेष बदलले. अशा प्रकारे कालदोषाने भ्रष्ट लोकांचा संप्रदाय चालला आहे, हा मोक्ष मार्ग आहे असे श्रध्दान न करणे ।।७९ ।।

www.vitragvani.com



पुढे सांगतात कीं, मोक्षमार्गीतर असे मुनि आहेत :-

**णिग्गंथमोहमुक्का बावीसपरीषहा जियकसाया ।**
**पावारंभविमुक्का ते गहिया मोक्खमग्गम्मि ॥८०॥**

निर्ग्रंथाः मोहमुक्ताः द्वाविंशतिपरीषहाः जितकषायाः ।
पापारंभविमुक्ताः ते गृहीताः मोक्षमार्गे ॥८०॥

अर्थ :— जे मुनि निर्ग्रंथ आहेत, परिग्रहरहित आहेत, मोहरहित आहेत ज्यांचा कोणत्या ही परद्रव्याशी ममत्वभाव नाही. जे २२ परीषह सहन करतात, ज्यानी क्रोधादि कषायाला जिंकले आहे आणि पापारंभाने रहित आहेत, गृहस्थानी करण्यायोग्य आरंभादिक पापात प्रवर्तित होत नाहीत अशा मुनिना मोक्षमार्गात ग्रहण केले आहे, अर्थात् मान्य केले आहे. रत्नकरंडक श्रावकाचारमध्यें श्री संमतभद्राचार्यांनी ही म्हटले आहे कीं,
"विषयाशावशातीतो निरारम्भोऽपरिग्रह: ज्ञान ध्यान तपोरक्तस्तपस्वी स प्रशस्तते ॥१०॥"

भावार्थ :— हे मुनि लौकिक कष्ट आणि कार्यांने रहित आहेत. जसे जिनेश्वराने मोक्षमार्ग बाह्य अभ्यंतर परिग्रहाने रहित नग्न दिंगबर रूप म्हटले आहे तसेच प्रवर्ततात तेच मोक्षमार्गी आहेत, अन्य मोक्षमार्गी नाहीत. ॥८०॥

पुढे पुन्हा मोक्षमार्गिची प्रवृत्ति सांगतात :-

**उद्धद्धमज्झलोये केई मज्झं ण अहयमेगागी ।**
**इयभावणाए जोई पावंति हु सासयं ठाणं ॥८१॥**

उर्ध्वाधोमध्यलोके केचित् मम न अहकमेकाकी ।
इति भावनया योगिनः प्राप्नुवंति स्फुटं शाश्वतं स्थानं ॥८१॥

अर्थ :— मुनिनी अशी भावना करावी - उर्ध्वलोक, मध्यलोक, अधोलोक या तिन्ही लोकात माझा कोणी नाही, मी एकाकी आत्मा आहे, अशा भावनेने योगी मुनि प्रकटरूपाने शाश्वत सुखाला प्राप्त करतो.

भावार्थ :— मुनिनि अशी भावना करावी कीं, त्रिलोकात जीव एकाकी आहे त्याचा संबंधी दुसरा कोणी नाही. ही परमार्थरूप एकत्व भावना आहे ज्या मुनिंची अशी निरंतर भावना असते तो मोक्षमार्गी आहे, जो वेष धारण करून ही लौकिक जनाबरोबर लालन पालन चालते तो मोक्ष मार्गी नाही. ॥८१॥

पुढे आणखी सांगतात :-

**देवगुरूणं भत्ता णिव्वेयपरंपरा विचिंतिंता ।**
**झाणरया सुचरित्ता ते गहिया मोक्खमग्गम्मि ॥८२॥**

देवगुरूणां भक्ताः निर्वेदपरंपरां विचिन्तयन्तः ।
ध्यानरताः सुचरित्राः ते गृहीताः मोक्षमार्गे ॥८२॥

www.vitragvani.com



अर्थ :— जे मुनि देवगुरू चे भक्त आहेत निर्वेद अर्थात् संसार - देह - भोगा चे विरक्त परंपरेचे चिंतन करतात, ध्यानात रत आहात, मग्न आहात, तत्पर आहात आणि ज्यांचे चारित्र उत्तम आहे. त्याना मोक्षमार्गात ग्रहण केले आहे.

भावार्थ :— ज्यानी मोक्ष मार्ग प्राप्त केला असे अरहंत सर्वज्ञ वीतराग देह आणि त्यांचे अनुसरण करणारे मोठे मुनि दीक्षा, शिक्षा देणारे गुरू यांची भक्ती करणारे संसार देह भोगापासून विरक्त होवून मुनि झाले, तशीच ज्यांची वैराग्य भावना आहे, आत्मानुभवरूप, शुध्दउपयोगरूप, एकाग्रतारूप, एकाग्ररूपी ध्यानात तत्पर आहेत आणि ज्याना व्रत, समिति, गुप्तिरूप, निश्चयव्यवहारात्मक सम्यक्त्वचारित्र होते तेच मुनि मोक्षमार्गी आहेत, अन्यवेष धारण करणारे मोक्षमार्गी नाहीत ।।८२ ।।

पुढे असे म्हणतात कीं, - निश्चयनयाने ध्यान असे करावे :-

णिच्छयणयस्स एवं अप्पा अप्पम्मि अप्पणे सुरदो ।
सो होदि हु सुचरित्तो जोई सो लहइ णिव्वाणं ।।८३।।

निश्चयनयस्य एवं आत्मा आत्मनि आत्मने सुरतः ।
सः भवति स्फुटं सुचरित्रः योगी सः लभते निर्वाणम् ।।८३।।

अर्थ :— आचार्य म्हणतात कीं, निश्चयनयाचे स्वरूप असे आहे कीं, जो आत्मा, आत्म्यात आपल्या साठीच चांगल्या प्रकारे रत होतो तो योगी, ध्यानी, मुनि, सम्यक्‌चारित्र्यवान होवून निर्वाण प्राप्त करतो.

भावार्थ :— निश्चय नयाचे स्वरूप असे आहे कीं, एका द्रव्याची अवस्था जी आहे तशी सांगणे. आत्म्याच्या दोन अवस्था आहेत - एक तर अज्ञान अवस्था आणि दुसरी ज्ञानावस्था जो पर्यंत अज्ञानावस्था राहाते तो पर्यंत तर बंध पर्यायाला आत्मा जाणतो कीं, मी मनुष्य आहे, मी पशु आहे, मी क्रोधी आहे. मी मानी आहे, मी मायावी आहे, मी पुण्यवान, धनवान आहे, मी निर्धन दरिद्री आहे, मी राजा आहे, मी रंक आहे, मी मुनि आहे, मी श्रावक आहे इत्यादी पर्याय आपण मानतो. या पर्यायात लीन होतो. तेंव्हा (साक्षात् मोक्ष मार्गात आरूढ) सम्यक्‌ज्ञानी होतो, याचे फल निर्वाण आहे, अशा प्रकारे जाणावे ।।८३ ।।(नोंद - प्रवचनसारा गाथा २४१-२४२ मध्यें जे ७ व्या गुणस्थानात आगमज्ञान तत्वार्थ श्रध्दान, संयतत्त्व आणि निश्चय आत्मज्ञानात युगपत् आरूढ होण्याला आत्मज्ञान म्हटले आहे. ते कथनाच्या अपेक्षेने येथे म्हटले आहे, गौण, मुख्य समजून घ्यावे)

पुढे हाच अर्थ दृढ करताना सांगतात :-

पुरिसायारो अप्पा जोई वरणाणदंसणसमग्गो ।
जो झायदि सो जोई पावहरो हवदि णिद्दंदो ।।८४।।

पुरुषाकार आत्मा योगी वरज्ञानदर्शनसमग्रः ।
यः ध्यायति सः योगी पापहरः भवति निर्द्वन्द्वः ।।८४।।

www.vitragvani.com



अर्थ :— हा आत्मा ध्यानाला योग्य कसा आहे? पुरूषाकार आहे, योगी आहे ज्याच्या मन, वचन, कायेच्या योगांचा निरोध आहे, सर्वांग सुनिश्चल आहे आणि वर अर्थात् श्रेष्ठ सम्यक्रूप ज्ञान तथा दर्शनाने समग्र आहे परिपूर्ण आहे ज्याना केवल ज्ञान दर्शन प्राप्त आहे, अशा प्रकारे आत्म्याचे जो योगी ध्यानि मुनि ध्यान करतो तो मुनि पापाला हरण करणारा आहे आणि निर्द्वन्द आहे रागद्वेष आदि विकल्पाने रहित आहे.

भावार्थ :— जो अरहंतरूप शुध्द आत्म्याचे ध्यान करतो त्याच्या पूर्वकर्माचा नाश होतो आणि वर्तमानात रागद्वेषरहित होतो तेंव्हा आगामी कर्माला बांधतो ।।८४।।

पुढे म्हणतात कीं, अशा प्रकारे मुनिचे आचरण सांगितले आता श्रावकांचे आचरण सांगतात :-

**एवं जिणेहि कहियं सवणाणं सावयाण पुण सुणसु ।**
**संसारविणासयरं सिद्धियरं कारणं परमं ॥८५॥**

एवं जिनैः कथितं श्रमणानां श्रावकाणां पुनः श्रृणुत ।
संसारविनाशकरं सिद्धिकरं कारणं परमं ।।८५।।

अर्थ :— एवं अर्थात् पूर्वोक्त प्रकारे उपदेश तर श्रमण मुनिना जिनदेवाने सांगितला आता, श्रावकाना संसाराचा विनाश करणारा आणि सिध्दि जो मोक्ष त्याला करण्याचे उत्कृष्ट कारण असा उपदेश सांगतात तो ऐका

भावार्थ :— मागे मुनिंच्या विषयी सांगितले आणि आता पुढे सांगतात ते श्रावकानां सांगत आहेत, असे सांगतात कीं, ज्यामुळे संसाराचा विनाश होईल आणि मोक्षाची प्राप्ति होईल. ।।८५।।

पुढे श्रावकानी प्रथम काय करावे ते सांगत आहेत . :-

**गहिऊण य सम्मत्तं सुणिम्मलं सुरगिरीव णिक्कंपं ।**
**तं जाणे झाइज्जइ सावय ! दुक्खक्खयट्ठाए ॥८६॥**

गृहीत्वा च सम्यक्त्वं सुनिर्मलं सुरगिरेरिव निष्कंपम् ।
तत् ध्याने ध्यायते श्रावक ! दुःखक्षयार्थे ।।८६।।

अर्थ :— प्रथम तर श्रावकाना सुनिर्मल अर्थात् भल्याप्रकारे निर्मल आणि मेरूवत् नि:कंप अचल तथा चल मलिन अगाढ दूषणरहित अत्यन्त निश्चल अशा सम्यक्त्वाला ग्रहण करून दु:खाचा क्षय करण्यासाठी त्याला अर्थात् सम्यक्दर्शनाला (सम्यक् दर्शनाच्या विषयाचा) ध्यानात ध्यान करणे.

भावार्थ :— श्रावक प्रथम तर निरतिचार निश्चल सम्यक्त्वाला ग्रहण करून त्याचे ध्यान करा या सम्यक्त्वाच्या भावनेने गृहस्थाच्या गृहाकार्यासंबंधी आकुलता, क्षोभ, दु:ख हेच आहे ते मिटले जाते. कार्याच्या बिघडण्या सुधारण्यात वस्तुच्या स्वरूपाचा विचार येतो तेंव्हा दु:ख मिटते. सम्यक्दृष्टिचा अशा

www.vitragvani.com



प्रकारे विचार होतो कीं, वस्तुचे स्वरूप सर्वज्ञानी जसे जाणले आहे तसे निरंतर परिणमते, त्या प्रमाणेच होते, इष्ट , अनिष्ट मानून दु:खी, सुखी होणे निष्फल आहे. असा विचार केल्याने दु:ख मिटते हे प्रत्यक्ष अनुभव गोचर आहे. म्हणून सम्यक्त्वाचे ध्यान करणे म्हटले आहे. ।।८६ ।।

पुढे सम्यक्त्वाच्या ध्यानाचा महिमा सांगतात :-

सम्मत्तं जो झायइ सम्माइट्ठी हवेइ सो जीवो ।
सम्मत्तपरिणदो उण खवेइ दुट्ठट्ठकम्माणि ।।८७।।

सम्यक्त्वं यः ध्यायति सम्यग्दृष्टिः भवति सः जीवः ।
सम्यक्त्वपरिणतः पुनः क्षपयति दुष्टाष्टकर्माणि ।।८७।।

<u>अर्थ :</u>— जो श्रावक सम्यक्त्वाचे ध्यान करतो तो जीव सम्यक्दृष्टि आहे आणि सम्यक्त्वरूप परिणमन करून दृष्ट असलेल्या आठ कर्मांचा क्षय करतो.

<u>भावार्थ :</u>— सम्यक्त्वाचे ध्यान अशा प्रकारे आहे - जर प्रथम सम्यक्त्व झाले नसेल तरी सुध्दा याचे स्वरूप जाणून त्याचे ध्यान केले तर तो सम्यक्दृष्टी होतो. सम्यक्त्व झाल्यानंतर त्याचा परिणाम असा आहे कीं, संसाराचे कारण जे दुष्ट अष्ट कर्म त्यांचा क्षय होतो. सम्यक्त्व होताच कर्मांची गुणश्रेणी निर्जरा होवूं लागते, अनुक्रमे मुनि होताच चारित्र आणि शुक्ल ध्यान यांचे सहकारी होतात तेंव्हा सर्व कर्मांचा नाश होतो ।।८७।।

पुढे हे संक्षेपाने सांगतात :-

किं बहुणा भणिएणं जे सिद्धा णरवरा गए काले ।
सिज्झिहहि जे वि भविया तंजाणइ सम्ममाहप्पं ।।८८।।

किं बहुना भणितेन ये सिद्धाः नरवराः गते काले ।
सेत्स्यंति येऽपि भव्याः तज्जानीत सम्यक्त्वमाहात्म्यम् ।।८८।।

<u>अर्थ :</u>— आचार्य म्हणतात कीं, जास्ती सांगण्यात काय साध्य होणार आहे? ज्यामुळें (नरप्रधान) श्रेष्ठलोक भूत कालात सिध्द झाले आहेत आणि आगामी कालात सिध्द होतील त्या सम्यक्त्वाचे महात्म्य जाणा :—

<u>भावार्थ :</u>— या सम्यक्त्वाचे असे महात्म्य आहे कीं, जे अष्टकर्माच नाश करून भूतकालात मुक्ती प्राप्त करते झाले, तसेच पुढे ही मुक्त होतील ते केवळ या सम्यक्त्वामुळेच झाले आहेत आणि होत राहतील म्हणून आचार्य म्हणतात कीं, जास्ती काय सांगायचे ? म्हणजेच सारांशाने हेच कीं, मुक्तीचे प्रधान कारण सम्यक्त्वच आहे. हा सम्यक्त्व धर्म असा आहे कीं, तो धर्माच्या सर्व अंगाना सफल करतो. ।।८८ ।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

पुढे म्हणतात कीं, जे निरंतर सम्यक्त्वाचे पालन करतात ते धन्य आहेत :-

ते धण्णा सुकयत्था ते सूरा ते वि पंडिया मणुया।
सम्मत्तं सिद्धियरं सिविणे वि ण मइलियं जेहिं ॥८९॥

ते धन्याः सुकृतार्थाः ते शूराः तेऽपि पंडिता मनुजाः ।
सम्यक्त्वं सिद्धिकरं स्वप्नेऽपि न मलिनितं यैः ॥८९॥

अर्थ :— ज्या पुरूषानी मुक्ती देणाऱ्या सम्यक्त्वाला स्वप्नावस्थेतही मलिन केले नाही, अतिचार लावला नाही, ते पुरूष धन्य आहेत, तेच माणूस आहेत तेच कृतार्थ आहेत तेच शूरवीर आहेत, तेच पंडित आहेत.

भावार्थ :— जगामध्ये जे कोणी दानादिक करतात त्याना धन्य म्हणतात तसेच विवाहादिक यज्ञादिक करतात त्याना कृतार्थ असे म्हणतात, युध्दामध्ये जे माघार घेत नाहीत त्याना शूरवीर म्हणतात, जे खूप शास्त्राचा अभ्यास करतात त्याना पंडित म्हणतात. हे सर्व म्हणण्यापुरते आहे जे मोक्षाचे कारण सम्यक्त्त्व मलिन करत नाहीत, निरतिचार पाळतात, ते धन्य आहेत ते कृतार्थ आहेत, ते शूरवीर आहेत, ते पंडित आहेत ते माणूस आहेत त्या शिवाय माणूस पशुसमान आहे. अशा प्रकारे सम्यक्त्वाचे महात्म्य सांगितले आहे ॥८९॥

पुढे शिष्य विचारतो सम्यकत्त्व कसे आहे? त्याचे समाधान करण्यासाठीं या सम्यक्त्वाचे बाह्य चिन्ह सांगतात :-

हिंसारहिए धम्मे अट्ठारहदोसवज्जिए देवे।
णिग्गंथे पव्वयणे सद्दहणं होइ सम्मत्तं ॥९०॥

हिंसारहिते धर्मे अष्टादशदोषवर्जिते देवे ।
निर्ग्रंथे प्रवचने श्रद्धानं भवति सम्यक्त्वम् ॥९०॥

अर्थ :— हिंसा रहित धर्म, १८ दोषरहित देव, निर्ग्रंथ प्रवचन अर्थात् मोक्षाचा मार्ग तसेच गुरू यांच्यावर श्रध्दा ठेवल्याने सम्यकत्त्व होते.

भावार्थ :— लौकिकजन तसेच अन्यमतवाले जीवाच्या हिंसेला धर्म मानतात आणि जिनमताप्रमाणे अहिंसेला धर्म मानले आहे त्याचीच श्रध्दा करावी अन्य ठिकाणी श्रध्दान करूं नये. तोच सम्यक्दृष्टि आहे. लौकिक अन्यमतवाले मानतात ते सर्व देव क्षुधादि तसेच रागद्वेषादि दोषाने युक्त आहेत म्हणून वीतराग सर्वज्ञ अरहंत देव सर्व दोषानी रहित आहेत त्याना देव मानावे, श्रध्दान करावे तीच सम्यक्दृष्टि आहे.

www.vitragvani.com



येथे १८ दोष सांगितले आहेत ते प्रधानतेच्या अपेक्षेने सांगितले आहेत त्याना उपलक्षणरूप जाणणे, याप्रमाणेच अन्यही जाणावेत. निर्ग्रंथ प्रवचन अर्थात् मोक्षमार्ग, तोच मोक्षमार्ग आहे, अन्यलिंगी, अन्यमतवाले, श्वेतांबरादिक जैनाभास मोक्ष मानतात तो मोक्षमार्ग नाही. असे श्रध्दान करणारे ते सम्यक्‌दृष्टि आहेत असे जाणावे ।।९० ।।

पुढे या अर्थाला दृढ करताना म्हणतात :-

जहजायरूवरूवं सुसंजयं सव्वसंगपरिचत्तं ।
लिंगं ण परावेक्खं जो मण्णइ तस्स सम्मत्तं ।।९१।।

यथाजातरूपरूपं सुसंयतं सर्वसंगपरित्यक्तम् ।
लिंगं न परापेक्षं यः मन्यते तस्य सम्यक्त्वम् ।।९१।।

अर्थ :— मोक्षमार्गाचा लिंग -(भेष) वेष असा आहे कीं, यथाजातरूप असे ज्याचे रूप आहे, ज्या मध्यें बाह्य परिग्रह, वस्त्रादिक किंचित् मात्र ही नाहीत सुसंयत अर्थात् सम्यक्‌प्रकारे इंद्रियांचा निग्रह आणि जीवांची दया ज्या मध्ये दिसते, असा संयम आहे, सर्वसंग अर्थात् सर्वच परिग्रह तथा सर्व लौकिक जनांच्या संगतिने रहित आहे आणि ज्यात परच्या अपेक्षेने कांहीं नाही, मोक्षाच्या प्रयोजनाशिवाय अन्य अपेक्षा नाही. असे मोक्ष मार्गाचे जे लक्षण (लिंग) मानतात, श्रध्दान करतात त्या जीवाला सम्यक्त्व होते.

भावार्थ :— मोक्षमार्गात असे ही लिंग आहे, अन्य अनेक वेषी आहेत, ते तर मोक्षमार्गात नाहीत, असे श्रध्दान करतात त्याना सम्यक्त्व होते. येथे परापेक्ष नाही असे सांगताना म्हटले आहे कीं, असे निर्ग्रंथ रूप ही जे कोणत्या अन्य आशयाने धारण करतात तो वेष म्हणजे मोक्ष मार्ग नाही. केवळ मोक्षाचीच अपेक्षा ज्यात आहे, त्यालाच मानणारा तो सम्यक्‌दृष्टि आहे असे जाणावे ।।९१ ।।

पुढे मिथ्यादृष्टिचे चिन्ह सांगतात :-

कुच्छियदेवं धम्मं कुच्छियलिंगं च बंदए जो दु ।
लज्जाभयगारवदो मिच्छादिट्ठी हवे सो हु ।।९२।।

कुत्सितदेवं धर्मं कुत्सितलिंगं च वन्दते यः तु ।
लज्जाभयगारवतः मिथ्यादृष्टिः भवेत् सः स्फुटम् ।।९२।।

अर्थ :— जे क्षुधादिक आणि रागद्वेषादि दोषाने दूषित आहेत ते कुत्सित देव आहेत, जे हिंसादि दोषाने सहित आहेत तो कुत्सित धर्म आहे, जे परिग्रहादि सहित आहेत तो कुत्सितलिंग आहेत. जे यांची वंदना करतात, पूजा करतात ते तर प्रकट मिथ्यादृष्टि आहेत. येथे आता आणखी विशेष सांगतात कीं, जे याना हित करणारे

मानून वंदना करतात, पूजा करतात ते तर प्रकट मिथ्या दृष्टि आहेत परंतु जे लज्जा, भय, गारव या कारणाने वंदन करतात, पूजा करतात, ते ही प्रकट मिथ्या दृष्टि आहेत. लज्जा तर अशी वाटते कीं, - लोक यांची वंदना करतात पूजा करतात, आम्ही पूजा नाही केली तर लोक आम्हाला काय म्हणतील? आमची जगात प्रतिष्ठा जाईल त्या लाजेमुळे वंदना व पूजा करतात. भय असे आहे कीं, याना राजादिक मानतात, आम्ही मानले नाहीतर आमच्यावर कांहीं संकट येईल अशा प्रकारे भयाने वदंन व पूजन करतात. गर्व असा कीं,- आम्ही मोठे आहोत, महंत पुरूष आहोत, सर्वांचा सन्मान करतो, या कार्यामुळे आम्हाला मोठेपण मिळते त्या गर्वाने वंदन व पूजन करतात अशा प्रकारे मिथ्या दृष्टिची लक्षणे (लिंग) सांगितली ।।९२ ।।

पुढे याच अर्थाला दृढ करताना सांगतात कीं :-

सपरावेक्खं लिंगं राई देवं असंजयं वंदे ।
माणइ मिच्छादिट्ठी ण हु मण्णइ सुद्धसम्मत्ती ।।९३।।

स्वपरापेक्षं लिंगं रागिणं देवं असंयतं वन्दे ।
मानयति मिथ्यादृष्टिः न स्फुटं मानयति शुद्धसम्यक्त्वी ।।९३।।

अर्थ :— स्व परापेक्ष लिंग - आपण कांहीं लौकिक प्रयोजन मनात धारण करून वेष घेतो तो साक्षेप आहे आणि कोणत्या परच्या अपेक्षेने धारण करा कोणाच्या आग्रहाने तसेच राजादिकाच्या भयाने धारण करणे ते परपेक्ष आहे. रागी देव ( ज्यांना स्त्री आदिचा राग असतो) आणि संयम रहिताना अशा प्रकारे म्हटले कीं, मी वंदन करतो तसेच त्याला मानून श्रध्दा करतात ते मिथ्यादृष्टि आहेत. शुध्द सम्यक्त्व झाल्यावर ना ते याना मानतात, ना श्रध्दा करतात आणि ना वंदन पूजन करतात.

भावार्थ :— वरती म्हटल्याप्रमाणे मिथ्यादृष्टिची प्रीति भक्ति उत्पन्न होते, जे निरातिचार सम्यकृत्त्वान आहेत ते याना मानत नाहीत ।।९३ ।।

सम्माइट्ठी सावय धम्मं जिणदेवदेसियं कुणदि ।
विवरीयं कुव्वंतो मिच्छादिट्ठी मुणेयव्वो ।।९४।।

सम्यग्दृष्टिः श्रावकः धर्मं जिनदेवदेशितं करोति ।
विपरीतं कुर्वन् मिथ्यादृष्टिः ज्ञातव्यः ।।९४।।

अर्थ :— जो जिनदेवाने उपदेशित धर्माचे पालन करतो तो सम्यकृदृष्टि श्रावक आहे जो अन्यमताचे उपदेशीत धर्माचे पालन करतो त्याना मिथ्यादृष्टि समजावे.

भावार्थ :— अशा प्रकारे म्हणल्याने येथे कोणी तर्क केला कीं, येथे तर आपले मत पुष्ट करण्यासाठीं पक्षपाती वार्ता सांगितली आहे आता त्याचे उत्तर सांगतात, असे नाही, ज्या मुळें सर्व जीवांचे हित होते तो धर्म आहे,

www.vitragvani.com



अशा अहिंसारूप धर्माचे जिनदेवाने प्ररूपण केले आहे. अन्यमतामध्यें अशा धर्माचे निरूपण नाही. अशा प्रकारे जाणावे ।।९४।।

पुढे म्हणतात कीं, जो मिथ्यादृष्टि जीव आहे तो संसारात दु:खसहित भ्रमण करतो :-

मिच्छादिट्ठी जो सो संसारे संसरेइ सुहरहिओ ।
जम्मजरमरणपउरे दुक्खसहस्साउलो जीवो ।।९५।।

मिथ्यादृष्टिः यः सः संसारे संसरति सुखरहितः ।
जन्मजरामरणप्रचुरे दुःखसहस्राकुलः जीवः ।।९५।।

अर्थ :— जो मिथ्यादृष्टि जीव आहे तो जन्म, जरा, मरणाने प्रचुर आणि हजारो दु:खाने व्याप्त या संसारात सुखरहित दु:खी होवून भ्रमण करतो.

भावार्थ :— मिथ्या भावाचे फल संसारात भ्रमण करणे हेच आहे. हा संसार जन्म, जरा, मरण आदि हजारो दु:खाने भरला आहे, या दु:खाला मिथ्यादृष्टि या संसारात भ्रमण भोगत राहातो. येथे दु:ख तर अनंत आहे हजारो कहाण्याना हे सांगितले आहे. ।।९५।।

पुढे सम्यक्त्व मिथ्यात्व भाव सारांशाने सांगत आहेत :-

सम्म गुण मिच्छ दोसो मणेण परिभाविऊण तं कुणसु ।
जं ते मणस्स रुच्चइ किं बहुणा पलविएणं तु ।।९६।।

सम्यक्त्वे गुण मिथ्यात्वे दोषः मनसा परिभाव्य तत् कुरु ।
यत् ते मनसे रोचते किं बहुना प्रलपितेन तु ।।९६।।

अर्थ :— हे भव्य ! असे पूर्वि सांगितलेले सम्यक्त्वाचे गुण आणि मिथ्यात्वाच्या दोषांची आपल्या मनापासून भावना कर आणि जे आपल्या मनाला आवडेल ते कर ! फार बडबड करून काय साध्य होणार आहे ? अशा प्रकारे आचार्यांनी उपदेश दिला आहे.

भावार्थ :— अशा प्रकारे आचार्यांनी म्हटले आहे कीं, जास्त काय सांगायचे? सम्यक्त्व मिथ्यात्वाचे गुणदोष पूर्वोक्त जाणून जे मनाला आवडेल ते करा येथे उपदेशाचा आशय असा आहे कीं, - मिथ्यात्वाला सोडा, सम्यक्त्वाला ग्रहण करा यामुळे संसाराचे दु:ख मिटून मोक्ष प्राप्त होईल ।।९६।।

पुढे म्हणतात कीं, जर मिथ्यात्वभाव सोडला नाही तर बाह्य वेषाचा कांहीं फायदा नाही :-

बाहिरसंगविमुक्को ण वि मुक्को मिच्छभाव णिग्गंथो ।
किं तस्स ठाणमउणं ण वि जाणदि अप्पसमभावं ।।९७।।

बहिः संगविमुक्तः नापि मुक्तः मिथ्याभावेन निर्ग्रंथः ।
किं तस्य स्थानमौनं न अपि जानाति आत्मसमभावं ।।९७।।

www.vitragvani.com



अर्थ :— जो बाह्य परिग्रहरहित आणि मिथ्याभावसहित निर्ग्रंथ वेष धारण केला आहे ते परिग्रह रहित नाहीत, त्याना नुसते उभे राहून कायोत्सर्ग करण्याने काय साध्य होणार आहे ? आणि मौन धारण करून काय साध्य होणार? कारण कीं, आत्म्याचा समभाव जो वीतराग परिणाम त्याला तो जाणत नाही.

भावार्थ :— आत्म्याच्या शुध्दस्वभावाला जाणून सम्यक्दृष्टि होतो. आणि जो मिथ्याभाव सहित परिग्रह सोडून निर्ग्रंथ झाला आहे, कायोत्सर्ग करणे, मौन धरणे इत्यादि बाह्य क्रिया करतो तर त्याची क्रिया मोक्षमार्गात सामिल करून घेणे योग्य नाही. कारण कीं, सम्यक्त्वाशिवाय बाहय क्रियेचे फल संसारच आहे ।।९७।।

पुढे शंका निर्माण होते कीं, सम्यक्त्वाशिवाय बाह्य लिंग निष्फल म्हटले आहे, जे बाह्य लिंग मूलगुण बिघडवतात त्याना सम्यक्त्व राहाते कीं नाही ? याचे समाधान सांगतात :-

**मूलगुणं छित्तूण य बाहिरकम्मं करेइ जो साहू ।**
**सो ण लहइ सिद्धिसुहं जिणलिंगविराहगो णियदं ॥९८॥**

मूलगुणं छित्वा च बाह्यकर्म करोति यः साधुः ।
सः न लभते सिद्धिसुखं जिणलिंगविराधकः नियतं ।।९८।।

अर्थ :— जे मुनि निर्गंथ होवून मूलगुण धारण करतो; त्याचे छेदन करून, बिघडवून केवळ बाह्य क्रिया कर्म करतात ते सिध्दि अर्थात् मोक्षाच्या सुखाला प्राप्त करूं शकत नाहीत. कारण कीं, असे मुनि जिनलिंगाचे विराधक आहेत.

भावार्थ :— जिन आज्ञा अशी आहे कीं, सम्यक्त्वसहित मूलगुण धारण करून साधू क्रिया करून धन्य होतात. मूलगुण २८ सांगितले आहेत. पांचमहाव्रत५. पांच समिति ५. इंद्रियांचा निरोध सहा आवश्यक ६. भूमिशयन - १. स्नानाचा त्याग, वस्त्राचा त्याग १ केशलोच१ एकवेळाभोजन१ खडे राहून भोजन-१, दंतधावन-१ अशा प्रकारे २८ मूलगुण आहेत. यांची विराधना करून कायोत्सर्ग, मौन, तप ध्यान अध्ययन करतो. त्याना या क्रियेमुळे मुक्ती मिळत नाही. जे अशा प्रकारे श्रध्दान करतात कीं, - आमचे सम्यक्त्व तर आहेच. बाह्य मूलगुण बिघडले तर बिघडो आम्ही मोक्षमार्गिच आहोत. तर अशा श्रध्देने आणि जिन आज्ञा भंग केल्याने सम्यक्त्वाचा ही भंग होतो, तर मोक्ष कसा मिळेल? आणि ( तीव्र कषायवान झाला तर ) कर्माच्या प्रबल उदयाने चारित्र भ्रष्ट होईल. आणि जर जिन आज्ञेप्रमाणे श्रध्दान राहिले तर सम्यक्त्त्व राहाते परंतु मूलगुणाशिवाय केवळ सम्यक्त्वाने मुक्ती नाही आणि सम्यक्त्वाशिवाय केवळ क्रियेने मुक्ती नाही असे जाणावे.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



प्रश्न :— मुनिनां स्नानाचा त्याग सांगितला आहे आणि आम्ही असे ही ऐकतो कीं, चांडाल आदिचा स्पर्श झाला तर दंड स्नान करतात.

समाधान :— जसे गृहस्थ ( सामान्य माणूस) स्नान करतात तसे स्नान करण्याचा त्याग सांगितला आहे कारण कीं, यात हिंसेची अधिकता आहे. मुनिंचे स्थान असे असते कीं, - कमंडलु मध्ये प्रासुकजल असते ते मंत्र म्हणत मस्तकावर धारामात्र देत टाकतात आणि त्या दिवशी उपवास करतात हे स्नान तर नाममात्र स्नान आहे. येथे मंत्र आणि तपस्नान प्रधान आहे, जलस्नान प्रधान नाही अशा प्रकारे जाणावे ।।९८।।

पुढे म्हणतात कीं, जो आत्मस्वभावाने विपरीत बाह्य क्रिया कर्म आहे ते काय करतील? मोक्षमार्गात तर कांहीं ही कार्य करत नाहीत :-

किं काहिदि बहिकम्मं किं काहिदि बहुविहं च खवणं तु ।
किं काहिदि आदावं आदसहावस्स विवरीदो ।।९९।।

किं करिष्यति बहिः कर्म किं करिष्यति बहुविधं च क्षमणं तु ।
किं करिष्यति आतापः आत्मस्वभावात् विपरीतः ।।९९।।

अर्थ :— आत्मस्वभावाने विपरीत , प्रतिकूल बाह्य कर्म जे क्रियाकांड ते काय करेल ? कांहीं मोक्षाचे कार्य तर किंचित्‌मात्र ही करणार नाही, अनेक प्रकारे उपवासादि बाहयतप ही काय करणार? कांहीं ही करणार नाही, आतापनयोग आदि कायक्लेश काय करेल? कांहीं ही करणार नाही.

भावार्थ :— बाह्य क्रियाकर्म शरिराश्रित आहेत आणि शरीर जड आहे आत्मा चेतन क्रिया करतो त्याचे फल चेतनेला मिळते. चेतनचा अशुभ उपयोग मिळाला तर अशुभकर्म बांधते आणि शुभउपयोग मिळेल तेंव्हा शुभकर्म बांधले जातात, आणि जेव्हा शुभ अशुभ दोन्हींनी रहित उपयोग होतो तेंव्हा कर्म बांधले जात नाहीत, प्रथम बांधलेल्या कर्माची निर्जरा करून मोक्ष मिळतो. अशा प्रकारे चेतना उपयोगाच्या अनुसार फलते, म्हणून असे म्हटले आहे कीं, बाहय क्रियाकर्माने तर कांही मोक्ष मिळत नाही शुध्द उपयोग झाल्यानंतर मोक्ष होतो. म्हणून दर्शन—ज्ञान उपयोगाचा विकार मिटवून ज्ञान चेतनेचा अभ्यास करणे मोक्षाचा उपाय आहे ।।९९।।

पुढे अशा अर्थाला पुन्हा विशेष रूपाने सांगतात :-

जदि पढदि बहुसुदाणि य जदि काहिदि बहुविहं य चारित्तं ।
तं बालसुदं चरणं हवेइ अप्पस्स विवरीदं ।।१००।।

यदि पठति बहुश्रुतानि च यदि करिष्यति बहुविधं च चारित्रं ।
तत् बालश्रुतं चरणं भवति आत्मनः विपरीतम् ।।१००।।

www.vitragvani.com



अर्थ :— जो आत्मस्वभावाने विपरीत बाह्य अनेक शास्त्राना वाचणारा आणि तो अनेक प्रकारच्या चारित्र्याचे आचरण करेल तर तो सर्वच बालश्रुत आणि बालचारित्र होईल. आत्मस्वभावाने विपरीत शास्त्राला वाचणे आणि चारित्र्याचे आचरण करणे हे सर्वच बालश्रुत व बालचारित्र आहे, अज्ञानीची क्रिया आहे, कारण कीं, ११ अंग आणि ९ पूर्व पर्यंत तो अभव्यजीव ही वाचन करतात आणि बाह्य मूलगुणरूप चारित्र ही पालन करतात तरी ही ते मोक्षाला योग्य नाहीत अशा प्रकारे जाणावे ।।१००।।

पुढे सांगतात कीं, कशा प्रकारचे साधू मोक्ष प्राप्त करतात :-

**वेरग्गपरो साहू परदव्वपरम्मुहो य जो होदि ।**
**संसारसुहविरत्तो सगसुद्धसुहेसु अणुरत्तो ॥१०१॥**
**गुणगणविहूसियंगो हेयोपादेयणिच्छिओ साहू ।**
**झाणज्झयणे सुरदो सो पावइ उत्तमं ठाणं ॥१०२॥**

वैराग्यपरः साधुः परद्रव्यपराङ्मुखश्च यः भवति ।
संसारसुखविरक्तः स्वकशुद्धसुखेषु अनुरक्तः ।।१०१।।
गुणगणविभूषितांगः हेयोपादेयनिश्चितः साधुः ।
ध्यानाध्ययने सुरतः स प्राप्नोति उत्तमं स्थानम् ।।१०२।।

अर्थ :— जो साधू मोक्षाचे उत्तम स्थान प्राप्त करतो अर्थात् जो साधू वैराग्यात तत्पर आहे, संसार, देह, भोगापासून प्रथम विरक्त होवून मुनि झाले त्या भावनेने युक्त होवून, परद्रव्यापासून पराङ:मुख होवून जसे वैराग्य होते त्याप्रमाणेच परद्रव्याचा त्याग करून त्या पासून पराङगमुख होवून जसे वैराग्य होते त्याप्रमाणेच परद्रव्याचा त्याग करून त्या पासून पराङ्गमुख राहावे. संसारासंबंधी इंद्रियांच्याद्वारे विषयसुख मिळते त्या पासून विरक्त व्हावे आपल्या आत्मिक शुध्द अर्थात् कषायांच्या क्षोभाने रहित निराकुल, शांतभावरूप ज्ञानानंदात अनुरक्त व्हावे, लीन व्हावे, वरचेवर त्याची भावना राहावी.

त्याचा आत्मप्रदेशरूप अंग गुणाच्या गणाने विभूषित आहे, मूलगुण उत्तरगुणापेक्षा आत्म्याला अलंकृत - शोभायमान केले आहे, ज्याच्या हेय उपादेय तत्त्वाचा निश्चय असेल, निज आत्मद्रव्य तर उपादेय आहे आणि असा ज्यांचा निश्चय आहे कीं, - अन्यपर द्रव्याच्या निमित्ताने झालेले आपले विकार भाव हे सगळे हेय आहेत. साधु होवून आत्म्याच्या साधनेत तत्पर आहेत, धर्म शुक्लध्यान आणि अध्यात्मशास्त्राला वाचून ज्ञानाच्या भावनेत तत्पर असेल, मग्न असेल, भल्याप्रकारे लीन असेल, असा साधु उत्तमस्थान जे लोकशिखरावर सिध्दक्षेत्र तथा मिथ्यात्वादि १४ गुणस्थानापासून निराळे शुध्दभावस्वरूप मोक्षस्थानाला प्राप्त करतो.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



भावार्थ :— मोक्षाच्या साधनेचे हे उपाय आहेत अन्य कांहीं नाही ।।१०१।। — ।।१०२।। पुढे आचार्य म्हणतात कीं, - सर्वात उत्तम पदार्थ शुध्द आत्मा आहे तो या देहातच राहात आहे त्याला जाणा :-

णविएहिं जं णविज्जइ झाइज्जइ झाइएहिं अणवरयं ।
थुव्वंतेहिं थुणिज्जइ देहत्थं किं पि तं मुणह ।।१०३।।

नतैः यत् नम्यते ध्यायते ध्यातैः अनवरतम् ।
स्तूयमानैः स्तूयते देहस्थं किमपि तत् जानीत ।।१०३।।

अर्थ :— हे भव्य जीवा ! तुम्ही या देहात स्थित असा कां आहेस ? कसा आहे ते जाणा ते लोकात नमस्कार करण्यायोग्य इंद्रादि आहे, तो नमस्कार करण्यायोग्य, ध्यान करण्यायोग्य आहे, आणि स्तुती करण्यायोग्य आहे. असे जो आहे ते या देहातच स्थित आहे त्याला यथार्थ जाणा.

भावार्थ :— शुध्द परमात्मा आहे तो कर्मानि आच्छादित आहे तरीही भेदज्ञानी या देहातील स्थित (आत्म्याचे) ध्यान करून तीर्थंकरादि सुध्दां मोक्ष प्राप्त करून घेतात, म्हणून असे म्हटले आहे कीं, लोकांमध्यें पूजण्या योग्य तर इंद्रादिक आहेत आणि ध्यान करण्यायोग्य तीर्थंकरादि आहेत तसेच स्तुति करण्यायोग्य तीर्थंकरादिक आहेत ते सुध्दां ज्याना नमस्कार करतात, ज्याचे ध्यान करतात, स्तुति करतात असे वचनात न येणारे, भेदज्ञानीयाचे अनुभव गोचर परमात्मा वस्तु आहे, त्याचे स्वरूप जाणा, त्याला नमस्कार करा, त्याचे ध्यान करा, बाहेर कां शोधता आहात? अशा प्रकारचा उपदेश केला आहे ।।१०३।।

पुढे आचार्य म्हणतात कीं, जे अरंहतादिक पंचपरमेष्ठी आहेत ते ही आत्म्यातच आहेत, त्यामुळे आत्माच शरण आहे :—

अरुहा सिद्धायरिया उज्झाया साहु पंच परमेट्ठी ।
ते वि हु चिट्ठहि आदे तम्हा आदा हु मे सरणं ।।१०४।।

अर्हन्तः सिद्धा आचार्या उपाध्यायाः साधवः पंच परमेष्ठिनः ।
ते अपि स्फुटं तिष्ठन्ति आत्मनि तस्मादात्मा स्फुटं मे शरणं ।।१०४।।

अर्थ :— अर्हन्त, सिध्द, आचार्य उपाध्याय आणि साधु हे पंचपरमेष्ठी आहेत हे ही आत्म्यातच आहेत, आत्म्याची अवस्था आहे म्हणून मी आत्म्यालाच शरण आहे, अशा प्रकारे आचार्यांनी अभेदनय प्रधान करून सांगितले आहे.

भावार्थ :— ही पांच पदे आत्म्याचीच आहेत, जेंव्हा हा आत्मा घातिकर्माचा नाश करतो तेंव्हा अरहंतपद होते. तोच आत्मा अघातिकर्माचा नाश करून निर्वाणाला प्राप्त होतो, तेंव्हा सिध्द पदाला पोहोचतो, जेव्हा शिक्षा, दीक्षा देणारे मुनि होतात तेंव्हा आचार्य म्हणवले जातात, पठन पाठनात तत्पर मुनिना उपाध्याय म्हटले जाते. अशा प्रकारे पांची पदे आत्म्यातच आहेत. म्हणून आचार्य विचार करतात कीं, जे या देहात

आत्मा स्थित आहे; म्हणून जरी (स्वयं) कर्म आच्छादित आहे तरी सुध्दां पांची पदाना योग्य आहे. यांच्या शुध्द स्वरूपाचे ध्यान करणे पांची पदाचे ध्यान आहे. म्हणून मी आत्म्याला शरण आहे. अशी भावना केली आणि पंचपरमेष्ठीचे ध्यानरूप अंतमंगल सांगितले आहे ।।१०४।।

पुढे सांगतात कीं, जे अंतसमाधि मरणात चाराआराधनेचे आराधन सांगितले आहे. हे ही आत्म्याचेच आराधन आहे, मी आत्म्यालाच शरण आहे :-

सम्मत्तं सण्णाणं सच्चारित्तं (`य) सत्तवं चेव ।
चउरो चिट्ठहि आदे तम्हा आदा हु मे सरणं ।।१०५।।

सम्यक्त्वं सज्ज्ञानं सच्चारित्रं सत्तपः चैव ।
चत्वारः तिष्ठन्ति आत्मनि तस्मादात्मा स्फुटं मे शरणं ।।१०५।।

अर्थ :— सम्यक्दर्शन सम्यक्ज्ञान सम्यक्चारित्र आणि सम्यक्तप या चार आराधना आहेत. हे ही आत्म्यात अस्तित्वरूप आहेतच. या चारी आत्म्याच्याच अवस्था आहेत म्हणून आचार्य म्हणतात कीं, मी आत्म्याला शरण आहे ।।१०५।। (भगवती आराधना गाथा)

भावार्थ :— आत्म्याचे निश्चय - व्यवहारात्मक तत्वार्थ श्रध्दान रूप परिणाम सम्यक्दर्शन आहे. संशय, विमोह विभ्रमाने रहित आणि निश्चय व्यवहाराने निजस्वरूपाची यथार्थ जाणणे, सम्यक्ज्ञान आहे. सम्यक्ज्ञानाने तत्त्वार्थाला जाणून रागद्वेषाने रहित परिणाम होणे सम्यक्चारित्र आहे. आपल्या शक्तीनुसार सम्यक्ज्ञाना पूर्वक कष्टाचा आदर करून स्वरूपाची साधना सम्यक्तप आहे, अशा प्रकारे हे चारी ही परिणाम आत्म्याचेच आहेत. म्हणून आचार्य सांगतात कीं, मी आत्म्याला शरण आहे या भावनेत चारीही आले.

अंतसल्लेखने मध्ये चार आराधनेचे आराधन सांगितले आहे. सम्यक्दर्शन ज्ञान, चारित्र, तप या चारींचा उद्योत, उद्यवन, निर्वहण, साधन, आरि निस्तरण अशा पांच प्रकारे आराधना सांगितली आहे. आत्म्याच्या आराधनेत (आत्म्याची भावना - एकाग्रता करण्यात) चारी ही आले. अशी अंतसल्लेखनेची भावना यात आली असे जाणणे तसेच आत्माही परममंगलरूप आहे. असे सांगितले आहे. ।।१०५।।

पुढे हा मोक्ष पाहुड ग्रंथ पूर्ण केला, त्याच्या ऐकण्याचे भक्ती करण्याचे फल सांगत आहेत :—

एवं जिणपण्णत्तं मोक्खस्स य `पाहुडं सुभत्तीए ।
जो पढइ सुणइ भावइ सो पावइ सासयं सुक्खं ।।१०६।।

एवं जिनप्रज्ञप्तं मोक्षस्य च प्राभृतं सुभक्त्या ।
यः पठति श्रृणोति भावयति सः प्राप्नोति शाश्वतं सौख्यं ।।१०६।।

अर्थ :— पूर्वोक्त प्रकारे जिनदेवाने सांगितलेल्या मोक्षपाहुड ग्रंथाला जे भक्तीभावाने वाचतात त्याची वरचेवर चिंतनरूप भावना करतात तसेच ऐकतात ते जीव शाश्वत सुख, नित्य अतिन्दिय ज्ञानानंदमय सुख प्राप्त करतात.

www.vitragvani.com



भावार्थ :— मोक्ष पाहुड मध्ये मोक्ष आणि मोक्षाच्या कारणाचे स्वरूप सांगितले आहे आणि जे मोक्षाच्या कारणांचे स्वरूप अन्य प्रकारे मानतात त्यांचा निषेध केला आहे. म्हणून या ग्रंथाचे वाचन केल्याने, ऐकल्याने त्याच्या यथार्थ स्वरूपाचे ज्ञान, श्रध्दान आचरण होते. त्या ध्यानामुळे कर्माचा नाश होतो, आणि त्याची सतत भावना केल्याने त्यात दृढ होवून एकाग्र ध्यानाची सामुग्री प्राप्त होते. म्हणून या ग्रंथाचे सतत वाचन, श्रवण करण्याची भावना ठेवली पाहिजे ।।१०६।।

अशा प्रकारे श्रीकुंदकुंद आचार्यांनी हा मोक्ष पाहुड ग्रंथ संपूर्ण केला याचा सारांश अशा प्रकारे आहे कीं, हा जीव शुध्ददर्शन-ज्ञानमयी-चेतनास्वरूप आहे. तरीही अनादिपासून पुद्‌गल कर्माच्या संयोगाने अज्ञान मिथ्यात्व, रागद्वेषादिक विभावरूप परिणमतो म्हणून नविन कर्माच्या सातत्याने संसारात भ्रमण करतो जीवाच्या प्रवृत्तिच्या सिध्दान्तात सामान्य रूपाने चौदागुण स्थाने निरूपित केली आहेत. यांच्या मिथ्यात्वाच्या उदयाने मिथ्यात्व गुणस्थान होते. मिथ्यात्वाची सहकारिणी अनंतानुबंधी कषाय आहे, केवळ त्यांच्या उदयाने सासादन गुणस्थान होते. आणि सम्यक्त्व, मिथ्यात्व दोन्हीच्या मिलापाने मिश्रप्रकृतिच्या उदयाने मिश्रगुणस्थान होते. या तीन गुणस्थानात तर आत्मभावनेचा अभावच आहे.

जेंव्हा काललब्धिच्या निमित्ताने जीवाजीव पदार्थाचे ज्ञान, श्रध्दान होते पर सम्यक्त्व होते तेंव्हा या जीवाला आपला आणि पराचा, हित अहिताचे तसेच हेय उपादेयाचे जाणणे होते तेंव्हा आत्म्याची भावना होते, तेंव्हा अविरतनामाचे चौथे गुण स्थान होते. जेंव्हा एकदेश परद्रव्याने निवृत्तिचे परिणाम होतात तेंव्हा जे एकदेश चारित्ररूप ५ वे गुणस्थान होणे. ते त्याला श्रावकपद म्हणतात. सर्वदेश परद्रव्यापासून निवृत्तिरूप परिणाम होतो तेंव्हा सकलचारित्र्याचे ६ वे गुणस्थान होते. यात काही संज्वलन चारित्रमोहाच्या तीव्रउदयाने स्वरूपाच्या साधनेत प्रमाद होतो म्हणून याचे नांव प्रमत्त आहे, या गुणस्थापासून वरच्या गुणस्थानाला साधू म्हणतात.

(स्व सन्मुखतारूप निजपरिणामाच्या प्राप्तिचे नांव ही उपादानरूप निश्चकाललब्धि आहे ते असेल तर त्यावेळी बाह्य द्रव्य क्षेत्र कालादि उचित सामग्री निमित्त आहे – उपचार कारण आहे अन्यथा उपचार ही नाहीत.)

जेंव्हा संज्वलन चारित्रमोहाचा मंद उदय होतो तेंव्हा प्रमादाचा अभाव होवून स्वरूपाच्या साधनेत मोठा उद्यम होतो. तेंव्हा याचे नांव अप्रमत्त असे ७ वे गुण स्थान असे दिले जाते. यात धर्मध्यानाची पूर्णता आहे. जेंव्हा या गुणस्थानात स्वरूपात लीन होताते तेंव्हा अतिशय अप्रमत्त होतात. श्रेणीचा प्रारंभ करतो. तेंव्हा त्यावर चारित्रमोहाचे अव्यक्त उदयरूप अपूर्वकरण अनिवृत्तिकरण सूक्ष्मसांपराय नांवाची ही गुणस्थाने होतात ४ थ्या पासून १० व्या सूक्ष्मसांपरायपर्यंत कर्माची निर्जरा विशेषरूपाने गुण श्रेणीरूप होते.

यानंतर मोहकर्माच्या अभावरूप ११ वे १२ वे उपशांतकषाय क्षीण कषाय गुणस्थाने होतात. याच्यामागे उरलेल्या तीन घाति कर्माचा नाश करून अनंत चतुष्टय प्रकट होवून अरहंत होतो हे सयोगी जिन नाम गुणस्थान आहे, येथे योगाची प्रवृत्ति आहे. योगाचा निरोधकरून अयोगी जिन नांवाचा चौदावे गुणस्थान होते. येथे अघातिया कर्माचा नाश करून, नंतर समयात निर्वाणपदाला प्राप्त होतो येथे संसाराच्या अभावाने मोक्षपद प्राप्त होते.

अशाप्रकारे सर्व कर्माच्या अभावरूप मोक्ष होतो, या कारणाने सम्यक्‌दर्शन-ज्ञान-चारित्र सांगितले आहे याची प्रवृत्ति ४ थ्या गुणस्थानापासून सम्यक्त्व प्रकट झाल्यावर एकदेश होते. येथून पुढे जस

www.vitragvani.com



जसा कर्माचा अभाव होतो तसतसे सम्यक्‌दर्शन आदिची प्रवृत्ति वाढत जाते आणि जसजसे यांची प्रवृत्ति वाढत जाते तसतसे कर्माचा अभाव होतो तेंव्हा १३ व्या गुणस्थानात अरहंत होवून जीवनमुक्त म्हणवले जाते आणि १४ व्या गुणस्थानाच्या शेवटी रत्नत्रयाची पूर्णता होते. म्हणून अघाति कर्माचा ही नाश होवून अभाव होतो तेंव्हा साक्षात् मोक्ष प्राप्त करून सिद्ध म्हणवले जातात.

अशाप्रकारे मोक्षाचा आणि मोक्षाच्या कारणांचे स्वरूप जिनागमातून जाणून आणि सम्यक्‌दर्शन - ज्ञान - चारित्र मोक्षाची कारणे सांगितली आहेत, याना निश्चय व्यवहारूप यथार्थ जाणून सेवन करावे तप ही मोक्षाचे कारण आहे. त्याला ही चारित्र्यात अंतभूर्त केले आहे आणि त्रयात्मक सांगितले आहेत, त्याला ही चारित्र्यात अंतर्भूत केले आहे. आणि त्रयात्मक सांगितले आहे. अशा प्रकारे या कारणाने प्रथमतर तद्‌भवच मोक्ष होतो. जो पर्यंत कारणाची पूर्णता होत नाही तत् पूर्वि कदाचित् आयुकर्माची पूर्णता झाली तर स्वर्गात देव होतो तेथे ही इच्छा राहाते हा शुभोपयोगाचा अपराध आहे. येथून पुन्हा मनुष्य जन्म घेवून सम्यक्‌दर्शनादि मोक्षमार्गाचे सेवन करून मोक्ष प्राप्त होतो अशी भावना राहाते त्या नंतर मोक्ष प्राप्त होतो (२ पुरूषार्थ सिध्दिउपाय श्लोक नं. २२०''रत्नत्रयरूप धर्म आहे ते निर्वाणाचे कारण आहे आणि त्या वेळी पुण्याचा आस्रव होतो तो अपराध शुभोपयोगाचा आहे '')

आता या पंचमकालात द्रव्य, क्षेत्र, काल, भावाची सामुग्री निमित्त नाही त्यामुळे तद्‌भव मोक्ष नाही तरी ही जो रत्नत्रयाचे शुध्दतापूर्वक पालन करेल तो येथून देव पर्याय प्राप्त करून नंतर मनुष्य होवून मोक्ष प्राप्त करून घेतो. म्हणून हा उपदेश आहे जसे शक्य होईल तसे रत्नत्रयाच्या प्राप्तिचा उपाय करणे. यात ही सम्यक्‌दर्शन प्रधान आहे त्या करीतां उपाय म्हणजे जिनागम समजून घेवून सम्यक्‌त्वाचा उपाय अवश्य करावा अशा प्रकारे या ग्रंथाचा सारांश जाणावा -

* छप्पय *

सम्यग्दर्शन ज्ञान चरण शिवकारण जानूं
ते निश्चय व्यवहाररूप नीकैं लखि मानूं ।
सेवो निशदिन भक्तिभाव धरि निजबल सारू,
जिन आज्ञा सिर धारि अन्यमत तजि अघकारू ।।
इस मानुषभवकूं पायकै अन्य चारित मति धरो
भविजीवनिकूं उपदेश यह गहिकरि शिवपद संचरो ।।१।।

* दोहा *

वंदूं मंगलरूप जे अर मंगलकरतार ।
पंच परम गुरु पद कमल ग्रंथ अंत हितकार ।।२।।

येथे कोणी विचारले कीं, ग्रंथात जेथे तेथे पंचनमोकाराचा महिमा बराच लिहिला गेला आहे. मंगलकार्यात विघ्नाला दूर करण्यासाठी यालाच प्रधान म्हटले आहे आणि यात पंचपरमेष्ठीला नमस्कार

www.vitragvani.com



आहे, ती पंचपरमेष्ठीची प्रधान झाली, पंचपरमेष्ठीला परम गुरू म्हटले यात या मंत्राचा महिमा तसेच मंगलरूप आणि या मुळें विघ्नाचे निवारण, पंचपरमेष्ठीची प्रधानता आणि गुरूपण तसेच नमस्कार करण्याचा योग्यपणा कसा आहे? ते सांगा.

याचे समाधान करण्यासाठी कांहीं लिहित आहेत :-

प्रथम पंचनमोकार मंत्र आहेत त्याची ३५ अक्षरे आहेत, हे मंत्राचे बीजाक्षर आहे तसेच यांचा योग सर्व मंत्रात प्रधान आहे, या अक्षरांचा गुरू आम्नयाने शुध्द उच्चारण असेल तसेच साधन यथार्थ असेल तेंव्हा हे अक्षर कार्यात् विघ्नदूर करण्यात कारण आहे म्हणून मंगलरूप आहे. 'म' अर्थात् पापाला गाळणारा त्याला मंगल म्हणतात. तसेच 'मंग' अर्थात सुखाला आणणार त्याला मंगल म्हणतात. यामुळें दोन्ही कार्ये होतात. उच्चारणाने विघ्न टळते, अर्थाचा विचार केल्याने सुख होते, यामुळे याला मंत्रात प्रधान म्हटले आहे. अशा प्रकारे (मंत्रात) मंत्राचा मोठेपणा (महिमा) आहे.

पंचपरमेष्ठीला यात नमस्कार आहे - ते पंचपरमेष्ठी अरहंत, सिध्द, आचार्य, उपाध्याय, आणि साधू हे आहेत. यांचे स्वरूप तर ग्रंथात प्रसिध्द आहे, तरी ही लिहितात :- हा अनादिनिधन, अकृत्रिम सर्वज्ञाच्या, परंपरेने सिध्द आगमात सांगितले आहे असे षट्द्रव्यरूप लोक आहे. यात जीवद्रव्य अनंतानंत आहे, आणि पुद्गलद्रव्य याच्या अनंतानंत पट आहे. एक एक धर्मद्रव्य, अधर्मद्रव्य, आकाशद्रव्य, आहे आणि कालद्रव्य असंख्यात द्रव्य आहे. जीव तर दर्शनज्ञानमयी चेतना स्वरूप आहे. अजीवपांच आहेत हे चेतनरहित जड आहे - धर्म, अधर्म, आकाश आणि काल ही चार द्रव्यें तर जसे आहेत तसेच राहातात यांना विकार परिणति नाही जीव पुद्गल द्रव्याच्या परस्पर निमित्त नैमेत्तिक भावाने विभाव परिणति आहे, यातही पुद्गल तर जड आहेत.याच्या विभाव परिणतिच्या दु:ख - सुखाचे संवेदन नाही आणि जीव, चेतन, आहे यामुळें सुख दु:खाचे संवेदन होते.

जीव अनंतानंत आहेत यात कांहीं संसारी आहेत. कांहीं संसारातून निवृत्त होवून सिध्द होतात. संसारी जीवात कांहीं तर अभव्य आहेत तसेच ते अभव्यासारखे आहेत, हे दोन्ही प्रकारचे संसारातून निवृत्त होवून सिध्द होतात, अशा प्रकारे जीवांची व्यवस्था आहे. आता यांचा संसाराची उत्पत्ति कशी आहे? ते सांगतात:-

जीवांच्या ज्ञानावरणादि आठ कर्माचा अनादिबंधरूप पर्याय आहे. या बंधाच्या उदयाच्या निमित्ताने जीव रागद्वेषमोहादि विभाव परिणतिरूप परिणमता आहे, या विभावपरिणतिच्या निमित्ताने नवीन कर्मबंध होतो, अशा प्रकारे यांच्या संतान परंपरेने चतुर्गतिरूप संसाराची प्रवृत्ति होते. या संसारात चारीगतीत अनेक प्रकारे सुखदु:खरूप होवून भ्रमण करतो. तेंव्हा कोणती वेळ अशी येते जेंव्हा मुक्त होणे, जवळ असेल तेंव्हा सर्वज्ञाच्या उपदेशाचे निमित्त घेवून आपल्या स्वरूपाला आणि कर्मबंधाच्या स्वरूपाला आपल्या आतील विभावाच्या स्वरूपाला जाणावे त्याचे भेदज्ञान करावे, तेंव्हा परद्रव्याला संसाराचे निमित्त जाणून त्यापासून विरक्त व्हावे, आपल्या स्वरूपाच्या अनुभवाचे साधन करावे - दर्शन ज्ञानरूप स्वभावात

स्थिर होण्याचे साधन करतात तेंव्हा यांचे बाहयसाधन हिंसादिक पंच पापांच्या त्यागरूप निर्ग्रंथपद दया करणारा साधु सर्व परिग्रहाच्या त्यागरूप निर्ग्रंथ दिंगबर मुद्रा धारण करावे पांच महाव्रते, पांच समिति, तीन गुप्ति यामध्यें प्रवर्तमान होतात तेंव्हा ते सर्व जीवावर दया करणारे साधू म्हणवले जातात.

यात तीन पदे असतात - जे आपण साधु होवून दुसऱ्याला साधू पदाची शिक्षा दीक्षा देतात त्यांना आचार्य म्हणतात. साधू होवून (जिनसूत्राला वाचतात) जिनसूत्राचे वाचन करतात, शिकवतांत त्यांना उपाध्याय म्हणतात. जे आपल्या स्वरूपाच्या साधनात राहातात त्यांना साधू म्हणतात, जे साधू होवून आपल्या स्वरूपाच्या साधनेच्या ध्यानाच्या बलाने चार घाति कर्मांचा नाश करून केवलज्ञान, केवलदर्शन, अनंतसुख आणि अनंतवीर्याला प्राप्त होतो ते अरहंत म्हणवले जातात. तेंव्हा तीर्थंकर तसेच सामान्य केवली जिन इंद्रादिकाने पूज्य होतात, त्यांची वाणी खिरते ज्यामुळे सर्व जीवावर उपकार होतो. अहिंसा धर्माचा उपदेश होतो, सर्व जीवांची रक्षा करतात यथार्थ पदार्थांचे स्वरूप सांगून मोक्षमार्ग दाखवतात अशा प्रकारे अरहंतपद होतेआणि जे चार अघाति कर्मांचा नाश करून सर्व कर्मापासून रहित होतात ते सिध्द म्हणवले जातात.

अशा प्रकारे ही पांच पदे आहेत. हे अन्य सर्व जीवापासून महान आहेत म्हणून पंचपरमेष्ठी म्हणवतात, यांचे नांव तसेच स्वरूपाचे दर्शन, स्मरण, ध्यान, पूजन, नमस्काराने अन्य जीवाला शुभ परिणाम होतात म्हणून पापाचा नाश होतो. वर्तमान विघ्नाचा विलय होतो, आगामी पुण्याचा बंध होतो म्हणून स्वर्गादिक शुभगति प्राप्त होते. यांच्या आज्ञेप्रमाणे वागल्याने परंपरेने संसारातून निवृत्त होतो म्हणून हे पांच परमेष्ठी सर्व जीवांचे उपकारी परमगुरू आहेत. सर्व संसारी जीवाना पूज्य आहेत. यांच्या शिवाय अन्य संसारी जीव राग - द्वेष - मोहादि विकाराने मलिन आहेत. हे पूज्य नाहीत यांचा महानपणा, गुरूपण, पूज्यपणा नाही आपणच कर्माने वश, मलिन आहात तेंव्हा दुसऱ्याचे पाप यांच्याकडून कसे नष्ट होईल?

अशा प्रकारे जिनमतामध्ये या पंचपरमेष्ठिचा महानपणा प्रसिध्द आहे आणि न्यायाच्या बलाने ही असेच सिध्द होते कीं, जे संसार भ्रमण रहित आहेत तेच दुसऱ्याच्या संसाराचे भ्रमण मिटवायला कारण होतात जसे ज्यांच्याजवळ धनादि वस्तु असेल तेच दुसऱ्याला धनादि देवूं शकतात आणि आपण दरिद्रि असाल तर दुसऱ्याची दरिद्रता कशी मिटवू शकाल? असे जाणावे. ज्याना संसाराचे विघ्न मिटवायचे असेल आणि संसारभ्रमणाच्या दु:खरूप जन्ममरणापासून रहित व्हायचे असेल तर अरहंतादिक परमेष्ठिचे नांवे मंत्र जपा. यांच्या स्वरूपाचे दर्शन, स्मरण ध्यान करा, यामुळे शुभ परिणाम होवून पापाचा नाश होतो, सर्व विघ्न टळते, परंपरेने संसाराचे भ्रमण मिटते. कर्माचा नाश होवून मुक्तीची प्राप्ति होते असा जिनमताचा उपदेश आहे म्हणून भव्य जीवाचा अंगिकार करणे योग्य आहे.

येथे कोणी म्हणत असेल - अन्यमतामध्यें ब्रह्मा, विष्णू, शिव आदि इष्ट देव मानतात त्यांची ही विघ्ने टळताना दिसतात तसेच त्यांच्या मतात राजादि मोठे मोठे पुरूष (पाहायला मिळतात) समाविष्ट

www.vitragvani.com



आहेत ? त्यामुळें असे कां म्हणता कीं, पंचपरमेष्ठीच प्रधान आहेत अन्यदेव नाहीत ? त्याना सांगतात, हे भाई ! जीवाना संसारभ्रमणाचे दु:ख आहे आणि संसार भ्रमणाचे कारण राग,द्वेष, मोहादिक परिणाम आहेत तसेच रागादिक वर्तमानात आकुलतामय दु:ख स्वरूप आहेत. म्हणून हे ब्रह्मादिक इष्टदेव सांगितले आहेत ते रागादि, काम क्रोधाने युक्त आहेत अज्ञान तपाच्या फलाने कित्येक जीव सर्व लोकात चमत्कारासहित राजादिक मोठे पद प्राप्त करून घेतात, त्याना लोक मोठे मानून ब्रह्मादिक भगवान आहेत असे म्हणूं लागतात आणि म्हणतात कीं, हे परमेश्वर ब्रह्माचा अवतार आहे तर असे मानण्याने कांहीं मोक्ष मार्गी तसेच मोक्षरूप होत नाहीत. संसारीच राहातात.

असेच अन्यदेव रागादिने दु:खरूप आहेत. जन्म मरणासहित आहेत ते परच्या संसाराचे दु:ख कसे मिटवतील ? विघ्न टाळणे आणि राजादिक मोठेपणा प्राप्त होणे हे त्या जीवाचे पहिले कांहीं शुभकर्म बांधले होते त्याचे ते फल आहे. पूर्वजन्मात कांहीं शुभ परिणाम केले होते म्हणून पुण्यकर्म बांधले गेले होते. त्यांच्या उदयाने कांहीं विघ्ने टळतात आणि राजादिक पदे ही प्राप्त होतात. कांहीं वेळा अज्ञान तप केले जाते त्याचे ही विपरीत फल मिळते. हे तर पुण्य पाप रूप संसार चक्र आहे यांत कांहींही मोठेपण नाही. ज्यामुळें संसारातील भ्रमण मिटते त्याचा महिमा जास्ती आहे, आणि ते (भ्रमण) वीतराग विज्ञान भावानेच मिटते, असे वीतराग विज्ञानभावयुक्त पंचपरमेष्ठी आहेत हेच संसारभ्रमणाचे दु:ख मिटवण्याचे कारण आहे.

वर्तमानात कांहीं पूर्वीच्या शुभकर्माच्या उदयाने पुण्याचा चमत्कार पाहून किंवा पापाचे दु:ख पाहून भ्रमात पडू नये, पुण्य, पाप दोन्ही संसारच आहेत यांच्या रहित मोक्ष आहे. म्हणून संसारातून सुटून मोक्ष मिळो असा उपाय केला पाहिजे. वर्तमानातील विघ्न सुध्दा जसे पंचपरमेष्ठीचे नांव, मंत्र, ध्यान, दर्शन स्मरणाने मिटेल तसे अन्य कोणाच्या नामस्मरणाने मिटणार नाही. कारण कीं, हे पंचपरमेष्ठीच शांतीरूप आहेत केवळ शुभ परिणामाचे कारण आहे. अन्य इष्ट रूप तर रौद्ररूप आहेत यांचे दर्शन, स्मरण, तर रागादिक तथा भयादिकाचे कारण आहे, यांच्यामुळे शुभपरिणाम होताना दिसतात. कोणाचे कदाचित् कांहीं धर्मानुरागाने शुभपरिणाम झाले तर झाले, सर्व कांहीं असे म्हणता येणार नाही ते तर प्राण्याच्या स्वाभाविक धर्मानुरागाने होते. म्हणून अतिशयवान शुभ परिणामाचे कारण तर शांतीरूप पंचपरमेष्ठीचे रूप आहे. म्हणून त्याचेच आराधन करा, वृथा खोटी युक्ती योजून भ्रमात पडू नये. असे जाणावे.

इति श्री कुन्दकुन्द स्वामी विरचित मोक्ष प्राभृताच्या पं. जयचंद्रजी छाबडा कृत देशभाषामय अनुवादाचा **डॉ. रेखा जैन** कृत मराठी भाषा अनुवाद समाप्त होत आहे. ।।६।।

# ✻ अथ लिंगपाहुड ✻

—: ७ :—

आता लिंगपाहुड वचनिकेचा अनुवाद लिहीत आहे :-

✻ दोहा ✻

जिनमुद्राधारक मुनी निजस्वरूपकूं ध्याय ।
कर्म नाशि शिवसुख लियो वंदूं तिनके पांय ।। १ ।।

अशा प्रकारे मंगल करण्यासाठी जिन मुनिनी शिवसुख प्राप्त केले त्याना नमस्कार करून श्री कुन्दकुन्द आचार्यकृत प्राकृत गाथा बंध लिंगपाहुड नामाच्या ग्रंथाच्या देशभाषामय वचनिकेचा मराठी अनुवाद लिहित आहे - प्रथम आचार्य मंगलासाठीं इष्ट सर्वांना नमस्कार करत आहेत :-

**काऊण णमोकारं अरहंताणं तहेव सिद्धाणं ।**
**वोच्छामि समणलिंगं पाहुडसत्थं समासेण ॥ १ ॥**

कृत्वा नमस्कारं अर्हतां तथैव सिद्धानाम् ।
वक्ष्यामि श्रमणलिंगं प्राभृतशास्त्रं समासेन ।। १ ।।

अर्थ :— आचार्य म्हणतात कीं, मी अरहंताना नमस्कार करून आणि तसेच सिध्दाला नमस्कार करून (श्री कुंदकुंद आचार्यकृत प्राकृत गाथाबंध) ज्यामध्यें श्रमणलिंगाचे निरूपण आहे असे पाहुडशास्त्र सांगत आहे.

भावार्थ :— या काळात मुनिंचे लिंग जसे जिनदेवाने सांगितले आहे त्यात विपरीतता आली त्याचा निषेध करण्यासाठीं हे लिंग निरूपण शास्त्र आचार्यानी सांगितले आहे या पूर्वी घातिकर्माचा नाश करून अनंत चतुष्टय प्राप्त करून अरहंत झाले, त्यानी यथार्थ रूपानी श्रमणाचा मार्ग प्रवर्तित केला आणि ते लिंग साधून

www.vitragvani.com



सिध्द झाले. अशा प्रकारे अरहंत सिध्दाना नमस्कार करून सिध्द झाले, अशा प्रकारे अरहंत सिध्दाना नमस्कार करून ग्रंथ लिहिण्याची प्रतिज्ञा केली आहे. ।।१ ।।

पुढे सांगतात कीं, जे लिंग बाह्य वेष आहे तो अंतरंग धर्म सहित कार्यकारी आहे :-

धम्मेण होइ लिंगं ण लिंगमत्तेण धम्मसंपत्ती ।
जाणेहि भावधम्मं किं ते लिंगेण कायव्वो ।। २ ।।

धर्मेण भवति लिंगं न लिंगमात्रेण धर्मसंप्राप्तिः ।
जानीहि भावधर्मं किं ते लिंगेन कर्तव्यम् ।। २ ।।

<u>अर्थ :</u>— धर्म सहित तर लिंग असते, परंतु फक्त लिंगाने धर्माची प्राप्ति होत नाही म्हणून हे भव्यजीवा! तूं भावरूप धर्माला जाण आणि केवळ लिंगाने तुझे कोणते कार्य होते अर्थात् कोणतेच कार्य होत नाही .

<u>भावार्थ :</u>— येथे असे जाणावे कीं, लिंग असे चिन्हाचे नांव आहे तो बाह्य वेष धारण करणे मुनिचे चिन्ह आहे असे चिन्ह जर अंतरंग वीतराग स्वरूप धर्म असेल तर त्या समवेत हे चिन्ह सत्यार्थ होते आणि या वीतरागस्वरूप आत्म्याच्या धर्माशिवाय लिंग जे बाह्य वेषाने धर्माची संपत्ति - सम्यक् प्राप्ति नाही, म्हणून उपदेश दिला आहे कीं, अंतरंग भावधर्म रागद्वेष रहित आत्म्याचे शुध्दज्ञान, दर्शनरूप स्वभाव धर्म आहे त्याला हे भव्य, तू जाण या बाह्य लिंग मात्र वेषाचे काय काम?

कांहींहीं नाही येथे असे ही जाणावे कीं, जिनमतामध्यें तीन लिंग सांगितले आहेत - १. मुनिंचे यथाजात दिगम्बर लिंग २. उत्कृष्ट श्रावक ३. आर्यिका. या प्रमाणे तिन्ही लिंगे धारण करणारे भ्रष्ट होवून कुक्रिया करतात त्यांचा निषेध आहे. अन्य मताचे कितीतरी वेष आहेत याना ही धारण करून कुक्रिया करू नये असे सांगितले आहे ।।२ ।।

पुढे सांगतात कीं, जे जिन लिंग निर्ग्रंथ दिंगबर रूपाला ग्रहण करून कुक्रिया करून हसे करून घेतात ते जीव पापबुध्दि आहेत :-

जो पावमोहिदमदी लिंगं घेत्तूण जिणवरिंदाणं ।
उवहसइ लिंगिभावं लिंगिम्मिय णारदो लिंगी ।।३।।

यः पापमोहितमतिः लिंगं गृहीत्वा जिनवरेन्द्राणाम् ।
उपसति लिंगभावं लिंगिषु नारदः लिंगी ।।३ ।।

<u>अर्थ :</u>— जो जिनवरेंद्र अर्थात् तीर्थंकर देवाचे लिंग नग्न दिंगबररूपाला ग्रहण करून लिंगीपणाला हास्यास्पद समजतो, तो लिंगी अर्थात् वेषधारी ज्याची बुध्दि पापाने मोहित आहे तो नारदा सारखा आहे किंवा या गाथेचा

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



४ थ्या पादाचा पाठ असा आहे - ''लिंग णासेदि लिंगीणं'' याचा अर्थ हा लिंगी अन्य जे कोणी लिंगाचे धारक आहेत त्यांच्या लिंगाना ही नष्ट करतात असे सांगतात कीं लिंगी सगळे असेच आहेत.

भावार्थ :- लिंगधारी होवून ही पापबुध्दिने कांहीं कुक्रिया केली तर त्यामुळे लिंगीपणा हास्यापद समजले जावून कार्यकारी नाही असे समजले जाते. लिंगीपणा भावशुध्दिने शोभा देतो. जेव्हा भाव बिघडतात तेंव्हा बाहय कुक्रिया करू लागतो तेंव्हा त्या लिंगाला तर लज्जित करतोच आणि अन्य लिंगाला ही कलंकित करतो, लोक म्हणतात कीं, लिंगी असेच असतात किंवा जसा नारदाचा वेष आहे त्यात तो आपल्या इच्छेनुसार स्वच्छंद प्रवर्ततो तसेच हा वेषी ही समजला जातो म्हणून आचार्यांचा सांगण्याचा आशय असा आहे कीं, जिनेंद्राच्या वेषाला लाजवणे योग्य नाही ।।३।।

पुढे लिंग धारण करून कुक्रिया करतात त्यांना प्रकट करतात :-

णच्चदि गायदि तावं वायं वाएदि लिंगरूवेण ।
सो पावमोहिदमदी तिरिक्खजोणी ण सो समणो ।।४।।

नृत्यति गायति तावत् वाद्यं वादयति लिंगरूपेण ।
सः पापमोहितमतिः तिर्यग्योनिः न सः श्रमणः ।।४।।

अर्थ :— जो लिंगरूप धारण करून नृत्य करतात, गातात वाद्ये वाजवतात ते पापाने मोहित बुध्दिवाले झालेले असतात, तिर्यंच योनितील आहेत पशु आहेत, श्रमण नाहीत.

भावार्थ :— लिंग धारण करून भाव बिघडऊन नाचणे, गाणे वाजवणे(वाद्ये) इत्यादि क्रिया करतात, ही पापबुध्दि आहे, पशु आहे अज्ञानी आहे. मनुष्य नाही, मनुष्य असेल तर श्रमणपणा ठेवावा. जसे नारद वेषधारी नाचतो, गातो, वाजवतो (वाद्ये) तसाच हा वेषधारी झाला तर उत्तर वेषाला लज्जास्पद आहे. म्हणून लिंग धारण करून असे करणे योग्य नाही ।।४।।

सम्मूहदि रक्खेदि य अट्टं झाएदि बहुपयत्तेण ।
सो पावमोहिदमदी तिरिक्खजोणी ण सो समणो ।।५।।

समूहयति रक्षति च आर्त्त ध्यायति बहुप्रयत्नेन ।
सः पापमोहितमतिः तिर्यग्योनिः न सः श्रमणः ।।५।।

अर्थ :— जो निर्ग्रंथ लिंग धारण करून परिग्रहाला संग्रहरूप करतो किंवा त्याची इच्छा चिंतवन ममत्व करतो आणि त्या परिग्रहाची रक्षा करतो. त्याचा सतत प्रयत्न करतो. त्याच्यासाठीं आर्तध्यान निरंतर करत असतो.

www.vitragvani.com



तो पापाने मोहित बुध्दिवाला आहे. तिर्यंचयोनि आहे, पशु आहे, अज्ञानी आहे श्रमण तर नाही, श्रमणपणाला बिघडवतो असे जाणावे. ।।५।।

पुढे पुन्हा सांगतात :-

कलहं वादं जूवा णिच्चं बहुमाणगव्विओ लिंगी ।
वच्चदि णरयं पाओ करमाणो लिंगिरूवेण ।।६।।

कलहं वादं द्यूतं नित्यं बहुमानगर्वितः लिंगी ।
व्रजति नरकं पापः कुर्वाणः लिंगिरूपेण ।।६।।

अर्थ :— जो लिंगी मान, कषायाने गर्व करतो निरंतर कलह करतो वाद करतो, द्यूत क्रिडा करतो, तो पापी नरकाला प्राप्त होतो आणि पापाने असेच करत राहातो.

भावार्थ :— जो गृहस्थ अशी क्रिया करतो त्याचा तो संभ्रम नाही कारण कदाचित् गृहस्थ उपदेश आदि निमित्ताने कुक्रिया करत राहिला तरी नरकात जात नाही परंतु लिंग धारण करून अशी कुक्रिया केली तर त्याला उपदेशाचा लाभ होत नाही, तो नरकालाच पात्र होतो. ।।६।।

पुढे आणखी म्हणतात :-

पाओपहदभावो सेवदि य अबंभु लिंगिरूवेण ।
सो पावमोहिदमदी हिंडदि संसारकांतारे ।।७।।

पापोपहतभावः सेवते च अब्रह्म लिंगिरूपेण ।
सः पापमोहितमतिः हिंडते संसारकांतारे ।।७।।

अर्थ :— पापाने घात केला गेला आहे. आत्मभाव असा होतो आणि लिंगीचे रूप करून अब्रह्म सेवन करतो. तो पापाने मोहित बुध्दिवाला लिंगी संसाररूपी कांतार - वनांत भ्रमण करतो.

भावार्थ :— प्रथम तर लिंग धारण केले आणि नंतर असा पाप परिणाम झाला कीं, व्यभिचार सेवन करूं लागला, त्याच्या पाप बुध्दिचे काय सांगायचे? त्याचे संसारात भ्रमण कां असे नां? ज्याला अमृत ही विषरूप झाले त्याचा रोग बरा होण्याची काय आशा ? तसेच हे झाले, अशाचा संसार करणे कठीण आहे ।।७।।

पुढे पुन्हा सांगतात :-

दंसणणाणचरित्ते उवहाणे जइ ण लिंगरूवेण ।
अट्टं झायदि झाणं अणंतसंसारिओ होदि ।।८।।

दर्शनज्ञानचारित्राणि उपधानानि यदि न लिंगरूपेण ।
आर्त्तं ध्यायति ध्यानं अनंतसंसारिकः भवति ।।८।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



अर्थ:— जर लिंगरूप घेवून दर्शन, ज्ञान, चारित्राला धारण केले नाही आणि आर्त्तध्यानाला जो जपतो तो असा लिंगी अनंतसंसारी होतो.

भावार्थ :— लिंग धारण करून दर्शन ज्ञान चारित्र्याचे सेवन करायचे असते ते तर केले नाही आणि परिग्रह कुटुम्ब आदि विषयांचा जे परिग्रह सोडले त्याची पुन्हा चिंता करून आर्त ध्यान केले तर 'अनंत संसारीच म्हणावे लागेल ! याचे तात्पर्य असे आहे कीं, सम्यक्दर्शनादिरूप भाव तर प्रथम झाले नाहीत आणि कांहीं कारणाने लिंग धारण केले तर काय उपयोग? प्रथम भाव शुध्द करून लिंग धारण करणे योग्य आहे ।।८।।

पुढे सांगतात कीं, जर भावशुध्दिशिवाय गृहस्थपद सोडले तर असे (विपरीत) भाव होतात :-

जो जोडेदि विवाहं किसिकम्मवणिज्जजीवघादं च ।
वच्चदि णरयं पाओ करमाणो लिंगिरूवेण ।।९।।

यः योजयति विवाहं कृषिकर्मवाणिज्यजीवघातं च ।
व्रजति नरकं पापः कुर्वाणः लिंगिरूपेण ।।९।।

अर्थ :— जे गृहस्थींचे विवाह जमवतात, कृषिकर्म - शेती करणे शेतकऱ्याचे काम व्यापार, वैश्यांचे कार्य आणि जीवघात अर्थात् वैद्यकर्मासाठीं जीवघात करणे अशी कार्ये करतात ते लिंगरूप धारण करून अशी पापकर्मे केल्यामुळे नरकाला प्राप्त होतात.

भावार्थ :— गृहस्थपद सोडून शुभभावाशिवाय लिंगी होतो, त्याच्या भावाची वासना मिटली नाही तर लिंगाचे रूप धारण करून ही गृहस्थाचे काम करू लागला स्वत: लग्न करत नाही मात्र दुसऱ्याची लग्ने जमवतात, तसेच शेती, व्यापार,जीव हिंसा करतात आणि गृहस्थाना करायला लावतात. त्यामुळे पापी होवून नरकात जातात असे वेष धारण करण्यापेक्षा गृहस्थधर्मच बरा होता निदान पदाचे पाप तरी लागत नाही. म्हणून असे वेष धारण करणे उचित नाही असा उपदेश आहे. ।।९।।

पुढे आणखी म्हणतात :-

चोराण 'लाउराण य जुद्ध विवादं च तिव्वकम्मेहिं ।
जंतेण दिव्वमाणो गच्छदि लिंगी णरयवासं ।।१०।।

चौराणां लापरागां च युद्धं विवादं च तीव्रकर्मभिः ।
यंत्रेण दीव्यमानः गच्छति लिंगी नरकवासं ।।१०।।

अर्थ :— जो लिंगी अशा प्रकारचे वर्तन करतो, जो चोराशी, खोटे बोलणाऱ्यांशी युध्द आणि वाद करतो,

www.vitragvani.com



आणि तीव्र कर्म ज्यामुळें पाप उत्पन्न होते असे तीव्र कषायांच्या कार्यामुळे तसेच यंत्र अर्थात् चौपट, जुगार, फासे, हिंदोळे असे खेळ खेळत राहातो, तो नरकात जातो. येथे 'लाउराण' म्हणजे राजकार्य करणाऱ्याबरोबर युध्द करतात वाद करतात, असे जाणावे.

भावार्थ :— लिंग धारण करून असे कार्य केले तर तो नरकातच जातो. यात कांहींच संशय नाही ।।१० ।।

पुढे सांगतात कीं, जो लिंग धारण करून या प्रमाणे लिंग योग्य कार्य करून ही दु:खी राहातो, त्या कार्याचा आदर करत नाही, तो ही नरकातच जातो :-

**दंसणणाणचरित्ते तवसंजमणियमणिच्चकम्ममि ।**
**पीडयदि वट्टमाणो पावदि लिंगी णरयवासं ।।११।।**

दर्शनज्ञान चारित्रेषु तपः संयमनियमनित्यकर्मसु ।
पीडयते वर्त्तमानः प्राप्नोति लिंगी नरकवासम् ।।११।।

अर्थ :— जो लिंग धारण करून या क्रिया करून बाध्यमान होवून पीडेला प्राप्त होतो. दु:खी होतो तो लिंगी नरकवासाला प्राप्त होतो. त्या क्रिया काय आहेत? प्रथम तर दर्शन, ज्ञान, चारित्र्यात यांचे निश्चय, व्यवहार रूप धारण करणे, तप - अनशनादि १२ प्रकार शक्तीनुसार करणे, संयम-इंद्रियाना आणि मनाला वश करणे तसेच जीवाची रक्षा करणे, नियम अर्थात् नित्य समयात नित्य करणे या लिंगाच्या योग्य क्रिया आहेत या क्रिया करत असताना दु:खी होतो तो नरकाला प्राप्त होतो. ("आतम हित हेतु विराग - ज्ञान, सोलखै आपकोकष्टदान" मुनिपद = मोक्षमार्ग, त्याला तो कष्ट दाता मानतो म्हणून तो मिथ्या रूचिवान आहे )

भावार्थ :— लिंग धारण करून जे कार्य करायचे होते त्याचा निरादर करतो आणि प्रमाद करता, लिंगाचे योग्य कार्य करताना दु:खी होतो तेंव्हा जाणा कीं, यांचे भावशुध्दिपूर्वक लिंगग्रहण झाले नाही आणि भाव बिघडल्यावर तर त्याचे फल नरकच होते. असे जाणावे ।।११ ।।

पुढे सांगतात कीं, जो भोजनासाठीं रसलोलूप असतो तो ही लिंगाला लज्जित करतो :-

**कंदप्पाइय वट्टइ करमाणो भोयणेसु रसगिद्धिं ।**
**मायी लिंगविवाई तिरिक्खजोणी ण सो समणो ।।१२।।**

कंदर्पादिषु वर्त्तते कुर्वाणः भोजनेषु रसगृद्धिम् ।
मायावी लिंगव्यवायी तिर्यग्योनिः न सः श्रमणः ।।१२।।

अर्थ :— जो लिंग धारण करून ही भोजनामध्यें (निरनिराळ्या) रसांची आसक्ती धरतो, कांदा आदि चे सेवन करतो त्याला काम सेवनाची इच्छा तसेच प्रमाद निद्रा अधिक मायेत वाढते, त्यामुळें तो लिंग व्यवायी अर्थात्

व्याभिचारी होतो. मायावी अर्थात् कामसेवनासाठी अनेक प्रकार करतो जो असा होतो तो तिर्थंच योनिचा आहे, पशुतुल्य आहे, मनुष्य नाही म्हणून श्रमण ही नाही.

भावार्थ:— गृहस्थपद सोडून ही आहारात लोलुपता ठेवणे, गृहस्थपदामध्यें तर अनेक रसदार भोजने मिळत होती तर तो (गृहस्थधर्म) का सोडला? म्हणून सांगावे वाटते कीं, आत्मभावनेचा रस जाणलाच नाही म्हणून भोजनरसाबरोबरच विषय सुखाची ही इच्छा होते त्यामुळें व्याभिचाराला प्रवृत्त होवून लिंगाला लज्जित करतो, अशा लिंगापेक्षा तर गृहस्थपदच श्रेष्ठ आहे असे जाणावे.

पुढे हे आणखी विशेष रूपाने सांगतात :-

धावदि पिंडणिमित्तं कलहं काऊण भुञ्जदे पिंडं ।
अवरुपरूई संतो जिणमग्गि ण होइ सो समणो ॥१३॥

धावति पिंडनिमित्तं कलहं कृत्वा भुंक्ते पिंडम् ।
अपरप्ररूपी सन् जिनमार्गी न भवति सः श्रमणः ॥१३॥

अर्थ :— जो लिंगधारी पिंड आहाराच्या निमित्ताने भटकतो (धावतो) आहारासाठीं कलह करतो, मग आहार घेतो, खातो आणि त्या निमित्ताने दुसऱ्याबरोबर ईर्षा करतो तो श्रमण जिनमार्गी नाही.

भावार्थ :— या काळात जिनलिंगापासून भ्रष्ट होवून प्रथम अर्ध वस्त्र धारक झाले नंतर त्यांच्यात श्वेतांबरादिक संघ झाले, त्यांनी शिथिलाचार पुष्ट करून लिंगाची प्रवृत्ति बिघडवली. त्यांचा हा निषेध आहे. यांच्यात आज ही कित्येक असे दिसतात जे आहारासाठीं शीघ्र धावतात, ईर्यापथाची शुध्द राहात नाही आणि आहार गृहस्थाच्या घरातून आणून दोघे चौघे एकत्र बसून खातात त्यात वाटणी करण्यात सरस, निरस झाले तर आपसात भांडण करतात आणि त्या निमित्ताने परस्पर ईर्षा करतात, अशा प्रकारची प्रवृत्ति केली तर श्रमण कसे काय म्हणायचे? ते तर जिनमार्गी नाहीत, कलीकालाचे वेषधारी आहेत याना साधू मानणारे ही अज्ञानी आहेत. ॥१३॥

पुढे पुन्हा सांगतात :-

गिण्हदि अदत्तदाणं परणिंदा वि य परोक्खदूसेहिं ।
जिणलिंगं धारंतो चोरेण व होइ सो समणो ॥१४॥

गृह्णाति अदत्तदानं परनिंदामपि च परोक्षदूषणैः ।
जिनलिंगं धारयन् चौरेणेव भवति सः श्रमणः ॥१४॥

अर्थ :— जो न दिलेले दान घेतो आणि परोक्ष परच्या दूषणाने 'परं'ची निंदा करतो तो जिनलिंग करून सुध्दा चोराप्रमाणे श्रमण आहे.

भावार्थ :- जो जिनलिंग धारण केल्याशिवाय आहार आदिचे ग्रहण करतो 'पर'ला देण्याची इच्छा नाही, परंतु कांहीं भयादिक उत्पन्न करून घेणे तसेच निरादराने घेणे लपून छपून कार्य करणे हे तर चोराचे कार्य आहे. हा वेष धारण करून असे करूं लागला तर तो चोरच झाला! असा वेषी होणे योग्य नाही.

पुढे म्हणतात कीं, जो लिंग धारण करून असे वर्तन करतो ते श्रमण नाहीत :-

उप्पडदि पडदि धावदि पुढवीओ खणदि लिंगरूवेण ।
इरियावह धारंतो तिरिक्खजोणी ण सो समणो ॥१५॥

उत्पतति पतति धावति पृथिवीं खनति लिंगरूपेण ।
ईर्यापथं धारयन् तिर्यग्योनिः न सः श्रमणः ॥१५॥

अर्थ :— जो लिंग धारण करून ईर्यापथ शोधत चालयचे होते त्याने तसे न चालता, पळत उड्या मारल्या खाली पडला परत उठून पळू लागला आणि जमिन खोदत असे पाय आपटले कीं जमिनीला भेगा पडल्या असे तिर्यंचयोनीचे आहेत, पशु आहेत, अज्ञानी आहेत मनुष्य नाहीत ॥१५॥

पुढे म्हणतात कीं, जे वनस्पति आदि स्थावर जीवाच्या हिंसेने कर्मबंध होतो ते न योजता स्वच्छंद होवून वर्तती तो श्रमण नाही :-

बंधो णिरओ संतो सस्सं खंडेदि तह य वसुहं पि ।
छिंददि तरुगण बहुसो तिरिक्खजोणी ण सो समणो ॥१६॥

बंधं नीरजाः सन् सस्यं खंडयति तथा च वसुधामपि ।
छिनत्ति तरुगणं बहुशः तिर्यग्योनिः न सः श्रमणः ॥१६॥

अर्थ :— जो लिंग धारण करून वनस्पति आदिच्या हिंसेने बंध होतो त्याला दोष न मानता बंधाला जुमानत नाही अन्नाला कुटतो आणि तसेच जमिन खोदतो तसेच वेळोवेळी वृक्षाचे छेदन करतो असा लिंगी तिर्यंचयोनि आहे, पशु आहे, अज्ञानी आहे, श्रमण नाही.

भावार्थ :— वनस्पति आदि स्थावर जीव जिन सूत्रात सांगितले आहेत आणि यांच्या हिंसेने कर्मबंध होणे ही म्हटले आहे? अशा प्रकारे मानणारा तसेच वैद्य कर्मादिच्या निमित्ताने औषधादिला, धान्याला पृथ्वीला तसेच वृक्ष तोडतो, खोदतो, छेदतो तो अज्ञानी पशु आहे लिंग धारण करून श्रमण म्हणवला जातो तो श्रमण नाही ॥१६॥

पुढे सांगतात कीं, तो लिंग धारण करून स्त्रीयावर प्रेम करतो आणि पर ला दूषण देतो तो श्रमण नाही :-

रागो करेदि णिच्चं महिलावग्गं परं च दूसेइ ।
दंसणणाणविहीणो तिरिक्खजोणी ण सो समणो ॥१७॥

रागं करोति नित्यं महिलावर्गं परं च दूषयति ।
दर्शनज्ञानविहीनः तिर्यग्योनिः न सः श्रमणः ॥१७॥

अर्थ :— जो लिंग धारण करून स्त्रियांच्या समुहाच्या प्रति तो निरंतर राग- प्रीति करतो आणि दुसऱ्या कोणाला जो निर्दोष आहे त्याला दोष लावतो तो दर्शन, ज्ञान रहित आहे, असा लिंगी तिर्यंच योनि आहे, पशुसमान आहे अज्ञानी आहे, श्रमण नाही.

भावार्थ :— लिंग धारण करणाऱ्याना सम्यक्दर्शन, ज्ञान होते आणि परद्रव्याविषयी राग द्वेष न करणारे चारित्र होते. तेथे जो स्त्री समुहाशी राग, प्रीति करतो आणि दुसऱ्याला दोष देवून द्वेष करतो, व्याभिचारी स्वभाव आहे त्याला कसले दर्शन, ज्ञान? आणि कसले चारित्र ? लिंग धारण करून लिंगाला योग्य आचरण करणे आवश्यक होते ते केले नाही तेंव्हा अज्ञानी पशु समानच आहेत, श्रमण म्हणवला जातो तो स्वत: ही मिथ्यादृष्टीच आहे. आणि दुसऱ्यालाही मिथ्यादृष्टी बनवणारा आहे. हे त्यांचे वागणे युक्त नाही . ॥१७॥

पुढे आणखी म्हणतात :-

पव्वज्जहीणगहिणं णेहिं सीसम्मि वट्टदे बहुसो ।
आयारविणयहीणो तिरिक्खजोणी ण सो समणो ॥१८॥

प्रव्रज्याहीनगृहिणि स्नेहं शिष्ये वर्त्तते बहुशः ।
आचारविनयहीनः तिर्यग्योनिः न सः श्रमणः ॥१८॥

अर्थ :— जो लिंगी (प्रव्रज्याहीन) अर्थात् दीक्षा रहित गृहस्थाबरोबर आणि शिष्यात खूप स्नेह ठेवतो, आणि आचार अर्थात् मुनिंची क्रिया आणि गुरूविषयी विनयंरहित असतो तो तिर्यंचयोनिचा आहे, पशु आहे अज्ञानी आहे श्रमण नाही.

भावार्थ :— गृहस्थाबरोबर मैत्री ठेवतो आणि शिष्याबरोबर खूप स्नेह ठेवतो तसेच मुनिआचार (प्रवृत्ति) आवश्यक आदि कांहीं करत नाही, गुरूंच्या विरोधी असतो, विनयादिंक करत नाही असा लिंगी पशुसमान आहे, त्याला साधू म्हणत नाहीत. ॥१८॥

पुढे म्हणतात कीं, जे लिंग धारण करून पूर्वोक्त प्रकारे वर्तन करतो तो श्रमण नाही, असे संक्षेपाने म्हणतात :-

एवं सहिओ मुणिवर संजदमज्झम्मि वट्टदे णिच्चं।
बहुलं पि जाणमाणो भावविणट्ठो ण सो समणो ॥१९॥

एवं सहितः मुनिवर ! संयतमध्ये वर्त्तते नित्यम् ।
बहुलमपि जानन् भावविनष्टः न सः श्रमणः ॥१९॥

अर्थ:— अर्थात् पूर्वोक्त प्रकारे वर्तन करतो, तो जरी श्रेष्ठ मुनि, संयंमी मुनिंच्या मध्यें निरंतर राहात असेल आणि अनेक शास्त्रे जाणत असेल तरी ही 'भावांनी' नष्ट आहे म्हणून श्रमण नाही.

भावार्थ :— असा पूर्वोक्त प्रकारचा लिंगी जो नेहमी मुनि मध्यें राहातो अनेक शास्त्राना जाणतो तरी ही भाव अर्थात् शुध्द ज्ञान चारित्ररूप परिणामाने रहित आहे, म्हणून तो मुनि नाही, भ्रष्ट आहे अन्य मुनिंचे भाव बिघडवणारा आहे ॥१९॥

पुढे पुन्हां म्हणतात कीं, जे स्त्री यांशी संसर्ग (जवळीक) ठेवतात ते ही श्रमण नाहीत :-

दंसणणाणचरित्ते महिलावग्गम्मि देहि वीसट्ठो।
पासत्थ वि हु णियट्ठो भावविणट्ठो ण सो समणो ॥२०॥

दर्शनज्ञानचारित्राणि महिलावर्गे ददाति विश्वस्तः ।
पार्श्वस्थादपि स्फुटं विनष्टः भावविनष्टः न सः श्रमणः ॥२०॥

अर्थ :— जे लिंग धारण करून स्त्रियांच्या समुहात त्यांच्यात विश्वास निर्माण करून आणि त्यांच्यावर विश्वास ठेवून दर्शन, ज्ञान चारित्र देतो त्याना सम्यक्त्व सांगतो. शिकणे शिकवण्याचे ज्ञान देतो, दीक्षा देतो, वर्तन शिकवतो, अशा प्रकारे विश्वास निर्माण करून त्यांच्यात राहातो तो असा लिंगी तर पार्श्वस्थापेक्षा ही निकृष्ट आहे, प्रकटभावाने विनष्ट आहे. श्रमण नाही .

भावार्थ :— लिंग धारण करून स्त्रियांच्यात विश्वास उत्पन्न करून त्यांना निरंतर, शिकवणे, शिकणे, मैत्री ठेवणे, असणारा तो खोटा आहे असे जाणावे.

पुढे पुन्हा म्हणतात :-

पुंच्छलिघरि जो भुञ्जइ णिच्चं संथुणदि पोसए पिंडं।
पावदि बालसहावं भावविणट्ठो ण सो सवणो ॥२१॥

पुंश्चलीगृहे यः भुंक्ते नित्यं संस्तौति पुष्णाति पिंडं ।
प्राप्नोति बालस्वभावं भावविनष्टः न सः श्रमणः ॥२१॥

अर्थ :— जो लिंगधारी पुश्चली अर्थात् व्याभिचारिणी स्त्रियांच्या घरी भोजन करतो आहार करतो आणि नित्य त्यांची स्तुति करतो कीं, ही मोठी धर्मात्मा आहे, हिला साधू विषयी खूप भक्ती आहे, अशा प्रकारे त्यांची स्तुती प्रशंसा करतो, अशा रीतिने शरीराचे पालन करतो असा लिंगी बालस्वभावाला प्राप्त होतो, अज्ञानी असतो. भावाने विनिष्ट होतो तो श्रमण नाही.

भावार्थ :— जो लिंग धारण करून व्याभिचारीणीचा आहार घेवून (पिंडाचे) शरीराचे पालन करतो, त्याची नित्य प्रंशसा करतो, तेंव्हा लक्षात घ्या - कीं, तो ही व्यभिचारीच आहे, अज्ञानी आहे, त्याला लाज वाटत नाही, अशा प्रकारे तो भावविनिष्ट आहे मुनित्त्वाचे भाव नाहीत तर मुनि कसे ? ।।२१ ।।

पुढे हे लिंग पाहुड संपूर्ण करताना म्हणतात कीं, जे धर्माचे यथार्थ रूपाने पालन करतात तो उत्तम सुख प्राप्त करतो :-

इय लिंगपाहुडमिणं सव्वं बुद्धेहिं देसियं धम्मं ।
पालेइ कट्ठसहियं सो गाहदि उत्तमं ठाणं ।।२२।।

इति लिंगप्राभृतमिदं सव बुद्धैः देशितं धर्मम् ।
पालयति कष्टसहितं सः गाहते उत्तमं स्थानम् ।।२२।।

अर्थ :— अशा प्रकारे या लिंग पाहुड शास्त्राचा - सर्वबुध्द जो ज्ञानी गणधरादि त्यांनी उपदेश दिला आहे, त्याला जाणून जो मुनिधर्माला कष्टसहित मोठ्या यत्नाने पालतात, रक्षा करतात, तो उत्तम स्थान मोक्षाला प्राप्त करून घेतो.

भावार्थ :— हे मुनिचे लिंग ते मोठ्या पुण्याच्या उदयाने प्राप्त होते ते प्राप्त करून ही पुन्हा खोटे कारण काढून ते बिघडवतो त्यामुळे हे जाणा कीं, तो फारच अभागी आहे - चिन्तामणि रत्न प्राप्त करून ते कवडीमोलाने नष्ट करतो म्हणून आचार्यांनी उपदेश दिला आहे कीं, असे पद प्राप्त करून त्याची मोठ्या प्रयत्नाने रक्षा करा. कुसंगती करून ते बिघडवले तर जसे प्रथम संसार भ्रमण होते तसेच पुन्हा संसारात अनंतकाल भ्रमण होईल आणि यत्नपूर्वक मुनित्वाचे पालन केले तर शिघ्र ही मोक्ष प्राप्त करून घ्याल. म्हणून ज्याना मोक्ष पाहिजे तो मुनिधर्माला प्राप्त करून यत्नसहित पालन करा, परिषहाचा उपसर्गाचा उपद्रव आला तर चलायमान होवूं नका, हा श्री सर्व देवाचा उपदेश आहे. ।।२२ ।।

अशा प्रकारे लिंग पाहूड ग्रंथ पूर्ण होत आहे. याचा संक्षिप्त विचार असा आहे कीं, या पंचमकालात जिनलिंग धारण करून पुन्हा दुर्भिक्षाच्या निमित्ताने भ्रष्ट वेष बिघडवणारे 'अर्ध्दफालक' म्हणून ओळखले गेले, यांच्यातले पुन्हा श्वेताम्बर झाले, त्यात ही 'यापनीय' झाले इत्यादि होवून शिथिलचाराला पुष्ट करण्याचे

www.vitragvani.com



शास्त्र रचून स्वच्छंद झाले, यातील कितीतरी एकदम निंद्य प्रवृत्ति करूं लागले त्यांचा निषेध करण्यासाठीं तसेच सर्वांना सत्य उपदेश देण्यासाठीं हा ग्रंथ आहे, तो समजून घेवून त्याचे श्रध्दान करणे. अशा प्रकारे निंद्य आचरणवाल्या साधूनां मोक्ष मार्गी न मानणे त्यांची वंदना व पूजा न करणे हा उपदेश आहे.

* छप्पय *

लिंग मुनीको धारि पाप जो भाव बिगाड़ै
वह निंदाकूं पाय आपको अहित विथारै ।
ताकूं पूजै थुवै वंदना करै जु कोई
वे भी तैसे होइ साथि दुरगतिकूं लेई ।।
इससे जे सांचे मुनि भये भाव शुद्धिमैं थिर रहे ।
तिनि उपदेश्या मारग लगे ते सांचे ज्ञानी कहे ।।१।।

* दोहा *

अंतर बाह्य जु शुद्ध जे जिनमुद्राकूं धारि ।
भये सिद्ध आनंदमय बंदूं जोग सँवारि ।। २ ।।

इति श्री कुन्दकुन्दाचार्य स्वामी विरचित श्री लिंग प्राभृताचे जयपूर निवासी पं. जयचंद्रजी छाबडा कृत देशभाषामय वचनिकेचा डॉ. रेखा जैन कृत मराठी अनुवाद समाप्त होत आहे ।।७।।

www.vitragvani.com



# ❋ अथ शीलपाहुड ❋

—: ८ :—

आता शील पाहुड ग्रंथाचा मराठी भाषा अनुवाद लिहित आहे :-

❋ दोहा ❋

भवकी प्रकृति निवारिकैं, प्रगट किये निजभाव ।
ह्वै अरहंत जु सिद्ध फुनि, बंदूं तिनि धरि चाव ॥१॥

अशा प्रकारे इष्टाच्या नमस्कार रूप मंगल करून शीलपाहुडनामक ग्रंथ श्रीकुन्दकुन्दाचार्य कृत प्राकृत गाथाबंधाचा मराठी अनुवाद लिहित आहे.

प्रथम कुन्दकुन्दाचार्य ग्रंथांच्या सुरूवातीला इष्टाला नमस्कार रूप मंगल करून ग्रंथ करण्याची प्रतिज्ञा करतात :-

वीरं विसालणयणं रत्तुप्पलकोमलस्समप्पावं ।
तिविहेण पणमिऊणं सीलगुणाणं णिसामेह ॥१॥

वीरं विशालनयनं रक्तोत्पलकोमलसमपादम् ।
त्रिविधेन प्रणम्य शीलगुणान् निशाम्यामि ॥१॥

अर्थ :— आचार्य म्हणतात कीं, मी वीर अर्थात् अंतिम तीर्थंकर श्री वर्ध्दमानस्वामी परम भट्टारकाला मन, वचन, कायेने नमस्कार करून शील अर्थात् निजभावरूप प्रकृति त्याच्या गुणाला अथवा शील आणि सम्यक्‌दर्शनादि गुणाला सांगतो, कसे आहेत श्री वर्धमान स्वामी - विशालनयन आहेत. बाह्यत: त्यांचे पदार्थाला पाहाण्यासाठी नेत्र विशाल आहेत, विस्तीर्ण आहेत, सुंदर आहेत, आणि अंतरंगात केवलदर्शन, केवलज्ञानरूप नेत्र समस्त पदार्थाला पाहाणारे आहेत आणि ते कसे आहेत - 'रक्तोत्पलकोमलसमपादं' अर्थात् त्यांचे चरण रक्त कमलाप्रमाणे कोमल आहेत, असे दुसऱ्या कोणाचे नाहीत. म्हणून सर्वाच्या प्रशंसेला पात्र आहेत, पूजण्या योग्य आहेत. याचा दुसरा अर्थ असा ही होतो कीं, रक्त अर्थात् राग रूप

आत्म्याचा भाव, उत्पल अर्थात् दूर करण्यात, कोमल अर्थात् कठोरता आदि दोष रहित आणि सम अर्थात् राग द्वेष रहित पाद अर्थात् ज्यांच्या वाणिचे पद आहे, ज्यांचे वचन कोमल हितमित मधुर राग द्वेष रहित दिसतात त्यामुळें सर्वांचे कल्याण होते.

भावार्थ :— अशा प्रकारे भगवान महावीराना नमस्कार रूप मंगल करून आचार्यांनी शील पाहुड रचण्याची प्रतिज्ञा केली आहे.

पुढे 'शीला' चे स्वरूप तसेच (ज्ञान) त्यामध्ये गुण असतात ते सांगतात :-

**सीलस्स य णाणस्स य णत्थि विरोहो बुधेहिं णिद्दिट्ठो ।**
**णवरि य सीलेण विणा विसया णाणं विणासंति ॥२॥**

शीलस्य च ज्ञानस्य च नास्ति विरोधो बुधैः निर्दिष्टः ।
केवलं च शीलेन विना विषयाः ज्ञानं विनाशयंति ॥२॥

अर्थ :— शील आणि ज्ञान या मध्यें ज्ञानीयानी विरोध नाही असे सांगितले आहे. असे नाही कीं, जेथे शील आहे तेथे ज्ञान नाही आणि ज्ञान आहे तेथे शील नाही. येथे जे विशेष(णवरी) आहे ते सांगत आहेत - 'शीला' शिवाय विषय अर्थात् इंद्रियाचे विषय ज्ञानाला नष्ट करतात ज्ञानाला मिथ्यात्व रागद्वेषमय अज्ञानरूप करतात.

येथे असे जाणावे कीं, - शील स्वभाव निसर्गाचा स्वभाव आहे. आत्म्याचा सामान्यत: ज्ञान स्वभाव आहे, या ज्ञान स्वभावात अनादिकर्म संयोगाने (पर संग करण्याच्या प्रवृत्तिमुळे) मिथ्यात्व रागद्वेषरूप परिणाम होतो म्हणून ही ज्ञानाची प्रकृति कुशील नांवाला प्राप्त करते, यामुळें संसार बनतो. म्हणून याला संसार प्रकृति म्हणतात. या प्रकृतिला अज्ञानरूप म्हणतात या कुशील प्रकृतिमुळे संसार पर्यायात अपनत्व मानतो तसेच परद्रव्यात इष्ट अनिष्ट बुध्दि करतो.

ही प्रकृति बदलते तेंव्हा मिथ्यात्वाचा अभाव म्हटले जाते. तेंव्हा ना संसार पर्यायात अपनत्व मानतो ना परद्रव्यात इष्ट - अनिष्ट बुध्दि होते आणि या भावाची पूर्णता होत नाही तो पर्यंत चारित्र मोहाच्या उदयाने कांहीं राग, द्वेष, कषाय परिणाम उत्पन्न होतात, त्याला कर्माचा उदय जाणावा, त्याग करावा अशी इच्छा करणारी प्रकृति असेल तर त्याला सम्यक्‌दर्शनरूप भाव म्हणतात, या सम्यक्‌दर्शन भावामुळे ज्ञान ही सम्यक् नाम प्राप्त करून घेते आणि पदाप्रमाणे चारित्र्याची प्रवृत्ति होते, जितक्या अंशाने रागद्वेष घटतो तितके अंश चारित्र म्हणतात अशा प्रकृतिला सुशील असे म्हणतात, अशा प्रकारे कुशील, सुशील शब्दाचा सामान्य अर्थ आहे.

येथे कोणी विचारले गाथे मध्यें ज्ञान अज्ञानाचा तसेच सुशील कुशीलाचे नांव तर आले नाही, ज्ञान आणि शील असे म्हटले आहे. याचे समाधान - पहिल्या गाथेत अशी प्रतिज्ञा केली आहे कीं, मी 'शीला' चे गुण सांगत आहे म्हणून अशा प्रकारे जाणले जाते कीं, आचार्यांच्या आशयात 'सुशील' म्हणण्याचे प्रयोजन आहे 'सुशील' हेच 'शील' नावाने सांगितले जाते. 'शील' नसेल तर कुशील म्हटले जाते.

www.vitragvani.com



येथे गुण शब्द उपकार वाचक घ्यावे तसेच विशेष वाचक घ्यावे, शीलामुळें उपकार होतो, तसेच शीलाचे विशेष गुण आहेत ते सांगत आहेत. अशा प्रकारे ज्ञानात जर शील आले नाही तर ते कुशील होते. इंद्रियांच्या विषयाची आसक्ती होते. तेंव्हा तो ज्ञान 'नाम' प्राप्त करत नाही असे जाणावे. व्यवहारात 'शील' चा अर्थ स्त्री संसर्ग वर्ज करणे असा ही आहे. म्हणून विषय सेवनाचा निषेध आहे. परद्रव्याचा संसर्ग सोडणे, आत्म्यात लीन होणे हे परमब्रह्मचर्य आहे. अशा प्रकारे हे शीलाचे नामान्तर जाणावे ।।२।।

पुढे म्हणतात कीं, ज्ञान होवून सुध्दा, ज्ञानाची भावना करणे आणि विषयापासून विरक्त होणे कठिण आहे :-

दुक्खेणेयदि णाणं णाणं णाऊण भावणा दुक्खं ।
भावियमई व जीवो विसयेसु विरज्जए दुक्खं ।।३।।

दुःखेनेयते ज्ञानं ज्ञानं ज्ञात्वा भावना दुःखम् ।
भावितमतिश्च जीवः विषयेषु विरज्यति दुक्खम् ।।३।।

अर्थ :— प्रथम तर ज्ञान ही दु:खाने प्राप्त होते, कदाचित् ज्ञान प्राप्त ही केले तरी ते जाणून त्याची भावना करणे, वरचेवर अनुभव करणे (दृढतर सम्यक् पुरूषार्थाने) त्याला त्रासदायक वाटते आणि कदाचित् ज्ञानाच्या भावनेसहित जीव असेल तरी ही तो विषयाला दु:खाने त्यागतो.

भावार्थ :— ज्ञानाची प्राप्ती करणे, नंतर त्यांची भावना करणे, नंतर विषयाचा त्याग करणे, हे शेवट दुर्लभ आहे. विषयांचा त्याग केल्या शिवाय (शरीर) प्रकृती बदलली जात नाही. अशा प्रकारे पहिल्यादा असे सांगितले आहे की विषय ज्ञानाला बिघडवत आहे. शेवटी विषयाचा त्याग करणे सुशील आहे.

पुढे म्हणतात की हा जीव जोपर्यंत विषयांत प्रवर्तित आहे तोपर्यंत ज्ञानाला जाणत नाही. आणि ज्ञानाला जाणल्या शिवाय विषयाशी विरक्त होऊन कर्माचा क्षय करत नाही :—

ताव ण जाणदि णाणं विसयबलो जाव वट्टए जीवो ।
विसए विरत्तमेत्तो ण खवेइ पुराइयं कम्म ।। ४ ।।

तावत् न जानाति ज्ञानं विषयबलः यावत् वर्त्तते जीवः ।
विषये विरक्तमात्रः न क्षिपते पुरातनं कर्म ।। ४ ।।

अर्थ :— जो पर्यंत हा जीव विषय बल अर्थात् विषयांच्या विषयभूत वशीभूत राहातो तो पर्यंत ज्ञानाला जाणत नाही आणि ज्ञानाला जाणल्याशिवाय केवळ विषयातून विरक्त होवून पूर्वि बांधलेल्या कर्माचा क्षय करत नाही.

भावार्थ :— जीवाचा उपयोग क्रमवर्ती आहे आणि स्वस्थ (स्वच्छत्व) स्वभाव आहे, म्हणून जसे ज्ञेयाला जाणतो, त्यावेळी त्यात तन्मय होवून राहातो. म्हणून जो पर्यंत विषयात आसक्त होवून राहातो तो पर्यंत ज्ञानाचा अनुभव होत नाही. इष्ट अनिष्ट भाव ही राहातात आणि ज्ञानाचा अनुभव झाल्याशिवाय कदाचित् विषयाना त्यागेल पण वर्तमान विषयाला तरी सोडावे, परंतु पूर्व कर्म बांधलेले असतात त्यांचा तर ज्ञानाचा अनुभव झाल्याशिवाय क्षय होत नाही, पूर्व कर्माच्या बंधाचा क्षय करण्यात (स्वसन्मुख) ज्ञानाचे च सामर्थ्य आहे. म्हणून ज्ञानासहित होवून विषय त्यागणे श्रेष्ठ आहे. विषयाना त्यागून ज्ञानाची भावना करणे हे सुशील आहे ।।४।।

www.vitragvani.com



पुढे ज्ञानाचा लिंगग्रहणाचा तसेच तपाचा अनुक्रम सांगतात :-

णाणं चरित्तहीणं लिंगग्गहणं च दंसणविहूणं ।
संजमहीणो य तवो जइ चरइ णिरत्थयं सव्वं ।।५।।

ज्ञानं चारित्रहीनं लिंगग्रहणं च दर्शनविहीनं ।
संयमहीनं च तपः यदि चरति निरर्थकं सर्वम् ।।५।।

अर्थ :— ज्ञान तर चरित्राने शुध्द आणि लिंगाचे ग्रहण दर्शनाने शुध्द तसेच संयमसहित तप, असे थोडे ही आचरण केले तर ते महाफल रूप होते.

भावार्थ :— हे उपादेयाचे ज्ञान तर होते आणि त्याग ग्रहण करत नाही तर ज्ञान निष्फल आहे. यथार्थ श्रध्दाना शिवाय वेष धारण केला तर ते पण निष्फल आहे. ( स्वात्यानुभूति द्वारे) इंद्रियाना वश करणे जीवाची दया करणे हा संयम आहे, या शिवाय तप केले तर अहिंसादिकाचा विपर्यय होवून तप ही निष्फल होईल अशा प्रकारे यांचे आचरण निष्फल होते ।।५ ।।

पुढे अशा प्रकारे सांगत आहेत असे जर थोड्या प्रमाणात जरी केले; तरी मोठ फळ घेत आहे :—

णाणं चरित्तसुद्धं लिंगग्गहणं च दंसणविसुद्धं ।
संजमसहिदो य तवो थोओ वि महाफलो होइ ।।६।।

ज्ञानं चारित्रशुद्धं लिंगग्रहणं च दर्शनविशुद्धम् ।
संयमसहितं च तपः स्तोकमपि महाफलं भवति ।।६।।

अर्थ :— ज्ञान तर चारित्र्याने शुद्ध आणि लिंगाच्या ग्रहण दर्शनाने शुद्ध तसेच संयमसहित तप अस जर थोड्या प्रमाणात आचरणात आणले तर महाफलरूप आहे.

भावार्थ :— ज्ञान थोडे ही असले आणि आचरण शुध्द केले तर मोठे फल मिळते आणि यथार्थ श्रध्दापूर्वक वेष घेतला तर मोठे फल मिळते. जसे सम्यक् दर्शनसहित श्रावक असले तर श्रेष्ठ आणि त्याच्याशिवाय मुनिचा वेष ही श्रेष्ठ नाही. इंद्रिय संयम, प्राणसंयम सहित उपवासादिक तप थोडे ही केले तर मोठे फल मिळते आणि विषयाभिलाषा असेल तसेच दया रहित मोठ्या कष्टाने तप केले तरी फल मिळत नाही. असे जाणावे. ।।६ ।।

पुढे म्हणतात कीं, जर कोणी ज्ञानी असून ही विषयासक्त असाल तर ते संसारातच भ्रमण करतात :-

णाणं णाऊण णरा केई विसयाइभावसंसत्ता ।
हिंडंति चादुरगदिं विसएसु विमोहिया मूढा ।।७।।

ज्ञानं ज्ञात्वा नराः केचित् विषयादिभावसंसक्ताः ।
हिंडंते चतुर्गतिं विषयेषु विमोहिता मूढाः ।।७।।

अर्थ :— कित्येक मूर्ख, मोही पुरूष ज्ञानाला जाणून ही विषयरूप भावात आसक्त होवून चतुर्गतिरूप संसारात भ्रमण करतात. कारण कीं, विषयाने विमोहित झाल्यानंतर हे पुन्हा जगात येतील यात ही विषय कषायांचा च संसार आहे.

भावार्थ :— ज्ञान प्राप्त करून विषय कषाय सोडणे चांगले आहे. नाही तर ज्ञान ही अज्ञानाप्रमाणेच आहे. ।।७।।

पुढे म्हणतात कीं, जेंव्हा ज्ञान प्राप्त करून अशा प्रकारे केले तर संसार सुटेल :-

जे पुण विसयविरत्ता णाणं णाऊण भावणासहिदा ।
छिंदंति चादुरगदिं तवगुणजुत्ता ण संदेहो ।।८।।

ये पुनः विषयविरक्ताः ज्ञानं ज्ञात्वा भावनासहिताः ।
छिन्दन्ति चतुर्गतिं तपोगुणयुक्ताः न संदेहः ।।८।।

अर्थ :— जे ज्ञानाला जाणून आणि विषयातून विरक्त होवून त्या ज्ञानाचा वरचेवर अनुभव भावना सहित घेतात. ते तप आणि गुण अर्थात् मूलगुण उत्तरगुणयुक्त होवून चतुर्गतिरूप संसाराला छेदतात, काटतात, यात संदेह नाही.

भावार्थ :— ज्ञान प्राप्त करून विषय कषाय सोडून ज्ञानाची भावना केली मूलगुण, उत्तरगुण ग्रहण करून तप केले तर तो संसाराचा अभाव करून मुक्तीरूप निर्मल दशेला प्राप्त होतो - हा शीलसहित ज्ञानरूप मार्ग आहे ।।८।।

पुढे अशा प्रकारे शील सहित ज्ञानाने जीव शुध्द होतो त्याचा दृष्टांत देतात.

जह कंचणं विशुद्धं धम्मइयं खडियलवणलेवेण ।
तह जीवो वि विशुद्धं णाणविसलिलेण विमलेण ।।९।।

यथा कांचनं विशुद्धं धमत् खटिकालवणलेपेन ।
तथा जीवोऽपि विशुद्धः ज्ञानविसलिलेन विमलेन ।।९।।

अर्थ :— जसे कांचन अर्थात् सुर्वण, क्षार (सैदव) आणि मीठ यांच्या लेपाने विशुध्द निर्मल कांती युक्त होते त्याचप्रमाणे जीव ही विषय कषायाच्या मल रहित निर्मल ज्ञानरूप जलाने प्रक्षालित होवून कर्मरहित विशुध्द होतो.

भावार्थ :— ज्ञान आत्म्याचा प्रधान गुण आहे परंतु मिथ्यात्व विषयाने मलिन आहे म्हणून मिथ्यात्व विषयरूप मलाला दूर करून याची भावना करावी. याप्रमाणे एकाग्रतेने ध्यान केले तर कर्माचा नाश होईल. अनंतचतुष्टय प्राप्त करून मुक्त होवून शुद्धात्मा होतो. येथे सुवर्णाचा दृष्टांत आहे हे जाणावे. ।।९।।

पुढे सांगतात कीं, जो ज्ञान प्राप्त करून विषयासक्त होतो तो ज्ञानाचा दोष नाही, कुपुरूषाचा दोष आहे :—

णाणस्स णत्थि दोसो कप्पुरिसाणो वि मंदबुद्धीणो ।
जे णाणगव्विदा होऊणं विसएसु रज्जंति ॥१०॥

ज्ञानस्य नास्ति दोषः कापुरुषस्यापि मंदबुद्धेः ।
ये ज्ञानगर्विताः भूत्वा विषयेषु रज्जन्ति ॥१०॥

अर्थ :— जो पुरूष ज्ञान गर्वित होवून ज्ञान मदाने विषयात रममाण होतात. तो या ज्ञानाचा दोष आहे, येथे आचार्य म्हणतात कीं,असे समजू नका, ज्ञान प्राप्त करून विषयात रमतो हा ज्ञानाचा दोष नाही असा पुरूष मंदबुद्धि म्हणावा आणि कुपुरूष आहे, याचा दोष आहे पुरूषाचा होनहार खोटा असतो तेंव्हा बुद्धि बिघडली जाते तो हा दोष अपराध पुरूषाचा आहे, ज्ञानाचा नाही. ज्ञानाचे कार्य तर वस्तु जशी आहे तशी सांगणे त्याप्रमाणे वर्तन करणे पुरूषाचे कार्य आहे, अशा प्रकारे जाणावे ॥१० ॥

पुढे म्हणतात कीं, पुरूषाना अशा प्रकारचे निर्वाण होते :—

णाणेण दंसणेण य तवेण चरिएण सम्मसहिएण ।
होहदि परिणिव्वाणं जीवाण चरित्तसुद्धाणं ॥११॥

ज्ञानेन दर्शनेन च तपसा चारित्रेण सम्यक्त्वसहितेन ।
भविष्यति परिनिर्वाणं जीवानां चारित्रशुद्धानाम् ॥११॥

अर्थ :— ज्ञान, दर्शन, तप, याचे सम्यक्त्व भावसहित आचरण व्हावे तेंव्हा चारित्राने शुध्द जीवाला निर्वाणाची प्राप्ति होते.

भावार्थ :— सम्यक्त्व सहित ज्ञान, दर्शन, तपाचे आचरण केले तर चारित्र शुध्द होवून राग द्वेष भाव नष्ट होतात तेंव्हा निर्वाण प्राप्त होते. हा मार्ग आहे ॥११ ॥

(तप: शुध्दोपयोगरूप मुनिपना, हे असेल त २२ प्रकाराने व्यवहाराचे भेद आहेत)

पुढे यालाच 'शीला' च्या मुख्यतेरूप नियमाने निर्वाण म्हणतात:-

सीलं रक्खंताणं दंसणसुद्धाण दिढचरित्ताणं ।
अत्थि धुवं णिव्वाणं विसएसु विरत्तचित्ताणं ॥१२॥

शीलं रक्षतां दर्शनशुद्धानां दृढचारित्राणाम् ।
अस्ति ध्रुवं निर्वाणं विषयेषु विरक्तचित्तानाम् ॥१२॥

अर्थ :— ज्या पुरूषांचे चित्त विषयापासून विरक्त आहे, शीलाची रक्षा करते दर्शनाने शुध्द आहे आणि ज्यांचे चारित्र दृढ आहे अशा पुरूषाचे ध्रुव अर्थात् निश्चयाने, नियमाने निर्वाण होते.

भावार्थ :— विषयापासून विरक्त होणे हीच शीलाची रक्षा आहे. या प्रकाराने जे शीलाची रक्षा करतात त्यांचेच सम्यक्‌दर्शन शुध्द असते आणि चारित्र अतिचाररहित शुध्द - दृढ असते. अशा पुरूषानाच नियमाने निर्वाण मिळते. जो विषयात आसक्त आहे त्यांचे शील बिघडते तेंव्हा दर्शन शुध्द न राहून चारित्र शिथिल होत जाते. तेंव्हा निर्वाण ही होत नाही. अशा प्रकारे निर्वाणमार्गात 'शील'च प्रधान आहे ।।१२।।

पुढे म्हणतात कीं, कदाचित् कोणी विषयात न विरक्त झाला नाही आणि मार्ग विषयातून विरक्त होण्यालाच सांगतो. त्यालाच मार्गाची प्राप्ति होते परंतु जो विषय सेवनलाच मार्ग म्हणतो त्याचे ज्ञान ही निरर्थक आहे :-

विसएसु मोहिदाणं कहियं मग्गं पि इट्ठदरिसीणं ।
उम्मग्गं दरिसीणं णाणं पि णिरत्थयं तेसिं ।।१३।।

विषयेषु मोहितानां कथितो मार्गोऽपि इष्टदर्शिनां ।
उन्मार्गं दर्शिनां ज्ञानमपि निरर्थकं तेषाम् ।।१३।।

अर्थ :— जो पुरूष इष्ट मार्ग दाखवणारे ज्ञानी आहेत आणि विषयाने मोहित झाले आहेत तरी ही त्याना मार्गाची प्राप्ति सांगितली आहे, परंतु जे उन्मार्ग दाखवणारे आहेत त्याना तर ज्ञानाची प्राप्ति सांगितली आहे, परंतु जे उन्मार्ग दाखवणारे आहेत त्याना तर ज्ञानाची प्राप्ति ही निरर्थक आहे.

भावार्थ :— मागे सांगितले होते कीं, ज्ञान आणि शील यांचा विरोध नाही आणि हे विशेष आहे कीं, ज्ञान असून विषयासक्त झाल्यामुळे ज्ञान बिघडले तर शील नाही. आता येथे अशा प्रकारे सांगितले आहे कीं, ज्ञान प्राप्त करून कदाचित् चारित्रमोहाच्या उदयाने (-उदयवश) विषय सुटले नाहीत तेथपर्यंत ते मोहित राहिले आणि मार्गाची प्ररूपणा विषयाच्या त्यागानेच करतो त्याला तर मार्गाची प्राप्ति होते ही परंतु जो मार्गाला कुमार्गरूप प्ररूपण करतो. विषय सेवनाला सुमार्ग म्हटले तर त्याची ज्ञान प्राप्ति ही निरर्थकच आहे ज्ञान करून ही मिथ्या मार्ग अवलंबला तर त्याला ज्ञान कसे होईल? ते ज्ञान मिथ्याज्ञान आहे. येथे हा आशय सूचित होतो कीं, सम्यक्त्वसहित अविरत सम्यक्‌दृष्टि तर चांगलीच आहे कारण कीं, सम्यक्‌दृष्टि कुमार्गाची प्ररूपणा करत नाही. आपला (चारित्र दोषाने) चारित्र मोहाचा उदय प्रबल होत नाही तो पर्यंत विषय सुटत नाहीत म्हणून अविरत आहे परंतु जे सम्यक्‌दृष्टि नाहीत आणि ज्ञान ही मोठे आहे, थोडे आचरण ही करत असेल, विषय ही सोडले आहेत आणि कुमार्गाचे प्ररूपण करत असेल तर ते चांगले नाही. त्याचे ज्ञान आणि विषय सोडणे निरर्थक आहे. अशा प्रकारे जाणावे. ।।१३।।

पुढे सांगतात कीं, जो जे उन्मार्गाचे प्ररूपण करणारे कुमताची, कुशास्त्राची प्रशंसा करतात. ते शास्त्राला ही जाणतात तरी ही शीलव्रत ज्ञानाने रहित आहेत ते आराधना करण्या योग्य नाहीत

कुमयकुसुदपसंसा जाणंता बहुविहाइं सत्थाइं ।
शीलवदणाणरहिदा ण हु ते आराधया होंति ।।१४।।

कुमतकुश्रुतप्रशंसकाः जानंतो बहुविधानि शास्त्राणि ।
शीलव्रतज्ञानरहिता न स्फुटं ते आराधका भवंति ।।१४।।

www.vitragvani.com



अर्थ :— जो अनेक प्रकारची शास्त्रे जाणतो. आणि कुमत कुशास्त्राची प्रशंसा करणारे आहेत ते शीलव्रत आणि ज्ञान रहित आहेत ते आराधना करण्यायोग्य नाहीत.

भावार्थ :— जे अनेक शास्त्राना जाणून ज्ञान तर खूप मिळवतात आणि कुमत कुशास्त्राची प्रशंसा करतात तेंव्हा ओळखावें कीं, त्यांना कुमत आणि कुशास्त्राचे प्रेम आहे म्हणूनच ते त्यांची प्रशंसा करतात. हे तर मिथ्यात्वाचे चिन्ह आहे. जेथे मिथ्यात्व आहे तेथे ज्ञान ही मिथ्या आहे आणि विषय कषायाने रहित होण्याला शील असे म्हणतात ते योग्य नाही, व्रते ही ते करत नाहीत कदाचित् कोणते व्रताचरण करत असेल तरी ते मिथ्यात्व चारित्ररूप आहे, म्हणून दर्शन ज्ञान चारित्र्याचे आराधना करणारा नाहीत. मिथ्यादृष्टि आहेत ॥१४॥

पुढे म्हणतात कीं, जरी रूपसुंदरादि प्राप्त केले आणि शील रहित असेल तर त्याचा मनुष्य जन्म निरर्थक आहे :-

रूवसिरिगव्विदाणं जुव्वणलावण्णकंतिकलिदाणं ।
सीलगुणवज्जिदाणं णिरत्थयं माणुसं जम्म ॥१५॥

रूपश्रीगर्वितानां यौवनलावण्यकांतिकलितानाम् ।
शीलगुणवर्जितानां निरर्थकं मानुषं जन्म ॥१५॥

अर्थ :— जे पुरूष यौवन अवस्थेत आहे आणि सर्वांना प्रिय आहेत लावण्यवान आहेत. शरीराच्या कांतीने, तेजाने मंडित आहेत आणि सुंदर रूप लक्ष्मी संपदाने गर्वित आहेत, मदोनमत्त आहेत परंतु ते जरी शील आदि गुणाने रहित असतील तर त्यांचा मनुष्य जन्म निरर्थक आहे.

भावार्थ :— मनुष्य जन्म प्राप्त करून शील रहित आहेत, विषयात आसक्त आहेत सम्यक्दर्शन ज्ञान चारित्र गुणाने रहित आहेत आणि यौवन अवस्थेत शरीराचे लावण्य कांतीरूप सुंदर धन, संपदा प्राप्त करून त्याच्या गर्वाने मदोन्मत राहातात. त्यांचा मनुष्य जन्म निष्फल घालवला मनुष्य जन्मात सम्यक्दर्शनादिचा अंगीकार करणे आणि शील, संयम पाळणे योग्य आहे आणि तसा अंगिकार केला नाही तर जन्म निष्फलच झाला असे समजावे.

असे ही सांगितले आहे कीं, पहिल्या गाथेत कुमत, कुशास्त्राची प्रशंसा करणाऱ्यांचे ज्ञान निरर्थक म्हटले होते. तसेच येथे रूपादिकाचा मद केला तर ते ही मिथ्यात्वाचे चिन्ह आहे, जे मद करतात त्याना मिथ्यादृष्टि जाणावे तसेच लक्ष्मी रूप यौवन कांतिने पंडित असेल आणि शीलरहित व्याभिचारी असेल तर त्याची लोकात निंदा च होते ॥१५॥

पुढे म्हणतात कीं, अनेक शास्त्राचे ज्ञान असले तरी शीलच उत्तम आहे :-

वायरणछंदवइसेसियववहारणायसत्थेसु ।
वेदेऊण सुदेसु य तेव सुयं उत्तमं शीलं ॥१६॥

व्याकरणछन्दोवैशेषिकव्यवहारन्यायशास्त्रेषु ।
विदित्वा श्रुतेषु च तेषु श्रुतं उत्तमं शीलम् ॥१६॥

www.vitragvani.com



अर्थ :— व्याकरण छंद वैशेषिक व्यवहार न्यायशास्त्र ही शास्त्रे अर्थात् जिनागमात ते व्याकरणादिकाला आणि श्रुत अर्थात् जिनागमाला जाणून ही यात शील असेल तर ते उत्तम आहे.

भावार्थ :— व्याकरणादि शास्त्रे जाणतो आणि जिनागमाला ही जाणतो तरी ही त्यात शीलच उत्तम आहे. शास्त्रांना जाणून ही विषयात ही आसक्त आहे तर त्या शास्त्राना जाणणे वृथा आहे, उत्तम नाही ।।१६।।

पुढे म्हणतात कीं, जे शील गुणाने मंडित आहे ते देवांचे ही वल्लभ आहेत.

सीलगुणमंडिदाणं देवा भवियाण वल्लहा होंति ।
सुदपारयपउरा णं दुस्सीला अप्पिला लोए ।।१७।।

शीलगुणमंडितानां देवा भव्यानां वल्लभा भवंति ।
श्रुतपारगप्रचुराः णं दुःशीला अल्पकाः लोके ।।१७।।

अर्थ :— जो भव्यप्राणी शील आणि सम्यक्दर्शनादि गुण अथवा शील गुणाने जो मंडित आहे त्याना देव ही पावतात, त्यांची सेवा करणारे सहायक होतात. जे श्रुतपराग अर्थात् शास्त्राच्या पलिकडे पोहोचले आहेत ११ अंगापर्यंत शिकले आहेत असे बरेच आहेत आणि त्यांच्यात कित्येक शील गुणाने रहित आहेत, दु:शील आहेत, विषय कषायात आसक्त आहेत तर ते लोकात न्यून (अल्पका) आहेत, ते लोकाना आवडत नाहीत तर देव तरी कसे सहायक होतील?

भावार्थ :— अनेक शास्त्रे जाणत असेल आणि विषयासक्त असेल तर त्याचा कोणी सहायक होणार नाही. चोर आणि अन्यायी ची लोकात कोणी सहायता करत नाही. परंतु शील गुणाने मंडित असेल आणि ज्ञान थोडे ही असले ते त्याचे उपकारी सहायक देव ही असतात तेव्हा मनुष्य तर सहायक होतातच शील गुणवाला सर्वांना प्रिय असतो ।।१७।।

पुढे म्हणतात कीं, जे सुशील आहेत त्यांचे मनुष्यभवात जगणे सफल आहे ठिक आहे :-

सव्वे विय परिहीणा रूपविरूवा वि वदिदसुवया वि ।
सीलं जेसु सुसीलं सुजीविदं माणुसं तेसिं ।।१८।।

सर्वेऽपि च परिहीनाः रूपविरूपा अपि पतितसुवयसोऽपि ।
शीलं येषु सुशीलं सुजीविदं मानुष्यं तेषाम् ।।१८।।

अर्थ :— जो सर्व प्राण्यात हीन आहे कुलादिकाने न्यून आहे आणि रूपाने विरूप आहेत, सुंदर नाहीत, 'पातित सुवयस:' अर्थात् अवस्थेने सुन्दर नाही वृध्द झाले आहेत परंतु जे सुशील आहेत, स्वभाव उत्तम आहे, कषायादिकाची तीव्र आसक्तता नाही त्यांचे मनुष्यपण सुजीवित आहे. जगणे चांगले आहे.

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



भावार्थ :— लोकात सर्व सामुग्री न्यून आहे परंतु स्वभाव उत्तम आहे विषय कषायात आसक्त नाहीत तर ते उत्तमच आहेत, त्यांचा मनुष्यभव सफल आहे त्यांचे जीवन प्रशंसेला योग्य आहे ।।१८।।

पुढे म्हणतात कीं, जितके ही चांगले कार्य आहे ते सर्व 'शीला' चे परिवारी आहेत :-

जीवदया दम सच्चं अचोरियं बंभचेरसंतोसे ।
सम्मद्दंसण णाणं तओ य सीलस्स परिवारो ।।१९।।

जीवदया दमः सत्यं अचौर्यं ब्रह्मचर्यसंतोषौ ।
सम्यग्दर्शनं ज्ञानं तपश्च शीलस्य परिवारः ।।१९।।

अर्थ :— जीवदया इंद्रियांचे दमन सत्य अचौर्य, ब्रह्मचर्य, संतोष सम्यक्दर्शन ज्ञान तप हे सर्व शीलाचे परिवार आहेत.

भावार्थ :— शील स्वभावाचे तसेच प्रकृति चे नांव प्रसिध्द आहे. मिथ्यात्व सहित कषायरूप ज्ञानाची परिणति तर दु:शील आहे याला संस्कार प्रकृति म्हणतात ही प्रकृति बदलून सम्यक् प्रकृति होते त्याला सुशील म्हणतात तीच मोक्ष सन्मुख प्रकृति म्हणतात. अशा सुशीलांचे 'जीवदयादिक' गाथेत सांगितले ते सर्व 'परिवारी आहेत कारण कीं संसार प्रकृति बदलते तेंव्हा संसार देहापासून वैराग्य येते आणि मोक्षा विषयी प्रीति निर्माण होते तेव्हाच सम्यक्दर्शनादिक परिणाम होतात. नंतर जितक्या प्रकृति असतील त्या सर्व मोक्षाच्या सन्मुख होतात, हेच सुशील आहे. ज्याला संसाराची विरक्ती येते त्याला ही प्रकृति प्राप्त होते आणि ही प्रकृति प्राप्त झाली नाही तर तो पर्यंत संसार भ्रमणच आहे, असे जाणावे ।।१९।।

पुढे 'शील' म्हणजे तप आहे अशी 'शीलाची' महिमा सांगत आहेत :-

सीलं तवो विसुद्धं दंसणसुद्धी य णाणसुद्धी य ।
सीलं विसयाण अरी सीलं मोक्खस्स सोवाणं ।।२०।।

शीलं तपः विशुद्धं दर्शनशुद्धिश्च ज्ञानशुद्धिश्च ।
शीलं विषयाणामरिः शीलं मोक्षस्य सोपानम् ।।२०।।

अर्थ :— शील हेच विशुध्द निर्मल तप आहे, शीलच दर्शनाची शुध्दता आहे शीलच ज्ञानाची शुध्दता आहे, शीलच विषयाचा शत्रू आहे आणि शीलच मोक्षाची शिडी आहे.

भावार्थ :— जीव, अजीव पदार्थाचे ज्ञान करून घेवून मिथ्यात्व आणि कषायाचा अभाव करणे सुशील आहे, हा आत्म्याचा ज्ञान स्वभाव आहे संसार प्रकृति मिटवून मोक्ष सन्मुख प्रकृति होते त्यालाच शील तप आदि सर्व नांवे दिली जातात - निर्मल तप, शुध्ददर्शन ज्ञान, विषय कषाय मिटणे मोक्षाची शिडी हे सर्व शील

www.vitragvani.com



शब्दाचे अर्थ आहेत, असे शीलाचे महत्त्व वर्णन केले आहे आणि हा केवळ महिमाच नाही तर या सर्व भावांचा अविनाभावीपणा सांगितला आहे ।।२०।।

जह विसयलुद्ध विसदो तह थावर जंगमाण घोराणं ।
सव्वेसिंपि विणासदि विषयविसं दारुणं होई ।।२१।।

यथा विषयलुब्धः विषदः तथा स्थावरजंगमान् घोरान् ।
सर्वान् अपि विनाशयति विषयविषं दारुणं भवति ।।२१।।

<u>अर्थ :</u>— जसे विषय सेवनरूपी विष विषय लुब्ध जीवाला विष देणारे आहे तसेच घोर तीव्र स्थावर जंगम सर्व विष प्राण्यांचा नाश करते तथापि या सर्व विषात विषयाचे विष जहाल आहे तीव्र आहे.
<u>भावार्थ :</u>— जसे हत्ती, मासा, भ्रमर, पतंग, आदि जीव विषयात लुब्ध होवून विषयाला वश होवून नष्ट होतात, तसेच स्थावर विष, खनिज, मोहरा, सोमल, आदि आणि जंगम विष (प्राणिज) सर्प, नाग, आदि चे विष, या विषाने ही प्राणी मारले जातात परंतु सर्व विषात विषयाचे विष अति तीव्र आहे. ।।२१।।

पुढे याचे समर्थन करण्यासाठी विषयाच्या विषाचा तीव्रपणा सांगतात कीं, विषाच्या वेदनेने तर एकदाच मरतो विषयामुळे संसारात भ्रमण करतो :-

वारि एक्कम्मि य जम्मे सरिज्ज विसवेयणाहदो जीवो ।
विसयविसपरिहया णं भमंति संसारकांतारे ।।२२।।

वारे एकस्मिन् च जन्मनि गच्छेत् विषवेदनाहतः जीवः ।
विषयविषपरिहता भ्रमंति संसारकांतारे ।।२२।।

<u>अर्थ :</u>— विषाच्या वेदनेने नष्ट झालेले जीव एका जन्मातच मरतो परंतु विषयरूप विषाने नष्ट जीव वारोवार संसाररूपी वनात भ्रमण करतात (पुण्याची आणि रागाची रूचि तीच विषय बुध्दि आहे)
<u>भावार्थ :</u>— अन्य सर्पादिकाच्या विषापेक्षा विषयाचे विष प्रबल आहे यांच्या आसक्तीने असा कर्म बंध होतो कीं, त्यामुळे अनेक वेळा जन्म मरण होते ।।२२।।

पुढे सांगतात कीं, विषयाच्या आसक्तीने चतुर्गति मध्यें दु:खच मिळते :—

णरएसु वेयणाओ तिरिक्खए माणुएसु दुक्खाइं ।
देवेसु वि दोहग्गं लहंति विसयासता जीवा ।।२३।।

नरकेषु वेदनाः तिर्यक्षु मानुषेषु दुःखानि ।
देवेषु अपि दौर्भाग्यं लभंते विषयासक्ता जीवाः ।।२३।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



अर्थ :— विषयामध्ये आसक्त जीव नरकात अत्यंत वेदना घेतात. तिर्यचोत तसेच मनुष्यात दु:खाला पाहात आहे, आणि देवात उत्पन्न झाले तर, तेथे पण दुर्भाग्य पहात आहे, हे नीच देव आहे, अशा प्रकारे चारी बाजूनी दु:ख ही पाहात आहे.

भावार्थ :— विषयासक्त जीवाला कोठेच सुख नाही, पर लोकात तर नरकादिचे दु:ख भोगतात परंतु या लोकात ही यांचे सेवन करण्यात आपत्ति आणि कष्ट येतात तसेच सेवनाने आकुलता दु:खच आहे, हा जीव भ्रमामुळें सुख मानतो, सत्यार्थ ज्ञानी तर विरक्तच होतो ॥२३॥

पुढे म्हणतात कीं, विषयाला सोडल्याने कोणतीच हानि नाही :-

तुसधम्मंतबलेण य जह दव्वं ण हि णराण गच्छेदि ।
तवसीलमंत कुसली खपंति विसयं विस व खलं ॥२४॥

तुषधमद्बलेन च यथा द्रव्यं न हि नराणां गच्छति ।
तपः शीलमंतः कुशलाः क्षिपंते विषयं विषमिव खलं ॥२४॥

अर्थ :— जसे (तुष) सालपट उडवल्याने मनुष्याचे धनद्रव्य जात नाही त्याप्रमाणेच (तसेच) तपस्वी आणि शीलवान पुरूष विषयाना दूर फेकतात.

भावार्थ :— जे ज्ञानी तप शील सहित आहे त्याना विषय सालपटाप्रमाणे आहेत, जसे उसाचा रस काढल्यानंतर चोयटे नीरस होतात तेंव्हा ते फेकण्या योग्यच आहेत. तसेच विषयाना जाणणे, हा रस होता ते ज्ञानीयाने जाणले मग विषय चोयट्या प्रमाणे राहिले त्याचा त्याग करण्यात काय हानि? अर्थात् कांहींच नाही. ते ज्ञानी धन्य आहेत जे विषयाना ज्ञेयमात्र जाणून आसक्त होत नाहीत.

जे आसक्त होतात ते अज्ञानीच आहेत कारण कीं, विषय तर जडपदार्थ आहे सुख तर त्यांनी ज्ञानातच जाणले होते. अज्ञानीने आसक्त होवून विषयात सुख मानले आहे. जसे श्वान वाळलेले हाड चघळते तेंव्हा हाडाची टोके तोंडात, टाळूला टोचतात आणि टाळू फाटते आणि त्यातून रक्त वाहू लागते. तेंव्हा अज्ञानी कुत्र्याला वाटते कीं, हा रस हाडातूनच निघाला आहे आणि ते सारखे चघळण्यात तो सुख मानतो. तसेच अज्ञानी विषयात सुख मानून ते वारंवार भोगतो परंतु ज्ञानीने आपल्या ज्ञानातच सुख जाणले आहे त्याना विषयाच्या त्यागात दु:ख नाही असे जाणावे ॥२४॥

पुढे म्हणतात कीं, कोणी प्राणी शरीराचे सर्व अवयव सुंदर प्राप्त करून घेतो तरी ही सर्वा(अंगात) पेक्षा शील च उत्तम आहे :-

❀ वट्टेसु य खंडेसु य भद्देसु य विसालेसु अंगेसु ।
अंगेसु य पप्पेसु य सव्वेसु य उत्तमं सीलं ॥२५॥

वृत्तेषु च खंडेषु च भद्रेषु च विशालेषु अंगेषु ।
अंगेषु च प्राप्तेषु च सर्वेषु च उत्तमं शीलं ॥२५॥

अर्थ :— प्राण्याच्या शरीरात कांही भाग तर गोल सुघट प्रशंसा योग्य असतात, कांहीं भाग अर्धगोल प्रशंसा योग्य असतात, कांहीं भाग सरळ साधे प्रशंसा योग्य असतात तर कांहीं भाग विशाल अर्थात् विस्तीर्ण रूंद प्रशंसा योग्य असतात, अशा प्रकारे सर्व अंग च उत्तम आहे. हे नसेल तर बाकी सर्व अंगे शोभा देत नाहीत हे प्रसिध्द आहे.

भावार्थ :— लोकात (जगात) प्राणी सर्वांग सुंदर आहे, परंतु दु:शील असेल तर सर्व लोकाकडून निंदा करण्यायोग्य असतो. अशा प्रकारे लोकातही शीलाचीच शोभा आहे. मोक्ष मार्गात ही शीलालाच प्रधान म्हटले आहे जितके सम्यक्दर्शनादिक मोक्षाची अंगे आहेत ते शीलाचेच परिवारी आहेत असे पूर्वि सांगितलेच आहे. ।।२५।।

पुढे म्हणतात कीं, जे कुबुध्दि ने मूढ झाले आहेत ते विषयात आसक्त आहेत, कुशील आहेत, संसारात भ्रमण करतात :-

**पुरिसेण वि सहियाए कुसमयमूढेहि विसयलोलेहिं ।**
**संसारे भमिदव्वं अरयघरट्टं व भूदेहिं ।।२६।।**

पुरिषेणापि सहितेन कुसमयमूढैः विषयलोलैः ।
संसारे भ्रमितव्यं अरहटघरट्टं इव भूतैः ।।२६।।

अर्थ :— जे कुसमय अर्थात् कुमताने मूढ आहेत. तेच अज्ञानी आहेत आणि तेच विषयात लोलूप आहेत, आसक्त आहेत ते घडयाळयाच्या काट्याप्रमाणे संसारात भ्रमण करतात, त्यांच्या बरोबर अन्य पुरूषांचे ही संसारात दु:खासहित भ्रमण होते.

भावार्थ :— कुमती विषयासक्त मिथ्यादृष्टि आपण विषयांना चांगले मानून सेवन करतो. कांहीं कुमती असे ही आहेत जे अशा प्रकारे सांगतात कीं, सुंदर विषय सेवन केल्याने ब्रह्म प्रसन्न होते (हा ब्रह्मानंद आहे) ही परमेश्वराची मोठी भक्ती आहे असे म्हणून अत्यन्त आसक्त होवून सेवन करतात. असा ही उपदेश दुसऱ्याना देवून विषयाकडे लावतात. ते स्वत: घड्याळाच्या काट्याप्रमाणे संसारात भ्रमण करतात अनेक प्रकारचे दु:ख भोगतात परंतु अन्य पुरूषानाही त्यात लावून भ्रमण करवतात म्हणून हे विषय सेवन दु:खासाठीच आहे. दु:खाचे कारण आहे असे जाणून कुमतीयाशी संबंध ठेवू नका, विषयासक्ती सोडावी यामुळे सुशीलपणा दिसेल ।।२६।।

पुढे म्हणतात कीं, जी कर्माची गांठ विषय सेवन करून आपल्या आपण बांधली जाते ती सत्पुरूष तपश्चरणादि करून (स्वत:च) आपल्या आपणच काटली जाते. :-

**आदेहि कम्मगंठो जा बद्धा 'विसयरागरागेहिं ।**
**तं छिन्दन्ति कयत्था तवसंजमसीलयगुणेण ।।२७।।**

आत्मनि कर्मग्रंथिः या बद्धा विषयरागरागैः ।
तां छिन्दन्ति कृतार्थाः तपः संयमशीलगुणेन ।।२७।।

www.vitragvani.com



अर्थ :— जी विषयाच्या रागरंगामुळे आपोआपाच गांठ बांधली आहे ती कृतार्थ पुरूष (उत्तमपुरूष) तप, संयम, शीलाच्या द्वारे प्राप्त पुण्याने छेदली जाते, सोडवली जाते.

भावार्थ :– जे कोणी गांठ बांधून घेतात तेच ती सोडण्याची कला ही जाणतात. जसे सोनार आदि (कलाकार) कारागीर दागदागीने करताना असे झाळतात (जोडतात) कीं, तो जोड दिसेनासा झाला तर तो जोड झाळणाराच ती जागा ते ओळखून तोडतात तसेच आत्म्याने आपल्याच रागादिक भावाने कर्माची गांठ बांधली आहे त्याला आपणच भेद विज्ञान करून रागादिकाचे आणि आपले जे भेद आहेत त्या संधिला शोधून तप, संयम, शीलरूप, भावरूप, शास्त्राद्वारे त्या कर्मबंधाला काटतात, असे जाणून जे कृतार्थ पुरूष आहेत ते आपले प्रयोजन पूर्ण करतात. ते या शीलगुणाला अंगिकार करून आत्म्याला कर्मापासून भिन्न करतात. असा पुरूषार्थ करणे पुरूषांचे कार्य आहे ।।२७।।

पुढे जे शीलाच्याद्वारे आत्मा शोभायमान होतो ते दृष्टान्तद्वारे दाखवत आहेत :-

उदधीव रदणभरिदो तवविणयंसीलदाणरयणाणं ।
सोहेतो य ससीलो णिव्वाणमणुत्तरं पत्तो ।।२८।।

उदधिरिव रत्नभृतः तपोविनयशीलदानरत्नानाम् ।
शोभते च सशीलः निर्वाणमनुत्तरं प्राप्तः ।।२८।।

अर्थ :— जसे समुद्ररत्नाने भरला आहे तरी सुध्दां पाण्या सहितच शोभायमान असतो त्या प्रमाणेच हा आत्मा तप, विनय,शील, दान या रत्नानी शोभयमान होतो कारण कीं, हे शील सहित आहेत. हे ज्यांच्याकडे आहे ते पुढे कांहीं राहात नाही अशा निर्वाण पदाला प्राप्त करतात.

भावार्थ :— जसे समुद्रात रत्ने अनेक आहेत तरी सुध्दां पाण्यामुळेच समुद्र नावाला प्राप्त होतो तसेच आत्मा अन्यगुणानी असला तरी शीलानेच निर्वाणपदाला प्राप्त करतो. असे जाणावे ।।२८।।

पुढे जे पुरूष शीलवान आहेत तेच मोक्षाला प्राप्त करतात हे सांगतात :-

सुणहाण गद्दहाण य गोपसुमहिलाण दीसदे मोक्खो ।
जे सोधंति चउत्थं पिच्छिज्जंता जणेहि सव्वेहिं ।।२९।।

शुनां गर्दभानां च गोपशुमहिलानां दृश्यते मोक्षः ।
ये शोधयंति चतुर्थं दृश्यतां जनैः सर्वैः ।।२९।।

अर्थ :— आचार्य म्हणतात कीं, आपण पहा कुत्रा, गाढव, गाय आदि पशु तसेच स्त्री यांच्यापैकी कोणाला मोक्ष मिळालेला दिसतो कां? तसे दिसत नाही मोक्ष हा चौथा पुरूषार्थ आहे म्हणून जे चौथ्या पुरूषार्थाला शोधतात त्यानाच मोक्ष मिळताना दिसतो.

भावार्थ :— धर्म अर्थ काम मोक्ष हे चार पुरूषार्थ आहेत हे प्रसिध्दच आहे यातला चौथा पुरूषार्थ मोक्ष आहे त्याला पुरूषच ते हेरतात आणि त्याची सिध्दि करतात. अन्य, श्वान, गर्दभ, बैल पशु स्त्री हे मोक्षाचा शोध घेताना दिसत नाहीत मोक्षाचे पुरूषार्थ कां म्हणतात येथे आशय असा आहे कीं, मोक्ष शीलामुळे मिळते श्वान, गाढव आदि अज्ञानी, कुशील आहेत, त्यांची स्वभाव प्रकृतिच अशी आहे ती बदलून मोक्ष होण्यायोग्य नाहीत. म्हणून पुरूषानी मोक्षाचे साधन शीलाला जाणून अंगिकार करावा. सम्यक्‌दर्शनादिक ते तर शीलाचेच परिवार मागे सांगितलेच आहेत तसे जाणावे. ।।२९।।

पुढे सांगतात कीं, शील असल्याशिवाय ज्ञानाने (केवळ) मोक्ष नाही त्याचे उदाहरण सांगतात. :-

**जइ विसयलोलएहिं णाणीहि हविज्ज साहिदो मोक्खो ।**
**तो सो सच्चइपुत्तो दसपुव्वीओ वि किं गदो णरयं ।।३०।।**

यदि विषयलोलैः ज्ञानिभिः भवेत् साधितः मोक्षः ।
तर्हि सः सात्यकिपुत्रः दशपूर्विकः किं गतः नरकं ।।३०।।

अर्थ :— जो विषयात लोलूप आसक्त आणि ज्ञानसहित असा ज्ञानियाने मोक्ष साधला असेल तर 'दशपूर्व' जाणणारा रूद्र नरकाला कां गेला ?

भावार्थ :— शुष्क कोरे ज्ञान हीन मोक्ष कोणाला मिळाला असे म्हणाले तर ''दशपूर्व'' चा पाठी रूद्र नरकात कां गेला? म्हणून शीलाशिवाय केवळ ज्ञानाने मोक्ष नाही, रूद्र कुशील सेवन करणारा आहे, मुनिपदापासून भ्रष्ट होवून कुशील सेवन केले म्हणून नरकात गेला, ही कथा पुराणात प्रसिध्द आहे. ।।३०।।

पुढे सांगतात कीं, शीलाशिवाय ज्ञानाने भावाची शुध्दि होत नाही :-

**जइ णाणेण विसोहो सीलेण विणा बुहेहिं णिद्दिट्ठो ।**
**दस पुव्वियस्स भावो यण किं पुण णिम्मलो जादो ।।३१।।**

यदि ज्ञानेन विशुद्धः शीलेन विना बुधैर्निर्दिष्टः ।
दशपूर्विकस्य भावः च न किं पुनः निर्मलः जातः ।।३१।।

अर्थ:— जो शीलाशिवाय ज्ञानाने विशुध्द भाव पंडितानी सांगितले आहे तर 'दशपूर्व' जाणणारा जो रूद्र त्याचा भाव निर्मल कां झाला नाही? यावरून समजते कीं, भाव निर्मल शीलामुळे होतो.

भावार्थ :— कोरे ज्ञान तर ज्ञेयच सांगते म्हणून ते मिथ्यात्व कषाय झाल्याने विपर्यय होतो, म्हणून मिथ्यात्व कषाय मिटवणे हेच शील आहे, अशा प्रकारे शीलाशिवाय ज्ञानानेच मोक्षाची सिध्दि होत नाही, शीलाशिवाय मुनि झाले तर तो भ्रष्ट होतात. म्हणून शील प्रधान जाणावे. ।।३१ ।।

www.vitragvani.com



पुढे सांगतात कीं, नरकात ही 'शील' झाले आणि विषयातून विरक्त झाले तर तेथून निघून तीर्थंकर पदाला प्राप्त होतो :-

जाए विसयविरत्तो सो गमयदि णरयवेयणा पउरा ।
ता लेहदि अरुहपयं भणियं जिणवड्ढमाणेण ॥३२॥

यः विषयविरक्तः सः गमयति नरकवेदनाः प्रचुराः ।
तत् लभते अर्हत्पदं भणितं जिनवर्द्धमानेन ॥३२॥

अर्थ :— विषयापासून विरक्त आहे तो जीव नरकाच्या अनेक प्रकारच्या वेदना ही जाणवू देत नाही, तेथे ही अति दु:खी होत नाही आणि तेथून निघून तीर्थंकर होतो असे जिनवर्धमान भगवंताने सांगितले आहे.

भावार्थ :— जिन सिध्दान्त मध्यें असे सांगितले आहे कीं, तिसऱ्या पृथ्वीतून निघून तीर्थंकर होतो ते सुध्दां शीलाचेच महात्म्य आहे. तेथे सम्यक्त्व सहित होवून विषयातून विरक्तभाव निर्माण होणे हे शीलाचे महात्म्य जाणावे.

सिद्धांतामध्ये अशाप्रकारे सांगितले आहे कीं, सम्यक्दृष्टिला ज्ञान आणि वैराग्य शक्ती नियमाने होतेच ती वैराग्य आहे तोच शीलाचा एक देश आहे अशा प्रकारे जाणावे ॥३२॥

पुढे या कथनाचा संकोच करतात :-

एवं बहुप्पयारं जिणेहि पच्चक्खणाणदरसीहिं ।
सीलेण य मोक्खपयं अक्खातीदं य लोयणाणेहिं ॥३३॥

एवं बहुप्रकारं जिनैः प्रत्यक्षज्ञानदर्शिभिः ।
शीलेन च मोक्षपदं अक्षातीतं च लोकज्ञानैः ॥३३॥

अर्थ :— एवं अर्थात् पूर्वोक्त प्रकार तसेच अन्यप्रकार ज्यामुळे प्रत्यक्ष ज्ञान दर्शन प्राप्त होते आणि ज्याना लोक, अलोकाचे ज्ञान आहे अशा जिनदेवने सांगितले आहे कीं, शीलामुळे ज्यात इंद्रियरहित अतींद्रिय ज्ञान सुख आहे असे मोक्षपद प्राप्त होते.

भावार्थ :— सर्वज्ञ देवाने अशा प्रकारे सांगितले आहे कीं, शीला ने अतिन्द्रिय ज्ञान सुखरूप मोक्षपद प्राप्त होते. तो भव्य जीव या शीलाचा अंगिकार करो असा उपदेशाचा आशय सूचित होतो. आणखी काय सांगायचे? हेच खूप सांगितले गेले आहे असे जाणा ॥३३॥

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



पुढे सांगतात कीं, शीलामुळे निर्वाण होते, त्याचे बरेच वर्णन आले आहे ते कसे ?

सम्मत्तणाणदंसणतववीरियपंचयार मप्पाणं ।
जलणो वि पवणसहिदो डहंति पोरायणं कम्मं ।।३४।।

सम्यक्त्वज्ञानदर्शनतपोवीर्यपंचाचाराः आत्मनाम् ।
ज्वलनोऽपि पवनसहितः दहंति पुरातनं कर्म ।।३४।।

<u>अर्थ :</u>— सम्यक्त्व ज्ञान, दर्शन, तप,वीर्य हे पांच आचार आहेत ते आत्म्याचा आश्रय घेवून पुरातन कर्माला तसेच दग्ध करतात जसे पवन सहित अग्नि जुन्या सुकलेल्या इंधनाला दग्ध करतो.

<u>भावार्थ :</u>— येथे सम्यकृत्व आदिपांच आचार तर अग्निस्थानिय आहेत आणि आत्म्याचे त्रैकालिक शुद्ध स्वभावाला शील म्हणतात. हा आत्म्याचा स्वभाव पवनस्थानीय आहे तो पंच आचाररूप अग्नि आणि शीलरूपी पवनाची सहायता घेवून पुरातन कर्मबंधाला दग्ध करून आत्म्याला शुद्ध करतो, अशा प्रकारे शीलच प्रधान आहे. पांच आचारात चारित्र सांगितले आहे, आणि येथे सम्यकृत्व सांगण्यात चारित्रच जाणावे.

पुढे सांगतात कीं, अशा आठ कर्माला ज्यानी दग्ध केले ते सिध्द झाले आहेत :-

णिद्दड्ढअट्ठकम्मा विसयविरत्ता जिदिंदिया धीरा ।
तवविणयसीलसहिदा सिद्धा सिद्धिं गदिं पत्ता ।।३५।।

निर्दग्धाष्टकर्माणः विषयविरक्ता जितेंद्रिया धीराः ।
तपोविनयशीलसहिताः सिद्धाः सिद्धिं गतिं प्राप्ताः ।।३५।।

<u>अर्थ:</u>— ज्या पुरूषाने इंद्रियाला जिंकले आहे, विषयापासून विरक्त झाले आहेत, आणि धीरवान आहेत. परिषहादि उपसर्ग आला तरी चलायमान होत नाहीत, तप विनय,शील, सहित आहे ते अष्टकर्माला दूर करून सिध्दगति जो मोक्ष त्याला प्राप्त झाले आहेत, ते सिध्द म्हणवले जातात.

<u>भावार्थ :</u>— येथे ही जितेंद्रिय आणि विषय विरक्ता ही विशेषणे शीलाची प्रधानता दाखवतात ।।३५।।

पुढे म्हणतात की जे लावण्य आणि शील युक्त आहे ते मुनि प्रशंसेला योग्य असतात :-

लावण्णसीलकुसलो जम्ममहीरुहो जस्स सवणस्स ।
सो सीलो स महप्पा भमित्थ गुणवित्थरं भविए ।।३६।।

लावण्यशीलकुशलः जन्ममहीरुहः यस्य श्रमणस्य ।
सः शीलः स महात्मा भ्रमेत् गुणविस्तारः भव्ये ।।३६।।

www.vitragvani.com



अर्थ :— ज्या मुनिचे जन्मरूप वृक्ष लावण्य अर्थात् दुसऱ्याना प्रिय वाटतो असा सर्वांगसुंदर तथा मन, वचन, कायेची हालचाल सुंदर आणि शील अर्थात् अंतरंग, मिथ्यात्व विषयरहित, परोपकारी स्वभाव या दोन्हीत प्रवीण, निपुण असेल तो मुनि शीलवान आहे, महात्मा आहे, त्यांच्या गुणांचा विस्तार लोकात पसरतो, फिरतो.

भावार्थ :— अशा मुनिंचे गुण लोकात विस्तारतात, सर्व लोकांच्या प्रशंसेला योग्य होतात, येथे ही ''शीला''चा महिमा जाणावा आणि वृक्षाचे स्वरूप सांगितले जसे वृक्षाच्या शाखा, पत्र, पुष्प, फल सुंदर आहेत आणि छायादि करून राग द्वेष रहित सर्व लोकांवर समान उपकार करतील त्या वृक्षाचा महिमा सर्व लोक करतात असे मुनिच सर्वांकडून मोठेपणा करण्याला योग्य होतात. ।।३६ ।।

पुढे सांगतात कीं, जे असे आहेत ते जिनमार्गात रत्नत्रयाच्या प्राप्तिरूप बोधिला प्राप्त होतात:-

णाणं झाणं जोगो दंसणसुद्धी य 'वीरियायत्तं ।
सम्मत्तदंसणेण य लहंति जिणसासणे बोहिं ॥३७॥

ज्ञानं ध्यानं योगः दर्शनशुद्धिश्च वीर्यायत्ताः ।
सम्यक्त्वदर्शनेन च लभन्ते जिनशासने बोधिं ।।३७।।

अर्थ :— ज्ञान, ध्यान, योग, दर्शनाची शुद्धता हे तर वीर्याच्या आधीन आहे आणि सम्यक्दर्शनाचे जिनशासनात बोधि प्राप्त करतात, रत्नत्रयाची प्राप्ति होते.

भावार्थ :— ज्ञान, अर्थात् पदार्थाला विशेष रूपाने जाणणे, ध्यान अर्थात् स्वरूपात एकाग्रचित्त होणे, आणि योग म्हणजे समाधी लागणे, सम्यग्दर्शनाला निरतिचार शुध्द करणे हे तर आपल्या वीर्य शक्तीच्या आधीन आहे, जितके शक्य आहे तितकेच मिळते परंतु सम्यक्दर्शनाने बोधि अर्थात् रत्नत्रयाची प्राप्ति होते. हे झाल्याने विशेष ध्यानादिक ही यथाशक्ती होतातच आणि हे झाल्याने शक्ती वाढते असे सांगण्यात शीलाचे माहात्म्य जाणावे. 'रत्नत्रय' हा आत्म्याचा स्वभाव आहे त्याला शील असे ही म्हणतात . ।।३७।।

पुढे म्हणतात कीं, ही प्राप्ति जिनवचनाने होते :-

जिणवयणगहिदसारा विसयविरत्ता तपोधणा धीरा ।
सीलसलिलेण ण्हादा ते सिद्धालयसुहं जंति ॥३८॥

जिनवचनगृहीतसारा विषयविरक्ताः तपोधना धीराः ।
शीलसलिलेन स्नाताः ते सिद्धालयसुखं यांति ।।३८।।

www.vitragvani.com



अर्थ :— ज्यानी जिनवचनाचे सार ग्रहण केले आहे आरि विषयापासून विरक्त झाले आहेत, ज्यांचे तप च धन आहे असे होवून मुनि शीलरूप जलाने स्नान करून शुध्द झाले ते सिध्दालय जे सिध्दांचे राहाण्याचे स्थान अशा सुखाला प्राप्त होतात.

भावार्थ :— जे जिनवचनाच्या द्वारे वस्तुच्या यथार्थ स्वरूपाला जाणून त्याचे सार जे आपल्या शुध्द स्वरूपाची प्राप्ति त्याचे ग्रहण करतात ते इंद्रियांच्या विषयापासून विरक्त होवून तप अंगिकार करतात ते मुनि असतात, धीर वीर बनून परिषह उपसंग आल्यानंतर ही चलायमान होत नाहीत तेंव्हा 'शील' जे स्वरूपाच्या प्राप्तिच्या पूर्णता रूप ८४ लाख उत्तर गुणाची पूर्णता, असलेल्या निर्मल जलाने स्नान करून सर्व कर्ममलाला धुवून, सिध्द सिध्द झालेले, त्या मोक्ष मंदिरात राहून तेथे परमानंद अविनाशी अतीन्द्रिय, अव्याबाध सुखाला भोगतात, हे शीलाचे महात्म्य आहे. असे शील जिनवचनाने प्राप्त होत, जिनागमाचा निरंतर अभ्यास करणे उत्तम आहे. ।।३८।।

पुढे अंतसमयी सल्लेखना सांगितली आहे, त्यात दर्शन, ज्ञान, चारित्र, तप या चार आराधनांचा उपदेश आहे हे सुध्दां शीलानेच प्रकट होतात. त्याला प्रकट करून सांगतात :-

**सव्वगुणखीणकम्मा सुहदुक्खविवज्जिदा मणविसुद्धा ।**
**पप्फोडियकम्मरया हवंति आराहणा पयडा ।।३९।।**

सर्वगुणक्षीणकर्माणः सुखदुःखविवर्जिताः मनोविशुद्धाः ।
प्रस्फोटितकर्मरजसः भवंति आराधनाः प्रकटाः ।।३९।।

अर्थ :— सर्व गुण जे मूलगुण, उत्तरगुणाने ज्यात कर्म क्षीण झाले आहेत, सुख दु:खाने रहित आहेत, ज्यात मन विशुध्द आहे आणि ज्यात कर्मरूप रजाला नष्ट केले आहे अशी आराधना प्रकट होते.

भावार्थ :— प्रथम तर सम्यक्‌दर्शनासहित मूलगुण उत्तरगुणांच्या द्वारे कर्माची निर्जरा झाल्याने कर्माची स्थिती, अनुभाग क्षीण होतो, पूर्वी विषयामुळे कांहीं सुख दु:ख होत होते त्याने रहित होतो, नंतर ध्यानात स्थिर होवून श्रेणी चढतो तेंव्हा उपयोग विशुध्द होतो, कषायांचा उदय अव्यक्त असेल तेव्हा दु:ख सुखाची वेदना मिटते, नंतर मन विशुध्द होवून क्षयोपशम ज्ञानाच्या द्वारे कांहीं शोभातून, ज्ञेयान्तर होण्याचा विकल्प होतो तो मिटून एकत्ववितर्क अविचार नावाचे शुक्लध्यान १२ व्या गुणस्थानाच्या शेवटी होते हा मनाचा विकल्प मिटवून तो विशुध्द होतो.

नंतर घातिकर्माचा नाश होवून अनंत चतुष्टय प्रकट होतात हे कर्म रजाचे नष्ट होणे, अशा प्रकारची आराधनेची संपूर्णता प्रकट होणे आवश्यक आहे. जो चरमशरीरी आहे त्याना तर अशा प्रकारे आराधना प्रकट होवून मुक्तिची प्राप्ति होते. दुसऱ्यांची आराधना एक देश होते, शेवटी आराधन करून स्वर्ग प्राप्त होतो, तेथे

www.vitragvani.com



सागरा पर्यंत सुख भोगून तेथून निघून मनुष्य होवून आराधना संपूर्ण करून मोक्ष प्राप्त होतो. अशा प्रकारे जाणणे, हा जिनवचनाचे आणि शीलाचे माहात्म्य आहे ।।३९।।

पुढे ग्रंथ पूर्ण करतात तेथे असे सांगतात कीं, ज्ञानाने सर्व सिध्दि आहे हे सर्व जनांत प्रसिध्द आहे, ते ज्ञान असे असले पाहिजे याविषयी सांगतात :-

अरहंते सुहभत्ती सम्मत्तं दंसणेण सुविशुद्धं ।
सीलं विसयविरागो णाणं पुण केरिसं भणियं ।।४०।।

अर्हति शुभभक्तिः सम्यक्त्वं दर्शनेन सुविशुद्धं ।
शीलं विषयविरागः ज्ञानं पुनः कीदृशं भणितं ।।४०।।

अर्थ :— अरहंता मध्यें शुभ भक्तीचे असणे सम्यक्त्व आहे, ते कसे आहे ? सम्यक्दर्शनापेक्षा विशुध्द आहे, तत्वार्थाचा निश्चय ! व्यवहार स्वरूप श्रध्दान आणि बाह्य जिनमुद्रा नग्न दिंगबर रूपाचे धारण तसेच त्याचे श्रध्दान असे दर्शनाने विशुध्द अतिचार रहित निर्मल आहे असा तो अरहंत भक्तीरूप सम्यक्त्व आहे, विषयापासून विरक्त होणे शील आहे आणि ज्ञान ही हेच आहे तसेच याहून भिन्न ज्ञान कसे म्हटले आहे ? सम्यक्त्व, शीलाशिवाय तर ज्ञान मिथ्याज्ञान रूप अज्ञान आहे.

भावार्थ :— सर्व मतामध्यें हे प्रसिध्द आहे कीं, ज्ञानाने सर्व सिध्दि होते आणि ज्ञान शास्त्राने होते आचार्य म्हणतात कीं, आम्ही तर ज्ञान त्याला म्हणतो जे सम्यक्त्व आणि शील सहित आहे, असे जिनागमात म्हटले आहे यापेक्षा निराळे ज्ञान कसे आहे? यापेक्षा भिन्न ज्ञानाला तर आम्ही ज्ञान म्हणत नाही, यांच्या शिवाय तर ते अज्ञानच आहे आणि सम्यक्त्व व शील आहे ते जिनागमात असते. तेथे ज्यांच्याद्वारे सम्यक्त्व शील झाले आणि त्याची भक्ती असेल तर ओळखावे कीं, त्यांना त्याची श्रध्दा सम्यक्त्व होईल तेंव्हा विषयापासून विरक्त ते होणारच, जर विरक्त झाले नाहीत तर संसार आणि मोक्षाचे स्वरूप काय जाणणार? अशा प्रकारे सम्यक्त्व शील झाल्यानंतर ज्ञान, सम्यक्ज्ञान नांव प्राप्त होते. अशा प्रकारे या सम्यक्त्व शीलाच्या संबंधी ज्ञानाचा तसेच शास्त्राचा महिमा आहे. असे हे जिनागम आहे म्हणून संसारातून निवृत्ति घेवून मोक्ष प्राप्त करून देणारे आहे. ते जयवंत होवो. हा सम्यक्त्व सहित ज्ञानाचा महिमा आहे ते अंत मंगल जाणावे . ।।४०।।

अशा प्रकारे कुंदकुंद आचार्यकृत शीलपाहुड ग्रंथ समाप्त झाला.

याचे संक्षेपाने असे वर्णन केले आहे कीं, - शील नांव स्वभावाचे आहे आत्म्याचा स्वभाव असे वर्णन केले आहे कीं, - शील नांव स्वभावाचे आहे आत्म्याचा स्वभाव शुध्दज्ञान दर्शनमयी चेतना स्वरूप आहे तो अनादि कर्माच्या संयोगाने विभावरूप परिणमतो याचे विशेष मिथ्यात्व कषाय आदि अनेक आहेत,

www.vitragvani.com



याना राग, द्वेष, मोह असे ही म्हणतात, यांचे भेद संक्षेपाने ८४ लाख आहेत. विस्ताराने असंख्यात अनंत आहेत याना कुशील म्हणतात. यांच्या अभावरूप संक्षेपाने ८४ लाख उत्तर गुण आहेत. त्याना शील असे म्हणतात. हे तर सामान्य परद्रव्याच्या संबंधाच्या अपेक्षेने शील, कुशीलाचा अर्थ आहे आणि प्रसिध्द व्यवहाराच्या अपेक्षेने स्त्री संगाच्या अपेक्षेने कुशीलाचे १८००० भेद सांगितले आहेत यांच्या अभावाने शीलाचे १८००० भेद आहेत, याना जिनागमा प्रमाणे जाणून त्याचे पालन करावे. लोकामध्ये शीलाचा महिमा प्रसिध्द आहे, त्याचे पालन करावे. लोकामध्ये शीलाचा महिमा प्रसिध्द आहे, जे त्याचे पालन करतात ते स्वर्ग मोक्षाचे सुख प्राप्त करून घेतात. त्याना आमचा नमस्कार त्याप्रमाणे आम्हालाही शीलाची प्राप्ती होवो. ही प्रार्थना आहे.

* छप्पय *

आन वस्तुके संग राचि जिनभाव भंग करि;
वरतैं ताहि कुशीलभाव भाखे कुरंग धरि।
ताहि तजैं मुनिराय पाय निज शुद्धरूप जल;
धोय कर्मरज होय सिद्धि पावै सुख अविचल ।।
यह निश्चय शील सुब्रह्ममय व्यवहारैं तियतज नमैं ।
जो पालैं सबविधि तिनि नमूं पाऊं जिन भव न जनम मैं ।।

* दोहा *

नमूं पंचपद ब्रह्ममय मंगलरूप अनूप ।
उत्तम शरण सदा लहूं फिरि न परूं भवकूप ।।२।।

इति कुन्दकुन्द आचार्य स्वामी प्रणीत शीलप्राभृताच्या जयपूर निवासी पं. जयचन्द्रजी छाबडाकृत देशभाषामय वचनिकेचा **डॉ. रेखा जैन** कृत मराठी भाषानुवाद समाप्त होत आहे. ।।८।।

Shree Kundkund-Kahan Parmarthik Trust, Mumbai.

www.vitragvani.com



# * वचनिकाकारांची प्रशस्ति *

अशा प्रकारे श्री कुंदकुंद आचार्यकृत गाथाबंध पाहुडग्रंथ आहे यातील पाहुडांची देशभाषामय वचनिका लिहिली आहे. यातील ६ पाहूंडाच्या टीका, टीपणी प्राप्त होती. यातील टीका तर श्रुतसागर कृत आहे आणि टिपणी मागेच कोणीतरी दुसऱ्यानी लिहीली आहे. यात कित्येक गाथा तसेच अर्थ अन्यप्रकारचे आहेत माझ्या विचारात जे आले त्यांचा आश्रय घेतला आहे आणि शील पाहुड दोन्ही पाहुडाची टीका टिप्पणी मिळाली नाही म्हणून गाथेचा अर्थ मला प्रतिभासित झाला तसा लिहिला आहे.

श्री श्रुतसागरकृत टीका षट्पाहुडाची आहे, त्यात ग्रंथांतराची साक्षी आदि कथन बरेच आहे त्याच्या टीकेची ही वचनिका नाही, गाथाचा अर्थ करणारी वचानिका करून मला समजलेला भावार्थ मी लिहिलेला आहे. प्राकृत व्याकरण आदिका ज्ञान माझ्यात विशेष नाही म्हणून व्याकरण दृष्ट्या तसेच आगमाप्रमाणे शब्द आणि अर्थ अपभ्रंश झाला असेल तर बुध्दिमान पंडितानी हा मूलग्रंथ विचार करून शुध्द करून वाचणे, मला अल्पबुध्दि जाणून हसे न उडवता क्षमा करणे. सत्पुरूषांचा स्वभाव उत्तम असतो, दोष पाहून क्षमाच करतात.

येथे कोणी म्हणाले - तुमची बुध्दि अल्प आहे, तर अशा महान ग्रंथाची वचनिका कां केली? त्याना असे सांगायचे आहे कीं, या कालात माझ्या पेक्षा मंदबुध्दि बरेच आहेत त्यांना समजण्यासाठीं लिहिले आहे. यात सम्यक्दर्शन दृढ करण्यासाठी प्रधानरूपाने वर्णन आहे म्हणून अल्पबुध्दिवाल्याने ही वाचावे अर्थ जाणून घ्यावा म्हणजे त्यांचे जिनमताचे श्रध्दान दृढ होईल. हे प्रयोजन जाणून जसा अर्थ प्रतिभासहित झाला तसा लिहिला आहे आणि जे मोठे बुध्दिवान आहेत ते मूलग्रंथ वाचून ही श्रध्दान दृढ करतील. माझे कांहीं प्रसिध्दि, लाभ,पूजा असे प्रयोजन नाही. धर्मानुरागाने ही वचनिका लिहिली आहे. म्हणून बुध्दिमानानी क्षमा करणेच योग्य होईल.

या ग्रंथाच्या गाथा संख्या अशा प्रकारे आहे - प्रथम दर्शन पाहुडच्या गाथा ३६ (२) सूत्रपाहूडाच्या गाथा -२७ (३) चारित्र पाहुडच्या गाथा ४५ (४) बोध पाहुडच्या गाथा ६१(५) भावपाहुडच्या गाथा -१६५ (६) मोक्ष पाहुडच्या गाथा -१०६ (७) लिंगपाहुडच्या गाथा २२ (८) शील पाहुडच्या गाथा - ४० अशा प्रकारे आंठी पाहुडाच्या एकूण गाथांची संख्या ५०२ इतकी आहे.

* छप्पय *

जिनदर्शन निर्ग्रंथरूप तत्त्वारथ धारन,<br>
सूतर जिनके वचन सार चारित व्रत पारन ।

बोध जैनका जांनि आनका सरन निवारन,
भाव आत्मा बुद्ध मांनि भावन शिव कारन ॥
फुनि मोक्ष कर्मका नाश है लिंग सुधारन तजि कुनय ।
धरि शील स्वभाव संवारनां आठ पाहुडका फल सुजय ॥

* दोहा *

भई वचनिका यह जहाँ सुनो तास संक्षेप ।
भव्यजीव संगति भली मेटै कुकरमलेप ॥ २ ॥
जयपुर पुर सूवस वसै तहाँ राज जगतेश ।
ताके न्याय प्रतापतैं सुखी ढुढ़ाहर देश ॥ ३ ॥
जैनधर्म जयवंत जग किछु जयपुरमैं लेश ।
तामधि जिनमंदिर घणे तिनिको भलो निवेश ॥ ४ ॥
तिनिमैं तेरापंथको मंदिर सुन्दर एव ।
धर्मध्यान तामैं सदा जैनी करै सुसेव ॥ ५ ॥
पंडित तिनिमैं बहुत हैं मैं भी इक जयचंद ।
प्रेर्यां सबकै मन कियो करन वचनिका मंद ॥ ६ ॥
कुन्दकुन्द मुनिराजकृत प्राकृत गाथा सार ।
पाहुड अष्ट उदार लखि करी वचनिका तार ॥ ७ ॥
इहाँ जिते पंडित हुते तिनिनैं सोधी येह ।
अक्षर अर्थ सु वांचि पढ़ि नहिं राख्यो संदेह ॥ ८ ॥
तौऊ कछू प्रमादतैं बुद्धिमंद परभाव ।
हीनाधिक कछु अर्थ ह्वै सोधो बुध सतभाव ॥ ९ ॥
मंगलरूप जिनेन्द्रकूं नमस्कार मम होहु ।
विघ्न टलै शुभबंध ह्वै यह कारन है मोहु ॥१०॥
संवत्सर दस आठ सत सतसठि विक्रमराय ।
मास भाद्रपद शुक्ल तिथि तेरसि पूरन थाय ॥११॥

इति वचनिकाकार प्रशस्ति ।
जयतु जिनशासनम् ।
शुभमिति ।

डॉ. रेखा नविनचंद्र जैन
अे-१४ अभिमान श्री सोसायटी, गेट नं. २ "नविन" बंगला , पुणे -८ . मोबाईल :- ९८२३१९१६६७